म. ग्रं. सं. ठाणें
[विषय] निबंध
[क्र.] नं. ८०

# किमान्य टिळकांचीं

# व्या

# ख्या

# नें

निबंध ८०
२५/१/६८
नोंद नं. ८८३०

REFBK-0005706

किम्मत सव्वा रुपया

निबंध ६३८
२५।११५३८

७८३८

# कै. लोकमान्य टिळक

यांचीं

# व्याख्यानें

प्रकाशक

जनार्दन सखाराम करंदीकर, ट्रस्टी, केसरी-मराठा संस्था, पुणें

REFBK-0005706

सन १९३८

दा. क्र. १७०६

किम्मत सव्वा रुपया

प्रकाशक : **जनार्दन सखाराम करंदीकर**, ट्रस्टी, केसरी-मराठा संस्था,
५६८ नारायण पेठ, पुणें.

मुद्रक : **धोंडो वासुदेव विद्वांस**, ५६८ नारायण पेठ, **केसरी** प्रेस, पुणें.

# ओळख

के. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे व त्यांजसंबंधाचे महत्त्वाचे बहुतेक सर्व वाङ्मय प्रसिद्ध होऊन मराठी वाचकांना आता उपलब्ध झालें आहे. त्यांच्या आठवणी, लेख, सूक्ति, चरित्र व धार्मिक मतें हीं पूर्वीच छापून निघालीं असल्यामुळें लो. टिळकांविषयीं महाराष्ट्रांतील विद्यमान व भावी पिढ्यांना यथार्थ कल्पना येण्यास कोणत्याहि प्रकारची उणीव राहिलेली नाहीं. तशांतूनहि उणीव असलीच तर त्यांच्या व्याख्यानांची. लो. टिळकांनीं आपल्या हयातींत शेंकडों विषयांवर हजारों व्याख्यानें दिलीं असतील. केसरींतील त्यांच्या लेखांचे व जाहीर सभांतील त्यांच्या व्याख्यानांचे विषय प्रायः एकच असत. या दृष्टीनें पाहिल्यास कदाचित् कोणास त्यांचीं व्याख्यानें वाचावयास मिळत नाहींत ही उणीव तितक्या तीव्रतेनें भासणार नाहीं. तथापि मनुष्याच्या लेखनांत व भाषणांत कांहीं फरक रहातोच. भाषणापेक्षां लेखन अधिक औपचारिक ठेवतां येते. लेखनातल्या इतका औपचारिकपणा भाषणांत राखावयाचा म्हटलें तरी राखणें निसर्गतःच अशक्य असल्यामुळें मनुष्यांतील व्यक्तित्व यथार्थत्वानें समजण्यास लेखापेक्षां भाषणच अधिक उपयुक्त होय हे कबूल करावे लागते. म्हणून नमुन्यादाखल टिळकांचीं कांहीं भाषणें वाचावयास मिळण्याची जर सोय झाली तर ती जनतेस इष्टच वाटेल यांत शंका नाहीं.

लो. टिळकांच्या एकंदर आयुष्यक्रमांत १९०७ व १९०८ हीं दोन सालें अतिशय महत्वाचीं मानावीं लागतात. त्या दोन वर्षांत त्यांच्या नैसर्गिक गुणांचा विकास होत होत ते अगदीं पराकोटीला जाऊन पोंचले. त्यांच्या त्या वेळेपर्यंतच्या हयातींत वंगभंगाच्या निमित्तानें बंगाल्यांत उसळलेली चळवळ हीच पहिली मोठी व सामुदायिक चळवळ होय. चळवळ बंगाली लोकांची होती तरी ती लो. टिळकांनीं इतक्या आवेशानें व उत्साहानें उचलून धरली कीं, अखिल बंगालप्रांत त्यांचा अनुयायी बनला. त्याशिवाय महराष्ट्र हा सर्वस्वी त्यांचा होताच ! यामुळें राष्ट्राच्या राजकीय उन्नतिविषयीं टिळकांना वरील दोन वर्षांत विशेष आशा व उमेद उत्पन्न झाली. त्या आशेंत व उमेदींत त्यांनीं केलेलीं भाषणें अत्यंत सामर्थ्यवान, तडफदार, तेजस्वी व प्रभावशाली वठली आहेत. त्या व्याख्यानांचीं टिपणें केसरी कचेरींतील

टिळकांचे लेखक श्री. सदाशिव हरि भावे यांनीं घेतली होती. श्री. भावे हे व्याख्यानांचा यथातथ्य रिपोर्ट देण्यांत अत्यंत वाकबगार होते आणि याच गुणामुळें त्यांना लोकमान्यांनीं केसरी संस्थेंत नोकरी दिली. त्यामुळें लोकमान्यांची भाषाशैली, विषयांची मांडणी व लकबी त्यास पूर्णपणें परिचित झाल्या. अशा लेखकानें लोकमान्यांचीं भाषणें स्वत: ऐकून लिहिलीं आहेत इतकें सांगितलें म्हणजे तीं जशीच्या तशीच वठली असतील याविषयीं वेगळी शिफारस करण्याचें कारणच नाहीं.

श्री. सदाशिवराव भावे यांनीं घेतलेल्या व्याख्यानांचे दोन भाग आहेत. पैकीं पहिला भाग पुणें येथील ज्ञानमित्र मासिकाचे संपादक व मालक श्री. नारायण बळवंत चव्हाण यांनीं आपल्या भारत व्याख्यानमालेंतून सन १९०८ मध्यें प्रसिद्ध केला, व दुसरा भाग खुद्द सदाशिवराव यांनीं स्वतःच सन १९०९ मध्यें छापून काढला. पहिल्या भागांत १९०७ सालांतील व दुसऱ्या भागांत १९०८ सालांतील भाषणें आलीं आहेत. पण हे दोन्ही भाग सिडेनहॅमशाहींत लवकरच जप्त झाले. तेव्हांपासून जवळ जवळ २८।२९ वर्षें ते जगाच्या दृष्टीआड होते. त्यानंतर सुदैवानें राष्ट्रीय सभेच्या मंत्रिमंडळाच्या हातीं मुंबई इलाख्याचा राज्यकारभार आला व त्यांनीं अधिकारारूढ झाल्यानंतर जीं कित्येक लोकोपयोगीं कृत्यें केलीं त्यांपैकींच मराठींतील तेजस्वी वाङ्मयांवरील बऱ्याच प्रमाणांत उठविलेली जप्ती हें एक होय. लो. टिळकांच्या व्याख्यानावरील जप्ती याच धोरणास अनुसरून उठविण्यांत आली. अशा रीतीनें जप्ती उठली तरी तीं व्याख्यानें कोणी पुनः छापून प्रसिद्ध केलीं तरच वाचकांना मिळणार हे उघड आहे. केसरी-मराठा संस्थेनें लो. टिळकांचे सगळे वाङ्मय यापूर्वीं त्यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं क्रमानें प्रसिद्ध केलेंच आहे. त्यांत व्याख्यानांची एक उणीव शिल्लक राहिली होती. ती भरून काढणें केसरी-मराठा संस्थेचें कर्तव्यच असल्यानें तिनें सदर व्याख्यानें लो. टिळकांच्या यंदाच्या पुण्यतिथीस प्रकाशित करण्याचें योजलें. त्याप्रमाणें तीं वाचकांच्या हातीं देण्यास आज आम्हास आनंद वाटत आहे.

लो. टिळकांच्या राजकारणांत सन १९०७ व १९०८ या दोन वर्षांत त्यांनीं स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या चळवळी विशेष नेटाला लावल्या. सुरतेस भरलेले राष्ट्रीय सभेचे अधिवेशन सन १९०७ सालीं मोडल्यामुळें तें वर्ष राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत चिरस्मरणीय होऊन राहिलें आहे. त्या

सुमारास त्यांनीं केलेलीं भाषणें अत्यंत स्फूर्तिदायक व प्रखर ठरलीं आहेत. सुरतेंतील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनानंतर १९०८ साल उजाडून समर्थ विद्यालयाच्या मदतीकरितां लो. टिळक, चिंतामणराव वैद्य व प्रो. विजापूरकर यांनीं महाराष्ट्रांत दौरा काढला. त्या दौऱ्यांतील टिळकांचीं भाषणें राष्ट्रीय शिक्षण व स्वदेशी या दृष्टीनें बहुमोल आहेत. त्याच सालांत पुण्यांत जिल्हापरिषद होऊन मद्यपाननिषेधाबरोबर पिकेटिंगच्या चळवळीस सुरुवात झाली. ही चळवळ अखिल हिंदुस्थानांत पहिलीच होय यांत शंका नाहीं. त्यानंतर बंगाल्यांत मुजफरपूर येथें पहिला बॉंबगोळा उडाला व त्याच्या पाठोपाठ टिळकांच्या १८९८ ते १९०८ पर्यंतच्या दहा वर्षांच्या राजकारणावर पडदा पडला. त्या दहा वर्षांत लो. टिळकांनीं चळवळीकरितां जे विषय हातीं घेतले त्यांपैकीं बहुतेक विषयांची आज तड लागली आहे किंवा लागण्याच्या मार्गांत आहे असें म्हणण्यास हरकत नाही. लोकमान्यांनीं मद्यपाननिषेधाच्या चळवळीस हात घातला ते मद्यपान तीन वर्षांत बंद करण्याचा चंग बांधून आलेले सरकार त्यांच्याच म्हणजे राष्ट्रीय पक्षाचे आहे. ज्या स्वदेशी साखरेकरितां त्यांनीं टाहो फोडला त्या स्वदेशी साखरेचें महाराष्ट्र हे आगर बनून महाराष्ट्र हा त्यांच्या त्या-वेळच्या कल्पनेप्रमाणें मॉरिशस झाल्यासारखा आहे. ज्या राष्ट्रीय शिक्षणाकरितां त्यांनीं दौरा काढला ते शिक्षण घेऊन पदवी मिळविलेल्यांना सरकारच्या मान्यतेचा शिक्काहि नुकताच प्राप्त झाला आहे. आणि सर्वांच्या शिरोभागी नमूद करण्यासारखें परिवर्तन म्हटले म्हणजे प्रांतिक स्वराज्य हिंदी लोकांनीं संपादिलें हे होय. गेल्या तीस वर्षांत ही एक क्रांति किंवा मन्वंतरच घडून आले आहे यांत शंका नाहीं. त्या दृष्टीनें तीस वर्षांपूर्वी लहानसहान हक्काकरितां व लोकहिताकरितां लो. टिळकां-सारख्या पुढाऱ्यानांहि रक्ताचें पाणी कसें करावें लागत असे हे लक्षांत येऊन तत्कालीन चित्र व सद्यःकालीन चित्र यामधील फरक या व्याख्यानांत पहावयास मिळाल्याचें श्रेय वाचकांना लाभणार आहे.

केसरी-मराठा कचेरी, पुणें
सोमवार ता. १ ऑगस्ट १९३८ इसवी

**वासुदेव कृष्ण भावे**

# मूळ पुस्तकाची प्रस्तावना*

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्याइतका विद्वान्, नीतिमान्, मुत्सद्दी किंवा करारी देशभक्त साऱ्या हिंदुस्थानांत दुसरा क्वचितच सांपडेल. कोणी देशभक्त विद्वान् असला तर अनीतिमान् असेल; कोणी नीतिमान् असला तर बुद्धिहीन असेल; कोणी मुत्सद्दी असला तर करारी नसेल; किंवा कोणी करारी असला तर मुत्सद्दी नसेल. पण लो. टिळक यांच्यांत सारे गुण एकवटलेले आहेत; आणि म्हणूनच आपलें शरीर, अंतःकरण व बुद्धि, सर्वस्वी देशकार्यार्थ वाहणाऱ्या या लोकनायकाचे विचार, भाषण व वर्तन हीं सर्वत्रांस वंद्य व अनुकरणीय झाली आहेत. देशाकरितां अंतःकरण कसें तुटलें पाहिजे, अंतःकरणांत खरा उमाळा आला म्हणजे वाणी कशी तेजस्वी निघते, आणि ‘ स्थितप्रज्ञ ’ झालेले देशभक्त केवळ परोपकार करण्याच्या बुद्धीनें, एकनिष्ठेनें व स्वार्थत्यागानें देशास मार्गदर्शक होऊन देशाचें हितवर्धनही कसें करतात, याचें हिंदुस्थानांतील उत्कृष्टांतील उत्कृष्ट उदाहरण लो. टिळक यांचेंच आहे. त्यांचीं व्याख्यानें ज्यांना ऐकावयास मिळालीं ते तर भाग्यवानच होत, पण ज्यांना ऐकावयास मिळालीं नाहींत अशा मराठी वाचकांपुढें तीं व्याख्यानें पुस्तकरूपानें ठेवून देशबंधूंची सेवा करावी, आणि लोकमान्यांच्या योगारूढ मानसिक स्थितींत राजद्रोहाच्या खटल्याचे अखेरीस निघालेल्या उद्गाराप्रमाणें, स्वतः त्यांच्यावर देशकार्यार्थ हालअपेष्टा भोगण्याचा प्रसंग आला असतां त्यांनीं अंगीकृत केलेल्या कार्याचा उत्कर्ष त्यांच्या अनुयायांनीं कसा करावा, हें त्यांच्याच शब्दांत होईल तितकें लोकांपुढें मांडावें, म्हणून लोकमान्यांचीं व्याख्यानें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. त्याप्रमाणें पहिल्या भागांत १९०७ सालांतील शिवाजी—उत्सवापासून तों त्याच सालांत सुरतच्या राष्ट्रीय सभेंतील बखेड्यापर्यंत—म्हणजे डिसेंबर अखेर—पर्यंतचीं व्याख्यानें प्रसिद्ध झालीं.

---

* पहिल्या भागाची प्रस्तावना दुसऱ्या भागाच्या प्रस्तावनेंत समाविष्ट केली गेली असल्यामुळें दुसऱ्या भागाचीच तेवढी प्रस्तावना उद्धृत केली आहे. —प्रकाशक.

आतां दुसरा भाग प्रसिद्ध होत असून या भागांत १९०८ च्या सुरवातीपासून तों १९०८ च्या शिवाजी-उत्सवापर्यंतचीं लोकमान्यांचीं व्याख्यानें प्रसिद्ध केलीं आहेत. यापुढें त्यांचें व्याख्यानच झालें नाहीं. आमच्या खडतर नशिबानें आमच्याचकरितां त्यांस कारागृहवास भोगावा लागत असल्यामुळें त्यांच्या देशभक्तिपूर्ण, तेजस्वी, विद्वत्ताप्रचुर व उत्साहजनक लेखांस किंवा भाषणांस सध्यां तरी आम्ही अंतरलो आहो !

राष्ट्रीय पक्षास मूलभूत असलेल्या तत्त्वांचें व धोरणाचें सार या भागांतील व्याख्यानांत वाचकांस सांपडेल अशी आशा आहे. या व्याख्यानांचे विषय वादग्रस्त झाले असून नेमस्त व राष्ट्रीय यांमध्यें वादाचें जें रण माजलें आहे त्यांत सत्पक्ष कोणता आहे, हें समजावून घेण्यासही हीं व्याख्यानें उपयोगी पडणार आहेत. लोकमान्यांच्या व्याख्यानांचें गुणवर्णन करीत बसणें म्हणजे सहस्त्ररश्मी सूर्यनारायणास मिणमिण्या दिवलीनें प्रकाशित करण्याचा प्रयत्न केल्यासारखें हास्यास्पद होणार असल्यामुळें त्या भरीस न पडतां तीं वाचकांस सादर करितों, व इतकेंच सांगतों कीं त्यांत कांहीं कमीपणा वाटल्यास तो व्याख्यानें उतरवून घेण्यांत झालेल्या चुकीमुळें आला आहे असेंच समजावें.

मनुष्यकृति नेहमीं सदोष असावयाचीच; त्याप्रमाणें ही कृतीही आहे. तरी त्यांतील लिहिण्याच्या किंवा छपाईच्या ज्या चुका वाचकांना आढळतील त्यांकडे सदय दृष्टीनें अवलोकन करून माझे स्वदेशभक्त देशबंधु लोकमान्यांच्या मुख्य उपदेशाकडेच विशेष लक्ष देतील अशी आशा आहे. लोकमान्यांनीं दिलेल्या, १९०७ सालापूर्वींच्या व्याख्यानांपैकीं महत्वाच्या निवडक व्याख्यानांचें पुस्तक लवकरच प्रसिद्ध करण्याचा विचार आहे.

पुणें, शनिवार पेठ,<br>फाल्गुन वद्य २ शके १८३०

सर्व स्वदेशभक्तांचा सेवक,<br>**सदाशिव हरी भावे**

# अनुक्रमणिका


| अ. नं. | व्याख्यानें | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | श्रीशिवाजी उत्सव, इंग्रजी राज्य, व हिंदुस्थानाचें प्राप्तव्य | १ |
| २ | सरकार व महाराष्ट्रांतील मद्यपान | ११ |
| ३ | राष्ट्रीय सद्गुण व व्यक्तिविषयक सद्गुण | १६ |
| ४ | राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय? | २२ |
| ५ | हिंदुधर्मांतील एकी व सहिष्णुता | २६ |
| ६ | हिंदुधर्मांतील कर्मफलाची कल्पना | ३३ |
| ७ | देशाला काय पाहिजे आहे! | ३८ |
| ८ | कर्मफलासक्ति | ४७ |
| ९ | आमचें कर्तव्य | ४८ |
| १० | गणेशोत्सवाचा समारोप | ५३ |
| ११ | सभाबंदीचा कायदा | ५६ |
| १२ | पैसा—फंड | ६० |
| १३ | चालू शिक्षणपद्धति व स्वावलंबन | ६७ |
| १४ | स्वदेशहित कसें साधावें ? | ७१ |
| १५ | सरकारी आश्वासनें व हिंदी लोक | ७८ |
| १६ | इंग्रजी राज्य व आमचें कर्तव्य | ८२ |
| १७ | सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण | ८६ |
| १८ | मजूर व स्वदेशी चळवळ | ९७ |
| १९ | राष्ट्रीय सभेची पछेहाट! | १०५ |
| २० | राष्ट्रीय पक्ष व 'राष्ट्रीय सभा' | ११३ |
| २१ | राष्ट्रीय सभेंत दुही! | १२६ |
| २२ | बाबू अरविंद घोष यांचा उपदेश | १३७ |
| २३ | भक्ति | १३८ |

२४ श्रीरामदास—'प्रवृत्ति व निवृत्ति '... ... ... १४२
२५ श्रीरामदास स्वामी यांची कामगिरी ... ... ... १४८
२६ राष्ट्रीय शिक्षण ... ... ... १५७
२७ स्वावलंबनाची आवश्यकता ... ... ... १६७
२८ आपले शत्रु आपणच ! ... ... ... १७३
२९ मद्यपाननिषेध ... ... ... १७८
३० राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा ... ... ... १८६
३१ स्वदेशी व्रत ... ... ... १९३
३२ बाबू बिपिनचंद्र पाल यांची मुक्तता ... ... ... १९८
३३ राष्ट्रीय शिक्षण व लोकांचें कर्तव्य ... ... ... २००
३४ मद्यपाननिषेधाच्या चळवळीची दिशा ... ... २०५
३५ रयतेचीं दुःखें ! ... ... ... २०८
३६ साखरेचे कारखाने ... ... ... २११
३७ कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर व 'राष्ट्रीय शिक्षण' ... २१२
३८ पुणें येथील मद्यपाननिषेधाची चळवळ ... ... २१४
३९ राष्ट्रीय शिक्षणाची दिशा ... ... ... २१७
४० राष्ट्रीय सभा व राष्ट्रांतील पक्ष ... ... ... २२०
४१ राष्ट्रीय सभा व बहुमताविरुद्ध असलेले लोक ... ... २२८
४२ आमची दुःस्थिति व त्यावर उपाय ... ... ... २३०
४३ श्रीशिवाजी महाराज व परिस्थितीचें बंड ... ... २३७
४४ आमची दुःस्थिति व आमचें प्राप्तव्य... ... ... २४६
४५ राजकीय साध्यसाधन—मीमांसा ... ... ... २५३
४६ आमच्या गरजा ... ... ... २६५
४७ कामकरी लोक व दारूचें व्यसन ... ... ... २७४
४८ राजकीय चळवळ यशस्वी कशानें होते ? ... ... २८१
४९ स्वराज्याची गुरुकिल्ली ... ... ... २८५

# चिंतनीय उद्गार !

बुधवार ता. २२ जूलै १९०८ रोजीं रात्रीं दहा वाजण्याचे सुमारास, मुंबई हायकोर्टांत, जास्टिस दावर शिक्षा देण्यास सज्ज झाले; आणि 'तुम्हाला कांहीं बोलावयाचे आहे काय ?' असा त्यांनीं प्रश्न केला; तेव्हां त्यांस उत्तर म्हणून लो. टिळक म्हणाले:—

"ज्यूरीनें कसाही निकाल दिलेला असला तरी मी पूर्णपणे निरपराधी आहें, असेंच मी पुन्हा निक्षून सांगतों. जगतांतील व्यवहारांचें नियमन करणाऱ्या अधिक श्रेष्ठ प्रतीच्या शक्ति आहेत; आणि मी मोकळा राहण्यापेक्षां माझ्या हालअपेष्टांनींच माझ्या अंगीकृत कार्याचा अधिक उत्कर्ष व्हावा, असा कदाचित् ईश्वरी संकेत असेल !"



लो. बाळ गंगाधर टिळक व्याख्यान देत आहेत.

# लो. टिळक यांचीं व्याख्यानें

## श्रीशिवाजी-उत्सव, इंग्रजी राज्य व हिंदुस्थानाचें प्राक्तन

एकोणिसशें सात सालच्या जून महिन्यांत पुणें येथें लकडीपुलाजवळील श्रीविठ्ठल-मंदिरांत जो श्रीशिवाजी उत्सव झाला त्याच्या शेवटच्या दिवशीं (ता. २४ जून रोजीं) लो. टिळक यांनीं अध्यक्ष या नात्यानें उत्सवाचा उपसंहार केला तो येणेंप्रमाणें:—

"यंदांचा उत्सव १४ वा म्हणून सांगण्यांत आला, पण खरा १४ वा उत्सव होण्यास अद्याप तीन वर्षें अवधि आहे. १८९६ सालीं हा उत्सव येथें प्रथम सुरू झाला व त्याच्या पुढच्याच वर्षी त्यावर संकट आलें; तथापि त्यांतूनही तो पार पडून टिकला आहे. यंदाच्या सालीं त्यावर पुनः किटाळ येईलसें वाटत होतें; परंतु त्यांतूनही तो निर्विघ्नपणें पार पडला. याबद्दल परमेश्वराचे आभार मानिले पाहिजेत. हल्लींचा काळ अस्वस्थतेचा आहे; तेव्हां येथेंही अस्वस्थता होते कीं काय व न झाल्यास करतां येईल कीं काय, अशी कित्येकांची तयारी होती असें दिसत होतें. पण कोणत्याही प्रकारची गडबड न होतां हा उत्सव पार पडला ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. माझें असें म्हणणें नाहीं कीं दंगाधोपा मोडण्याची सरकारी अधिकाऱ्यांनीं तयारी करूं नये. उलट हें त्यांचें कर्तव्यच आहे असें मीं समजतों. पण त्यांचें चुकतें आहे तें हें कीं, अशा प्रसंगीं दंगेधोपे करण्याकरितां आम्ही जमतों असें ते मानतात! तीन दिवसांत येथें काय झालें, तर रा. प्रधान यांनीं उत्सवाच्या पहिल्या दिवशीं सद्यःस्थितीसंबंधानें कांहीं विचार आपल्यापुढें मांडले;

दुसऱ्या दिवशीं माझे मित्र रा. शिवरामपंत परांजपे यांनीं राजा व प्रजा यांच्या परस्परसंबंधाच्या पाश्चात्य कल्पना—विशेषतः त्यांच्यामधील मूळ कराराची कल्पना—प्लेटोपासून रूसोपर्यंत कशी वाढत गेली हें सांगितलें; व रा. भागवत यांनीं शिवाजीची सेनानी, मुत्सद्दी व लोकनायक या दृष्टीनें काय योग्यता होती हें आपणाला कळविलें. आज तिसऱ्या व शेवटचे दिवशीं, रा. खाडिलकर यांनीं शिवाजीच्या वेळच्या मुत्सद्यांचें गुणवर्णन करून शिवाजीच्या व त्यांच्या अंतिम हेतूंत काय फरक होता हें सांगितलें. यांत लपवण्यासारखें तें काय ? व हीं भाषणें लिहून घेण्याला पोलिसांचे येथें १५ रिपोर्टर तरी कशाला पाहिजेत ? ते आले म्हणून आम्ही कांहीं भीत नाहीं. फार लांब कशाला, कलेक्टर किंवा गव्हर्नर ऐकावयाला येतील तर मी तें चांगलेंच म्हणेन. आमच्या देशांत असल्या उत्सवानें जागृति करण्याचा आमचा हेतु आहे; आणि हा हेतु आम्ही कांहीं लपवून ठेवूं इच्छित नाहीं. आम्हाला जें कांहीं बोलावयाचें तें आम्ही उघड उघड बोलतों.

इंग्रजी साम्राज्यांत इतर नागरिकांस जे हक्क आहेत ते आम्हांस प्राप्त व्हावे एवढ्याकरितां आमची ही चळवळ आहे; आणि ते हक्क आम्ही मिळवूं तेव्हांच स्वस्थ बसूं. आम्हांस जें कांहीं पाहिजे आहे आणि आम्ही जें कांहीं मागतों तें हेंच. यांत चोरी कसची ? आमच्या देशांत कांहीं आम्ही चोर नाहीं; जें कांहीं आम्ही बोलतों तें सरकारला कळण्याकरितांच आम्ही बोलतों; आणि त्यांना ऐकावयाचेंच असेल तर घरीं, दारीं, दुसऱ्या कोठेंही, तें सांगण्यास आम्ही तयार आहों. मी स्पष्ट सांगतों कीं—देवासमोर सांगतों, मग साहेबासमोर तर सांगेनच—दंगाधोपा करण्याचा आमचा बिलकुल हेतु नाहीं. मग हा एवढा रिपोर्टरांचा खटाटोप कशाला व असल्या बातम्या मिळविण्याकरितां २ लाख रुपये खर्चून जादा पोलीस ठेवण्यांत तरी काय हांशील ? गरीब लोकांकडून कराच्या रूपानें घेतलेल्या पैशाचा माझ्या मतें हा अपव्यय आहे. एवढ्या पैशांत एखादी धंदेशिक्षणाची शाळा काढली तर त्याचा पुष्कळ चांगला उपयोग होईल. बंड करण्यास अवश्य लागणारा दारूगोळा, बंदुका, पैसा वगैरे सामुग्री आमच्याजवळ नाहीं, आणि सरकारापाशीं एका तासांत हजार गोळ्या बाहेर पडणाऱ्या 'मशीनगन' सारखीं अनेक यंत्रें आहेत, हें आम्हांला माहीत नाहीं काय ? कॉलेजांत शिकून जे बी. ए., एम्. ए.,

एल्एल्. बी. झाले त्यांना काय एवढें समजत नाहीं ? बरें, आम्ही जें बोलतों तेंही कांहीं गुप्त बोलत नाहीं. घरीं, दारीं, वर्तमानपत्रांत हेंच सांगतों. मग हे डिटेक्टिव कशाला ? सरकारला आमचें ऐकायचेंच असेल—आणि त्यांनी तें ऐकावें म्हणून आम्ही बोलतों—तर मग सरकारी अधिकाऱ्यांनी येथें येऊन आमचें बोलणें खुशाल ऐकावें. पण त्यांना ऐकायचें आहे कोठें ? वक्तयास एखाद्या शब्दांत पकडून त्याला कैदेंत कसा घालतां येईल—फांसांत कसा अडकवितां येईल—याकरितां हे डिटेक्टिव आहेत. राजाप्रमाणें आम्हांला जरी 'चार' किंवा 'डिटेक्टिव' ठेवतां न आले, तरी एवढें खूप समजा कीं, परमेश्वर हा सर्वांत मोठा डिटेक्टिव आहे आणि तो सारें पहात आहे !

## मोर्ले साहेबांचें पांडित्य

मोर्ले म्हणतात, सुशिक्षित लोक आमचे शत्रू. कां ? तर राजकीय बाबतींत ते आमच्या विरुद्ध चळवळ करतात म्हणून. अडाणी लोकांचे या सुशिक्षितांस पाठबळ नाहीं, अशीही मोर्ले साहेबांनीं कोटी केली आहे. जणूं काय अडाणी लोकांनादेखील या गोष्टींचें ज्ञान असलेंच पाहिजे ! बरें, यांना सरकार शिकवील म्हणावें तर तेंही नाहीं. मोर्लेंच्या मतें आम्हांस मिळालेल्या शिक्षणामुळें आम्ही त्यांचे शत्रू बनलों आहों. आम्हांस ज्ञान मिळालें नसतें तर आम्ही कांहीं त्यांचे शत्रू झालों नसतों; आणि मग आमची गणना अडाणी वर्गांबरोबर मित्रांतच झाली असती. सारांश, आम्ही शत्रू नव्हे तर आमच्यामधील ज्ञान हें सरकारचें शत्रू आहे. ॲडमला ज्ञान मिळालें—त्यानें ज्ञानाचें फळ चाखलें—म्हणून तो परमेश्वराचा शत्रू झाला. आम्हांस ज्ञान प्राप्त झालें म्हणून आम्ही सरकारचे शत्रू. अर्थात सरकार हें ज्ञानाचें शत्रू झालें, आणि ज्ञानाचे शत्रू कोण असतात हें आपल्याला माहीतच आहे ! मी आतां सांगितलेंच आहे कीं, आम्हांला कांहीं दंगाधोपा करावयाचा नाहीं. शिवाजी उत्सवापासून आम्हांस जें काय शिकावयाचें तें निराळेंच आहे. शिवाजीनें ज्या उपायांचें अवलंबन केलें तेच उपाय सद्यःस्थितींत पुनः अमलांत आणा असें कोणी म्हणत नाहीं. पण ज्या बुद्धीनें ते उपाय तेव्हां शोधून काढले तशा प्रकारची बुद्धि आमच्या अंतःकरणांत नेहमीं जागृत पाहिजे. ती बुद्धि, तो उत्साह किंवा तें धैर्य उत्पन्न करण्याकरितां हे उत्सव आहेत.

अशा प्रसंगीं कोणीहि कुबुद्धीनें येथें येऊन बोलत नाहीं. रिपोर्टरांनीं आमचीं भाषणें खुशाल उतरून घ्यावीं; आम्ही कांही त्यांस भीत नाहीं. माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, सगळें उतरून घ्या. किंबहुना रिपोर्ट मजजवळ आणाल तर मीही तो दुरुस्त करून देईन. आम्हांला तरी सरकारास आम्ही काय म्हणतों तें कळवावयाचेंच आहे. कोणींही असें म्हणत नाहीं, कीं बेकायदेशीर मार्गाचा लोकांनीं स्वीकार करावा. आमचे कायदेशीर मार्ग कोठें अद्याप संपले आहेत, तर बेकायदेशीर मार्गांचें अवलंबन करावयाचें! दुर्दैवानें सरकारच्या वर्तनामुळें बेकायदेशीर मार्ग स्वीकारण्याची वेळ आली तर पुढचें पुढें पाहतां येईल. सध्यां कांहीं ती वेळ नाहीं; आणि तसा कोणाचा हेतूही नाहीं. अशा वेळीं कायदेशीर चळवळ बेकायदेशीर ठरवून लाला लजपतरायासारख्या पुरुषास ब्रह्मदेशांत पाठविणें हें गैरशिस्त होय; आणि मोर्लेसारख्यांनीं त्यांस संमति द्यावी यासारखें इंग्रजी राज्यास माझ्या मतें दुसरें कोणतेंही अपायकारक नाहीं. मोर्ले हे पंडित आहेत. नाहीं कसें म्हणावें? त्यांचे ग्रंथच तशी साक्ष देतात. पण पंडित निराळे व मुत्सद्दी निराळे. मुत्सद्दी पंडित असावा लागत नाहीं व प्रत्येक पंडित मुत्सद्दी असतोच असें नाहीं. मोर्ले साहेबांवरून काशीच्या कांहीं पंडितांची मला आठवण होते. हे भले जाडे विद्वान्, कोणी नैय्यायिक तर कोणी वैय्याकरणी. पण प्रिन्स ऑफ वेल्स आले तेव्हां ह्यांनींच सरस्वतीची मूर्ति त्यांस अर्पण केली! लक्ष्मी गेलीच होती आणि सरस्वतीही देऊन टाकली!

मोर्ले साहेबांची गोष्ट अशांतलीच आहे. त्यांना भिकारी सुशिक्षितांची काय पर्वा? ते म्हणतात कीं, राजेरजवाड्यांचा वर्ग सरकारच्या बाजूचा आहे. बरोबर आहे; कारण, नाहीं तर त्यांचें राज्य जाईल! इंग्रजी जाहिरनाम्यापेक्षां राजकीय सभा बंद करण्याकरितां कांकणभर जास्त कडक जाहिरनामा कोल्हापूर दरबारकडून निघाला, त्यांतील बीज तरी हेंच. व्यापारी वर्ग सरकारच्याच बाजूचा; कारण त्यांचा बहुतेक व्यापार विलायती मालाचा. अधिकारी वर्ग जाणून बुजून सरकारनें नेमलेला तेव्हां तो सरकारच्या बाजूचा असावयाचाच. कुळंबी, माळी त्यांना तर कांहीं समजत नाहीं, पण ते आमचेच असले पाहिजेत; कारण आम्हीं त्यांचे राजे! मोर्ले साहेबांची ही कोटी परवां लोगन साहेबांनीं कायदेकौन्सिलांत सांगून,

आपण म्हणजे अधिकारी वर्ग शेतकऱ्यांचे मित्र, आणि पुढें बसलेले लोकनियुक्त सभासद केवळ सावकारांचे मित्र, असें चापून विधान केलें. कुळंब्यांना किंवा शेतकऱ्यांना कांहीं कळतच नाहीं, तेव्हां त्यांच्यासंबंधानें या अधिकाऱ्यांनीं काय वाटेल तें बोलावें!

## राजा देव तर प्रजाहि देवच

असो; अशा तऱ्हेनें हिंदुस्थानांतील लोकांचें वर्गीकरण करून त्यांच्या सुखाकरितां हल्लींची राज्यपद्धति आकल्पांत—त्यांची दृष्टि पोहोंचते तोपर्यंत—चालावी, असें मोर्ले साहेबांनीं म्हटलें आहे. राहतां राहतां सुशिक्षितांचा वर्ग राहिला व त्यांस मोर्ले यांनी 'शत्रू' म्हणून खड्यासारखें निवडून काढलें आहे. ते म्हणतात कीं, शिक्षणानें हा वर्ग असंतुष्ट होऊन राज्यकारभारांत आपल्याला घ्या अशी मागणी करील, असें पूर्वींच भाकीत झालें होतें. पण हा वर्ग राज्यकारभार चालविण्यास लायक नसून केवळ पोटासाठीं हल्लींची धडपड चालू आहे. सुशिक्षित वर्ग गरीब आहे हें मलाही मान्य आहे. लक्ष्मी आणि सरस्वती क्वचितच एकत्र वास करितात. परंतु आह्मीं 'गरीब' म्हणून आमची अशी उपेक्षा करणें मात्र बरोबर नाहीं. आमच्याजवळ ज्ञान आहे आणि **ज्ञान केव्हांही गरीब नसतें.** वर मोर्ले यांनीं सांगितलेले लोक आज आम्हांस अनुकूल नसतील; पण पुढेंमागें आह्मी त्यांस आमच्यांत ओढूं. राजकीय चळवळ करणारांपाशीं संपत्तीच असली पाहिजे असें नाहीं. रशिया, जर्मनी वगैरे देशांत चळवळ करणारे लोक गरीबच आहेत. आणि आमच्या देशांतील उदाहरण पाहिजे असल्यास चाणक्याचें आहे. त्याला श्राद्धाचें आमंत्रण होतें व तेथें अग्रस्थान मिळालें नाहीं म्हणून तो अपमान सहन न करितां 'नंदाचा उच्छेद करीन तेव्हांच शेंडी बांधीन' अशी त्यानें प्रतिज्ञा केली; आणि शेवटासही नेली! सारांश, भिकारी म्हणून आमचा तिरस्कार करणें योग्य नाहीं. मोर्लेही एकदां गरीबच होते. मोर्लेसारखीं शहाणीं शहाणीं माणसें जेव्हां अशा चुका करितात, तेव्हां क्रांतीची वेळ जवळ आली आहे म्हणून समजावें. मोर्ले देतील, देतील असें कित्येकांस वाटत होतें पण कांहीं नाहीं. परक्यांशीं विरोध आला असतां कौरव, पांडव मिळून जसे १०५, तसें हिंदुस्थानाचा प्रश्न निघाला असतां कॉन्सर्व्हेटिव्ह आणि लिबरल १०५ आहेत. बाल्फोरनें विचारावें आणि मोर्लेनें उत्तर द्यावें; हा गुरुशिष्यसंवाद! यापासून कांहीं एक निष्पन्न व्हावयाचें

नाहीं. **आम्हांस जे हक्क मिळावयाचे आहेत ते आम्ही स्वतःच्याच प्रयत्नानें मिळविले पाहिजेत,** आणि या सर्व कार्यांची जबाबदारी तरुण पिढीवर आहे. धैर्यानें, नेटानें, कायदेशीर रीतीनें व इतिहासाला धरून त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे. रा. परांजपे यांनीं राजा व प्रजा यांमधील संबंध ‘करारावर’ रचल्याची कल्पना आपणाला सांगितली व रा. दामले यांनीं १८५८ सालचा जाहीरनामा हा आमच्याकडे तशा प्रकारचा ‘करारनामा’ आहे, असें म्हटलें. पण माझ्या मतें हा करार नाहीं, तर लोकांना तेवढ्या वेळेपुरतें शांत करण्याकरितां काढलेला एक मुत्सद्दीपणाचा लेख आहे— ही एक प्रकारची फसवणूक आहे. बलिष्ठ व निर्बल यांच्यांत करार होत नाहीं, त्यांस दोन्ही समानबल पाहिजेत. अधिकारी आणि प्रजा यांच्यांत करार कसला? प्रजा शिरजोर झाली म्हणजे कराराची सबब पुढें करून त्याच्या जोरावर राजाशीं भांडावयाचें, ही पाश्चिमात्यांची एक शक्कल किंवा कल्पना आहे; व राज्यव्यवस्थेचा पाया व्यावहारिक तत्त्वावर रचण्याचा तिकडील विद्वान लोक प्रयत्न करीत असल्यामुळें ती निघाली आहे. पण आम्हाला तेवढ्यामुळें समाजरचनेची आमची जुनी धार्मिक कल्पना सोडून देण्यास नको. राजा देव आहे. हो आहे, नाही कोण म्हणतो? पण प्रजा कोण? देवच. अर्थात् प्रजादेवानें राजदेवतेचा जुलूम सोसलाच पाहिजे असें अनुमान यापासून निघत नाहीं. ज्या मनूनें “महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति” असें राजाचें गौरव सांगितलें, त्यानेंच राजाच्या पाठीमागें राजधर्म लावून देऊन ते धर्म त्यानें न पाळले तर तो नरकांत जाईल, असें स्पष्ट म्हटलें आहे!

हे धर्म किंवा कायदे बदलण्याचें हल्लींच्या प्रमाणें राजाच्या हातांत पूर्वी नसे. ऋषि धर्म सांगत व राजास ते पाळावे लागत. मनु सांगतो कीं, लाला लजपतरायाप्रमाणें **शिक्षेस पात्र नसलेल्या गृहस्थास जर राजा शिक्षा करील, किंवा शिक्षेस पात्र असणारास सोडून देईल, तर तो “अयशो महदाप्नोति नरकं चापि गच्छति” म्हणजे नरकास जाईल.** राजा देव झाला म्हणून त्यानें वाटेल तो अन्याय करावा, असें आमच्या शास्त्रांत कोठेंही सांगितलें नाहीं. उलट तो जेव्हां अन्याय करूं लागतो तेव्हां देवाचा दुसरा अवतार होतो; या दोन देवांचा झगडा होतो; आणि पहिला देव जाऊन त्याच्या जागीं दुसरा देव येतो. परशुराम व राम दोन्ही विष्णूचेच अवतार. पण काय झालें? परशुरामाला रामापुढें माघार

घ्यावी लागली. आणि त्याच्या तोंडांतून ज्योत निघून ती रामाच्या तोंडांत गेली. मग परशुराम मनुष्यच राहिला. सारांश, राजा देव आहे असें मानलें तरी तेवढ्यानें जुलुमाचें आणि अन्यायाचें समर्थन होत नाहीं. अन्याय करणारा देव असुर होतो आणि दुसरा देव त्याच्या जागीं येऊन त्याला काढून टाकतो; हें लक्षांत ठेवलें म्हणजे 'ना विष्णुः पृथिवीपतिः' या तत्त्वांत कोठें न्यून रहात नाहीं. शिवाजीला कांहीं लॉक, हूकर, हॉब्स, यांचीं नांवें अगर कराराची कल्पना माहीत नव्हती. त्याची समजूत आमच्या धर्मांत किंवा वेदांतांत सांगितल्याप्रमाणेंच होती. मात्र तो वेदांत कसा व कुठें लावावयाचा हें त्यास चांगलें कळत होतें. माझ्यासमोर हे हरदास आहेत. ते सांगतात कीं, एका गृहस्थाच्या घरीं एक पाहुणा आला. त्यानें आपलें गांठोडें घरधन्यापाशीं ठेविलें, आणि जातांना आपल्याबरोबर घरधन्याचेंही गांठोडें घेऊन चालला. कां? तर परब्रह्म परब्रह्माला घेऊन चाललें! अशा गृहस्थाच्या पाठीत एक भलें मोठें परब्रह्म— लांकूड घालणें हाच खरा वेदांत होय. **वेदांत ठीक आहे, तो लावावयास मात्र शिकलें पाहिजे.** राजा जर ब्रह्म आहे तर आम्ही तरी कोठें माया आहों? आम्हीही ब्रह्मच. श्रीकृष्णाला हा वेदांत बरोबर माहीत होता, व म्हणूनच त्यानें अर्जुनास युद्ध करण्यास सांगितलें. सारांश, राजा जर आपले धर्म सोडून कोणतेंही कृत्य करील तर आमच्या जुन्या धर्माप्रमाणेंही त्या चुकीचें त्यास प्रायश्चित्त भोगावें लागेल.

## संकटांशिवाय कार्यसिद्धि नाहीं

मि. मोर्ले यांनीं जी मोठी चूक केली आहे ती ही कीं, त्यांनीं लाला लजपतरायासारख्या पुरुषांस विनाकारण हद्दपार करण्याला संमति दिली. पण याला भिऊन आतां काय होणार? देशकार्यासाठीं अनेक संकटें सोसण्यास आम्ही तयार असलें पाहिजे. रक्तपातशून्य क्रांति (Bloodless Revolution) हे शब्द आहेत. रणांगणावर रक्तपात होण्याचा त्यांत समावेश न झाला तरी तुरुंगाची किंवा हद्दपारीची शिक्षा त्यांत येत नाहीं, असें समजूं नका. तुरुंगांत टाकतील, एक दोन वर्षें ठेवतील, सोडून देतील, व तितक्या अवधींत एखाद्याचें पौंड दोन पौंड वजन वाढेलही. याची फिकिर करून आतां उपयोग नाहीं. हीं संकटें सोसण्यास आम्ही तयार असलें पाहिजे; त्याशिवाय

गत्यंतर नाहीं, व कार्यसिद्धिही व्हावयाची नाहीं. लक्षांत ठेवा कीं शिवाजी महाराजांनादेखील कैदी व्हावें लागलें, उपाशीं रहावें लागलें, आणि कष्ट सोसावे लागले. निव्वळ युक्तिवादानें या गोष्टी सिद्ध व्हावयाच्या नाहींत. स्वार्थ व युक्ति यांच्या तंट्यांत स्वार्थ युक्तीला मारतो. आम्हांला आमचा स्वार्थ साधावयाचा आहे, आणि सरकारच्या अधिकारी वर्गास त्यांचा स्वार्थ साधावयाचा आहे. सरकार म्हणजे येथील अधिकारी वर्ग, इंग्लंडचे लोक नव्हेत; कारण, विलायतेंतील एका मजुराला तुम्ही जाऊन विचारा, तर तो साफ असें सांगेल कीं, “मला यांच्याशीं काय करावयाचें आहे?” हा स्वार्थाचा तंटा आहे, आणि यांत निश्चयानें व धैर्यानें संकटांतून पार पडूं, अशा बुद्धीनें जर वागाल तरच तुम्हांस यश येईल. याकरितां स्वदेशी चळवळ, बहिष्कार हे उपाय रा. प्रधान यांनीं सांगितलेच आहेत. इंग्रजांच्या अंगावर हात टाकण्याची आम्हांस मुळींच जरूरी नाहीं, आमचा हात त्यांच्या खिशावर पडला म्हणजे बस्स आहे. **हें राज्य आज आमच्या मदतीनेंच चाललेलें आहे.** वरच्या गोऱ्या अधिकाऱ्यांचा जरी हुकूम झाला तरी आगगाडी, तारायंत्र, मुलकी, दिवाणी, वगैरे खात्यांचें कच्चें काम सर्व आम्हीच चालवितों. १५ रुपयांवर कांहीं युरोपियन कारकून येत नाहीं. तें आम्हीच असणार व आमच्या मदतीखेरीज हें गाडें चालावयाचें नाहीं. या परिस्थितीचा विचार करून यांतूनच आम्हांस कांही तरी मार्ग काढिला पाहिजे. नाहीं तर जगांत तोंड दाखविण्यास जागा नाहीं. आजच इतर राष्ट्रें आम्हांला हंसत आहेत. युक्तीचा पगडा स्वार्थावर बसण्यास दृढनिश्चयाचें आणि स्वार्थत्यागाचें पूर्ण बल पाहिजे. **आमच्या मागण्या, आमचे हेतु, गैरकायदेशीर नाहींत, गैरसनदशीर नाहींत, इतिहासाच्या विरुद्ध नाहींत, मानवी स्वभावाच्या विरुद्ध नाहींत, आणि देवाच्या आज्ञेच्याही विरुद्ध नाहींत. याला जे आडवे येतील त्यांनीं आमचा मार्ग कांहीं वेळ अडवला, तरी तो त्यांना पुढें मोकळा करून द्यावा लागेल.**

एक लाला लजपतराय कैदेंत गेले म्हणून काय झालें! त्यांच्या जागीं दुसरे पन्नास लाला तयार झाले पाहिजेत. एक सिव्हिलियन गेला तर त्याच्यापेक्षां वरचढ दुसरा सिव्हिलियन त्याच्या जागीं येतो. आम्हीही हेंच तत्त्व पाळिलें पाहिजे. लाला लजपतराय यांस केव्हांच सोडणार नाहींत असें नाहीं; पण आज


अर्ज करून कांहीं ते सुटत नाहींत. पंजाबांत जे खटले चालले आहेत ते कशा-करितां ? तुम्ही भ्यावें म्हणून. आणि तुम्ही भ्याला म्हणजे त्यांचें काम झालें. मग ते लाला लजपतराय यांस सोडून देतील. पण हा कांहीं त्यांस सोडण्याचा खरा मार्ग नव्हे. त्यांच्यावर जुलूम झाला याबद्दल जर आम्हांस खरोखर वाईट वाटत असेल तर म्युनिसिपालिट्यासारखीं सरकारचीं कामें तरी करावयास आम्ही नाकबूल व्हावयास पाहिजे होतें. तें न करतां आम्ही राजनिष्ठ म्हणून जाहीर-नामा काढून नगारा वाजविण्यांत काय हंशील ? याचा खरा अर्थ न कळण्याइतकें **सरकार कांहीं वेडें नाहीं. तें आमच्यापेक्षां शहाणें आहे, शतपट शहाणें आहे; आणि म्हणूनच आमच्यावर राज्य करीत आहे.** त्यांना चकविण्याइतके आम्ही जेव्हां शहाणे होऊं तेव्हां त्यांचें राज्य रहाणार नाहीं. तात्पर्य, आम्ही राजनिष्ठ आहों म्हणून टिमकी वाजविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. आम्ही स्पष्ट सांगतों कीं, अमुक अमुक हक्क आम्हांला पाहिजे आहेत. आमचें म्हणणें आम्ही उघड बोलतों व वर्तमानपत्रांतून लिहितों. पोलीस रिपोर्टरांनीं तें खुशाल लिहून घ्यावें. मला त्यांच्या विरुद्ध बोलावयाचें नाहीं. ते बिचारे आपल्या पोटाचे नोकर आहेत. ‘ आम्हांलाही पोट आहे म्हणून आम्ही हक्क मागतों. आमच्या पोटाला पाहिजे ’ असें न ह्मणणारी प्रजा राजाला तरी कशी मिळणार, आणि प्रजा नाहीं म्हणजे तो राजा तरी कोणाचा होणार ? आम्हांस जें कांहीं पाहिजे आहे तें आम्हीं स्पष्ट बोलत आहों, व तें असेंच केव्हांही बोलण्याची आमची तयारी आहे.

## स्मिथ व किंकेड यांच्या चुका

असो; शेवटीं महाराष्ट्राच्या इतिहाससंबंधानें प्रसिद्ध झालेल्या दोन लेखां-बद्दल मला दोन शब्द सांगावयाचे आहेत. पहिला लेख व्हिन्सेंट स्मिथ यांचा. या गृहस्थांनीं ख्रिस्ती शकापूर्वीं व पुढें ६०० मिळून १२०० वर्षांचा हिंदुस्था-नाचा इतिहास ताम्रपट वगैरे आधारांवरून लिहिला आहे व तो वाचनीय झालेला आहे. पण मराठ्यांच्या इतिहासाचे ताम्रपट नसल्यामुळें ह्मणा, किंवा त्यांचा इतिहास न वाचल्यामुळें म्हणा, मराठी मुत्सद्दी व योद्धे यांच्यासंबंधानें ‘ लुटा-ऱ्यांची टोळी ’ असें जें यांनीं “ ईस्ट अँड वेस्ट ” मध्यें प्रसिद्ध झालेल्या आपल्या निबंधांत वर्णन दिलें आहे तें निराधार व चुकीचें आहे. रा. भागवत व रा. खाडिलकर यांच्या भाषणांवरून ही गोष्ट आपल्या लक्षांत आलीच असेल.

दुसरा लेख किन्केड साहेबांचा. यांत त्यांनीं पेशवाईचें वर्णन चांगलें केलें आहे. पण पेशवाई बुडाल्याचीं जीं कारणें सांगितलीं आहेत तीं बरोबर नाहींत. पेशव्यांनीं शाहूचें राज्य बळकाविलें म्हणून पुढें त्यांचा वचक न राहून त्यांचें राज्य गेलें असें म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कोठेंही झालें तरी एकाच कुलांत १०-१५ कर्तबगारीचीं माणसें एका पुढें एक निपजत नाहींत. करितां राज्य अविच्छिन्न चालण्यास राजसत्ता एका कुलाच्या ताब्यांत एकसारखी न राहतां प्रजेच्या पुढाऱ्यांच्या हातांत असली पाहिजे. हें तत्त्व इकडे चालू नव्हतें, म्हणून इकडील बादशाह्या ४ । २ पिढ्यांतच डबघाईस येत, असें माझें मत आहे. हल्लीं तरी आम्ही राजकर्त्यांजवळ हेंच मागत आहों, इंग्रजी राज्य याखेरीज मोर्लेसाहेब म्हणतात त्याप्रमाणें दीर्घकाल टिकणें शक्य नाहीं.

सरतेशेवटीं रा. टिळक यांनीं असें सांगितलें कीं, शिवाजीउत्सवाची उत्तरोत्तर प्रगतिच होत आहे. धार, बनारस किंवा तंजावर येथें जरी त्यास विघ्न आलें, तरी एकंदरींत तो जास्त प्रिय होत असून लोकांना त्यांतील मर्म कळलें आहे. दंगेधोपे करण्याकरितां किंवा मुसलमानांना चिथवण्याकरितां आम्ही जमलों नाहीं, व त्याकरितां हा उत्सवही नाहीं. इतकें बोलून अखेरीस त्यांनीं व्याख्याते, निबंधकार, जागेचे मालक व आपलें भाषण स्वस्थपणानें ऐकून घेतल्याबद्दल श्रोतेजन यांचे आभार मानून परमेश्वरकृपेनें हा उत्सव निर्विघ्नपणें पार पडला म्हणून त्याचेही आम्हांवर उपकार आहेत, असें सांगितलें.



नोंद नं.........

# सरकार व महाराष्ट्रांतील मद्यपान

मंगळवार, ता. २० माहे आगस्ट १९०७ रोजीं सायंकाळीं पुणें येथील 'नेटिव जनरल लायब्ररी' मध्यें ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या अध्यक्षतेखालीं मद्यपाननिषेधक सभा स्थापन करण्याकरितां जाहीर सभा भरली होती. तेव्हां मद्यपानाचा होत असलेला प्रसार थांबावा म्हणून सरकारनें व लोकांनीं प्रयत्न करणें जरूर आहे, अशा अर्थाच्या ठरावास अधिमत देतांना लो. टिळक यांनीं भाषण केलें, तें येणेंप्रमाणें:—

मी आज सभेला आलों तो बोलायला म्हणून आलेलों नंव्हतों, पण सभेला येऊन मद्यपाननिषेध हा विषय असतां न बोलणें मी पातक समजत असल्यामुळें दोन शब्द बोलत आहे. हिंदुस्थानांतील सर्व धर्मांतून मद्यपानाचा निषेध केलेला आहे. बौद्धधर्माच्या ज्या दहा आज्ञा आहेत त्यांत मद्यपानाचा निषेध आहे. हिंदू धर्मांत निषेध आहे, मुसलमानी धर्मांतही निषेध आहे. या सगळ्या धर्मांत दारू पिणें हें पाप मानितात. पूर्वीची राज्यपद्धति कशीही असो, पण एवढें मात्र खरें कीं, **पूर्वीं आमच्यांत मद्यपानाचें व्यसन नव्हतें.** १८२० सालीं मौन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनी रिपोर्ट लिहिला असून तो सरकारनें प्रसिद्ध केला आहे; त्यावरून पेशव्यांच्या ताब्यांतील जिल्ह्यांचें पेशवाईच्या वेळचें अबकारी उत्पन्न सारें १०००० रु. चें होतें, तेंदेखील कोंकणाकडील माडांचेंच असावें. भट्ट्या सरकारी हुकुमानें बंद केल्या होत्या, व मद्याची विक्री करण्याचीही परवानगी नव्हती. मौन्ट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांनीं या रिपोर्टांत असें म्हटलें आहे कीं पेशवाईतील हा प्रतिबंध इंग्रजी राज्यांतही राहिल्यास बरा! पण पुणें व नगर या दोनच जिल्ह्यांचा मक्ता आतां १०।१२ लक्षांचा व मध्यभागांतील सहा जिल्ह्यांचा २५।३० लक्षांचा झाला आहे! हें एवढें उत्पन्न वाढलें कशानें? आमच्या पूर्वजांनीं धर्मानें मद्यपान नाहींसें केलें होतें. पण आतां असें कां झालें याचा आपण विचार केला पाहिजे. मद्यपाननिषेधासंबंधाचा प्रयत्न सुरू झाल्यास बरींच वर्षें झालीं. १८८८ सालीं केन साहेबांनीं यासंबंधानें प्रयत्न केला होता. पुणें, सातारा, बेळगांव वगैरे ठिकाणीं सभा स्थापल्या होत्या. पूर्वीं व अलिकडे कुलाबा, बेळगांव, खानदेश, नाशिक येथें उपदेश करण्यांत आला व येत आहे.

लोकांकडून शपथा घेववित्या जात आहेत. शपथेप्रमाणें न वागणाऱ्यास जातीबाहेर टाकण्याचाही यत्न झाला आहे. पण या प्रयत्नांना यश यावें तसें येत नाहीं. मी स्वतः यासंबंधानें येवलें वगैरे ठिकाणीं व्याख्यानें दिलीं आहेत. पण लोक सरासरीं तीन चार महिने निभाव धरतात. याचें कारण पोलीस संप करणारांचीं नांवें टिपून घेतात, हें होय. उपदेशक पैसे खर्चून नेमले, गिऱ्हाईक दुकानांतून जाईनासें झालें, तेव्हां कॉन्ट्रॅक्टरनीं कलेक्टरकडे गाऱ्हाणें नेलें. एकदां एक कलेक्टर एका कॉन्ट्रॅक्टरला म्हणाला, ते दारू न पिण्याविषयीं उपदेशक नेमतात, तर तूंही तसेंच दारू पिण्याविषयीं लोकांना उपदेश करणारे उपदेशक कां नेमीत नाहींस! तूं दारू पिण्याचा उपदेश कर! तसेंच जत्रेंत दारूच्या दुकानांत वेश्या व तमाशे आणून लोकांना व्यसनांत गोंवितात, व सरकार याची कांहींच दाद घेत नाहीं! आम्ही दोन गोष्टी कानावर घालून मनावर जो ठसा उमटवितो तो बुजवून कसा टाकावा, याचा प्रयत्न कॉन्ट्रॅक्टर, सरकारचे खालचे अधिकारी व पोलीस करीत असतात. त्यांत त्यांना काय वाटतें कोणास ठाऊक!

रा. ब. जोशी यांनीं सांगितलें कीं दारूच्या दुकानांची संख्या कमी होत आहे, पण ती कमी कोठें होत आहे व जास्त कोठें होते आहे, याचा विचार केला पाहिजे आहे. मी आज ४० वर्षें पुण्यास पाहतों आहे; दारूचीं दुकानें वाढलेलीं आहेत. विश्रामबाग हायस्कूल जवळ एक दारूचें दुकान उघडलें! विद्यार्थ्यांनीं राजकीय चळवळींत मात्र पडतां कामा नये, त्यांच्या शाळेजवळ दारूचा गुत्ता असलेला सरकारला चालतो. असो, एक स्वदेशी दारूचें दुकान होतेंच, तों दुसऱ्या बाजूस एक विदेशी दारूचें दुकान निघालें! तें आम्हांस नको म्हणून लोकांनीं अर्ज केला. माझी सही त्या अर्जावर होती; पण अर्जाचें उत्तर आलें "दुकानांतल्या दारूचा खप होतो आहे, त्या अर्थी तेथें दारूचें दुकान पाहिजे आहे; तेव्हां दुकान बंद करतां येत नाहीं." पुढें त्या दुकानदाराची दारूची विक्री होईनाशी झाली, व म्हणून दुकान तेथून उठवून लष्करांत न्यावें असें त्यानें ठरविलें आणि त्यानें त्याप्रमाणें सरकारांत अर्ज केला. पण याला सरकारनें परवानगी दिली नाहीं! ही गोष्ट मला कळण्याचें कारण तो दारूवाला अर्जाकरितां माझ्याकडेच आला होता!

## भयंकर नवीन प्लेग

अबकारी खात्याचा नुकताच ठराव बाहेरं पडला आहे व मोर्ले साहेब दारू-च्या व्यसनाला ' Dire new plague ' ' भयंकर नवीन प्लेग ' म्हणत आहेत. पण ४-५ कोटींच्या उत्पन्नांवर पाणी सोडावयास ते तयार नाहींत. सरकारला ४-५ कोटींचें उत्पन्न दुसऱ्या कोणत्या तऱ्हेनें काढतां येणार नाहीं काय ? निव्वळ नाण्यावर सरकारला ६ कोट रुपये मिळत आहेत. माझ्या मतें मिठाचा कर कमी केला तो न करतां दारूची मनाई केली असती तर अधिक चांगलें झालें असतें. तत्ववेत्ता झाला तरी घरीं बसून रिपोर्टांत दारू नको म्हणतो, पण **तिजोरीची दृष्टि कांहीं निराळी आहे.** सरकारची इच्छा दारू बंद व्हावी. आमचीही इच्छा तशीच आहे. मग हें व्यसन वाढतें कां ? मोर्लेसाहेबांनीं सांगितलें कीं अबकारी संबंधाची जी चौकशी केली ती उत्पन्न कमी करण्याकरितां नाहीं, तर खातें नीट कसें चालेल हें पाहण्याकरितां केली. दारू कशी गाळावी, भट्ट्या कुठें व किती ठेवाव्या, दुकानें कोठें घालावीं याविषयीं शिस्त ठरविण्याकरितां ही चौकशी झाली होती. पेशवाईंत दारू करणें, दारू विकणें, दारू पिणें, हे गुन्हे समजत होतें व त्याबद्दल शिक्षा होत असे. पण **इंग्रज सरकार स्वतःच दारू तयार करितें—दुसऱ्याला करूं देत नाहीं—स्वतःच भट्ट्या ठेवतें व स्वतःच दारू विकतें !** मला वाटतें न्याय व अंमलबजावणीचीं खातीं निर-निराळ्या अधिकाऱ्यांच्या हातांत द्यावीं म्हणून जसें म्हणतात, तसेंच दारू गाळणारे व विकणारे अधिकारी तरी निरनिराळे असावे. पण सध्यां उत्पन्न जास्त कसें होईल, इकडे सरकारचें लक्ष असतें.

इंग्लंडचें **राष्ट्र पिढीजाद दारूबाज** आहे, दारू प्यायल्याशिवाय त्यांचें होत नाहीं. आम्ही अशक्त असूं, देशाची कळकळ आम्हांला नसेल, आम्ही देशद्रोही असूं, काय वाटेल ते आम्ही असूं; पण आम्ही—हिंदी लोक—मूळचे दारूबाज मात्र खास नाहीं. इंग्लंडांत दारूविरुद्ध कायदा केला तर लोक बंड करतील. त्यांना दारू प्यायला हवी आहे, खाण्यापिण्यांत दारू असल्याशिवाय त्यांचें चालत नाहीं. तेव्हां तिकडे यासंबंधानें ज्या कमेट्या नेमतात त्या लोकमत तयार करण्याकरितां नेमतात. लोकांत चळवळ करून मद्यपानाविरुद्ध त्यांना लोकमत तयार करावयाचें असतें. आमच्या इकडे लोकमत पूर्वींचें मद्यपाना-

विरुद्ध आहे. लोकमताची ही घडी सरकारनें बिघडविली आणि आतां आमच्यामागें ' बिघडलेली घडी नीट बसवा ' म्हणून लागले आहेत. सरकारनें बहुमत ऐकलें पाहिजे तर कांहीं फायदा होईल. कोणच्याही कामांत सरकारतर्फे बोलणारे लोक आमच्यांत असतात. त्यांस हातीं धरून सरकार वागतें; व आम्ही खटपट करणारे ठरतो मूर्ख ! कुलाबा जिल्ह्यांत वगैरे प्रयत्न झालेला आहे व अधिकाऱ्यांनीं अशा रीतीनें प्रयत्न करणाऱ्या गृहस्थांवर खटले केले, हें आपल्याला माहीतच आहे. सरकारचा हेतु चांगला असेल, पण तो कृतींत दिसत नाहीं. सरकारनें असें साफ सांगावें कीं, अमुक एक तीन-चतुर्थांश लोकांचें मत अमुक ठिकाणीं दारूचें दुकान नको असें असलें तर दारूचें दुकान उठवूं. म्हणजे आम्ही लोकमत तसें करून दाखवितों.

## औषधालाहि दारू नको

अडाणी असतात, ते धर्माची गोष्ट सांगितल्यानें ऐकतात; दारू पिणारा अडाणी हें आपण पाप करितों म्हणून कबूल करतों. दारूचा परिमाण स्नायूवर काय होतो, यानें त्यांना खायला कसें मिळत नाहीं, हें कदाचित् त्याला सांगतां येणार नाहीं. पण हें पाप आहे हें तो जाणतो. पण, इंग्रजी शिक्षणानें सुशिक्षितांचा बुद्धिभ्रंश झालेला आहे. ते म्हणतात "अंः ! धर्मात काय वाटेल तें आहे !" नवीन ज्ञानाच्या दृष्टीनें पाहिलें तर हे सुशिक्षित लोक म्हणतात " थोडी प्यायला काय हरकत आहे !" कोणी म्हणतात Temperance म्हणजे 'मितपान' पाहिजे. एका सभेंत असला वाद निघाला होता, तेव्हां, वेदांत सोम पीत होते असें आहे, तेव्हां आम्ही दारू प्यायलों म्हणून काय झालें, असा विचार निघाला. कोणी औषध म्हणून घेतो म्हणतो; जेवावयाच्या पूर्वी १ औंस घेतल्यानें अग्निमांद्य जातें म्हणून कोणी पितो; तर कोणी डोकेंदुखीकरितां घेतो ! मागें एक पत्रक सही करण्याकरितां मजकडे आलें होतें. त्यांत वर लिहिलें होतें कीं, औषधाखेरीज मी कधींहि दारू पिणार नाहीं ! यावर मी सही करीत नाहीं, म्हणून सांगितलें. औषधाला तरी दारू असल्याशिवाय होत नाहीं असें कुठें आहे ! माझ्या मतें औषधालासुद्धां दारू घेण्याची कांहीं एक आवश्यकता नाहीं. हजारों वर्षें जुन्या लोकांचें जर दारूवांचून चाललें तर आपलें कां चालू नये ! दारूशिवाय काय औषधच होऊं शकत नाहीं ! सुशिक्षितांचा शपथेवर थोडाबहुत

विश्वास आहे. त्यांच्याकडून दारू पिणार नाहीं म्हणून सह्या घेतल्या पाहिजेत, ते शपथेप्रमाणें वागतात किंवा नाहीं हें पाहण्याकरितां एक कमिटी पाहिजे, व या कमिटीचा निकाल मी ऐकेन अशी त्यांची कबूली पाहिजे, नाहीं तर हेच अब्रू-नुकसानीबद्दल फिर्याद लावावयाचे! अशिक्षितांना मद्यपानापासून परावृत्त करतां येईल, पण सरकारची शब्दांची सहानुभूति आहे, ती कृतीची झाली पाहिजे; **आमच्या हातांत अधिकार दिल्यास आम्ही दहा वर्षांत मद्यपानाचें अर्धें व्यसन नाहींसें करूं.** आम्हाला जर स्वराज्याचे हक्क असते तर हें व्यसन वाढलेंच नसतें. अधिकार नसेल तर हें काम वाऱ्याची मोट बांधण्यासारखें आहे. सरकारची सहानुभूति मिळवाल, उपदेशानें लोकांस व्यसनापासून परावृत्त कराल, शपथ घेणारे शपथा पाळतील, त्या पाळल्या जातात किंवा नाहीं याची चौकशी हमेशा होईल, तर यांत यश येईल; नाहीं तर 'यत्ने कृते यदि न सिद्ध्यति कोऽत्र दोषः' असें समाधान मानावयास तरी जागा राहील.

मराठी ग्रंथ सं... स्थळ प्र... नं.... नं....

# राष्ट्रीय सद्‌गुण व व्यक्तिविषयक सद्‌गुण

पुणें येथील गणेशोत्सवांत, शुक्रवार, ता. १३ माहे सप्टेंबर १९०७ रोजीं रात्रीं नेने घाटावरील गणपतीपुढें लो. टिळक यांचें व्याख्यान झालें, तें येणेंप्रमाणें:—

आपल्यांतील राष्ट्रीय गुण लोपत चालले आहेत! पेशव्यांच्या बुडत्या काळांत झालेल्या मुत्सद्यासारखे मुत्सद्दी किंवा कर्तृत्ववान् पुरुषदेखील आतां दिसत नाहींत! पेशवाई बुडाली तेव्हांसुद्धां बापू गोखल्यांसारखे पुरुष निघाले. पेशवाई बुडायची ती बुडालीच. ती कांहीं बुडायची राहिली नाहीं. पण तेव्हां कर्तबगार माणसें निघालीं होतीं. परिस्थिति वाईट असल्यानें त्यांस यश आलें नाहीं ही गोष्ट निराळी. एका इंग्रजी कवीनें म्हटल्याप्रमाणें—एखादी गोष्ट साध्य व्हावयाची नसली तर ती होणार नाहीं, पण उद्योग केला पाहिजे, प्राण खर्ची पडला तरी हरकत नाहीं, असें वाटलें पाहिजे; मग निदान माणसाकडे तरी दोष येत नाहीं. राष्ट्राचें काम कांहीं एका इसमाच्या हातांत नसतें. तेव्हां परिस्थिति प्रतिकूल असल्यामुळें अपयश येण्याचा संभव आहे, पण माणसांनीं आपलें काम केलेंच पाहिजे. बापू गोखले यांनीं कर्तबगारी व करारीपणा दाखविला. हा गुण आमच्या पूर्वजांत होता, पण आतां कालाच्या भेदामुळें—किंवा विपर्यासानें—आपल्यांत हा गुण दिसत नाहीं! माझ्या आठवणींत व वाचण्यांत असें आहे कीं, प्रि. परांजपे सीनियर रँगलर होऊन इकडे आले तेव्हां क्यांडी साहेबांच्या अध्यक्षतेखालीं (हे साहेब तेव्हां न्यायमूर्ति होते) मुंबई प्रेसिडेन्सी असोसिएशननें त्यांस एक मेजवानी दिली—तेव्हां प्रसंग नसतां क्यांडीसाहेब म्हणाले. "तुम्ही बुद्धिमान् असला, परीक्षा पास झाला, तरी तुम्हां लोकांत character नाहीं." हा अतिप्रसंग झाला. पण अशा प्रकारचा दोष इंग्रज आम्हांवर ठेवीत असतात. तर मग, जे गुण आमच्यांत पाहिजेत ते गुण आमच्यांत नाहींत काय! लोकांचे वर्ग अनेक आहेत. **कांहीं लोक असे असतात कीं चार पैसे मिळवावे, कोणच्याही लचांडांत पडूं नये, उपास पडला तर निमुटपणें उपाशी रहावें, कुणी-**

**करून चरितार्थ चालवून स्वस्थ असावें. हे निरुपद्रवी लोक होत.** हे लोक काय वाईट आहेत ? मला नाहीं वाटत यांना कोणी वाईट ह्मणेल म्हणून. **हा गुण नाहीं असें नाहीं, पण तो राष्ट्रीय गुण नाहीं.** तो गुण आहे खरा; पण तो मेंढ्यांत असतो, आणि त्यांना तो शोभतोही. व्यक्तिशः पहातां हा गुण आहे. पण **राष्ट्रीय दृष्ट्या तो दुर्गुण आहे.**

## गुणांत संवयीनें फरक करा

कित्येकदा व्यक्तिशः जो गुण समजला जाईल तो राष्ट्रीय दृष्ट्या दुर्गुण ठरेल व राष्ट्रीय दृष्ट्या जो गुण असेल तो व्यक्तिशः दुर्गुण समजण्यांत येईल; उदा.—एक घोडा आहे. तो चावत नाहीं, लाथा मारत नाहीं, एका तासांत १५ मैल जातो; पण एवढ्यानें तो पलटणींत चालावयाचा नाहीं. पलटणींतील घोड्याबरोबर त्यास जातां आलें पाहिजे, इतर तापट असतील तर त्यानें त्यांच्याबरोबर चाललें पाहिजे, हळू चालणारे असतील तर त्यांना बरोबर घेऊन चाललें पाहिजे, तर तो उपयोगीं. घोड्याला या गोष्टीचें शिक्षण द्यावें लागतें व त्याबरोबरच्या शिपायालाही संवयच करावी लागते. एक गोष्ट सांगतात कीं, सैन्यांत नोकरी केलेला एक शिपाई बाजारांतून कांहीं पदार्थ एका भांड्यांत घेऊन घराकडे चालला होता. वाटेंत कोणी एक ‘ Arms down ’ म्हणून गमतीनें म्हणाला. त्या क्षणीं या शिपायानें हातां-तलें भांडें टाकून ‘ Arms down ’ केलें; हा संवयीचा जोर होय. चांगल्या गोष्टीची संवय केल्यानें ती गोष्ट प्रसंग आला कीं, आपल्या हातून निमूटपणें घडून येते. शिक्षणानें गोष्टी अंगांत इतक्या भिनतात कीं, कांहीं एक खूण होतांच क्रिया घडते. राष्ट्राकरितां प्रत्येक माणसाला आपला हेका सोडावा लागतो, भोंव-तालच्या लोकांना झेपेल असें वागावें लागतें, इतर लोक आपल्या बरोबर येतील असें पहावें लागतें आणि या गोष्टी येण्यास संवय लागते. या ९० वर्षांत हे गुण यावे तसे नजरेस येत नाहींत; याचें कारण **या गुणांचा उपयोग होईल अशी संधि आतां इंग्रजांच्या कृपेनें आपल्याला येत नाहीं !** कोणचेंही मोठें काम करावयाचें असेल तर तें इंग्रजांनीं करावयाचें असें झालें आहे. पूल बांधावयाचा असला तर तो इंग्रजांनीं बांधावयाचा, मोठमोठ्या राजकीय घडा-मोडी करावयाच्या त्या त्यांनींच ! कांहींही करायाचें झालें कीं, तें इंग्रजांनीं करा-

यचें ! आम्ही पोटाला मिळवितों, सरकार आम्हांला पोटाला मिळवूं देतें. दुष्काळांत मदत करतें, ( तरीही लोक मरतात ! पण सरकारच्या दप्तरीं तसें कुठें आहे ? ) पण यापेक्षां जास्त कांहीं नाहीं ! डार्विन सांगतों कीं, ज्या इंद्रियाचा उपयोग होत नाहीं तें इंद्रिय कालानें नाहींसें होतें. म्हणजे इंद्रियाचा बाहेरचा आकार राहतो, पण इंद्रियांतील धर्म नाहींसा होतो. व अशा कांहीं पिढ्या गेल्या तर तें इंद्रिय आकारासुद्धां पार नाहींसें होतें. कोंबड्याला पाण्यांत टाकून ठेवल्यानें त्याच्या पायाच्या बोटांमधून सालडी असल्याचें लिहिलेलें आहे. ही शरिराच्या भागांची गोष्ट झाली, मग मनांत तर संवयीनें फरक होईलच होईल. आपली परिस्थिति बदलल्याला तीन पिढ्या झाल्या आहेत. लोकांत घराच्या बाहेर न लागणारे गुण आहेत. घरीं राहून खावें, प्यावें, राहिली वेळ नोकरींत घालवावी, संतापी स्वभाव असला तरी तो घरांतल्या घरांत, साहेबासमोर संतापीपणा चालत नाहीं ! ‘ अहिंसा परमो धर्मः ’ हें खरें आहे. यांतील अहिंसेचें लक्षण असें सांगितलें आहे कीं, कोणासही कोणच्याही प्रकारें दुखवावयाचें नाहीं. हा मोक्ष मिळवून देणारा गुण आहे. पण या गुणानें पारलौकिक सौख्याची प्राप्ति आहे, या लोकींच्या सुखाची नाहीं. घरचा संसार अजून राहिला असल्यामुळें हा निरुपद्रवीपणा संसाराच्या उपयोगी गुण राहिला आहे. **राष्ट्राला धक्का बसला असतां आपल्याला धक्का बसल्यासारखें वाटणें, आपलीं लहान सहान कामें बाजूला ठेवून राष्ट्राच्या कामाला जाणें, राष्ट्राचा खेद स्वतःच्या खेदास कारण होणें, किंवा राष्ट्राचा त्वेष आपल्या अंगीं उत्पन्न होणें हें कमी आहे व तें पाहिजे आहे.**

पहिल्या बाजीरावानें यवनी ठेविली होती. ( मी आतां पुढें सांगणार आहे ती गोष्ट खरी आहे कीं खोटी आहे हें मी खात्रीपूर्वक सांगूं शकत नाही. ) मस्तानीचा बुरूज आहे व बाजीराव-मस्तानी नाटकही झालें आहे, तेव्हां लोकांस ठाऊकच आहे. त्या वेळीं ब्राम्हण विशेष जागृत होते. तेव्हां येथें पुण्यास बाजीरावाविषयीं सभा भरली व चर्चा चालली. त्यांत एका स्वामीनें उठून म्हटलें “उद्यां जर मोंगलांवर स्वारी करावयाची असली तर दुसरा बाजीराव कुठें आहे ! तो आणून द्या म्हणजे तुमचें म्हणणें आम्ही ऐकूं.” राष्ट्रास लागणाऱ्या गुणांचा या गोष्टींत जास्त विचार होऊन व्यक्तिशः जे गुण लागतात त्यांचा विचार मागें टाकण्यांत आला.

रामशास्त्र्यांनीं राघोबादादांस देहांत प्रायश्चित्त सांगितलें, तेव्हां व्यक्तिशः आपलें नुकसान होईल हें त्यांस ठाऊक होतें, पण राष्ट्रीय दृष्टया जें योग्य दिसलें तें त्यांनीं सांगितलें. पुण्याच्या बाहेर जावें लागेल हें ते जाणून होते, व एकानें त्यांना यासंबंधीं 'असें कसें बोलला?' म्हणून विचारलें असतां 'मी आपलें प्रस्थान कालच ठेविलें आहे' म्हणून त्यांनीं सांगितलें.

## राष्ट्रीय गुणांचें शिक्षण

राष्ट्रीय गुण आमच्यांत यावे असें शिक्षण आम्हाला मिळतें किंवा नाहीं, याचा आम्ही अलीकडे विचारच केलेला नाहीं. शाळेंत शिकल्यानें मुलांना नोकरी मिळते, म्हणून आपण मुलांना शाळेंत शिकायला पाठवीत आलों आहों एवढेंच! मुलाला सांगितल्यास राष्ट्रीय गुणांवर तो १०—५ पानें निबंध लिहून आणील पण स्वतःच्या वर्तनासंबंधानें विचारलें तर तसें समाधानकारक उत्तर त्यास देतां येईल कीं नाहीं याची शंका आहे. राष्ट्रीय गुणांची याद इतिहासांत सांपडेल. हे गुण नाहींसे कसे होतात हें पहावयाचें असल्यास गिबनच्या Decline and Fall of the Roman Empire मध्यें याचें वर्णन सांपडेल. या राष्ट्रीय गुणांचा उपयोग नसल्यानें ते आमच्यांत येत नाहींत. शाळेंत याचें खरें शिक्षण मिळत नाहीं व पुढें आयुष्यांत या गुणांचा उपयोग नाहीं. तरीही कोणाच्या अंगांत तेज राहिल्यास नोकरींत त्याची डाळ शिजत नाहीं. **निरुपद्रवीपणांत सगळ्या जगांत आमचा पहिला नम्बर लागेल. पण करारीपणा, मताचा अभिमान धरून राष्ट्राला बरोबर घेऊन लोकांत मिळून मिसळून वागून स्वार्थत्याग करण्याचा गुण आपण शिकला पाहिजे.** पलटणींतील कवाइती-प्रमाणेंच राष्ट्रीय कवाईत शिकावयाची आहे. राष्ट्रीय गुण कसे असतात व त्यांचा उपयोग कुठें आणि कसा होतो, हें आपण इतर राष्ट्रांच्या इतिहासावरून शिकलें पाहिजे. राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें आक्षेप काढतात कीं 'सरकारी शाळेंत पांचव्या यत्तेंत पांचवें पुस्तक शिकवितात, मग तुम्ही राष्ट्रीय शाळेंत काय पांचव्या यत्तेंत सहावें पुस्तक शिकवणार?' पुस्तकांपलीकडे त्यांचें लक्षच गेलेलें नसतें!

## पराक्रम व चारित्र्य

आईबाप निरुपद्रवी असले तर मुलगा त्यापेक्षां जास्त होतो. आईबाप भित्रे असले तर मुलगा दोन आणे। जास्त भित्रा होतो; म्हणून सुधारणा प्रथम घरांत सुरू केली पाहिजे. चोरी करूं नका, दारू पिऊं नका, असा घरीं उपदेश करतात. (बापच दारू पिणारा असला तर गोष्ट निराळी!) पण राष्ट्रीय गुणांची गोष्ट निघत नाहीं. डॉ० भाटवडेकरांना तर मुलांनीं स्वदेशी साखर खाल्लेलीदेखील आवडत नाहीं, याविषयीं मी 'केसरीं'त लिहिलेंच आहे. मुलांना राष्ट्रीय गुणांचें शिक्षण लहानपणापासून दिलें पाहिजे. त्यांच्यांत एक प्रकारचा अभिमान, तेज, करारीपणा आला पाहिजे. Character चा अर्थ 'पराक्रम' असा आहे. 'चारित्र्य' अशा अर्थाचा तो शब्द आहे. हें **चारित्र्य शिकवितील अशा शाळा काढणें, या गुणांचा उपयोग होईल अशा संस्था उत्पन्न करणें व तिसरें घरांत या गुणांचें शिक्षण देणें; हें झालें पाहिजे.** लहानसान गोष्टींतही करारीपणा पाहिजे. चार वाजतां उठून स्नान करावें यावर कोणी म्हणेल, दहा वाजतां केलें म्हणून काय झालें!' पण तर्कानें व न्यायानें पाहूं जाऊं तर सगळेंच कांहीं नाहींसें होऊं लागेल. यानें व्रतस्थपणा, करारीपणा येत असतो, संवय लागत असते. Domestic Discipline घरची शिस्त पाहिजे. शाळेंतही शिस्त आहे. मास्तर आल्यावर मुलें उभीं राहिलीं नाहींत तर त्यांना छड्या मारतात. असली 'डिसिप्लिन' आहे, पण Character शिकविण्याचें काम होत नाहीं! पलटणींचे सर्वच शिपाई सारखे सशक्त नसतात, पण त्यांना सारखीं पाउलें टाकावीं लागतात. राष्ट्राकडे पहाणारा कोणी तरी असावा लागतो. पेशवे राष्ट्राकडे पाहणारे होते. करारी, हिंमती योद्धे उत्पन्न झाले पाहिजेत ही पेशव्यांना काळजी होती. पण आतांच्या सरकारला हे गण नको आहेत—आमच्यांत नको आहेत, त्यांच्या लोकांत पाहिजे आहेत. शाळांतील शिक्षक हे सरकारचे नोकर असल्यामुळें ते हे गुण शिकवीत नाहींत, व आईबापांच्या दोन तीन पिढ्या निरुपद्रवी झाल्यानें त्या गुणांचें घरीं शिक्षण नाहीं! अशी स्थिति आहे. **आपण बुद्धिवंत व जातिवंत आहों. आपल्या पूर्वजांत राष्ट्रीय गुण होते व आपल्यांत हे गुण येणार नाहींत असें नाहीं. निरुपयोगीपणानें, किंत्ता किंवा उदाहरण समोर नसल्यानें, सरकार दर-**

**त्यांत या गुणांची चहा नसल्यामुळें, आमच्यांतील हे गुण गेले आहेत, ते पुनः आणण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.**

## राष्ट्रीय कामांत पुढाकार

कोणी म्हणतात "हे गुण आधीं आपल्या अंगीं आणा, मग राष्ट्रीय चळवळी करा; सामाजिक, धार्मिक बाबींत प्रथम हे गुण संपादन करून मग राष्ट्रीय चळवळींत पडावें. मला हा विचार पसंत नाहीं. **ज्या कामाकरितां गुण संपादन करावयाचे तें काम करूनच ते संपादन केले पाहिजेत.** जमिनीवर पोहायला शिकून मग पाण्यांत पोहायला जाईन म्हटलें तर होणें नाहीं. **पोहायला शिकायला पाण्यांतच गेलें पाहिजे.** शरीरसामर्थ्य मिळविण्याकरितां आधीं दूध पिऊन शरीर चांगलें झाल्यावर तालीम करीन म्हणून होणें नाहीं. त्याला आधीं तालीमच केली पाहिजे. आपण राष्ट्रीय कामें करावयास जास्त जास्त लागलें पाहिजे. आपल्या हातांत जी कांहीं कामें असतील—हिंदुस्थानावर परकी सैन्य चालून आल्यास तें परतविण्याचें काम सरकारनें आपल्याकडे घेतलेंच आहे—तीं आपण नीट केलीं पाहिजेत. यश आतां न आलें तर पुढील पिढीला येईल. **राज्याचा मक्ता इंग्रजानीं घेतला तरी इतर पुष्कळ कामें आपल्या हातीं आहेत, तीं करा.** यत्न करा, म्हणजे राष्ट्रीय गुण तुमच्यांत येतील व वाढतील. **नुसतें पोट भरून होत नाहीं. 'काकोपि जीवति चिराय बलिं च भुंक्ते'** घराबाहेर पाहिलें पाहिजे. किंबहुना शाळेंतील किंवा गृहशिक्षणाच्या मार्गापेक्षां, राष्ट्रीय गुण अंगीं येण्याचा किंवा नवीन पिढीला शिकवण्याचा हा मार्ग— म्हणजे राष्ट्रीय कामांत पुढाकार घेऊन तीं करणें—अधिक उपयुक्त आहे असें म्हटलें तरी चालेल. राष्ट्रीय चर्चेत निघालेला हा सिद्धांत आहे, तो मी आपल्याला सांगितला आहे. शेवटीं ज्याचा उत्सव चालला आहे त्या गजाननाच्या कृपेनें हे गुण आपल्यांत येतील अशी आशा प्रदर्शित करून मी आपलें भाषण पुरें करितों.

# राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय ?

शनिवार, ता. १४ सप्टेंबर १९०७ रोजीं रात्रीं, पुणें येथें नारायण पेठेंतील लो. टिळक यांच्या वाड्यांत बसविलेल्या गणपतीपुढें रा. रा. सिताराम केशव दामले, बी. ए., एलएल. बी. यांचें व्याख्यान झालें, त्याप्रसंगीं अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणालेः—

व्याख्यात्यांनीं राष्ट्रीय शिक्षणाची जी व्याख्या सांगितली तिला पुरवणी देण्याचें काम मजवर आलें हें कांहीं बरें नाहीं, तरी पण तें आलें आहे तर मी करितो. व्यापार, उद्योगधंदे, शास्त्रें, यांचें शिक्षण सरकार देत नाहीं म्हणून आम्हांला राष्ट्रीय शिक्षण पाहिजे, असा हा विषय लोकांपुढें मांडण्याची एक रीत आहे. पण एवढें बस्स नाहीं. ही मांडणी अशी नको आहे. अशी मांडणी केल्यानेंच प्रि. परांजपे यांच्या सारख्यास यांत बोट घालायाला जागा सांपडली ! आम्हीं राष्ट्रीय शिक्षणाची गोष्ट काढली कीं, ते आम्हांला विचारतात " गणितांत दोन आणि तीन पांच होतात, राष्ट्रीय शाळेंत काय दोन आणि तीन सहा म्हणून सांगणार आहां ! भूगोल शिकवावयाचा तर नकाशा समोर ठेवूनच शिकवणार कीं नाहीं ? तसें आम्हीही शिकवतों. लंडन शहर तर कांहीं नकाशांत इकडून तिकडे जात नाहीं ना ? " अशी थट्टा करतात. धर्माची गोष्ट निघाली कीं, विचारतात " हिंदु धर्म शिकवतां ? कां मुसलमानी धर्म शिकवतां ? " पुस्तकाची गोष्ट निघाली कीं म्हणतात " भागवत शिकवितां का भारत शिकवितां, का कुराण शिकवितां ? " ज्यांच्यावर लोकशिक्षणाची जबाबदारी आहे त्यांनीं या विषयांची अशी थट्टा करणें अत्यंत उद्वेगजनक व खेदजनक आहे ! परकी राज्यकर्ते आम्हांला पाहिजे तसें शिक्षण देत नाहींत, तसा त्यांचा हेतु नाहीं, इच्छा नाहीं, ते तसें शिक्षण देऊं शकत नाहींत. परकी सरकाराच्यानें हें होणार नाहीं, व अर्ध्या किंवा चतकोर भाकरीवाल्यांनाही तें शिकवितां येणार नाहीं. ली वॉर्नरचें पुस्तक वाईट आहे, त्यांतील विधानें खोटीं आहेत असें यांच्या शाळेंतल्या मास्तरांना सांगतां येईल काय ! नाहीं. कोणी सांगूंच लागला तर डायरेक्टर उद्यां ग्रँट बंद करील

इंग्रजांचें म्हणणें असें आहे कीं तुम्ही शिका; पण स्वराज्याचे हक्क मागूं नका. मोर्ले साहेब सुशिक्षितांना शत्रू म्हणतात. शिक्षणाचें हें हल्लींचें धोरण कर्झन साहेबांनीं बदलविलें आहे. आम्ही आपल्या मुलांना शिक्षण द्यायचें आणि गोठ्यांतल्या गुरांना शिक्षण द्यायचें यामध्यें जो फरक आहे तो फरक स्वतंत्र देशांतील शाळेंत दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत व आम्हांस दिल्या जाणाऱ्या शिक्षणांत आहे. कलकत्त्याच्या राष्ट्रीय शाळेंत दादाभाईंचीं आणि दत्ताचीं पुस्तकें शिकवितात. प्रि. परांजपे हीं पुस्तकें आपल्या शाळेंत शिकवतील काय ? जर ते हीं पुस्तकें घेतील तर मी त्यांचें म्हणणें ऐकेन. शिक्षणानें डोळे उघडतात हें सरकारला नको आहे; ते असलें शिक्षण बंद करूं पहात आहेत. तें त्यांना बंद करतां येत नाहीं; पण होईल तितका या शिक्षणाचा पाय मोडून ठेवण्याचा त्यांचा यत्न आहे. आमचे व्यापारी भरभराटले तर सरकारला वाईट वाटणार नाहीं असें एक गृहस्थ म्हणाले. पण मला वाटतें सरकारला वाईट वाटेल; कारण, आमचे धंदे बुडवून त्यांचे व्यापारी भरभराटले आहेत. त्यांना शेतकी वाढवावयाची आहे. " शेतकी-पेक्षां उद्योगधंद्याकडे लक्ष द्या, पैसे हवे असल्यास महाराणीच्या स्मारकार्थ्रीत्यर्थ गोळा होणारे पैसे देऊं. " असें कर्झन साहेबास सांगण्यांत आलें होतें; पण तें त्यांनीं ऐकलें नाहीं. टाटाच्या देणगीच्या व्यवस्थेस त्यांनीं होईल तितकी दिरंगाई करून ती होऊं दिली नाहीं. असलें शिक्षण वाढलें तर सरकारचा नाइलाज आहे, पण तसें झालें नाहीं तर सरकारला बरेंच वाटेल.

## कुंडींतील झाडें नकोत

राष्ट्रीय शिक्षण ब्राह्मणांकरितांच नको आहे; अंत्यजाला, चांभाराला सोनाराला, सर्वांना तें शिक्षण पाहिजे आहे. सर फेरोजशहा मेथा म्हणतात, सरकारी शाळांतूनच आम्ही निघालों; तसेंच आणखीही लोक निघतील. रानडे, मेथा, न्यू इंग्लिश स्कूलचे उत्पादक, त्याच शिक्षणांतून निघाले. पण फार झालें तर शेंकडा १ । २ निघाले; आम्हांला शेंकडा शंभर पाहिजे आहेत, हें कसें होणार ? बुद्धि कमी जास्त असली तरी **सर्वांवर राष्ट्रीय विचाराचा ठसा उमटला पाहिजे आणि तें राष्ट्रीय शाळावांचून व्हावयाचें नाहीं.** एका गृहस्थानें सांगितलें कीं व्यापाराच्या बाबतींत इंग्लंड निजलें होतें. तसें नाहीं. पण उलट

इंग्लंड चरत होतें व जर्मनी भीक मागत होती. पुढें जर्मनीनें यत्न करून तो देश पुढें जाऊं लागला तेव्हां इंग्लंड पुन्हा प्रयत्नाला लागलें. जर्मनीचें बस्तान तेव्हां बिघडलें होतें, आतां आपलें बस्तान बिघडलें आहे; तें आम्ही नीट बसवावयास पाहिजे आहे. सरकारला आम्ही दोष देत नाहीं. ते मानवच आहेत; आम्हीदेखील मानवच आहोंत, तेव्हां त्यांच्याप्रमाणेंच आम्ही आपलें हित पाहतों यांत कांहीं चूक नाहीं. हें कांहीं बेकायदेशीर नाहीं. राष्ट्रीय शिक्षणाची थट्टा करणें म्हणजे आपल्या विद्वत्तेचा व बुद्धिमत्तेचा दुरुपयोग करणें होय. शिक्षणासंबंधानें पाहतां १८८३ च्या न्यू. इं. स्कूलच्या रिपोर्टांत ‘कोणत्याही राष्ट्राचें शिक्षण त्या राष्ट्रांतील लोकांच्याच हातांत असलें पाहिजे’ असें वाक्य सांपडेलसें वाटतें. आम्ही; हें गव्हरनरांसमोर बोललों आणि त्यांना तेव्हां तें आवडलें. सरकार त्यावेळेला डेक्कन कॉलेज आमच्या स्वाधीन करीत होतें. वॅटफील्ड, वेडर्बर्न व रे हे सरकारतर्फे व रा. आगरकर, मी व नामजोशी शाळेतर्फे बोलत होतों. मि. ली वॉर्नर साहेब तेव्हां सेक्रेटरी होते. त्यांच्या मनांत याविरुद्ध कांहीं असेल कदाचित्, पण त्यांस तें बाहेर बोलून तेव्हां कांहीं उपयोग वाटला नसावा. तो मनू आतां पालटला आहे. राष्ट्रीय शिक्षणांत आम्हांला मराठींत शिक्षण पाहिजे. त्यांत व्यापारी व शास्त्रीय विषयांचें शिक्षण पाहिजे हें खरें; पण मुख्य मुद्दा हा नाहीं. इंग्लंड, अमेरिका यासारख्या स्वतंत्र **देशांत जें शिक्षण देतात तसलें शिक्षण** आम्हांला पाहिजे आहे. आम्हांला जोमाचीं माणसें पाहिजे आहेत तीं सरकारला कदाचित् पटावयाचीं नाहींत. पण त्याला कांहीं इलाज नाहीं. कुंडींतल्या झाडाप्रमाणें ठराविक उंचीपर्यंत झाड वाढूं देण्याची सरकारची इच्छा आहे, आम्हांला पूर्ण वाढ होऊं द्यावयाची आहे. आम्हांला **स्वराज्याचें शिक्षण पाहिजे आहे. सरकारला ओशाळलेला शिक्षकवर्ग या कामाचा नाहीं.**

## वळण ही मुख्य गोष्ट

मुलांना सरकारी नोकऱ्या मिळणार नाहींत. सरकारजवळचे पैसे—ते विरुद्ध असल्यानें—उपयोगाचे नाहींत. आमच्यांतील पैसेवाल्यांचे पैसेही ते पदवी वगैरेच्या मागें लागल्यानें मिळणें नाहीं. पण आमच्या अंगांत धमक असली तर आम्ही

पैसे आणूं, नाहीं तर मरून जाऊं. मग काय ! ज्यांना पैसे मिळाले आहेत त्यांनीं पैसे कुठून आणिले ! 'न्यू इंग्लिश स्कूल' च्या वेळेस आमच्या खिशांत एक पैसा-सुद्धां नव्हता. मेथांनीं आपल्या आयुष्याची कामगिरी केली आहे, पण त्यांनी या गोष्टीचा विचार केला नाहीं. आम्ही जरी सरकारी शाळांतून निघालों तरी माझी अशी समजूत झाली आहे कीं, सरकारी शिक्षणानें विद्यार्थ्यांचीं मनें भ्रष्ट होतात, विद्यार्थ्यांचीं मनें बाटतात. जो विचार सरकारी शाळांतून शिकवीत नाहींत किंवा ग्रॅन्ट्स्-इन्-एड शाळांतून शिकवीत नाहींत तो आम्हांला शिकवायला पाहिजे आहे. सरकारी धोरणानें आम्ही दरिद्री झालों, हेंही आम्हांला त्या शाळेंत शिकवावयाचें आहे; दोन आणि तीन पांच, हें शिकविण्याकरितां नाहीं राष्ट्रीय शाळा काढीत ! श्राद्ध करावयाचें हा मुख्य मुद्दा; तीन ब्राम्हण सांगावयाचे कीं पांच सांगावयाचे, हा गौण प्रश्न आहे. मुख्य मुद्दा लपविण्यांत कांहीं अर्थ नाहीं. **तुम्ही कसेंही बोललात तरी तुमचा अर्थ काय सरकारला कळत नाहीं ? सरकार तुमच्या बारशाला जेवलें आहे.** या राष्ट्रीय शिक्षणाच्या कामांत खाजगी शाळांनीं पुढाकार घेतला पाहिजे. राष्ट्र पुढें जात असतां त्यांनीं मागें राहून कसें चालेल ! मागें राहतील तर नवीन प्रयत्न झाला पाहिजे. धंदेशिक्षण पाहिजे म्हणून उद्यां फर्ग्यूसन कॉलेजांत धंदेशिक्षण देतील, पण तेवढ्यानें तें राष्ट्रीय शिक्षण होत नाहीं. राष्ट्रीय शाळेंत 'श्रीमंत सकल' चाच कित्ता शिकवला तरी तो निराळ्या वळणावर शिकविला जाईल हें उघड आहे. वळण ही त्यांतली मुद्याची गोष्ट आहे. शिक्षणाचे वळण आमचें—राष्ट्रीय—पाहिजे आहे. राष्ट्राला त्याची फार फार जरूर आहे; पुण्यास जरूर आहे. असा प्रयत्न केल्यास पांच पंचवीस वर्षांत—आपल्या हयातींत—त्याला चांगले स्वरूप आलेलें दिसेल, अशी मला खात्री आहे. वेळ फार झाला आहे, तेव्हां गजाननाच्या कृपेनें काम आरंभल्यास यश येईल अशी आशा प्रदर्शित करून मी आपलें भाषण पुरें करितों.

# हिंदु धर्मांतील एकी व सहिष्णुता

रविवार, ता. १५ सप्टेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, पुणें येथील नायकांच्या गणपतीपुढें लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

गणपतीचा उत्सव आज १२-१३ वर्षें चालूं आहे. पहिल्या पहिल्यानें त्यावर आक्षेप आले. तरी आतां त्याला व्यवस्थित स्वरूप आलें आहे. कोणत्याही गोष्टीसंबंधानें सुरुवातीला असेंच होत असतें. प्रथम 'हें करूं कां तें करूं' या विचारानें मन चंचल होत असतें. पण अनुभवानें स्थिरता येऊन अखेरीस जास्त व्यवस्थित स्वरूप प्राप्त होतें. गणपत्युत्सवावर अनेक आक्षेप आले. कोणी म्हणाले, गणपतीचा सार्वजनिक उत्सव सशास्त्र नाहीं, सार्वजनिक उत्सव करण्यांत गणपतीला विटाळ होऊन तो रागावतो; आणि कोणी म्हणाले यानें विद्यार्थ्यांचा वेळ जातो. **लोक जमल्यानें देवाला विटाळ होतो म्हणणें म्हणजे देवानें माणसें उत्पन्न केलीं नाहींत असें म्हणण्यासारखें आहे.** वेदांत चार वर्ण आहेत. ब्राह्मण मुखाचे ठिकाणीं, क्षत्रिय बाहूचे ठिकाणीं, वैश्य ऊरूचे ठिकाणीं व शूद्र चरणाचे ठिकाणीं आहेत. मग डोक्याला काय पायाचा विटाळ होतो किंवा बाहूला पायाचा विटाळ होतो ! असें धरल्यास आधीं डोकें तोडून निराळें ठेवावें लागेल. प्रथम प्रथम मला या उत्सवासंबंधानें जीं पत्रें आलीं होतीं त्यांत लिहिलें होतें कीं, उत्सव करतां हें चांगलें आहे, पण सार्वजनिक उत्सवानें गणपतीला विटाळ होतो. आतां हा आक्षेप नाहींसा झाला आहे. या उत्सवानें मुसलमानांना राग येईल असा एक आक्षेप होता, पण तोही जात चालला आहे. पोलिसांनीं यंदां उत्सवाच्या मिरवणुकीला पास देतांना दोन मुसलमानांच्या साक्षी घेतल्या आहेत. 'आम्ही सद्याला मुसलमान कोठचे आणावे ?' म्हणून विचारलें असतां 'आम्ही आणून देतों' म्हणून सांगून त्यांनीं तसे आणूनही दिले. प्रत्येक गोष्टींत चांगलें व वाईट असतें आणि चांगलें पहाणाऱ्यास नेहेमीं फायदाच होत असतो. पोलिसांचें हें करणें उत्सवाला अडवणुकीचे आहे. तरी या पोलिसांच्या कृतीमुळें उत्सवाला मुसलमान विरुद्ध नाहींत, एवढें आपोआप सिद्ध होतें. कांहींना या उत्सवांत सर्व लोकांबरोबर सामील होणें कमीपणाचें वाटतें.

मराठी ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत २७

पण ही उत्सवांत राहिलेली उणीव कांहीं दिवसांनीं कमी होऊन नाहींशी होईल. सरकारविरुद्ध बोलण्याकरितां हा उत्सव आहे, असाही एक आक्षेप आहे. पण, या उत्सवांत आम्ही काय बोलतों हें अक्षरशः टिपून घेण्याकरितां सरकारचे रिपोर्टर येत आहेत. तेव्हां हा आक्षेपही लवकरच नाहींसा झाला पाहिजे. अक्षरशः म्हणण्याचें कारण एक दोन वाक्यें घेऊन भाषणाचा विपर्यास कोणासही करतां येईल. तसें करण्याकरितां रिपोर्टर येत नाहींत, अशी मी आशा करितों. **आम्ही चव्हाटयावर, रस्त्यावर, जें बोलतों तें बेकायदेशीर असेल अशी कल्पनाच करणें आधीं चुकीचें आहे.** यंदा सरकार कांहीं करणार आहे या भीतीनें कांहीं चांगले लोक या उत्सवांत सामील झाले नाहींत, पण ही भीति निर्मूल आहे, हें स्पष्टपणें जाहीर रीतीनें सांगण्याकरितांच मी इतका प्रस्ताव केला आहे. हा उत्सव आतां व्यवस्थित झाला आहे. त्याचा प्रसार जास्त होत असून त्याला अधिकाधिक मदत होत आहे. तो वाढत आहे. यंदा पोलिसांच्या शाळेंतील मुलांनीं आपल्या प्रिन्सिपालची परवानगी घेऊन उत्सव केला. ज्याला अजून गणपत्युत्सवाची भीति वाटत असेल त्याची ती भीति जावी म्हणून मी हें सांगतों आहें.

## धर्माविषयीं उदासीनता

या उत्सवांत आम्हीं आमच्या हिताच्या गोष्टींचा ऊहापोह करितों. आमच्या धर्मांत सामाजिक बाबींचा अंतर्भाव होतो, त्यांची आम्ही या उत्सवांत चर्चा करतों. **मोक्ष ज्यानें मिळेल तेवढाच धर्म अशी आमच्या धर्माची तरी व्याख्या नाहीं.** चारी वर्णांतील लोकांच्या रोजच्या व्यवहाराविषयींचें वर्णन आमच्या धर्मांत केलेलें आहे. ख्रिस्ति लोकांप्रमाणें आठवड्यांतील एक दिवसापुरता—रविवारपुरता—आमचा धर्म नाहीं. समाजाशीं आमच्या-इतक्या सलोख्यानें कोणी वागत नाहींत. मुसलमान लोक हिंदूंचा धर्म खोटा समजतात; ख्रिस्ति लोक समजतात कीं, हिंदू लोक सारे नरकांत जाणार, आणि त्यांचा समज आहे कीं, त्यांच्या हातांत स्वर्गाच्या द्वाराच्या किल्ल्या असून कोणास आंत सोडावयाचें आणि कोणास सोडावयाचें नाहीं हें ठरविण्याचा अधिकार त्यांजकडेच आहे. मुसलमान व हिंदू या दोघांसही ते खोटे म्हणतात.

आमच्या धर्मांत सहिष्णुता जास्त आहे; ज्यानें त्यानें आपापला धर्म पाळावा असें आमचा धर्म सांगतो. प्रथम प्रथम पोर्तुगीज लोकांनीं गोव्याकडील लोकांना ख्रिस्ती बनविण्याचा सपाटा चालविला, तेव्हा गांवेंच्या गांवें ख्रिस्ती झाली. हे राजकीय दृष्ट्या ठीक नाहीं, असें अनुभवानें ठेंच लागून समजल्यावर धर्माविषयीं उदासीन राहण्याची इंग्रजांना बुद्धि आलेली आहे, ती कांहीं मूळची नव्हे. त्यांची आमच्या धर्मासंबंधानें सहानुभूति नाहीं, म्हणूनच त्यांच्या वृत्तीला औदासिन्य असें नांव दिलेलें आहे. उदासीनता आणि सहिष्णुता यांत महदंतर आहे. हिंदु लोकासारखा सहिष्णु धर्म जगात दुसरा नाही.

## हिंदूंत उच्चनीच भाव नाहीं

ही आमच्या धर्माबाहेरील लोकांविषयींची गोष्ट झाली, पण आतां आमच्या समाजांतल्या समाजांत जी व्यवस्था आहे ती कशी आहे याचाही विचार या उत्सवांत केला पाहिजे. आमच्या समाजांत अनेक जाती आहेत. **कमी जास्त दर्जा असेल, पण महारमांगापासून ब्रह्मवायापर्यंत सारे हिंदूंत येतात.** धर्मशास्त्र असें सांगतें, इतकेंच नाहीं, तर भागवतधर्मांतही उच्चनीचभाव नाहीं. महार, मांग, चांभार, सोनार, हे पंढरीच्या पांडुरंगाला सारखे प्रिय आहेत. पंढरपूरला जाऊन पहाल तर हे सर्व लोक पांडुरंगाचे पाय घट्ट धरतात असें दिसून येईल. गणपतीला विटाळ होईल म्हणून आक्षेप आणणें—आणि तो ज्यांचा गणपतीवर विश्वास नाहीं व धर्मावरही विश्वास नाहीं अशांनीं आणावयाचा हें विशेष—हें कांहीं वाजवी आणि प्रशस्त नाहीं. जुन्या ग्रंथांपासून चातुर्वर्ण्याची व्यवस्था आहे. माझी खात्री आहे कीं मी जें सांगत आहें किंवा सांगेन तें मी जुन्या ग्रंथांना सोडून सांगणार नाहीं. मी जें सांगणार आहे तें कितीही जुन्या मताचा इसम असला तरी त्यास व नव्यासही पसंत पडेल. **'हिंदु' हा शब्द उच्चारल्याबरोबर त्यांतील सर्वांना एक प्रकारची ईर्षा, एक प्रकारचा आवेश, एक प्रकारचा उत्साह उत्पन्न झाला पाहिजे.** धर्माचें खरें रहस्य हेंच आहे. आपण हिंदु आहांत. तर हिंदु धर्माची ध्वजा उभारली म्हणजे त्या धर्माकरितां झगडण्यास आपण सर्वांनीं एक दिलानें झटलें पाहिजे. आपल्यांत धर्मबुद्धि नाहीं. पण आपण आपला

गैरसमज करून घेतला आहे. हिंदुधर्म हें एक शरीर आहे; तोडून ठेवलेले हात, तोडून ठेवलेले पाय, असे फुटकळ अवयव नाहींत. मागें एका व्याख्यानांत मी सांगितल्याप्रमाणें ज्याला वेदादि ग्रंथपरंपरा मान्य आहेत तो हिंदू झाला व एका पुरुषाचा अवयव झाला हें त्यानें विसरतां कामा नये. अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे आर्यसमाजी देखील हिंदूंत येऊं शकतो. 'पोट आणि अवयव' ह्या इसापनीतील गोष्टींत म्हटल्याप्रमाणें पोटाशीं इतर अवयवांनीं भांडून चालणार नाहीं. या विचारांच्या विरुद्ध अलीकडे कांहीं होत आहे. ३८ वर्षांचे गुरू जे शंकराचार्य ते विपरीत बुद्धीनें पछाडले गेले आहेत. दुही होऊं देणें, गोंधळ होऊं देणें, बरें नव्हे. असें चालूं द्यावें हें हिंदू धर्माला व जातीलाही योग्य नाहीं. शंकराचार्यांचें भांडण होऊं नये म्हणून मी व इतरांनीं प्रयत्न केला; पण तो विफल झाला आहे! समाजापुढें हें सांगण्याचा संकल्प करूनच आज मी आलों आहे. **धर्मांत भेद, फूट होऊं देणें बंद केलें पाहिजे व हिंदु समाज एक राहिला पाहिजे.** मिशनरी लोक महाराला म्हणतात, "तुला हिंदू तुच्छ मानितात, तूं आमच्यांत ये." **तो ख्रिश्चन झाला व त्यानें विजार घातली कीं आम्हाला त्याचा विटाळ होत नाहीं;** त्याला कांहीं मग जात रहात नाहीं. तो मग 'साहेब' झाला, व 'ना विष्णुः पृथिवीपतिः' म्हणून आम्ही त्याचा मान करावयाला तयार होतों. याचा बंदोबस्त झाला पाहिजे. शंकराचार्यांच्या गादीबद्दल तन्टा चालला आहे. नुसत्या संन्याशानें कशाबद्दल भांडावयाचें? गादी आहे म्हणून तिच्याकरितां हें भांडण आहे. ही त्यांतील खरी गोष्ट आहे. गादीबरोबर पैसा आहे, वैभव आहे, म्हणून हें भांडण आहे. समाजाच्या वरच्या भागांत, खालच्या भागांत, मधल्या भागांत तंटा आहे; हें चांगले नाहीं. लोकांचे जे नायक, अग्रणी, त्यांनीं याचा विचार केला पाहिजे; नाहीं तर सगळे दुसऱ्या धर्मांत जाऊन आपल्या धर्माचा ऱ्हास होईल.

## हिंदु धर्माचा संग्राहकपणा

बौद्ध धर्मांतील मोक्षाचीं तत्त्वें हिंदु धर्मांतील तत्त्वांइतकीं उदात्त नाहींत, तरी त्या धर्मांतील लोकांनीं आमच्यापैकीं शेंकडा ८० किंवा ९० लोक एकदां आपल्यांत ओढले होते. त्या वेळीं बाटलेल्या लोकांना परत आपल्यांत घेऊन


बौद्धधर्मांतील उपयुक्त गोष्टींचा आपल्या धर्मांत समावेश करण्यांत आला. यज्ञांतही मांसाचा उपयोग करूं नये हें आम्ही बौद्ध व जैन धर्मापासून घेतलें. **आमच्या परंपरेला विरुद्ध न जातां—आणि ही मर्यादा अत्यंत महत्त्वाची आहे,—ज्या गोष्टींचा स्वीकार करणें इष्ट वाटेल त्या गोष्टी स्वीकारणें ही आमची फार दिवसापासूनची प्रवृत्ति आहे.** सगळ्या देवांना खोटें मानून ख्रिस्त देव माना म्हणून सांगितलें तर आमच्या धर्मांतील लोक ऐकणार नाहींत, पण ताबुताला नवस केला म्हणजे तो पावतो, त्याप्रमाणें ख्रिस्ताला नवस करा, तो पावतो, म्हणून सांगितलें तर कदाचित् ते ख्रिस्ताला नवस करतील. हिंदूंवर अनेक वादळें आलीं, हिंदूधर्माचा छळ झाला, मध्यंतरीं आम्हांला बौद्धांनीं मागें टाकिलें; तरी आमचा धर्म आहे, आज जिवंत आहे, हें हिंदूधर्माच्या अंगीं असलेल्या लवचिकपणाचें फल होय. जुने मूर्तिपूजक लोक मागें पडले; ग्रीक लोक, रोमन लोक, ख्रिस्ताचे पूर्वीचे जुने पंथ, खाल्डिया व इराण यांतील धर्म, नाहींसे झाले आहेत. येथें पळून आलेल्या पारशांचा धर्म हिंदुंनीं वचावला आहे. परंपरा कायम राखण्याच्या युक्तीनें, धैर्यानें, आह्मी जिवंत राहिलों आहों. तेव्हां १८ जातींचे जे शंकराचार्य त्यांच्यावर एक प्रकारची जबाबदारी आहे. पण पूर्वीच्या गुरूचा तूं शिष्य कीं मी शिष्य असें करून हा तंटा परधर्मीय राज्यकर्त्यापुढें गेला आहे. गादीवाल्यांना हें आवडत असलें तरी आह्मांला हें आवडत नाहीं व तुम्हांला आवडत नसेल तर याचा बंदोबस्त करा. खरा प्रकार असा आहे कीं, 'वेदोक्त' हें एक निमित्त आहे. गादीकरितां हा तंटा आहे. वेदोक्तासंबंधीं जुन्या शंकराचार्यांनीं संमति दिली होती हें मला स्वतःला माहित आहे. तंटा खरोखर वेदोक्तासंबंधाचा नाहीं. शिवाजीच्या वेळीं जी गोष्ट एकदां सिद्ध झाली त्यापेक्षां जास्त कोल्हापूरचे महाराजांना कांहीं नको आहे. सर्व जातीच्या शहाण्या लोकांनीं धर्माचा विचार करून, सलोखा वाढविण्यासारखें, व धर्माची घडी बसेल असें कांहीं करण्याकरितां एक कौंसिल केले पाहिजे. (नोटेबल्सच्या कौंसिलप्रमाणें दुर्बल व बेजबाबदार नव्हे) व त्यांचें मत शंकराचार्यांनीं घेतलें पाहिजे.

समाजांत नीति, धैर्य, एकी वाढावी व असलेले दोष काढून टाकावे म्हणून यत्न केला पाहिजे. हळू हळू गुण आला तरी औषध घेतले पाहिजे.

हा तंटा बंद करण्याकरितां सर्वांनीं प्रयत्न केला पाहिजे. आमचें म्हणणें ते ऐकतील, न ऐकतील तर त्यांचें गुरुत्वहि राहील कीं नाहीं याची शंका आहे. आम्ही 'आमचे ते गुरू नाहींत' असें म्हटलें म्हणजे मग काय ? ते धर्मपुस्तकांचे व पोथ्यांचे गुरू ! मग ते गुरू कसचे ? ते मग 'लायब्रेरियन' होतील. समाजांत फूट पडत आहे, उदासीन सरकार ती बंद करीत नाहीं, करणार नाहीं, करण्याचे त्यांचें काम नाहीं. तें आपणच केले पाहिजे. ब्राह्मण जर श्रेष्ठ तर खालचे लोक त्यांच्याप्रमाणें वर्तन करण्याचा प्रयत्न करावयाला लागले तर वाईट काय ? हिंदू समाज एके ठिकाणीं ठेवावयाचा आहे; व परकीय सरकारच्या राज्यांत परकी लोक आपल्या फुटीचा फायदा घेण्यास भोंवतीं घिरट्या घालीत असतां एकी ठेवणें निराळें, आणि अनुकूल परिस्थितींत एकी ठेवणें निराळें आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कोणते उपाय केले पाहिजेत हें मी या वेळीं सांगत नाहीं. माझें मत तयार नाहीं असें नाहीं. निर्णय व्हावयाची तयारी झाल्यास मी माझें मत सांगेन, आतांचा वेळ त्यासंबंधीं वाद करावयाचा नाहीं. लोकांनीं आपला हक्क गुरूस दाखविला पाहिजे. नाहीं तर गुरुत्व दुसऱ्याला दिलें पाहिजे. हें करणें म्हणजे वाऱ्याची मोट बांधणें आहे असें कोणास वाटेल, पण तें तसें नाहीं. ही गोष्ट नवीन नाहीं. श्रीतुकारामासारख्यांनी असले प्रयत्न केले आहेत आणि आतां त्या वेळेपेक्षां हल्लींची स्थिति फारच जास्त भयंकर असल्यामुळें प्रयत्न करणें अत्यंत आवश्यक आहे. इंग्रजी शिक्षणानें धर्मावर परिणाम होत आहे. राज्यकर्ते परकीय आहेत, परधर्मीयांजवळ मनुष्यबळ आहे व द्रव्यबळ आहे. आम्ही माणसें आहों, पण दरिद्री आहों, पंगू आहों, पण परमेश्वराची आमच्यावर कृपा आहे; नाहीं तर इतकी हजार वर्षें आम्ही राहिलोंच नसतों, करितां प्रयत्न केलाच पाहिजे. हल्लींची स्थिति वाईट आहे. हा इतर धर्मीयांचा, किंवा देवाचा दोष नाहीं, असला तर तो आपलाच अपराध आहे, तेव्हां यत्न करा. न केल्यास व मग तुम्हांस तुमचा दोष भोंवल्यास ईश्वराचा अपराध नाहीं. ही गोष्ट एकदां सांगितली होती. पण नुकत्याच फुटी झाल्यामुळें हा विषय मी यंदां पुनः घेतला. हिंदूंतील जाती या एका पुरुषाचे अवयव होत, हें कोणी कबूल करणार नाहीं असें वाटत नाहीं. चातुर्वर्ण्यांतील हरएक वर्णांचे गुण व कर्तव्यें निराळीं असलीं तरी ते वर्ण एका धर्माचे, एका पुरुषाचे, नवीन दृष्टीनेंहि अवयव आहेत, हें विसरतां कामा नये.

## प्रेम व मित्रत्व वाढवा

आपली स्थिति विपन्न आहे. परमेश्वर आणि धर्म याशिवाय आह्मांला कोणी त्राता राहिला नाहीं; हें लक्षांत ठेवा. प्रेम उत्पन्न होईल, मित्रत्व वाढेल, तंटे मिटतील, गुरू या सत्कार्यास मदत करतील व सर्व सुखप्रद मार्ग अनुसरतील, असें झालें पाहिजे. आजच्या विषयासंबंधानें मी जें सांगितलें त्यांत ग्राह्यांश न वाटल्यास सोडून द्या, पण ग्राह्यांश आहे असें वाटल्यास तो घ्या. शेवटीं गजाननाच्या प्रसादानें सर्व कल्याणप्रद होईल, असें इच्छून मी आपलें भाषण पुरें करितो.



# हिंदु धर्मांतील कर्मफलाची कल्पना

सोमवार, ता. १६ सप्टेंबर १९०७ रोजीं रात्रीं, पुणें येथें नातू यांचे हौदाजवळ बसविलेल्या गणपतीपुढें लो. टिळक यांचें व्याख्यान झालें, तें येणेंप्रमाणें:—

व्याख्यानाची व व्याख्यान उतरवून घेण्याची तयारी आतां झालेली आहे ( सभेंत व्याख्यान टिपून घेण्यास डिटेक्टिव्ह आले होते, ); तेव्हां व्याख्यानास सुरवात करण्यास कांहीं हरकत नाहीं. 'कर्मफलाची कल्पना' हा माझ्या व्याख्यानाचा विषय आहे. धर्म पुष्कळ आहेत. ख्रिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, बौद्ध धर्म, वगैरे धर्म आहेत. मुसलमानी धर्म ख्रिस्ती धर्मापासून निघालेला आहे. 'ओल्ड टेस्टमेंट' दोन्ही धर्मांना कबूल आहे. जिवंत मनुष्याला आत्मा आहे असें हिंदु, ख्रिस्ती व मुसलमान मानितात; पण शेवटच्या दोन धर्मांप्रमाणें 'जजमेंट डे'ची कल्पना हिंदु धर्मांत नाहीं. ख्रिस्ती व मुसलमान लोकांना 'जजमेंट डे'चे दिवशीं आपल्या कर्मांचा झाडा द्यावा लागणार असून त्यांच्या कर्मांचें फळ त्यांना त्या दिवशीं मिळणार आहे. त्यांची कल्पना अशी आहे कीं, सगळे आत्मे निरानिराळे आहेत. बाप, मुलगा, भाऊ, मित्र या सर्वांचे आत्मे निरनिराळे असतात, असा त्यांचा समज आहे. या निवाड्याच्या दिवशीं सर्व शरीरें सजीव होऊन थडग्याबाहेर येणार आहेत, अशी त्यांची कल्पना असल्यामुळेंच ते शरीरें पुरीत असतात. हा दिवस येईतों सर्व आत्म्यांनीं 'पर्गेटरी' नामक स्थलांत कुचंबत पडावयाचें, असें आहे. दहनविधीची चाल विलायतेंत सुरू करूं लागले असतां बिशपसारखे युनिव्हर्सिटीचे पदवीधर, बी. ए. प्रोफेसर, 'अशी चाल सुरू करणें धर्मविरुद्ध होतें' असें म्हणूं लागले, तें एवढ्याचकरितां. पुनर्जन्म येत नाहीं असें मनानें घेतल्यानंतर अनेक अडचणी येतात. सगळ्या पिढ्यांनां नवे आत्मे, तेव्हां त्यांचे पूर्वींचे संचित कांहीं नसायचें; तर मग एक श्रीमंत, एक गरीब, एक आंधळा, एक लंगडा, एक उच्च, एक नीच, एक राज्योपभोग घेणारा किंवा एक तसाच दारिद्र्यांत खितपत पडणारा, असले भेद कां दिसतात? या कल्पनेनें एक तर ईश्वराला वैषम्याचा किंवा

निर्घृणतेचा दोष द्यावा लागेल, किंवा त्याला अन्यायी न म्हटलें तर क्रूर म्हणावें लागेल. ख्रिस्ती लोक ईश्वराला अन्यायी किंवा क्रूर म्हणत नाहींत. मग या गोष्टीची उपपत्ति काय ? 'बायबल 'मध्यें मोझेजची गोष्ट आहे. एका कोंकराला एके दिवशीं वाघानें खाल्लें, हें मोझेजनें पाहिलें तेव्हां त्यानें आपल्या मनास प्रश्न केला कीं, कोंकरानें वाघाचा काय अपराध केला होता ? कांहीं एक केला नव्हता. मग वाघानें त्या कोंकराला कां खावें ? याचें उत्तर त्याला सुचेना; व या प्रश्नाचें उत्तर बायबलांतही समाधानकारक दिलेलें नाहीं. कर्मविपाक किंवा पुनर्जन्म यानें जशी या गोष्टीची जुळणी लागते तशी कशानेंही लागत नाहीं. आमच्या धर्मांतील कल्पना म्हणून मी हें म्हणतों आहे असें नाहीं; तर ती गोष्ट योग्य आहे असें तर्कदृष्टीनेंही सिद्ध होतें. ख्रिस्ती लोकांनीं पुनर्जन्माची थट्टा आणि कुचेष्टा केली, पण ही एकीकडे आणि हिंदुधर्माचें ज्ञान झाल्यावर 'थिऑसफी 'च्या दृष्टीनें वगैरे होणाऱ्या व्यवहारांतील प्रत्येक गोष्टीच्या कारणांचा विचार हा दुसरीकडे आहे. पाश्चात्यांना इकडच्या धर्मांतील विचारसरणी दिवसेंदिवस जास्त मान्य होत आहे. दोन वर्षांपूर्वी 'ईस्ट अँड वेस्ट ' मासिक पुस्तकांत मि. बीमन ( सध्यां न्याय-मूर्ति ) साहेबांनीं एक निबंध लिहून युक्तिवादानें व तर्कपद्धतीनें आपल्या इकडील कर्मवादाची तत्त्वें सिद्ध केलेलीं आहेत.

## हिंदी तत्त्वज्ञानास मान्यता

गुरुत्वाकर्षणाचा नियम न्यूटननें काढला. आकर्षण कांहीं डोळ्यांनीं दिसत नाहीं, तरी युक्तीनें तें ठीक आहे. पृथ्वी फिरते कां सूर्य फिरतो, याविषयीं अनुमानच काढणें भाग पडतें. कर्मवादाची गोष्ट ह्यांतीलच आहे. आणि आपणा सर्वांस समाधानाची गोष्ट ही कीं, विलायत, जर्मनी, अमेरिका, या देशांतून ईश्वर व कर्म, ईश्वर व जग, जग व आत्मा, एकच आहेत कां दोन आहेत, जड व सजीव, एक कीं भिन्न भिन्न आहेत; जगाच्या उत्पत्तीची कल्पना खरी कोणची; या गोष्टींविषयींची इकडील मतें नवीन शोधांनीं सिद्ध होऊं लागलीं आहेत. पुष्कळ लोक अनेक गोष्टींवर नुसता विश्वास ठेवीत असतात; पण ज्यांनां विचार करितां येतो त्यांनीं सर्वदृष्टीनें विचार केला पाहिजे. वैषम्य आणि नैर्घृण्य यांची प्रसक्ति ईश्वरावर होऊं नये म्हणून पुनर्जन्माची कल्पना आहे. शंकराचार्यांनीं हें लिहिलें

तेव्हां त्यांना ख्रिस्ती धर्म माहीत नव्हता व ख्रिस्ती धर्माच्या खंडनार्थ म्हणून कांहीं त्यांनीं हें लिहून ठेविलेलं नाहीं. धर्माची थट्टा करणें सोपें आहे, पण कोणीही इसम एकदां शंकराचार्यांच्या विचारसरणींत शिरला कीं त्यांतून बाहेर येणें कठीण पडतें. मोठमोठे बुद्धिवान् पुरुष सुद्धां आचार्यांच्या कोटिक्रमांत गुंग होतात —मग ते कसेही बुद्धिवान्, तरतरीत, व कोटीक्रम करणारे असोत—हें लक्षांत ठेविले पाहिजे. आचार्यासारख्या पुरुषानें ज्या धर्मांत परिश्रम केले, त्या धर्माची थट्टा करणें हें आंधळ्यानें दिवा दिसत नाहीं म्हणण्यासारखें आहे. अगदीं आरंभाला कर्म कुठलें आलें? तेव्हां तें नव्हतें, असा आक्षेप येतो? पण तो आरंभापुरताच आहे; आणि जगाच्या आरंभाप्रमाणेंच तें बरेंच अगम्य आहे. पण तेवढ्यानें पुढील युक्तिवाद ढासळत नाहीं. कर्माचें संचित व क्रियमाण वगैरे भेद आहेत; पण तें सारें सांगेन म्हटलें तर एक ग्रंथच होईल; ते सगळें सांगणें आज शक्य नाहीं. कर्मानें जर कोणचीही गोष्ट घडते तर मग आमच्या हातीं कांहीं राहिलें नाहीं असें होतें, व दैववादी उत्पन्न होतात. पण, यास असें उत्तर आहे कीं पूर्वीच्या कर्मानें जर ही स्थिति आलेली आहे तर ती पुढें सुधारावी म्हणून यत्न करण्याची जबाबदारीही आली. कर्म कसें करावें, हें भगवद्गीतेंत सांगितलें आहे.

## कर्म फुकट जात नाहीं

माणसालाच कर्म भोंवतें असें नाहीं, तर तें राष्ट्रालाही भोंवतें. Force is never lost ( शक्ति कधींही फुकट जात नाहीं ), Energy is never lost ( चालक–शक्ति कधींही फुकट जात नाहीं ), हा अर्वाचीन शास्त्राचा सिद्धांत आहे; त्याप्रमाणेंच कर्मही कधींच फुकट जात नाहीं. पदार्थ पूर्णपणें नाहींसा कधींही होत नाहीं, फक्त त्याच्या दशेंत मात्र फरक पडतो, म्हणजे त्याची स्थिति व स्वरूप बदलतें; पण तो पदार्थ समूळ नाहींसा होत नाहीं. आत्म्याची कल्पना तंतोतंत याप्रमाणें आहे. ज्यानें सजीवत्व येतें तो आत्मा; आणि जीव निघून गेला म्हणजे आत्मा कांहीं नाहींसा होत नाहीं; त्याचें रूपांतर होऊन पुनर्जन्म होतो. अज्ञेय असें जगाच्या बुडाशीं कांहीं असतेंच. या गोष्टी आपल्याला कळत नाहींत, पण त्यांचा अभाव आहे असें म्हणतां येत नाहीं. न कळणारी गोष्ट असूं शकते–आहे–हें सिद्ध करण्यास स्पेन्सर साहेबांनीं आपल्या पुस्तकाचीं ५०० पानें खर्च केली

आहेत—तेव्हां, एखाद्या कल्पनेनें कोणत्याही गोष्टीची उपपत्ति लागत असल्यास ती कल्पना घेतली पाहिजे. या दृष्टीनें कर्माची कल्पना घेतली पाहिजे. ही घेतली म्हणजे बरें कर्म आणि वाईट कर्म यांची कल्पना निघते, व येथूनच ( Ethics ) नीतिशास्त्राला सुरवात होते. Greatest good of the greatest number म्हणजे सगळ्यांत जास्त संख्येचें सगळ्यांत जास्त कल्याण ज्यानें होतें, ती गोष्ट चांगली; ही पाश्चात्यांची कल्पना आहे. आमच्याकडची कल्पना अशी आहे कीं, निरपेक्ष कर्म करावें, त्याचा परिणाम चांगला होतो. नुसत्या युक्तिवादानें मन चमत्कारिक होतें; तसें माझेंही एकदां झालेलें होतें; कारण तेव्हां इकडचे व तिकडचे दोन्हीकडील ग्रंथ वाचून तुलनात्मक दृष्टीनें विचार झाला नव्हता; असा विचार झाला पाहिजे. इतिहासांत एका पिढीच्या चुकीचा परिणाम दुसऱ्या पिढीला भोगावा लागतो असें दिसतें, हें कां होतें ? याची उपपत्ति कर्मफलाच्या कल्पने-शिवाय लागत नाहीं. पूर्वीच्या पापांचें क्षालन करून नवीन चांगलें कर्म केलें पाहिजे. कर्माची कल्पना इतकी उदात्त आहे कीं त्यानें खासगी व राष्ट्रीय वर्तन सुधारण्यास उत्तेजन मिळतें, 'आत्मावै पुत्रनामासि' हें श्रुतिवचन आहे. याचा अर्थ ' मुलगा म्हणजे बापच ' यावरून असा अर्थ घ्यायचा कीं, पुढच्या पिढीचें हित करणें तें आपलेंच सुख. ' केवळ आमच्या सुखाकरितां आम्ही यत्न करूं, पुढील पिढी आपल्या दुःखाची वाटेल तशी विल्हेवाट करील,' ही कल्पना ' सर्व आत्मे एकच आहेत ' यानें जाते.

कर्म चांगलें करतां कां वाईट करतां याचा तुम्ही कधीं विचार करतां काय ? नाहीं. मग तुमची स्थिति वाईट याचा दोष परमेश्वराकडे कसा येईल ? " आत्मैव ह्यात्मनो बंधुः आत्मैव रिपुरात्मनः " असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. परमेश्वर आपण होऊन एक दिवस तुम्हां सर्वांना चांगली स्थिति आणणार आहे असें कांहीं नाहीं. वाईट कर्म टाका, चांगलें कर्म करा, म्हणजे तुमची उन्नति होईल. कर्माची, पुनर्जन्माची व ईश्वराचा दोष नाहीं ही—या तीन कल्पना एके ठिकाणीं केल्या-खेरीज त्यांतील खरी खुबी कळणार नाहीं. आमच्या धर्मानें केलेल्या उपदेशापेक्षां चांगला उपदेश करणारा धर्म जगांत कोठेंही सांपडणार नाहीं. ज्यू लोकांवर त्यांचा देव एकदां मेहेरबानी करणार आहे, असें आहे. तुमच्या धर्माचें तत्त्व असें आहे कीं तुम्हाला पाहिजे तें तुम्ही प्रयत्न करून मिळविलें पाहिजे. तुमच्या

कर्माप्रमाणें तुम्हांला फळ मिळेल, ही कल्पना हिंदुधर्मांतील असून ती जगभर पसरेल. हें सोनें ( ही कल्पना ) येथील बाजारांत लोखंड समजलें जात असून सध्यां पाश्चात्यांच्या बाजारांत त्याची किंमत होत आहे. कर्म प्रधान आहे, ही कल्पना मी आज सांगितली आहे, यापेक्षां जास्त गोष्टींकरितां तुम्हांला आपल्या ग्रंथांचें वाचन केलें पाहिजे. विषय धार्मिक असला तरी व्यवहाराला तो उपयोगी आहे. शेवटीं चांगलें कर्म करा, म्हणजे गजाननाच्या कृपेनें तुम्हाला यश येईल, असें सांगून मी आपलें भाषण संपवितों.

मराठी ग्रंथ संग्रहालय
निबंध ६३
वन्देमातरम्

# देशाला काय पाहिजे आहे ?

मंगळवार, ता. १७ सप्टेंबर १९०७ रोजीं, सायंकाळीं, पुणें येथें, नारायण पेठेंतील लो. टिळक यांच्या वाड्यांत बसविलेल्या गणपतीपुढें ह. भ. प. भिंगारकरबोवा यांच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

परवांच्या दिवशीं नायकांच्या गणपतीपुढें व्याख्यान दिलें तेव्हां समाजाच्या धार्मिक स्थितीचें मी वर्णन केलें; आमचें वर्तन परकीयांशीं सहिष्णुतेचें असलें तरी आपसांत फूट आहे, हें त्या दिवशीं सांगितलें. तें व्याख्यान जुन्या व नव्या मंडळींस पसंत पडलें. सुधारकांनां वाटलें, मी जातिभेदाविरुद्ध व्याख्यान दिलें. कृष्ण सभेंत आला असतां जो जसा होता त्यास तो तसा दिसला— कंसाला दुष्ट दिसला—तें कसेंही असो, दोघांसही व्याख्यान पसंत पडलें हें अभिनंदनीय आहे. धार्मिक बाबतींत जशी फूट आहे तशी राजकीय बाबतींतही फूट आहे. त्यांचीं कारणें काय, त्यांचा प्रतिकार होणें शक्य आहे कीं नाहीं, त्याला काय उपाय आहेत, हें मी आज सांगणार आहे. एका तासाच्या अवधींत या विषयांतील सर्व मुद्यांचा सर्व दिशेनें विचार होणें शक्य नाहीं. तरी त्याचें सामान्य स्वरूप मी आपल्यापुढें मांडणार आहें. गणपतीपुढें राजकीय विषयावर व्याख्यान देण्यास हरकत नाहीं, असें माझें मत असल्याचें मजसंबंधींच्या १२—१३ वर्षांच्या अनुभवानें लोकांस माहीत आहेच. धर्मानें जसा समाज बांधला गेला आहे; तसा तो राजकीय बंधनानेंही बांधला गेला आहे; व सर्व बाजूनीं विचार करण्याची आपली पद्धत आहे. पंजाबांत, बंगाल्यांत, नागपूर प्रांतांत, महाराष्ट्रांत, सध्यां काय चाललें आहे, याची माहिती आपल्याला असेलच. कांहीं बरी, कांहीं वाईट अशी बातमी रोज येत आहे. याविषयीं विचार करावयास थोडी दृष्टि बदलली पाहिजे.

## राष्ट्राच्या जिवंतपणाचें लक्षण

राजकीय बाजू, सामाजिक आणि धार्मिक बाजूपासून कोणी भिन्न करीत असतील, तर ते आपल्या सोयीसाठीं तसें करीत असतील. सामाजिक, राजकीय,

सांपत्तिक, या सर्व देशाच्या स्थितीच्या बाजू असून त्या एकमेकांत इतक्या मिसळल्या आहेत कीं, जो सामाजिक बाबतींत न्याय तोच राजकीय बाबतींतही लागू आहे. घराला चार दारें असून त्यांतील 'तीन दारें बंद करून एकाच दारानें वापर कर' म्हणून एखाद्या घरवाल्यास सांगणें म्हणजे त्याचें स्वातंत्र्य कमी करणें आहे; तसेंच या संबंधानेंही आहे. राजकीय व सामाजिक यांत आधीं कोणचा ? असा प्रश्न अजूनही होत असतो. मजकडे एक लक्षाधीश श्रीमंत गृहस्थ आले होते, ते म्हणाले "तुम्ही स्वदेशी करा, पण सरकारास चिडवूं नका" हे गृहस्थ चार-पांच गिरण्यांचे मालक आहेत. मी त्यांनां सांगितलें कीं हा गरीबांच्या पोटा-पाण्याचा प्रश्न आहे; तेव्हां तुमच्यापेक्षां त्यांचें मत भिन्न असणें अगदीं साहजिक आहे. माझा तर समज असा आहे कीं पुष्कळ अंशीं—मी सर्वांशीं म्हणत नाहीं—देशाची सामाजिक व सांपत्तिक स्थिति राजकीय स्थितीवर अवलंबून असते. फ्रान्सचा व्यापार इतका वाढला नाही, जर्मनीचा व्यापार इतका वाढला नाहीं, पण इंग्लंडचा व्यापार वाढून तो इजिप्त, हिंदुस्थान वगैरेकडे सर्वत्र पसरला, हें इंग्रजांच्या राजकीय शक्तीनेंच झालें आहे, नाहीं तर झालें नसतें. सामाजिक बाबतींतही हाच न्याय लागूं पडतो. पेशव्यांच्या सैनिकांनीं रणांगणावर असतांना पखालींतील पाणी पिण्यास कमी केलेलें नाहीं. हें लक्षांत ठेविले पाहिजे. एक मोठें अंतीम कार्य असावें लागतें आणि तें असलें म्हणजे मध्यंतरीं लहान सहान अडचणी आल्यास त्या उचलून दूर बाजूला ठेवतां येतात व ठेवीत असतात. महत्वाकांक्षा ठेवूं नका, अभ्युन्नतीची इच्छा धरूं नका, असें आपला धर्म सांगत नाहीं. माझी स्थिति सध्यां आहे त्यापेक्षां चांगली झाली पाहिजे. असें वाटणें हें सजीवतेचें लक्षण आहे. नुसता जीव असल्यानें राष्ट्र होत नाही. तसें असतें तर बैलांत जीव आहे म्हणून बैलांचेही एक राष्ट्र झालें असतें. सजीवपणाला उमेद, धमक, महत्वाकांक्षा लागत असते. हिंदुस्थान अगदीं मेलेल्या राष्ट्रांत जमा केलें नाहीं तरी त्याची स्थिति घोंगडीवर ओढून काढण्यासारखी होत चालली आहे. या स्थितीसंबंधीं राजकीय वैद्यांचा विचार चालू आहे व त्यांचे विचार जितके अधिक प्रचलित होतील तितके हवे आहेत; अशी निदान माझी इच्छा आहे, याबद्दल मला शंका नाहीं, पण कोणाला वाटत असल्यास माझा नाइलाज आहे, या राजवैद्यांचे प्रयत्न ५० वर्षांपासून चालू आहेत. घोंगडीवर टाकलेल्या रोग्यास डॉक्टरांनीं सांगितल्यास १५—१५ मिनिटांनींही औषध द्यावें लागतें, व ओषध नुसतें दिल्यानेंच

कार्य होत नाहीं, तर तें लागू पडलें पाहिजे. त्याचप्रमाणें देशाचेंहि आहे. देशांतही विचाराचें औषध नुसतें पोटांत जाऊन उपयोगी नाहीं, तर देशानें हात पाय हालवले पाहिजेत, तेव्हांच औषध लागू पडलें असें म्हणतां येईल.

## नुसतीं तत्त्वें काय कामाचीं ?

आमची स्थिति वाईट आहे, याबद्दल कोणाचाही वाद नाहीं. न कळत **संपत्तीचें हरण होत आहे.** कलेक्टर धंदा बुडवीत नाहीं, पण जीं दारें बंद पाहिजेत तीं उघडीं राहून दुसऱ्या लोकांना आंत येऊन आम्हांला बुडवायला सांपडतें ! हीं द्वारें बंद करणें आमच्या हातांत नाहीं, सरकारला विनंति करून सरकार ऐकत नाहीं. आमची चळवळ सध्यां आहे ती कांही राज्य घेण्याकरितां नाहीं. एक, पंचवीस, पांचशें घ्या, अधिकारी परदेशांतून आल्यानें नुकसान होत नाहीं असें नाहीं, पण तें थोडें आहे. सुमारें सातशें सिव्हिलियन सध्यां हिंदुस्थानांत आहेत; त्यांनीं आतां घेतात त्याच्या दुप्पट जरी पगार घेतला तरी कांहीं अत्यंत नुकसान होणार नाहीं, पण सध्यां हिंदुस्थान देश इंग्रजांनी चरण्यास कुरण झाल्यामुळें सर्व लोक निर्धन झाले आहेत ! प्रजा विद्वान, धनिक, शूर, पराक्रमी अशी करावी म्हणून सरकारला नीतिदृष्ट्या जरी वाटत असलें तरी कृतींत त्याचा परिणाम कांहीं नाहीं. चांगलीं तत्त्वें काय ? तीं मिल्ल साहेबांच्या पुस्तकांत वाटेल तितकीं आहेत. हिंदुस्थानाच्या कल्याणाकरितां हिंदुस्थानाचें राज्य करावयाचें असें त्यांनीं लिहिलें आहे. पण काय ? पुराणांतील वांगीं पुराणांत. सुदैवाची गोष्ट म्हणावयाची कीं, असलीं तत्त्वें तरी कबूल करतात ! नुसती शांतता असून काय करावयाचें आहे ? शांतता असली तरी घरीं खायला नसलें म्हणजे घर नकोसें होतें, तसें झालें आहे. आमची संपत्ति, मानासिक शक्ति, नैतिक शक्ति, यांचा ऱ्हास होत आहे. कोणाचा द्वेष करण्याचा आमचा उद्देश नाहीं पण **चिमटे बसत आहेत** व देशाच्या स्थितीबद्दल आम्हांला वाईट वाटत आहे; आणि त्याकरितांच प्रयत्न होत आहेत. **ओरड, सभा, अर्ज, नम्र प्रार्थना, विनंति, सर्व केलें.** आमचीं दुःखें आम्ही त्यांना सांगितलीं, त्यानीं ऐकलीं व त्यांना तीं समजलीं, पण कांहीं नाहीं ? रानडे, मेथा, तेलंग, दादाभाई, यांनीं एकसारखी कपाळकूट केली, पण "शिकलेले लोक आमचे शत्रू आहेत, रयत

अजून आमच्या नादीं आहे. त्यांना तसेंच ठेवण्याचा आमचा उद्योग आहे, त्यांना आम्ही तसें ठेवूं, परंतु सुशिक्षित म्हणतात तें आम्ही कधींही देणार नाहीं." अशा प्रकारचें सरकारचें वर्तन आहे.

आमची ओरड चालू असताही लोकांचे हक्क क्रमाक्रमानें काढून घेतले याचें एकच उदाहरण मी सांगतों. पूर्वी आमचे शेतकरी आपल्या जमीनीचे मिरासदार मालक होते, पण लँड रेव्हिन्यू कोडांत फक्त नांगरण्याचा हक्क सरकारनें दयाळुपणानें शेतकऱ्यांकडे ठेविला आहे. (Right of occupancy) असे शब्द आहेत. तर मग शेतकरी शेत विकतो, म्हणजे काय विकतो ? तर हा **नांगरण्याचा हक्क** विकतो. हा हक्क दयाळू सरकारानें वंशपरंपरा दिलेला आहे. ( It is declared to be hereditary ) एका कायद्याच्या कलमानें सर्व लोकांची जमिनीवरील सत्ता सरकारनीं सपाट्यासरशी नाहींशी केली ! हें झालें तेव्हां कै. वा. मंडलीक कौंसिलर होते, पण कांहीं नाहीं ! सरकार मोठें धिम्में आहे. त्याला दम आहे. आम्ही पडलों कायदेबाज ! कायदा झाल्यावर आमची चळवळ थंड पडली; व पुढें हा कायदा आणखी जुलमी करण्यांत आला ! पूर्वीचा शेतकऱ्यांचा जमिनीवरील हक्क शेषाच्या मस्तकापासून तो आकाशापर्यंत होता. विलायतेंतही तो तसाच आहे, पण आतां नांगर जितका खोल जाईल तितका—तेथपर्यंत—शेतकऱ्याची जमिनीवर सत्ता ! शेतकऱ्यानें मोठा इंग्रजी 'प्लो' ( नांगर ) आणला तर तो जो काय खोल जाईल तितकी शेतकऱ्याची सत्ता ! असें झालें आहे. त्याच्या खालीं जमिनींत जें काय सांपडेल तेवढें, सोनें, दगड, मुरूम वगैरे यांच्या खाणीवर हक्क सरकारचा. शेतावरील हवेसंबंधी अमूक एक उंचीपर्यंत शेतकऱ्याचा हक्क, असा कायदा झालेला नाहीं ! पण हवेमधून विमानांतून लढण्याची गोष्ट सिद्ध झाल्यास हेंही होण्याचा संभव आहे. हाच कायदा आणखी जुलमी केला; तेव्हां 'पूर्वीचा कायदा जर तुम्ही कबूल केलात, तर आतां यांत काय विशेष आहे ? त्याच तत्त्वावर हाही कायदा आहे' असें सांगण्यांत आलें. आमचे कायदे-कौन्सिलर कौन्सिलांतून उठून गेले, पण त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं ! इन्कम् टॅक्स झाला, लायसेन्स टॅक्स झाला, तेव्हांही आम्ही ओरड केली. तरी कांहीं नाहीं ! राज्यकर्ते दमदार असल्यामुळें प्रत्येक वेळीं चळवळ करण्याचा त्रास मात्र आम्हांला पडावा, एवढेंच झालें !

अर्ज करा, निषेध दाखवा, तक्रार करा, ते तिकडे दुर्लक्ष करतात. ही गोष्ट बंगालच्या लोकांच्या मनांत पहिल्यानें भरली. बंगालची फाळणी रद्द करण्याकरितां अर्ज पाठविले, ठराव पास केले, शहरांतून आणि खेड्यांतून अर्ज पाठविले, डेप्युटेशनें झालीं, पण कांहीं नाहीं! तेव्हां सध्यांची नवी युक्ति निघाली. राज्य इंग्रजांचें खरें, तरी पण लोकांत दुही उत्पन्न करण्याकरितां—लोकांच्या इच्छा बाजूला ठेवून—सरकारनें बंगालची फाळणी केली! लोकांनां याचें फार वाईट वाटलें. याबद्दल सरकार जबाबदार आहे. लोकांनीं बोभाटा, तक्रार, गाऱ्हाणें सगळें कांहीं केलें होतें. हें गळू मलमपट्टीनें बंद होणारें नाहीं—वरून कातडी आली तरी त्यांत रोग राहतोच—तें वाहतच ठेविलें पाहिजे, हें लोकांच्या लक्षांत आलें. पण, ही गोष्ट मुंबईकडे आली नाहीं. एक नावडणारी गोष्ट सोसून, दुसरी होईतों थांबून पुनः ती सोसणें, आणि असाच क्रम पुढें चालविणें हें जिवंतपणाचें लक्षण नाहीं. इंग्रज बलाढ्य आहेत. सरकार सांगतें व मीही सांगतों कीं, सरकार बलाढ्य आहे. आम्ही गरीब व दीन आहों. पण त्यामुळें बलाढ्यानें जुलूम करावा असें मात्र होत नाहीं. ३०,००,००,००० लोकांनां असंतुष्ट ठेवून सरकारचें चालणार नाहीं.

## फुटलेल्या आरशाचे तुकडे

असो. लोकांनां जेव्हां कळलें कीं, युक्तिवादानें कांहीं एक व्हावयाचें नाहीं. तेव्हां स्वदेशी व बहिष्कार हें उपाय पुढें आले. पण काय म्हणावें समजत नाहीं. काँग्रेसमध्यें दरवर्षी असा ठराव होतो कीं, स्वदेशी बंगाल्यापुरती! महाराष्ट्र, मद्रास, वायव्य प्रांत, यांना ती नको म्हणतात. डोकें दुखत असलें तर त्याचें दुःख हातापायास कसचें! असें त्याचें म्हणणें. बंगाल्याचा अपमान झाला हें दिसत आहे तरी आपल्या अंगावर जबाबदारी घ्यावयास नको. बंगाल्यापुरतें तें, असें म्हणणें, हीं बुद्धि राष्ट्रीय कल्पनेची नाहीं! असें म्हणणें म्हणजे आपल्या तोंडानें आपलें राष्ट्र छिन्नभिन्न झालें आहे म्हणून सांगण्यासारखें आहे. काँग्रेसमध्यें अजून इतकी फूट आहे. इंग्रज तुमची मजा पहात आहेत. हा तुमचा प्रकार पाहिला म्हणजे ते समजतात कीं, इतक्यांतच यांचें ऐकण्याचें कारण नाहीं. मी राजा असतों तर हेंच केलें असतें, व माझ्या दोस्त पत्रकारांनां या गोष्टीला उत्तेजन द्या म्हणून मी सांगितलें असतें. अँग्लो-इंडियन पत्रें तेंच

करीत आहेत. पंजाबांत दंगा चालला असतां आपण आपल्या खोलीचें दार बंद करून बसावें, अशी तुमची बुद्धि झाल्यासारखी दिसते; पण, हें अत्यंत लाजिरवाणें आहे. मोर्ले यांनीं चक्क जबाब दिला आहे. समज पडली नसल्यास करून घ्या. Notables ( सरदार ) आपल्या बाजूला करून घेण्याचा हा खेळ आहे. "माझ्या हातांत रुपये आहेत ते तुम्ही मागूं नका. मी ते आपल्या हातांत ठेवून तुमच्या कानाशीं पाहिजे तर खुळखुळावतों, त्या आवाजानें तुम्हांला आनंद होत असल्यास करून घ्या. हवे तर माझा ताबा त्यांच्यावर राहील अशा तऱ्हेनें ते मी तुम्हाला दाखवितों—पिंजऱ्यांत ठेवतों, ते तुम्हीं पहा—व त्यानें तुमचें समाधान होत असल्यास करून घ्या; पण रुपये मात्र मागूं नका, ते मी तुम्हांला देणार नाहीं" असें म्हणण्यासारखें हें आहे. सर्व सरकारी अधिकार कायम ठेवून एक 'स्कीम' करा म्हणून मला त्या कामावर सरकार नेमतें, तरी मीही हेंच केलें असतें. दुसरें काय करणार? अशा स्थितींत असलेंच कांहीं तरी सोंग उभें करावयास पाहिजे. तांदूळ देणार नाहीं, त्याची एवढीशी कणीही देणार नाहीं, मग भुस्कूट आणि कोंडा हें राहिलें, तें घेऊन आनंदी रहाल तर रहा; सरकारला आनंदच होणार आहे. पण मी असें विचारतों कीं सध्यांच्या असल्या स्थितींत राष्ट्र असेंच फुटलेलें राहणार आहे काय ? फुटलेल्या आरशाचे वेगवेगळे तुकडे असतात तसे सगळे प्रांत फुटलेलेच राहणार आहेत काय ?

## राष्ट्रीयत्व बाणवा

५० वर्षांपूर्वींच्या पंथांची कामगिरी आतां संपली आहे. त्यांनीं आपल्या मार्गांत कांहीं बदल केला तरच तो पंथ आणखी कांहीं दिवस राहणार आहे. सर्व प्रांतांना एकमेकांबद्दल सहानुभूति वाटायला पाहिजे आहे. राष्ट्रीय पक्षाचे पुढारी सध्यां याच विवंचनेंत आहेत. "Create a sentiment of nationality", "लोकांत राष्ट्रीयत्वाची कल्पना आणा" हा पहिला भाग आहे. दोन्ही पक्ष बोलत आहेत; आपलें म्हणणें यच्चयावत् सर्वांनां कळेतों बोलणें व लिहिणें हें कांही कोणाला चुकलें नाहीं. आपले विचार दुसऱ्यास कळविण्यास बोलणें हा एकच मार्ग आहे. काय बोलावयाचें हा मात्र प्रश्न आहे ! एकमेकांचा—प्रांताप्रांतांत—विचार घ्या, **पण कांहीं पुढें**

**मागें ओढूं नका.** चळवळ करणारांचा व मधले कोठवले जे अधिकारी यांचा तंटा आहे. एडवर्ड बादशहा किंवा राणी यांचा व आमचा तंटा नाहीं. यजमानांनीं ५० वर्षांपूर्वी नोकर ठेवले आहेत व त्यांचा आतां आम्हांला कंटाळा आलेला आहे, तर त्यांनां काढून टाका, असें आमचें म्हणणें आहे. आमच्या हिताचे अधिकारी पाठवा—ते इंग्रज असले तरी चालतील—हें मी म्हणतों. पण तसे गोरे अधिकारी मिळणें शक्य दिसत नाहीं; म्हणूनच आम्ही स्वराज्य मागत आहों. **पण कोणी म्हणतात आम्हीं राज्य उलथविणार आहोंत! आमच्यांत शक्ति नाहीं असें सरकारास माहीत असतां सरकारनें किंवा दुसरे कोणी असें म्हणणें म्हणजे आम्हाला हिणावणें आहे; आमच्या दुःखावर डागण्या देणें आहे.** हा आमचा उपहास आहे. त्याचें आम्हाला वाईट वाटतें, इतकेंच नाहीं तर, तें आमच्या मनांत डांचत आहे. पण आम्ही दुर्बल असल्यानें आम्हांला ऐकून घ्यावें लागतें. याला उपाय आम्ही पहात आहोंत. आमची स्थिति वाईट आहे, ती सुधारणार नाहीं तर आम्ही मनुष्य आहों असें होणार नाहीं. सुधारलेलीं राष्ट्रें आम्हांला आपल्या दाराशीं उभें करीत नाहींत. या झगड्यांत जे बळी पडत आहेत, मरत आहेत, त्यांनीं येथें बसून नांवें ठेवणें हें बुद्धीचें दौर्जन्य आहे. चांगले लोक—उगीचच्या उगीच—हद्दपार केले आहेत. हक्क देण्याला आम्हीं अपात्र आहों असें स्वतंत्रतेचें माहेरघर जी पार्लमेंट सभा तेथें सांगण्यांत आलें आहे, आणि अधिकाऱ्यांचे वाईट रिपोर्ट वर गेले आहेत. वेळ फार कठीण आली आहे, तरी आपण उद्योग केलाच पाहिजे, व जितका नेटाचा उद्योग करूं तितकें लवकर फल प्राप्त होईल.

मी उद्योगवादी आहे. **कोणी देईल तें घ्या नाहीं दिलें तर स्वस्थ बसा, असा कोणाचा समज असल्यास माझा समज तसा नाहीं. भित्रेपणांत शहाणपणाची भर पडली म्हणजे त्याला सावधगिरी म्हणतात. तसला सावधपणा सोडून द्या. सावधपणा मुळींच नको असें माझें म्हणणें नाहीं. पण उमेदीबरोबर व स्वार्थत्यागाबरोबर असणारी सावधगिरी पाहिजे; भित्रेपणाबरोबर असलेली सावधगिरी नको;** असें माझें म्हणणें आहे. बंगाल्यासारखें आपण केलें पाहिजे असें माझें मत आहे. 'खळग्यांत जा' असें कोणी म्हणत नाहीं; पण

मोटार येत असतां सबंध मोटार अंगावरून जाण्यापेक्षां पायावरून जाऊं द्या असें माझें म्हणणें आहे. चांगलीं, सद्‌बुद्धीचीं, शिकलेलीं माणसें सरकारच्या रोषास बळी पडलीं आहेत, पण लाला लजपतरायांच्यावर झालेल्या जुलुमाचा नुसत्या शब्दांनीं निषेध करण्यास देखील मुंबईकरांस अजून फुरसत होत नाहीं ! हें जर तुम्हांला असह्य झालें नसेल तर राष्ट्र जितकें लवकर मरेल तितकें बरें ! **या गोष्टी जर तुमच्या अंतःकरणाला झोंबत नसल्या तर हें राष्ट्र मेलेलें काय वाईट ! घोडा आजारी झाला व तो बरा होण्याची आशा अगदीं राहिली नाहीं, तर घोड्याला गोळी घालून ठार मारीत असतात, त्याप्रमाणें या राष्ट्राचें होईल तर बरें ! वेदना तरी नकोत.** मृत लोकांनीं या भूमीला भार होण्यापेक्षां दुसरीं कोणी माणसें येऊन ती सनाथ करतील ! एका प्रांताला ती गोष्ट चांगली तीच सर्वांनां चांगली. सर्व प्रांत ऐक आहेत, अशी बुद्धि होऊन देशाचें काम पुढें ढकललें पाहिजे. या गोष्टी सर्वांनां कळाव्या म्हणून सांगणें भाग पडलें. जास्त जास्त ज्ञान झालें पाहिजे आहे. गणपती ही ज्ञानाची देवता आहे, आणि आज मला तिची मदत पाहिजे आहे. भ्याडपणा सोडून दिला पाहिजे. स्थिति वाईट आहे हें सर्वांनां कबूल आहे. मग 'मी नेमस्त, तूं जहाल' हें काय ? 'सरकाराला चिडवूं नका' हें काय आहे ? व्यर्थ चिडवा असें कोण म्हणतो ? चिडविल्याशिवाय नेमस्तपणानेंच कार्यसिद्धि होत असल्यास ती नको आहे, असें नाहीं. पण तशी ती होत नाहीं हें दिसत आहे. सरकारी अधिकारी ऐकत नाहींत हें सिद्ध झालें आहे. एडवर्ड बादशहा म्हणतात प्लेग कमी करा कीं इकडे अधिकाऱ्यांनीं केलें इनॉक्युलेशन सुरू ! राणीचा जाहीरनामाही चांगला होता, पण कृति होत नाहीं ! **ज्या गोष्टी आहेत त्यांची नुसती तात्त्विक समज असून भागत नाहीं.** इच्छेचे मज्जातंतू हाताच्या बोटांत उतरले पाहिजेत. **घोंटाळा माजला आहे, तो काढून टाकण्याकरितां घस सोसावी लागली, तुरुंगांत जावें लागलें, हद्दपार व्हावें लागलें, तरी तुम्ही तयार असलें पाहिजे.** सोनें तावून बडविल्यानेंच त्याचा कस लागत असतो. त्याप्रमाणें संकटांनींच तुमचा कस लागणार आहे. तुमचा कस कांहीं भोजनाच्या ताटावर लावावयाचा नाहीं.

## रात्रीनंतर सूर्योदय

बादशहानें तात्विक दृष्ट्या कांहीं कबूल केलें तरी हातापायांची कृति एक व डोक्यांतील विचार दुसरा असें तें होत आहे. बिपिनचंद्र पाल यांच्याविषयीं कोणी एकानें टीका केली कीं 'आमच्याप्रमाणें खोटी साक्ष देऊन त्यांनीं आपली मुटका करून घ्यायची होती!' पण ज्यांनीं आज स्वतःस देशकार्यास बळी दिलें आहे त्यांच्याविषयीं असें म्हणणें गैर आहे. राम्या व गोम्या यांच्यांत विरोध असला व त्यांपैकीं राम्या ओरडूं लागला कीं गोम्याचें कल्याण झालें असें समजणें अत्यंत चुकीचें आहे. पाल बाबू यांस शिक्षा झाल्याबद्दल आनंद प्रदर्शित करून 'लंडन टाइम्स'नें जी टीका केली त्याविषयींची तार आज वाचावयास मिळाली. 'लंडन टाइम्स'चें हें मत पाहिलें म्हणजे पाल बाबूंचा मार्ग योग्य होता असेंच खुशाल समजणें योग्य आहे. हा मार्ग अनुसरून प्रत्येक प्रांतांतील—प्रत्येक जातींतील—मनुष्यानें देशकार्याला मदत केली पाहिजे. **तुम्हाला संकटाला तोंड देववत नसलें, हा मार्ग तुम्हांला बिकट वाटत असला, तर त्या मार्गानें जाण्याची व कार्य करण्याची तुमच्यावर कोणी गोणी ठेवली नाहीं. पण जे त्या मार्गानें जात आहेत त्यांच्या वाटेंत निदान कांटे तरी पसरूं नका. त्यांनां 'वाईट' तरी म्हणूं नका.** ज्या गोष्टी आहेत, जी परिस्थिति आहे, तिचा विचार करा. **बळी पडणारांचें अभिनंदन करा, त्यांनां मदत करा. निदान त्यांनां मागें ओढूं नका.** मी मागें केसरींत लिहिल्याप्रमाणें पेन्शनर, शाळा व सरकारी नोकर यांनां सरकार आपल्या ताब्यांत ठेवूं पहात आहे. सुशिक्षितांचा पाडाव करण्याचा त्यांचा हेतू आहे. पुढल्या पिढीला बिकट प्रसंग येत आहे. सर्व एक व्हा. या स्थितींतून बाहेर कसे येऊं, संपत्ति, अधिकार कसा मिळवूं, याचा विचार करा. जाच होईल तो सहन करण्याची तयारी पाहिजे. **वाघाच्या शिकारीची तयारी कराल तेव्हां कोल्हा मिळेल, कोल्ह्याच्या शिकारीची तयारी केल्यानें कांहीं मिळावयाचें नाहीं.** परमेश्वरकृपेनें तुझी यशस्वी व्हाल अशी माझी खात्री आहे. यत्न करा. यत्न सोडूं नका. **लक्षांत ठेवा कीं, रात्रीचे बारा तास गेल्यावर मागून सूर्योदय होत असतो.**

# कर्मफलासक्ति

मंगळवार, ता. १७ सप्टेंबर १९०७ रोजीं रात्रीं, पुणें येथें, लष्करमधील श्री नगरेश्वराचे देवालयांत, रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचें 'कर्म-फलासक्ति' या विषयावर व्याख्यान झालें. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणाले :—

चांगलें कर्म म्हणजे काय? गृहस्थाश्रमाला चांगलें कर्म कोणतें? काम्य कर्मांचा ऱ्हास गृहस्थाश्रमीयांनीं करावयाचा काय? नाहीं. काम्य कर्मांचा ऱ्हास संन्याशानें करावयाचा. गृहस्थाश्रमीयांनीं काम्य कर्मांचा ऱ्हास करावयाचा नसून फलाची आशा सोडून कर्म करावयाचें आहे. आम्हाला—गृहस्थाश्रमीयांना—परमेश्वर-प्राप्तीचा मार्ग म्हणजे हाच होय. आजारी पडलेला मनुष्य आहे, त्यामुळें तुम्हाला काळजी लागलेली आहे, अशा वेळीं डॉक्टर येतो, (या डॉक्टराला रोगी बरा व्हावा म्हणून काळजी असतेच) तो आजाऱ्याच्या आजारासंबंधानें सर्व हकीगत ऐकतो व औषध देतो, पण रोगी मरत असला तरीही डॉक्टर आपली 'फी' घेऊन जातो व घरीं त्यास सुखानें जेवण जातें. आम्हांला मात्र दुःख होतें व तें आमच्या मायेमुळें होतें. हा पाश कठीण आहे; तो तोडणें सोपें नाहीं; त्याचप्रमाणें आपलेंच पोट भरून होत नाहीं; तर तुमच्या जातीकरितां व तुमच्या देशाकरितांहि तुम्ही चांगलें कर्म केलें पाहिजे. हें असलें कर्म तुम्ही कराल तर या लोकीं व परलोकीं तुम्हाला चांगली गति मिळेल. अशीं चांगलीं कर्में करतांना तीं करणारां-वर विपत्ति आली असतां परमेश्वर अवतार घेत असतो—पण लोक मात्र साधू पाहिजेत आणि मग त्यांच्यावर संकट आलें आहे असें झालें पाहिजे. देवाला भक्ति पाहिजे आहे. तुमचा उत्कर्ष व्हावा, तुम्हाला सुख व्हावें अशी त्याची इच्छा आहे, आणि म्हणून तुम्ही चांगलें कर्म—फलाशा सोडून—करण्यास प्रवृत्त व्हाल तर सुखी झाल्याशिवाय राहणार नाहीं. तुम्ही आपल्या कर्मांचा पडदा जर स्वच्छ कांचेसारखा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसेल, तो गोणताटाचा कराल तर त्यांतून परमेश्वर दिसावयाचा नाहीं. परमेश्वराच्या भक्तीचे दोन मार्ग आहेत. घरीं नाक धरून बसाल—हा एक मार्ग आहे—तर तुमची तुम्हाला मुक्ति मिळेल एवढेंच, पण इतरांनांहि मुक्ति मिळवून देण्याकरितां तुम्ही कांहीं केलें पाहिजे.

---

# आमचें कर्तव्य

गुरुवार, ता. १९ सप्टेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, पुणें येथें, रे मार्केटाजवळ बसविलेल्या गणपतीपुढें, रा. रा. भास्कर बळवंत भोपटकर यांचें व्याख्यान झालें. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणाले :—

पहिल्यानें सांगण्यांत आल्याप्रमाणें आजचा दिवस उत्सवांतील शेवटचा आहे. आनंदाची गोष्ट आहे, इतके लोक जमले आहेत कीं सँडो साहेबांससुद्धां आंत यायला वाट मिळाली नाहीं; त्यांचें माझ्याकडे दोन निरोप आले. आजच्या व्याख्यानाचा विषय उपसंहारात्मक होता. उत्सवांतील साऱ्या व्याख्यानांनां हजर राहणाऱ्यांस सध्यांच्या उत्सवांत प्रचलित विषयावरील—सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे सर्व गोष्टीं विषयींचीं—सध्यांचीं मतें ऐकावयास सांपडलीं आहेत. आह्मांस ज्ञान पाहिजे आहे, आणि गणपति ही ज्ञानाची देवता आहे, तेव्हां तिच्यासमोर असल्या विषयावर उहापोह होणें अगदीं साहजिक व योग्य आहे. ज्ञान हें एकाच दिशेनें घेऊन भागत नाहीं; एकच दिशेनें ज्ञान घ्या म्हणणें म्हणजे सैंपाकघरांतून माजघरांत येऊं नका म्हणून सांगण्यासारखें आहे. सैंपाकघरांतच राहणाऱ्या स्वैंपाक्याला सुद्धां माजघरांत वाढावयाला यावें लागतें. एकाच ज्ञान-वृक्षाचीं हीं निरनिराळीं फळें आहेत आणि त्या सर्वांचें सेवन करणें इष्ट आहे. राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार, आणि धर्मांतील एकी, या विषयीं व सामाजिक बाबींविषयींही ऊहापोह उत्सवांत झाला आहे. मद्यपानावर रा. लव्हाटे यांचें एक व्याख्यान झालें. समाजाचा सर्व बाजूनें विचार करण्या-करितां, या विषयांचा खल व्हावा, आढावा घ्यावा, म्हणून नुसती इच्छाच नव्हे, नुसता हेतूच नव्हे, तर उत्सवाचा कार्यक्रमही तसाच ठरविण्यांत येत असतो. हा उत्सव निर्विघ्नपणें पार पाडल्याबद्दल उत्सवाचे खरे अध्यक्ष जे गजाननमहाराज त्यांचे मी 'आभार' मानतों—नव्हे, आभार मानण्याची पद्धत नवीन असून गजाननाचे आभार मानण्याची आमची योग्यता नाहीं—स्मरण करितों. आम्ही जर वाईट नादाला लागलों, वाईट कर्माला प्रवृत्त झालों, तर श्रीगजानन आम्हांला त्यापासून परावृत्त करतात. यंदा लोकांनां वाटत होतें कीं, उत्सवांत कांहीं

'विशेष' होणार आहे. 'शेष' नाहीं तो 'विशेष' असा त्याचा अर्थ होता कीं, काय कोण जाणें, कांहीं एक विघ्न न येतां उत्सव पार पडला आहे, व यावरून शिकावयाचें तें एवढेंच कीं, भितां कामा नये, 'भिल्यापाठीं ब्रह्मराक्षस अशी जी आपल्यांत ह्मण आहे ती लक्षांत ठेवली पाहिजे. वेळ अशी आली आहे कीं, भीति सोडून शक्ति, निश्चय, करारीपणा दाखवून क्रिया केली पाहिजे. नुसतें बोलावयाचे, अर्जांचे, विनंतींचे दिवस जाऊन आतां स्वपराक्रमाचे व स्वावलंबनाचे दिवस आले आहेत. काळ फिरला आहे हें लक्षांत ठेवा, व या परिस्थितींतून पार पडण्यास परमेश्वराची प्रार्थना करा.

## मानसिक सामर्थ्य पाहिजे

सँडो म्हणाले तसें माझें मत नाहीं. शारीरिक सामर्थ्य नको आहे असें नाहीं पण शरीरसामर्थ्य सँडोसारखें असो कीं माझ्यासारखें लटपटीत असो; शरीरापेक्षां मन हें जास्त जोरदार पाहिजे. बंध किंवा मुक्ति, सुटका किंवा संसारांत पडणें याला कारण मन आहे. भारतांत सांगितलेलें 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः' हें लक्षांत ठेवा. नुसत्या शक्तीनें भागत नाहीं. एवढा सामर्थ्यवान् हत्ती, पण तो अंकुशानें वळतो. आमच्यांत सामर्थ्य नाहीं असें नाहीं, पण जें सामर्थ्य आहे तें सरकारचा जुलूम आमच्यावर करण्यांत खर्च होत आहे! सैन्य आह्मा लोकांचे आहे. सरकारनें तिबेट कोणाच्या सामर्थ्यानें जिंकला? महाराष्ट्रांतील लोक खुजे आहेत, त्यांची उंची फार तर ५ फूट ४ इंच भरते आणि पंजाबी सहा फूट भरतात. आणखी, **आठ फूट उंची भरेल, तरी त्यांचें करायचें आहे काय? मन घट्ट पाहिजे आहे. जोंपर्यंत मन घट्ट नाहीं, तोंपर्यंत जगांत कोणी विचारणार नाहीं.** आम्हाला घरांत बसून वाद करावयाची संवय लागलेली आहे. स्वराज्य पूर्ण मागावें कीं अर्धें मागावें, साम्राज्याच्या आंत कीं बाहेर, याचा वाद आम्ही करीत असतो. ही संवय वाईट आहे. 'बिपिन बाबूंचें म्हणणें वाईट, आम्हा मवाळांचें म्हणणें चांगलें, १५०० वर्षांनंतरच्या गोष्टींचा वाद उगीच आज करीत बसले आहेत', असें म्हणतात. 'अर्धें' म्हणजे काय, व 'सबंध' म्हणजे काय हें सरकारला कळतें; सरकार दोघांच्याही बारशाला जेवलेलें आहे. हक्क मिळविण्याला कारण तुमचा निश्चय होणार आहे, एवढें बस्स आहे. थोडें दिल्यास मागून मिल्ल साहेबां-

च्या म्हणण्याप्रमाणेंच होणार आहे. कर्झननेंही म्हणाले होतें कीं, ' तुम्हांला आतां जर कांहीं हक्क दिले तर पुनः पुढें तुम्हीं हक्क मागणार नाहीं' असें कबूल कराल तर कांहीं हक्क देऊं. ' यावच्चद्रदिवाकरौ सरकारी अधिकारी येथें कायम रहावे, तुम्हीं त्यांच्या गोठ्यांतील गुरें आजपर्यंत होतां तसेंच तुमच्या मुलांनीं निरंतर दास्यत्वांत रहावें, ही त्यांची इच्छा असून तसें त्यांचें विधानहि झालें आहे; आणि इकडे आम्ही वाद करीत आहों कीं अर्धें मागावें कीं पूर्ण मागावें ? देणारा कांहीं एक देऊं इच्छित नसतां दोन भटांनीं दारांशीं उभे राहून दहा लाख मागावे कां दोन कोट मागावें म्हणून तंटा मांडावा तसें हें उपहासास्पद आहे ! आमच्यांत चिकाटी नाहीं, निश्चय नाहीं, हक्क कसे मिळवावे हें आम्हांला कळत नाहीं; आम्ही मूर्ख आहों, असें जगाला सांगण्यासारखें हें आहे.

## स्वातंत्र्य व जुलूम यांचा तंटा

**आम्हांला धर्मदृष्ट्या, सामाजिक व राजकीय दृष्ट्या, वळण पाहिजे आहे; निव्वळ गंमत, मौज करण्याकरितां, किंवा आमच्या-जवळ पैसे फार झाले आहेत ते खर्च करण्याकरितां आम्ही उत्सव करीत नाहीं.** ज्ञान मिळावें म्हणून ही खटपट आहे; व उत्सवांतील व्याख्यानांतून यासंबंधीं सांगितलें आहे. तुम्ही जिवंत रहावयाला योग्य आहां कीं नाहीं, हें निश्चयानें दाखवावयाचें आहे. सर्व समाज एक असून प्रतिकार करा-वयास तयार व संकटें सोसण्यास तयार आहे कीं नाहीं, छळाचा अंमल सोशिक-पणावर बसतो किंवा सोशिकपणा छळास मागें हटवितो हें पाहण्याची वेळ आहे. तुम्ही निश्चय कराल तर छळ करणारे मागें पडतील. मी मागें सांगितल्याप्रमाणें सैतानाचा आणि देवाचा जसा नित्य तंटा आहे तसा स्वातंत्र्याचा व जुलुमाचा नेहमीं तंटा असतो. राघूसारखे बोलण्याचे, इंग्रज पंडिताप्रमाणें बोलण्याचे दिवस आतां गेले आहेत. हिंदूंचा धर्म कायम राहणारा आहे, एक तरी हिंदू कसल्याही संकटांतून जिवंत राहील तर तो पुनः हिंदु धर्माचा प्रसार करील असें हिंदुधर्माचें सांगणें आहे. असला सनातन धर्म आपण पाळतों आहों. तुरुंगांत गेलो तरी बेहत्तर, पण माझ्या सदसद्विवेकबुद्धीविरुद्ध मी अन्यायाला आणि जुलमाला मदत करणार नाहीं, असें बाबू बिपिनचंद्र पाल यांनीं तोंडानें सांगितलें आहे व

कृतीनें दाखविलें आहे. एक गोष्ट ध्यानांत घ्या कीं मी पाल बाबूंनां गणेशोत्सवाकरितां येथें बोलावणार होतों; पण त्यांनीं अशी कांहीं कृति केली आहे कीं ते जरी येथें आले नाहींत, तरी त्यांच्या येण्यानें जो उत्साह व चळवळ झाली असती तो उत्साह व ती चळवळ तुमच्यांत आज दिसत आहे. लढाईला तोंड लागलें आहे, प्रश्न हा आहे कीं तुम्ही मागें घेणार कीं प्रतिपक्षी मागें घेणार! एक मेलें पाहिजे किंवा कायमचें दास्यत्वांत राहिलें पाहिजे. मला या प्रसंगीं तुम्हांला एकच उपदेश करावयाचा आहे, आणि तो उपदेश म्हणजे अश्वत्थाम्यानें कौरवसेनेला केलेला उपदेश होय. अश्वत्थाम्यानें सांगितलें "यदि समरमपास्य नास्ति मृत्योर्भयमिति युक्तमितोऽन्यतः प्रयातुम्। अथ मरणमवश्यमेव जंतोः किमिति वृथा मलिनं यशः कुरुध्वे॥" मरण आणि दुःख चुकलेलें नाहीं. मरण घरीं बसून येईल, व दुःख तर मागें लागलेंच असतें. मग लढाईंत यशस्वी होणें चांगलें कां घरीं मरणें चांगलें?

सरकारनें उग्र स्वरूप धारण केलें आहे, यानें आम्हीं भिणार कीं त्याचा प्रतिकार करणार? आज वीस वर्षांनीं प्रतिकार करून यशस्वी झाल्याचें तुम्हांस सांगतां येईल, असा तुम्ही यत्न करा; इतकीं वर्षें दृढनिश्चयानें व निकरानें प्रयत्न कराल तर तुम्हांला स्वराज्य मिळालेंच पाहिजे. परमेश्वर तुमच्या मागें उभा आहे. माघार घेण्याची वेळ नाहीं. तुम्हांला तोंड दिलेंच पाहिजे. बंगाल्यानें निश्चय केला आहे, महाराष्ट्र केव्हां निश्चय करणार? सरकारनें कांहीं केलें तरी स्वदेशी व बहिष्काराचें व्रत आम्हीं पुढें चालविणार असा आपला निश्चय पाहिजे. मला तुरुंगांत पाठविलें किंवा फांसावर चढविलें तरी बेहत्तर, असें बाबू सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांनीं नुकतेंच जाहीर केलें आहे. शेंकडों लोक कैदेंत जात आहेत, गेले आहेत, लोक हद्दपार झाले आहेत, अनेक गृहस्थ संकटें सहन करीत आहेत, यानें जर तुमचें मन निग्रही बनत नसेल तर तुमची गणना पशूंत करावी लागेल. तुमच्या धर्मांतील जिवंतपणा व तेज, आणि तुमची ऐतिहासिक परंपरा लक्षांत घेतां तुम्हांला अपयश कधींही येणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. हिंदूंची संख्या जास्त आहे. त्यांची परंपरा मोठी आहे. मनोनिग्रह व सोशिकपणा त्यांच्यांत आहे—ह्याचा उपयोग आजपर्यंत आमच्या गळ्याभोंवतींचीं दास्यत्वाचीं बंधनें घट्ट आवळण्याकडे झाला. आतां त्याचा

उपयोग हीं बंधनें कमी करण्याकडे झाला पाहिजे. आमचा मार्ग राजरोस आहे. तो सडकेचा मार्ग आहे, तो धर्मानें, इतिहासानें, नीतीनें आंखलेला आहे व तो सुटकेचा मार्ग आहे. या मार्गावरून तुम्ही मोटारच्या वेगानें जाणार कां पाऊल-पाऊल चालणार ! कसेही जा. पण जाणें अवश्य आहे. वाटेंत कांटे आढळल्यास ते दूर सारले पाहिजेत; पायाला कांटे लागल्यास त्याची तुम्हांस क्षिति नसावी. मुद्याच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करूं नका आणि क्षुल्लक गोष्टींकडे लक्ष देऊं नका. धर्म, पुराणें, इतिहास साक्ष देत आहेत कीं, तुम्हाला यश येईल. नेटानें व निकरानें यत्न केल्यास आणखी वीस वर्षांनीं मजवर जरी नाहीं तरी पिढींतील दुसऱ्या कोणावर यशस्वी झाल्याचें याच उत्सवांत गणेशापुढें जाहीर करण्याचा प्रसंग खास येईल. शेवटीं श्री गजानन आपल्याला सद्बुद्धि देवो अशी त्याची प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.

असें म्हणून ४००० लोकांच्या टाळ्यांच्या प्रचंड गजरांत व ‘ वन्दे मातरम् ’ च्या जयघोषांत लो. टिळक यांनीं आपलें वक्तृत्वपूर्ण भाषण संपविलें.

# गणेशोत्सवाचा समारोप

शुक्रवार, ता. २० सप्टेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, पुणें येथें, नदीचे तीरावर गणपतीविसर्जनाचे प्रसंगीं समारोपादाखल बोलतांना लो. टिळक म्हणाले :

(१) हा उत्सव निर्विघ्नपणें पार पाडल्याबद्दल गजाननाचें स्मरण करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे. पंजाबांत धुमाकूळ चालला आहे, बंगाल्यांत जुलूम होत आहे, त्याप्रमाणें उत्सवाचें निमित्त करून येथेंहि लोकांवर संकट आणलें जाईल कीं काय, अशी चांगल्या चांगल्या लोकांना शंका आली होती. ही शंका उगीच आहे असें माझें मत होतें व तें खरें होतें असें आतां सिद्ध झालें आहे. ईश्वराच्या इच्छेविरुद्ध व नियमाविरुद्ध जाण्याची प्रवृत्ति या शहराच्या अधिकाऱ्यांना झाली नाहीं व उत्सवांत विघ्न आणण्याचें त्यांनीं मनांत आणिलें नाहीं, याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे. शिस्त, धैर्य, ऐक्य, निश्चय, यांनीं आमच्या उत्सवांत आम्ही अधिकाऱ्यांना हात घालूं दिला नाहीं याबद्दल आम्ही आमच्या लोकांचेहि आभार मानिले पाहिजेत; कारण एका हातानें कधीं टाळी वाजत नसून दोन हातापैकीं एक हात—म्हणजे लोक—यांनीं कलहास जागा दिली नाहीं; यावरून एक गोष्ट सिद्ध झाली आहे, ती ही कीं, या शहरांतील श्रीमंत, गरीब, कारागीर व इतर धंदेवाले लोक संकटाच्या प्रसंगींही आपलें कर्तव्य पार पाडीत असतात. जुटीनें कसें वागावें, शिस्त उत्पन्न करून ती कशी पाळायाची, आत्मसंयमन कसें करावें लागतें, हें गणपत्युत्सवापासून शिकतां येतें. उत्सवांतील व्याख्यानांनीं ज्ञान मिळतें. मेळ्यांच्या पदांनीं गोड रीतीनें सामाजिक, धार्मिक, वगैरे गोष्टी कानावर पडून अंतःकरणांत भिनतात. आतां उत्सव समाप्त झाला असून तो चांगल्या रीतीनें पार पडल्याचा आनंद माझ्या मुखानें व्यक्त करावयाचा असें ठरविल्याबद्दल मी आपले सर्वांचे आभार मानितों. प्लेग अजून विशेषसा नाहीं, पाऊसपाणी बेताचें आहे, उत्सवांत पावसानें विरस केला नाहीं. याप्रमाणें उत्सव झाला आहे. पण, आतां पुढें वर्षभर तुम्ही काय करणार !

दहा दिवस उत्सव होऊन गणपति-विसर्जनानंतर घरीं गेल्यावर तुम्हांला ओकें ओकें वाटेल. ज्या गोष्टीची संवय होते, विशेषतः

दहा दिवस संवय होते, ती गोष्ट नाहीशीं झाल्यानें तिचा मनाला चटका लागणें साहजिक आहे. माझें असें सांगणें आहे कीं हजारों वर्षें ज गोष्ट तुम्ही भोगलीत ती गोष्ट—स्वराज्य—गेल्याबद्दल तुमच्या मनाला चटका लागेल असें कांहीं करा. गणपतीची आराधना करतांना स्वराज्य, वैराज्य, पारमेष्ठ्य राज्य, अधिराज्य, हें मागण्याची आपली पूर्वापारची चाल आहे. हे शब्द ज्या मंत्रांत आहेत ते मंत्र बंगाल्यांतील चळवळीनंतर केलेले नसून ते प्राचीन आहेत. तुम्ही त्या शब्दांचा अर्थ विसरून गेला होता; कसें विसरला कोणास ठाऊक ! ही कल्पना आठवावी म्हणून बंगाल्यांतलि चळवळ झालेली आहे. आज बरींच वर्षें 'स्वराज्य' 'वैराज्य' 'अधिराज्य' हे शब्द आपण केवळ पोपटाप्रमाणें म्हणत आलों आहों. पण आतां आपण माणसें झालों आहों. भटांना, वैदिकांना वेदघोष केल्याबद्दल कांहीं लोक हंसत, पण सुदैवानें सुशिक्षितांना आतां कळूं लागलें आहे कीं, स्वराज्याची कल्पना सध्यां ज्यानें विशेष रीतीनें पुढें आणिली, नीट समजावून दिली, देशहिताकरितां ज्यानें कैद सोसली, त्याचे याप्रसंगीं आपण उपकार व आभार मानले पाहिजेत. स्वराज्याच्या हक्काची प्राप्ति व्हावी असें इच्छावयाचें आहे. विशेष वैभवानें, उत्साहानें, स्वातंत्र्यानें गणेशोत्सव करतां यावा असें इच्छावयाचें आहे. प्लेग येईल, प्लेग जाईल, प्लेगाबद्दल गणपति जबाबदार नाहीं. तुमच्या कर्मानें प्लेग होतो. बंगाल्यांत गणेशोत्सव नसून प्लेग आहे व जपानांत गणेशोत्सव झाला पण प्लेग झाला नाहीं. तुमच्या दुष्कृत्यांमुळें व सरकारच्या दुष्कृत्यांमुळें प्लेग झाला आहे, हें मी तुम्हांला सांगतों. आपल्या—तुमच्या आमच्या (त्यांतच सरकारही आलें) कृतीनें प्लेग येतो व आला. ज्याला खायला पोटभर मिळतें त्याला प्लेग होत नाहीं; इंग्रजांना प्लेग होत नाहीं. आम्हांला इंग्रजांसारखें खायला प्यायला मुबलक मिळेल व रहायला त्यांच्यासारखे हवेशीर बंगले मिळतील तर हिंदुस्थानांत प्लेग राहणार नाहीं, हें मी खात्रीनें सांगतों. प्लेग हा दारिद्र्याचा रोग आहे. कोणत्याही दुःखाचें, आपत्तीचें खरें कारण काय ? याचें ज्ञान गजानन तुम्हांला देवो, त्याची तुम्ही प्रार्थना करा; ती करणें जरूर आहे. पुढल्या उत्सवापर्यंत स्वराज्य, वैराज्य, अधिराज्य याकरितां तुमची जास्त तयारी राहील अशी मी आशा करितों.

(२) गणेशोत्सवांतील गणपतीचे विसर्जनानंतर स्वदेशी व बहिष्कार ही वाळू येथून नेऊन तुम्ही आपापल्या घरांतून पसरावी व बहिष्काराचे शस्त्र हे

जे उंदीर यांपासून आपला बचाव करून घ्यावा. तुमच्या यत्नांचा लय अखेरीस पारमेष्ठयांत होईल. स्वराज्य, वैराज्य, पारमेष्ठय राज्य, हे कांहीं समानार्थक शब्द नाहींत; आमच्या पूर्वजांना शब्द फुकट दवडण्याची संवय नव्हती. शब्दच्छल करूं नका; पहिल्या पायरीपासून सुरवात करा, शेवटास नेऊन पोहोंचविण्यास गजानन समर्थ आहे. परमेश्वर, देश, स्वतः व पंचमहाभूतें यांनां स्मरून स्वदेशी व बहिष्कार याविषयीं शपथ घेऊन स्वराज्यप्राप्त्यर्थ झटण्याचा निश्चय करा; आणि पुढच्या वर्षीं अशा प्रसंगीं त्या तुमच्या कामाचा हिशोब देण्याचा संकल्प करा. राजाच्या डिटेक्टिवांपेक्षां परमेश्वराच्या डिटेक्टिवांची भीति जास्त बाळगली पाहिजे. आपण शुद्ध अंतःकरणानें, शुद्ध कर्माला प्रवृत्त झालों असलों म्हणजे सरकार अनुकूल असलें काय आणि प्रतिकूल असलें काय, डिटेक्टिवांनीं भाषणें टिपून घेतलीं काय आणि न घेतलीं काय, सारखेंच. स्वराज्य तुमच्या जवळच आहे; ओळखाल तर सांपडेल. सर्व कांहीं तुम्हीच करीत आहां, सगळे तुमचेंच आहे, तुम्हीच सर्वत्र वावरतां आहां, पण तुम्हांला ज्ञान नाहीं; तें मिळावें म्हणून गजाननाची प्रार्थना करा.

# सभाबंदीचा कायदा

गुरुवार, ता. १७ आक्टोबर १९०७ रोजीं, पुणें येथें, सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत शहरवासीयांची सभा भरली होती. या सभेंत पसार झालेल्या चार ठरावांपैकीं तिसरा ठराव सभाबंदीच्या कायद्यासंबंधानें निषेध प्रदर्शित करणारा असून तो सभेपुढें मांडण्याचें काम लो. टिळक यांनीं केलें. तेव्हां ते म्हणाले:—

अध्यक्षसाहेब आणि सभ्य गृहस्थहो ! आपल्यापुढें दोन ठराव येऊन गेले आहेत, आणि आतां तिसरा ठराव यावयाचा आहे. पहिले दोन ठराव आपल्या लोकांसंबंधींचे होते आणि तिसरा ठराव सरकारासंबंधीचा आहे. बाबू बिपिनचंद्र पाल यांनीं नवा रस्ता दाखविला; व रावळपिंडीच्या लोकांनीं देशाकरितां हाल सोशिले; म्हणून त्यांचें अभिनंदन करावें लागलें. पुढेंही, या लोकांचे झाले तसे सर्वांचे हाल होण्याचा संभव आहे, असें दाखविणाऱ्या कायद्यासंबंधींचा तिसरा ठराव असून अशा वेळीं आपल्याला त्यांच्यासारखेंच करावें लागेल असें दिसतें. हिंदुस्थान सरकार सर्व हिंदुस्थानाकरितां सभाबंदीचा कायदा करावयास निघालें आहे.—हो, हिंदुस्थान सरकार हिंदुस्थानाकरितांच कायदा करणार; हिंदुस्थान सरकारची सत्ता कांहीं हिंदुस्थानाबाहेर नाहीं; विलायतेंत कांहीं कायदा पुढें आणतां येणार नाहीं. आणि असा कायदा केलाच तर तेथें कोणी ऐकणारही नाहीं. हा कायदा जुलुमी आहे. अन्यायाचा आहे, तो आम्हांला नको, तो इंग्रजी राज्याच्या इभ्रतीस आणि न्यायीपणास काळिमा आणणारा आहे, तो कायदा रशियांत शोभण्यासारखा आहे, इंग्रजी राज्यांत शोभण्यासारखा नाहीं, असें स्पष्टपणें कळविण्याकरितां हा तिसरा ठराव आहे. चुकीचें भाषांतर करून तसला ठराव आम्ही पास केला असें म्हणावयास कोणास सांपडूं नये म्हणून मुद्दाम तो इंग्रजींत लिहिला आहे. तो मी प्रथम इंग्रजींत वाचून दाखवितो. ( येथें लो. टिळक यांनीं इंग्रजींतील ठराव वाचून दाखविला.) याला काय म्हणावें हें समजत नाहीं. हिंदुस्थान सरकारनें वेड घेतलें आहे असें मी म्हणतों. सरकारनें पूर्व बंगाल व आसाममध्यें सभा बंद केल्या आहेत, कलकत्त्यास १४४ कलमाखालीं सभांना मनाई करण्यांत

आली आहे. पाहिजे तो अधिकार सरकारला आहे; व्हाइसरॉयाला सगळे अधिकार आहेत, पण त्याचा उपयोग करण्यास मोठेच प्रसंग लागतात; विशेष कठीण प्रसंग आल्याशिवाय व्हाइसरॉयाला असा कायदा करतां येत नाहीं. त्याला विलायतेहून इंडिया-ऑफिसची संमति लागते, पर्यायानें पार्लमेंटाची संमति लागते, असे त्याला पडदे आहेत, अशा त्याला अडचणी आहेत. त्या नाहींशा करून सामान्यपणें सर्वत्र लागू असा कायदा करून घेण्यास सरकार प्रवृत्त झालें आहे. उद्यां हा कायदा कौन्सिलपुढें येऊन सात दिवसांनीं सिलेक्ट कमेटीपुढून परत येईल व नोव्हेंबर पहिलीपर्यंत तो तयार होईल. अशा रीतीनें १५ दिवसांत हा कायदा पसार होणार आहे. पंधरा दिवसांत या कायद्याची वाटाघाट होणार आहे. वाटाघाट तरी कशाची! हा कायदा करण्याचा सरकारचा निश्चय आहे, आणि सरकार तो करणार. या होणाऱ्या कायद्यासंबंधीं निषेध करणाच्या सभेला मी तयार झालों आहे. पण तें केवळ आपलें कर्तव्य म्हणून तयार झालों आहे. सरकार आपल्या मताला काडीइतका देखील मान द्यावयास तयार नाहीं—सरकार कायदा करणार; ठराव करा, पत्रें पाठवा, तारा पाठवा, वाटेल तें करा; गोपाळराव गोखले कौन्सिलमध्यें जाऊन वाटेल तितकी बडबड करोत, त्यानें कांहीं होत नाहीं.

## रशियाचें अनुकरण

पण आपलें कर्तव्य आपण केलें पाहिजे. आतां अशा तऱ्हेनें निषेध प्रदर्शित करणें आपलें कर्तव्य आहे; कायदा झाल्यावरचें कर्तव्य निराळें आहे, त्याचा विचार आपण आतांपासून करून तयार असलें पाहिजे. रशियन सरकारचे कायदे आमचे सरकार इकडे आणीत आहे. रशियांत असा कायदा आहे. इकडे २० माणसें एके ठिकाणीं जमल्यानें सभा होते तर तिकडे पांचच माणसें जमल्यानें सभा होत असते. इकडच्या या कायद्यानें वॉरंटाशिवाय पकडण्याचा हुकूम आहे, तर तिकडे लोकांना गोळी घालून ठार करण्याचा हुकूम आहे. म्हणजे रशियन सरकारापेक्षां आमचें सरकार अद्यापि बरें आहे. तिकडे पांच माणसांची सभा व इकडे २० माणसांची ती सभा, तेव्हां रशियन सरकारच्या चार-पांच-पट आमचें सरकार चांगलें आहे असें पाहिजे तर म्हणा. पण सरकार हा कायदा काय

म्हणून करीत आहे ! राजद्रोहाकरितां हा कायदा आहे काय ? त्याला हा नवीन कायदा कशाला ? १२४ अ त्याकरितां खंबीर आहे. आम्ही सभेंत राजद्रोह बोललों तर तुमचे डिटेक्टिव्ह आहेत, तुमचे रिपोर्टर आहेत, आम्हाला पकडा, आमच्यावर फिर्याद करा; पण, सभाच भरवायची नाहीं हें काय ? सभेची व्याख्या तरी किती व्यापक आहे ! २० माणसें जमली कीं ती सभा झाली, व त्यांत राजकीय विषय निघाला कीं ती बेकायदेशीर होऊन पोलीसांस लोकांना बिनवॉरंटानें पकडतां येतें; मग ती सभा खाजगी असो कीं सार्वजनिक असो; घरांत भरलेली असो कीं रस्त्यावर भरलेली असो; तिकिटें लावून भरविलेली असो कीं कशीही असो, ती या कायद्यांत येणार ! आपण आपल्या घरीं वीस माणसें जेवायला बोलावलीं व त्यांत श्लोकाच्या ऐवजीं एखादें पद कोणी म्हटलें व त्यांत राजकीय असें कांहीं आलेसें पोलिसांस वाटलें, कीं पोलिस तुमच्या घरांत शिरणार आणि जेवणावरून मनगटाला धरून पोलिस त्या इसमाला बाहेर काढणार ! असें होणार, हें मी तुम्हांला सांगून ठेवतों. २० माणसें जमली कीं सभा होते, १८ च असलीं तर २ पोलिसांनीं पाठवावीं म्हणजे झालें ! कोणाला वाटेल, मी ही युक्ति पोलिसांना सुचवून देतो, पण पोलिसांना हें सगळें सुचतें !

## वाणीनें व कृतीनें निषेध

हिंदुस्थानांत शांतता असतां, साम्राज्यावर कोणचेंही संकट नसतां, राशियाचा पाय मोडला असतां, रशिया येण्याची भीति बिलकूल नसतां, असें करणें हें इंग्रजी राज्याच्या इभ्रतीस बट्टा आणणारें आहे ! कायदा जितका अधिक कडक तितकी तो चुकविण्याची बुद्धि अधिक होत असते. रशियांत असे कायदे आहेत आणि तिकडील लोक ते चुकवीत आहेत. तोंडावाटे बाहेर पडणारे विचार पोटांत कोंडले तर अनर्थ होईल ! आम्ही स्पष्ट सांगतों कीं, सरकारनें असें करणें हें त्यांना चांगलें नाहीं, आम्हांलाही चांगलें नाहीं. रशिया येण्याची भीति होती ती जपाननें दूर केली, पण आतां येथेंच रशिया होत आहे याला काय करणार ? वायव्य प्रांतांतून राशिया येणार होता, आतां तो सिमल्याहून येत आहे ! चुकलों, वायव्य सरहद्दीवरून रशिया येणार होता, तो आतां सिमल्यावरून येत आहे. सभाबंदीचा हा कायदा जुलमी आहे. असा कायदा करण्याचा

सरकारला हक्क नाहीं. मनगटाच्या जोरावर असेल, पण नीतिनें नाहीं,—ईश्वरदत्त वाणीचा हक्क काढून घेण्याचा सरकारास हक्क नाहीं. मी तुम्हांला सांगतों कीं, तुम्ही आतांपासून तयार व्हा; मी तुम्हांला स्पष्ट सांगतों कीं आज वाणीनें तर उद्यां तुम्हांला कृतीनें निषेध करावा लागेल. जो कायदा आपल्याला जुलमी वाटतो तो न मानणें हें प्रजेचें काम आहे. कायद्यानें वागणाऱ्या गरीब, शांतताप्रीय, सुशील प्रजेवर जुलूम करणें रशियन सरकारापेक्षांही क्रूरपणाचें—रानटीपणाचें आहे. प्रसंग कठीण आला आहे, त्याकरितां आतांपासून तयार व्हा, अशी विनंति करून मी आपलें भाषण पुरें करितो.

# पैसा-फंड

मंगळवार, ता. १५ आक्टोबर १९०७ रोजीं रात्रीं, मुंबई येथें शांतारामाचे चाळींतील पटांगणांत, पैसा-फंडासंबंधानें जाहीर सभा भरली होती. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणाले:—

आतां आपल्याला सेक्रेटरींनीं पैसा-फंडाचा जो वार्षिक अहवाल वाचून दाखविला तो, व निरनिराळ्या वक्त्यांनीं जीं भाषणें केलीं तीं, आपण सर्वांनीं ऐकलींच आहेत. आतां प्रथम अध्यक्ष या नात्यानें मला एक दोन गोष्टी सांगावयाच्या आहेत. डॉ. गोविंद बाळाजी खेर हे उद्यां मुंबईत पैसाफंड गोळा करण्याचें जें काम व्हावयाचें आहे त्या कामासंबंधींच्या व्यवस्थेंत गुंतल्यामुळें सभेला हजर राहूं शकले नाहींत, अशा अर्थाचें त्यांजकडून पत्र आलें आहे त्यावरून समजतें; त्याचप्रमाणें रा. वामन रामचंद्र जोशी हेही अशाच कामामुळें या सभेस हजर राहूं शकले नाहींत, असें त्यांनीं कळविलें आहे. दुसरी गोष्ट, रा. कानडे यांजकडून १० रु. व आणखी १ रु. २ आ.—हे कोणाकडून आले हें मला कळविण्यांत आलेलें नाहीं—मजकडे येथें आलेले आहेत; पण ही पैसे गोळा करण्याची वेळ नाहीं. उद्ईक दसऱ्याचे सुमुहूर्तावर मुंबईतील तरुण मंडळीं निरनिराळ्या चाळींतून वगैरे फिरून पैसा-फंडाकरितां तिकिटें देऊन पैसे गोळा करणार आहेत व तुमच्या जवळ १ दिवसाचें उत्पन्न मागणार आहे. तरुण मंडळींनीं हें काम केलें म्हणजे बिनखर्चीं बरेंच काम झाल्यासारखें होणार आहे. गेल्या दोन वर्षांत मिळून २१००० रु. जमले, असें रिपोर्टावरून आपल्यास कळलेंच आहे. आत्तांच मी थोडा हिशोब केला, त्यावरून १३ लाख लोकांनीं पैसे दिले असें यावरून होतें. हिशेबांत कांहीं वरचे आंकडे मी सोडिले आहेत, हें सांगून ठेवतो; नाहीं तर मला गुणाकार येत नाहीं म्हणतील ! कोणी जास्त वर्गणी देऊन ही रक्कम जमली असें धरल्यास पांच सहा लाख लोकांनींच वर्गणी दिली म्हटलें पाहिजे. मुंबईची लोकसंख्या १० लाख आहे; म्हणजे मुंबईच्या सगळ्या लोकसंख्येनें देखील वर्गणी दिलेली नाहीं; इतकें अजून काम व्हावयाचें आहे. मुंबईतील गिरणीचा एखादा मालक आपल्या गिरणीच्या वार्षिक उत्पन्नांतून—त्याला त्याचें विशेष

कांहीं न वाटतां—२० हजार रुपये देऊं शकेल; पण आम्हांला त्यापेक्षां पैसा पैसा गोळा केलेली वर्गणी विशेषतः पाहिजे आहे. पैसा देण्याची प्रत्येकाला बुद्धि झाली पाहिजे व त्यानें आपली वर्गणी बिनखर्ची कमिटीकडे पोहोंचविण्याची व्यवस्था केली पाहिजे.

## खानेसुमारीची पद्धति घ्या

आनंदाची गोष्ट आहे कीं, फंडाचा उपयोग काय होतो असें आतां लोक आम्हांला विचारूं लागले आहेत. पैसा पैसा देणाऱ्यासही—माझ्या मतें—आपल्या पैशाचा विनियोग कसा होतो म्हणून विचारण्याचा हक्क आहे. लोकांनीं असें विचारावें याच मताचा मी आहे, असें विचारण्याची संवय ही मोठी अभिनंदनीय आहे. सरकार आमच्यापासून दरसाल १०० पासून १२५ कोट रुपये घेतें. माणशीं ३ रुपये कर आम्ही देतों, याचा विनियोग सरकार कसा करितें ? हा प्रश्न सरकारास विचारण्याची संवय यामुळें आम्हांस लागल्यास फंडानें ही एक मोठीच कामगिरी केल्यासारखें होईल. आम्हांला एकजुटीनें कार्य करावयास शिकावयाचें आहे. या फंडाला जर लोकांची सहानुभूति मिळाली तर मग मोठ्या कामाकरितां यापेक्षां जास्त सहानुभूति आम्हाला मिळवितां येईल. गेल्या वर्षी वर्षप्रतिपदेस पुणें, नाशिक, वगैरे ठिकाणीं तरुण मंडळींनीं एक दिवस खटपट केल्यानें काय फायदा झाला, हें सर्वांस माहीतच आहे. तरुण मंडळींनीं आपला एक दिवस खर्ची घातल्यानें एकट्या पुणें शहरांत एका दिवसांत १२०० रु. गोळा झाले. हा प्रयोग आतां मुंबईस विशेष प्रकारानें करून पहावयाचा आहे; आणि तो सफल झाल्यास इतरत्रही त्याचा प्रसार होईल. सरकारची खानेसुमारी होते तेव्हां ती हिमालयापासून तों कन्याकुमारीपर्यंत एका दिवसांत—एका रात्रींत—आपल्याच लोकांकडून होत असते. हें उदाहरण लक्षांत ठेवा, त्यांत विशेष अर्थ आहे. तशी पैसाफंडाची खानेसुमारी आपण केल्यास काय उत्पन्न होईल, याचा हिशोब निरनिराळ्या वक्त्यांनीं वेळोवेळीं आपल्यापुढें मांडलाच आहे. पैसाफंडाची जरूरी आहे, ती गोळा करण्याचें अंगीं सामर्थ्य आहे, पण उद्योग नाहीं. तो झाला पाहिजे आहे. विद्यार्थ्यांनीं देशकार्याकरितां एक दिवस खर्चण्याचा गुण त्यांच्यांत आल्यास व एका पिढीनें पुढें

दुसऱ्या पिढीस तसेंच तयार केल्यास पुढील पिढी राष्ट्राच्या कामास तयार राहत जाईल. 'पैसा–फंड' 'पैसा–फंड' म्हणून ३० कोट लोकांच्या ३० कोट पैशांना ६४ नीं भागून किती रुपये होतात, हें काढण्यास फारसें ज्ञान लागत नाहीं; त्याला चौथ्या इयत्तेपर्यंतचें गणित बस्स होतें. पण, विद्यार्थ्यांचे आयुष्यांतील दर वर्षांतील एक दिवस सार्वजनिक कामास लागणें ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. उद्यां किती तरुण पैसा–फंड गोळा करण्यास निघतात, किती काम होतें, किती पैसा जमतो, यां तरुणांचा लोक कसा काय सत्कार—म्हणजे साधा नव्हे, तर वर्गणी देऊन करतात, याचा निकाल आतांपासून चोवीस तासांच्या आंतच होणार आहे. उद्यांचा दिवस राष्ट्रकार्याचा आहे असें समजून हें काम कळकळीनें, एकनिष्ठेनें व तत्परतेनें तडीस जाईल असा प्रयत्न करा, अशी माझी तरुण मंडळीस विनंति आहे.

या राष्ट्रीय फंडाचा विनियोग कसा होणार ? असा एक प्रश्न येतो. या फंडाचा विनियोग कसा करावा, या संबंधानें पुष्कळ सूचना आल्या; कोणी म्हणतो एक 'पॉलिटेक्निक् इन्स्टिटयूट' काढावें, कोणाचें म्हणणें एक मोठी कागदाची गिरणी काढावी, कोणी साखरेची गिरणी काढावी म्हणून सुचवितो, कोणास वाटतें कापसाची गिरणी सुरू करावी, पण कमिटीजवळ फंडाची रक्कम किती जमली आहे यां गोष्टीचा विचार या सूचना करतांना यांनीं लक्षांत ठेविला नव्हता असें दिसतें. मोठी गिरणी काढूं नये असा कांहीं आमचा संकल्प नाहीं, नसावी अशी इच्छा नाहीं; पण फंड जास्त जमेल, वार्षिक वर्गणी जसजशी जास्त जास्त वाढेल, तसतसें असलें कांहीं करणें अधिकाधिक शक्य होईल. एका वर्षांत एक कारखाना काढण्याचा कमिटीनें विचार केला आहे, दहा वर्षांत दहा कारखाने निघून जरूर पडेल तर परदेशांतून शिक्षक आणून निरनिराळे धंदे शिकविण्याची तजवीज करण्याचा विचार आहे. ज्यांना ह्याची घाई झाली असेल त्यांनीं फंड गोळा करण्यासंबंधानेंही घाई करण्याची मेहेरवानगी केल्यास चांगलें होईल !

खर्चासंबंधानें जर पाहिलें तर नुसत्या एका कारखान्याच्या जागेस व इमारतीस दहा हजार रुपये खर्च येतो. फंड चांगला जमेल तर मुंबईस मोठें विद्यालयही होईल. सूचना आल्या आहेत त्या चांगल्या आहेत; पाठविणारांनीं विचार करूनच त्या पाठविल्या आहेत. पण पैशाचा प्रश्न आहे, व आंथरूण पाहून

पाय पसरणें जरूर आहे. मुंबईसारख्या ठिकाणीं—किंवा जवळपास कारखाने काढणें चांगलें; कारण येथें मोठाले कारखाने आहेत, रासायनिक प्रयोगशाळा आहेत, इंजिनियर आहेत.

## पैसा-पैसा जमवा

पैसा–फंडाचा प्रसार महाराष्ट्रांत चांगला आहे, पण गुजराथी लोकांत तो झालेला नाहीं. गुजराथी लोकांची मदत पाहिजे. रुपयामागें एक आणा वार्षिक नफ्यांतून निराळा काढण्याची गुजराथी लोकांना पूर्वीची संवय आहेच. त्यांतून किंवा त्यासारखी पैसा–फंडाकरितां पैसा काढण्याची व्यवस्था करणें त्यांस जास्त सुलभ आहे. त्यांचा हिशेब दिवाळींत केला जातो, तेव्हां पैसा–फंडाकरितां गुजराथी लोकांची वर्गणी दिवाळींत गोळा केल्यास जास्त जमेल. पारशांचेंही असेंच आहे. श्रीमंत लोकांपासून आम्ही गरीबाप्रमाणें एकच पैसा मागणार— त्यांनीं जास्त दिलें तर घेणार नाहीं असें नाहीं ! महाराष्ट्रांत ६० लाख व गुजराथेंत ६० लाख लोक आहेत, म्हणजे १२० लाख लोक झाले. इतक्या लोकांनीं पैसे दिलें तर केवढी रक्कम होते तें पहा. रा. अंताजी दामोदर काळे यांना प्रथम लोक वेडे म्हणाले; पण या पद्धतीनें पैसा जमतो असें दोन वर्षांच्या अनुभवानें आपल्याला कळून आलें आहे. पैसा पैसा म्हणजे थोडा होत नाहीं. मिशनरी लोक पैसा पैसा गोळा करूनच इकडे आले व सगळ्या हिंदुस्थानाला ख्रिस्ती करण्याची त्यांची उमेद आहे. मिशनऱ्यांची ही गोष्ट महत्त्वाची आहे; आणि त्याहीपेक्षां पैसा–फंड अधिक महत्त्वाचा, अधिक शक्य व अत्यंत कमी उपहासास्पद आहे. तरुण मंडळींनी फंड गोळा करण्याचें काम केल्यास निम्म्या तरी लोकांचें पैसे गोळा होतील. मुंबईस विद्यार्थी कांहीं थोडे नाहींत. त्यांनीं प्रयत्न मात्र केला पाहिजे आणि मोठ्यांची त्याला मदत पाहिजे. उद्यां विद्यार्थी पैसा गोळा करावयास येतील तेव्हां त्यांना पैसा द्या, आणि त्यांची खोटी करूं नका, म्हणजे काम लवकर होईल. त्यांची वेळ पावती देण्यांत फुकट जाऊं नये म्हणून त्यांच्याजवळ तिकिटें दिलीं आहेत, ती घेऊन त्यांस पैसे द्यावे; त्यांचा वेळ बचावल्यास त्यांस दुसरीकडे जाऊन वर्गणी गोळा करण्यास सांपडणार आहे. या विद्यार्थ्यांना—ते राजकीय कामांत पडले म्हणून—सरकारी रोषाची भीति बाळ-

गण्याचें कारण नाहीं; कारण, या फंडाचा उपयोग राजकीय कामांकडे होणार नाहीं अशी या फंडाची अट आहे. तेव्हां विद्यार्थी, फंडाचे स्वयंसेवक व इतर लोक किंवा या संबंधाची सभा, यास कायद्यानें प्रतिबंध होऊं शकत नाहीं. आतां औद्योगिक गोष्टी राजकीय आहेत असें म्हणूं लागलें तर गोष्ट निराळी ! गेलीं दोन वर्षें—प्रो. रानडे यांनीं म्हटल्याप्रमाणें—मोठी जिकिरीचीं गेलीं; पुढलीं वर्षें जास्त जिकिरीचीं जातील असें दिसत आहे. आम्ही दोनदां किंवा एकदां जेऊन अगर नुसतें पाणी पिऊन, आहे त्या स्थितींत स्वस्थ राहून, परमेश्वराचें व सरकारचें चिंतन करावें अशी सरकारची इच्छा आहे. या गोष्टी दूर सारण्याचे तुमच्यांत जर धैर्य नसेल तर मग परमेश्वराची मदत तुम्हाला होणार नाहीं. **तुमचें धैर्य व परमेश्वराची मदत याचें प्रमाण समच आहे, व्यस्त नाहीं, हें लक्षांत ठेवा.**


## कळकळ पाहिजे

पैसा पैसा आकाशांतून कांहीं पडणार नाहीं. होनांची वृष्टी पूर्वकालीं आकाशांतून झाल्याचें लिहिलेलें आहे, पण आतां कलियुग आहे व कलि वाढला आहे; तशी वृष्टी आतां होणार नाहीं. यत्न केल्यास मात्र पैशाची धार खास लागेल, हें मी सांगतो. कितीहि गरीब झालों तरी आपणास पैसा पैसा खास देतां येईल. एका वक्त्यानें सांगितल्याप्रमाणें तंबाखूंत, विडींत वगैरे किती तरी पैसे खर्च होत असतात, त्यांपैकी पैसा पैसा काढून ठेवणें कठिण नाहीं. गरीब झालो, तरी आपल्याला एक पैसा देतां येईलच, आणि तोहि जेव्हां देतां येणार नाहीं, तेव्हां आपण जिवंत राहूं किंवा नाहीं याची शंका आहे. बाहेरच्या लोकांनीं फंडास मदत केली पाहिजे. दोन वर्षांत २१ हजार रुपये मिळाले पण इतके रुपये एका वर्षांत जमविले पाहिजेत, मग मुंबईस ‘ पॉलिटेक्निक् इन्स्टिटयूट ’ होईल. कारखानदारांनीं मदत देण्याचें कबूल केलें आहे. चांगले चांगले लोक काम करावयास तयार आहेत, त्यांना कांहीं चारचारशें पांचपांचशें पगार द्यावयास नको, ते कमी पगारावर काम करावयास तयार आहेत. पण यापुरते तरी पैसे जमा झाले पाहिजेत तेहि जमा झाले नाहींत तर—मी जास्त जोराचा शब्द वापरीत नाहीं—आपलें कमनशीब म्हणावें लागेल ! पैसा दिला पाहिजे आणि तो बिनखर्ची पोहोचविला पाहिजे. मनिऑर्डरींत वगैरे पैसे खर्च करूं नका. फंडाच्या कमिटीनें उपदेशक

वगैरे नेमिले नाहींत, याचें कारण त्यांच्या प्रचारांत, प्रवास-खर्चांत वगैरे फंडाचा फार पैसा खर्च होतो. गेल्या वर्षांत कमिटीनें २०८ च रुपये खर्च केले आहेत, यावरून कमिटीचा हात खर्चासंबंधानें किती आंखडता आहे हें दिसून येईल. खर्चाचा हात आणखी आंखडता घ्यावा अशी तुमची इच्छा असल्यास तुम्ही आपले हातपाय हालविले पाहिजेत;- म्हणजे कमिटीस आंखडतें घेतां येईल. पुढील दोन वर्षांत फंडाचा विनियोग झालेला लोकांच्या दृष्टीस पडेल व तो योग्य झाला आहे असें पाहून लोकांना फंडास मदत करण्यास उत्तेजन येईल. फंडाच्या कामाला अर्थशास्त्राचें किंवा इतिहासाचें ज्ञान लागत नाहीं. त्याला मोठें ज्ञान लागत नाहीं, विद्वत्ता लागत नाहीं, धष्टपुष्ट शरीरप्रकृति लागत नाहीं. हा कळकळीचा प्रश्न आहे—याला कळकळ मात्र लागते.

फंडाला श्रीमंतांनीं मदत केली तरी श्रीमंतांपेक्षां गरीब लोक जास्त असावयाचेच. तेव्हां गरिबांच्याच जास्त उपयोगी—थोड्या भांडवलावर गरिबांस चालू करितां येतील अशा धंद्याचें—शिक्षण देण्याकडेच जास्त लक्ष देण्यांत येणार आहे. गाईचें दूध काढणाऱ्यांस दुधापैकींचे कांहीं दूध आंचळाला लावावें लागतें. तसा वार्षिक उत्सवाचा खर्च फंडांतून करावा लागतो. पहिल्या वर्षीच्या उत्सवाचा खर्च ४० रुपये झालेला आहे. हा वार्षिक उत्सव तुम्हांला या कामीं उत्तेजन यावें म्हणून केला जातो. हिंदुस्थान दरिद्री आहे वगैरे गोष्टी आतां सर्वांना माहिती झाल्या आहेत—लहान मुलांना देखील हें ठाऊक झालें आहे; पण हें अंतःकरणांत किती उतरलें आहे हें पहावयाचें आहे. उद्योग करा, प्रयत्न करा, म्हणजे तुम्हांला यश येणार आहे. रा.काळे यांनीं ही कल्पना पुढें आणली, त्यांनीं त्याकरितां स्वतःचे पैसे खर्च करून श्रम केलेले आहेत; त्यांचें आपण अभिनंदन केलें पाहिजे. आपल्याइकडे असें करणारे लोक नाहींत असें नाहीं. एखादा साधू, बैरागी किंवा संन्याशी, यांनीं फक्त एकट्याच्या प्रयत्नानें देऊळ बांधिल्याचीं, एखादी संस्था स्थापिल्याचीं, किंवा एखादें अन्नछत्र घातल्याचीं उदाहरणें आहेत. एका मनुष्याच्या आयुष्यांतील— साऱ्या आयुष्यांतील नाहीं, २०-२२ वर्षांतीलच म्हणावयाचीं—कारण बहुधा तो इतकींच वर्षें काम करितो—स्वार्थत्यागाची ही कामगिरी, त्यानें जर एवढें काम होतें, तर सर्वांनीं दरसाल एक दिवस—आयुष्य नाहीं, या कामाकडे खर्च

केल्यास लक्षपट अधिक काम राष्ट्राकडून होणार आहे, हें काम करण्यांत राष्ट्रीयत्वाचें शिक्षण मिळणार आहे, तें दवडूं नका. परमेश्वराच्या कृपेनें यश येईल. प्रयत्न करा. यापेक्षां जास्त लोक पुढल्या वर्षीच्या उत्सवाला जमतील व सभाबंदीचा कायदा त्यांच्या आड येणार नाहीं, अशी मला आशा आहे.



# चालू शिक्षणपद्धति व स्वावलंबन

शुक्रवार ता. १५ नोव्हेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, पंढरपूर येथें, नाटकगृहा-मध्यें श्री. चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं 'स्वदेशी संमेलन' भरलें होतें. तेव्हां "औद्योगिक व शेतकीचें शिक्षण सध्यांच्या शिक्षणक्रमांत दिलें जात नाहीं, तें अवश्य आहे; आणि सरकारनें या बाबतींत उदासीन वृत्ति बाळगिल्यास लोकांनीं या कामांत हात घातला पाहिजे" अशा अर्थाचा पहिला ठराव लो. टिळक यांनीं सभेपुढें मांडला. तेव्हां ते म्हणाले:—

अध्यक्ष महाराज, व सभ्य गृहस्थहो! आज माझ्याकडे आपल्यापुढें संमेलनांतील पहिला ठराव मांडण्याचें काम दिलेलें आहे. आपल्यासमोर आतां जीं भाषणें झालीं त्यांत संमेलनाचा हेतु स्पष्ट झाला आहे; हीं संमेलनें कां भरवावीं हें गतसालापासूनच स्पष्ट झालेलें आहे. मोठमोठ्या शहरांतून चांगल्या चांगल्या वक्त्यांच्या तोंडून जे विचार बाहेर पडतात ते विचार खेड्यापाड्यांतील लोकांस-सुद्धां कळावे, शहाणे लोक एके ठिकाणीं जमावे व चर्चा व्हावी, हा या संमेलनांचा हेतु आहे. शहाणे लोक जे विचार करतात ते विचार सर्वत्र पसरून सुशिक्षित व अशिक्षित, ज्ञानी व अज्ञानी यांनीं जमून कार्याला लागावें, हा हेतु आहे. आपली स्थिति वाईट आहे, हें सर्वांना कळूं लागलें आहे. खेड्यापाड्यांतून, आमच्या घरादारांतून, ज्यांनीं आमची स्थिति पाहिली असेल, त्यांना हें सांगायला नको. आमची स्थिति कशी आहे, याबद्दल तिऱ्हाइतांनीं मत देणें म्हणजे आम्हांला मूर्ख म्हणणें आहे. आम्ही श्रीमंत आहों कां गरीब आहों, आमच्या पोटाला खायला मिळतें कां नाहीं, आमचा व्यापार चालतो कां चालत नाहीं, याबद्दल एखाद्या इंग्रजानें आंकडे मांडून आमची स्थिति भरभराटीची आहे, आमची प्राप्ति चांगली आहे, प्राप्ति चांगली नसली तरी खर्चाच्या मानानें पुष्कळ आहे, असें म्हणणें म्हणजे मेलेला मनुष्य जिवंत आहे म्हणून सांगण्यासारखें आहे! कांहीं इंग्रज पत्रकार अजून असें लिहितात व आमच्यांतीलही कांहीं शहाणे लोक अजून असें मानितात, पण आम्हांला कांहीं आमची स्थिति निकृष्ट आहे हें सिद्ध करून द्यावयास नको आहे. गरीब असलेले लोक

कालांतरानें श्रीमंत होतात व श्रीमंत असतात ते गरीब होतात, हा व्यक्तिसंबंधींचा अनुभव राष्ट्रासंबंधानेंही येत असतो. हिंदुस्थानांत एकदा सोन्याचा धूर निघत असे, आतां गोवऱ्यांचा तरी निघतो कीं नाहीं याची शंका आहे ! इकडे, पूर्वी एकदां इंग्रज दरिद्री होते, ते आतां श्रीमंत झाले आहेत ! **सांपत्तिक स्थिति राजाश्रयानें चांगली रहात असते.** राजा कांहीं आमच्याकडून करांचे पैसे घेऊन त्यावर विवक्षित वर्गांतील लोकांस चैन करतां यावी याकरितां निर्माण झालेला नाहीं. प्रजाच जर आपली व्यवस्था पाहील तर राजाची जरूरी राहणार नाहीं. लोकांचे सुख वाढवील तर राजा पाहिजे. पशूंत राजा नाहीं. ते खातात, पितात व जगतात; आणि खायला प्यायला मिळालें नाहीं तर मरतात. पण माणसाला अधिकाधिक सुख मिळविण्याकरितां सत्ता निर्माण करून त्या सत्तेच्यातर्फे आपलें कल्याण करून घ्यावयाचें असतें, म्हणून राजा हवा असतो; मग राजा एक असो वा अनेक असोत; ६ हजार कोसावर असो, जवळ असो, वा दूर असो.

## शिक्षण कशाकरतां देतात ?

इंग्रजांनीं शांतता आणि सुरक्षितपणा दिला, आतां चोऱ्या होत नाहींत; इंग्रजांनीं आगगाड्या केल्या, आगबोटी आणिल्या, इंग्रजांनीं सडका केल्या आणि पोष्ट केलें; अशी मोठी प्रौढी सांगतात. पूर्वींचे पैसे जवळ राहिले होते तोंपर्यंत याचें कौतुकही करण्यांत आलें. सडका झाल्या, जमीनीची पाहणी केली, शाळा स्थापिल्या, या गोष्टी पाहून पूर्वींच्या पिढींतील माणसांना व हल्लींच्या पिढींतीलही कित्येक जणांना साहजिक फार कौतुक वाटत असे व यासंबंधीं स्तुति करण्यांत येत असे. पण या एकंदर संस्था केवळ एकतर्फी असून देशाचा रोग वाढवीत आहेत असा समज आतां होऊं लागला आहे. सडका व आगगाड्या यांनीं आपला फायदा झाला कीं नुकसान झालें, या विषयावर मी बोलत नाहीं. कारण मी शिक्षणाच्या विषयावर बोलावयास उभा राहिलों आहे. सरकारनें आम्हांला जे शिक्षण दिलें तें निःशक्त करण्याकरितां—आमच्या दोन डोळ्यांपैकीं एकच डोळा ठेवण्याकरितां—दिलें काय ? हा प्रश्न आहे. शिक्षणाचा खरा उपयोग असा आहे कीं प्रत्येक धंद्यांतील माणसांला त्यामुळें आपापला धंदा जास्त चांगल्या रीतीनें करतां आला पाहिजे. सुताराला शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याला कारकून करावयाचा नाहीं.

(त्याला कारकून तरी करून करावयाचे काय, आणि कारकुनाच्या जागा आहेत कोठें ?) तर त्याला आपला सुताराचा धंदा जास्त चांगला करतां यावा म्हणून शिक्षण द्यावयाचें. पूर्वी न सुचलेली क्लृप्ति काढून आपला धंदा सुधारतां यावा, म्हणून शिक्षण द्यावयाचें. बैल व म्हैस यांच्या मुलांनां शिक्षण द्यावें लागत नाहीं. चारा खायला, पाणी प्यायला, शिकवावें लागत नाहीं.

असो. शेतकऱ्यांना फार तर तीन-चार यत्तांचें शिक्षण मिळतें; पण हें शिकून त्यांना फायदा काय ? त्यांना नांगराची सुधारणा सांगत नाहींत. बीं कसें पेरावें वगैरे शिकवीत नाहींत. आमच्या इकडे परदेशांतील रॉक-ऑईल पुष्कळ येतें, पण आमच्या इकडचें तेल थोड्या खर्चांत, थोड्या श्रमांत, पुष्कळसें कसें काढतां येईल, हें शिकवीत नाहींत. विणकराची हीच गोष्ट आहे. त्या लोकांना नवीन मार्गासंबंधींची माहिती सांगत नाहींत. देशांत शांतता आहे हें खरें, पण शांततेनें पोटाला कांहीं मिळत नाहीं. **खायला नाहीं, मग नुस्ती शांतता करायची आहे काय** ? नुसत्या शांततेनें लोकसंख्या मात्र वाढत चालली ! या गोष्टींचें नियमन करण्यास कांहीं पाहिजे म्हणून प्लेग व दुष्काळ येऊं लागले आहेत. सरकार राजधर्मापासून च्युत झालेलें आहे व एकदां राजधर्मापासून यांचा पाय निसटल्यावर तो किती खोलांत जाईल हें कांहीं मला सांगतां येत नाहीं. गिरणीचा धंदा सरकारला काय शिकवितां येत नव्हता ? मुंबई वगैरे ठिकाणीं गिरण्या निघाल्या आहेत हें खरें; पण त्याकरितां सरकारानें प्रयत्न केलेला नाहीं. उलट कामाचे तास कमी करून गिरण्यांचें नुकसान करण्याचा विचार आहे. माझ्या हातांत जो ठराव आहे त्यांत म्हटलें आहे कीं, सरकारी शिक्षणक्रम अपुरा आहे व जर सरकार द्यावें तें शिक्षण देत नसेल तर तें आपण दिलें पाहिजे. आमच्या सरकारचें सालाचें १२५ कोटींचें उत्पन्न आहे. त्या रुपयांची गोष्ट एकदम बोलतां आली तरी ही रकम एवढी मोठी आहे कीं, ती मोजावयाला लागल्यास सगळी रकम मोजण्यास कित्येक दिवस लागतील. यापैकीं ३० कोट रुपये लष्करावर खर्च केले जातात, म्हणजे सुमारें एक-चतुर्थांश उत्पन्न लष्करावर खर्च केलें जातें ! १० रु. उत्पन्न असलेला इसम आपल्या घराच्या रखवालीकरितां ३ रुपयांचा रामोशी ठेवील काय ? पण सरकार करीत आहे !

## यत्न करा, यश येईल

आम्ही म्हणतो त्या प्रकारच्या शिक्षणास सरकारनें मदत करावी अशी विनंति आहे, पण ती सरकार ऐकणार नाहीं अशी आम्हांला खात्री आहे. काय आहे व काय पाहिजे हें काय सरकारला कळत नाहीं ? कळतें. पण गोऱ्यांचें नुकसान होतें म्हणून सरकार तें करीत नाहीं. अध्यक्ष म्हणाले त्याप्रमाणें बादशाहाला दोन मुलगे आहेत—इंग्लंड व हिंदुस्थान. बापाला हिंदुस्थानचा सावत्रपणा वाटला नाहीं तरी आईला वाटतो, तसें झालें आहे. मुसलमानांनीं जुलूम केला असला तरी हिंदुस्थानचा पैसा उचलून हिंदुस्थानाबाहेर कांहीं त्यांनीं नेला नाहीं. इंग्लिशांना पैसा हिंदुस्थानाबाहेर न्यायचा आहे. गरीब प्रजेचा पैसा विलायतेस न्यावा ही त्यांची बुद्धि आहे, हें आतां आम्हाला कळूं लागलें व जसजसें कळूं लागलें, तसतसा सरकारच्या अंगाचा तिळपापड होऊं लागला आहे. या गोष्टी आम्ही बोलतो हें सरकारांस खपेनासें झालें आहे. आतां २० माणसांवर जमून असल्या गोष्टींची चर्चा करणें थांबविण्याच्या उद्देशानें सभाबंदीचा कायदा करण्यास तें उद्युक्त झालें ! **आमच्या स्थितीसंबंधानें सरकार उदासीन राहतें, व आम्ही दरिद्री होत आहों, हें आम्हांला कळूं लागलें आहे. मग आमचें मन कां तळमळूं नये ?** आमच्या मनांतील तळमळ बोलून दाखविणें राजद्रोहीपणाचें समजलें जावें हें कांहीं राजनीतीचें सुलक्षण नाहीं. येथें लांकूड नाहीं ? कां करवत नाहीं ? कीं सुतार नाहीं ? पण काड्या इतके दिवस इकडे झाल्या नाहींत, याचें कारण आम्हांला या गोष्टी शिकविल्याच नाहींत. आम्ही आपली उन्नति आपणच करून घ्यावयाच्या मार्गास लागलें पाहिजे. आम्ही दरिद्री असलों तरी आमची संख्या फार मोठी आहे, तेव्हां थोडथोडी मदत प्रत्येकानें केल्यानें पुष्कळ कार्य होणार आहे. इंग्लंडनें स्वतः ज्या प्रकारच्या संस्था काढून आपली स्थिति सुधारली त्या प्रकारच्या संस्था आपण काढून आपण आपली स्थिति सुधारून घेतली पाहिजे. सरकार बोलतें, पण मनांत करण्याचें नाहीं. जपाननें ४० वर्षांत जें केलें तें इंग्रजांनीं १५० वर्षांमध्यें हिंदुस्थानांत केलें नाहीं. तेव्हां तुम्ही कराल अशी मी आशा करितों. आपलें शिक्षण अपुरें आहे, तें पुरें करण्याचा यत्न कराल, थोडथोडी वर्गणी जमवून कां होईना, पण यत्न कराल, तर तुम्हांला यश येईल अशी मला आशा आहे.

# स्वदेशहित कसें साधावें ?

शनिवार, ता. १६ नोव्हेंबर १९०७ रोजीं रात्रीं, पंढरपूर येथें चंद्रभागेच्या वाळवंटावर, सुमारें १५००० लोकांसमोर लो. टिळक यांनीं भाषण केलें. तेव्हां ते म्हणालेः—

सभ्य गृहस्थहो ! गेल्या सालीं याच ठिकाणीं चंद्रभागेच्या वाळवंटावर मी दोन शब्द सांगितले होते व आपण ऐकले होते; त्याला एक वर्ष होऊन गेलें. त्या वेळचे लोक पुनः आज आले असतील, त्यांना आतां मी जें सांगणार आहे तें नवीन वाटणार नाहीं; पण पांडुरंगाचें दर्शन कितीहि वेळां घेतलें तरी जसें तें इष्टच आहे त्याप्रमाणें मी सांगणार आहें ते विचार ऐकून अंतःकरणांत उतरेपर्यंत त्यांचें निरूपण झालें पाहिजे आहे. तेव्हां पुनः तेच विचार बोलल्याबद्दल आपण माफी कराल अशी आशा आहे. गेल्या वर्षांत काय झालें ? दोन स्नेही भेटले तर "तुझ्या घरचें कसें काय चाललें आहे ? मुलें माणसें चांगलीं आहेत ना ? गुरेंढोरें ठीक आहेत का ? रोगराई वगैरे कांहीं नाहीं ना ?" असे प्रश्न एकमेकाला करितात. त्याप्रमाणें 'गेल्या वर्षांत काय झालें ?' असा प्रश्न झाल्यास आपल्याला काय उत्तर द्यावें लागेल ? प्लेग पसरत चालला आहे; पिकें चांगलीं नाहींत; गेल्या वर्षापेक्षां स्थिति चांगली झाली, असें सांगतां येत नाहीं. तुम्ही सर्वजण पांडुरंगाचें दर्शन घ्यावयास आला आहां, पण देशाचें कल्याण करण्याची बुद्धि आम्हांला दे, अशी प्रार्थना त्याच्याजवळ तुम्ही केली आहे काय ? पूर्वी येथें येण्यास आगगाडी नव्हती, यंदा झाली आहे. मग या गाडीनें तुमचा फायदा झाला आहे काय ? कां तुमचे पैसे मात्र तेवढे गेले आहेत ? या किंवा असल्या गोष्टींचा तुम्ही विचार केला आहे काय ? तुम्ही म्हणाल "पांडुरंगावर आमचा हवाला आहे. तो आम्हांला देईल." कबूल आहे. गोष्ट खरी आहे. **पण पांडुरंगाला तरी मागावें लागतें, तेव्हां तो देतो. त्याच्यावर भक्ति व दृढ विश्वास ठेवून त्याला मागावें लागतें व त्याला आपलें मागणें देणें भाग पाडावें लागतें.** तुमची स्थिति कशी आहे व तुम्हांला काय पाहिजे आहे, याचा विचार करून निष्ठेनें आणि भक्तीनें पांडु-

रंगाजवळ तुम्ही मागणें केलें आहे काय ? हा माझा प्रश्न आहे. **देशस्थितीचा विचार करा, हें माझें सांगणें आहे.**

## कृतीनें निष्ठा सिद्ध करा

गुदस्त सालचें सरकार यंदा राहिलें नाहीं. तुमची स्थिति जशी वाईट झाली तशी तुमच्या सरकारची बुद्धीही वाईट झाली आहे. सभा-बंदीचा कायदा सरकारानें नुकताच केला आहे. वीस माणसांपेक्षां जास्त माणसें राजकीय गोष्टीकरितां एके ठिकाणीं जमूं द्यावयाची नाहींत, असें सरकारानें ठरविलें आहे. देशाची सेवा करणारांना सरकारानें पकडलें व अटकेंत टाकिलें. आतां त्यांतील लाला लजपतराय यांस सोडिलें आहे. शेतकरी, व्यापारी, उदमी, सर्वांना कठीण स्थिति आली आहे. ही एक कचाटी आहे व त्यांत आपण सांपडलों आहों, आपण यांतून निघत नाहीं, हा दोष कोणाचा ? आपला, कां परमेश्वराचा ? परमेश्वराची बुद्धि सदा सारखी आहे. भक्ताचें संकट परमेश्वर निवारण करतो, पण तशी निष्ठा तुम्ही आपल्या कृतीनें दाखविलेली नाहीं. एका वर्षांत स्थिति बदलली आहे व पुढें काय होईल हें सांगतां येत नाहीं. आज मी येथें आपणांसमोर व्याख्यान द्यावयास उभा राहिलों आहें, अशा रीतीनें पुढल्या वर्षीं आपण जमलों असतां व्याख्यान देणें शक्य राहील कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. असाही प्रसंग येण्याचा संभव आहे कीं वीस माणसांपेक्षां जास्त मंडळींचा फड येथें पुढल्या वर्षीं येऊं शकणार नाहीं ! पांडुरंगाचें नांव घेतल्यानें तुमच्या मनांत खळबळ झाली तर तुम्ही कायद्यांत येतां, असें होण्याचा संभव आहे. पंढरपूर हें मोठें महत्त्वाचें क्षेत्र आहे; तें महाराष्ट्रांतील मुख्य ठिकाण आहे म्हटलें तरी चालेल. मुंबई, पुणें हीं शहरें तुम्हांला मोठालीं दिसतील, पण त्या शहरांतून १० रु. करितां गुलामगिरींत जाणारे लोकच तुम्हांला सांपडतील. पण पंढरपुराचें तसें नाहीं. कळकळीनें व निश्चयानें, कोणाचाही स्वार्थ नसतां आपण होऊन जर कोठें लोक जमत असतील तर ते पंढरपुरास जमतात. तुमची जेवणाखाण्याची सोय येथें नाहीं, तुम्हांला कोणी आमंत्रण केलें नव्हतें, तुमची उतरण्याची वगैरे सोय मुद्दाम आधींच कोणी केलेली नाहीं, पंढरपुरांत रोगराई

होण्याचा संभव आहे. असें असलें तरी तुम्ही येथें येतां. त्या श्रद्धेनें, निष्ठेनें कळकळीनें तुम्ही देशाविषयीं विचार करा.

व्यापारी जसा वर्षाचा आढावा काढतो; नफा झाला का तोटा झाला, खर्च काय झाला व शिल्लक काय राहिली हें पाहतो; त्याप्रमाणें **देशाविषयीं वर्षांतून एक दिवस तरी—निदान एक घटका तरी—तुम्ही विचार करा.** हा माझा एकट्याचा किंवा दुसऱ्या एखाद्या व्यक्तीचा प्रश्न नाहीं. हा तुमचा—माझा—सर्वांचाच प्रश्न आहे. आपली स्थिति गेल्या वर्षांत निर्विवाद वाईट झाली आहे तुमच्याकरितां सरकाराशीं भांडणारांस ते शिक्षा करीत असून 'असें कां करितां ?' म्हणून त्यांस विचारिलें असतां 'रयतेच्या कल्याणाकरितां' असा जबाब येतो ! सभाबंदी कां करितां ? तर रयतेच्या कल्याणाकरितां ! २० रेडे, २० म्हशी, २० गाई एकत्र जमल्या तर चालतील, २० मेंढ्या जमल्या—हजारों जमल्या—तरी चालतील, पण २० माणसें जमलेलीं चालणार नाहींत ! याचा प्रतिकार तुम्ही करणार कीं नाहीं, हा प्रश्न आहे. आमच्या धर्माच्या ठिकाणीं, पुण्यक्षेत्रीं, आमच्या धर्माविरुद्ध बोलण्यास मिशनऱ्यांना मुभा आहे, कां ? तर म्हणे मनांतील विचार मोकळेपणानें बोलून दाखविण्याची सर्वांना मोकळीक असली पाहिजे. मग आमचीं तोंडें सरकारनें कां बंद करावीं ? हा प्रश्न आहे. राज्य कोणाला नको ? मिळालें तर सर्वांनां पाहिजे आहे. मला दिलें तर मलाही पाहिजे असें वाटतें ! हा मनुष्यधर्म आहे, पण राजाच्या मागें धर्म आहे; शास्त्र आहे. तें जेव्हां राजा उल्लंघून जातो—पाळीत नाहीं—तेव्हां राजा पाप करतो व या राजाच्या शास्त्रांत सांगितलें आहे कीं, राजाचीं दुष्कृत्यें प्रजेला भोंवतात. माझें पाप मला भोंवतें. तुमचें पाप तुम्हाला भोंवतें. **राजाचें पाप राष्ट्राला भोंवतें.** आमच्या शास्त्रांत असें आहे. असें न झालें तर तो राजा कशाचा ? राजाचें पाप नुसतें राजाला भोंवलें तर राजांत व इतर माणसांत फरक तो काय राहिला ? मग तो साधा मनुष्य झाला ! राजाच्या पापानें प्रजेवर संकटें येतात व त्याचा प्रतिकार प्रजेनें न करणें म्हणजे राजाच्या पातकांत प्रजेनें आपल्या पातकाची भर घालून आपल्यावर जास्त संकटें ओढून घेणें आहे. राजाचा धर्म सुटला आहे. पाप झालें आहे. देशांत धान्य नाहीं ! पण धान्य देशाबाहेर कोण जाऊं देतो ? व

जर धान्य देशबाहेर जातें तर खरें दुष्काळाचें कारण कोणतें ? जी गोष्ट अधर्माची व अनीतीची आहे ती राजाला व प्रजेला दोघांनाही अहितकारक आहे असें स्पष्टपणें म्हणण्यास काय हरकत आहे ? गोष्टी मनांतल्या मनांत ठेवण्याचे दिवस गेले आहेत. तुम्ही उद्योग कराल तर हे दिवस जातील—खात्रीनें जातील; नाहीं तर कठीण अवस्थेंत रहाल. सद्यांच्या स्थितीसंबंधानें खेड्यापाड्यांतून चर्चा झाली पाहिजे. येथून कांहीं शिकून जर परत जावयाचे असेल तर राजाची नीति बिघडली आहे, धर्म बिघडला आहे, हें लक्षांत आणा व कार्याला लागा. " तोंड दाबून बुक्क्यांचा मार आम्ही सहन करणार नाहीं ! " असें ज्या दिवशीं स्पष्ट सांगाल **त्या दिवशीं तरणोपाय आहे.**

## सरकारला चहाडखोर पाहिजेत

सरकार काय म्हणत आहे ? आम्ही इतक्या कोसांवरून जें आलो आहो तें चंबूगबाळें उचलून परत जाण्याकरितां आलों नाही. आम्ही येथें राहणार. आम्ही हल्लीं करतों त्याप्रमाणेच राज्य करणार. तुम्ही तक्रार करतां कामा नये. केलीत तर शिक्षा होईल. सभाबंदीचा कायदा कां केला ? म्हणून जर विचाराल तर तुम्हाला सांगतील कीं, हे 'बामण' वाईट आहेत. त्यांचीं तोंडें बंद करण्याकरितां हा कायदा केला आहे. त्यांचें म्हणणें तुम्ही आपण होऊन तोंड बंद ठेवा; व तुम्ही न ठेवाल तर आम्हीं तें शिवूं. तुम्ही म्हणाल कीं, राजकीय विषयावर नाहीं तर नाहीं; आम्ही धार्मिक विषयांवर बोलूं. पण त्यानें खळबळ, जागृति, स्फूर्ति उत्पन्न झाली—विठ्ठल विठ्ठल म्हणण्यानें खळबळ झाली—तर तें सरकार बंद करणार ! याचा विचार तुम्ही करावा. खेड्यापाड्यांतून हा विचार तुम्ही घेऊन जावा, हा माझ्या बोलण्याचा हेतु आहे. गेल्या वर्षाची हकीगत सांगण्याकरितां मी येथें मुद्दाम आलों आहे. कोणी विचारतील " मग काय ? आम्ही बंड करायचें कीं काय ? " बंडही करायला नको व स्वस्थही बसायला नको, हें माझें यास उत्तर आहे. पोलीस कोण आहे ? मुनसफ कोण असतात ? मामलेदार कोण असतात ? सगळें तुमचेच लोक. सगळें तुमच्याच हातांत आहे; पण तुम्ही ओळखीत नाहीं. ही बार्शी लाईट रेल्वे आहे. ती चालवितो कोण ? एक साहेब वर आहे. बाकी आम्हीच ती चालवितो. असेंच सगळें आहे.

आणि असें जर आहे तर सरकारला आपल्या मनासारख्या गोष्टी करायला कां लावतां येणार नाहीं ? पाटील, कुलकर्णी, सारा वसूल करणारे, न दिल्यास धरणारे, आपलेच लोक असतात. पिकें चांगलीं आलीं आहेत असा खोटा रिपोर्ट करणारे लोकही आपलेच असतात ! सरकाराला तुमच्यांतील चहाडखोर लोक कसे वाढतील याची काळजी आहे. असल्या प्रकारची चहाडी करणें हा देशाशीं बेइमानपणा, मातेशीं बेइमानपणा आहे ! तो सोडून द्या. ही पहिली गोष्ट. एवढी गोष्ट कराल तर सरकारचा एक पाय खास लंगडा पडेल; दुसऱ्या पायाचें मग पाहूं. ते म्हणतात, आम्ही सहा हजार कोसांवरून आलों, तुह्मी आम्हांला बातमी देणार नाहीं तर कसें होईल ? तुम्ही चहाडी केली नाहीं तर सरकारचें अर्धें काम बंद होईल ? हें पूर्वी कोणी बोलतें तर तो राजद्रोह समजला गेला असता, पण आतां सरकारी अधिकारीच हे सांगत आहेत; व त्यांचेच म्हणणें मी तुम्हांला सांगितलें आहे. दुसरी गोष्ट काय ? तुम्हांला खायला जर मिळत नसेल, तुमच्या पोटाला जर मिळत नसेल, **तुमच्या पोटांतून जर खरी कळ येत असेल तर तुमचें तोंड त्यासंबंधानें बोलेल.** तुमच्यापैकीं कोणी चहाडी केली नाहीं, रुसून बसला, 'तर तुम्हाला काय पाहिजे ?' म्हणून आपोआप विचारायला येतील. 'मग आम्हाला हें हें पाहिजे' असें त्यांना सांगावें. वैद्याला खरेंच सांगितले पाहिजे, नाहीं तर इलाज होणार कसा ?

## स्वदेशीची शपथ घ्या

शेतकऱ्यांनीं, कारागिरांनीं, धंदेवाल्यांनीं, पाटील कुळकर्ण्यांनीं—सर्वांनीं—"या राज्यांत आमची स्थिति चांगली नाहीं" असें स्पष्ट सांगितलें पाहिजे. यांत सर्वांच्या सांगण्यांत मेळ पाहिजे. कलेक्टर असो, कमिशनर असो कीं त्यापेक्षां दीड हात उंचीचा कोणी साहेब असो; त्याला हेंच उत्तर देण्यांस भिऊं नका. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं; नाहीं तर (दांतखिळीच बसली असल्यास) पळी घालून तोंड उघडावें लागतें. पांडुरंगाचा पदर धरून त्याला जेवायला लावलें होतें. सरकारचा पदर तुम्हांला सांपडलेला नाहीं व तो पदर तुम्हाला धरतां येत नाहीं. इंग्रज सहा हजार कोसांवरून येथें आले आहेत, ते तुमच्या कल्याणाकरितां, मोक्षाकरितां, येथें आलेले नाहींत, हें स्पष्ट सांगितलें पाहिजे आहे व तें मी

तुम्हांला सांगतों. ते आपल्या फायद्याकरितां—आपल्या कल्याणाकरितां—येथें आले आहेत. मग त्यांचें कल्याण कांहीं कमी करण्याचें तुमच्या हातांत आहे काय ? याचा विचार करा. यावर स्वदेशी व्रताचे अवलंबन हा एक उपाय आहे. आपल्याजवळ शस्त्रें नाहींत. ते बळकट आहेत, ते श्रीमंत आहेत, त्यांना आपण पैशानें अडवूं शकत नाहीं, तेव्हां हाच उपाय आहे. तुमच्या पैशावर, तुम्ही बातम्या देतां त्यावर, तुमच्या कर्तबगारीवर जें राज्य चालतें तें कोठें तरी अडलेंच पाहिजे. सरकारचे अधिकारी येथें कोणी असतीलच. माझें संरक्षण करायला कांहीं पोलिस नेहमीं माझ्यामागें येत असतें. पण " आम्हीं कोणाचा द्वेष करीत नाहीं. आपल्या पोटावर प्रीती करितों एवढेंच " असेंच तुम्ही सांगा. यांत इंग्रजांचा द्वेष नाहीं. सर्वांना खायला मिळावें अशी आमची इच्छा आहे. त्या सर्वांत आम्ही स्वतः येतों. आमचें ताट घेऊन दुसऱ्यांस द्यावयास मात्र आम्ही तयार नाहीं. गेल्या वर्षी ' स्वदेशी ' व्रताविषयीं शपथ घेण्यास मी तुम्हांस सांगितलें होतें; तें विसरला असाल तर पुनः एकदां शपथ घ्या. पुनः पुनः हेंच सांगायचें कीं **चहाडी पुरे करा.** सरकारवर रुसून बसा. लहान मुलें बापावर रुसतात तर मग वयानें मोठ्या अशा तुम्हांस रुसतां येणार नाहीं ? उद्योग करितां येत नाहीं, रुसतां येत नाहीं, व तोंडही बंद ठेवितां येत नाहीं ! ज्याच्यानें चहाडी केल्याशिवाय राहवत नाहीं त्याला पांडुरंगानें एकच जागा केली आहे. ती जागा नरक ही होय !

## स्पष्ट बोलण्याचे दिवस

**आपल्या कर्मानें खालीं पडाल किंवा वर याल. रुसाल ते मनासारखें घडून येईपर्यंत रुसा.** गोष्ट शेवटाला लागेपर्यंत रुसा. मग सरकार कितीहि बलाढ्य असो तें तुम्हांला " काय पाहिजे ? " म्हणून येऊन विचारील. सरकारला वाटतें आहे कीं, सध्यांची चळवळ धाकानें जाईल. ती वरवरची आहे. मूल रुसलें असतां बाप तरी काय करतो ? प्रथम छडी दाखवितो. त्यानें काम झालें नाहीं तर ' आपोआप रुसवा जाईल ' म्हणून कांहीं दिवस तिकडे दुर्लक्ष करून तसाच राहतो. त्यानेंही झालें नाहीं तर मग विचारतो "तुला काय पाहिजे?" मग ' उद्यां करीन ' म्हणून गोष्ट पुढें ढकलतो, व यानेंही साधलें नाहीं म्हणजे

जें पाहिजे तें देत असतो. तसेंच लोकांसंबंधानेंही आहे. **रुसणें हें बेकायदेशीर नाहीं**—बेकायदा वर्तन करूं नका—व हें एकनिष्ठेनें कराल तर पांडुरंग तुम्हांला तारील यांत संशय नाहीं. तुमच्यांत मनुष्यपण आहे, तुमचे हितानहित तुम्हांला कळतें असें दाखवा. मी सांगतो हें माझ्या फायद्याकरतां नाहीं. यानें कदाचित् मी सरकारच्या रोषास पात्र होईन. सरकारी धोरण तुम्हांला कळूं नये अशी अधिकाऱ्यांची इच्छा दिसत आहे. पण खरें स्पष्टपणानें सांगणें जरूर आहे, असे दिवस आले आहेत; आणि म्हणून ही जबाबदारी मी आपल्या अंगावर घेतली आहे. **आज मी येथें बोलतों आहे व तुम्ही इतकेजण ऐकत आहां पण पुढल्या सालीं असें करूं शकाल किंवा नाहीं याची शंका यावी, असाच काळ आला आहे.** तुम्ही भ्याल तर तुमचा तरणोपाय नाहीं, असें स्पष्टपणें पांडुरंगासमोर, या चंद्रभागेच्या तटावर, मी सांगत आहे. विचार करा व कार्याला लागा, अशी माझी तुम्हांस विनंति आहे—नाहीं—आग्रह आहे. तुमच्यांत एक निष्ठा, सत्यनिष्ठा पाहिजे. परमेश्वरावर निष्ठा पाहिजे. जो परमेश्वराशीं प्रतारणा करितो तो राष्ट्राशींहि प्रतारणा करण्याचा संभव आहे. धीर धरा, निश्चयानें वागा, स्वदेशीचें व्रत एकनिष्ठेनें पाळा, परमेश्वर तुम्हांला संकटांतून मुक्त करील.

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. १०८६५ ६३
२८।१२

# सरकारी आश्वासनें व हिंदी लोक

सोमवार, ता. २५ नोव्हेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, धारवाड येथें, 'काळ' पत्राचे संपादक दे. रा. शिवरामपंत परांजपे यांचें व्याख्यान झालें. नंतर अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणालेः—

पांच वर्षांपूर्वी या ठिकाणीं तुम्हाला दोन शब्द सांगितले तेव्हांच्या आणि आतां प्राप्त झालेल्या कालाकडे पाहिलें तर किती तरी फरक पडल्याचें आपल्याला दिसून येतें. "वंदे मातरं" हे शब्द त्या वेळीं कोणाला तरी माहीत होते कां! आतां पहात्रें तों हिमालयापासून तों थेट कन्याकुमारीपर्यंत, खेड्यापाड्यांतून, गिरीकंदरांतूनसुद्धां हा जयध्वनि ऐकावयास येतो आहे व याची मजल सिलोन ब्रह्मदेशापर्यंतसुद्धां जाऊन पोहोंचली आहे. हें असें कसें झालें? राज्यकर्त्यांपैकीं कांहीं म्हणत.त कीं, हें गौडबंगाल उपद्व्यापी चळवळ्या लोकांनीं उत्पन्न केलें आहे; पण हें म्हणणें चुकीचें आहे. याला कारण चळवळे लोक नसून राज्यकर्तेच आहेत असें माझें मत आहे. इंग्रजी राज्य येथें कसेंही स्थापिलें गेलें असो, त्याविषयीं मला आतां खुलासेवार सांगण्याचें प्रयोजन नाहीं व वेळही नाहीं. व्याख्याते प्रो. परांजपे यांनीं आपणांस सांगितलेंच आहे कीं, आमच्यांतील फुटी व यादवीवर त्यांनीं आपल्या राज्याचा पाया उभारला. मी म्हणतो राजनीतींतल्या कपटप्रयोगाचें साहाय्यही त्यांनीं घेतलें आहे. हें कांहीं मी पदरचें सांगत नाहीं. त्यांच्याचपैकीं एका विद्वान इतिहासकारानें हें विधान केलें आहे. केंब्रिज विश्वविद्यालयांतील इतिहासाचे अध्यापक प्रो. सिली यांनीं २५ वर्षांपूर्वीच आपल्या पुस्तकांत हें लिहून ठेवलं आहे. तें कांहीं असो, आम्हीं राजकीय दृष्ट्या पराभूत झालों आहों व नंतर हा क्रम इतक्यावरच न थांबतां व्यापारी दृष्ट्याही आम्ही परवश होऊन बसलों आहों. असो, ज्या वेळीं पेशवाई गेली त्या वेळीं सुजाउद्दवल्याच्या वेळेसारखीच एक गोष्ट घडून आली ती मी तुम्हांस सांगतों. बापू गोखल्यांच्या सैन्यापुढें आहे याच सैन्याचा निभाव लागणार नाहीं, तेव्हां त्याला कुमक पाहिजे व ती मिळण्याला एक दिवसाचा अवकाश पाहिजे तर तो कसा मिळावा ही विवंचना इंग्रज सेना-

पतीला फार वेळ न पडूं देण्याची पुण्याई एकानें गांठीं बांधली. त्याचें नांव सांगण्याचें कांहीं कारण नाहीं. तो बाजीरावाकडे आला व म्हणाला, आज एकादशी, आज कसची लढाई करतां ? उद्यां द्वादशीचें पारणें फेडूं व लढाई देऊं.' झालें. मूर्खच तो ! त्यानें त्याप्रमाणें बापु गोखल्यांना परत बोलावलें. द्वादशीचें पारणें सोडून लढाईचा विचार करतात तों लढाईचें पारडें फिरलेलें ! दारूच्या पोत्यांत वाळू भरलेली सांपडली.

## स्वावलंबनानें हक्क घ्या

असो, अशा तऱ्हेनें पोत्यांतून इंग्रजी राज्य प्रस्थापित झाल्यानंतर त्याला कायमपणा येण्याकरतां राज्यकर्त्यांनीं प्रजेला बरीच गुळचट अभिवचनें---अभिवचनें म्हणण्यापेक्षां आशिर्वाद दिले; कारण, वचन पाळण्याची जबाबदारी वचन देणारावर पडत असते. वचनाला वचन देणारा बांधला गेला असतो. त्यानतर डलहौसी साहेबांच्या परोपकारी कारकीर्दीनें सत्तावन सालाचा प्रसंग ओढवला व त्यांतून कसेबसे पार झाल्यानंतर लोकांत शांतता व्हावी म्हणून आमच्या राणी सरकारांनीं खऱ्या अंतःकरणानें प्रजेला आपलें लेखी वचन दिलें; पण तें वचन नसून, तीं तुमची हक्काची सनद नसून, तो एक राजनीतीचा डाव होता व **ती सनद 'अशक्य सनद' आहे असें, त्याच महाराणीच्या प्रतिनिधीनें आम्हाला स्पष्ट सांगितलें.** निरनिराळ्या अनेक वेळीं दिलेल्या वचनांचा भंग केल्यामुळें प्रजेच्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला, कीं चळवळ्या लोकांच्या खटपटीमुळें झाला ? आरंभीं आरंभीं सरकारान पसरलल्या मायाजाळाला भुलून जाऊन आम्ही फसलों; पण असेच नुसतें वासावर किती दिवस संतुष्ट राहणार ? पण त्यांतून आम्हांला हा एक भ्रम होता कीं हे बेटे "कान्सर्वेटिव्ह" जाऊन एकदां "लिबरल" आले कीं आमचें काम खात्रीनें होईल, आणि परमेश्वरकृपेकरून तोही संशय लवकरच फिटला, हें तरी भाग्यच समजलें पाहिजे. एकदांचे लिबरल आले व आम्हांला पाहिजे होता त्यापेक्षां कांकणभर जास्तच 'लिबरल' मताचा स्टेट सेक्रेटरीही आमच्या वांटणीला आला व आमच्या आशेला पंख फुटले ! पण ते आशेचे पंख "चांदोबाच्या" सबबीवर मोर्ले साहेबांनीं तोडले व स्वच्छ सांगितलें कीं,

‘ सिव्हिल सर्व्हिसच्या ’ लोकांचे अधिकार काडीइतकेही कमी करण्यास आपण तयार नाहीं व तसें करणें इष्टही नाहीं. इष्ट यांना नसेल; पण तें आम्हांला आहे कीं नाहीं हें नको कां आम्ही पहावयाला ? आम्ही तरी काय मागतों आहों ? आम्हांला दिलेलीं वचनें पाळा, हाच आमचा आग्रह आहे ना ? मग यांत गैर, नुसतें गैर नाहीं तर गैरकायदा तरी काय झालें ? आम्ही असें म्हटलें तर लाग-लीच आमचे कपाळीं राजद्रोहाची मुद्रा मारून आमच्या पुढाऱ्यांना हद्दपार कर-ण्यालाही कमी होत नाहीं. मालक म्हणजे आमचा बादशहा इतका दयाळू असतांना या गुमास्त्यांच्या पोटांत इतकें कां दुखावें ? मालक उदार आहेत, पण त्यांचा उदारपणा निरुपयोगी ! कारण कोठावळ्याच्या कद्रूपणाला त्यांना आळा घालतां येत नाहीं, हें काम त्याच्यानें होत नाहीं, म्हणून गप्प न बसतां तें आम्ही केलें पाहिजे. मनुष्याचा स्वभावच आहे. द्यायला कुणालाही नको, आपलेंच दुसऱ्याजवळ असतें खरें; पण तें परत मिळण्याच्या वेळीं कोण यातायात पडते, हा आपला नित्याचा अनुभव आहे. समजा ही स्थिति उलट असती आणि तुम्ही इंग्लंडांत असतां तर आपखुषीनें हक्क त्यांना दिले असतेत कां ? असें जर आहे तर फसलेल्या “ विनंति अर्जांच्या ” मार्गानें आपण चालावयाचें कीं स्वावलंबी होऊन हक्क घेण्याला, मागण्याला नव्हे, पात्र व्हावयाचें याचा विचार करा.

## सुखानें स्वराज्य-प्राप्ति नाहीं

हल्लीं जहाल व मवाळ म्हणून उगीच भेद करण्यांत येतो. स्वदेशाकरतां काम करणाऱ्याच्या मार्गांत प्रकृतिभिन्नत्वामुळें सध्यांही फरक असेल. पण खरा जहालपणा अजून उत्पन्न झाला नाहीं व तो उत्पन्न झालाच तर सरकारच्या करणीनेंच होईल. सौम्यपणें मिळालें तर कोणाला नको आहे ? पण तसें मिळण्याची आशा नाहीं व कोणाला मिळालें नाहीं, आणि आम्हालाही मिळणार नाहीं. मग स्वस्थ बसावयाचें कीं आमची ठेव आम्हाला परत देण्याला त्यांना भाग पाडावयाचें ? असे भाग पाडण्याला अडवणुकीच्या मार्गाचा आपण अंगिकार केला पाहिजे. या मार्गाचा अभ्यास, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण या धड्यांनीं तूर्त करा. मनांत असल्यावर मनुष्याला असाध्य असें कांहीं नाहीं. हा मार्ग सुखाचा नाहीं हें मी कबूल करतों, पण सुखानें कधीं स्वराज्यही मिळत नसतें. तें मिळण्यास

तुरुंगवास, फटके, हद्दपारी, इतकेंच काय, पण सत्पक्षाकरितां व न्यायाकरितां आपण मरणासही तयार झालें पाहिजे. ही मनाची तयारी होण्याला राष्ट्राची काय स्थिति आहे ती स्पष्ट दिसून अंतःकरणावर बिंबली पाहिजे. ज्यांच्या अंतःकरणावर बिंबली अशा या व मागच्या पिढींतील सर्व देशभक्तांनीं हिंदभूचा जो मोडका गाडा अशा स्थितींत येथपर्यंत आणून सोडला आहे तो नेटानें पुढें ओढण्याचें काम पुढच्या पिढीचें आहे; व तो ते ओढतील व कोठेंही खुंटू देणार नाहींत असा मला भरंवसा आहे. तरुणांनो, मवाळ जहालांच्या तंट्यांत पडूं नका. मवाळ असा जहाल असा, राष्ट्रकार्य करण्यास अंगचोरी व कसूर करूं नका. महाराष्ट्राकडे सर्वांचे डोळे आहेत. महाराष्ट्रानें आधीं केलें आहे. या गोष्टीची त्याला ओळख आहे. स्वराज्य म्हणजे काय याचा त्याला अनुभव आहे. तेव्हां महाराष्ट्रीयांच्या अंगांत त्या पूर्वजांचें शुद्ध रक्त जर खेळत असेल तर हल्लींच्या परिस्थितीला योग्य व आंखून दिलेल्याच कायद्याच्या मर्यादेंत ते स्वराज्याचे हक्क संपादतील. नाहीं तर बोलूं नये, पण अनिर्वाहपक्ष असून बोलतों कीं, महाराष्ट्रीयांचें शुद्ध व तेजस्वी वीर्य भ्रष्ट झालें आहे असें समजावें लागेल.

मराठी ग्रंथ संग्र
स्थळ प्रत

# इंग्रजी राज्य व आमचें कर्तव्य

मंगळवार, ता. २६ नोव्हेंबर १९०७ रोजीं रात्रीं गुळेहोसूर येथें 'काळ' कर्ते दे. रा. शिवरामपंत परांजपे यांचें व्याख्यान झालें. नंतर अध्यक्ष या नात्यानं लो. टिळक म्हणाले:—

रा. परांजपे यांनीं जें सांगितलें तेंच मीही सांगणार आहे. अशा गोष्टी पुनः पुनः ऐकल्यानें मनावर ठसतात. इतक्या दूरवर येऊन आपणांस चार शब्द सांगण्याचा आम्हांला काय अधिकार आहे, अशी कोणी पृच्छा करील तर—कारण तसें करण्यास शिकविलें जाईल—त्यास माझें असें सांगणें आहे कीं, सात हजार कोसांवरून आलेल्या इंग्रज लोकांस जर तसा हक्क आहे, तर हिंदुस्थानांत आणि त्यांतल्या त्यांत महाराष्ट्रांत राहणाऱ्या मला तर तो आहेच आहे. आपणास अधिकार आहे आणि मला नाहीं म्हणणें म्हणजे आपला अन्याय आपणच कबूल केल्यासारखें आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक निराळीं नाहींत. दोघांमध्यें एकच रक्त खेळत आहे; दोघांची भाषा एकच म्हणजे कानडी ही होती. भाषेच्या बाबतींत महाराष्ट्र बाटून मराठी झालें आहे. सर्व हिंदुस्थानांत सरकारनें ज्याप्रमाणें फुटीचा डाव मांडिला आहे, तसा तो कर्नाटकांतही मांडिला आहे, असें दिसतें. लिंगाईत लोकांस तुम्हांपासून अलग करण्याचा प्रयत्न होत आहे. तो इसापनीतींतील चार बैलांच्या गोष्टींतील सिंहाप्रमाणेंच आहे. यानें फसले जाऊं नका. प्रत्येकाशीं निरनिराळें बोलल्यापेक्षां पुष्कळ लोक एके ठिकाणीं जमले म्हणजे एखादी गोष्ट सर्वांस एकदम सांगतां येतें, व म्हणूनच मी आज येथें आलों आहे. तुम्हीही कांहीं विशिष्ट हेतु मनांत धरून आला असाल. येथें उत्सवांत सात दिवस मुक्तद्वार असतें, एवढ्याकरितांच जर तुम्ही आला असाल, तर तुम्हांस माझें स्पष्ट सांगणें आहे कीं, तुम्ही आपलें व स्वामींचें असें दोघांचेही नुकसान करीत आहां. आपण अशा उत्सवाचें प्रसंगीं जें एकत्र जमावयाचें ते जेवणाकरितां नसून कांहीं तरी बोध घ्यावा, म्हणून होय; व असें केलें तरच स्वामीस संतोष होईल.

## कृतीनें आधार

आज सर्व हिंदुस्थानांतील लोक एका विचारानें प्रेरित झाले आहेत. पंचवीस वर्षांमागें असें होणें शक्य नव्हतें. आम्हामध्यें वाढत असलेल्या दारिद्र्यामुळें आमचे डोळे उघडले आहेत, याबद्दल आपण सरकारचे आभार मानले पाहिजेत. परिणामावरून कारण गृहीत धरावें असा कायदा आहे. सरकारानें कृतीनें आमचे डोळे उघडविले आहेत तेव्हां आम्हीही कृतीनेंच आभार मानूं; आणि ती कृति म्हणजे स्वराज्याचे हक्क संपादन करणें ही होय. स्वराज्य तुम्हास अपरिचित नाहीं. महाराष्ट्राच्या मराठीशाहीच्या अगोदर विजयनगरचे राज्य तुमच्याइकडे होऊन गेलें. विजयनगरचे राज्यांतील कांहीं नियम शिवाजी, पेशवे वगैरेंच्या वेळेच्या मुत्सद्यांनीं आपल्या राज्यांत सुरू केले होते, असें इतिहास सांगत आहे. हा देश जास्त सुपीक आहे; तेव्हां आपण जास्त सुखी असला पाहिजे. आपणा-मध्यें सभ्यां कर्ते पुरुष उरले नाहींत. मोठमोठ्यांचे मोठमोठे वाडे वगैरे ओस पडत आहेत; तेव्हां असा तेजोभंग होण्यास काय कारणें झालीं याचा विचार करा. मी म्हणतों या सर्व गोष्टींस इंग्रज सरकार कारणीभूत झालें आहे. आमचें राज्य घेतलें तें आम्हांवर उपकार करण्याकरितां घेतलें म्हणतात. आम्हांस निःशस्त्र केलें त्याचें कारणही आम्ही मुलांप्रमाणें भांडू नयें म्हणूनच सांगतात. अशा नाना तऱ्हेच्या धूर्त कोट्या लढविल्या जातात, ते सांगतात तोच खरा हेतु आहे कीं नाहीं तें आपण पहावयास नको काय ? ते म्हणतात आम्ही अधिकारास पात्र नाहीं. शंभर वर्षांच्या इंग्रजी राज्यानें जर अद्यापि आम्हांत पात्रता आली नाहीं तर ती त्यांच्या दृष्टीनें पुढें कधींहीं येणें शक्य नाहीं. दुसरें असें कीं, दंगेधोपे नाहींसे करून प्रजेची सुखवृद्धि करावी हाच जर आम्हांस निःशस्त्र करण्याचा उद्देश असेल, तर स्मशानशांततेचे साम्राज्य झालें हें कबूल केलें पाहिजे. आज दंगेधोपे बिलकूल नाहींत, सर्व भौतिक सुधारणा झाल्या आहेत; तरी खरें सुख नाहीं. आपण जीं माणसें होता तीं मेंढरें व्हावींत म्हणून हा सर्व खटाटोप करण्यांत आला आहे. असेच निरुपद्रवी रहा, पुणेंकरांचें ऐकूं नका, म्हणून जो उपदेश करण्यांत येत आहे तोही याचसाठीं होय. ही स्थिति नाहींशी कशी होईल याचा विचार राष्ट्रांतील कर्ते पुरुष करीत आहेत. वेदांता उमजण्यापूर्वी संसार मिथ्या आहे हें जसें समजलें पाहिजे तसेंच, उपाययोजना

निवेदन करण्यापूर्वीं आपली हीन स्थिति कशी झाली आहे हें समजून सांगणें भाग पडतें.

## कृपण बापाशीं झगडा

सध्यां सुरू झालेला झगडा बापलेकांतील झगड्यासारखा आहे. एखाद्या कृपण बापाला आपल्या मुलास अखेरपर्यंत कांहींमुद्धां देऊं नये असे वाटत असतें, परंतु होतां होईल तों नाहीं न म्हणतां कांहीं तरी सांगून तो वेळ मारून नेतो, पण अखेर मुलगा निकरावरच आला म्हणजे ज्याप्रमाणें त्यास स्पष्ट नाहीं म्हणावें लागतें, तशी सध्यां इंग्रज सरकारची स्थिति झाली आहे. आजपावेतों कांहीं तरी मधाचें बोट दाखवून वेळ मारून नेण्यांत आली, पण जेव्हां गोष्टी निकरावर आल्या, तेव्हां 'मायबाप' म्हणवून घेण्याची इच्छा धरणाऱ्या सरकारनें स्पष्ट 'नाहीं' म्हणून सांगितलें ! मोर्ले साहेब म्हणतात कीं, तुमच्यामध्यें भाऊबंद वगैरे आहेत तोंपर्यंत आम्ही हिंदुस्थान सोडून जाणार नाहीं; गेल्यास सर्व जग आम्हाला हंसेल. हिंदुस्थानाखेरीज व अशाच समानव्यसनी देशांखेरीज सर्व जग हंसल्यास नवल नाहीं. कारण लंकेंतील सगळे रावणच. आम्हास कांहीं न देण्याचा सरकारनें संकल्प केला आहे असेंच दिसतें. आम्हीही स्वराज्याचे हक्क मिळविण्याचा संकल्प केला पाहिजे. स्वराज्याचे हक्क मिळाल्याशिवाय आमचें नष्टचर्य संपत नाहीं, हें आतां निश्चित झालें आहे. स्वराज्य होतें तेव्हां त्याची किंमत वाटली नाहीं. आतां तें नाहीं. तेव्हां नुसती तें हवें अशी बुद्धि सुचून काय उपयोग ? आतां स्वतः हातपाय हालविल्याशिवाय गत्यंतर नाहींसें झालें आहे. एखादी गहाण टाकलेली जमीन कायमची आपणाकडेच असावी असें ज्याप्रमाणें लोभी सावकारास वाटत असतें तद्वत् सरकारची आज स्थिति झाली आहे. हातीं आलेलें सावज सोडून देणें मनुष्यस्वभावाचे विरुद्ध आहे. तुम्ही घेतल्याशिवाय तुम्हांस कसलेही अधिकार मिळणार नाहींत. एका इंग्रजी ग्रंथकारानें स्पष्ट सांगितलें आहे कीं, आपणास स्वराज्य हवें, असें जर हिंदुस्थानांतील तीस कोटि लोक निर्धारानें सांगतील, तर इंग्रजांना तें द्यावें लागेल. आपणास जें हवें आहे तें न भितां स्पष्ट सांगा. असें करतांना कोणाचा अकारण अपमान न होईल, अशी खबरदारी घ्या. "परित्राणाय साधूनाम् विनाशाय च दुष्कृतां। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे" हें भगव-

द्रचन लक्षांत ठेवा. आतां कोठें झगड्यास सुरवात झाली आहे. आतां मागें घेणार कीं मर्दाप्रमाणें तोंड देणार ?

## मरून जगणें व जगून मरणें

स्वदेशी आणि स्वराज्य कांहीं भिन्न नाहीं. स्वदेशीचें अंतिम स्वरूप स्वराज्य आहे. तुमच्या पोटापाण्याची ही गोष्ट सांगण्याकरितांच मी आज येथपर्यंत आलो आहे. आपण सर्व स्वदेशभक्त आहांतच पण देशाकरतां मरावयास तयार झाला तोच खरा देशभक्त होय. असे भक्त किती आहेत म्हणून हिंदुस्थान तुम्हास विचारीत आहे. भित्रे ते स्वदेशी कसचे ! मरावें कीं जगावें हा आज आपणापुढें प्रश्न आहे. या प्रश्नाचा निकाल परमेश्वरकृपेनें अनुकूल असा लागेल अशी मला आशा आहे; सध्यां आपण मरून जगायला शिकावयाचें आहे व जगून मरावें कसें हें समजून घ्यावयाचें आहे. माझें भाषण कागदावर टिपून घेणारे खुशाल घेवोत, त्यांच्याकरितां माझा प्रयत्न नाहीं; पण तुम्ही मात्र त्याचें नीट मनन करून मी सांगितलेलें तुम्हांला पटलें असेल तर कार्यास लागा, हेंच माझें आपणांस शेवटचें सांगणें आहे.



# सरकारी शिक्षण व राष्ट्रीय शिक्षण

गुर्लहोसूर येथें श्री चिदंबर स्वामीचा उत्सव होत असतो. १९०७ सालच्या या उत्सवास लो. टिळक हे गेले होते व जातां येतां कांहीं ठिकाणीं त्यांचा मुक्काम झाला होता. त्यांत बेळगांव येथें ते उतरले होते. तेव्हां रा. खोत यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचें व्याख्यान झालें. दसऱ्याचे दिवशीं झालेल्या मर्दानी खेळांत प्राविण्य दाखविल्याबद्दल कांहीं तरुणांस बक्षिसें द्यावयाचीं होतीं, तीं बेळगांवकरांनीं लो. टिळक यांच्या हस्तें या प्रसंगीं देवविलीं; नंतर ते म्हणालेः—

अध्यक्ष महाराज व सभ्य गृहस्थहो, आजच्या प्रसंगीं माझ्याकडून बक्षिसें देवविण्याचा जो मान मला आपण दिला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. शारीरिक शिक्षणाची आवश्यकता हल्लीं विशेष आहे. अध्यक्षांनीं असें सांगितलें कीं, बक्षिसें घेऊन शारीरिक शक्तीस उत्तेजन देण्याची चळवळ येथें तीन वर्षांपासून सुरूं झाली आहे. ज्याप्रमाणें बेळगांवांतील पुढाऱ्यांचें शारीरिक शिक्षणाकडे लक्ष गेलें आहे त्याप्रमाणें देशांतील इतर सर्व भागांतही या विषयाकडे पुढाऱ्यांचें कमीअधिक लक्ष गेलेलें आहे. महाराष्ट्रांत कित्येक प्रमुख शहरांत अशींच बक्षिसें देण्याचा परिपाठ अलीकडे पडत चालला आहे. महाराष्ट्रांतच नव्हे, तर बंगाल्यांतहि तोच क्रम सुरू झालेला आहे. किंबहुना येथल्यापेक्षां बंगाल्यांत शरीर कसदार व पीळदार करण्याची चळवळ जास्त फलद्रूप झाली आहे. National Volunteers राष्ट्रीय स्वयंसैनिक यांच्या हल्लीं तेथें ज्या मंडळ्या निघाल्या आहेत, व ज्यांनीं अलीकडे तेथें घडलेल्या कित्येक प्रशंसनीय कामगिऱ्या करून दाखविल्या, त्यांचा उगम वास्तविकपणें पहातां बंगाल्यांत ठिकठिकाणीं पांच-सहा वर्षांपासून जे तालमीचे आखाडे स्थापन झाले आहेत त्यामुळेंच झालेला आहे. बंगल्यांतील ह्या क्रांतीचें श्रेय सरला देवी या स्त्रीकडे आहे. या बाईनीं पांच-सहा वर्षांपूर्वीं बंगाल्यांत वीराष्टमीचा उत्सव सुरूं केला व त्या वेळेपासून तेथील तालमीचे आखाडे दिवसेंदिवस वाढत असून त्यांची भरभराट होत आहे. ही जशी बंगाल्यांत शारीरिक बलाच्या बाबतींत क्रांति झालेली आहे, तशी व तितकी हिंदुस्थानांतील इतर कोणत्याहि

भागांत अजून झालेली नाहीं, पण सर्व देशभर ही क्रांति होण्याचा काळ आतां अगदीं समीप आला आहे, व तशी क्रांति सर्व देशभर लवकरच घडून येईल असा मला भरवंसा आहे. पूर्वी पेशवाईमध्यें महाराष्ट्रांत शरीर तरवेज ठेवण्याची पद्धति अतिशय होती. पुणें, सातारा, नाशिक इत्यादि ठिकाणीं पुष्कळ व मोठमोठे तालीमखाने असत. त्यावेळीं महाराष्ट्रांत लष्करी पेशाचें विशेष प्राबल्य असल्यामुळें मर्दानी खेळांकडे लोकांचे पूर्ण लक्ष असे. तालीमखान्यांत व मर्दानी खेळांत खालच्या वर्गांतीलच लोक सामील होत असें नाहीं. ब्राह्मणादि पांढरपेशे वर्गांतील लोकहि शरीरें कमावण्यांत कसूर करीत नसत. कित्येक तालिमींवरील वस्ताद त्या वेळीं ब्राह्मण होते. सरकारांत कारकुनी व इतर पेशाचेही जरी लोक असत, तरी शारीरिक संपत्तीकडे निखालस दुर्लक्ष केलेले असे लोक सहसा कोणीहि आढळत नसत.

## सरकारी शिक्षण व लोकांच्या गरजा

पेशवाईनंतर महाराष्ट्रांत मर्दानी खेळांचा ऱ्हास झाला. शारीरिक शिक्षणाकडे आमच्या इंग्रज सरकाराचें लक्ष गेले नाहीं असे नाहीं. सुमारें २०-२५ वर्षांपूर्वी सन १८८० सालानंतर सरकारनें शाळांतून शारीरिक शिक्षण सुरू केलें. परंतु हें शिक्षण ज्या तऱ्हेनें देण्यांत येतें तें येथील परिस्थितीस कितपत योग्य आहे याबद्दल पुष्कळांस शंका आहे. लॉन-टेनिस, क्रिकेट इत्यादि खेळ खेळण्याची प्रवृत्ति बरीच वाढली आहे. तथापि शरीराचे स्नायू बळकट करण्याला आमची जुनी पद्धतीच अधिक योग्य आहे, असें पुष्कळांचें म्हणणें आहे. सर्व शरीर चांगल्या रीतीनें कसून तयार करण्यासाठीं बंगाल्याप्रमाणें सर्व देशभर पद्धतशीर तालीमखानेच स्थापन झाले पाहिजेत. मर्दानी खेळांचें समारंभ करून, ठिकठिकाणच्या तालीमबाज लोकांस वर्षांतून एकादे प्रसंगीं एकत्र जमविण्याची पद्धत फारच इष्ट आहे. प्रत्येक जिल्ह्यांतील तरुण मंडळीमध्यें दळणवळण वाढण्यास व सार्वजनिक कामें सर्वांनीं मिळून करण्याचा त्यांजमध्यें हुरूप उत्पन्न होण्यास तशा समारंभाचा फार उपयोग आहे. तरुणपणीं ज्या ज्या तरुणांचा परस्परांशीं परिचय होईल, त्यांचा तो परिचय शेवटपर्यंत चांगल्या रीतीनें टिकेल अशी माझी समजूत आहे. सरकारनें शाळांतून थोडीबहुत शारीरिक शिक्षणाची सोय केली आहे.

यावरून या गोष्टीच्या विरुद्ध सरकार नाहीं हें उघड आहे. तथापि आमच्या तरुण विद्यार्थ्यांचीं शरीरें जेवढी व जशी बळकट व्हावयास पाहिजेत, तेवढी व तशी ती करण्यास मात्र सरकार तयार नाहीं. कदाचित् तसें करण्यास सरकारजवळ पैसा नसेल किंवा आमच्या तरुणांच्या शारीरिक शिक्षणाबद्दल आम्हांस जेवढें अगत्य वाटतें तेवढें सरकारास वाटत नसेल. सरकारी शाळांतील इतर जें पुस्तकी शिक्षण तें देखील आमच्या देशास जशा प्रकारचें पाहिजे तशा प्रकारचें सरकाराकडून देवविण्यांत येत नाहीं. हल्लींच्या सरकारी शिक्षणानें आमच्या तरुण पिढीच्या निकडीच्या गरजा बिलकूल भागत नाहींत, ही गोष्ट आतां पुष्कळ पुढाऱ्यांच्या लक्षांत येत चालली आहे. तरुण पिढी कशी सुधारावी याबद्दल पुष्कळ ठिकाणीं चर्चा सुरू झाली आहे. मीही ही चर्चा बऱ्याच ठिकाणीं स्वतः ऐकली आहे. पुणें, सातारा, धुळें वगैरे महाराष्ट्रांतील कित्येक ठिकाणीं व बंगाल्यांतही झालेली चर्चा मला माहीत आहे. त्यावरून हल्लींच्या शिक्षणानें सरकारी नोकरीला पात्र असेच लोक निर्माण होतात, याबद्दल बहुतेक एकमत असल्याचें मला आढळून आलें.

शिक्षणाचा येवढाच परिणाम होणें ही मोठी शोचनीय गोष्ट होय. आमच्या तरुणांच्या शिक्षणाची अशी अवनत स्थिति आणखी किती दिवस ठेवावयाची ? सर्व प्रांतांतील पुढारी लोकांपुढें आज जो अत्यंत महत्वाचा प्रश्न येऊन पडला आहे तो शिक्षणाचा प्रश्न होय. हा प्रश्न आमचे पुढारी जेवढ्या लवकर सोडवून त्याचा कायमचा निकाल लावतील तेवढें जास्त हितावह होणार आहे. राजकीय, मानसिक, वगैरे शिक्षण कसें द्यावें यासंबंधी मी पुष्कळ वादविवाद ऐकिला आहे; मतभेदही बरेच झालेले आहेत. आम्ही मुलांना वाईट वळण लावितों असा प्रतिपक्षीयांनीं बोभाटा केला आहे. सरकारी अधिकारी शिक्षणाच्या विरुद्ध नाहींत, मग विद्यार्थ्यांचीं मनें सरकारी शिक्षणाच्या विरुद्ध कलुषित कां करतां ? असा त्यांचा आम्हांला प्रश्न आहे. सरकार शिक्षणाच्या विरुद्ध नाहीं ही गोष्ट खरी आहे. पण चांगले नोकर व उत्तम गुलाम तयार व्हावे, असें शिक्षण सरकाराला हवें आहे. शिक्षण देण्यास ज्यावेळीं सरकारानें प्रारंभ केला होता, त्या वेळीं सरकारचा हेतु चांगला होता. हिंदुस्थानांतील शिक्षणासंबंधानें ज्या वेळीं चर्चा झाली त्या वेळीं मेकॉले साहेबांनीं

असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकांवर कायमची गुलामगिरी लादणें कधींही योग्य होणार नाहीं. विद्येनें हिंदुस्थानांतील लोक सुसंस्कृत होऊन, ते स्वातंत्र्याची इच्छा करूं लागतील, तर तें त्यांस देणें हेंच ब्रिटिश सरकारचें पवित्र व भूषणप्रद कर्तव्य होय. त्या वेळीं लोकांमध्यें स्वातंत्र्याची इच्छा हल्लींच्या इतकी उत्कट नव्हती. त्यामुळें सरकाराचें शिक्षणाचें मूळचें धोरण कांहीं वर्षें निष्कपटपणें अबाधित राहिलें. तथापि गेल्या ५०–७५ वर्षांच्या अनुभवानें सरकाराची बुद्धि व धोरण यांत पालट झालेला आहे. अधिकारी वर्गाचीच ( Bureaucracy ची ) सत्ता कायम राहिली पाहिजे, व ती कायम राहील तरच या देशाचें कल्याण होईल, असें आतां मोर्लेसारखे उदार पंडितही उघडपणें म्हणूं लागले आहेत. ही सत्ता कायम करण्याच्याच हेतूनें सरकारचें प्रत्येक बाबतींतील व शिक्षणाच्या बाबतींतीलही धोरण पालटलेलें आहे. राजकीय हक्कांसाठीं—किंबहुना स्वराज्यासाठीं—सुशिक्षितांकडून जों जों जास्त जोराची चळवळ होत आहे तों तों सरकार आपलें पिछेहाटीचें धोरण अधिक बळकट करूं लागलें आहे.

## सरकारचें पिछेहाटीचें धोरण

महर्षि दादाभाईनीं गेल्या वर्षीं स्वराज्याचें प्राप्तव्य हिंदी लोकांसमोर ठेविल्यापासून आजपर्यंत एक वर्षांत देशामध्यें जी विचारक्रांति झाली आहे, ती वीस वर्षांनींही झाली नसती येवढी मोठी आहे. ही विचारक्रांति दिवसेंदिवस अधिक जोराच्या झपाट्यानें होत चालली आहे. ह्या विचारक्रांतीचा ओघ आपण पुढें चालवावा किंवा कुंठित करावा ? या प्रगतिपर ओघास अनुसरून आमच्या तरुण पिढीस आम्ही शिक्षण द्यावें किंवा सरकारच्या प्रतीपगमनी धोरणाच्या शिक्षणांतच आमच्या तरुणांना आम्ही कुचंबत ठेवावें ? ऐतिहासिक, शास्त्रीय व औद्योगिक शिक्षण आमच्या तरुणांना बंद झालें आहे व होत आहे. सरकार विद्वान निर्माण करीत आहे व करीलही. परंतु त्यांस लंगडे विद्वान बनविण्याकडे सरकारचें बुद्धिसर्वस्व खर्च होत आहे. तरुण पिढी दाबून टाकावी, तिच्यामधील हुरूप व तेज नष्ट करून टाकावें, अशी सरकारची इच्छा आहे, असें उघड दिसत आहे. सरकारी नोकरांच्या मुलांवरच सरकारची हल्लीं देखरेख आहे, असें नाहीं,

हल्लीं जीं सर्क्यूलरें निघालीं आहेत त्यामुळें सरकारी शाळांतीलच नव्हे तर सरकारच्या मदतीनें चालणाऱ्या व स्वतंत्र खासगी शाळांतील मुलांवरही देखरेख ठेवण्याचें काम सरकारानें आपणाकडे घेतलें आहे. देशांतील सर्व विद्यार्थ्यांनीं सरकारास आवडेल तेंच करावें व न आवडेल तें करण्याचें सोडून द्यावें, अशी सरकारची इच्छा आहे. याप्रमाणें सरकारचें धोरण हल्लीं पालटलें आहे. हें धोरण वाईट आहे. आम्हांला हें धोरण नाकबूल आहे. या धोरणानें पुढील पिढी तेजोहीन होईल, असा आमचा समज आहे. या धोरणास आळा घालण्याचे आम्हांकडून वेळींच प्रयत्न झाले पाहिजेत. आमच्या मुलांचें शिक्षण आम्ही आमच्या हातीं घेण्यावांचून दुसरा मार्ग आतां राहिला आहे असें मला वाटत नाहीं. आमच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाची आम्ही फार काळजी घेतली पाहिजे. इंग्लंडच्या इतिहासांत चार्लस राजाला लोकांनीं ठार मारल्याचा उल्लेख आहे. पण त्याला लोकांनीं कां मारिलें व त्यापासून इंग्लंडवर काय परिणाम झाला याची माहिती आमच्या विद्यार्थ्यांस मिळत नाहीं. इतिहासांतील सिद्धांतांची मुलांना लहानपणींच ओळख पटली पाहिजे. लढाईच्या तारखा व तहाचीं कलमें यांचें ज्ञान गौण होय.

## राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम

राष्ट्रीय शिक्षणाचा उपक्रम पुष्कळ ठिकाणीं झाला आहे. बंगाल्याप्रमाणें उमरावती वगैरे ठिकाणीही राष्ट्रीय शाळा निघाल्या आहेत. तथापि हा उपक्रम बंगाल्याप्रमाणें इतर कोणत्याही प्रांतांत अद्याप नांवारूपास आलेला नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट होय. इकडील प्रांतांतील पुढाऱ्यांचें राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्याला पुरेसें पाठबळ मिळालेलें नाहीं. राष्ट्रीय शिक्षणावर आक्षेप घेण्यांतच आमचे पुढारी कालाचा अपव्यय करीत आहेत. विद्यार्थ्यांची शिस्त बिघडते, असा एक त्यांचा आक्षेप आहे. मुलांवर सरकारच्या मर्जीप्रमाणें पालकांनीं दाब ठेवावा, आणि पालकांना जर तसा दाब ठेवतां आला नाहीं तर सरकारानें ठेवावा असें ते म्हणतात. ज्या वेड्यांनां आपल्या मालमत्तेची नीट व्यवस्था ठेवतां येत नाहीं, त्यांच्या इष्टेटीची व्यवस्था सरकार पहात असतें. त्याचप्रमाणें ज्या पालकांना विद्यार्थ्यांवर सरकाराच्या इच्छेप्रमाणें दाब ठेवतां येणार नाहीं, ते पालक वेडे आहेत असें समजून त्यांच्या ताब्यांतून विद्यार्थ्यांना सरकारच्या ताब्यांतच

देणें इष्ट आहे, असें सरकारचें व आमच्या कित्येक पुढाऱ्यांचेंही मत आहे. आमच्या मुलांचें जर कोणी कल्याण करणार असतील तर ते कलेक्टर, कमिशनर व गव्हर्नर होत असें त्यांचें म्हणणें दिसतें. ते विद्यार्थ्यांचें कल्याण करणार म्हणजे त्यांस नेभळे करणार. शिस्तीसाठीं म्हणून सरकारनें ' रिस्ले सर्क्युलर ' व इतर नियमही प्रसिद्ध केले आहेत. युनिव्हर्सिटीचा कायदाही झालेला आहे. त्या नियमांचें उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यास परीक्षेला बसूं द्यावयाचें नाहीं, असेंही सरकारनें ठरविलें आहे. शिस्तीसाठीं सरकार इतका खटाटोप करीत आहे, हें पाहून शिस्त पाहिजे म्हणून आमचेही कित्येक पुढारी ओरड करीत आहेत. पण राष्ट्रीय शाळेंत आम्ही तरी विद्यार्थ्यांना ' चोऱ्या करा ' ह्मणून शिकविणार आहों कीं काय ? राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यास नोकरी कशी मिळणार ? असा कांहीं मंडळींचा दुसरा आक्षेप आहे. सरकारी शाळेंत अभ्यास करून परीक्षा दिली ह्मणजे नोकरी लागण्याचा संभव असेल, परंतु सरकारी शिक्षणानें नोकरी वांचून अन्य धंदा करण्याची पात्रता व उत्सुकता विद्यार्थ्यांमध्यें रहात नाहीं व जितके विद्यार्थी पास होतात तितक्या नोकऱ्याही सरकारजवळ नाहींत. उलट पक्षीं सरकारी नोकरीची प्रारंभापासून अपेक्षा न करणारे जे मारवाडी, लिंगायत, बनिया वगैरे व्यापारी पेशाचे वर्ग आहेत त्यांच्या मुलांनां सरकारी शिक्षणाची मोठीशी आवश्यकताही कधीं भासत नाहीं, व मोठेपणीं पोट कसें भरेल याची चिंताही त्यांना करावी लागत नाहीं. राष्ट्रीय शाळेंतील शिक्षणानें पोट कसें भरेल अशी शंका घेणें व्यर्थ आहे. स्वतःच्या हिंमतीवर पोट भरण्याचें सामर्थ्य जर राष्ट्रीय शिक्षणानें अंगीं येणार नाहीं, तर तें राष्ट्रीय शिक्षणच नव्हे. जर्मनी, अमेरिका, जपान इत्यादि ठिकाणीं इतर शिक्षणाबरोबर उद्योग धंद्यांचेंही शिक्षण देण्यांत येत असते. तें राष्ट्रीय शिक्षण होय, असें मी समजतो.

## राजकीय प्रमेयांचें बाळकडूं

हिंदुस्थानांत युनिव्हर्सिटी स्थापन होऊन ५० वर्षे झालीं, तथापि तिज-मार्फत देण्यांत येणारें शिक्षण अद्यापही अत्यंत अपुरे आहे, अशी इतर पुष्कळ जणांप्रमाणें माझीही समजूत आहे. राष्ट्रीय शाळेंत नवीन तें काय शिकविणार ? असा कित्येकजण प्रश्न विचारतात. या प्रश्नाचें सांगोपांग उत्तर देण्याचा प्रसंग

नाहीं. ह्मणून चिल्लर बाबी मी सोडून देतो. केवळ तत्वापुरतें मला बोलावयाचें आहे. आज इतकीं वर्षें ऊहापोह करून राष्ट्रीय सभेनें, पन्नास वर्षें मेहनत करून दादाभाईनीं, आणि दहा पंधरा वर्षें श्रम करून दत्तांनीं, जे सिद्धांत स्थापित केले आहेत, ते सिद्धांत आमच्या मुलांना लहानपणींच आह्मीं शिकवावे कीं नाहीं ? मला असें वाटतें कीं देशाच्या राजकीय, सामाजिक वगैरे परिस्थितीचें व ती स्थिति सुधारण्यासाठीं ठरलेल्या सिद्धांतप्राय उपायांचे ज्ञान मुलांना लहानपणापासूनच करून देणें अत्यंत आवश्यक झालें आहे. राजकीय सिद्धांतांचे व सामाजिक प्रमेयांचें विद्यार्थ्यांस लहानपणापासून बाळकडू देणे हेंच राष्ट्रीय शिक्षणाचे बी होय. प्रजेचे हक्क काय असतात, व त्यांपैकीं आपणांला किती आहेत हें जसें मुलांना समजलें पाहिजे तद्वतच जातिभेद, जातिद्वेष, व जातिमत्सर यांच्या योगानें आमचा देश कसा विभागला जात आहे, कसा भाजून निघत आहे, कसा करपून जात आहे, याचेंही ज्ञान राष्ट्रीय शाळेंतील मुलांनां मिळाले पाहिजे. जातिभेद मोडण्याची आवश्यकता किती आहे, हें आमच्या विद्यार्थ्यांस समजलें पाहिजे. जातीजातींचें तंटे न होऊं देण्याची खबरदारी घेणें हें आपलें सर्वांचें आद्य कर्तव्य आहे. ही गोष्ट राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यांत आली पाहिजे. प्रस्तुत परिस्थिति लक्षांत घेऊन राष्ट्रीय विद्यालयांत सर्व धर्मांच्या विद्यार्थ्यांच्या धर्मशिक्षणाचीही सोय झाली पाहिजे. बनारस येथील ' सेंट्रल हिंदु कालेजां 'त अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. ती किंवा तशाच प्रकारची योग्य पद्धत धर्मशिक्षणाच्या बाबतींत योजणें जरूर आहे. बाकी इतर शिक्षणासंबंधानें कोणाचाही वाद नाहीं. त्रैराशिक कोठेंही एकाच रीतीनें शिकविलें जाईल. कलकत्त्याच्या राष्ट्रीय शाळेंत दोन आणि दोन यांची बेरीज चार होते असेंच शिकविण्यांत येतें व सरकारी शाळेंतही तसेंच शिकविलें जातें. परंतु औषध एक असलें तरी अनुपानें भिन्न असतात. सरकारी शाळेंतील अनुपान आम्हांस अहितकारक आहे. म्हणून हितकारक अनुपानाच्या राष्ट्रीय शाळा आम्हाला पाहिजेत. किल्यांतील अक्षरें तीच असतात, परंतु वळणांमध्यें निरनिराळे प्रकार असतात. सरकारी शाळां-तील शिक्षण गुलामगिरीच्या वळणावर मिळत असतें. राष्ट्रीय शाळांतून त्या वळणांस फांटा मिळाला पाहिजे व विद्यार्थ्यांस स्वाभिमानाचें व तेजस्वीपणाचें

बाळसेदार वळण प्रथमपासून घालून देण्यांत आलें पाहिजे. आमच्या विद्यार्थ्यांनां शिस्त नको असें राष्ट्रीय पक्षाचें म्हणणें नाहीं. पण शिस्तींतही तऱ्हा आहेत. तुरुंगांतील कैद्यांनाही फार उत्तम शिस्त लाविलेली असते. तसली शिस्त आमच्या विद्यार्थ्यांस नको आहे. 'राष्ट्रीय शाळेंतील विद्यार्थ्यांस उडाणटप्पूपणा करण्यास उत्तेजन मिळतें व राष्ट्रीय पक्ष पाश्चात्य शास्त्रें शिकविण्यास तयार नाहीं' असे मिथ्या आरोप कोणी कोणी पक्षाग्रतेनें करितात. परंतु राष्ट्रीय पक्षाचा शिक्षणाचा सर्व झरा राष्ट्राच्या ताब्यांत हवा आहे. तरुण पिढीनें विद्वान्, बुद्धिमान, निश्चयी, व शरीरसामर्थ्यानें युक्त व्हावें इतकीच आमची इच्छा नाहीं, तर आमच्या तरुणांनीं पाश्चात्य शास्त्रांत पारंगत व्हावें, अशीही आमची प्रबल इच्छा आहे. हीं पाश्चात्य शास्त्रें आमच्या विद्यार्थ्यांस शिकण्याचे कामीं ज्या दिवशीं हरकत होईल, त्या दिवशीं हिंदुस्थानाचा भाग्योदयच सरला असें मी समजेन.

विद्यार्थी आपला अभ्यास सोडून सभेला येतात, आणि ते जे सभेला येतात ते आपल्या आईबापांची आज्ञा मोडून येतात, असें कोणी कोणी म्हणतात. पालकांच्या प्रत्यक्ष आज्ञेचें उल्लंघन करून कोणी विद्यार्थी सभेला जात असतील, तर त्यांचा बंदोबस्त करण्याचें काम पालकांचें आहे. पण विद्यार्थ्यांनीं सभेला येणें हें गैर नाहीं, इतकेंच नव्हे, तर अवश्य आहे, असें मला वाटतें. विद्यार्थ्यांनां सभांतून जें शिक्षण मिळतें, तें शाळांतून देण्याची सरकारची इच्छा नाहीं. तें शिक्षण सरकारी शाळांतून हल्लीं मिळत नाहीं, म्हणून विद्यार्थ्यांनीं सभांस यावें असें मी म्हणतों. आम्ही सभेमध्यें जीं तत्त्वें व सिद्धांत प्रतिपादन करीत असतों त्यांचाच समावेश जर राष्ट्रीय शाळांतील धड्यांमध्यें होईल, व राष्ट्रीय शाळांमध्यें जर सर्व ठिकाणच्या विद्यार्थ्यांचा समावेश होईल, तर मग विद्यार्थ्यांनीं सभेस येण्याची कांहीं जरूरी नाहीं. किंबहुना मग त्यांनीं सभेला येऊं नये असेंही मी म्हणेन. सर्व जातींनीं एक होऊन सार्वजनिक कामें एकजुटीनें करावींत असा बोध सभांमधून होत असतो. राष्ट्रीय शाळांमध्यें झालें तरी जातीजातींनीं एक होण्याची आवश्यकता, इत्यादि गोष्टी विद्यार्थ्यांस शिकविल्या पाहिजेत. राष्ट्रीय शाळा महाराष्ट्रांत अद्याप एकही चांगली चाललेली नाहीं. प्रो. विजापूरकर यांच्या खटपटीनें 'समर्थ विद्यालय' स्थापन झालें; पण त्यासही लोकांची जशी मदत मिळावयास पाहिजे होती तशी अजूनही मिळालेली

नाहीं. समर्थ विद्यालय हें कांहीं फक्त ब्राह्मणांसाठींच नाहीं. ब्राह्मण, मराठे, लिंगायत, जैन इत्यादि सर्व जातींसाठीं समर्थ विद्यालय आहे. या विद्यालयांत धर्म, राजकारण, व्यवहार, आदिकरून सर्व आवश्यक विषयांचें शिक्षण देण्याची हळूहळू तजवीज होत आहे. या विद्यालयाचे सर्व बेत तडीस जाण्यास लोकांच्या मदतीची मात्र तूर्त फार अपेक्षा आहे.

## राष्ट्रीय शाळा व राष्ट्रीय कॉलेज

मोर्ले साहेब असें म्हणतांत कीं, शिक्षण ही दारू आहे. दारू विकण्याला लायसेन्स घ्यावें लागतें. त्याप्रमाणें शिक्षण देण्यालाही लायसेन्स घेतलें पाहिजे. अशा कायदा करण्यास मोर्ले साहेब कमी करणार नाहींत ! पण तसें होईपर्यंत महाराष्ट्रांत आपण शक्य तितक्या राष्ट्रीय शाळा व एक तरी राष्ट्रीय कॉलेज स्थापन करण्याची हल्लीं वेळ आलेली आहे. जातीय तंटें उद्भवणार नाहींत अशी 'सेंट्रल हिंदु कॉलेजा' प्रमाणें कांहीं व्यवस्थाही आपणास करावी लागेल. ही संधि पुनः येणार नाहीं. कदाचित् जर आमचें विद्यालय बळकट पायावर उभें राहणार नाहीं, तर सरकारची पद्धत बळकट होईल, मग आमचें डोकें वर करण्यास आम्हांस फार जड जाईल. फर्ग्युसन कॉलेज व रत्नागिरी, ठाणें इत्यादि ठिकाणच्या खासगी शाळा, या हल्लीं मोठ्या कष्टानें चालविल्या जात आहेत. या सर्व संस्था एक होतील, त्या सर्वांचा मिळून एक प्रकारचा 'बोर्ड ऑफ एज्युकेशन' स्थापन होईल, त्या बोर्डाच्या मार्फत सर्व व्यवस्था व नियम होतील, तर राष्ट्रीय शिक्षणाचें काम सुलभ होईल. परंतु ज्या संस्थांजवळ महत्प्रयासानें थोडाबहुत पैसा जमला आहे, त्या या गोष्टीस कबूल होणार नाहींत हें खरें. तरी पण हळू हळू आपण हा उद्योग चालू ठेविला म्हणजे त्या संस्थाही आपल्या संस्थेस येऊन मिळतील.

कलकत्यास एक हायस्कूल व एक मोठें कॉलेजही आहे. एक मेडिकल कॉलेजदेखील तेथें सुरू झालेलें आहे. या शिक्षणसंस्थांतून केवळ बी. ए., एम्. ए. च तयार करावयाचे नाहींत. ज्याच्या त्याच्या इच्छेप्रमाणें व आवडीप्रमाणें शिक्षण देण्याची त्या संस्थांत सोय आहे. मुंबईंतील लोकांना या गोष्टीची आवश्यकता वाटत नाहीं. 'सरकारी शाळांतून व कॉलेजांतूनच मेथा व रानडे यांसारखे

विद्वान् व कर्तबगारीचे लोक निर्माण झाले कीं नाहीं ?' असा मुंबईकरांचा आम्हांस प्रश्न असतो. सरकारी शिक्षणानें मेथा व रानडे हे एकेकच तयार झाले. त्यांच्यासारखे लोक सतत व जास्त निपजत राहिले पाहिजेत, म्हणून राष्ट्रीय शाळा पाहिजेत, असें माझें उत्तर आहे. तालीमखान्याचा उपयोग न करतां बलवान् झालेले लोक केव्हां केव्हां आढळतील, पण तालीमखान्यांत मल्ल तयार करण्याची सोय असली तरच अधिक मल्ल दृष्टीस पडतील. मेथा, रानडे यांसारखे लोक जास्त जास्त निर्माण व्हावेत, अशी सरकारची इच्छा नाहीं, व इच्छा असणें शक्यही नाहीं. असें असणें ही मनुष्यस्वभावाच्या विरुद्ध गोष्ट आहे. आम्ही जर त्यांच्या जागीं असतों तर आम्ही देखील तसेंच केलें असतें. आम्हांला कर्तृत्वशून्य बनविण्यांत सरकारचा फायदा आहे. हा फायदा ते सहसा गमावून घेणार नाहींत. ते सध्यां स्वहिताच्या बाजूस वळलेले आहेत. ती बाजू सोडून आमच्या हिताच्या बाजूस वळण्याला सरकारला आम्ही भागच पाडलें पाहिजे. तरच ते वळतील.

## परिस्थितीचें यथार्थ ज्ञान

राष्ट्रीय शिक्षणानें सरकारी शिक्षणाचें धोरण आम्ही हाणून पाडलें, तरच आमचा तरणोपाय आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न येवढ्या महत्वाचा असून प्रांतिक सभेपुढें गेल्या सालीं तो आला नाहीं. यंदाच्या राष्ट्रीय सभेपुढें देखील ह्या प्रश्नास बराच विरोध येण्याचा संभव आहे. परंतु हा प्रश्न आतां उपस्थित झाला आहे, त्या अर्थीं त्याचा सर्व पुढाऱ्यांनीं विचार करणें जरूर आहे. 'समर्थ विद्यालय' आज गरीब स्थितींत आहे. तथापि मनावर घेऊन त्या संस्थेस हस्तें परहस्तें सर्वांनीं मदत केली असतां, ती भरभराटीस आल्यावांचून राहणार नाहीं. आम्ही ज्या वेळीं पुण्यांत फर्ग्युसन कॉलेज सुरू केलें, तेव्हां त्या संस्थेजवळही कांहीं पैसा नव्हता. पण हल्लीं त्याच संस्थेजवळ तीन चार लाख रुपये जमले आहेत. झटून खटपट केली असतां राष्ट्रीय शिक्षणाच्या संस्थांनाही यश आल्यावांचून राहणार नाहीं. या संस्था बंद करावयास शिकविण्यासाठीं नाहींत. आमचे तरुण स्वराज्याच्या हक्कासाठीं भांडण्यास व स्वराज्य संपादन करण्यास तयार होतील, असें शिक्षण आम्हांस द्यावयाचें आहे.

आपल्या मुलांबाळांसाठीं पैसा ठेवण्यापेक्षां त्यांना विद्येची जोड देण्याची व्यवस्था करून ठेवणें ही गोष्ट अधिक श्रेयस्कर आहे. 'बुद्धिर्यस्य बलं तस्य' Knowledge is power अशी म्हण आहे. डेक्कन कॉलेजांत फॉरेस्ट म्हणून एक प्रोफेसर होते. ते असें म्हणत कीं, हिंदुस्थानांतील सर्व लोकांस आपल्या पारतंत्र्याचें ज्ञान होऊन स्वातंत्र्य उपभोगण्याची ज्या दिवशीं इच्छा होईल, त्या दिवशीं त्यांनीं आम्हांवर एक एक ढेकूळ जरी फेंकलें तरी तेवढ्यानें-च आम्ही हिंदुस्थानांत होतों कीं नव्हतों असें होऊन जाऊं. सारांश, परिस्थि-तीचें यथार्थ ज्ञान राष्ट्रास करून देणें यासारखी महत्वाची दुसरी कोणतीहि गोष्ट नाहीं. हें महत्कार्य करण्याकडे आम्ही आजवर पाठ वळविली होती. पण यापुढें त्याकडे आम्ही आपलें तोंड वळविलें तरी पुरें होणार आहे. केवळ अक्षरज्ञानासाठीं कित्येक जाती आपापल्या जातीपुरत्याच शाळा काढूं लागल्या आहेत. पण राष्ट्रीय शिक्षणाच्या दृष्टीनें जातीजातींच्या शाळा योग्य नव्हेत. सर्व जातींनीं एकाच शाळेंत बसून राष्ट्रोद्धारशिक्षण घेणें अत्यंत इष्ट व आवश्यक आहे. तरी या गोष्टीकडे लक्ष देण्याची सर्वत्रांस बुद्धि होवो, अशी प्रार्थना करून मी माझें भाषण पुरें करतों.

# मजूर व स्वदेशी चळवळ

ता. १५ डिसेंबर १९०७ रोजीं, सायंकाळीं, मुंबईच्या स्वदेशी वस्तुप्रचारिणी सभेमार्फत, चिंचपोकळी येथील जैन धर्मस्थानकामध्यें, 'स्वदेशी' संबंधानें जाहीर सभा भरली होती. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणाले:—

आतांपर्यंतच्या वक्त्यांनीं तुम्हांस स्वदेशीचें महत्त्व समजावून सांगितलेंच आहे. मला असें सांगण्यांत आलें आहे कीं आज येथें जमलेल्या या जनसमूहामध्यें गिरण्यांतून काम करणाऱ्या लोकांचा भरणा विशेष आहे. आनंदाची गोष्ट आहे. या मुंबई शहरांत गिरण्यांतून काम करणाऱ्या लोकांची संख्या दोन लाख आहे. हे बहुतेक लोक कोंकणांतून आलेले असतात. घाटावरीलहि कांहीं असतात; पण फार थोडे. कोंकणांतून आलेल्यांचीच संख्या जास्त. हे लोक पोटें भरण्याकरितां येथें येतात. त्यांना माझा पहिला प्रश्न असा आहे कीं, पांचपन्नास वर्षांपूर्वी जेव्हां येथें गिरण्या वगैरे कांहीं नव्हतें, तेव्हां तुमचे बापआजे येथें येत होते काय? जर येत नव्हते, तर ते आपलीं पोटें कशीं भरीत होते! आणि आतांच तुम्हाला आपला देश सोडून येथें कां यावें लागत आहे! त्यांचे वेळीं तुमच्या देशांत शेती वगैरे पुष्कळ होती, आतां ती नाहीं म्हणून देश सोडावा लागतो असें कांहीं नाहीं. तेव्हां होती तितकी शेती आतांहि आहे; थोडी जास्त आहे. मग आतांच तुमचा त्या शेतीवर निर्वाह कां चालत नाहीं! हा प्रश्न आहे. तुमच्या सर्वांच्या पोटाला तुमच्या देशांतील धान्य हल्लीं पुरत नाहीं. वास्तविक धान्य अपुरें नाहीं पण शेतीशिवाय इतर धंदे नाहींत म्हणून धान्य अपुरें आहे. इतरहि कारणें आहेत. तुम्हांला तुमच्या देशांत धंदे कां नाहींत? तुमच्या बापआजांना होते; तुम्हाला कां नाहींत! तुमचें धंदे कशानें गेले! कोणी घालविले! याचा तुम्ही विचार करावा. असले विचार तुमच्या डोक्यांत येत नाहींत; ते आणावेत म्हणून आजच्या सभेचा प्रयत्न आहे. तुम्ही आपली भीक सुटावी, खायला मिळावें म्हणून येथें येतां. परंतु नाना प्रकारची व्यसनें—दुर्व्यसनें तुम्हांला लाग-

त्यामुळें व मुंबईचा पैसा यशस्वी नसल्यामुळे तो मुंबईंतच ठेवून तुह्मी पुन्हा पूर्ववत् कोरडेच घरीं जातां! तुमच्यापैकीं बहुतेकांना दारूचें व्यसन लागलेलें असतें. त्या व्यसनाचे पायीं तुम्ही आपल्या संपत्तीचा—शरीरप्रकृतीचा—नाश करितां. कोंकणांत असतांना गुळाचा खडा आणि गारसें पेलाभर पाणी यांनीं तुमचा श्रमपरिहार होत असे. आतां होत नाहीं. आतां 'कप' भर चहा किंवा दारूचा एखादा ग्लास लागतो! असें कां? या पदार्थांनीं श्रमपरिहार होतो असें तुम्हांला कोणीं सांगितले? आधींच दारिद्रय, तशांत असलीं दुष्ट व्यसनें, अंगीं जडल्यामुळे तुमचा पैसा तुमच्या पुरवठ्याला येत नाहीं. पूर्वींची उपासमार व भीक कायमच रहाते. असले विचार तुम्हांला कोणी सांगत नाहींत.

## गिरणीवाल्या शेटजींचें कर्तव्य

हें तुमच्या गिरणीवाल्या शेटचें वस्तुतः काम आहे. परंतु प्लेग होऊं नये ह्मणून प्लेगाची लस टोंचण्याचा—इनॉक्युलेशनचा—उपदेश करण्यापलीकडे तुमचे शेट कांहीं करीत नाहींत! ह्या उपदेश करण्यांत तरी प्लेगच्या दिवसांत भयानें तुह्मी कामधंदे सोडून जाऊं नये, व गिरण्या बंद पडून आपलें नुकसान होऊं नये, हाच हेतू असतो. म्हणून तुमचे शेट तुम्हाला इनॉक्युलेशनचा म्हणजे लस टोंचून घेण्याचा उपदेश करितात! परंतु वस्तुतः ज्या दुष्ट व्यसनामुळें प्रकृति रोगट बनून प्लेगला बळी पडण्याला तुह्मी पात्र होतां, तीं व्यसनें सोडून द्या म्हणजे दारू वगैरे पिऊं नका, असा उपदेश करण्याला एखादा तरी गिरणीवाला शेट तुमचेकडे कधीं आला आहे काय! तुम्हांला प्लेग व्हावयाचा असेल तर तो लस टोंचून घेतल्यानें थांबणार नाहीं. दारु वगैरे प्रकृतीला हानिकारक व्यसनें टाकून द्या, म्हणजे थांबेल, असें मी तुम्हांला सांगतों. शरीर जर सर्व रोगाचें माहेरघर झालें आहे तर दंडावर लस टोंचून प्लेग हटेल असें म्हणणें चूक आहे. मला तसें वाटत नाहीं. आम्हीं असें तुम्हांला सांगतों म्हणून "भटांनीं हें कांहीं तरी स्वदेशीचें ढोंग काढलें आहे, आपल्याला त्याची कांहीं जरूरी नाहीं" असें सांगून तुमच्यामध्यें जातिद्वेषाचें खूळ माजविण्यांत येते. असा हितोपदेश तम्हांला करण्यांत येतो! येथील कांहीं गिरण्यांतून असा उपदेश करण्यांतहि आला आहे, असें माझ्या ऐकण्यांत आहे. परंतु तो उपदेश खोटा आहे.

## पोटापाण्याचा प्रश्न

स्वदेशी कांहीं केवळ भटांचा अथवा तुमचीच बाब नाहीं. हिंदु-मुसलमानांचाही तो प्रश्न नाहीं. या देशांत जन्मास येऊन परंपरेनें ज्यांचीं हितानहितें हिंदुस्थानच्या सुखदुःखावर अवलंबून रहात आलीं आहेत, त्या कोणाचाही **स्वदेशी हा पोटापाण्याचा प्रश्न आहे.** स्वदेशीपासून तादृश फायदा तुमचा आहे; भटांचा नाहीं. गिरण्यांतून कामें करायला भट नाहींत; असले तरी फार थोडे आहेत. फायदा तुमचाच आहे. हा माझ्या अंगांत जो अंगरखा आहे तो जर मी तुम्ही तयार केलेल्या कापडाचा केला, तर कापड विणण्याची मजुरी, सुताची मजुरी व इतरही कित्येक फायदे तुम्हांला मिळतील. आणि जर मी हें कापड विलायतेंतील मँचेस्टर येथें गोऱ्या कारखानदारांनीं, गोऱ्या मजुरांनीं तयार केलेलें घेतलें तर मागें सांगितलेला सर्व फायदा गोऱ्यांच्या घशांत जाईल. मी तुमच्या गिरण्यांतील कापड घेतों म्हणून त्याची मजुरी तुम्हांला मिळते. म्हणजे स्वदेशीपासून प्रत्यक्ष फायदा तुमचा आहे. भटांचा नाही. भटांचें काम तुम्हांला उपदेश करण्याचें—चांगला मार्ग दाखविण्याचें—आहे. तुम्ही दोन लाख आहां, हें पूर्वी सांगितलेंच आहे. चांगल्या मार्गाला लागण्याचा तुम्ही निश्चय कराल तर काय पाहिजे तें होईल. सरकारजवळ दोन लाख सैन्यही नाहीं. इतक्या दोन लाखांनीं—तुम्ही—आपली स्थिति काय आहे, कशी आहे, हें समजावून घ्यावें; समजल्यावर ती दुसऱ्यास समजवावी असा आमचा हेतु आहे. उपदेश आम्हींच म्हणजे भटांनींच केला पाहिजे असें नाहीं. तुम्हींही करावा. परंतु भटांमध्यें जाणत्या लोकांचा भरणा बराच असल्यामुळें ते तुम्हांला उपदेश करितात. तुम्ही जाणते व्हा. उपदेश करा. किंबहुना तुम्ही जाणते व्हावे म्हणूनच आम्हीं प्रयत्न करतों. तुम्ही जाणते झाल्यावर या गोष्टी तुम्हांस आपोआप समजतील, आम्ही सांगण्याची जरूरी राहणार नाहीं. सध्यां जें आम्ही तुम्हांला सांगतों, तें तुमच्या कल्याणाचें सांगतों, परंतु तुमचा गैरसमज करण्याचा कित्येक प्रयत्न करितात ! सरकार असा प्रयत्न करितें यांत नवल नाहीं. तें त्याचें काम आहे. परंतु आपलेच लोक वरीलप्रमाणें प्रयत्न करितात याला काय म्हणावें ! हा आत्मद्रोह आहे ! हा देशद्रोह आहे ! हा मातेशीं बेइमानपणा आहे !!! वस्तुस्थितीच्या यथार्थ ज्ञानापासून तुम्हांला पराङ्मुख करणारे लोक हे तुमचे हितशत्रु आहेत, हें विसरूं नका ! त्यांच्या वाऱ्यासही उभे राहूं नका.

सरकारच्या कृपेंतच ज्यांचा स्वार्थ गुंतला आहे अशा लोकांचा तो उपदेश आहे, हें लक्षांत ठेवा. निदान सरकारकृपा संपादन करण्याच्या महत्त्वाकांक्षेचे लोक तुम्हाला तसें सांगत असतील. स्वदेशीपासून तुमचें नुकसान आहे असें जर तुम्हांस कोणी सांगितलें, तर ज्या स्वदेशीमुळें आम्हांला पोटाला अन्न मिळतें, त्या स्वदेशीपासून आमचें नुकसान कसें ? असा त्यांना उलट प्रश्न करायला शिका.

## स्वदेशींतच कल्याण

मला असें माहीत आहे कीं, मुंबईच्या पहिल्या प्लेगच्या वेळीं जीव बचावण्याकरितां म्हणून तुम्ही मजूर लोक आपापल्या गांवीं गेला. परंतु तिकडे उपासमारीनें मरण्याची पाळी आली तेव्हां मुंबईस खाऊनपिऊन तरी मरूं, असा मनाचा धडा करून परत मुंबईस आला. याचा अर्थ असा कीं, तुमच्या देशांत तुम्हांला आपल्या उदरनिर्वाहाचें साधन नाहीं. म्हणून आपलीं घरेंदारें सोडून तुम्ही येथें येतां—येथें उद्योगधंदे आहेत म्हणून येतां. स्वदेशीचा हेतु तरी हाच आहे कीं, तुम्हांला उद्योगधंदे मिळावेत, जे आहेत ते भरभराटीला येऊन तुमचें अधिक कल्याण व्हावें. स्वदेशी, स्वदेशी कांहीं बाजारांत मिळणारी एखादी दृश्य वस्तु नाहीं. तुमचें हृदय, तुमचें मन, तुमचें अंतःकरण स्वदेशी आहे. ओळखलें मात्र पाहिजे ! हा केवळ तुमचाच प्रश्न आहे असें नाहीं. माझाही आहे. मी तरी तुमच्याच खिशांतून थोडें थोडें घेऊन आपला संसार चालविणारा मनुष्य आहे. **स्वदेशीचें तत्त्व तुम्हांला मान्य झालें पाहिजे. कारण, तसें न होईल तर तुम्हांला आपला प्राण प्रिय नाहीं असें म्हणावें लागेल !** तुम्ही स्वदेशीचा अंगिकार कराल तरच आम्हांला तुमचेविषयीं दया येईल. एरवीं कां यावी ? कलकत्त्याकडे विलायती मालाची व व्यापाऱ्यांची काय अवस्था झाली आहे, हें तुम्हांला ठाऊक नाहीं. गिऱ्हाईक नसल्यामुळें विलायती मालाचे गठ्ठे वखारींत पडून राहिले—इतके पडून राहिले कीं, त्यांची अडचण होऊं लागली तेव्हां ते मुंबईस—येथें—पाठवावे लागले ! येथेंही त्यांस ‘ गोडाऊन ’ मध्येंच पडून राहण्याची वेळ आली, तेव्हां आतां ते गठ्ठे परत ‘ स्वदेशी ’ म्हणजे विलायतेंत रवाना होणार आहेत ! तुमचे देशबांधव अलीकडे दोनतीन वर्षें तुम्हां मजूर लोकांच्या पोटापाण्याची व्यवस्था पाहूं लागल्यामुळें असा प्रसंग

दा. म. ५७०६

आला आहे, हें विसरूं नका. तुमचा बहुतेकांचा मूळचा राहण्याचा प्रांत कोंकण. तेथें किंवा इतर कोठेंही एखादे वर्षी पावसानें दगा दिला तर डोळे पांढरे होण्याची वेळ येते ! ती कां यावी ? तुमचा देश सर्व संपत्तीनीं संपन्न असतां तुम्हांवर असा प्रसंग कां येतो ? तुमच्या देशांत पिकणारें धान्य तुमच्या उपयोगाला न लागतां कोठें जातें ? कां जातें ? कोण जाऊं देतो ? याची माहिती तुमच्या जाणत्या, सुशिक्षित देशबंधूंपासून तुम्ही मिळविली पाहिजे.

## सुशिक्षित देशबंधूंचें कर्तव्य

मुंबईच्या या भागांत स्वदेशीनिमित्त भरलेली ही पहिलीच सभा आहे, असें ऐकून मला फार आश्चर्य वाटलें ! तुमच्या अज्ञानाबद्दल एकटे तुम्हीच जबाबदार नाहीं. तुमच्या सुशिक्षित देशबंधूंची तुम्हांस ज्ञानदानाचे कामीं भरपूर मदत मिळत नाहीं, हेंही तुमच्या अज्ञानाचें मूळ आहे. आजची सभा या भागांतील शेवटची होणार नाहीं अशी आशा आहे. विलायती मालाची बंगाल्याकडे काय दुर्दशा झाली आहे ती सांगितलीच आहे. अजून सर्व लोक स्वदेशी बनले नाहींत, तरी अशीं आशाजनक चिन्हें दिसूं लागलीं आहेत. सर्व लोक स्वदेशीचे अनुयायी बनतील तेव्हांच आपल्या उन्नतीला खरी सुरुवात झाली असें होईल. आज तुम्ही दोन लाख लोक मुंबईत गिरणीच्या धंद्यावर अवलंबून आहां. गरज वाढेल तर आणखी दोन लाखांची येथें सोय होण्याजोगी नाहीं काय ? गरज वाटूं लागली, तुमच्या गिरणीवाल्या शेटला हल्लींहून अधिक किफायत होऊं लागली, म्हणजे सहजच तो दुसरी गिरणी उभारील आणि तुमच्या पोटापाण्याची व्यवस्था होईल. नफ्यापैकीं कांहीं भाग तुमचा शेट मोटारींत घालील हें खरें आहे. परंतु लाखों रुपयांचा नफा कांहीं मोटारींत मुरत नाहीं. मला तुमची काळजी वाटते. कारण, मी तुमचा आहे; अथवा तुम्ही माझे आहां ! तुमचें माझें असें नातें असल्यामुळें मला तुमची काळजी वाटते ! एखाद्या गोऱ्याला तशी वाटणार नाहीं. कारण, तो तुमचा नाहीं किंवा तुम्ही त्याचे नाहीं ! तुमचे वाडवडील येथेंच जन्मास येऊन आपली इहलोकची यात्रा संपवून गेले तुम्ही येथेंच जन्मास आला व येथेंच वावरतां; आणि तुमच्या पोरांबाळांनींही येथेंच दिवस काढावयाचे आहेत. काळ कठीण येत चालला आहे. आजचा दिवस उद्यांला रहात

नाहीं ! वेळींच सावध होऊन भावी अरिष्टांशीं लढण्याचें सामर्थ्य आपण आपल्यांत व आपल्या मुलाबाळांत आणलें पाहिजे. संपत्तीच्या अभावीं दुष्काळांसारख्या खडतर दिवसांत आपल्याच्यानें मुळींच टिकाव धरवत नाहीं. अशी स्थिति तुम्ही आणखी किती दिवस सहन करणार ? असा माझा तुम्हांला प्रश्न आहे. या प्रश्नाच्या उत्तरावर तुमच्या पुढील कालाचा बरेवाईटपणा अवलंबून आहे. तुम्ही शहाणपणानें आपली स्थिति सुधारण्याच्या उद्योगास लागला नाहीं, आपल्या जाणत्या पुढाऱ्यांच्या उपदेशाप्रमाणें वागून ते दाखवितील त्या हितकर मार्गानें गेलां नाहींत, तर संकटकाळीं एक मरून तरी जाल, किंवा अली महमद भिमजी म्हणतात, तुम्हांला पाद्रीसाहेब धरून तरी नेतील !

## सरकारचा दयाळूपणा !

तुमचें सरकार दयाळू आहे, याबद्दल वाद नाहीं. फारच दयाळू आहे ! त्यानें तुम्हांस बसण्याकरितां आगगाड्या केल्या आहेत, मोटारी केल्या आहेत, फार काय विजेच्या ट्राम्‌वेही केल्या आहेत ! तुम्हीं आपल्या गांवीं गेल्यावर आप्तांना, आपल्या इष्टमित्रांना, मुंबईच्या या वैभवाच्या गोष्टी खात्रीनें सांगत असाल ! परंतु यांपैकीं एकही बाब तुम्हांला पोटाला अन्न देत नाहीं. विजेच्या ट्राम्‌वेंत बसल्यानें भूक भागत नाहीं ! आपणां सर्वांपुढें सध्यां पोटाचा प्रश्न आहे ! आपल्याला विजेच्या गाड्याही पाहिजे आहेत; नकोत असें नाहीं ! परंतु त्या आपणच केलेल्या पाहिजेत; तर उपयोग ! तुम्ही उपाशी मरावें, अशी सरकारची इच्छा नाहीं; फक्त स्वदेशीच्या फंदांत तुम्ही पडूं नयें असें सरकार म्हणतें ! कांहीं न खातां पोटभर खावें असें म्हणण्यापैकींच हें आहे ! सरकार स्वदेशीला फारसें अनुकूल नाहीं. आपण स्वदेशीचे मोठे भोक्ते आहों असा तें वरकांति बहाणा करितें; परंतु प्रत्यक्ष कृति अगदीं विपरीत असते. नवलाची गोष्ट नाहीं. तें त्यांचें कामच आहे. मला तुम्ही पोटभर खावें असें वाटतें, तसें सरकारलाही आपल्या गोऱ्या मजुरांच्या चैनींत अंतर पडूं नये असें वाटणें स्वाभाविक आहे. हा त्यांचा धर्मच आहे. इंग्रज कांहीं तुम्हांला मोक्ष देण्याकरितां येथें राज्य करीत नाहींत. ते करतात तेंही बरोबर आहे; व तुम्ही करितां तेंही बरोबर आहे. चुकत नाहीं कोणाचेच ! अंतर एवढेंच कीं, त्यांनीं जे करावयाला

पाहिजे आहे तें ते बिनचूक करितात. तुम्ही मात्र करायला पाहिजे ते करीत नाहीं. मी सरकारच्याच तोंडानें सांगतों कीं, आपल्या या हिंदुस्थानांत प्रतिवर्षी सात कोटी लोक अन्नाविणें तडफडतात ! नक्की आंकडा मला अल्ली महमदांनीं सांगितला तो नीट लक्षांत ठेवा. आतांपर्यंत समजावून सांगितलेल्या स्वदेशीच्या मार्गानें आपण गेलो तर या अन्नावेगळ्या लोकांची सोय आपोआपच लागेल !

## स्वदेशाचें रक्त पिऊं नका

हे मणिलाल त्रिवेदी, यांनीं तुमचेपुढें साखरेचे जे नमुने मांडले आहेत ते स्वदेशी असून पवित्र म्हणजे हिंदुत्वाला बट्टा न आणणारे असे आहेत. परदेशी साखरेंत धर्मबाह्य असें काय काय असतें हें माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनीं सांगितलेंच आहे. परंतु या बाबतीचा मी थोडा निराळ्या दृष्टीनें विचार करितों. **परदेशी साखरेस जनावरांच्या हाडारक्ताचा विटाळ झालेला असतो, हें तर खरेंच, पण याहूनही भयंकर अशा स्वदेशाच्या रक्ताचें तींत मिश्रण असतें !** पूर्वी आपल्याकडे साखर तयार होत असे. कोल्हापुराकडे साखरेचे कारखाने होते. खाली म्हैसूरकडेही ती तयार करीत असत; व अजूनही करितात. परंतु आपल्या जावा बेटांतील वगैरे गोऱ्या जातवाल्यांची भरभराट होण्याकरितां तुमच्या दयाळू सरकारने साखरेच्या रूपानें दरसाल सात कोटींची लूट करण्याचा मार्ग त्यांना मोकळा करून दिला ! उद्यां तुम्हांला कोणी परदेशी साखरेंत रक्तहाडादि धर्मबाह्य वस्तु नसतात असे सिद्ध करून दाखविल, परंतु तुमच्या स्वदेशाचें तिच्यांत रक्त नसतें असें कोणाला केव्हांही सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं. ज्या ज्या ठिकाणचे कारखाने सरकारनें बुडविल्यामुळे त्या कारखानदारांचे, व त्यांचे पोटीं असलेल्या गोरगरिबांचे शिव्याशाप या परदेशी साखरेवर आहेत ! माझ्या देशबांधवांनो ! असली ही साखर तुमच्या अंगीं कशी लागेल ? आणि असली साखर खाणाऱ्या तुम्हा लोकांचे चेहेरे निस्तेज व फिक्कट दिसले तर त्यांत आश्चर्य ते काय ? साखरेंत धर्माची बाब आहे. परंतु या विचारसरणीनें प्रत्येक परदेशी वस्तू त्याज्यच नव्हे तर अस्पर्श्यही ठरत नाहीं काय ? यालाच बहिष्कार म्हणतात ! या बहिष्कारा-शिवाय स्वदेशीची पूर्तता होत नाहीं, याकरितां तुम्ही बहिष्काराचा अंगिकार करा असें मी तुम्हांला वारंवार सांगतों. कसल्याही व्यसनास आधीन न राहतां—

व्यसनांत स्वदेशी विदेशी असा भेद नाहीं,— व्यसन कसलेही असले तरी तें त्याज्यच होय. आपलें शरीर निरोगी व मजबूत करा. दुर्व्यसनाचे पायीं उधळत असलेल्या पैशाचा संचय करा. ते पैसे तुम्हाला अडल्या वेळीं तुमच्या उपयोगी पडतील. याप्रमाणें वागाल तर इंग्लंडामध्यें ज्याप्रमाणें मजूर वर्गाला महत्व आहे, राजदरबारीही त्याला मान आहे, त्याप्रमाणें तुम्ही महत्त्व पावाल, व राजदरबारीही तुमचा मान होईल. मी तुम्हांला तुमच्या हिताच्या गोष्टी सागतों म्हणून माझ्यावर सरकारची वक्रदृष्टि आहे. आपल्याच हाडामासाचे परंतु दुर्दैवानें पोटार्थी होऊन सरकारचे गुलाम बनलेले हे पोलीस लोक माझें भाषण टिपून घेऊन त्यांत मनसोक्त फेरफारही करून वरिष्ठांकडे पाठवितात.

माझ्या प्रिय बांधवांनो ! **अशा प्रकारें सरकारच्या रोषाची नागवी तरवार माझ्या शिरावर सदैव लटकलेली असतांना मी तुम्हांला हा उपदेश करीत आहे ! तो तुम्ही वायां जाऊं देऊं नका, असें माझें तुम्हांजवळ मागणें आहे. परमेश्वर कांहीं तुम्हांला विसरला नाहीं. डोळे मिटून दिसणार नाहीं. डोळे उघडा ! तुमचा उद्धार करावयाला तो तयार आहे.**

# राष्ट्रीय सभेची पिछेहाट !

सोमवार, ता. २२ डिसेंबर १९०७ रोजीं सायंकाळीं, सुरत येथें, बालाजीच्या टेकाडावर, उमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळक यांचें इंग्रजींत भाषण झालें, त्याचा मराठी सारांश येणेप्रमाणें:—

सभ्य गृहस्थ हो ! आजच्या भाषणाकरितां मी जो विषय निवडला आहे तो सद्यःस्थिति हा होय. या विषयावर बोलतांना एक गोष्ट आधीं करण्याची माझी इच्छा आहे; ती ही कीं, आमच्या पक्षासंबंधानें किंवा आमच्यासंबंधानें जो गैरसमज झाला आहे किंवा पसरविण्यांत आला आहे, त्याचा निरास करावयाचा. असें म्हणतात कीं, आम्ही राष्ट्रीय सभेंत दुही उत्पन्न करण्याकरितां येथें आलों आहों, राष्ट्रीय सभा मोडून टाकण्याच्या बुद्धीने प्रेरित होऊन आम्ही सर्व कांहीं चालविलें आहे. पण मी आपल्याला एकदम स्पष्टपणें कळवितो कीं हें म्हणणें साफ खोटें आहे. असें करण्याची इच्छा राष्ट्रीय पक्षाची बिलकुल नाहीं. राष्ट्रीय सभेंत बखेडा उत्पन्न करण्याचा किंवा राष्ट्रीय सभेपासून अलग होण्याचा या पक्षाचा उद्देश नाहीं. राष्ट्रीय सभेच्या प्रगतीस मदत करण्याकरितां आम्हीं येथें आलों आहों. वस्तुस्थिति काय आहे हें तुम्हांला कळवावें, व कांहीं तरी पुढें पाऊल टाकावें, म्हणून आम्हीं येथें आलों आहों. राष्ट्रीय सभा मोडण्याचा किंवा तींत बखेडा माजविण्याचा उद्देश—मी ज्या पक्षाचा असल्याबद्दल मला अभिमान वाटतो—त्या राष्ट्रीय पक्षाचा खास खास नाहीं, हे मी आपल्याला प्रतिज्ञापूर्वक जाहीर रीतीनें सांगतों. राष्ट्रीय सभेची पिछेहाट होऊं नये, राष्ट्रीय सभेचें पाऊल मागें ओढण्याचा प्रयत्न दुसरे कोणी करीत असल्यास त्यांस तसें करूं देऊं नये, हें राष्ट्रीय सभेच्या प्रत्येक भक्ताचें पवित्र कर्तव्य आहे. राष्ट्रीय पक्षांतील गृहस्थांचाही हेतु हाच आहे. वर्तमानपत्रांमधून व अन्य रीतीनें आपणांस असें कळविण्यांत आलें आहे कीं, नवीन विचार हा राष्ट्रीय सभेच्या भक्तांचे मार्गांत एक अडथळा मात्र झाला आहे. अशी आपली कल्पना झाली असल्यास तिचा निरास करणें जरूर आहे. राष्ट्रीय सभेकरितां परिश्रम करण्यांत आज तेवीस वर्षें खर्च करण्यांत आलीं आहेत. तिच्याप्रीत्यर्थ आमचे कित्येक लाख रुपये खर्च झाले

आहेत. अशा राष्ट्रीय सभेचा जीव घ्यावयास आम्ही निघालों आहोंत, असें म्हणणें अगदीं खोटेपणाचें आहे.

## न बोलण्याची भीरुता

आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, वीस-बावीस वर्षांपूर्वीची आमची जी राजकीय स्थिति होती, ती आतां तशीच राहिलेली नसून तिच्यांत फार फरक झालेला आहे, म्हणून राष्ट्रीय सभेच्या कार्यक्रमांत कालानुरोधानें अवश्य तो फेरफार केला पाहिजे, असें आम्ही म्हणतों. आपल्याला सांगितलें तर आश्चर्य वाटेल, पण मी सांगतो कीं, सुरतेच्या राष्ट्रीय सभेचीं सूत्रें सध्यां ज्यांच्या हातांत आहेत त्यांची इच्छा पीछेहाट करण्याची आहे. आमच्या इच्छेविरुद्ध राष्ट्रीय सभेंतील कांहीं ठराव पास झालेले आहत असे ते म्हणतात; आणि शक्य झाल्यास हे ठराव गाळून टाकण्याची त्यांची इच्छा आहे. नेमस्त पक्षाची सुरतेस बोलबाला आहे व येथें आपल्या मनांतील इच्छा पुरवून घेतां येतील असें त्यांस वाटत आहे. राष्ट्रीय सभेला लंगडी आणि लुली करून तिला तशीच लंगडी व लुली असलेली इतर प्रांतांत पाठवावी असा ह्यांचा इरादा आहे. आणि हीच गोष्ट होऊं देऊं नये म्हणून आमचा प्रयत्न आहे. या प्रयत्नास तुमची मदत आम्हांला मिळेल अशी आह्मी आशा करतो. त्यांचें ह्मणणें असें कीं—मी एकदम मुद्यावरच येतों—स्वदेशी, बहिष्कार यांवरील राष्ट्रीय सभेचे ठराव वाजवीपेक्षां जास्त पुढें गेलेले आहेत, त्यानें सरकारचा कोप झालेला आहे; आणि शक्य झाल्यास यांपासून राष्ट्रीय सभेनें मुक्त व्हावें. ते म्हणतात कीं, बहिष्काराचें अवलंबन लोकांनीं कृतींत करावें, पण त्यासंबंधानें तोंडानें बोलूं नये. पण हें भेकडपणाचें नाहीं काय ? ही भीरुता नव्हे काय ? जें करावयास आपण तयार आहों तें बोलून दाखविण्यासही आपली तयारी असली पाहिजे. मी म्हणतों, जें करावयाचा तुमचा संकल्प असेल तें तुम्हीं बेलाशक बोलून दाखवा, आणि जें बोलून दाखवावयाची तुमची तयारी नाहीं तें करावयास जाऊं नका. जें करावयाचें आहे तें बोलावयास भिऊं नये व करावयाचें नाहीं त्याविषयीं व्यर्थ बडबड करूं नये. आपण जें करतो तें बोलावें व जे बोलतों तें करावें, या मताचा मी आहे. कांहीं

गृहस्थांचा—नेमस्त म्हणविणाऱ्या पक्षाचा—या गोष्टीवर ( म्हणजे बहिष्कारासंबंधींच्या ठरावावर) फार डोळा आहे. राष्ट्रीय सभेचें काम थबकून राहण्याचें कारण 'अध्यक्षाची निवडणूक' हे झालें आहे. पण मी आपल्याला स्पष्टपणें सांगतो कीं, हा मुख्य प्रश्न नाहीं. अमुक गृहस्थ अध्यक्ष निवडावा हें व्यक्तीकरितां म्हणण्यांत येत नसून विवक्षित राजकीय मताचा तो गृहस्थ निदर्शक प्रतिनिधि असावा म्हणून म्हणण्यांत येत आहे. अध्यक्ष अमुक अमुक मताचा असावा असें आमचें म्हणणें आहे. आम्ही म्हणतो सरकारच्या म्हणण्यास किंवा कोपास भीक न घालतां आपण निर्भयपणे आपल्यास इष्ट ती कृति करीत राहिले पाहिजे, आणि ते म्हणतात कीं, असें आपल्यास करतां येणार नाहीं; कारण, आपल्या चळवळीचा गळा सरकार केव्हांच दाबून टाकील. यांतील पहिल्या मताचा मी आहे. आमच्या क्रिया आम्ही सरकाराकरितां करीत नाहीं. त्या आम्ही आमच्या करितां करितों. **सरकारला खुष करण्याचा आमचा हेतु नाहीं, त्याचप्रमाणें सरकारला नाखूष करण्याचाही आमचा हेतु नाहीं.** आम्ही कर्तव्याच्या मार्गानें जात आहों, आणि त्यानें जर सरकारला राग येत असेल, तर त्याला आमचा इलाज नाहीं.

## निदान मागें जाऊं नका

राष्ट्रीय सभेचें काम पूर्वीच्या रीतीनें चालवीत आल्यानें कांहीं एक फायदा झाला नाहीं हें सिद्ध झालेलें आहे. त्यानें हित तर होत नाहींच, पण राष्ट्र भिक्षेकरी बनून राष्ट्राची नैतिक अवनति मात्र होत आहे. वंगभंगाचे योगाने नवी चळवळ निघाली आहे. तत्प्रीत्यर्थ कित्येक तरुणांनीं हाल सोसले आहेत. त्यांच्यांशीं विश्वासघाताचें वर्तन करून त्यांना अंगाबाहेर टाकण्यास व आपली नवी चळवळ सरकारकडून चिरडून घेण्यास तुम्ही तयार आहां काय ? स्टेट सेक्रेटरी मि. मोर्ले, व्हाइसरॉय व इतर सरकारी अधिकारी यांनीं ही चळवळ नाहींशी करण्याचा निश्चय केला आहे; ते नेमस्तांना आपल्या भोंवतीं गोळा करणार आहेत. असें त्यांनीं अगदीं उघडपणें धडधडीत सांगितले आहे. त्यांना आमची चळवळ हाणून पाडावयाची आहे. आमच्या चळवळीकडे त्यांचें बारीक लक्ष आहे, आणि आमच्यांत दुही माजावी असेंच ते इच्छितात. नेमस्त म्हणविणारे अप्रा-

माणिकपणानें आपलीं मतें पुढें करितात असें मी म्हणत नाहीं; पण ते बोलतात तें प्रामाणिकपणानें बोलतात असेंही गृहीत धरलें, तरी तें गैरमुत्सद्दीपणाचे किंवा वेडेपणाचे आहे यांत संशय नाहीं. गतवर्षीच्या राष्ट्रीय सभेंत वयोवृद्ध पुढारी दादाभाई नौरोजी यांच्या नायकत्वाखालीं स्वराज्याची ध्वजा फडकविण्यांत आली. ही दादाभांईनीं उभारलेली ध्वजा मी खाली ओढूं इच्छितो असें म्हणण्याचे धारिष्ट कोणाच्या अंगांत आहे ? मवाळांनीं भेकडपणानें ही ध्वजा ओढून जमिनीवर आणल्यास दादाभाई नौरोजी आपल्यास काय म्हणतील ? हा स्वराज्याचा ठराव झाला तेव्हां कित्येक मवाळांना तो आवडला नाहीं. त्यांच्या पत्रांपैकीं एका पत्रानें असें लिहिले होतें कीं हा ठराव आम्हाला आवडत नाहीं, व आम्ही त्याच्याविरुद्ध न जाण्याचें कारण एवढेच होतें कीं, त्या वेळीं अध्यक्षाच्या खुर्चीवर दादाभाई नौरोजी होते. आमचें अंतिम साध्य पूर्ण स्वराज्य असलें पाहिजे हें खरें; पण निदान गतवर्षी झालेला ठराव तरी कायम राहिला पाहिजे यांत संशय नाहीं.

राष्ट्रीय सभेच्या झालेल्या ठरावास मागें घेण्याचा अधिकार प्रत्यक्ष अध्यक्षासही नाहीं. राष्ट्रीय सभेनें पास केलेले सर्व ठराव त्यांस मान्य आहेत अशा समजावरच त्यांची अध्यक्षाचे जागेकरितां निवडणूक होत असते. अध्यक्ष झाला तरी त्यास राष्ट्रीय सभेच्या ठरावाच्या उलट जाण्याचा हक्क नाहीं. तो तसें करूं लागल्यास त्याला तें करूं देतां कामा नये. राष्ट्रीय सभेच्या पीछेहाटीशीं सुरतेचा संबंध राहून सुरत शहराचे नांव कलंकित होणें तुम्हांस आवडतां कामा नये. वाईट कृत्यास सुरत मदत करणार नाहीं अशी मी आशा करितों. राष्ट्रीय सभेची पीछेहाट होणें जर तुम्हांला आवडत नसेल तर आम्हांला आपण मदत केली पाहिजे. **तुमच्यानें पुढें जाववत नसेल तर जाऊं नका, पण निदान मागें जाऊं नका.** राष्ट्रीय सभेची पीछेहाट होऊं नये अशी आमची अंतःकरणापासून इच्छा आहे. राष्ट्रीय सभेचे काम यंदां पुढें गेलें नाहीं तर पुढल्या वर्षी तें पुढें जाईल. राष्ट्रीय सभेची पीछेहाट होऊं नये म्हणून आम्ही जे कांहीं करूं त्याबद्दल आपण आम्हांला क्षमा केली पाहिजे. आमचे अंतिम साध्य स्वराज्य असूं नये असें 'लंडन टाइम्स'-नें धिक्कारपूर्वक म्हटलें आहे. मोर्ले साहेबांच्या मतें स्वराज्याचें प्राप्तव्य असाध्य आहे; पण आपण हें लक्षांत ठेवा कीं, जें मोर्ले साहेबांस अशक्य आहे तें हिंदु-

स्थानांतील लोकांस अगदीं शक्य आहे. त्यांचें व आमचें हित परस्परविरुद्ध आहे. तेव्हां मोर्ले साहेब आमच्या प्राप्तव्यास असाध्य म्हणत आहेत यावरूनच तें आपणांस खास साध्य आहे असें समजावयास पाहिजे आहे. ते व आम्ही हे फिर्यादी-आरोपी यांसारखे आहोंत. एक पक्ष 'नाहीं' म्हणेल, दुसरा पक्ष 'हो' म्हणेल. आजपर्यंत राष्ट्रीय सभा कायदे-कौन्सिलांत जास्त सभासद घ्या, जंगल-खात्यांत सुधारणा करा, असें म्हणत असे. आतां या सर्व गोष्टींचा ज्यांत अंत-र्भाव होतो, त्या स्वराज्याचें प्राप्तव्य स्वीकारण्यांत आलें आहे. कॉंग्रेसमध्यें घोटाळा माजविण्याचा किंवा ती मोडण्याचा आमचा हेतु नाहीं; आणि म्हणूनच तुम्ही आम्हांला मदत करण्यास मागें घेणार नाहीं अशी आम्हांला आशा आहे. आमच्या पक्षाला जय होईल अशी आम्हांला आशा आहे.; कारण आमचें प्राप्तव्य न्याय्य आहे. जो कोणी माणूस—मग तो केवढाही मोठा असो—स्वराज्याच्या प्राप्तव्यापासून मागें सरा म्हणून तुम्हाला सांगेल, त्याचें तुम्ही ऐकूं नका. नेमस्तांच्या सावधगिरीला राष्ट्रीय सभेनें ठरविलेलें प्राप्तव्य धाडसाचें वाटत असेल, म्हाताऱ्यांना हें पसंत नसेल; पण जुन्या पक्षाला पीछेहाट करूं देतां कामा नये.

## बहिष्काराची भीति कां ?

तुमच्या स्वागत कमिटींतील कांहीं लोकांना 'बहिष्कार' हा शब्द नको आहे. त्यांना बहिष्कार शब्दानें सूचित होणाऱ्या कृतीची भीति वाटत नाहीं. शब्दाची भीति वाटते ! राष्ट्रीय सभेनें लोकमत प्रदर्शित केलें पाहिजे. बहिष्का-राच्या चळवळीनें सर्व हिंदुस्थानांत नवीन तेज उत्पन्न झालें आहे. असले उपाय राष्ट्राला नेहमींच सुचत नसतात; हा बहिष्काराचा उपाय सोडून राष्ट्रांतील नवीन चैतन्य नष्ट करण्यास तुम्ही तयार होणार आहां काय ? ट्रान्सव्हालांतील लोकांनी अप्रत्यक्ष प्रतिकारास सुरवात केलेली आहे; व राष्ट्रीय सभेनें त्यासंबंधींची आपली संमति प्रदर्शित करावी असें त्यांचे, म्हणजे जुन्या पक्षाचें म्हणणें आहे, ट्रान्स-व्हालांतील एशियाटिक लोकांना एक प्रकारचा 'झिजिया' कर द्यावा लागतो, व आपलें नांव रजिस्टर करून गुन्हेगारांप्रमाणें आपल्या आंगठ्याचा ठसा त्यांनी द्यावा असें फर्माविण्यांत आलें आहे. १२००० लोकांपैकीं २०० जणांनी आपलीं

नांवें रजिस्टर केलीं, पण इतर 'आम्ही हा कायदा पाळीत नाहीं' असें म्हणत आहेत. याबद्दल जर तुम्ही पसंती प्रदर्शित करतां तर मग बहिष्कार जाहीर करण्यास तुम्ही कां भितां ? ट्रान्सव्हालांतील लोकांचें कृत्य अधिक धिटाईचें आहे. आणि तें जर तुम्हांला आवडतें तर मग बहिष्कार का नको ? यांतील असंबद्धता तुमच्या निदर्शनास आणणें जरूर आहे. बहिष्काराविषयीं बोलूं नका म्हणणाऱ्यांचा काय हेतु असावा याचा तुम्ही विचार करा. नेमस्त पुढारी व सरकार यांचें संगनमत झालें आहे असें मी म्हणत नाहीं; ते अप्रामाणिकपणानें हें करतात असेंही मी म्हणत नाहीं, पण ते भीत आहेत. या लोकांना माझें असें म्हणणें आहे कीं, **तुम्हांस धारिष्ट होत नसेल तर तुम्ही स्वस्थ बसा;** आणि दुसरे जे लढाई करीत आहेत त्यांचा काय निकाल होतो तें पहा. बहिष्काराचे ठरावाचे आड येऊं नका अशी मी त्यांस विनंति—प्रार्थना—करितो.

हा ठराव पसार न करणें म्हणजे बंगाल्यांतील चळवळीची बदनामी करणें आहे. ज्या वंगभंगानें बहिष्काराची चळवळ सुरू झाली तो वंगभंग अद्याप कायम आहे. **तुम्ही राष्ट्रीय सभेची पिछेहाट करून नवीन चळवळ अंगाबाहेर टाकाल तर हे लक्षांत ठेवा कीं दोन वर्षांचे आंत नवी चळवळ चिरडलेली तुम्ही पहाल !** पुढें जाणें तुमच्याच्यानें होत नसेल तर निदान मागें जाऊं नका. राष्ट्रीय सभेपुढें वादाकरितां यावयाच्या विषयांची जी याद स्वागतकमिटीतर्फे प्रसिद्ध करण्यांत आली आहे, त्यांत स्वराज्य, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हे विषय गाळण्यांत आले आहेत. सुरतेच्या प्रांतिक सभेंत राष्ट्रीय शिक्षणाचा ठराव येऊं दिला नाहीं. राष्ट्रीय सभेंत आम्ही असें होऊं देणार नाहीं. कसलेही बडे गृहस्थ असले तरी त्यांचें वजन असल्या बाबतींत आमच्यावर पडणार नाहीं. आम्ही राष्ट्रीय सभेशीं एकनिष्ठपणानें वागणें हें आपलें आद्य कर्तव्य समजतों, आमच्या मार्गांत कोणी व्यक्ति आल्यास आम्ही त्यांना बाजूला सारूं. यांत कांहीं गैरशिस्त आहे काय ? यानें राष्ट्रीय सभेला कोणत्याही प्रकारचा धक्का बसण्याचा संभव आहे काय ? असें जर यांत कांहीं नाहीं, तर आमच्या पक्षास तुम्ही मदत कराल कां जे लोक चालत्या गाड्यास खीळ घालायला पुढें होत आहेत त्यांना मदत कराल ! प्रश्न व्यक्तींचा, मेथा—गोखल्यांचा नाहीं, घोष—लाळजींचा नाहीं, किंवा सुरेंद्र—अरविंदां-

चाहि नाहीं. तो तत्त्वाचा प्रश्न आहे. कितीहि उच्च दर्जाचा, सन्माननीय किंवा बडा इसम असो, त्याच्यापेक्षां राष्ट्रीय सभेच्या हिताकडे आपलें लक्ष अधिक असले पाहिजे. हा प्रश्न देशाच्या स्वातंत्र्याचा आहे. मी तर अशा कामांत व्यक्ती-कडे किंवा व्यक्तीसंबंधाच्या गोष्टीकडे पूर्णपणें दुर्लक्ष करीन. शिवाजी आला त्या-प्रमाणें हे मराठे लोक तुमच्यावर स्वारी करायला आलेले आहेत असेंहि तुम्हांला सांगण्यांत येईल; पण हे खोडसाळपणाचें आहे. पदार्थविज्ञानशास्त्राचा हा सिद्धांत आहे कीं, घर्षणाशिवाय गति नसते; गतीचा नाश होईल इतकें फाजील घर्षण होऊं देतां कामा नये म्हणजे झालें. पण घर्षण हें राहिलेंच पाहिजे. कोठें थांबावें हें आम्हाला कळतें; आणि एका विवक्षित मर्यादेपलीकडे घर्षण जाणार नाहीं अशी आम्ही काळजी घेऊं. ठराव एकमतानें पसार व्हावे असें माझें म्हणणें आहे, पण तसें न झाल्यास ते बहुमतानें तरी पण पसार झाले पाहिजेत. राष्ट्रीय सभेची पीछेहाट करूं निघणारा इसम राष्ट्रीय सभेसंबंधीं एकनिष्ठ नाहीं असें मी म्हणतो.

## कोणाचीच वतनदारी नको

राष्ट्रीय पक्षाचे लोक दंगेखोर आहेत असें तुम्हांला कोणी सांगतील. पण पक्षाभिमानानें म्हणून त्यांजकडून आपल्या पक्षाच्या हितार्थ या बातम्या पसरविण्यांत आल्या आहेत, हें तुम्ही लक्षांत ठेवा. आम्ही पद्धतशीर रीतीनें झगडणार आहों. सभ्यपणानें वर्तन ठेवण्याचा आमच्या पक्षाचा संकल्प आहे. आमचे प्रतिपक्षी जरी असभ्यपणानें वागले, तरी आम्ही सभ्यपणानेंच वागूं. **वतनदारीविरुद्ध आमचें बोलणें आहे; मग ती वतनदारी परकीयांची असो, कीं स्वदेशी गृहस्थांची असो; ही दोन्ही प्रकारची वतनदारी द्वेष्यच आहे.** परिणाम कांहीं झाला तरी गोष्ट तडीस लावण्याचा आमचा इरादा आहे. खोट्यानाट्या बातम्यांनीं भलत्या मार्गाला लागूं नका. राष्ट्रीय सभा या वेळीं सुरतेस प्रथमच आलेली आहे; व तुमची व्यवहारकुशल व्यापारी असल्याबद्दल ख्याति आहे; तेव्हां चांगल्या कार्याच्या नाशास तुम्ही प्रवृत्त होणार नाहीं किंवा मदत करणार नाहीं अशी मी आशा करितो. राष्ट्रीय सभा नागपुराहून सुरतेस आणली याविरुद्ध आतां मी बोलत नाहीं. ही गोष्ट आम्ही कबूल केली आहे, हें आमच्या येथें येण्यावरून दिसून येईलच. एकदां पास झालेले ठराव यंदा पास केले नाहींत म्हणून काय

झाले ! असें एक म्हणणें मी मुंबईस ऐकलें. पण सगळे लोक हे ठराव घ्या म्हणत असतां न घेणें याचा अर्थ काय ? या गोष्टीचा विचार करा. मोर्ले व इतर अधिकाऱ्यांना हे आवडत नाहीं असें त्यांनी सांगितले आहे. त्यांना भिऊन हे ठराव गाळले असाच अर्थ होऊन त्यानें पीछेहाट होणार आहे. राष्ट्रीय पक्षाचा इसम ते ठराव पुनः पसार करील, त्यांना चिटकून राहील, आणि कांहीं झाले व विरुद्ध पक्ष कितीहि असला तरी त्यांना सोडणार नाहीं, मागें जाणें आत्मघातकी-पणाचे आहे. अशा प्रकारची सद्यःस्थिति आहे. भिऊं नका; नव्या पक्षाचे कोणतेही इसम दंगा करूं इच्छित नाहींत, कदाचित् आमच्या सूचना विशेष नेटानें अधिक पुढें ढकलल्यास आमच्या प्रतिपक्षांनाच दंगेखोरपणाचें अवलंबन करण्याची पाळी येईलसें वाटते. असो. सरतेशेवटीं उच्च प्राप्तव्याबद्दल व उच्च कार्याकरितां सुरतकर आम्हांस मदत करतील अशी आशा करून व माझें भाषण लक्षपूर्वक ऐकून घेतल्याबद्दल आपले आभार मानून मी खाली बसतो.



# राष्ट्रीय पक्ष व राष्ट्रीय सभा

मंगळवार ता. २४ डिसेंबर १९०७ रोजीं दोन प्रहरीं सुरत येथें, राष्ट्रीय परिषदेच्या बैठकींत, बाबू अरविंद घोष यांच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळक यांचें भाषण झालें. तें येणेप्रमाणें :—

अध्यक्ष महाराज आणि सभ्य गृहस्थ हो ! ही परिषद भरविण्याचा हेतु काय आहे, आपण येथें कोणत्या हेतूनें प्रेरित होऊन जमलों आहों, हे मी अध्यक्षांच्या परवानगीनें आपल्यापुढें मांडूं इच्छितों. वर्तमानपत्रांतील खोट्यानाट्या लेखांनीं व खाजगी भाषणांतून पसरविलेल्या बातम्यांनीं या परिषदेच्या हेतूविषयीं इतर संस्थांतील कित्येक लोकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे, म्हणून तो प्रथम दूर करणें जरूर आहे. ही सभा— ही परिषद—राष्ट्रीय सभेची प्रतिस्पर्धी संस्था नाहीं. राष्ट्रीय सभेशीं विरोधीभाव ठेवण्याचा आमचा हेतु नाहीं, आणि राष्ट्रीय सभेचा नाश झाल्यावर तिची जागा आपण आटोपावी असाही या परिषदेचा उद्देश नाहीं. ही राष्ट्रीय सभेचेंच एक अंग आहे. राष्ट्रीय सभेला खरोखर राष्ट्रीय बनवावी हाच हिचा उद्देश आहे. राष्ट्रीय सभेंतून आपलें अंग काढून घेण्याचा किंवा तिच्यांत दुही माजविण्याचा आमचा इरादा नाहीं. आमचा उद्देश न्याय्य, कायदेशीर—आणि आपण मला परवानगी द्याल तर—पद्धतशीर (Constitutional) आहे. याविषयीं गैरसमज करून घेण्याचें किंवा कोणच्याही प्रकारें भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. पार्लमेंटांतही अनेक पक्ष असतात, आणि आपापल्या पक्षाची सरशी व्हावी असा ते प्रयत्न करीत असतात. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्ष आपली सरशी व्हावी म्हणून यत्न करतो, तसा सोशियालिस्ट पक्षही आपली सरशी व्हावी म्हणून प्रयत्न करतो. सध्यां लिबरल पक्षाच्या हातांत राज्याचीं सूत्रें आहेत, यांत कोणी कांहीं वाईट आहे असें समजत नाहीं. राष्ट्रीय सभेंत याप्रमाणें नेमस्त व जहाल असे दोन पक्ष झाले असून राष्ट्रीय सभेचीं सूत्रें सध्यां जीं नेमस्त पक्षाचे हातांत आहेत तीं नवीन राष्ट्रीय पक्षाचे हातांत यावीं, राष्ट्रीय सभेंतील बहुमत आपल्या बाजूचें व्हावें, अशी आमची इच्छा आहे. यांत

आम्हांला यश येईल अशी आम्हांला आशा आहे; कारण, आमचें कार्य पवित्र, धर्म्य आहे. राष्ट्रीय सभा नागपूर येथें न भरवितां सुरतेस भरवावी असें ठरविण्यांत आलें, तेव्हां राष्ट्रीय पक्षाची दुसरी राष्ट्रीय सभा करावी असेंही सुचविण्यांत आलें होतें; पण बहुमत या सूचनेच्या विरुद्ध पडल्यामुळें ही सूचना अमलांत आणण्यांत आली नाहीं. या संस्थेनें तेवीस वर्षें परिश्रम केलें आहेत आणि तत्प्रीत्यर्थ कांहीं लाख रुपये खर्च झाले आहेत. ती जर आपल्याला अनुकूल करून घेतां येईल, (मी 'काबीज' म्हणत नाहीं.)—अशी अजून आशा आहे—तर मग एक संस्था मोडून टाकून दुसरी उत्पन्न करण्याचे फुकट श्रम घेण्यांत काय अर्थ आहे?

## नुसतें मतप्रदर्शन नको

राष्ट्रीय सभा काबीज करण्याचा आमचा हेतु नसून आमचा पक्ष वाढवून सभेंत आपली सरशी करण्याचा आमचा विचार आहे. कांहीं वर्षांपूर्वी सर फेरोजशहा मेथा यांनीं राष्ट्रीय सभेचें काम म्हणजे लोकमताचें केंद्रीभवन करणें होय, असें म्हटलें होतें. आम्ही यापुढें जाऊं इच्छितों. केंद्रीभवनाची कल्पना पदार्थविज्ञानशास्त्रावरून घेतलेली आहे. पण उष्णतेचे किरण केंद्रांत नुसतें आणून काय उपयोग! असें उगीचच्या उगीच करून फळ काय? त्यापासून उत्पन्न होणारी उष्णता उपयोगी लाविली पाहिजे, तिनें कांहीं कार्य झालें पाहिजे, त्या उष्णतेनें कांहीं तरी दग्ध केलें पाहिजे, असें आमचें म्हणणें आहे. **पतित झालेल्या राष्ट्राला वर आणणें हा उद्देश आहे.** राष्ट्रीय सभा ही हें कार्य करणारी संस्था असली पाहिजे. **नेमस्त व राष्ट्रीय पक्ष यांच्या मतांतील भेद हाच होय; पहिल्याला नुसतें आपलें मत प्रदर्शित करावयाचें आहे आणि दुसऱ्याला प्रत्यक्ष कामगिरी करावयाची आहे,** राष्ट्रीय सभेंत नवा पक्ष अस्तित्वांत आहे, त्याची जरूरी आहे, असें दाखविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे जें कार्य राष्ट्रीय सभा करीत नाहीं तें कार्य करून दाखविण्यास तुम्ही तयार झालें पाहिजे, हाच होय. असलें काम करण्याविषयींचा विचार राष्ट्रीय सभेनंतर परिषदेची जी बैठक होणार आहे तींत केला जाईल. आज व उद्यां जी बैठक व्हावयाची आहे तींत राष्ट्रीय सभेच्या बैठकींतील ठरावांसंबंधानें

नव्या पक्षानें कसें धोरण ठेवावयाचें, व राष्ट्रीय सभेवर आपलें वजन पाडण्यास किंवा आपल्या मताची छाप राष्ट्रीय सभेवर पडावी म्हणून आपण एकमतानें काय काय करावें याचा विचार करावयाचा आहे. वसाहतींसारखें स्वराज्य हें राष्ट्रीय सभेचें प्राप्तव्य आहे; आम्ही थोडे पुढें जाऊं इच्छितो. स्वदेशाचें स्वातंत्र्य हें आमचें प्राप्तव्य आहे. या प्राप्तव्यानें कांहीं लोकांना कसेंसेंच वाटतें. पण असें वाटण्याचें कांहीं कारण नाहीं. स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे तें उद्यांपरवांच मिळवावयाचें असें नसून त्याकरितां कित्येक वर्षें जावीं लागणार आहेत. तें केव्हां मिळणार—लवकर मिळणार कां उशीरा—हें सर्वस्वीं आपल्या कर्तव्यजागृतीवर, उत्साहावर व चिकाटीवर अवलंबून राहणार आहे.

नेमस्तांचें प्राप्तव्य व आमचें प्राप्तव्य यांत मी असा फरक करतो कीं त्यांचें प्राप्तव्य हें व्यावहारिक असून कांहीं वर्षांच्या अवकाशांत मिळवावयाचें आहे, आणि आमचें प्राप्तव्य हें अगदीं अखेरचें—अंतिम असें आहे. नेमस्त म्हणविणाऱ्या लोकांच्या अंतःकरणांत हीच गोष्ट आहे, पण त्यांच्यापैकीं कांहीं, आपण कायद्यांत सांपडूं म्हणून भीत आहेत; कांहींजणांना गोऱ्या अधिकाऱ्यांना नाखूष करवत नाहीं; कित्येकांना वाटतें कीं, या गोष्टीवर जोर देऊन कोणत्याही प्रकारचा फायदा नसून सरकारचा रोष मात्र त्यामुळें आपण आपल्यावर ओढवून घेऊं, आणि म्हणून ते हें प्राप्तव्य जाहीर करूं इच्छित नाहींत. आम्हांला राष्ट्रीय सभेनें कबूल केलेल्या प्राप्तव्यापेक्षां अधिक उच्च असें प्राप्तव्य पाहिजे आहे; कारण, सध्यांचें राष्ट्रीय सभेचें प्राप्तव्य असावें तसें प्रोत्साहनकारक नाहीं. यानें सरकारास राग येण्याचें कांहीं कारण नाहीं. स्वातंत्र्याकरितां ज्या ब्रिटिश लोकांनीं अचाट प्रयत्न केला आहे, त्या ब्रिटिश लोकांनीं संतापण्यासारखें यांत कांहीं नाहीं. आम्ही गैरसनदशीर अगर गैरपद्धतशीर वर्तन करूं इच्छित नाहीं—अर्थात् सनदशीर किंवा पद्धतशीर याचा आमचा व नेमस्तांचा अर्थ यांत फरक आहे. आम्ही आपलें प्राप्तव्य सनदशीर पद्धतीनें व कायदेशीर रीतीनेंच मिळविणार आहों असें सांगितलें म्हणजे मग आमच्या प्राप्तव्यास भिण्याचें कोणास कारण राहणार नाहीं. येथील गोऱ्या अधिकारी वर्गाला राग येईल हें आम्ही जाणून आहों. ज्यांच्या हातांत आज सत्ता आहे त्यांच्या हातांतून ती जाईल, पुढेंमागें केव्हां तरी जाईल, ही कल्पना त्यांस पसंत होणें शक्य नाहीं. मी अधिकारी वर्गावर असतों तर माझा

अधिकार कमी झालेला मला देखील आवडला नसता; व ज्यानें केव्हां तरी गोऱ्या अधिकारी वर्गाच्या हातांतील सत्ता जाईल असें कोणचेंही कृत्य इंग्रजी गोऱ्या अधिकारी वर्गास आवडणें शक्य नाहीं. आपल्या हातांतील सत्ता जाऊं न देण्याची इच्छा बाळगणें हें पूर्णपणें मानवी स्वभावास अनुसरून आहे. पण निरंतर दास्यत्वांत राहणें न आवडणें हेंही मानवी स्वभावास पूर्णपणें धरून आहे.

## दोन स्फूर्तींचा लढा

स्वातंत्र्याची इच्छा सहज स्फूर्तीनें येणारी आहे. दोन स्वाभाविक स्फूर्तींतील—इच्छेंतील—हा लढा आहे; आणि लोकमतानुसार राज्य चालविण्याच्या इच्छेची गोऱ्या अधिकाऱ्यांच्या इच्छेवर सरशी होईतों हा तंटा चालणार आहे. आम्ही सरकारविरुद्ध बंड करण्याची तयारी करीत नाहीं. आमचीं साधनें उघड व कायदेशीर आहेत व आमचें प्रातव्य आम्हांला मिळेल अशी आम्हांला आशा आहे. तें बोलून दाखविण्याचें धैर्य आम्हीं आपल्या आंगीं बाळगतों, आणि त्याकरितां सोसावें लागणारें कष्ट सोसण्याचीही पण आमची तयारी आहे. आमचें प्रातव्य दाबून टाकणें आतां शक्य नाहीं. आम्ही म्हणतों तें प्रातव्य राष्ट्रीय सभेला आज कबूल नसलें तरी तें पुढें कबूल करावें लागेल. राष्ट्रीय सभा अखेरीस हें प्रातव्य मान्य करील अशी माझी खात्री आहे. "कानडासारखें स्वराज्य दिल्यास हिंदुस्थानांतील लोक 'पूर्णपणें स्वतंत्र होऊं' असें मनांत आणतील, आणि मग तुम्ही त्यास कसा प्रतिबंध कराल!" असा प्रश्न मि. केर हार्डी यांस करण्यांत आला होता. या प्रश्नाचें 'कानडा जर पुढें पूर्ण स्वतंत्र होईल तर हिंदुस्थानही होईल.' दोघांनाही न्याय एकच, असें उत्तर त्यांनीं दिल्याचें कळतें. पण हा प्रश्न फार पुढचा आहे—अतिशय कालांतरानें पुढें येणारा आहे. राजकारणांत प्रत्यक्ष करावयाच्या गोष्टींचा विचार प्रथम व्हावयाचा असतो, आणि त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेनें सध्यां जाहीर केलेलें प्रातव्य प्रत्यक्ष काम करण्यास स्वीकारलें आहे. आम्ही स्वीकारलेला हेतु पूर्णपणें न्याय्य, सर्वस्वी कायदेशीर, व अगदीं पद्धतशीर आहे, आणि या हेतूच्या प्राप्त्यर्थ प्रयत्न करण्याचे कामीं उत्तेजन देतांना बिचकण्याचें कारण नाहीं. अंतिम हेतु अगर अखेरचें प्रातव्य यास पीनलकोडाचा कायदा बाध आणूं शकत नाहीं. पीनलकोडाचा संबंध

प्रत्यक्ष होणाऱ्या कृतीशीं असून उच्च अंतिम हेतूशीं नाहीं. उच्च हेतु व अंतिम प्राप्तव्य यासंबंधाच्या कल्पना स्वीकारणें बेकायदेशीर ठरूं लागल्यास कित्येक उदारमतवादी इंग्रज मुत्सद्यांस व ग्रंथकर्त्यांस प्रथम तुरुंग दाखवावा लागेल. कायदा हा अत्युच्च प्राप्तव्याला लागू होत नाहीं, तर आपलें प्राप्तव्य प्राप्त करून घेण्याकरितां ज्या साधनांचा उपयोग आपण करूं त्या साधनांना मात्र कायदा लागू होत असतो. लोकांना बंड करण्याचा उपदेश केल्यास तो कायद्यांत येईल; पण अंतिम हेतु किंवा उच्च असें अखेरचें प्राप्तव्य लोकांना समजावून देण्याचा प्रयत्न हा कायद्यांत येणार नाहीं; ही गोष्ट—हा महत्वाचा भेद—लक्षांत ठेवला पाहिजे.

## राष्ट्रीय पक्ष हें एंजिन

उच्च प्राप्तव्य डोळ्यांसमोर ठेऊन त्यास अनुकूल अशा योग्य व कायदेशीर प्रयत्नांनीं कार्यभाग उरकणें हा हिंदुस्थानांतील राष्ट्रीय पक्षाचा हेतु आहे, कायद्याप्रमाणें वागण्याचा आमचा हेतु आहे—अर्थात् कायदे करण्याचा हक्क आम्हांस नाहीं, आम्हांला कायद्यांत फेरफार करतां येत नाही, किंवा कायद्याचा अर्थ करण्याचाही अधिकार आमच्या हातांत नाहीं, हें उघडच आहे. तेव्हां जुलमी कायद्यामुळें ट्रान्सव्हालांतील हिंदी लोकांना ज्याप्रमाणें कायदा मोडावा लागला त्याप्रमाणें कायदा मोडणें आम्हांला पुढें मागें भाग झाल्यास त्याचा दोष आमच्याकडे राहणार नाहीं. राष्ट्रीय सभेचा मार्ग म्हणजे प्रार्थना करणें, अर्जी करणें, निषेध दर्शविणें, हा होता. गेल्या वर्षीच्या बैठकीपासून यांत बदल झालेला आहे. बहिष्काराचें तत्त्व राष्ट्रीय सभा कबूल करूं लागली आहे; पण सब्जेक्ट कमिटींत वगैरे बहिष्काराच्या तत्त्वांतील सर्व अर्थ नाहींसा करून टाकून बहिष्कारास केवळ औद्योगिक बहिष्काराचें स्वरूप देण्याचा सर्व प्रकारचा प्रयत्न होतो आहे असें दिसून येतें. बहिष्काराचें शस्त्र उपयोगांत आणतां आलें तर तें फारच शक्तिमान शस्त्र आहे,—मी औद्योगिक बहिष्कारासंबंधानें बोलत नसून राजकीय बहिष्कारासंबंधानें बोलत आहें—पण तें निर्जीव करून टाकण्याचा कित्येकांचा विचार आहे. राष्ट्रीय सभा आमच्या पक्षाच्या शस्त्रांपैकीं एक एक शस्त्र हळू हळू हातीं धरूं लागली आहे, पण अर्थात् प्रथम लपतछपत व भीतभीतच तें

तिजकडून घेतलें जात आहे. बहिष्काराच्या शस्त्रासारखीं आणखीही शस्त्रें आहेत. उदाहरणार्थ अप्रत्यक्ष प्रतिकार हें एक बलवान शस्त्र आहे. राष्ट्रीय सभा ही जुन्यास बिलगून राहूं पाहणारी एक संस्था आहे, आणि ती तशी असणें साहजिक आहे; कारण अनेक निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधी राष्ट्रीय सभेंत येतात आणि सगळ्या सांखळीची मजबुती सांखळींतील अगदीं कमजोर असलेल्या दुव्याइतकी असते हें तत्व गृहीत धरून ते जमलेले असतात. राष्ट्रीय सभेंतील अत्यंत नेमस्त म्हणून जे कोणी असतात त्यांच्या धोरणावर राष्ट्रीय सभेचें धोरण अवलंबून असतें. राष्ट्रीय पक्ष हा आगगाडीच्या साध्या किंवा गार्डाच्या डब्यासारखा नाहीं, तर तो एंजिनासारखा गति देणारा पक्ष आहे. राष्ट्रीय पक्ष ही चालक शक्ति आहे. राष्ट्रीय सभेला गति देऊन पुढें नेण्याचा आमचा विचार आहे. आम्हांला लवकर पुढें जावयास पाहिजे आहे. राष्ट्रीय सभा प्रथम एकदम कोणचीच गोष्ट करा किंवा ती ठीक आहे असें म्हणत नाहीं. लोकांनीं पुढें होऊन एखादी चांगली गोष्ट जोखीम अंगावर घेऊन केली म्हणजे मग राष्टींय सभा ती गोष्ट मागून कबूल करीत असते. जसजसे प्रसंग दरवर्षी एकामागून एक येत जातील तसतसें धोरण राष्ट्रीय सभेला स्वीकारावें लागेल—अप्रत्यक्ष प्रतिकार स्वीकारावा लागेल, अशी खात्री आहे.

## जुनी पिढी व नवी पिढी

ट्रान्सव्हालांतील लोकांनीं जुलमी कायद्याचा प्रतिकार केला; आतां राष्ट्रीय सभा हें मान्य करील. पण याचा अर्थ काय होतो ? ट्रान्सव्हालसारखा कायदा जर हिंदुस्थानांत केला तर आम्ही ट्रान्सवालांतील हिंदी लोकांसारखा त्याचा प्रतिकार करूं, असाच याचा अर्थ होत नाहीं काय ? राष्ट्रीय सभा असें म्हणणार नाहीं. एखादी गोष्ट तुम्ही केली म्हणजे मग 'शाबास' म्हणून तुमची पाठ थोपटण्यास राष्टींय सभा तयार आहे. कांहीं लोकांनीं आधीं पुढें जावें, हाल सोसावें, निसटण्याचा मार्ग करून द्यावा, मग चार घोड्यांच्या बगीसकट त्या मार्गावरून आम्ही जाऊ, अशी राष्ट्रीय सभेंतील कित्येकांची इच्छा आहे. पुढें जाण्यास जुनी पिढी तयार नाहीं; तसें करणें तिच्या जिवावर येत आहे. नव्या पिढीस पुढें वेगानें जावयाचें आहे. वृद्धांची सावधगिरी व तरुणांची हिंमत यांची योग्य

सांगड घातल्यानें उत्कृष्ट असा मध्यम मार्ग सांपडणार आहे. जुन्या पिढींतील लोकांनी राष्ट्रीय सभेचें धोरण वीस वर्षें कायम राखलें आहे; वडील मंडळींनीं केलेल्या कामगिरीचेंच राष्ट्रीय सभा हें फळ आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जुन्या पिढीला फारच सावधगिरीनें पाऊल टाकावें असें वाटत आहे. नव्या पिढीला आपलें प्राम्रव्य मिळविण्याच्या मार्गास झपाट्यानें जावेसें वाटत आहे; अशा तऱ्हेनें नव्याजुन्या पिढींत तंटा उपस्थित झाला आहे. पण नेमस्त व राष्ट्रीय पक्षाचे लोक हे दोन्ही एकाच देशांत जन्म पावलेले असून त्या देशाच्या पुनरुज्जीवनाची जबाबदारी दोघांवर सारखीच आहे हें विसरतां कामा नये. राष्ट्रीय पक्षाचे लोक जर बुडविले जाणार असले तर आम्ही सर्व—राष्ट्रीय पक्षाचे लोक व नेमस्त—बुडविले जाऊं; एकच पक्ष बुडविला जाणार नाहीं, असा नेमस्त पुढाऱ्यांनीं सद्यःस्थितीचा विचार करावा, अशी माझी त्यांस विनंति आहे. जुन्यास चिलगणारे नेमस्त व आम्ही लोकसत्ताभिमानी यांची सांगड जमल्यास राष्ट्रीय सभेला योग्य वळण लागणार आहे.

## अधिक विस्तीर्ण क्षितिज

उच्च प्राम्रव्य व तें साध्य करून घेण्यासाठीं परिणामकारक—फल प्रसवणारीं—साधनें यांचें अवलंबन आम्ही केलें आहे, आणि कनिष्ठ प्राम्रव्य व प्रार्थना–अर्जी–निषेधाचें अवलंबन नेमस्त पक्षानें केलें आहे; हा आमच्यांत व नेमस्तांत फरक आहे. सध्यां राष्ट्रीय सभेचें काम अरेरावी पद्धतीनें चालविलें जात आहे. ( श्रोत्यांपैकीं एकजण 'धिक्कार' म्हणून ओरडतो ) धिक्कार म्हणूं नका. त्यांनी राष्ट्रीय सभा काढून वीस वर्षें चालविली आहे. त्यांनीं चांगली कामगिरी केली असें आम्ही म्हणतों. पण काळ बदलला आहे आणि आपल्या काम करण्याच्या पद्धतींतही फरक करणें अवश्य झालें आहे, एवढेंच आमचें म्हणणें आहे. यांत चीड आणण्यासारखें, उपमर्दकारक, अगर अनुचित असें कांहीं एक नाहीं. सरकार म्हणजे ज्याप्रमाणें परकी गोरा अधिकारी वर्ग त्याप्रमाणेंच राष्ट्रीय सभा म्हणजे—हा राष्ट्रीय सभेचा अधिकारी वर्ग असें झालें आहे, आणि राष्ट्रीय सभेच्या या अधिकाऱ्यांस राष्ट्रीय सभेचें सर्व काम निरंतर आपल्या मताप्रमाणें चालावयास पाहिजे

आहे. जुन्या पिढीनें कामगिरी केली आहे हें कबूल आहे; पण आतां दिशा बदलली पाहिजे. वयोवृद्ध देशभक्त दादाभाई नौरोजी यांनीं आमच्याकरितां परिश्रम केलें, हिंदुस्थानांतून विलायतेकडे द्रव्यौघ एकसारखा वाहत आहे ही कल्पना त्यांनीं पुढे आणिली व सिद्ध करून दाखविली. हिंदुस्थान दिवसें-दिवस अधिकाधिक दरिद्री होत असून हिंदुस्थान इंग्लंडच्या गळ्यांत एक बोजड धोंड झाली आहे, हें त्यांनीं सिद्ध केलें. ब्रिटिश लोकांची याबद्दल खात्री करून देण्यास दादाभाईंना आपल्या आयुष्याचीं ५० वर्षें खर्चावी लागलीं. त्यांनीं प्रति-पादिलेलें हें सारें आतां आम्हांला मान्य आहे. न्यूटननें गुरुत्वाकर्षणाच्या काय-द्याचा शोध लावला. आतां ती गोष्ट शाळेंतील लहान मुलगा ठाम ठरलेली म्हणून गृहीत घेतो, कारण, त्याला पुढें शिकावयाचें असतें. दादाभाईंनीं केलेल्या गोष्टीविरुद्ध भांडावयास आम्ही निघालों नाहीं; त्या मान्य करूनच आम्ही पुढें जाऊं इच्छितों. दादाभाईंनीं ज्या आंकड्यांवरून आपला सिद्धांत सिद्ध केला त्यांचें परीक्षण करावयाच्या भानगडींत पडण्याचें कारण नाहीं.

पृथ्वी फिरते व सूर्य फिरत नाहीं, हा न्यूटनचा सिद्धांत जसा विद्यार्थी एक-दम ग्रहण करून पुढें शिकतो, तसेंच याही बाबतींत आहे. आम्हीं जुन्या पिढीच्या खांद्यावर उभे राहिलों आहों आणि म्हणूनच आमच्या दृष्टीचें क्षितिज अधिक विस्तीर्ण झाले असून आम्हांस अधिक दूरचें दिसत आहे. आम्ही अधिक शहाणें आहों असें नाहीं; तर जुन्या पिढीच्या खांद्यांवर उभे राहून पहात असल्यामुळें आमच्या दृष्टीच्या टप्प्यांत अधिक प्रांत येत आहे. तेव्हां जुन्या पिढीशीं भांडत न बसतां, त्यांच्या शहाणपणाविषयीं वाद न करतां, किंवा त्यांनीं केलेल्या कामगिरी-संबंधानें तंटा न करतां, त्यांनीं जेथपर्यंत मजल मारिली आहे त्याच्यापुढें जाऊन काम करीत राहणें हे सर्वथैव योग्य होणार आहे. त्यांनीं जेथें काम सोडलें तेथूनच आपल्यास सुरवात करावयाची असून पुढें जावयाचें आहे. राष्ट्रीय पद्धतीनें शिक्षण देणाऱ्या संस्थांचें जाळें सर्व देशभर पसरून तें सुव्यवस्थित झालें पाहिजे आहे. दादाभाई नौरोजी किंवा इतर लेखक यांनीं ज्या सत्य गोष्टींचा शोध लाविला, त्या आमच्या शाळांतून शिकविल्या जाव्या आणि लहान मुलांनीं मुळाक्षरांबरोबर त्या शिकाव्या असें शिक्षण आम्हांस पाहिजे आहे. सध्यां चालू असलेली शिक्षण-पद्धति गोऱ्या अधिकारीवर्गानें घालून दिलेली आहे. सध्याचें

शिक्षण गोऱ्या अधिकारी वर्गाच्या हातांत आहे. आह्मांला राष्ट्रीय पद्धतीचे शिक्षण हवें असल्यामुळें तें हिंदुस्थानांत स्थापित केलेल्या शिक्षणपद्धतीला कांहीं अंशीं विरुद्ध असावयाचेंच. "ब्रिटिस सरकार हिंदुस्थानचें कल्याण करण्याकरितां हिंदुस्थानांत आले आहे; आणि सूर्य, चंद्र, अगर पृथ्वी हीं अस्तित्वांत आहेत तोपर्यंत आम्हांस ( इंग्रजांस ) येथें ईश्वरी आज्ञेनें रहावयाचें आहे," अशा प्रकारचें तत्त्व सरकारी शाळांतून व कॉलेजांतून शिकविलें जातें. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांतून 'स्वातंत्र्यप्राप्तीची महत्वाकांक्षा आपण बाळगली पाहिजे आणि ते स्वातंत्र्य केव्हां तरी आपल्याला मिळालेंच पाहिजे' या बुद्धीनें प्रयत्न करणें अवश्य आहे. राष्ट्रीय शाळेंत असें शिकविलें जाईल. आमची तिजोरी आमच्या ताब्यांत नाहीं; आमच्या द्रव्याचा विनियोग करणें हें आमच्या हातांत आलें पाहिजे. हें राष्ट्रीय शिक्षणाच्या द्वारें विद्यार्थ्यांना शिकविलें जाणार आहे. गेल्या वर्षीं राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें राष्ट्रीय सभेनें ठराव पसार केला. पण हें लक्षांत ठेवा कीं, त्यापूर्वीं कलकत्त्यास व पूर्व-बंगालमध्यें राष्ट्रीय शाळा स्थापण्यांत आल्या होत्या. आपलीं मतें कबूल करणें राष्ट्रीय सभेला भाग पाडण्याचा एक मार्ग म्हणजे आपण प्रत्यक्ष कांहीं कामगिरी करावयाची हा होय. तुमची कामगिरी यशस्वी झाली आहे हें एकदां राष्ट्रीय सभेनें पाहिलें म्हणजे तुमच्या कामाचें जें फल असेल त्याचा स्वीकार राष्ट्रीय सभा मोठ्या आनंदानें करील. राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा काढल्या आणि मागून 'वः ! तुह्मी चांगलें केलेंत,' असें राष्ट्रीय सभा म्हणाली, अशी स्थिति आहे; स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य या जशा राष्ट्रीय पक्षाच्या मुख्य गोष्टी आहेत, त्याचप्रमाणें राष्ट्रीय सभेला आमच्या माताची बनवावयाची असल्यामुळें तिच्या रचनेच्या नियमांकडेही आमचें लक्ष असावयास पाहिजे आहे.

## मवाळांची खरी इच्छा

राष्ट्रीय सभेची रचना सवलतीची व राष्ट्रीय पक्षास फायदेशीर असली पाहिजे. राष्ट्रीय सभा पूर्णपणें राष्ट्रीय हित साधणारी व्हावी, तिचें काम जनतेच्या बहुमतानें व जाहीर रीतीनें व्हावें, ते एखाद्या अरेरावाच्या खोलींत खासगी रीतीनें होऊं नये, असें आमचें म्हणणें आहे. राष्ट्रीय सभेची फी फार द्यावी लागते,

ती कमी केली पाहिजे. वास्तविक फी मुलींच लागूं नये, पण कांहीं खर्च करावा लागतो तेवढ्यापुरती घ्यावी. विलायतेंत चळवळ करण्याकरितां ३०,००० रुपये खर्च होतो आणि हिंदुस्थानांत चळवळ करण्याकरितां एक पैसाही खर्च होत नाहीं तो झाला पाहिजे आहे. लाला लजपतराय सांगतात कीं, इंग्रजांना भीक मागि-तलेली आवडत नाहीं; त्यांना भीक मागणाराचा तिटकारा आहे. आपण जें मागतो त्यास आपण पात्र आहो असें दाखविले पाहिजे—म्हणजे अशा दृष्टीनें दाखविलें पाहिजे कीं, आपण मागतों तें 'देत नाहीं' म्हणून उत्तर आलें तर तें आपल्या बळावर मिळविण्याची आपली तयारी आहे. युनिव्हर्सिटीची परीक्षा देऊन ग्रॅज्युएट होऊन पात्र होणें, याविषयीं मी बोलत नसून आपण मागतों त्य हक्कांचा उपयोग करण्यास आपण लायक आहों, ते आपण मिळवणार, अशा निश्चयाच्या तयारीसंबंधानें माझें बोलणें आहे. मागणी मागतांना जें मागतां तें मिळविण्याचा तुमचा निश्चय इतका दृढ असला पाहिजे कीं, तुमच्या मागणीस 'नाहीं' ह्मणणें अशक्य झालें पाहिजे. आवेशानें व कळकळीनें यत्न केल्यास, नवीन विचारांचें वेड आपल्यास लावून घेण्याचें काम करावयास निघाल्यास, आपल्याला यश आलेंच पाहिजे. आणि याकरितां हिंदुस्थानां-तच विशेष कामगिरी झाली पाहिजे. 'पियर्स'च्या साबणाची एक जाहिरात मी पाहिली. त्यांत एक चित्र होतें, आणि या चित्रांत अंग धुण्याच्या टिनाच्या टबांत बसविलेलें एक मूल खालीं जमीनीवर जवळ असलेली साबणाची वडी घेण्याचा प्रयत्न करीत आहे असें दाखविलें असून त्या मुलाची इच्छा दर्शविणारें एक वाक्य चित्राखालीं लिहिलें होतें. 'मला ती ( साबणाची वडी ) मिळाल्या-शिवाय मी सुखी होणार नाहीं.' असें ते वाक्य होतें. हेंच वाक्य राष्ट्रीय पक्षाच्या हेतूसंबंधानें लावावयाचें म्हणजे "आह्मांस पाहिजे तें मिळेपर्यंत आह्मी सुखी होणार नाहीं" असें करून मी घेतो. राष्ट्रीय पक्षाचें प्राप्तव्य साध्य होई-पर्यंत तो पक्ष सुखी व्हावयाचा नाहीं. "राष्ट्रीय सभा फार पुढें गेली! राष्ट्रीय सभेच्या कांहीं ठरावांमुळें आम्ही संकटांत सांपडलों आहों" असें नेमस्त लोक म्हणत आहेत; आणि सुरत ही सुरक्षित जागा आहे असें पाहून—'अशी कल्पना करून' म्हणणें अधिक योग्य होईल—मागें कूच करण्याचा त्यांचा विचार आहे. हें त्यांना आम्ही करूं देणार नाहीं! मोर्ले साहेबांच्या व

हिंदुस्थान सरकारच्या उद्गारांमुळें राष्ट्रीय सभेची पीछेहाट करण्याची मवाळांची जी इच्छा होती तिला अंशतः तरी उत्तेजन मिळालेलें आहे. त्यांचा सरकाराशीं असें करण्याबद्दल संकेत ठरलेला आहे असें मी म्हणत नाहीं; पण ते अप्रामाणिक नसले तरी फाजिल सावध व शंकेखोर आहेत, यांत संशय नाहीं. मागें जावयाचें आणि पुढें यावयाचें असें समुद्राच्या भरतीप्रमाणें तुम्ही करूं लागल्यास विवक्षित मर्यादेपलीकडे तुम्ही कधींही जाणार नाहीं. नेमस्त म्हणतात कीं, सरकार फार बलिष्ट आहे आणि या नवीन धोरणाचा स्वीकार केल्यास तें कायम राखण्याचे सामर्थ्य आपल्यांत नाहीं; सरकारच्या दडपशाहीचा धाक त्यांना वाटत आहे; आणि म्हणून या प्रसंगीं मागें सरणें हें सावधगिरीचें व शहाणपणाचें आहे, असें ते म्हणत आहेत. सरकारला न भितां आम्हांला पुढें पुढें जावयाचे आहे आणि थोडथोडी कां असेना, पण एकदां आक्रमिलेली जागा पुनः परत मागें चालून यावयाची नाहीं, तर पुढेंच जात रहावयाचे आहे. दुर्दैवेकरून, उलट वाहणाऱ्या दडपशाही धोरणाच्या ओघाविरुद्ध झगडून आपल्याला मार्ग काढावा लागणार आहे. बहिष्कारानें जें जें कांहीं दर्शित होतें तें सारें मुकाट्यानें करा, त्याविषयीं बाहेर बोलूं नका, त्यानें सरकार रागावेल, असें त्यांचें—मवाळांचें—म्हणणें आहे. हें शहाणपण वृद्धांच्या उपयोगाचें आहे. हा उपदेश अगदीं निरुपयोगी आहे. जी गोष्ट उघड बोलून दाखविण्याचे धैर्य अगांत नाहीं ती गोष्ट करूं जाणाऱ्या माणसास 'भ्याड' म्हणत असतात. कोणचीही गोष्ट आम्ही गुप्तपणें करूं इच्छित नाहीं. आमच्यावर संकटें आलीं तर तीं सहन करण्याचीं आमची तयारी आहे. सावधगिरीचा एक प्रामाणिकपणा असतो; व उत्साहाचा एक प्रामाणिकपणा असतो. आमच्या तरुणांत उत्साह असावा असें आम्हांस वाटते.


## माघार खाण्याची कल्पना हाणून पाडा

आतां अध्यक्षांच्या निवडणुकीचा प्रश्न राहिला. गैरसमज दूर व्हावा म्हणून मी हा प्रश्न अखेरीस घ्यावयाचे ठरविले. हा प्रश्न व्यक्तिविषयक नाहीं. डॉ. घोस हे फार विद्वान आहेत, याबद्दल आमच्या मनांत मुळींच शंका नाहीं. पण आम्ही प्रगतिकारक पक्षाचे आहों, आणि लाला लजपतराय यांची अध्यक्षाच्या जागेकरितां निवडणूक करावी अशी कामगिरी त्यांनीं केली आहे. आमचा ज्या मतांवर विश्वास आहे

त्या मतांची लालाजी हे प्रतिमा आहेत, आणि म्हणून अध्यक्षस्थानाकरितां त्यांचें नांव सुचविण्यांत आलें आहे. लाला लजपतराय यांना यंदा राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष करूं नये, म्हणून पुढें केलेलें पहिलें कारण टिकत नाहीं असें पाहतांच 'सरकार चिडेल' हें कारण पुढें करण्यांत आलें. माझें असें मत आहे कीं, अध्यक्षाची निवडणूक या तत्त्वावर होतां कामा नये. अध्यक्षाच्या निवडणूकीसंबंधानें विचार चालला असतां असल्या कारणांचें वर्चस्व यापुढें चालूं देतां कामा नये. यंदा हें चालूं दिल्यास माझी विशेष हरकत नाहीं, पण पुढें अशी चूक होणार नाहीं अशाबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे. 'सरकार' म्हणजे 'गोरा अधिकारी-वर्ग' असें धरल्यास लालाजींस अध्यक्ष निवडल्यानेंच काय, पण राष्ट्रीय सभेंत पसार होणाऱ्या प्रत्येक ठरावानें सरकारास चीड येत आहे. म्हणून ते सारे ठराव गाळण्यास हे लोक तयार होणार आहेत काय ? आम्ही सरकारला चिडविण्याकरितां कांहींएक करीत नाहीं. आम्ही जे कांहीं करतों तें आपल्या कल्याणाकरितां करतों, आणि त्यानें जर कोणास राग येत असेल तर त्याला आमचा इलाज नाहीं. जगाच्या कल्याणाकरितां सूर्य प्रकाशतो, पण रुक्ष वाळवंटावर त्याचा प्रकाश पडून तेथील वातावरण दुःसह झाल्यास तो दोष सूर्याचा नव्हे. त्याचप्रमाणें कांहीं विषयांसंबंधानें आमचीं मतें ठरलेलीं असलीं, तीं मतें न्यायाला व नीतीला धरून आहेत अशी आमची खात्री असली, त्यांकरितां आम्हांला यत्न करावयाचा असला, परंतु त्यानें जर कोणाच्या स्वार्थास धक्का पोहोचूं लागला, तर आम्ही एवढेंच म्हणूं शकूं कीं, दुसऱ्या कोणास राग आणण्याचा अगर दुसऱ्या कोणाचा उपमर्द करण्याचा आमचा उद्देश केव्हांही नव्हता व नाहीं. आम्ही आमच्या इच्छा सफल करण्याचा प्रयत्न करीत असतां कोणास राग येऊं लागला अगर कोणाचा उपमर्द होऊं लागला तर तो दोष सर्वस्वी त्यांचा आहे.

आपल्याला पुढें जाणें शक्य नसेल तर आपण निदान मागें जाऊं नये. माघार खाण्याच्या कल्पनेस यंदां आपण हाणून पाडिलें तर पुढें प्रगतिच होईल असें दिसत आहे. राष्ट्रीय सभा नेमस्तांच्या हातांत राखण्याचा हा बहुधा शेवटचाच प्रयत्न होत आहे. या झगडण्यांत आपण यशस्वी झाल्यास आपल्या मार्गांत या प्रकारच्या अडचणी पुन्हां येणार नाहींत असें वाटत आहे. सुरतचे लोक बुद्धिवाद ग्रहण करणारे आहेत. आपल्या कार्यक्रमासंबंधानें त्यांची

सहानुभूति आपण मिळविली पाहिजे. सुरतेच्या लोकांना जर आम्हांला आमच्या मताचे करतां आलें नाहीं, तर राष्ट्रीय सभा आपल्या मताची करूं अशी आशा आपल्याला कशी बाळगतां येईल ? राष्ट्रीय सभेची पीछेहाट थांबविल्यानें आपण पाया भक्कम केल्यासारखें होईल. त्या पायावर योग्य अवकशांत टोलेजंग व सुंदर इमारत उभारावी याच हेतुनें आपणा सर्वांस येथें येण्यास व या ठिकाणीं येऊन विचार करण्यास पाचारण करण्यांत आलें. राष्ट्रीय सभेची बैठक झाल्यावर दुसरी एक परिषद भरविली जाणार असून त्यांत राष्ट्रीय कामगिरी सर्व हिंदुस्थानभर पसरविण्याकरितां निरनिराळ्या प्रांतांतून व जिल्ह्यांतून संस्था स्थापून या परिषदेच्यातर्फे सर्वत्र प्रत्यक्ष कांहीं विधायक अशी कामगिरी करविण्यासंबंधानें विचार व्हावयाचा आहे.



# राष्ट्रीय सभेंत दुही !

सुरत येथें भरलेली हिंदुस्थानची तेविसावी राष्ट्रीय सभा मोडल्यावर, शनिवार, ता. २८ डिसेंबर १९०७ रोजीं सुरतेसच, राष्ट्रीय सभेसंबंधानें पुढें काय करावयाचें, याविषयीं विचार करण्याकरितां राष्ट्रीय पक्षातर्फे, बाबू अरविंद घोष यांच्या अध्यक्षतेखालीं एक परिषद भरविण्यांत आली होती. या परिषदेंत लो. टिळक यांनी इंग्रजींत भाषण केलें. त्याचा गोषवारा असाः—

: सध्यांचा प्रसंग कसा आहे व आपण येथें कशाकरितां जमलों आहों, याबद्दल चार शब्द बोलण्याविषयीं मला विनंति करण्यांत आली आहे, आणि त्याप्रमाणें मी चार शब्द बोलणार आहे, राष्ट्रीय सभेचे जे प्रतिनिधी येथें जमले आहेत ते मध्यम स्थितींतील गृहस्थ आहेत, असा समज आहे. दोन दिवसांपूर्वी याच जागीं राष्ट्रीय पक्षांच्या लोकांची परिषद भरली होती, तेव्हां गैरसमज होऊं नये म्हणून एवढा खुलासा करणें अवश्य आहे कीं, ही सभा केवळ राष्ट्रीय पक्षाच्या प्रतिनिधींचीं नसून इतर प्रतिनिधींचीही आहे. मि. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखालीं जे ठराव कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत पसार झाले तें ठराव ज्यांस मान्य आहेत अशा सर्व प्रतिनिधींची ही सभा आहे. आतां राष्ट्रीय सभेचे कामांत अडथळा करण्याचा प्रयत्न कोणी केला ? आणि बखेडा कां झाला ? एकमत करण्याचे कामीं यश कां आलें नाहीं ? याचा विचार प्रथम केला पाहिजे. शोचनीय दुही माजलेली आहे, आणि ज्या राष्ट्रीय सभेकरितां तेवीस वर्षे परिश्रम करण्यांत आले व लाखो रुपये खर्च झाले, त्या राष्ट्रीय सभेची बैठक अनियमित कालपर्यंत तहकूब ठेवण्यांत आली आहे ! असे कां झालें, हें पाहिले पाहिजे. राष्ट्रीय सभेंत दोन पक्ष होते हे आतां अगदीं उघड झालें आहे; राष्ट्रीय पक्षाची इच्छा जुन्या पक्षांतील लोकांच्या इच्छेच्या अगदीं उलट होती, त्यामुळें लढा माजला; आणि त्यामुळेंच राष्ट्रीय सभेचें काम मिळूनमिसळून अगर एकोप्यानें होऊं शकलें नाहीं. दडपशाहीचे कायदे करण्याचा सध्यांचे काळीं सरकारनें निश्चय केला आहे; आणि अशा प्रसंगीं गेल्या वर्षीची आपली स्थिति—गेल्या वर्षापर्यंत झालेली आपली प्रगति—कायम राखण्याचा प्रयत्न करणें हें आपलें कर्तव्य आहे.

असें आमचें म्हणणें होतें. राष्ट्रीय सभेच्या रचनेंत कोणतेंही नवें तत्त्व घालण्याचा आमचा प्रयत्न नव्हता; गेल्या सालीं झालें तें कायम ठेवण्यास पाहिजे होतें, एवढेंच काय तें आमचें म्हणणें होतें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे राष्ट्रीय सभेची, विशेषतः सुरतेच्या सभेची, व्यवस्था करणाऱ्या कांहीं नेमस्तांनीं राष्ट्रीय सभेला तिच्या 'राष्ट्रीय' आसनावरून खालीं ओढण्याचा व ती 'हिंदी नेमस्तांची सभा' करून टाकण्याचा प्रयत्न केला, आणि जुन्या व नव्या पक्षांत यामुळेंच तंटा उपस्थित होऊन तो आज कांहीं आठवडे चालला. राष्ट्रीय सभेला मागें ओढण्याचा कित्येकांचा विचार आहे हें माझ्या लक्षांत आलें, आणि त्याप्रमाणें मी वर्तमानपत्रांत लिहिलें. लाला लजपतराय यांस अध्यक्षस्थान देण्याच्या प्रश्नाकडे अरेरावीपणानें दुर्लक्ष करण्यांत आलें, आणि तेव्हांपासून राष्ट्रीय सभेची पीछेहाट व्हावी—तिला नेमस्त करावी—असा कित्येकांचा मनोदय असल्याची मला शंका आली.

हें एकच उदाहरण घडलें असें नाहीं; तर एकामागून एक अशा गोष्टी घडून आल्या कीं, राष्ट्रीय सभेस—तिचें राष्ट्रीय स्वरूप नाहींसें करून—विवक्षित पक्षाची, विवक्षित मताची बनविण्याचा कांहीं जणांचा बेत झाला आहे, हें अधिकाधिक स्पष्ट होऊं लागलें. असें होऊं शकलें नसतें; पण राष्ट्रीय सभेंतील सत्ता कांहीं लोकांनीं आपल्या हातांत घेतली होती—मग हे रिसेप्शन कमेटीच्या संमतीनें झालेलें असो वा संमतीवाचून केलेलें असो; त्याविषयीं वाद करीत बसण्याचें कारण नाहीं.—आणि त्यामुळें हें शक्य झालें. आपलीं मतें सरकारी मताशीं जुळावीं असा राष्ट्रीय सभेच्या वतनदारांचा—मुंबईकर मवाळांच्या पुढाऱ्यांचा—हेतु होता. यांनीं सरकारशीं संगनमत करून असा संकेत ठरविला होता असें मी म्हणत नाहीं; पण सरकारच्या हालचालीशीं समांतर—एकाच दिशेची—अशी त्यांची चळवळ होती यांत शंका नाहीं. राष्ट्रीय सभा सरकारास रुचणें कधींही शक्य नाहीं. राष्ट्रीय सभेनें स्वीकारलेला राजकीय धर्म हा राजकर्त्यांना आवडण्यासारखा नव्हता; आणि म्हणून सरकार अगदीं कमींत कमी हरकत घेईल अशा प्रकारचा राष्ट्रीय सभेचा अंतिम हेतु ठरवावा, ही कल्पना कित्येक नेमस्तांच्या डोक्यांत आली. कोणावरही 'सरकारशीं मिलाफीनें वागून या गोष्टी करण्यास हे प्रवृत्त झाले,' असा आरोप करण्याची माझी इच्छा नाहीं. सरकारच्या पसंतीच्या मर्यादेबाहेर जाणें व सरकारास चीड आणणें व्यावहारिक दृष्टीनें शहाण-

पणाचें नाहीं, असें सध्यांच्या दडपशाहीच्या काळांत कोणास प्रामाणिकपणानें वाटणें असाहजिक नाहीं; पण माझ्या मतें जुलमानें किंवा दडपशाहीनें प्रजेच्या उत्साहाची वाढ अधिक जलद होते. ज्या बऱ्या लोकांनीं पीछेहाटीचा प्रयत्न केला, त्यांना कांहीं स्वार्थ साधावयाचा होता असें माझें म्हणणें नाहीं; पण त्यांचें वर्तन देशहिताच्या दृष्टीनें घातुक होतें, इतकेंच माझें म्हणणें आहे. कांहीं बाबतींत सरकाराबरोबर ' सलोख्यानें पण विरोधी भावानें ' काम करूनच राष्ट्राची प्रगति होईल असें मानणारे कांहीं गृहस्थ आहेत. यांचें मत हें एक राजकीय मत झालें. दुसरें राजकीय मत नवें असून गेल्या दोन-तीन सालांतच उत्पन्न झालेलें आहे, पण तें जोरदार झालेलें आहे; व राष्ट्रीय पक्षाचे लोक या दुसऱ्या मताचे आहेत. या दोन मतांच्या अनुयायांत लढा आहे हें उघड आहे; परंतु हा लढा असला तरी राष्ट्रीय सभेचें काम एकमतानें व्हावें अशी सर्वांची इच्छा होती व गेल्या वर्षीं वयोवृद्ध पुढारी मि. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षत्वाखालीं कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत ' त्वयार्धं मयार्धं ' या न्यायानें समेट होऊन एकमतही झालें होतें.

## राष्ट्रीय सभेच्या कार्यपद्धतींत फरक

आतां हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, राष्ट्रीय सभेची रचना पार्लमेंट सभेच्या रचनेसारखी नाहीं. प्रांताप्रांतांतील प्रतिनिधि राष्ट्रीय सभेंत लोकसंख्येच्या मानानें येत नाहींत. पार्लमेंट सभेंत प्रत्येक ' बरो ' मधून लोकसंख्येच्या मानानें प्रतिनिधि येतात; राष्ट्रीय सभेचें तसें नाहीं. शिक्षणाच्या मानाने, राष्ट्रीय सभा भरावयाचें ठिकाण सभेला येणाऱ्या प्रतिनिधींना जसें कमी अधीक दूर किंवा जवळ पडत असेल त्याचप्रमाणे, किंवा आपआपल्या ऐपतीच्या मानानें, निरनिराळ्या प्रांतांतील प्रतिनिधि राष्ट्रीय सभेला येत असतात. सामान्य नियम असा आहे कीं, कलकत्त्यास राष्ट्रीय सभेची बैठक झाल्यास एकंदर प्रतिनिधींपैकीं अर्धे प्रतिनिधि बंगाल्यांतील असावयाचे; आणि अशा स्थितींत दुसऱ्या एका किंवा दोन प्रांतांतील प्रतिनिधींच्या मदतीनें राष्ट्रीय सभेंत पाहिजे ते ठराव बहुमतानें पास करून घेणें त्यांस शक्य असतें. एका किंवा दोन प्रांतांस आपली मतें अशा आगंतुक बहुमतानें साऱ्या हिंदुस्थानावर लादतां येऊं नयेत म्हणूनच

राष्ट्रीय सभेचे ठराव सर्वानुमतें पसार करावयाचे, असा यावर उपाय योजण्यांत आला होता. बनारस येथें बहिष्काराचा ठराव पुढें आणण्यांत आला होता आणि बहिष्काराचें तत्त्व सर्व हिंदुस्थानानें अंगिकारिलें असतें तर बंगाली लोकांना फार आनंद झाला असता. कलकत्त्यास बंगाली लोकांनीं मनांत आणिलें असतें तर त्यांना आपल्या इच्छेप्रमाणें ठराव पसार करून घेतां आले असते; पण मद्रास इलाखा व संयुक्तप्रांत बहिष्काराच्या या ठरावाविरुद्ध होतो, आणि एकमतानें ठराव पसार करण्याचें तत्त्व अबाधित असल्यामुळें असा ठराव पसार करण्यांत आला नाहीं. बंगाल्यांत सुरूं करण्यांत आलेली बहिष्काराची चळवळ न्याय्य व कायदेशीर आहे, अशा अर्थाच्या ठरावावर बंगाली लोकांस कलकत्त्याच्या बैठकींत संतुष्ट रहावें लागलें. ‘स्वदेशी’च्या ठरावावर कांहीं उपसूचना कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेपुढें मांडल्या जाणार होत्या, पण कांहीं प्रांतांच्या इच्छेप्रमाणें त्या राष्ट्रीय सभेपुढें मांडण्यांत आल्या नाहींत; व या ठरावांत ‘कांहीं झीज सोसूनही’ एवढे शब्द मात्र घालण्यांत आले. अशा तडजोडीनें कलकत्त्याच्या गेल्या वर्षीच्या बैठकीचें काम पार पाडण्यांत आलें. यंदा असा महत्त्वाचा प्रश्न राष्ट्रापुढें होता कीं, सरकारानें दडपशाही अंमलाला सुरुवात केली असतांना आपण राष्ट्रीय सभेच्या रचनेंत आणि राष्ट्रीय सभेच्या काम करण्याच्या पद्धतींत आपणांस इष्ट असा—थोडा कां होईना—फरक करावा कीं करूं नये ? या प्रश्नाचा निकाल तडजोडीनेंच व्हावयास पाहिजे होता; पण तसें झालें नाहीं.

राष्ट्रीय सभेपुढें ‘स्वराज्य’ हें प्रातव्य कलकत्ता येथें मांडण्यांत आलें होतें. हें प्रातव्य ‘अशक्य’ आहे असें सेक्रेटरी ऑफ स्टेट, लंडन टाइम्स, सरकारी अधिकारी, आणि अँग्लो-इंडियन पत्रें, यांनीं जाहीर केलें. स्वदेशीचे ‘प्रामाणिक स्वदेशी’ व ‘अप्रामाणिक स्वदेशी’ असें भेद करण्यांत आले; तसे बहिष्काराचेही ‘औद्योगिक बहिष्कार’ व ‘राजकीय बहिष्कार’ असे दोन भेद करण्यांत आले. सरकाराला एखादी गोष्ट करावयास भाग पाडण्या करितां बहिष्काराचा उपयोग करणें हें प्रत्यक्ष राजद्रोहीपणाचे नसले तरी सरकारास अप्रिय आहे, असें आम्हांला सांगण्यांत आलें. राष्ट्रीय शिक्षण कसें द्यावें, यासंबंधीचा विवक्षित कार्यक्रम बाबू गुरुदास बॅनर्जी यांनीं तयार केला व बंगाल्यांत

राष्ट्रीय शाळाही निघाल्या. पण त्यांजकडे सरकारची सदय दृष्टि नव्हती. आमच्या परकी सरकारास आमच्या तरुण पिढीच्या मानासिक शिक्षणावर पूर्णपणें ताबा ठेवावयास हवा आहे. बहिष्कारासंबंधीं व राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं बंगाल्यांत जी चळवळ झाली तीवर सरकारची दृष्टि वक्र होती आणि यासंबंधींच्या चळवळींत तरुण विद्यार्थी सामील झाले तेव्हां त्यांनीं रिस्ले सर्क्युलरांसारख्या उपायांनीं ती चळवळ दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. स्वतंत्र देशांतून जें शिक्षण दिलें जातें, तें शिक्षण आम्हांला दिलें जात नाहीं. स्वातंत्र्याच्या कल्पनांचें आकंठ सेवन होईल अशा प्रकारचें शिक्षण आम्हांला मिळूं नये अशीच सरकारची इच्छा आहे. सर्व शिक्षणसंस्था 'सरकारी' करून टाकण्याकरितां या संस्थावरं सरकारला आपला ताबा ठेवायला पाहिजे आहे. नवीन चळवळ आपल्याला पसंत नाहीं, असें सरकारनें जाहीर केलें आहे. कॉलेजें नालायक ठरविण्यांत आलीं; 'युनिव्हर्सिटी ॲक्ट' पसार करण्यांत आला. एकंदरीनें शिक्षणपद्धति 'सरकारी' करण्याकरितां शक्य तें सर्व करण्यांत आलें. यंदांच्या राष्ट्रीय सभेच्या बैठकीपूर्वी अशा प्रकारची स्थिति होती. आतां, राष्ट्रीय सभेला मागें ओढण्याचा कोणासही हक्क नाहीं, मग तो गृहस्थ केवढाही असो. तसें करण्याचा कोणास हक्क आहे असें म्हणणें म्हणजे राष्ट्रीय सभेचा जाणून बुजून धडधडीत उपमर्द करणें आहे. आपलें प्रातव्य मिळविण्याच्या मार्गांत पुढें जातां आलें नाहीं, तर निदान मागें जाऊं नये, परिश्रम करून मिळविलेलें स्थान—झालेली गति—कांहीं झीज सोसून कायम राखावी, हें आपलें कर्तव्य आहे. पण सरकार नाखूष होऊं नये म्हणून राष्ट्रीय सभेला सुरक्षित मर्यादेच्या आंत मागें ओढण्यास मुंबईचे नेमस्त गृहस्थ तयार झाले! ज्या गोष्टी प्रत्यक्ष घडल्या त्या मी सांगत आहे; त्यांवरून काय अनुमानें काढावयाचीं याचा विचार आपण करा.

## आमचें प्रातव्य काय ?

गेल्या वर्षी, 'स्वराज्याचे हक्क असलेल्या वसाहतीसारखें स्वराज्य', हें राष्ट्रीय सभेचें प्रातव्य ठरविण्यांत आलें होतें; यंदा 'स्वराज्याचे हक्क असलेल्या वसाहतीसारखें' हे शब्द काढून 'ब्रिटिश साम्राज्यांतील इतर

सं. निबंध

भागांसारखें ' हे शब्द वापरण्यांत आले. शिवाय हें यंदाचें प्रातव्य 'अंतिमांतलें अंतिम ' म्हणून सुचविण्यांत आलें. ही पीछेहाट होती, आणि म्हणून आम्ही तिच्याविरुद्ध गेलो. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं, ' स्वराज्याचे हक्क असलेल्या वसाहतींसारखें ' हें शब्द आतां नेमस्तांच्या ' कनव्हेन्शन 'चे प्राप्तव्यांत घातले आहेत. गेल्या वर्षांच्या ठरावाप्रमाणें, सध्यांची गोऱ्या अधिकाऱ्यांचे हातांत सत्ता ठेवून राज्य करण्याची पद्धत बदलून त्या जागीं नवी स्वराज्याचे हक्क देणारी राज्यपद्धति यावी, असें राष्ट्रीय सभेचें म्हणणें होतें. यंदा ' सध्यांच्याच राज्यपद्धतींत सुधारणा करावयाची ' असें म्हटलें आहे. गेल्या वर्षीच्या ' स्वदेशी ' च्या ठरावांत 'कांहीं झीज सोसून' स्वदेशी माल घ्यावा असें म्हटलें होतें; यंदा ' कांहीं झीज सोसून ' हे शब्द ठरावांतून काढून टाकण्यांत आले—कलकत्त्यास दोन पक्षांत तडजोड व्हावी म्हणून हे शब्द घालण्यांत आले होते. बहिष्काराच्या ठरावांत ' बहिष्काराची चळवळ ' हे शब्द काढून ' ब्रिटिश मालास बहिष्कार ' असें त्यांचें रूपांतर केलें, आणि राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावांत ' राष्ट्रीय ताबा ' असावा असें होतें त्या ऐवजीं ' स्वतंत्र ताबा ' असें करून त्यांत सरकारी मदत घेणाऱ्या शाळांचाही अंतर्भाव करण्याचा प्रयत्न केला. हें पाहून या पीछेहाटीविरुद्ध जावयाचें, असें ठरविण्यांत आलें; आणि राष्ट्रीय सभेला मागें ओढण्याची नेमस्तांची इच्छा जितकी जोरदार होती तितकाच जोरदार असें होऊ न देण्याचा राष्ट्रीय पक्षाचा निश्चय झाला. या निश्चयालाच अध्यक्षाच्या निवडणुकीस हरकत घेण्याचें स्वरूप आलें होतें. सुरतेस सब्जेक्ट कमिटींत व्हावें तसें आपलें बहुमत व्हावयाचें नाहीं, असें राष्ट्रीय पक्षाला वाटत होतें; ' सरकार चिडेल ' म्हणून लाला लजपतराय यांस अध्यक्ष निवडण्यांत आलें नाहीं, हें राष्ट्रीय पक्षाच्या सर्व लोकांना माहीत होतें; सर्व तऱ्हेनें पीछेहाट करण्याचा नेमस्तांचा संकल्प आहे, हें त्यांनीं पाहिले होतें; आणि म्हणून पीछेहाटीच्या प्रत्येक ठरावाविरुद्ध जावयाचे, असें ठरविण्यांत आले. ' त्वयार्धं मयार्धं ' या तत्त्वाप्रमाणें नेमस्तांनीं वागावयास पाहिजे होतें, पण त्यांनी तसें केलें नाहीं ! सरकार रागावले आहे, प्रसंग जर कठीण आहे, तर पुढें जाऊं नका, पण पूर्वीचे तरी कायम ठेवा, म्हणजे आम्ही संतुष्ट राहूं, असें राष्ट्रीय पक्षातर्फे सांगण्यांत आलें होतें. जाहीर व्याख्यानांतून, वर्तमानपत्रांतील लेखांमधून, आणि

अन्य तऱ्हेनें ही गोष्ट अगदीं खुलासेवार सांगण्यांत आली होती. मी स्वतः सुरतेंत यासंबंधानें भाषण केले होते. पण नेमस्त—विशेषतः मुंबईकर नेमस्त—राष्ट्रीय सभेला पुढें तर जाऊं द्यावयाची नाहींच, पण उलट मागें ओढावयाची, अशी आपल्या मनाशीं गांठ बांधून सुरतेस आले होते.

## समेटाचे अयशस्वी प्रयत्न

मी आपल्याला सांगतों कीं, खासगी व सार्वजनिक रीतीनें या नेमस्तांना भेटण्याचा एकदां नाहीं, दोनदां नाहीं, तर तीन चार वेळां आम्ही प्रयत्न केला, पण आम्हांला नेमस्तांनीं दूर राखिलें; त्यांनीं आमचें म्हणणें नुसतें ऐकूनही घेतलें नाहीं. तेव्हां आम्ही त्यांच्या कृतीविरुद्ध एकजुटीनें गेलों; आणि त्याचा परिणाम राष्ट्रीय सभेंत दुही हा झाला! ही दुही कायमची होणार नाहीं अशी मी आशा करितों. या दुहीनें इतरांपेक्षां मला कमी वाईट वाटत आहे असें नाहीं. जेव्हां सर्वांचे एकमत होणें अवश्य होतें अशा वेळीं दुही माजलेली आहे. आपण व सरकार यांमधील संबंधाच्या दृष्टीनें हें फार अहितकर झालें आहे. सरकारच्या मनांत नेमस्तांना आपल्याभोंवतीं गोळा करावयाचें होतें, आणि त्याप्रमाणें होऊं पहात आहे. सध्यांच्या प्रसंगीं सरकारच्या हातांतील खेळणें होऊन कोणच्याही सुशिक्षित इसमानें सरकारी इच्छेप्रमाणें नाचण्यास तयार व्हावयास नको होतें. पण सुदैवानें म्हणा अगर दुर्दैवानें म्हणा—कारण एका बाजूचें सुदैव म्हणजे दुसऱ्या बाजूचें दुर्दैव होतें—गोष्ट घडून आली आहे, आणि नेमस्त विजयी झाले आहेत. ( श्रोत्यांपैकीं कांहीं ' नाहीं ' ' नाहीं ' ' त्यांचा विजय झालेला नाहीं ' म्हणतात ). राष्ट्रीय पक्षांशी सलोखा करून ते विजयी झालेले नाहींत, तर राष्ट्रीय पक्षाचें न्यायाचें म्हणणें न ऐकतां त्यांस तुच्छ करून टाकून—झिडकारून—ते विजयी झाले आहेत. ( श्रोते 'धिक्कार' म्हणतात ) ते विजयी झाले आहेत, पण त्यांनी स्वीकारलेली स्थिति किती असुरक्षित आहे हें त्यांस थोड्या वर्षांच्या अनुभवानें दिसून येईल. डॉ. घोस म्हणाले कीं, राष्ट्रीय पक्षास हाणून पाडलें पाहिजे. पण या खालीं काय संकटें दडून बसलीं आहेत हें त्यांना थोडक्यांच वर्षांत दिसेल. राष्ट्रीय सभेच्या ध्वजेखालीं दोन्ही पक्षांनीं एक होणे यंदा अशक्य झाल्याचें आढळून आलें, तडजोडीचें तत्त्व मान्य

झालें नाहीं, आणि तेविसाव्या राष्ट्रीय सभेचा असा परिणाम लागला ! निरनिराळ्या प्रांतांतील अर्धे जुन्या पक्षाचे व अर्धे नव्या पक्षाचे प्रतिनिधी घेऊन त्यांची एक लहानशी कमिटी नेमावी व या कमिटीनें तडजोड काढावी, तोंपर्यंत अध्यक्षाच्या निवडणुकीचें काम तहकूब ठेवावें—म्हणजे अध्यक्षाची निवडणूक सर्वानुमतें होणें शक्य होईल, अशी उपसूचना—बोलू दिलें असतें तर—मी राष्ट्रीय सभेपुढें मांडणार होतों. माझें बोलणें ऐकून घ्यावें म्हणून मी शिकस्त केली, पण थोडीदेखील पड खाण्यास नेमस्त मंडळी तयार नसल्यानें मला त्यांत यश आलें नाहीं. ही सूचना खासगी रीतीनें मी पूर्वीच केली होती, आणि तीच मला राष्ट्रीय सभेपुढें मांडावयाची होती.

## तापी नदींत समाधि !

दोन्ही पक्षांशीं स्नेह असलेल्या मध्यस्थ मित्रांनीं समेट करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांसही यश आलें नाहीं; आणि याचें कारण मुंबईच्या नेमस्तांचा बिलकुल पडतें न घेण्याचा बेपर्वाईचा विचारच होय. नेमस्तांच्या परम असहिष्णुतेनें ही दुही झाली. आणि त्यानें दोन भाऊ विभक्त होऊन जसे दोघेही निर्बल होतात त्याप्रमाणें दोन्ही पक्ष निर्बल झाले ! दुसऱ्या पक्षानें म्हणजे राष्ट्रीय पक्षानें गम खावयाची होती, असें कोणी म्हणतील. पण गम खाण्याला सुद्धां मर्यादा असते. नवीन कांहीं करा असें आम्ही म्हणत नव्हतों. नुसतें आहे तें कायम ठेवा असें आमचें म्हणणें होतें. आम्ही अगदीं कमींत कमी अशी मागणी केली होती. राष्ट्रीय पक्षानें राष्ट्रीय सभेची पीछेहाट होऊं द्यावयाची होती काय ? राष्ट्रीय सभा ही एक उपयुक्त संस्था आहे, हिंदुस्थानांत सर्व देशातर्फे काम करणारी राजकीय संस्था म्हणजे राष्ट्रीय सभाच काय ती एक आहे, नवीन सभेस या सभेनें मिळविलेली इभ्रत कमविण्यास पुष्कळ वर्षें खर्चावीं लागतील. या गोष्टी पीछेहाटीच्या विरुद्ध जाणाऱ्या लोकांना माहीत होत्या—नव्हत्या असें नाहीं. ते राष्ट्रीय सभेचें महत्त्व पूर्णपणें जाणून होते. पण मोठ्या श्रमानें व वादविवादानंतर जी प्रगति राष्ट्रीय सभेनें केली होती ती कायम राखणें सुद्धां अशक्य झाल्यामुळें राष्ट्रीय सभेंत दुही माजली. राष्ट्रीय सभेंत अखिल हिंदुस्थानाची बुद्धि समष्टिरूपानें दिसून येते; पण या बुद्धीसही समेट घडवून आणतां आला


नाहीं ! ज्यांना राष्ट्रीय सभेची पीछेहाट करावयास पाहिजे होती, आणि तसें करण्यासाठीं ज्यांनीं प्रयत्न केला त्यांना लवकरच पश्चात्तापांत पडावें लागेल; आपण स्वीकारलेला मार्ग तर्कविचारास सोडून असून तो आत्मघातकी आहे असें त्यास अनुभवानें कळेल. सरकाराला आपल्या भोंवतीं नेमस्त गोळा करावयाचे होते, पण त्याचा देशाला कांही उपयोग नाहीं, हें त्यांना अनुभव आल्यावर उमजेल. पण त्यांची चूक त्यांना दिसून येईपर्यंत व झालेली दुही नाशकारक आहे अशी दोन्ही पक्षांची खात्री होईतों काय करावें ? हा सध्या आपल्यापुढें प्रश्न आहे. तुम्हाला तुमचे स्वतःचे कारभार नीट करतां येत नाहींत, ते तुम्ही स्वराज्य कसें चालविणार ? असा टोमणा आमचे प्रतिपक्षी आम्हांला देतील हें खरें; असा प्रसंग येऊं नये म्हणून मी वाटेल तें करावयास तयार झालो असतो; पण पीछेहाटीचा हट्ट नेमस्तांनीं धरिला, आणि त्यामुळें हा प्रसंग ओढवला, नाहीं तर ओढवला नसता. एखाद्या प्रांताच्या तब्बेतीखातर राष्ट्रीय सभेचा मोड होऊं नये म्हणून जें एकमताचें तत्त्व स्वीकारण्यांत आलें होतें, त्याकडे यंदा दुर्लक्ष करण्यांत आलें. सर्वसाधारण प्रतिनिधींना आपल्या विश्वासांत घेऊन त्यांचें मत घेण्याची ज्यांस परवा नाहीं अशा नेमस्त गृहस्थांनीं ‘ हें असें असें झालेंच पाहिजे ’ म्हणून हुकूम सोडला आणि त्याप्रमाणें तें बहुमतानें नव्हे तर दुहीनें करण्यांत आलें. आणि राष्ट्रीय सभेला तापी नदींत समाधि देण्यांत आली !

## ज्वाला प्रदीप्त राखणें हेंच कर्तव्य

असो, गेल्या सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेंत पसार झालेल्या ठरावांना आधारभूत धरून राष्ट्रीय सभेचें काम अंगावर घ्यावें आणि तें पुढें चालवावें ह्मणून आपण आतां काय केलें पाहिजे, याचा विचार करण्याकरितां आपण येथें जमलों आहों. **सरकार रागावलें तरी आम्ही मागें जाणार नाहीं.** व्यावहारिक—व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीनें—मागें जाणे हें शहाणपणाचे असेल, पण त्यानें देशाचें हित होणार नाहीं. सरकारी अधिकाऱ्यांना खुष करण्याच्या बुद्धीपेक्षां प्रतिकाराची बुद्धि दाखविण्याची माझ्या मतें ही वेळ आहे. आपल्याला जो थोडा अग्नि रक्षण करतां येण्यासारखा आहे, त्या अग्नीची ज्वाला भडकेपर्यंत तो जळता ठेवण्यासाठीं, जिवंत राखण्यासाठीं, आपण कांहीं करूं

शकणार नाहीं काय ? आमच्या मनांत नवीन संस्था काढण्याचे नाहीं, पण दडपशाहीच्या अत्यंत गारठविणाऱ्या थंड हवेंतही जी जीव धरून राहील, इतकेंच नव्हे तर अधिक प्रदीप्त होईल, अशी संस्था आम्हांला पाहिजे आहे. येथें जमलेल्या जमावांत याचा विचार करतां येणें शक्य नाहीं, पण सर्व प्रांताचे प्रतिनिधी—२३ व्या राष्ट्रीयसभेकरितां म्हणून आलेले प्रतिनिधी—येथे एकत्र जमले आहेत, तेव्हां यासंबंधानें कांहीं तरी व्यवस्था आतांच करणें जरूर आहे. माझ्या मतें पंचवीस तीस प्रतिनिधींची एक कमिटी नेमावी, या कमिटीकरितां दोन सेक्रेटरी निवडण्यांत यावेत, त्यांनी दुहींचे परिणाम काय होतात, यावर नजर ठेऊन काय काय कारवाई करावी, पुन्हा पुढच्या वर्षी सभा भरविणें शक्य आहे कीं काय, हें ठरवावें. दुही वाढत नाहीं आहे अशाबद्दल सेक्रेटरींनी काळजी घ्यावी आणि यासाठीं त्यांनी प्रतिबंधक उपायांची योजना करावी. समेट करण्याच्या बुद्धीनें आपण सर्वांनी या गोष्टींचा विचार करावा अशी माझी आपणांस विनंति—अर्जी—आहे. विरुद्ध असलेल्या विवक्षित पक्षाचें खंडन करावें असा माझा हेतु नाहीं. खऱ्या खऱ्या गोष्टी जितक्या निःपक्षपातपणें मला सांगतां आल्या तितक्या निःपक्षपातपणानें मी सांगितल्या आहेत. माझ्या पक्षावर जो दोषारोप करण्यांत येईल त्यापासून मी मोकळा आहे किंवा मोकळा असूं शकेन असें मी म्हणत नाहीं; परंतु दोष किंवा श्रेय कोणाचें आहे, दुही केल्याचा दोष कोणाकडे आहे, याचा निकाल भाविष्यकाली होणार आहे. प्राप्तव्याचे अधिक जवळ कोणाचा पक्ष आहे हें थोड्या वर्षांच्या अनुभवानें दिसून येणार आहे. तोंपर्यंत दोन्ही पक्ष आपलेच म्हणणें बरोबर होतें असें म्हणतील. सध्यां मध्यंतरीच्या वेळांत काय करावें हें ठरविणें अवश्य आहे. कलकत्त्याच्या राष्ट्रीय सभेंत पसार झालेल्या ठरावापासून आम्ही आपल्या कामास सुरवात करूं इच्छितों आणि जसजसा काळ जाईल तसतसें आम्हांस पुढेंही जावें लागणार आहे. नेमस्तांनीं 'कन्व्हेन्शन' भरवून एक कमिटी नेमली आहे. आम्ही दुसऱ्या पक्षाशीं स्पर्धा न करतां मिळूनमिसळून कार्य करण्याच्या बुद्धीनें कार्यास उद्युक्त झालों तरच आम्हांस पुढें जातां येणार आहे. पुढें परमेश्वराच्या कृपेनें दोन्ही पक्षांत समेट होऊन ते एक होण्याची संधि पुनः येईल अशी मी आशा करितों. एवढेंच नव्हे, तर एक झालेले दोन्ही पक्ष जो जुलूम करणें सरकारास योग्य वाटेल (न्यायानें नव्हे) त्या जुलमाविरुद्ध

एकजुटीनें झगडतील, इतकेंच नाहीं, तर गेल्या वर्षी कलकत्यास ज्या स्वराज्याची ध्वजा उभारण्यांत आली, त्या स्वराज्याच्या प्राप्तव्याच्या अधिक जवळ जाऊन आपण पोहोंचूं, अशीही मला आशा आहे. (भाषण शांतपणें ऐकून घेतल्याबद्दल आपल्या श्रोत्यांचे आभार मानिल्यावर टाळ्यांच्या प्रचंड गजरांत आपले भाषण संपवून लो. टिळक खालीं बसले.)



# बाबू अरविंद घोष यांचा उपदेश

सोमवार, ता. १३ जानेवारी १९०८ रोजीं सायंकाळीं, नारायण पेठेंतील लो. टिळक यांचें वाड्यांत कलकत्त्याचे बाबू अरविंद घोष यांचे रा. रा. अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. त्याप्रसंगी व्याख्यात्यांचे आभार मानतांना लो. टिळक म्हणाले:—

मित्रमंडळी व सद्गृहस्थहो! आपल्यावर दुसरें एक माझें व्याख्यान लादावें या उद्देशानें मी उभा राहिलेला नाहीं. मला चारच शब्द बोलावयाचे आहेत, आणि तेवढे बोलून मी आपली रजा घेईन. आपण येथें येण्याची तसदी घेतली याबद्दल मी आपले आभार मानावे कीं आपल्याला आज आतां जें नवीन राजकीय मतावरील अत्युत्कृष्ट विवरण ऐकावयाला मिळाले त्याबद्दल आपलें अभिनंदन करावें, हेंच या वेळीं मला समजेनासें झालें आहे. नुसती तयारी करण्यांतच काल वाया दवडूं नका, तर एकदम कार्याला सुरवात करा, असा अरविंद बाबूंनीं आपल्याला उपदेश केला आहे. कसें तरून जावें याचा केवळ विचार करीत बसण्यांत किंवा त्यासंबंधानें तर्कवितर्क करण्यांतच वेळ न घालवितां एकदम उद्योगाला प्रवृत्त व्हा, हें बाबूसाहेबांच्या व्याख्यानाचें सार आहे. विचार करीत व वेळ येईल—संधि येईल—म्हणून तिची वाट पहात बसूं नका; वेळ—संधि—आपल्या कर्तबगारीनें आणा, नाहीं तर कांहीं आशा नाहीं. आपल्याला सरकारी दडपशाहीला तोंड द्यावयाचे आहे आणि इकडे आपल्यास मागें ओढणाऱ्या नेमस्त शृंखलांशीं झगडावयाचे आहे; पण आपला आपल्या कर्तबगारीवर भरंवसा आहे. आपणा सर्वांपेक्षां उच्च अशा ईश्वरी सत्तेवर, त्याचप्रमाणें आपल्या लोकांच्या भवितव्यतेवर आपला विश्वास आहे; आणि आम्हांला आशा आहे कीं, आम्ही उत्साहानें कार्याला हात घातला तर आमच्या इच्छा पूर्ण झालेल्या आम्हाला दिसतील. मला आतां विशेष कांहीं बोलावयाचे नाहीं आणि विशेष कांहीं बोलण्याची आवश्यकताही पण नाहीं! बाबूसाहेबांचें आतां झालेलें भाषण हें पुण्यांतील शेवटचें भाषण नाहीं अशी मी आशा करितो; आणि आज ज्या प्रकारचा उपदेश बाबू अरविंद यांनीं केला त्या तऱ्हेचा उपदेश—त्यांची स्वतःचीं इच्छा असेल त्याहीपेक्षां अधिकदां—त्यांनीं आपणाला करावा, अशाबद्दल आपणा सर्वांतर्फे मी त्यांना अंतःकरणपूर्वक आमंत्रण देतों.

# भक्ति

बुधवार ता. ५ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं, पुणें येथील सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत बाबू देवेंद्रनाथ सेन, एम्. ए., या बंगाली गृहस्थाचें 'भक्ति' या विषयावर व्याख्यान झालें; तेव्हां अध्यक्ष या नात्यानें बोलतांना लो. टिळक म्हणाले:—

वेळ बराच झालेला आहे, हा विषयही माझ्या अधिकारांतला नाहीं, तेव्हां त्यावर वेळ घालविणें बरोबर होणार नाहीं. बंगाल्यांत एम्. ए. झाल्यावर, व हायकोर्टांत वकिली केल्यावर भक्तीकडे वळलेले एक गृहस्थ आज तुमच्यापुढें आहेत. इंग्रजी शिक्षणाच्या सुरुवातीला इंग्रजी शिकणारे लोक प्रथम निराकार परमेश्वराच्या भक्तीकडे वळले होते. साकार परमेश्वराची भक्ति करणें आपल्या विद्येला शोभत नाहीं, आपण जें ज्ञान संपादन केलें त्या ज्ञानाचा व साकार परमेश्वराच्या भक्तीचा जोड मिळत नाहीं, असें ते म्हणत. याच विचारानें प्रार्थनासमाजाची उत्पत्ति झाली. या लोकांच्या अंगांत भक्ति मुळींच नव्हती असें नाहीं, पण त्यांना निराकार परमेश्वराची भक्ति करणें आवडले व त्यांनीं तशी चळवळ सुरू केली. पुढें बंगाल, वायव्य प्रांत व इकडेही साकार परमेश्वराची भक्ति शक्य आहे या विचारास सुरवात झाली. बंगाल्यांतील स्वामी विवेकानंद, बाबा भारती वगैरे गृहस्थांनीं या मताचें प्रवर्तन केलें. या गृहस्थाप्रमाणें जगभर फिरून आलेले किंवा त्यांच्या तोडीचे गृहस्थ आमच्याकडे झाले नाहींत, तरी पुढें प्रार्थनासमाजाचीं तत्त्वें या बाजूस ग्राह्य झालीं नाहींत, यावरून इकडलेंही वळण बदललें हें लक्षांत येईल. पाश्चात्यांच्या शिक्षणानें, पाश्चात्यांच्या ग्रंथांच्या वाचनानें, पाश्चात्यांच्या सहवासानें इंग्रजी शिकलेल्या आमच्या इकडील पहिल्या पहिल्या लोकांस निराकार भक्ति प्रिय झाली होती. ईश्वर निराकार आहे हा विचार ख्रिस्ती आहे व त्याच्या उलट विचार आहे तो आमचा आहे. या लोकांनीं प्रथम इंग्रजी ग्रंथांचें अध्ययन केलें व त्याचे संस्कार त्यांच्या मनावर झाले ते अधिक दृढ झाले.

## भक्तीचा भाग

प्रथम वाक्य आपल्यापुढे येतें त्याचा जो संस्कार आपल्या मनावर होतो तसा संस्कार दुसऱ्यांदा वाचल्याचा होत नाहीं. म्हणूनच लहानपणापासून विवक्षित वळणाचें शिक्षण द्यावयास पाहिजे असें म्हणत असतात. पहिल्या पहिल्यांदा इंग्रजी शिकलेल्या लोकांच्या मनावर पाश्चात्य शिक्षणाचे संस्कार झाले, व इंग्रजी पुस्तकांतील परंपरेनें प्राप्त झालेला संस्कार बरोबर आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां—तुलना करण्याकरितां—संस्कृत पुस्तकें यानीं पाहिलीं. पण पुढें हें मान बदलत चाललें. नंतर उपनिषदांतील वाक्यें, आधार घेऊन ब्रह्मसमाज काढण्यांत आला. यापुढें सर्व धर्मांतील रहस्यें एकत्र करून त्यांच्यांत तुलना करून उत्तमोत्तम तें ग्रहण करावयाचें असें एका पंथानें ठरविलें—अर्थात् रहस्यांची तुलना करून उत्तमाची निवड करण्याची अक्कल आपल्यांतच आहे असा यांचा समज होता. हा दुसऱ्या पिढीचा विचार झाला. पुढें, हीं सारीं तत्त्वें आमच्या धर्मांत आहेत आणि हा आमचा राष्ट्रीय धर्म आहे, असें म्हणणारी तिसरी पिढी निघाली. या पुढची पायरी म्हणजे ख्रिस्ती लोक ज्याप्रमाणें दूर दूरच्या देशांत मिशनरी पाठवून इतर धर्मांतील लोक ख्रिस्ती धर्माचे अनुयायी बनवितात, त्याप्रमाणें इतर देशांतील परधर्मीयांस हिंदु बनवावयाचें, ही होय. बाबा भारती हे याप्रमाणें अमेरिकेंत गेले होते व "प्रीती-संबंधाचीं वगैरे जीं तत्त्वें आमच्या धर्मावरून इतकीं समजत नाहींत तीं तुमच्या धर्मांत विशेष स्पष्ट—विशद—केलीं आहेत," असें अमेरिकन लोक आतां म्हणूं लागले आहेत. कृष्णाची लीला व गोपी संबंधींचा भाग पहिल्या पिढीच्या—इंग्रजी शिकलेल्यांपैकीं—लोकांना वाईट वाटत होता; पण आतां आजच्या व्याख्यात्यासारखे गृहस्थ, राधा आणि कृष्ण यांची प्रार्थना करूं लागले आहेत, यावरून विचारांची क्रांति कशी झाली आहे हें कळून येईल. 'मी भक्त नाहीं, मी धार्मिक गृहस्थ नाहीं, या विषयावर बोलण्याचा माझा अधिकार काय ?' म्हणाल, तर 'भक्ति' या विषयावर व्याख्यान झालें असतांना मी अध्यक्ष झालों एवढाच. मला अध्यक्ष होण्याविषयीं विचारण्यांत आलें तेव्हां मी 'नाहीं' म्हटलें असतें तर काय झालें असतें ? हें निराळें, पण मला 'नाहीं' म्हणवेना. असो. यज्ञयागादि कर्में, योग, हटयोग, ज्ञानयोग, यापेक्षां भक्तीचें महत्त्व अधिक तें कां व कशांकरितां ? डॉ. गर्दे यांनीं

सांगितल्याप्रमाणें वेदांपासून तो तुकारामाच्या अभंगांपर्यंत भक्तीचा भाग आढळतो. ज्ञान, कर्म, योग, भक्ति, यांत भक्ति ही श्रेष्ठ सांगितलेली आहे. 'श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः'। असें श्रीकृष्णांनीं भगवद्गीतेंत सांगितलें आहे. शूद्रांना भक्तीचा अधिकार आहे. बाह्य जातींनाही हा अधिकार आहे.

## भक्तीवांचून ज्ञान लंगडें

परमेश्वराच्या चरणीं लीन व्हावें, मी जग चालवीत नाहीं, मी संसार करीत नाहीं, अशी भक्ताची भावना होत असते. संसार सोडावा लागतो म्हणतात, माझें मत याहून अधिक आहे. माझ्या मतें संसार वाढविला पाहिजे, राष्ट्र म्हणजे एका देशांतील लोक, एवढ्यानें भक्ताचें समाधान होत नाहीं. धर्माच्या विचारानें परमेश्वर एक आणि आपण सारीं त्याचीं लेंकरें, असें झाल्यावर या विचारानें सर्व क्रिया होतात. अद्वैत हें भक्तीला विरुद्ध नाहीं. मी व परमेश्वर एक आहे, इतर सगळे व परमेश्वर एक आहे, असें कळलें म्हणजे पूर्वीची कुटुंबाबद्दलची बुद्धि बदलून त्यासंबंधांत शैथिल्य येईल. पण मग अनेक कुटुंबें स्वतःचीं होतात, मन अधिक उदात्त होतें, काम, क्रोध वगैरे जे 'रिपु' म्हटले आहेत ते जातात, आपण वरच्या वरच्या वातावरणांत जातो व पुढें या मार्गानेंच परमेश्वराची प्राप्ति होते. ज्ञान हें भक्तिवांचून लंगडें आहे; नुसतें ज्ञान उपयोगाचें नाहीं.

आपल्या बांधवाकरितां अंतःकरण तळतळणें, त्यांना मुक्ति मिळावी अशी इच्छा ठेवणें, त्यांना मोक्ष प्राप्त व्हावा व त्यांना भक्तीचीं साधनें मिळावींत असें वाटणें, हें भक्तीचें लक्षण आहे, तुकारामबोवासारख्यांनीं अमुकच कां केलें ? असा प्रश्न येईल. पण एका विषयाकडे तंद्री लागल्यावर जगांतील दुसऱ्या विषयांकडे लक्ष जात नाहीं, हें याचें कारण आहे. एखाद्या गांवढळानें 'तुम्हीं नांगर कां धरीत नाहीं ? इंग्रजी कां शिकलांत ?' असा प्रश्न आपल्यास करण्यासारखें हें आहे. न्या. मू. रानडे जज्ज होते. ते दुसरे कांहीं कां झाले नाहींत ? असा प्रश्न करण्यासारखें हें होईल. क्षुल्लक मनानें प्रश्न करावयाचा नाहीं आहे. परमेश्वर, भक्त व भक्ति, या तीन तऱ्हेनें या विषयाचा विचार करतां येतो. खरी भक्ति असेल तर त्यांत बाकीच्या सर्व कल्पनांचा अंतर्भाव होतो. एका रुपायांत आठ

आणी, चार आणी, दोन आणी यांचा अंतर्भाव सहजच होतो. आपण सर्व भावंडें आहों व परमेश्वर आणि आपण एक आहोंत हें ज्ञानांतील—धर्मांतील—उच्च तत्व आहे. परमेश्वरांत व माझ्यांत भेद नाहीं, ही बुद्धि व्यक्तिशः झाली; पण मी व माझे बांधव हे एक असें झालें पाहिजे—मी, माझे बांधव व परमेश्वर हें एक—असे झालें पाहिजे.

इतर धर्मांत व आमच्या धर्मांत फरक असा आहे कीं, इतर धर्मांतून एका विशिष्ठ व्यक्तीवर भाव ठेवण्यास सांगितलेलें आहे, आणि आमच्या धर्मांत तसें नाहीं. भक्ति ही भावना व तिचा विषय हीं इतर धर्म कायम करतात. आमच्या धर्मांप्रमाणें कृष्ण, गणपति, वगैरेंवर आम्ही सारखाच विश्वास ठेवतो. ही बुद्धि उत्पन्न होणें, जगांतील कर्तव्यें या तत्वांत लीन होणें, हें खऱ्या भक्तीचें तत्व आहे; आणि तें आमच्या धर्मांत अति उज्वल रीतीनें सांगितलें आहे. बुद्ध धर्मांत ज्ञानाचा अतिरेक आहे; इतर धर्मांतून हें तत्व नाहीं व या तत्वामुळें आपला धर्म विशेष महत्वाचा आहे. मनुष्याची वृत्ति किती वाढवितां येईल, हें भक्तितत्वांत सांगितलें आहे. स्पेन्सरसारखे विश्वांत लीन होतात; पण यापलीकडे कांहीं आहे—आणि हें आहे ही गोष्ट त्यांना कबूल आहे—त्यांत लीन झाल्यानें त्यामध्यें आपला व विश्वाचा दोन्हींचाही अंतर्भाव होतो. ज्याकरितां प्रत्येकाचा आत्मा आतुर झालेला असतो त्याकरितां बुद्धीला जागृत करून परमावधीप्रत पोहोंचविणें, सर्वांना सुखी करणें, ही भक्ति आहे. परमेश्वर ही कांहीं माझ्या-सारखी हात पाय असलेली एक व्यक्ति नाहीं; भक्तीनें परमेश्वराचें उच्च स्वरूप कळतें. ज्यांनीं या विषयासंबंधानें विचार केला आहे त्यांच्या हकीगतीवरून व अनुभवावरून महाराष्ट्रांत तरी याबद्दल शंका नाहीं.

# श्रीरामदास—‘ प्रवृत्ति व निवृत्ति ’

बुधवार, ता. २५ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं, पुणें येथील ओंकारेश्वराचें देवळांत श्री रामदासांच्या उत्सवानिमित्त रा. रा. सखाराम केशव दामले, बी. ए., एलएल. बी. यांचें व्याख्यान झालें. व्याख्यानाला विवक्षित विषय नव्हता. व्याख्यान संपल्यावर रा. ल. रा. पांगारकर, संपादक ‘मुमुक्षु’, यांनीं यावर कांहीं टीका केली, आणि नंतर लो. टिळक हे बोलावयास उभे राहिले. तेव्हां ते म्हणाले :—

सभ्य गृहस्थ हो ! व्याख्यात्याप्रमाणेंच माझी स्थिति झाली आहे. त्यांचें व्याख्यान जसे संकीर्ण झालें तसेंच माझेंही होणार आहे. माझें भाषण शेवटचें आहे, आणि संकीर्ण प्रकरणें हीं केव्हांही शेवटीच येत असतात. अध्यक्षासंबंधी सूचना करतांना मला ‘ अर्वाचीन रामदास ’ असा किताब देण्यांत आलेला आहे, पण—देणारानें तो कोणत्याही उद्देशानें दिलेला असो—त्याला मी पात्र नाहीं. हा विनय नव्हे. माझ्या अंगीं रामदासांची योग्यता नाहीं. जी वस्तुस्थिति आहे ती मी आपल्याला सांगतो. व्याख्यात्यांनीं धार्मिक विषयावर व्याख्यान दिलेलें नाहीं. तर त्यांनीं आपल्या व्याख्यानांत सद्यःस्थितीवर चार शब्द सांगितले आहेत. रामदासांचा उत्सव धार्मिक विशेष, हें नाकबूल करतां यावयाचें नाहीं; पण धर्म व राजकरण दोन नाहींत. ‘ All men are born equal ’ ‘ सर्व माणसें सारखीं ( सारख्या हक्काचीं ) जन्मलीं आहेत ’ हें इंग्रजी तत्त्व आहे; पण आमचें वेदांताचें तत्त्व यापेक्षां उदात्त आहे. त्यांत, सर्व माणसांचा आत्मा सारखा आहे, असेंच केवळ नाहीं, तर सर्व माणसें व प्राणी यांचा आत्मा सारखा आहे, असें सांगितलें आहे. जगांतील अत्यंत उदात्त विचारांची जर एखादी शाळा असेल तर ती वेदांताची होय. सामान्य व्यवहारापासून किंवा शास्त्रांतून उदात्त तत्वें काढण्याची खटपट करावयाची, यापेक्षां आत्म्याच्या संबंधांत अशी उदात्त तत्वें सांगतां आलीं तर तीं अधिक सोपपत्तिक व साधार होतील. हें अधिक चांगलें. वेदांतानें दुसऱ्याची मिळकत आपली होते, किंवा दुसऱ्याची बायको आपली होते, असें कोणी म्हणतात. पण हें खोटे आहे,—हा खोटा वेदांत

आहे. 'All men are equal' म्हणजे 'सर्व माणसें सारखीं आहेत' हें तत्व इंग्रज लोक हिंदुस्थानला लावतात तेव्हां 'All individuals are equally slaves' म्हणजे "सर्व माणसें एकसारखीच गुलाम आहेत" असें लावतातसें दिसतें. हा जसा मूळ तत्वाचा विपरीत अर्थ झाला; तसाच 'दुसऱ्याची मिळकत वेदांतानें आपली होते' म्हणणारांचा वेदांत विपरीत अर्थाचा—खोटा आहे. Representatives लोकप्रतिनिधी यांच्या सल्ल्यानें राज्यकारभार चालवावा हें तत्व इंग्रज लोक कबूल करतात, पण ते आम्हाला म्हणतात "तुम्ही लहान आहां व आम्ही तुमचे Representatives 'प्रतिनिधी' म्हणूनच येथें राज्य करीत आहों.' आमच्या धर्मतत्वाप्रमाणें राजाचा व माझा आत्मा सारखा आहे; राजाच्या विशिष्ट क्रियेनें त्याला अधिकार प्राप्त झालेला आहे, तशी क्रिया केल्यास दुसऱ्याला राजा होतां येतें. राजाच काय, परमेश्वर होतां येतें. मग काय राजा होतां येणार नाहीं ? निवृत्तींत प्रवृत्तीचा समावेश हात नाहीं, असें म्हणतां यावयाचें नाहीं. मोक्षाकरितांसुद्धां कर्मच करावें लागत असतें. राजा होणें ही अलीकडची पायरी आहे; श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे कीं,

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥

## खरा रामदासी कोण ?

एकदम परमेश्वराकडे कधींही जातां यावयाचें नाहीं. चांगलीं कर्में करावीं लागतात, संपत्तीचे भेदाभेद विसरावे लागतात, आणि असले उदात्त विचार धर्मापासूनच शिकावे लागतात. संसार तुच्छ मानावयाचा हें खरें, पण तो रस्त्यांत हिंडण्याकरितां नाहीं—मोक्षाकरितां तुच्छ मानावयाचा आहे. कांहीं तरी उच्च साध्याकरितां संसार तुच्छ मानावयाचा आहे. तसें न करतां संसार तुच्छ मानून कोणी रस्त्यांत भडकूं लागल्यास तें 'उदरनिमित्तं बहुकृतवेषः' पैकीं झालें. आपल्याला रामदासी म्हणवून जो अत्युच्च कल्पनेनें, हेतूनें, उच्च साध्याकरितां कार्य करण्यास प्रवृत्त झाला नाहीं, त्यानें रामदासांची थट्टा केली असें समजावें. श्री व्यासांनीं पोथी लिहिली ही पुराणिकांनीं पोटें भरण्याकरितां, असें कोणी म्हणतात; पण ही थट्टा झाली. व्यासांनीं पोथी या हेतूनें लिहिली नाहीं.

रामदासस्वामी यांनीं दासबोध लिहिला व तो खरा समजला तर एकट्या शिवाजीला समजला. रामदासांनीं महाराष्ट्रांत जागृति केली म्हणजे लोकांना गंध लावायला शिकविलें असा अर्थ नाहीं. तुकारामांना हा अर्थ अभिप्रेत नव्हता. उच्च कल्पना, अत्युच्च कल्पना लोकांस शिकवून त्या त्यांच्यांत खेळूं देणें—जातीजातींतील भेद नाहींसे करून आपण सारे एकच आहों असें वाटावयास लावणें, हें खरें धर्म-शिक्षण आहे. इंग्रजी तत्त्ववेत्यांनीं हीं तत्वें सांगितलीं आहेत. आणि तीं आपल्या उपयोगाचीं आहेत. हीं तत्वें पूर्वी आपल्यांत होतीं. पण तीं आपण विसरलों आहों. मनाचें संकुचितत्व टाकून मन उदार करावयाचें, आपल्या भाईबंदांच्या दुःखाबद्दल दुःख वाटावयाचें, हें साधुसंतांचें लक्षण आहे. 'जे का रंजले गांजले' आणि 'त्यासि म्हणे जो आपुले,' जो सगळ्या लोकांच्या सुखानें सुखी होतो, जो लोकांच्या दुःखानें दुखी होतो, लोकांना कष्ट झाले असतां ज्याला कष्ट होतात, तो साधू समजावयाचा. सर्वांच्या सुखाची विवंचना करणें, ह्याचा ज्यांनीं उपदेश केला व धर्म आणि राजकारण हीं दोन नाहींत, असे ज्यांनीं शिकविलें, त्यांचा हा उत्सव आहे. हे उत्सव दरवर्षी करावयाचे याचा अर्थ—डॉक्टरी भाषेंत बोलावयाचें म्हणजे—रामदासांनीं जे गुण सांगितले आहेत ते अंगीं येईपर्यंत, त्यांच्या विचा-रांचा हा 'डोझ' गुण येईपर्यंत वारंवार पुनः पुनः द्यावयाचा—repeat कराव-याचा—असा आहे. हे उत्सव कोठपर्यंत करावयाचे ? तर रामदासांच्या शिष्यां-सारखे उच्च हेतूनें प्रेरित होऊन तुम्ही सर्व हिंदुस्थानभर हिंडू लागाल तोंपर्यंत —तुम्ही असें करूं लागला म्हणजे मग उत्सवाचा परिणाम झाला.

## निवृत्तींत प्रवृत्ति असते

निवृत्तिमार्गांत प्रवृत्तिमार्ग येतो; पण निवृत्तिमार्ग म्हणजे काय ? हें मात्र नीट समजले पाहिजे. **निवृत्ति कशापासून ? काम, क्रोध वगैरेपासून, स्वार्थ व संकुचित विचार यांपासून. जगापासून निवृत्ति नव्हे.** तसें असतें तर आत्महत्या केली असती; पण तशी आत्महत्या कोणत्याही साधूनें केलेली नाहीं. संसारांतील काम, क्रोध वगैरेपासून निवृत्ति करावयाची आहे. मिल्ल, स्पेन्सर यांनीं तत्त्वें सांगितलीं आहेत; पण तीं कमी दर्जाचीं आहेत; त्यापेक्षां साधुसंतांची योग्यता अधिक आहे. मिल्ल हा 'ईस्ट इंडिया कंपनी'चा नोकर होता

स्थळ प्रत

व त्यानें जीं कांहीं तत्वें प्रतिपादिलीं आहेत त्या तत्वांकरितां त्याला मान आहे. पण आपल्या साधूंनीं प्रतिपादिलेलीं तत्वें धर्माकरितां, परमेश्वराकरितां, प्रतिपादिलेलीं असून तीं अधिक योग्यतेचीं आहेत. निवृत्तींत प्रवृत्ति नाहीं, असें मानणें चूक आहे. **निवृत्तींत प्रवृत्ति आहे हें रामदासांनीं सांगितलें आहे.** आपण सर्व एक आहों, इंग्रज व आपण सारखे आहों, आज विवक्षित कर्म केल्यामुळें जर इंग्रज राज्य करीत असतील तर आपण तसें कर्म केल्यास आपलें राज्य होईल, हें धर्म शिकवितो. ज्या धर्मानें परमेश्वर होतां येतें तो धर्म काय राजा होऊं देणार नाहीं ? पांच रुपयांकरितां आपल्या देशबांधवांची चुगली सांगण्यास, आपल्या देशबांधवांचें गळे कापण्यास मनुष्य तयार होतो; तसें त्यानें होऊं नये, असें पाहिजे असल्यास तें धर्म शिकवील. स्वार्थत्याग करावयास जो मनोनिग्रह लागतो, तो मनोनिग्रह धर्म शिकवील. योगानें अगर धर्मानें जर मनोनिग्रह अंगीं येईल तर मनुष्य नुसता धार्मिक नाहीं तर उत्तम नागरिक होईल. धर्म मन तयार करतें. मग काय काम करावयाचें, हें परिस्थितीवर अवलंबून आहे. धर्म काय सांगतो ? तूं स्वतंत्र आहेस, मायेचें पटल आलें आहे, तें सोडून दे. संसारांतील लोभाची, क्रोधाची, स्वार्थाची बुद्धि टाकून द्यावी; परमेश्वर होण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं आहे, परिस्थितीनें रडूं लागलास तर तें चूक आहे; हें धर्मानें कळून येईल. धर्माचीं तत्वें अधिक उच्च, उदात्त व योग्यतेचीं आहेत. तत्वज्ञानानेंही हेंच कळतें.

व्याख्यात्यांनीं सेल्बी साहेबांविषयीं सांगितलें. ते तत्वज्ञानी असले तरी आपल्या देशापुरते आहेत; तें पुस्तकी तत्वज्ञान आहे. रामदास स्वामीसारखे संत हे जगाचे तत्वज्ञानी होत; त्यांचें तत्वज्ञान सर्व जगाकरितां असतें; हिंदी पुढाऱ्यांच्या मागें विद्यार्थ्यांचें शेपूट असतें, असें म्हणून सेल्बीसाहेब या शेपटाचा उपहास करतात. कां ? तर पुढाऱ्यांच्या मागचें हें शेपूट काढून त्यांना आपल्या मागें लावावयाचें आहे ! पुढाऱ्यांच्या मागें विद्यार्थी जातात, ते त्यांना आपल्या मागें जावयास पाहिजे आहेत. हा स्वार्थसाधूपणाचा वेदांत आहे. इंग्रजी गुरूंत असे पुष्कळ आहेत. दासबोधांत बऱ्याच प्रकारचे गुरु सांगितलेले आहेत, पण मोक्षगुरुचा मान राजगुरुला किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या 'गुरूला' दिलेला नाहीं. 'गुरुः साक्षात् परब्रम्ह' खरा, पण तो कोणता ?

सर्वांना सारखे लेखील तो. पण या गुरूंचें तत्वज्ञान इंग्रजाकरितां निराळें आणि आमच्याकरितां निराळें! हे 'वेतनगुरु' आहेत. ते विद्वान आहेत—कारण विद्वान नसते तर असल्या कोट्या त्यांना करतां आल्या नसत्या—असल्या कोट्या करतात, यावरूनच त्यांची विद्वत्ता दिसून येते—पण ते इंग्रजांचें वेतन खात आहेत, त्यांनां इंग्रजांची छाप वाढवावयाची आहे. ते खरें बोलत नाहींत, बोलले तर संदिग्ध बोलतात. या गुरूंनीं दिलेलें शिक्षण आम्हांस पुरेसें नाहीं, आणि म्हणूनच राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता आहे. आपला अधिकार काय व राज्यकर्त्यांचा अधिकार काय, राज्यकर्त्यांच्या बरोबरीचे आपण कसे होऊं, हें शिकविणारें—राष्ट्र बनविण्यासारखें जें शिक्षण—तें राष्ट्रीय शिक्षण. अमेरिकेंतील विद्यार्थ्यांना प्रथम Declaration of Independence 'स्वतंत्रतेची द्वाही' शिकवितात; तिकडच्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सुरुवात अशी होते. इकडे आम्हाला इंग्रजांनीं लिहिलेला इतिहास शिकविला जातो, आणि त्यांतून काय असतें तर "तुम्ही सर्व लोक आपआपसांत भांडत होता व म्हणून इंग्रज हिंदुस्थानांत आले आणि पुढें शेवटपर्यंत ते राहिले पाहिजेत."

## हिंदुस्थानाच्या धर्माची स्थापना

राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें जातां जातां एक गोष्ट सांगतो. व्याख्यात्यांनीं म्हटलें कीं राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें इकडे असावी तशी चळवळ नाहीं, पण याचा उपक्रम येथें होणार आहे. आम्ही उद्यां त्याकरितां सोलापुरास जात आहों. प्रो. विजापूरकर यांनीं 'समर्थ विद्यालय' स्थापिलें आहे—त्यांच्या संस्थेला रामदासांचेंच नांव दिलेलें आहे—आणि त्याच्या शाखा सर्वत्र स्थापावयाच्या आहेत. रामदासांनीं हजार दोन हजार लोक शिष्य केले म्हणजे तितक्या सर्वांना लिहितां वाचतां येत होतें किंवा त्यांना लिहावयाला वाचावयाला शिकविलें असें कांहीं नाहीं. **राष्ट्राबद्दल—स्वदेशाबद्दल—प्रीति उत्पन्न करणें, हें राष्ट्रीय शिक्षण होय;** आणि देशाबद्दल प्रीति उत्पन्न करणें म्हणजे संसाराची प्रीति कमी करणें आहे. ही पायरी झाल्याशिवाय—मधली ही पायरी ओलांडल्याशिवाय—परमेश्वर होतां येत नाहीं. सूर्य प्रकाशतो पण आपल्या प्रकाशानें लोकांचें फार हित होतें, आपल्या प्रकाशण्याचा लोक नानाप्रकारे उपयोग करून घेतात, हें त्याला ठाऊक नसतें

असें एक म्हणतात. तसें धर्म माणसाला करतो. धर्मानें मनाचें संकुचितत्व जातें. या शिक्षणाचें काम राष्ट्रीय शिक्षणानें झालें पाहिजे आहे. बंगाल्याच्या मानानें आपण मागें आहों, हें मला कबूल आहे; तसा प्रयत्न झाला पाहिजे आहे. या उत्सवापासून रामदासांना कांहीं फायदा नाहीं. ते मुक्त झाले असतील किंवा नसतील, पण त्यांना या उत्सवाचा कांहीं फायदा नाहीं. त्यांचें लक्ष आपल्याकडे असल्यास त्यांची त्या वेळची इच्छा सफल करण्याचा प्रयत्न आपण करतांना त्यांनीं पाहिलें तर त्यांना आनंद होणार आहे. रामदासांच्या वेळेसारखी हल्लींची वेळ आहे; आणि त्यांच्या प्रयत्नासारखे प्रयत्न हल्लीं झाले पाहिजेत. शिक्षणाचें काम झालें पाहिजे. धर्माची नव्हे—महाराष्ट्र धर्माची—महा म्हणजे मोठ्या, राष्ट्राच्या म्हणजे साऱ्या हिंदुस्थानाच्या धर्माची स्थापना व्हावयास पाहिजे आहे. देशाची उन्नति व्हावी, राष्ट्राची उन्नति व्हावी, बंधुत्वाची उन्नति व्हावी व आत्मा या पायऱ्यांतून जाऊन मुक्त व्हावा, असें झालें पाहिजे आहे. **तरुण पिढीपैकीं कित्येक तरुण जर सर्व देशभर रामदासांच्या अनुयायांसारखे संचार करून देशकार्य करावयास पुढें येतील, तर या उत्सवाचा उपयोग झाला असें मी समजेन.** तरुण पिढीनें जर निश्चय केला, तर आम्हांला करतां आलें नाहीं तें त्यांना करतां येईल. परमेश्वराच्या कृपेनें सर्व होत आहे. त्याच्या कृपेनें असें होवो, अशी इच्छा प्रदर्शित करून मी आपलें भाषण पुरें करतों.

# श्रीरामदासस्वामी यांची कामगिरी

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं, सोलापूर येथील म्युनिसिपल दवाखान्यासमोरील पटांगणांत रा. ब चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष महाराज आणि सद्गृहस्थहो ! डॉ. रानडे यांनीं सांगितल्याप्रमाणें हा सुयोग प्राप्त झाला आहे, पण हा सुयोग जुळवून आणलेला नाहीं. परमेश्वराची कृपा म्हणून हें जमलें आहे. चांगले पुरुष जे आहेत, जे सत्पुरुष आहेत, त्यांचा शब्द आधीं मग अर्थ असतो. 'ऋषीणां पुनराद्यानां वाचमर्थोनुधावति ' अशी त्यांची स्थिति असते. त्यांनीं कोणाला आशीर्वाद द्यावा आणि तो मागाहून सफल व्हावा, अशा तऱ्हेचा आजचा हा योग आहे, असें मी समजतो. आम्ही आलो तो दासनवमीचा योग येईल, असें चिंतून आलो नाहीं. हा योग मागून जुळून आला आहे. ह्या योगावरून आमच्या कार्यास यश येईल अशी आशा वाटते. पुढें चांगलें होणार असलें म्हणजे आधीं स्वप्न पडतें किंवा भावी कार्याचीं ज्याप्रमाणें पूर्वचिन्हें अगोदर दिसूं लागावीं, त्याप्रमाणें हें आहे. आम्ही ज्या कार्याकरितां येथें आलों आहों त्यासंबंधीचे शब्द कदाचित् माझ्या व्याख्यानांत येणार नाहींत. आजचा विषय दासनवमीला, आजच्या परिस्थितीला व आमच्या कार्याला अनुसरून होईल. मी आज श्री समर्थांची कामगिरी सांगणार आहे. रामदासांच्या कामगिरीसंबंधानें थोडाबहुत बोध आपणांस बखरीवरून झाला असेल. पण मी आतां ज्या गोष्टी सांगणार आहे त्या बखरींतील नव्हेत. समर्थांचें तपोबल, त्यांचा शिष्यगण, त्यांची राहणी, त्यांचें योगसामर्थ्य, श्रीशिवाजीसारख्या शिष्याची प्राप्ति व त्यांची निष्ठा, या गोष्टी बखरींत आहेत. पण मला आज जें सांगावयाचें आहे, तें निराळें आहे. याच बखरींचा—चरित्राचा—इतिहासदृष्ट्या थोडासा विचार करावयाचा आणि आपल्या डोळ्यांपुढील महाराष्ट्र देशांतील मराठ्यांची प्रसिद्धि होण्याला श्रीरामदासांनीं काय काय केलें याचें निरूपण करावयाचें, असा माझा विचार आहे.

## समर्थांचें तपोबल

आपण पहिल्यानें महाराष्ट्राची स्थिति तेव्हां कशी होती हें पाहूं. रामदासांच्या जन्माच्या वेळीं महाराष्ट्र पारतंत्र्यांत निमग्न झाला होता. त्यांतून सोडविण्याकरितां ज्या थोर विभूति परमेश्वरानें पाठविल्या त्यांतील पहिलें स्थान श्रीरामदासांना दिलें पाहिजे. परमेश्वराचे अवतार वारंवार होत नसतात. ते विशिष्ट काळीं, विशिष्ट प्रसंगीं व विशिष्ट ठिकाणीं धारण करावे लागतात. समुद्रांतील वेद गिळणाऱ्या माशांचा संहार करण्याकरितां मच्छ अवतार घ्यावा लागला, प्रल्हादाकरितां नारसिंह अवतार स्वीकारावा लागला. परमेश्वराचे लोकस्थितीप्रमाणें व परिस्थितीप्रमाणें निरनिराळे अवतार होत असतात. अर्थात् महाराष्ट्र वर काढण्याकरितां ज्या गुणाची आवश्यकता होती तशा गुणांनीं परिपूर्ण अशी विभूति त्यावेळीं अवतीर्ण झाली. देशास पारतंत्र्य असलें म्हणजे त्या देशाची एक तऱ्हेची वाईट दशा होत असते. धर्माचा त्राता नाहींसा होतो, उद्योगाचा त्राता रहात नाहीं व लोकांस पोटभर कसें मिळेल हे पहाणाराही कोणी रहात नाहीं. व्यापार, हिंमत, उमेद या सर्व बाजूनें देशाचा ऱ्हास चाललेला असतो. अशा वेळीं देश वर आणण्यास केवळ धर्मबुद्धि असून चालत नाहीं. मी धर्मबुद्धि वाईट आहे असें ह्मणत नाहीं. पण या वेळची स्थिति ( श्रीरामदासांच्या वेळची स्थिति ) केवळ धर्मग्लानीची नव्हती. धर्माचीच ज्यावेळीं ग्लानि होती त्यावेळीं श्रीशंकराचार्यांचा अवतार झाला, पण ज्यवेळीं धर्माबरोबर इतर अनेक गोष्टींचीही हानि होते, त्यावेळीं एकच दिशेनें विचार करणारा अवतार होऊन चालत नाहीं. महाराष्ट्राच्या या विपन्नकाळीं एक विशिष्ट प्रकारचा मनुष्य उत्पन्न होणें जरूर होतें, त्याकाळीं तशा प्रकारचा पुरुष निर्माण होऊन त्यानें त्यावेळीं देशाचें रक्षण केलें एवढेंच नाहीं तर महाराष्ट्राचें आज जें कांहीं नांव आहे तें त्या पुरुषाच्या परिश्रमाचें, तपोबलाचेंच बीज आहे.

## युक्ति व शक्ति यांचा संयोग

महाराष्ट्र देशाला, तो विपन्न झाला असतां, निराश होण्याचें कारण नाहीं. “परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृतां ॥ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि

युगे युगे ॥ ' असें प्रत्यक्ष ईश्वरानें आपणांस सांगितलें आहे. याठिकाणीं ' युगे युगे ' याचा ' वेळोवेळीं ' असा अर्थ आहे. आमचीं कर्में आम्ही बरोबर करीत असतां, आमच्या हातून कोणताही अपराध झाला नसतां, आमच्यावर येणाऱ्या विपत्ति काढून टाकण्याकरितां परमेश्वर अवतार घेत असतो. यासंबंधी आमची खात्री आहे. धर्म आम्हांस तेंच सांगत आहे. वाईट वेळीं परमेश्वराला तुमचें स्मरण येऊन तुमचें संरक्षण करण्यास तो विसरत नाहीं. श्रीरामदासाच्या चरित्रापासून पहिला बोध जो घ्यावयाचा तो हा आहे. या महाराष्ट्रास परमेश्वर विसरला नाहीं. तो वाट पहात आहे कीं तुम्ही उद्योग करीत आहां कीं नाहीं ? तुम्ही आपलें कर्तव्य केल्यावर तो आपलीं हजारों कामें बाजूस ठेवून जन्म घेईल, हें तत्त्व श्रीरामदासांच्या चरित्रावरून शिकण्यासारखें आहे. धर्माचा व राष्ट्राचा त्राता कोणी उरला नाहीं, चांगल्या लोकांचा इलाज खुंटला, अशी जेव्हां वेळ आली, तेव्हां परमेश्वरानें ही जोडी—श्रीशिवाजीमहाराज व श्रीसमर्थ रामदासस्वामी ही जोडी—निर्माण केली. श्रीतुकाराम, ज्ञानदेव, वगैरे पूर्वीच्या साधुसंतांचा इतिहास आपणास ठाऊक आहेच. त्यांनीं आपापलीं कार्ये केल्यावर रामदास आणि श्रीशिवाजी ही जोडी निर्माण झाली. भगवद्गीतेंत ' यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः । तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ असें म्हटलें आहे. अशी जोडी असली, एक युक्ति ( योग ) सांगणारा व दुसरा शक्ति ( पार्थ ) दाखविणारा असला किंवा **युक्तीचा आणि शक्तीचा संयोग** झाला—अथवा जेथें होतो—तेथें श्रीः, विजय, यांचा संभव होऊन राष्ट्र उदयास येते, तें संपन्न होतें, त्यास वैभव प्राप्त होतें.

## गीतेंतील जोडी

गीतेंतील ही जोडी आमच्या या महाराष्ट्रांत दोनशें वर्षांपूर्वी होऊन गेली. या जोडीस श्रीकृष्ण आणि अर्जुन यांची तुलना योग्य आहे. त्या जोडीप्रमाणेंच श्रीरामदासस्वामी व श्रीशिवाजीमहाराज यांचीं कर्तव्यें भिन्न भिन्न होतीं. श्रीशिवाजी महाराजांनीं आपल्या शौर्यानें, आपल्या देशप्रीतीनें, आपल्या कर्तबगारीनें त्या वेळच्या त्रास देणाऱ्यांचा संहार केला आणि त्यांचें करणें योग्य आहे, तसेंच

केलें पाहिजे, अशी युक्ति देणारे श्रीरामदास होते. अशा तऱ्हेचा योग नेहमीं आपल्या नजरेस येत नाहीं. कधीं युक्ति असते तर शक्ति नसते, व कधीं शक्ति असली तर युक्ति नसते. पेशवाईच्या अखेरीस युक्ति होती—नाना फडनवीस होते—पण शक्ति नव्हती. एका वेळीं शक्ति होती पण युक्ति नव्हती. शहाजी-महाराज हे याचें उदाहरण होते. त्यामुळें त्यांना यश प्राप्त झालें नाहीं. ते सामर्थ्यानें कांहीं कमी नव्हते. पण रामदासांच्या काळीं शक्ति आणि युक्ति यांची जोडी उपलब्ध झाली होती. यांपैकीं शक्तीचा भाग मी सोडून देतो आणि केवळ युक्तीच्या भागाकडे वळतों. युक्तीलाच योग म्हणतात. समर्थ मोठे योगी होते, त्याच योगानें महाराष्ट्र वर आला. पाठीमागील साधुसंतांनीं धर्माचाच योग शिकविला, तो व्यावहारिक नव्हता. पण धर्म आणि व्यवहार यांची जोडी घालण्याची वेळ येतांच ती जोडी घालण्याचा योग रामदास स्वामींनीं शिकविला. धर्म आणि व्यवहार यांची जोडी कशी घालावयाची हें रामदासांनीं शिकविलें. घराचें दार बंद करून उपासना केली कीं काम संपलें, घराबाहेर कोणाचेंही राज्य असो, बाहेर वाटेल त्या आपत्ति येवोत, त्यांचा धर्माशीं कांहीं संबंध नाहीं, असा एक पूर्वी समज असे. धर्माचा इतर व्यवहाराशीं कांहीं संबंध नाहीं; राजकीय व्यवहार, देशाची कल्पना यांचा धर्मांत अंतर्भाव होत नाहीं, अशा प्रकारची कल्पना किंवा कुकल्पना पूर्वी आमच्यांत शिरली होती व अलीकडेही अशी कल्पना आमच्या शाळांतून शिरली आहे.

## धर्मांतील उच्च तत्त्वज्ञान

धर्मामुळें तंटे होतात, हें म्हणणें बरोबर नाहीं, असें म्हणणें वाईट आहे. तंटे होतात—तंटे ज्यांना करावयाचे आहेत त्यांच्या कृत्यांमुळें ते होतात, धर्माचें रहस्य तंट्यांत नाहीं, तें एकी करण्यांत आहे. 'वसुधैव कुटुंबकम्' हें तत्त्व धर्म शिकवितो. माणसांमध्यें तंटे लावून देण्याकरितां ईश्वरानें धर्म निर्माण केला नाहीं. ज्यांच्या धर्मांत असें सांगितलें नाहीं, अशा लोकांनीं हें खूळ उठविलें आहे. इतर धर्म खोटे, इतर धर्मांचे लोक नरकाला जाणार, असें आमचा हिंदुधर्म शिकवीत नाहीं. तंटा करणारा धर्म आमचा कीं इतरांचा याचा विचार आपण करावा. धर्माखेरीज लोकांच्या मनांत चांगल्या

कल्पना उत्पन्न होत नाहींत. अति उच्च कल्पना इंग्रजीत तत्त्वज्ञानाच्या ग्रंथांतच सांपडतात असें प्रतिपादण्याचें आमच्यांतील इंग्रजी शिक्षण मिळालेल्या कांहीं ग्रॅज्युएटांनीं धाडस केलें. प्रत्येक मनुष्य सारख्या योग्यतेचा व स्वतंत्र जन्मलेला असा आहे, अशा तऱ्हेचीं स्पेन्सर, मिल्ल वगैरेंचीं तत्त्वें आम्हांस मोठीं मोहक वाटतात, तीं मनाला एकदम गांगरवून सोडतात, लिहिणाराबद्दल पूज्यबुद्धि उत्पन्न करतात. पण जुने रामदासस्वामींचें ग्रंथ वाचल्यास राष्ट्र ही कल्पना, मनुष्य जन्मतःच स्वतंत्र व ते सर्व सारखे आहेत, ह्या कल्पना आपल्या धर्मापासून शिकण्यासारख्या आहेत असें समजून येईल. खिस्ती धर्मांत असें सांगितलें नाहीं म्हणून अशा तऱ्हेचीं तत्त्वें त्यांना निराळे ग्रंथ लिहून सांगावीं लागतात. खिस्ती राष्ट्रांताल राजकीय तत्त्वें धर्मग्रंथांतून निघालीं नाहींत. रशियांतील लोक, युरोपांतील राष्ट्रांना बिगरख्रिस्ती अगर Unchristian असें म्हणतात. युरोपियन राष्ट्रें राजकारणांत धर्म आणूं शकत नाहींत. अमेरिकन लोकांच्या जाहिरनाम्यांतही सर्व मनुष्यें, सर्व प्राणी स्वतंत्र निर्माण केले आहेत असें वाक्य आहे. बायबलांत हीं तत्वें निराळ्या रीतीनें सांगितलीं आहेत. पण ख्रिस्ती राष्ट्रें हें तत्व सोडून देतात, किंवा स्वतःपुरतें स्वीकारतात. पहिल्यानें रामदासांनीं हिंदु धर्माचें पुनरुज्जीवन केलें. भक्तिरूप मार्गांत जातीचा भेद नाहीं, हें श्रीरामदासांनीं शिकविलें. रामाचा किंवा पंढरीचा भक्त कोणीही होऊं शकतो. या धर्मांत असें तत्व आहे कीं ज्याला मोक्षप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाहीं. देश आणि देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्वप्रकारें धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों. उदात्त विचार विकसित करून संसारांतून वर वर नेऊन ईश्वरप्राप्ति करून घ्यावयाची आहे, असें धर्माचें तत्व आहे. मनुष्याचा परमेश्वर होऊं शकतो. आज जमलेल्या हजारों लोकांचा व माझा आत्मा भिन्न नाहीं. सगळ्या मनुष्यांचा आत्मा एक आहे. तो मीच आहे, मी तो आहे, हें नातें ओळखणारा अधिक तत्वज्ञ व देशाचा अधिक हितकर्ता असें म्हणण्यास हरकत नाहीं. वेदांताचीं हीं तत्वें व्यवहारांत कशी लावावी हें जर कोणी सांगितलें असेल तर तें श्रीरामदासांनीं. दासबोध हा ग्रंथ केवळ धर्मासाठीं अगर केवळ व्यवहारासाठीं लिहिलेला नाहीं. जे आपल्या देशाकडे पहात नाहींत, 'जे कां रंजले गांजले त्यांस'

आपले म्हणत नाहींत, **आपले हजारों देशबांधव विपन्नावस्थेंत असतांना जे नाक धरून घरांत बसतात ते ढोंगी आहेत.** अशा प्रकारची बुद्धि उत्पन्न करणें म्हणजे राष्ट्र जिवंत करणें आहे. मरणोन्मुख राष्ट्र जिवंत होण्याची वेळ येते तेव्हां या तत्वाची ओळख करून द्यावी लागते.

## दासबोधानें काय शिकविलें ?

आपणांस लागणारे सामर्थ्य धर्माखेरीज येत नाहीं. शरीरसामर्थ्याचें मी आतां वर्णन करीत नाहीं, पण युक्तीचें सामर्थ्य प्रत्येकास येण्यासारखें आहे. त्याकरितां मन मोठें झालें पाहिजे. समाजाची स्थिति सुधारण्याची कर्तव्यबुद्धि जागृत झालेला प्राणी काय करूं शकेल आणि काय नाहीं याचा वाद व्यर्थ आहे. सर्व कांहीं आपल्या हातांत आहे. 'तुम्ही अशक्त आहां, दुर्बल आहां, तुमच्या हातून कांहीं व्हावयाचें नाहीं, तुम्ही कांहीं न करतां स्वस्थ बसावें, केव्हां तरी परमेश्वर प्राप्त होईल, असें समर्थांनीं कधीं सांगितले नाहीं. आत्मा, तुम्ही व देश यांस लागणारी शक्ति तुमच्याजवळ आहे; पण निश्चय पाहिजे—वेळेस मरावयालाही तयार झाले पाहिजे. परमेश्वरावर दृढ विश्वास पाहिजे. इतकी तयारी झाल्यास यश खात्रीनें येईल. धर्माचरणाची व्याख्या श्रीरामदासांच्या चरित्रावरून करावयास पाहिजे. संसारांत पडावयाच्या प्रसंगीं 'सावधान' या शब्दोच्चारावरून ते सावध झाले व बायकापोरांच्या संसारापासून ते निवृत्त झाले. पण महाराष्ट्राच्या संसारापासून ते अलिप्त नव्हते. या कामीं आपणास मनोनिग्रह करावा लागतो व तो धर्माचरणाखेरीज होत नाहीं. योगामुळें मन ताब्यांत कसें आणावें हें कळतें. श्रीसमर्थांनीं असली नीति दोनशें वर्षांपूर्वी आपल्या ग्रंथांत नमूद केली आहे. आपण लोभांत गुंतूं नये. कर्तव्य आणि लोभ यांतील भेद लक्षांत असावा. लोभी अनेक प्रकारचे आहेत. राष्ट्राचें नुकसान होत असले तरी केवळ आपलें एक महिनाभर पोट भरण्याकरितां राष्ट्राशीं जे बेइमान होतात त्यांस बिलकूल धर्मशिक्षण नाहीं असें समजावें.

## मन तयार करा

अलीकडे शाळांतून धर्मशिक्षण देण्यांत येत नसून युक्तायुक्तता शिकविण्यांत येत आहे. त्यामुळें 'मला देशाची काय जरूर आहे?' अशा

तऱ्हेचे विचार उत्पन्न होऊन दहा पंधरा रुपयांकरितां देशाची चहाडी सांगण्यास कांहीं लोक तयार झालेले आहेत. अन्यायाचा प्रतिकार करण्याचें त्यांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं; सामर्थ्य निश्चयाचें असतें. आपल्या देशांत पुष्कळ पशु आहेत; पण मनुष्यास जें सामर्थ्य येतें तें त्याच्या डोक्यांतील मगजामुळें येतें—त्याकरतां मन स्थिर आणि घट्ट पाहिजे, त्याला चांगल्या रीतीनें वागण्याची संवय लागली पाहिजे, बरें–वाईट हें लहानपणीं कळलें पाहिजे, आणि त्याप्रमाणें त्याच्या हातून क्रिया घडली पाहिजे. पण कोणीतीही राज्यपद्धति अगर देश घ्या—अलीकडे शंभर वर्षांत हे धर्माची बाब झुगारून देऊं लागले आहेत; पण धर्माचे फायदे फार आहेत. त्यामुळें मन तयार होतें. अशा तऱ्हेनें तयार झालेलें मन कोणत्याही विषयाकडे वळल्यास खरें कोणतें, खोटें कोणतें हें त्यास समजतें. वेदांतही हें सांगितलें आहे. 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः'. आपलें मन तयार नसलें म्हणजे आपणांस परमेश्वर आणि आपला आत्मा एक आहे असें समजत नाहीं. मन इतकें तयार नसल्यामुळें मन हें बंधास कारण आहे असें म्हटलें आहे. हाच न्याय राजकीय बाबतींत आहे. मनें तयार होतील तर स्वातंत्र्य तुमच्याजवळ ठेवलेलें आहे. तीं तयार नसतील तर पारतंत्र्याच्या रज्जूनीं तुम्ही आंवळलेले असाल. रामदासांनीं राष्ट्राचीं मनें तयार करण्याचें काम केलें. शिवाजी महाराजांची सेना व त्यांची प्रजा त्यांनीं निर्माण केली–तिचीं मनें बदलून तीं त्यांनीं निर्माण केलीं. हें काम शिक्षणानें होणार आहे. रामदासांनीं शाळा काढल्या नव्हत्या. त्यांची हजार—बाराशे शिष्यमंडळीं हिंडत असत. दर जिल्ह्यास शंभर सवाशें फिरते शिष्य लोकांस स्वराज्याचा, स्वातंत्र्याचा आणि मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविण्यास हिंडत असत. ते प्रत्येकाच्या दारोदार हिंडत होते व प्रत्येकास त्याचें कर्तव्य ते शिकवीत असत. त्यांनीं लिहावाचायला शिकविलें नाहीं. त्यांनीं राष्ट्राचा अभ्युदय कशानें होईल, तें संपन्न कसें होईल, हें शिकविलें.

## देशाचा संसार

मनें तयार करण्याची युक्ति दोनशें वर्षांपूर्वी रामदासांनीं अमलांत आणली होती. आपण श्रीरामदासांचा उत्सव करतों तो त्यांचा मान करण्याकरतां करीत

नाहीं. तुमच्या मानाची अगर गौरवाची त्यांना अपेक्षा नाहीं. आपण अशांचे उत्सव करतो ते त्यांच्या चरित्रापासून आपणांस कांहीं स्फूर्ति व्हावी, आपला भाग्योदय व्हावा म्हणुन करीत असतों. श्रीसमर्थांचा हा उत्सव धार्मिक आहे. श्रीशिवाजी महाराजांचा उत्सव राजकीय आहे. पण धार्मिक आणि राजकीय उत्सव हे आपणास विभक्त करतां येणार नाहींत. शरीराच्या डाव्या उजव्या अंगाप्रमाणें ते चिकटलेले आहेत. धर्माची मदत घेऊन मनें तयार करून खऱ्या वेदांताची ओळख करून देऊन, लोकांना संकटांतून पार पाडण्याचें काम महाराष्ट्रांत झालेलें आहे. पुढें रामदास होतील. पण तोपर्यंत आपण आपल्या सामर्थ्याप्रमाणें, मगदुराप्रमाणें, आपआपलें काम करण्याच्या उद्योगास लागलें पाहिजे. आज कांहीं अंशीं महाराष्ट्राची स्थिति दोनशें वर्षापूर्वींच्या स्थितीसारखी झाली आहे. मुसलमानी अमदानीपेक्षां हल्लीं सडका आणि पोस्ट ऑफिसें अधिक झालीं आहेत. पण स्वतःचें राज्य नसल्यामुळें होणारे दुष्ट परिणाम नजरेस येऊं लागले आहेत. अशा वेळीं आपण आपल्यापुढें श्री रामदासांचा कित्ता ठेवला पाहिजे, व त्यांनीं घालून दिलेला धडा गिरवला पाहिजे, तर पुढचें काम दुसरी कोणती तरी विभूति उत्पन्न होऊन ती पूर्ण करील. आपण आपली निरनिराळीं मनें एक आहेत असें नजरेस आणून दिले पाहिजे. प्रत्येकाच्या मनांतील उदात्त विचार प्रकट झाले पाहिजेत. प्रत्येकाच्या घरीं दारीं जाऊन त्याच्या मनांत आत्म्याच्या एकपणाचें बी रुजविणें हें पुढाऱ्याचें कर्तव्य आहे. हें कर्तव्य करणाऱ्यास संसार सोडून द्यावा लागेल; इतकेंच नव्हे, प्रर त्याहूनही अधिक हाल सोसावे लागतील. मन तयार झाल्यावर ह्या संकटांतून सुटण्याचें सामर्थ्य परमेश्वर आत्म्यास देतो. श्रीसमर्थांनीं हेंच शिकविलें. त्यांचा हा योग, ही कामगिरी आपल्या हातून आपण त्यांच्यापेक्षां तपोबलानें कमी असल्यामुळें होणार नाहीं. पण गरुडाइतकें उडतां येत नाहीं म्हणून चिमणी उडण्याचें सोडून देत नाहीं, त्याचप्रमाणें आपणास त्यांच्या इतकी कामगिरी करतां आली नाहीं म्हणून मुळींच करावयाची नाहीं असें नाहीं.

## शक्ति-युक्तींची जोड

आपण श्रीसमर्थांनीं आंखून दिलेल्या मार्गानें दोन तीन पावलें जरी गेलों तरी तेवढी शक्ति पुढील पिढीस मिळेल व तिला पांच सहा पावलें टाकण्याचें

सामर्थ्य येईल. अशा तऱ्हेनें दहा, पंधरा, वीस, पंचवीस, पावलें टाकण्याचें सामर्थ्य वाढत गेल्यास पुढें एखादी विभूति जन्मास येईल. आपण परंपरेनें चाललें पाहिजे. नुसती आशा धरून बसून भागणार नाहीं. मेघाचा एखादा बिंदू अमुक आपल्या घशांत पडेल अशी चातकवृत्ति धरूं नका. ही वृत्ति पक्ष्याला शोभते, मनुष्याला शोभत नाहीं. मनुष्यास परमेश्वरानें मन दिलें आहे, आत्मा दिला आहे. तो आपल्या तोंडाच्या स्नायूंचाच फक्त उपयोग करील तर तो ईश्वरासंबंधीं कृतघ्न होईल. असें केल्यानें परमेश्वराचा उपमर्द केल्यासारखें होणार आहे. याकरतां भरंवसा ठेवा, मनें तयार करा. धर्मावर व परमेश्वरावर श्रद्धा ठेवा. व्यवहार व धर्म दोन नाहींत. लंगोटी लावून बाहेर पडणें म्हणजे संसार सोडणें नव्हे, हें लक्षांत ठेवा. **बायकापोरांच्या ऐवजीं देशाचा संसार करण्याची बुद्धि होणें हा त्या बुद्धीचा विकास आहे.** त्याच्या पुढची पायरी मानवजात कशी संतुष्ट करावयाची ही आहे, व त्याच्यापुढें ईश्वर आहे. आपणांस हें सोडून चालणार नाहीं. रामदासांचे शिष्य ब्रह्मचारी होते, पण त्यांनीं देश सोडला नाहीं. श्रीसमर्थांनीं मनुष्य जातींतील स्त्रीबरोबर जरी लग्न केलें नाहीं तरी त्यांचें आत्म्याशीं लग्न झालें होतें. केवळ त्यांच्या कुडींतील आत्म्याशींच नव्हे तर प्रत्येकाच्या शरीरांतील आत्म्याशीं त्यांचें लग्न लागलेलें होतें. श्रीसमर्थांनी महाराष्ट्रास ब्राह्मणांचें कर्तव्य काय आहे हे आपल्या उदाहरणानें दाखवून दिलें. त्यांच्या ब्रह्मज्ञानाची आपणास जरूर आहे. त्यांच्याप्रमाणें प्रयत्न झाले पाहिजेत. तरच ब्राह्मणांच्या गुरुत्वाचा उद्धार होईल व त्यामुळें सर्व लोक मोक्षपदास अधिकारी होतील. रामदासांच्या कर्तबगारीचें आजच्या दिवशीं प्रत्येकानें मनन करून पुढें त्यांचें अनुकरण केलें पाहिजे. रामदासांचा योग युक्तीचा आहे. त्याच्याशीं शक्तीची कशी जोड घालावी याचा भार ईश्वरावर टाकून आपणास स्फूर्ति देण्याबद्दल ईश्वराची आपण प्रार्थना केली पाहिजे.

# राष्ट्रीय शिक्षण

गुरुवार ता. २७ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं, सोलापूर येथें श्रीसिद्धे-श्वराच्या देवळासमोरील पटांगणांत, मुंबईचे डॉ. देशमूख यांच्या अध्यक्षते-खालीं लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष आणि सद्गृहस्थ हो ! आजचा विषय राष्ट्रीय शिक्षण हा होय. कालच्या व्याख्यानांत, शिक्षण देण्याची आवश्यकता हल्लींच वाटतें असें नाहीं, तर रामदासांच्या वेळींही त्यांना हें काम करावें लागलें असें मी सांगितलें होतें. राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या अगर स्वरूप सांगावयास समर्थांनीं केलेला उपक्रम लक्षांत आणला पाहिजे. आपण कोण, आपली स्थिति काय आहे, पुढच्या पिढीनें काय करावें, पोट कसें भरावें, देशाची कामगिरी काय आहे, याची ओळख करून देणारें शिक्षण राष्ट्रीय शिक्षण होय. या शिक्षणास लिहिण्यावाचण्याचीच जरूर आहे असें नाहीं. नुसती सही करावयास आल्यानें ते राष्ट्रीय शिक्षण होत नाहीं. अक्षरें काढण्यावर राष्ट्रीय शिक्षण मोजावयाचें नाहीं. कोणी लिहावाचावयास शिकूं नये असें माझें म्हणणें नाहीं. जितके लोक शिकतील तितकें चांगलें. पण खरें राष्ट्रीय शिक्षण समजून घेण्यास याच्या पलीकडे आपण गेले पाहिजे. देश ओळखण्यास शिकणें यास राष्ट्रीय शिक्षण म्हणावयाचें. अशा तऱ्हेच्या राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा आपल्याकडे आहेत किंवा नाहींत, असल्यास त्यांचा किती उपयोग होतो, याचा आज थोडासा विचार करूं. सर्व गोष्टी विस्तारानें जरी सांगतां आल्या नाहींत तरी थोडक्यांत कां होईना, त्यांच्यापैकीं शक्य त्या गोष्टींचें मी निरीक्षण करणार आहें.

इंग्रज सरकारनें शाळा काढल्या, हायस्कूलें स्थापन केलीं व कालेजें उभारलीं आहेत, मग राष्ट्रीय शिक्षणाची काय गरज आहे ? असें कोणी म्हणतील. सरकारी शाळेंत राष्ट्रीय शिक्षण मिळत असेल तर मग नवीन शाळांची जरूर नाहीं. याच्या पुढची पायरी म्हणजे राष्ट्रीय शिक्षण नसेल तर तशा तऱ्हेचा उपक्रम करण्यास सरकारास सांगणें. यालाही नवीन शाळांची जरूरी नाहीं. पण सर-

कार अशा तऱ्हेचा उपक्रम जर करीत नाहीं तर आपण स्वस्थ न बसतां आपल्या हातानें आपण उद्योग उभारला पाहिजे, हें उघड आहे. एरवीं त्या विषयाची उपपत्ति होत नाहीं. हल्लींच्या शाळांतील शिक्षण 'राष्ट्रीय' नाहीं. ते तसें मिळणें अशक्य आहे; व तें मिळण्याकरतां आमचा आम्हीच उद्योग केला पाहिजे. सरकारास कारकून, इंजिनियर, डॉक्टर पाहिजे आहेत व हे तयार कसे करावयाचे एवढ्याचाच ते विचार करतात. शाळांतील शिक्षण त्यास अनुसरूनच आहे. असले कारकुनीचें शिक्षण देण्याकरतां सरकारनें पहिल्यानें या शाळा काढल्या. या आज सत्तर वर्षें चालल्या आहेत. त्यांचें स्वरूप कांहीं विशेष तऱ्हेनें पालटलेलें नाहीं. शाळा वाढल्या, विद्यार्थ्यांची व उमेदवारांची संख्या वाढली. पहिल्यानें या मंडळींना मिळत असलेल्या नोकऱ्या मिळेनाशा झाल्या. यामुळें शिक्षण उपयोगी नाहीं असें लोकांना वाटूं लागलें. पहिल्याप्रथम या शिक्षणाबद्दल आम्हांस फार अभिमान वाटत असे, माझीही अशीच समजूत होती व वडिलांचीही अशीच समजूत होती. पण हल्लींचा प्रकार जसजसा वाढत चालला तसतसें आमच्या मनांत, आम्ही बुद्धीनें इतर देशांच्या बरोबरीचें असून आमचा देश उदयास कां येत नाहीं? असा विचार उभा राहिला. बारा वर्षांच्या शिक्षणानेंहि २५ रुपये मिळविण्याची योग्यता आमच्यांत कां येत नाहीं? असे लोक आपल्या स्वतःस प्रश्न करूं लागले. या ओघाबरोबर मीही पुढें जात चाललों आहे. हल्लींच्या सरकारी शाळांतून सरकार परधर्मी असल्यामुळें धर्मशिक्षण बिलकुल मिळत नाहीं. सरकारला ही गोष्ट शक्य नाहीं. हा दोष सरकारी शाळांतून आहे म्हणून आम्हांस योग्य शिक्षण मिळत नाहीं असें म्हणणें जरूर आहे.

## सरकारी शिक्षणांतील उणीव

आम्ही ज्ञान संपादन करतों त्यांत धर्माची बिलकुल ओळख नसते. २० वर्षें शिक्षण मिळाल्यावर मग धर्माचा अभ्यास करावा लागतो, धर्माचा उपयोग होत नाहीं, त्यासंबंधीं ज्ञान मिळत नाहीं, धर्म तुच्छ वाटतो, अशा तऱ्हेच्या मनाच्या स्थितींत तयार झालेले शिक्षित लोक कर्तव्यपराङ्मुख होतात असें आढळून आलें आहे. पण सरकार परकी असेपर्यंत हा दोष सरकारास काढता येणार नाहीं. याचा परिणाम मुसलमान, लिंगाईत, जैन, ब्राह्मण, यांना धर्मशिक्षणा-

करतां स्वतःस निराळी तजवीज करावी लागली, हा झाला. धर्मशिक्षण कसें मिळेल याचा निरनिराळ्या जमातींना विचार करावा लागला आहे, धर्मशिक्षणाचा अभाव ही पहिली उणीव होय. सरकारी शाळांतील शिक्षणांत विद्यार्थ्यांना देश-संबंधानें कांहीं माहिती होत नाहीं ही दुसरी उणीव होय. देशाची स्थिति कशी आहे याची ओळख किंवा विचार याचा या शिक्षणांत समावेश नाहीं. आपणास पाहिजे काय, राज्य बरें आहे कीं वाईट आहे, हिंदुस्थानचा भाग्योदय कां होत नाहीं, तो कशानें होईल, याची ओळख विद्यार्थ्यांना करून दिली जात नाहीं. इंग्रजांचें राज्य गोऱ्या लोकांकरतांच—इंग्रजांचा नफा व्हावा म्हणून—स्थापन झालें आहे. यांत त्यांना आपणास दोष देतां येत नाहीं. आम्ही असेंच केलें असतें. जो तो आपल्या पोळीवर तूप ओढणारच. ६००० कोसांवरून ते येथें तुम्हांला मोक्ष-प्राप्ति व्हावी म्हणून आले नाहींत. हा नफ्याचा धंदा इंग्रज लोक करीत आहेत. हा धंदा असल्यामुळें या देशाचें कल्याण कसें करावें याची आम्हांस ओळख करून दिली जात नाहीं. तशी ओळख त्यांनीं करून देणें अशक्य आहे. हिंदु-स्थान दरिद्री कां ? त्यास खावयास कां मिळत नाहीं ? ट्रान्सवालांत आमचे कां हाल होत आहेत ! याचा विचार कॉलेज सोडल्यावर कांहीं वर्षांनीं दादाभाईसारख्यांनीं लिहिलेलीं पुस्तकें वाचल्यावर हल्लीं होतो. देशाची ओळख नाहीं असे शिक्षण २० वर्षे दिलें जातें. सर्व तऱ्हेच्या उद्योगधंद्यांचें शिक्षण मिळत नाहीं. आमच्या विद्यार्थ्यांना खुला व्यापार चांगला असें शिकविण्यांत येतें. त्यामुळें ते आमच्यांशीं या तत्त्वाबद्दल भांडतात. लोकांचें हक्क काय, त्यांना काय मिळवितां येईल, याची ओळख त्यांना होत नाहीं. माल बाहेरदेशीं किती जातो, मोबदला माल किती येतो, देशांतील कोणता माल, कोणता धंदा नाहींसा झाला, यासंबंधाची ओळख आम्हांस वर्तमानपत्रें, सभा व दादाभाई सारख्यांचीं पुस्तकें यांतून मागाहून करून घ्यावी लागते. ही ओळख झाली म्हणजे आपणांस शाळेंत मिळालेलें शिक्षण किती एकांगी आहे हें लक्षांत येतें.

कोणी असा प्रश्न करतील कीं, वर्तमानपत्रें व सभा यांतून तरी तुम्ही हें ज्ञान देत आहां ना ! आम्ही हे विषय दाखल करतों हें खरें आहे. सरकारास हें माहीत आहे, व म्हणूनच विद्यार्थ्यांनीं वर्तमानपत्रें वाचूं नयेत, सभेस जाऊं

नये, असें सांगण्यांत येत आहे. आमच्या ३० व्या वर्षी आम्हांस मिळणारें ज्ञान आमच्या १५ व्या वर्षी आम्हांस मिळणें अधिक श्रेयस्कर आहे. पूर्वींच्या पिढीचा अनुभव तरुण पिढींतच आपणांस मिळावा, आपणांस मिळालेलें ज्ञान पुढील तरुण पिढीस आधीं मिळावें व तिनें त्यांत भर घालून तें वाढवून त्यांत अब्रू व देशाबद्दलचा जास्त अभिमान मिळवावा. शास्त्रीय शोधांतही अशीच स्थिति असते. एका मनुष्यानें आपलें आयुष्य खर्चून विजेच्या दिव्याची कल्पना काढली तर पुढच्या पिढीस तो शोध अंगवळणी पडत असतो व त्याच्यापुढें शोध होऊं लागतो. मागील ज्ञान पिढीस देणें व तिला संसाराकरितां अधिक तयार करणें जरूर आहे. कांहीं लोकांचें असें म्हणणें आहे कीं 'तुम्हांला कोठें राष्ट्रीय शिक्षण मिळालें होतें ! उगीच हा खटाटोप व आक्रोश कां ?' यास आम्ही असें उत्तर देतों कीं आम्हांस ३५ व्या वर्षी मिळालेलें ज्ञान आमच्या तरुण पिढीस १५ व्या वर्षी मिळावें म्हणून ही खटपट आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या राष्ट्रीय शाळांची आवश्यकता अशाकरितां आहे कीं, त्या ठिकाणीं सर्व प्रांतांतील लोकांना आपल्या धर्माचें, नीतीचें, उद्योगधंद्यांचें, देशस्थितीचें, आपल्या हक्कांचें ज्ञान मिळावें. हें ज्ञान मिळणें अवश्य आहे, सरकारास असलें ज्ञान देण्याची बुद्धि नाहीं, व तें त्यांना देतांही येत नाहीं. याचकरितां राष्ट्रीय शिक्षण पाहिजे आहे.

## राष्ट्रीय शाळा कशासाठीं पाहिजेत ?

खासगी शाळा एकदां सरकारच्या कबज्यांत गेल्या कीं त्यावर सरकारची छाप बसेल, व म्हणून आम्ही म्हणतों कीं या शिक्षणाकरतां स्वतंत्र शाळा पाहिजेत. अशा शिक्षणानें लोक असंतुष्ट होतील असें सरकारास वाटतें. पण हा राजद्रोह नव्हे. प्रत्येक मनुष्यास आपली स्थिति वाईट झाली आहे हें ज्या शाळेंत समजविलें जाईल ती राष्ट्रीय शाळा आहे. आज पुढें आलेलीं जीं जपान, अमेरिकेसारखीं राष्ट्रें आहेत तेथील शिक्षणाची व येथील शिक्षणाची तुलना केल्यास आपलें शिक्षण फारच हलक्या प्रतीचें आहे असें आढळून येईल. आपल्या लोकांच्या मनांत जास्त विचार व जास्त कल्पना येऊं नयेत, त्यांनीं विश्वासु नोकर व्हावें, साहेबांच्या जागेकडे पाहूं नये, त्यांचे व्यापारी या देशांत आले

तरी हरकत नाहीं, त्यांनीं आमच्या प्राप्तीपैकीं भाग घेऊन श्रीमंत व्हावें, आम्ही दरिद्री असावें, इंग्लंडचें पोट चाललें म्हणजे झालें, अशा तऱ्हेची सरकारची बुद्धि आहे, व ती योग्य आहे. मी सरकारच्या जागीं असतों तर माझी बुद्धि अशीच असती. ईश्वरानें मला राजा केलें नाहीं हें चांगलें केलें. नोकरीकरितां आम्ही शिकतों, असें मुलांना प्रश्न विचारल्यास त्यांच्याकडून उत्तर येतें. ब्राह्मणाचेंच असें उत्तर येतें असें नाहीं; तर मारवाडी व इतर व्यापारी मंडळीं यांचीं मुलेंही असेंच उत्तर देतात ! हल्लींच्या शिक्षणामुळें हलकें काम करण्याची लाज वाटतें, फाजील अभिमान शिरतो, डौलाचा शिरकाव होतो, व मनुष्य देशाच्या कार्यास नालायक होतो. ही शिक्षणाची दिशा बदलली पाहिजे. राष्ट्रीय शिक्षण हा विषय विशिष्ट जातीकरतां नाहीं. तो सर्व जातींचा सार्वजनिक विषय आहे. सर्वांना हा एक सारखाच परिचित असला पाहिजे. हें समजून देऊन लोकांचें साहाय्य मागावें व हल्लींची शिक्षणाची पद्धति सुधारून लोकांस ज्ञान व्हावें, यासंबंधीं आपणांस विचार कर्तव्य आहे. राष्ट्रीय शिक्षण मिळालें नाहीं तर पुढील पिढी आंधळी होईल. आपला धर्म कळावा, देश कळावा, नीतीचें आचरण घडावें, देश खालीं जात चाललेला वर उचलण्याची ताकद व धैर्य यावें, जोम यावा, याकरितां या राष्ट्रीय शाळा पाहिजे आहेत.

या काढावयाच्या कशा, हा मोठा प्रश्न आहे. सरकार आपल्या शाळा काढूं शकत नाहीं. सरकारजवळचे पैसे आमचेच आहेत, पण त्यांच्या ताब्यांत गेले म्हणजे त्यांचा खर्च कसा करावयाचा हें आमच्या स्वाधीन रहात नाहीं. तें त्यांच्या हातीं जात असल्यामुळें आम्हांस राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न सोडवितां येत नाहीं. हेंच सरकार आमचें असतें, तर मी आज या विषयाची कहाणी सांगण्यास येथें उभाही राहिलों नसतों. जर्मनीस अशा सभा भरवाव्या लागल्या नाहींत. आपला देश अडाणी होतोसा दिसल्या बरोबर हजारों शाळा त्यानीं काढल्या, परकीय मालावर जकात बसवली, शास्त्रीय शिक्षण देण्यास सुरवात केली, व आतां जर्मनीची इतकी प्रगति झाली आहे कीं खुद्द इंग्लंडांत हे लोक मोठमोठे मॅनेजर वगैरे झाले आहेत. जपाननें अशीच आपली प्रगति करून घेतली. पण त्यांचीं स्वतःचीं राज्यें होतीं. आमच्या येथें राज्य आहे, पण तें स्वतःचें नाहीं. त्यांत आमचेपणा नाहीं. ही गोष्ट सरकारला चांगल्या चांगल्या लोकांनीं सांगितली

आहे. सरकारची इच्छा असल्यास हल्लींचीं सर्व कॉलेजें व शाळा 'राष्ट्रीय' होऊं शकतील. पण असली इच्छा त्यांच्या मनांत शिरत नाहीं, त्यास काय करणार? त्यांस बाजूस ठेवून त्यांच्या मर्जीकडे लक्ष न देतां, आपण आपल्या मुलांबाळांस आपणांस पाहिजे तें शिक्षण स्वतः दिलें पाहिजे.

## इंग्रजीचा वरचष्मा

इंग्रजी भाषा फार द्वाड आहे. ती लवकर येत नाहीं. ती सोपी नाहीं. केवळ राज्यकर्त्यांची म्हणून आम्हांस ती शिकावी लागते; आमच्यावर तें निव्वळ ओझें आहे. आमचें शिक्षण मराठींत मिळत नसल्यामुळे फार नुकसान आहे. आपणांस इंग्रजीत दोन दोन तास बोलण्याची काय म्हणून जरूर वाटावी? मराठी बोलणारा साहेब एक तरी निघाला आहे काय? पण आमच्यापैकी शेकडों लोक इंग्रजी बोलतात. आम्ही इंग्रजी भाषेचें ज्ञान शिकविण्यांत फुकट वर्षे घालविलीं. मला मिळालेलें ज्ञान मराठी भाषेंत मिळालें असते, देशी भाषेंत मिळालें असतें—तर हें सर्व ५२ वर्षांचें ज्ञान २५ व्या अगर ३० व्या वर्षीच मला मिळालें असतें. **या इंग्रजी भाषेमुळें वर्षें फुकट जातात.** राष्ट्रास परकी भाषेंत शिक्षण देणें म्हणजे त्याची खच्ची करण्यासारखें आहे. याचकरितां देशी भाषेंत ज्ञान दिलें पाहिजे. यामुळें विद्यार्थ्यांचें आयुष्य वांचणार आहे. धर्माचें शिक्षण मिळणार आहे. आम्ही बॅरिस्टर झालों तरी धर्मासंबंधीं भोपळ्या एवढें पूज्य! धर्मासंबंधीं आमच्या देशाची प्रौढी आहे. धर्माच्या बाबतींत हिंदुस्थान पक्कदशेस आलें असलेलें गोरे लोक कबूल करतात, पण आमचे लोक, मॅक्समुलर वेदांत अमूक आहे म्हणून सांगतात, असें म्हणतात! लहान मुलांस पूर्वपरंपरेचें ज्ञान दिल्यास त्यांच्या मनांत उदात्त तत्त्वें बिंबलीं जातात—त्यांच्यांत अभिमान उत्पन्न होतो, व त्यामुळें देशाची आणि देवाची नोकरी करण्यास त्यांच्या अंगीं अधिक योग्यता येते. अशा तऱ्हेचें शिक्षण आम्ही राष्ट्रीय शाळेंत देणार आहों. या शिक्षणाविरुद्ध आमच्यांत कांहीं लोक आहेत; पण त्यांना मी सांगतों कीं, प्रत्येक जमातीचे धर्म शिकविले जावे, अशी येथें व्यवस्था होणार आहे. या शाळेंत मराठींत शिक्षण द्यावयाचें आहे. ही शाळा कोणत्याही एकट्या धर्माच्या लोकांकरतां नाहीं, एकट्या ब्राह्मणांकरतां ही शाळा नाहीं किंवा एकट्या जैनांकरतां नाहीं. प्रत्येकाच्या धर्माप्रमाणें शिक्षण

निरनिराळें दिलें जाईल. बाकीचें शिक्षण एकसारखें दिलें जाईल. हा या राष्ट्रीय शाळेचा उद्देश आहे. निरनिराळे पंथ कबूल करून त्यांतील द्वैतभाव काढून देशा-करितां काम करतां यावें असें शिक्षण देण्यांत येईल. नोकरी मिळावी म्हणून आम्ही शिक्षण देणार नाहीं. आमचीं मुलें सरकारी परीक्षेकरितां तयार करावयाचीं नाहींत. प्रत्येकास आपलें पोट भरतां येईल असें शिक्षण आम्ही देणार आहों. मी काय करूं, अशी पंचाईत पडूं नये. ब्राह्मणांनीं उपदेशाचें काम करावें, थोडक्यांत सांगावयाचें झाल्यास चातुर्वर्ण्याच्या व्यवस्थेला लागणाऱ्या निरनिराळ्या उद्योग-धंद्याचें शिक्षण देतां यावें, अशा तऱ्हेची या ठिकाणीं व्यवस्था केली जाईल.

## सरकारी रोषाचा प्रतिकार

हल्लीं अशी स्थिति नाहीं. अलीकडे ब्रह्मचारी विद्यार्थ्यांची वहिवाट मोडत चालली आहे. पण या शाळेंत येणारास शिक्षण होईपर्यंत ब्रह्मचारी राहावें लागणार. देशांत कर्तबगारीचें कर्ते पुरुष निर्माण व्हावेत म्हणून ही शाळा काढण्यांत आली आहे. लोकांच्या तोंडाकडे बघण्याची त्यांना वेळ येऊं नये असें शिक्षण देण्यांत येईल. एका पिढींत रामदासाप्रमाणें १,२०० उपदेशक महाराष्ट्रांत पसरावे व उद्योगधंद्यांस अधिक योग्य करावेत एवढ्याकरतां ही शाळा आहे. आमचें हें करणें सरकारास रुचणार नाहीं, हें कबूल आहे. पण आमचा हा प्रयत्न बंद करावयाला सरकार तयार होईल कीं नाहीं याची शंका आहे. उन्नतीचा मार्ग स्वीकारूं नये असें सांगणारें सरकार टिकत नाहीं; असें सांगणारें सरकार पाप करतें. आमचें सरकार शहाणें आहे, तें असें करणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. तथापि त्यांनीं आमच्या कार्यास बंदी केल्यास त्या वेळीं देव बुद्धि देईल तसें करूं. त्या परिस्थितीला जीं माणसें असतील, त्यांच्यावर हा विषय सोंपवून द्या. त्यांच्याविषयीं आज विचार करूं नका. पुढें संकट येईल म्हणून आज कामाला सुरुवात करीत नाहीं तो 'प्रारभ्यते न खलुविघ्नभयेन नीचैः' या साधूक्तीप्रमाणें हलक्या प्रतीचा समजला जाईल. अडथळा आला म्हणजे थांबणारे दुसऱ्या प्रतीचे लोक होत. आम्हांस राष्ट्रीय शिक्षणाचें देऊळ बांधावयाचें आहे; आंत सरस्वती देवीची स्थापना करावयाची आहे. देवळावर वीज पडली तर तें देऊळ आपण पुनः बांधणार नाहीं काय? उत्तम प्रतीचे जे लोक असतात

ते 'विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः' त्यांच्यावर वरचेवर जरी संकटें आलीं तरी आपला उद्योग सोडीत नाहींत. आपण उत्तम पुरुषांत जाणार नाहीं असें जर वाटत असेल मग ही राष्ट्रीय शिक्षणाची गोष्ट सोडून द्या. विघ्नें येतील, पण उमेद पाहिजे. विघ्नांची सबब सांगून खालीं बसावयाची आम्हांस संवय लागली आहे. ही दुष्ट संवय काढून टाकणें हेंच या राष्ट्रीय शाळेचें पहिलें काम आहे. या संवयी आम्हांस नकोत. विघ्नें ही येणारच. तीं अधिक येतील तर बरें. त्यामुळें आम्ही कसोटीला लागूं. सैन्य तयार ठेवण्याकरतां झांकाखेलसारखी लढाई उपस्थित करावी लागते. विघ्नें यावींत, येऊं नयेत अशी मी ईश्वराची कधीं प्रार्थना करणार नाहीं. विघ्नामुळें उत्कर्ष होतो असें म्हणणारा मी आहे. तथापि सरकारचा रोष होणार नाहीं, झाला तरी त्याचा प्रतिकार करूं, असें मला वाटतें.

## शिक्षणाचें मंदिर

आतांपर्यंत राष्ट्रीय शिक्षणासंबंधीं व शाळेसंबंधीं जें सांगावयाचें तें थोडक्यांत सांगितलें. ही शाळा कशी निर्माण करतां येईल यासंबंधीं दोन शब्द सांगावयाचे आहेत. शाळा बांधावयास जवळ जवळ १०–१२ लाख रुपये खर्च येईल. वास्तविक सरकारनें हें काम करावें; पण तें करीत नाहीं. मी म्हणतो तुम्ही तरी कंबर बांधून हें करणार कीं नाहीं ? या जिल्ह्यांत जवळ जवळ दहा लाख लोक आहेत. त्यांना माणशीं रुपया जास्त नाहीं. आम्ही सरकारास माणशीं चार रुपये देतो. आमची संख्या तीस कोटी असून सरकारचें उत्पन्न १२० कोटी आहे. दर मनुष्य दरसाल सरकारला ४ रुपये देतो आणि आम्ही एकदां एक रुपया मागितला तर तो त्यास विशेष आहे असें नाहीं. मात्र सगळ्यांच्या मनांत ही गोष्ट आली पाहिजे. सगळ्यांच्या फायद्याकरतां ही गोष्ट आहे. त्यांनीं मनांत आणल्यास ती दुर्घट नाहीं. ज्यास ज्या तऱ्हेनें मदत करतां येईल त्यानें ती तशी करावी. **महाराष्ट्रांत शिक्षणाचें हें एक देऊळ बांधावयाचें आहे. तें तुमच्या साहाय्यानें बांधलें जाईल अशी माझी खात्री असल्यामुळें मी आपल्यापुढें उभा राहिलों आहे.** या गोष्टी मोठ्या खऱ्या, पण आपल्यापुढील हें देऊळ (श्रीसिद्धेश्वराचें) जर आपणांस बांधतां येतें तर राष्ट्रीय शिक्षणाचें देऊळ आपणांस कां बांधतां येऊं नये ! हें देऊळ माझ्याकरितांही नाहीं व तुमच्याकरतांही

नाहीं. तें पुढील पिढीकरतां आहे. त्या पिढीत कांहीं जोम यावा, तीस स्वातंत्र्य-शिक्षण मिळावें, तिच्या अंगीं आपण ओढीत आणलेलें गाडे पुढें एक कोसभर तरी नेण्याची ताकद यावी, तिच्यांत महत्वाकांक्षा उत्पन्न व्हावी, आम्ही सर्वजण एक आहोंत असें पिढींतील लोकांना वाटावें, त्यांचें शरीरसामर्थ्य वाढावें, व हातीं घेतलेली गोष्ट तडीस नेऊं अशी त्यांस धमक यावी, अशी जर आपल्याला अपेक्षा असेल तर त्यास राष्ट्रीय शिक्षणाखेरीज दुसरा मार्ग नाहीं. म्हणून या कामाकरितां आपल्या प्राप्तीपैकीं कांहींतरी भाग आपण द्या, अशी माझी विनंति आहे. भिक्षा मागून शिकवूं पण हें राष्ट्रकार्य सोडणार नाहीं, अशा निश्चयाचे प्रो. विजापूरकरांसारखे लोक या संस्थेंत काम करावयास मिळाले आहेत, त्यामुळें ही शाळा चालेल किंवा नाहीं याची शंका घेण्याचें कारण नाहीं. या शाळेशीं—या समर्थविद्यालयाशीं—सरकारचा संबंध नाहीं. व पुढेंही तो ठेवावयाचा नाहीं, आपणांस जें योग्य वाटेल तेंच येथें शिकवावयाचें आहे. सरकार चांगलीशी शाळा निघाली कीं तिला ग्रँट देतें. सरकारचें अन्न वाईट, पोटांत जिरत नाहीं. सरकारच्या पैशाबरोबर त्यांची बुद्धि येते.

## राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय ?

आमच्यांतील कित्येक विद्वान राष्ट्रीय शिक्षण आम्हांला कळत नाहीं, असें सांगतात. राष्ट्रीय शाळेंत आम्ही 'दोन आणि दोन चार' हेंच शिकविणार. पण त्याच्याबरोबर 'दोन आणि दोन चार' हें आम्हांस इंग्रज सरकारच्या कृपेमुळें समजलें असें म्हणतां येऊं नये अशी आम्ही तजवीज करणार. आम्ही शिक्षण देतांना कलकत्ता कलकत्त्याच्याच ठिकाणीं आहे म्हणून सांगणार; पण त्याबरोबर तेथें पूर्वीं हिंदुस्थानांतील लोकांचें राज्य होतें, हल्लीं इंग्रजांचे आहे, असे सांगणार, आम्हींही इंग्लंडचा इतिहासच शिकवूं. पण राजाचा जुलूम तेव्हां इंग्लिशांनीं कसा टाळला, संपत्ति कशी मिळविला, हेंही पण शिकविण्यास आम्ही विसरणार नाहीं. हिंदुस्थानचा इतिहासही तोच आहे; पण तो शिकवितांना हल्लींची स्थिति कशी आहे, इंग्रजी राज्यांत धंदे कसे नाहीसें झालें, हें आम्ही समजून सांगणार. हल्लींची परिस्थिति कशी बदलतां येईल हें जाणणारीं माणसें या शाळेंतून बाहेर पडावी म्हणून हा उद्योग आहे. लोकांनीं फाजील शहाणे होऊं

नयें असें सरकारास वाटतें. बैलास झांपण घातली कीं, त्याने वाटोळेंच फिरलें पाहिजे; त्याप्रमाणें आमचीं स्थिति झाली आहे. असलें शिक्षण आम्हांस बंद करावयाचें आहे. आम्हांस पाहिजे तें शिक्षण द्यावयाचें आहे. याकरतां आम्हांस राष्ट्रीय शाळा पाहिजे आहेत. १२० कोटि रुपये आमच्याजवळ नाहींत, पण ते देणारीं माणसें आमच्याजवळ आहेत. याकरतां माझी अशी प्रार्थना आहे कीं, आपण सर्वांनीं शक्य ती मदत या राष्ट्रीय कार्याला करावी. आम्ही ही मदत मागण्याकरतां येथें आलो आहों. आज एक वर्षभर 'समर्थविद्यालय' चाललें आहे. आतांपर्यंत त्याचें धोरण सांगितलें. हें पुढें कसें चालेल याबद्दल शंका नको. **ज्यांस आमची ही दिशा आवडत नसेल त्यांनीं आमच्या मार्गांत विघ्नें आणण्याची तरी खटपट करूं नये** एवढेंच त्यांना सांगणें आहे.

मदत दिली तर ती आम्हांस पाहिजे आहे. नाहीं दिलीत तर निदान स्वस्थ बसा. आमच्या मार्गांत दगड न टाकलेत तरी पुष्कळ केलेत असे आम्ही समजूं. राष्ट्रीय शिक्षणाची योग्यता आम्हांस आतां कळूं लागली आहे. आम्हांस ज्ञान इंग्रजांनींच दिलें हें खरें; व त्याबद्दल त्यांचे आम्हांवर उपकार आहेत; पण त्यांचें पुढचें धोरण वाईट आहे. इंग्रजांनीं मला शिक्षण दिलें तरी पुढें काय करावयाचें, हें माझें मीच ठरविणार. पुढच्या पिढीची काळजी नसेल तर काय उपयोग ? हल्लींच उशीर झाला आहे; पण अद्यापि वेळ गेलेली नाहीं. बंगाल्यांत अशा तऱ्हेच्या शाळा सुरू आहेत, तिकडील धनिक लाखो रुपयांची मदत करीत आहेत. या कार्यास मदत देण्यापेक्षां अधिक लोकोपयोगी असें दुसरें काम पैसेवाल्यांस नाहीं. हें शाश्वत कार्य आहे. याकरितां यास होईल तितकी मदत करा. बंगाल, पंजाब, मद्रास इकडे असा उपक्रम सुरूं झाला आहे. महाराष्ट्र निजणार कीं काय ? तो निजणार नाहीं, अशी माझी समजूत व उमेद आहे, पण ही खोटी ठरविण्याचें पाप आपण माथीं घेणार असाल तर गोष्ट निराळी ! माझ्या अनुभवावरून माघार घेणार नाहीं, अशी मला उमेद आहे. हें कार्य तडीस नेण्याबद्दल परमेश्वर महाराष्ट्रांतील लोकांना बुद्धि देवो अशी मी त्याची प्रार्थना करतो. आतांपर्यंत सर्व मुद्दे सांगितले. शंकेचें उत्तर देण्यास मी तयार आहे. पोटांत शंका ठेऊन परत घरीं जाऊं नका अशी माझी आपणांस विनंति आहे. तसें केल्यास राष्ट्राचा घात केल्यासारखें होईल. ब्राह्मणांनीं, व्यापाऱ्यांनीं, सगळ्यांनीं प्राप्तीप्रमाणें मदत करावी. हा राष्ट्रीय डोलारा आहे व तो उभारला पाहिजे आहे. तो उभारण्यास ईश्वर आपल्याला बुद्धि देवो एवढेंच माझें मागणें आहे.

---

# स्वावलंबनाची आवश्यकता

शुक्रवार, ता. २८ फेब्रुवारी १९०८ रोजीं सायंकाळीं सोलापूर येथें म्युनिसिपल दवाखान्यासमोरील पटांगणांत लो. टिळक यांचें व्याख्यान झालें तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष आणि सभ्य गृहस्थहो, आज आपणापुढें तिसऱ्यांदा उभे राहण्याचा प्रसंग आहे. या प्रसंगीं मागच्या व्याख्यानांचा उपसंहार करण्याचा माझा विचार आहे. कालच्या परवांच्या व्याख्यानांवरून सामान्यतः आपल्या लक्षांत आलें असेल कीं, आमच्या कल्याणाच्या गोष्टी सरकारच्या हातून पार पडत नाहींत. वास्तविक पाहतां राजा हा प्रजेच्या कल्याणाकरितां आहे, स्वतःची चैन भोगण्याकरितां नाहीं. राजा ही संस्था प्रजेनें चौथा अगर पांचवा हिस्सा देऊन निर्माण केली आहे. राजाला 'षष्ठांश भाग' असेंही म्हणतात. राजाला पोसावयाचें तें त्यानें लोकांचें कल्याण करावें म्हणून. प्रजेस पोटभर खावयास घालून तिचें मुलाप्रमाणें पालन करण्याकरितां ही संस्था निर्माण झाली आहे. राजा कांहीं आकाशांतून पृथ्वीवर पडलेला नाहीं. तो परस्परांच्या संमतीनेंच निर्माण झाला आहे. घरच्या कामांत ज्याप्रमाणें एकादा कर्ता पुरुष लागत असतो, त्याप्रमाणें राष्ट्राच्या कल्याणाकरितां राजा नेमावा लागतो. जो राजा आपल्या प्रजेच्या कल्याणाकरितां झटत नाहीं तो राजा नव्हे, व जी प्रजा आपलें कर्तव्य बजावीत नाहीं, ती प्रजाही पण नव्हे. प्रजेचे ज्याप्रमाणें धर्म आहेत त्याप्रमाणें राजाचेही पण आहेत. सरकारचें ऐकलेंच पाहिजे हा एकच आमचा धर्म नव्हे. राजानेंही आपले धर्म पाळले पाहिजेत. ही पुरातन वहिवाट आहे. प्रजेनें राजास कर्तव्य करावयास लावावें हीही पूर्वापारची वहिवाट आहे. घरांतील एखादा कर्ता पुरुष, घरांतील सर्व इस्टेट गहाण टाकून अगर दुसऱ्या कोणत्या तऱ्हेनें तिची वासलात लावूं पाहील, तर घरांतील इतर मंडळी कोर्टापर्यंत जाऊन त्याचा कर्तेपणा घालवून आपले हक्क शाबीत करतात; तोच न्याय राजकीय बाबतींत लागूं आहे. राजकीय बाबतींत परमेश्वर हें कोर्ट आहे. त्यास असा अर्ज करावयाचा कीं सर-

कारनें ज्या कांहीं गोष्टी करावयास पाहिजेत त्या त्याच्या हातून होत नाहींत, त्या करण्याची त्यास बुद्धि द्यावी. हा एक मार्ग झाला.

## स्वतःच्या शक्तीचा उपयोग

दुसरा मार्ग म्हणजे राजानें केलें नाहीं तर आपल्या हातून जें काय होण्यासारखें असेल तें आपण स्वतः करावयाचें. आपण सर्वस्वी पराधीन नाहीं. सरकार आम्हांस जमूं देतें, अजून आम्हांस बोलूं देत आहे, ऐकूं देत आहे; आपणांजवळ कांहीं तरी शक्ति आहे, ती सर्व एकत्र करा. आपण लंगडे आहों, पण घरांत संचारतां येईल इतकी शक्ति राहिली आहे, तिचा उपयोग करून घेतां येईल कीं नाहीं हा प्रश्न आहे. हल्लीं जो मुख्य वाद आहे तो आम्ही आमची सर्व शक्ति, पैसा व वेळ नुसती सरकारला विनंति करण्यांत खर्च करावा कीं आम्ही स्वतः कांहीं करावयाला लागावें व कित्ता घालून द्यावा, यासंबंधीं आहे. सरकारनें केलें तर तें आम्हांला नको आहे असे नाहीं. पण सरकार निजलें आहे. या मुदतींत आमचें जें नुकसान होत आहे तें थोडेंबहुत कमी करण्याचा आम्ही कां उद्योग करूं नये ! आतां हा उद्योग कसा करावयाचा, हा प्रश्न आहे. आपल्या गावांत शिरलेला वाघ पोलिस सुपरिंटेंडंट येऊन मारीपर्यंत आपण घरें लावून स्वस्थ बसायचें कीं, शस्त्र नसलें तरी धोंड्यासारख्या अन्य उपायानें वाघ मारतां येईल कीं नाहीं, हें पहावयाचें, अशा तऱ्हेची हिंदुस्थानची स्थिति आहे. सरकार आमचें हित करीत नाहीं, हें ठरलें आहे. अशा वेळीं स्वस्थ बसणें हें मनुष्याचें लक्षण नव्हे. माणुसकीला ही गोष्ट शोभत नाहीं. आपणांस बुद्धि आहे, हातपाय आहेत, आपणास काय करतां येईल इकडे आपलें लक्ष लागलें आहे, अशावेळीं कोणच्या स्वदेशी संस्था काढतां येतील हें पहावयाचें आहे.

## स्वदेशी–बहिष्काराची जोडी

हिंदुस्थानांत जागृति झाली आहे, अंतःकरणें खळबळून गेलीं आहेत, सरकारवरचा विश्वास कमी होत चालला आहे ! राष्ट्राच्या हिताच्या गोष्टी सरकारला करावयाच्या नाहींत—अशा गोष्टी कांहीं मर्यादेपर्यंत सरकार करील

पण त्याच्यापुढें जाण्याची त्यांची इच्छा नाहीं. त्यांत त्यांचें नुकसान आहे, एवढें पुरें कळून चुकलें आहे. अशा वेळीं राष्ट्रीय शिक्षणाची संस्था स्वार्थत्यागानें स्थापावयास पाहिजे. त्याखेरीज दुसरे दोन तीन प्रकार अलीकडे निघाले आहेत. बहिष्कार हा त्यांपैकींच एक आहे. कित्येकांस असें वाटतें कीं बहिष्कार घातला कीं आम्ही सरकारचा द्वेष करतो. सरकारशीं फाटून वागूं नका, तें चिडेल असें करूं नका, असें त्यांचें म्हणणें आहे. यास आमचें असें उत्तर आहे कीं, फाटून वागण्याची आमची इच्छा नाहीं. आम्ही मिळून वागण्यास तयार आहों, पण आमच्या कल्याणाची ज्यांना अपेक्षा नाहीं, **ज्यांना इंग्लंडच्या हिताखेरीज दुसरें कांहीं दिसत नाहीं, त्यांना राग येईल म्हणून आम्ही नम्र रीतीनें वागण्यांत आमचें कल्याण नाहीं**. आम्हांस कळतें आहे तें करावयास लागलें पाहिजे. परकी वस्तूंचा अनावर संचार झाला आहे, तो आम्ही बंद करावयास लागणें अवश्य आहे. हा संचार सरकार एकदम बंद करील. आम्ही तो हळूंहळूं करूं. पण यांत आम्ही द्वेष करीत आहों असें जर सरकार समजत असेल तर तें चुकीचें आहे. सरकार या देशाचें कल्याण करणार आहे कीं नाहीं ? या प्रश्नास 'नाहीं' म्हणून उत्तर आल्यास आम्ही फटकून वागलें पाहिजे. कल्याणाची बुद्धि असेल तर त्याप्रमाणें वर्तन ठेवावें. नसेल तर आम्ही फटकून वागल्याबद्दल रागावूं नये. पण असल्या सबबी आम्ही ऐकणार नाहीं. तुम्हीही ऐकूं नये. हा स्वतःचा हक्क आहे. आमचें आम्हांस कल्याण कळत आहे. अशा वेळीं असुक रागावेल म्हणून आमच्या कल्याणाची गोष्ट आम्ही केली नाहीं तर आत्मा रागावणार नाहीं काय ? सदसद्विवेकबुद्धीची आज्ञा पाळण्याला जर मनुष्य तयार होत नसेल तर तो आत्मज्ञान विसरला असें म्हटले पाहिजे. सरकारनें आमच्या हिताच्या गोष्टी केल्या नाहींत, त्या आपण करावयाच्या आहेत, अशा वेळीं स्वदेशी आणि बहिष्कार या दोहोंचा अंगिकार केला पाहिजे, ही जोडी तुटावयाची नाहीं. जें तुटणें शक्य म्हणतात त्यांना एक बाजू दाखवावयाची असते. स्वदेशी वापरणें याचा अर्थच परदेशी टाकणें असा आहे. पण हें उघड बोलण्यांत काय हंशील? असें कोणी म्हटल्यास मी ह्मणतों, माझ्या मनांतील विचार उघड बोलावयास जर मी तयार नसेन तर मी मनुष्यच नव्हे. कांहीं बोलणारे असतात, पण करणारे नसतात. कांहीं करणारे असतात. पण बोलत नाहींत. कांहीं

करतात व बोलतात. बोलतो त्याचप्रमाणें करतो आणि करतो त्याचप्रमाणें बोलतो तो उत्तम मनुष्य होय. बाकीचे खालच्या प्रतीचे होत. जो करीत नाहीं व बोलतही नाहीं तो देशाचा शत्रू होय. अशी विचारांची परंपरा देशांत चालूं आहे. याकरतां काय करावयाचें याचा विचार होऊन त्याप्रमाणें उपक्रम सुरूं झाला आहे.

## स्वदेशीच्या व्रताचें आचरण

या स्वदेशी संस्थांचा उद्देश स्वदेशीचा प्रसार करावा, होण्याजोग्या गोष्टींचा प्रयत्न करावा, असा आहे. मागें अशा संस्था झाल्या आहेत. जो स्वदेशीची शपथ घेणार नाहीं तो या संस्थेचा सभासद नसावा, आचरणानें कित्ता घालून देईल अशा तऱ्हेचा गृहस्थच सभासद असावा. सही झाली कीं तो सभासद झाला, ही कल्पना जाऊन, आचरण करणारा सभासद, ही कल्पना आली पाहिजे. या स्वदेशी संस्था आचरणाच्या पायावर रचल्या जाव्या अशी व्यवस्था झाली पाहिजे. प्रत्येकानें थोडाबहुत आश्रय दिल्याखेरीज राष्ट्राचीं कामें होत नाहींत. नियमानें देशाकरितां कांहीं तरी देईन, असा प्रत्येकानें निर्धार केला पाहिजे. तिसरी गोष्ट दारूच्या व कोर्टाच्या बाबतींत निर्बंध असावा. जेथें दारू मुळींच नव्हती तेथें लक्षावधि रुपयांची दारू खपूं लागली आहे ही दुःखाची गोष्ट आहे. सरकारच्या राजकारस्थानांत ही मोठी चूक झाली आहे. पंचायती मोडून लोकांस कोर्टाच्या नादीं लावल्यानें हजारों लोकांची वेळ व वित्त या कामीं विनाकारण खर्चीं पडत आहे. याकरितां लवादकोर्टें स्थापा व गांवांतल्या लोकांना आपापला बंदोबस्त करावयास शिकवा. हीं कामें आपल्याला केलीं पाहिजेत. आपल्याला मिळावयाचें तें पुढें मिळेल. योग्य झाल्याशिवाय कांहीं देणार नाहीं, असें सरकारानें आम्हांस सांगितलें आहे. ‘ योग्य ’ याचा अर्थ आम्ही ‘ बी. ए. ’ असा करतों. तुमच्या अंगांत हिसकावून घेण्याची शक्ति येईल तेव्हां तुम्ही योग्य झाला असें सरकार समजतें. पेंचांत आणल्याखेरीज दाता देत नाहीं. आपले दावे आपसांत तोडा म्हटलें तर शंकराचार्यसुद्धां कबूल होत नाहींत. कोर्टांतील लोक आमच्यापेक्षां कांहीं शहाणे नाहींत, पण साहेबांच्या तोंडून आपल्या खटल्याचा निकाल ऐकण्याची आपणांस फार हौस आहे. ही वेडेपणाची संवय घालविली पाहिजे. इंग्रज

स्थान प्रत सं.

सरकार येथून गेलें तरी आम्ही राज्य चालवूं, अशी आपल्यांत धमक पाहिजे. आपली रकम पोष्टांत ठेवण्याऐवजीं लहान लहान संस्था काढून परस्परांस मदत होईल अशा तऱ्हेनें त्या रकमा त्या संस्थेंत ठेवतां येतील अशी व्यवस्था करावी.

## गाड्याचें चाक वर काढा

अशा तऱ्हेनें आपण उद्योग करावयास लागलों तर अधिकाऱ्यांना ही गोष्ट रुचणार नाहीं, हें मी जाणून आहे. संकटें येणारच. अडचणी येतील, पण त्यांस डगमगतां कामा नये. पूर्व बंगाल्यांत स्वदेशी संस्था स्थापन झाल्या आहेत, आणि त्या एकाच मनुष्याच्या खटपटीनें झाल्या आहेत. ते गृहस्थ बाबु अश्विनीकुमार दत्त हे होत. त्यांनीं आपलें वजन खर्च करून बंगाल्यांतील प्रत्येक जिल्ह्याला राष्ट्रीय शाळा व स्वदेशी संस्था स्थापन केली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवकांची कामगिरीही अनुकरणीय आहे. स्वतःचीं कामें स्वतःस करावयास लावणें याचेंच नांव स्वातंत्र्याचें शिक्षण. कंठशोष करून स्वातंत्र्य मिळणार नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या योग्यतेप्रमाणें स्वतंत्र व्हावयास पाहिजे. लहान मुलांना असें शिक्षण दिलें पाहिजे. बंगालप्रमाणें महाराष्ट्रांत स्वदेशी संस्था स्थापन होऊन त्या ठिकाणीं स्वदेशी, बहिष्कार, लवाद, वगैरे ज्या ज्या गोष्टी आपल्या हातीं असतील त्या त्या करण्यास सुरुवात केली पाहिजे. आयर्लंडानें अशाच स्वदेशी संस्था स्थापन करण्याचें मनांत आणलें आहे. इंग्लिश भाषा वापरू नये, असाही प्रयत्न ते करीत आहेत. आपण एकमेकांना मदत करावी, परदेशी माल घेऊं नये आणि राष्ट्राला पुरें स्वातंत्र्य मिळाल्याखेरीज आपलें काम हातचें खालीं ठेवूं नये, असा ते लोक निश्चय करीत आहेत. ते गोरे आहेत. आमच्या स्थितींत जर इंग्रज असते तर त्यांनीं आपल्यापेक्षां फार प्रयत्न केले असतें, आपणांस चैन पडूं दिलें नसतें. इंग्लिशांनीं आपल्या राजाला चैन पडूं न देतां आपले हक्क मिळविले आहेत. आम्ही त्यांचेच इतिहास व ग्रंथ वाचीत आहोंत व त्यांचा अभ्यास करीत आहोंत. त्यांनीं आपले स्वातंत्र्याचे हक्क मिळवण्याकरतां जी खटपट केली ती आपण केली पाहिजे. **प्रत्येक गोष्ट क्रमाक्रमानें करा; पण निश्चयाच्या पाठिंब्याशिवाय तो उद्योग सफल होणार नाहीं हें लक्षांत ठेवा.** या कामीं आपलें आयुष्य खर्चलें तरी हरकत नाहीं पण निश्चय सोडूं नका. हल्लीं मनुष्यें व्यवहार करतात पण देश

व्यवहार करीत नाहीं. महाराष्ट्रांत प्रत्येक जिल्ह्यांत अशा संस्था झाल्यास महाराष्ट्र जिवंत झालें असें म्हणतां येईल. **देश आपला आहे, ही बुद्धि मनांत ठेवा.** उन्नतीची उमेद बाळगा आणि लहान संस्था स्थापा. कै. माटे, कै. चक्रदेव व कै. जोशी यांनीं अशा तऱ्हेचा उद्योग मागेंच सुरू केला होता, पण असे योग पुनः पुनः भ्रष्ट होतात. त्यांस पुनः पुनः चलन द्यावें लागतें. बंगाल्यानें हल्लीं अशा तऱ्हेचें चलन दिलें आहे. अशा वेळीं परमेश्वरावर भक्ति ठेवा, आणि सर्व उद्योगाचें मूळ जो निश्चय तो कायम ठेवा, म्हणजे परमेश्वर तुम्हांस साह्य करील. आपल्या राष्ट्राचें चाक ह्याहून अधिक खालीं जाणें अशक्य आहे. **आपल्या राष्ट्ररूपी गाडीचें चाक आतां वरच आलें पाहिजे.** तें कसें हें सांगण्याची जरूर नाहीं. तयारीला लागा. यश देणार परमेश्वर समर्थ आहे.

# आपले शत्रु आपणच !

शनिवार, ता. २९ फेब्रुवारी १९०८ रोजीं, सोलापूर येथें सदरबाजारांत लो. टिळक यांचें व्याख्यान झालें. तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष आणि सद्गृहस्थहो ! सदरबाजारांतील लोकांनीं या ठिकाणीं जो आमचा सन्मान व गौरव—आम्ही तितके योग्य नसतांनाही—केला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आज लोकसमुदाय फारच मोठा जमला आहे; पण उशीर झाला असल्यामुळें थोड्या अवधींत मला जे चार शब्द सांगतां येतील तेवढ्यांत आपण पूर्तता करून घ्याल व कमी-अधिक असल्यास ते परिपूर्ण करून गोड करून घ्याल अशी आशा आहे. सद्यःस्थिति या विषयाचे, हल्लीं काय चाललें आहे, पाठीमागें काय होतें, आणि ही स्थिति सुधारतां येईल किंवा कसें, असे तीन भाग होऊं शकतात. प्रत्येकाचें विस्तृत विवेचन एका वेळीं होणें अशक्य आहे.

महाभारतांत एका पर्वांत धर्म आणि नारद यांचा संवाद दिला आहे. त्यांत नारदांनीं धर्मास अनेक प्रश्न विचारले आहेत. लोकांची स्थिति कशा प्रकारची असावी तें नारदांनीं या प्रश्नांत ध्वनित केलें आहे. पाऊस, कृषिकर्म, वाणिज्य, व्यापार वगैरे कसे काय आहेत ! ब्राह्मण आपला धर्म पाळतात किंवा नाहीं ! वगैरे अनेक तऱ्हेचे हे प्रश्न आहेत. तुम्हीही अशा तऱ्हेचे प्रश्न विचारून त्यांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न केल्यास तुमची स्थिति तुम्हांस कळून येईल.

## चाळीस कोटींची खंडणी

हल्लीं राज्य इंग्रजांचें आहे. पहिला प्रश्न असा उद्भवतो कीं हिंदुस्थानांत पाऊस नीट पडतो कीं नाहीं, व नीट पाऊस पडत नसला तर जितका पाऊस पडतो तितका शेतकऱ्यांकरतां सांठवून ठेवण्याची तजवीज केली आहे किंवा नाहीं ? शेतकी पावसावर अवलंबून न ठेवतां जे राजे कालवे, तलाव वगैरे करतात ते चांगल्या तऱ्हेचे, अशी पूर्वीची समजूत असे. अशा तऱ्हेचा प्रश्न केल्यास शेतकीची व पदार्थ उत्पन्न होतात त्यांची स्थिति कळून येईल. आपण

इसमाची स्थिति न पाहतां देशाची स्थिति पाहिली पाहिजे. हल्लीं मी दरसाल १२० कोटि रुपयांचा माल बाहेर पाठवितो. व त्याच्या मोबदला ८० कोटींचा माल देशांत आणतों. म्हणजे **दरसाल आमचे अशा रीतीनें ४० कोटि रुपये जातात !** इतके दिवस आहांस हें कळत नव्हतें. आम्ही दरिद्री होत चाललों आहों, एवढेंच आपणांस समजत होतें. देशाचा विचार करणारीं माणसें निपजलीं नव्हतीं तोंपर्यंत देशास कोठें कीड लागली आहे हें समजणें कठीण होतें. कुटुंबाचा व देशाचा विचार निराळा आहे. तसा विचार करणारांचें असें म्हणणें आहे कीं, ३० कोटि लोक जितकें उत्पन्न करतात त्यांतील $\frac{2}{3}$ किंमत पदरांत पडते $\frac{1}{3}$ किंमत परदेशांत जाते; ती निरनिराळ्या रूपानें जाते. इंग्लिशांचें राज्य कायम रहावें म्हणून दरसाल ४० कोटि रुपये येथून परदेशी रवाना होतात. दरसाल ४० कोटि रुपये देण्याइतकें हें राज्य उत्तम आहे कीं नाहीं हा दुसरा प्रश्न आहे. आम्ही दंगाधोपा करूं देत नाहीं, म्हणून हे ४० कोटि रुपये नेतो असें त्यांचें म्हणणें आहे. प्रथम त्यांच्या दृष्टीनें आपण विचार करूं. काम करणाऱ्यास पैसा नाहीं म्हणणें म्हणजे एक प्रकारचा कृतघ्नपणा होय हें खरें आहे. पण प्रश्न असा आहे कीं काम करावयाला यांना बोलाविलें कोणी ? कोणी न बोलावितां, इकडे येऊन आमच्या लोकांस त्यांच्यासारखीं कामें करतां येणें शक्य असतां त्यांना तीं न देतां आपल्या हातांत ठेवून, मग म्हणावयाचें कीं 'आम्ही काम करतों म्हणून मोबदला घेतों !' यांच्यांतील हीच गौणता आहे. यासंबंधीं विचार चालू आहेत व होत आहेत, पण जे वाद सिद्ध झाले नाहींत ते मी सांगूं इच्छित नाहीं. दरसाल ४० कोट रुपये येथून बिनमोबदल्यानें परदेशी नेले जातात ही पहिली विचार करण्यासारखी गोष्ट आहे. सोलापुरांतून दरसाल २ लाख कोणी घेऊन जाऊं लागला तर हें शहर किती दिवस श्रीमान राहील ? इकडून दरसाल विलायतेंत जो पैसा जात आहे तोच तेथील कंपन्यांना भांडवल मिळून त्या कंपन्या तें भांडवल याच देशांत व्याजी लावून पुनः दुसऱ्या वर्षास त्याबद्दलचें व्याजही आमच्याकडून घेत असतात !

## धार्मिक व आर्थिक ऱ्हास

दरसाल ४० कोटि खंडणी देऊन श्रीमान राहणारा असा कोणता देश आहे ? हिंदुस्थान म्हणूनच त्यानें आजपर्यंत कळ सोसली. दुसरा एखादा देश असता तर

त्याची धुळधाण उडाली असती. ही पैशाची गोष्ट झाली. संपत्तीलाच ऱ्हास आहे असें नाहीं. **धर्मालाही ऱ्हास लागला आहे.** धर्माच्या बाबतींत सक्ति करावी असा कायदा नाहीं; पण आम्ही गरीब झाल्यानें पैसेवाल्याकडून अनेक तऱ्हेचे धर्मविरूद्ध उद्योग होत असतात; आणि अशा हल्ल्यानें धर्म बिघडत चालला आहे. धर्माचें शिक्षण नसल्यामुळें आम्ही धर्मास पारखे झालों आहों. विद्वान जर धर्मपराङ्मुख झाले तर खालच्या प्रजेस त्राता रहात नाहीं—त्यामुळें ती मिशनऱ्यांच्या कचाट्यांत सांपडते. गोवधासारखें अनिष्ट प्रकार चालले आहेत. शीख, मुसलमान यांनाही अनिष्ट प्रकार होत आहेत. राजा अधिकार वजावीत नाहीं, व शंकराचार्यासारख्या धर्मगुरूंस अधिकार नाहीं, यामुळें अनवस्था होते व धर्म ढिला पडतो. धर्माबरोबर **लोकांतील उत्साहही कमी झाला आहे.** लोकांस नोकऱ्या मिळेनाशा झाल्या आहेत. लष्करांत हलक्या जागा मिळतात. सर्व तंत्रें सरकारनें आपल्या हातीं ठेवल्यामुळें लष्करी बाण्याची तयारी नाहींशी होत चालली आहे. बंदोबस्त ठीक असेल, सडका, आगगाड्या झाल्या असतील, कलकत्त्याहून हुकूम सुटल्याबरोबर तो पाटील मान्य करीत असेल, राज्याचें गाडें सुयंत्रित चाललें असेल, पण **शांततेपेक्षां अधिक लाभ आम्हांस होत नाहीं,** ही गोष्ट पहिल्यांदा आमच्या लक्षांत आली नव्हती. एकीच्या बाबतींत नामशेष झालेले, धर्माच्या बाबतींत खालावलेले, शेतकीचा धंदा बुडालेला, कोष्ट्यांचा धंदा बुडालेला, लष्करी शिक्षण नसल्यामुळें दुर्बलता आलेली, व सर्वजण एका इंग्रज सरकारच्या वेसणींत सांपडलेले, असे आम्ही आहों. आपला देश इतक्या तऱ्हेनें खालीं गेलेला आहे. खेडेगांवांतील कुंभार, लोहार नाहींसे झालेले आहेत. त्यांचे धंदे बुडाले ! कोष्ट्यांचा धंदा बुडाला व त्यांचा धंदा इंग्रजी कोष्ट्यांनीं आपल्या हातांत घेतला. विलायतेंतील दोन शहरें आमच्या येथें कापड खपवून गब्बर झालीं आणि हें कापड विलायतेंत एकही कापसाचें बोंड तयार न होतां तेथें तयार होतें. इकडील धंदे इकडून तिकडे गेले ते इंग्रजी राज्यांत गेले. मुसलमान राजे या देशांतील पैसा परदेशांत टाकीत नसत—सर्व येथल्या येथेंच ठेवीत. आपण पाठविलेल्या मालाचे सर्व पैसे ज्यास परत येतात तो खरा सुपीक प्रदेश होय.

दुष्काळ पडला तर त्यास आम्हीं काय करावें ? पाऊस पडला नाहीं तर त्यांत आमचा काय दोष ? असें सरकारतर्फें सांगण्यांत येतें. यास मी उलट असा प्रश्न विचारतों कीं, इंग्लंड हा त्यांचा देश आहे, तेथें चांगलें पीक आलें तर चार पांच महिने पुरें इतकें धान्य येतें. बाकीचे आठ महिने पुरेसें धान्य बाहेरून आणावें लागतें; असें असून तीन तीन वर्षें पुरेल इतकें धान्य पिकणाऱ्या या देशांत दुष्काळ कां, व इंग्लंडांत कां नाहीं ? दोन्हीही राज्यकर्त्यांचे देश आहेत. यावरून दुष्काळाचा पावसाशीं विशेष संबंध नाहीं, हें दिसून येईल. येथील कारागिरी बुडविल्यामुळें हे दुष्काळ पडत आहेत. दुष्काळांत रिलीफ कामें काढून लोकांस मरूं न दिल्याबद्दल आम्ही वाटल्यास सरकारचे आभार मानूं. सरकार करतें आहे तें मी वाईट म्हणत नाहीं; पण सावकारानें आपल्या कुळाकडून आपला वसूल येण्याकरतां त्यास मरूं दिलें नाहीं म्हणून त्याचे जसे आभार मानावयाचे नाहींत, तशाच तऱ्हेची ही गोष्ट आहे. आमच्या जवळ पैसे असतील तर आम्हांस धान्य खरेदी करतां येईल. पाऊस पडला नाहीं तरी आमचें चालण्यासारखें आहे; पण पैसा नाहीं ! दुसरा धंदा नसल्यामुळें सर्वांना दुष्काळकामावर जाण्याची पाळी येते. त्यांतच हल्लीं सर्व बाबतींत अतिशय महागाई झाली आहे.

## राज्य लोकांचेंच आहे

ही स्थिति सुधारण्यास एकच मार्ग आहे. सरकारचा अधिकार बराचसा आपल्या हातीं आल्याखेरीज हें बंद होणार नाहीं. हल्लींची ही स्थिति सरकारच्या पुस्तकांतूनच निघाली आहे. ह्या गोष्टी अनेक तऱ्हेनें सरकारच्या कानावर गेल्या आहेत. पण त्याचा उपयोग झालेला नाहीं. **आम्ही स्वराज्य मिळविणें म्हणजे इंग्रजांना हांकून देणें हा अर्थ नव्हे.** सर्व तंत्रें आमच्या हातीं येऊन मग बरोबरीच्या नात्यानें ते राहिले तर हरकत नाहीं. आम्ही असहिष्णु नाहीं. आमच्या हातीं अधिकार आल्यास तीस चाळीस वर्षांत आम्हांस इष्ट त्या सुधारणा घडवून आणतां येतील. या सुधारणा विनंति करून होणार नाहींत. ते सुधारणा करीत नाहींत, त्यांना त्या करण्याची बुद्धि आहेसें दिसत नाहीं. त्यांना स्वार्थ आहे. आम्ही प्रयत्न करतो, पण त्यास राजाश्रय नसल्यामुळें आम्ही लंगडे आहों. याची

ग्रंथ पान १७७

पूर्तता स्वराज्याचे हक्क मिळवून त्याचा देशहितार्थ उपयोग करण्यानें होणार आहे. हा उपाय आंवाक्याच्या बाहेरचा आहे; तरी प्रयत्न करणें हें आपलें काम आहे. ते स्वराज्याचे हक्क मिळावे अशी जर आपली बुद्धि असेल, तर आपण जरा आत्मनिरीक्षण केलें पाहिजे; हल्लीं सर्व अधिकार सरकारला आहे, पण तो बजावण्याचें काम आम्ही करीत आहोंत. अधिकार बजावण्याची आमच्या इतक्या लोकांची जोंपर्यंत खुषी आहे—सरकारनें काम सांगावे, आणि आम्ही तें बजवावें; अशीच केवळ जोंपर्यंत स्थिति आहे—तोंपर्यंत सरकारनें आम्हांस हक्क काय म्हणून द्यावे ? कोणीही हक्क सुखासमाधानानें देत नाहीं. जोंपर्यंत आमच्यापैकींच सरकारचे नोकर 'अंमलबजावणी होणें अशक्य आहे' असें सांगण्यास तयार नाहींत, तोंपर्यंत आमच्या मागण्याचा काय अर्थ ? अर्जांना कोणीही भीक घालीत नाहींत. अंतःकरणें जळत असतील तर सरकारास दहा वर्षांत हक्क द्यावे लागतील अशा तऱ्हेचा मार्ग स्वीकारावा लागेल. हा मार्ग कांट्याचा आहे. आम्ही निश्चय केला तर अशक्य नाहीं. तुम्ही इंग्रज सरकारचें राज्य आपण होऊन चालवीत आहां. तुमच्या हातूनच जुलूम करण्याची हातोटी सरकारास साधली आहे. याकरतां ज्या वेळीं तुम्ही एकजुटीनं प्रयत्न कराल त्या वेळीं हें राज्य तुमचेंच आहे. इंग्रज सरकारची अशीच इच्छा आहे हिंदुस्थानांतील लोक तयार झाले कीं आम्ही येथून जाऊं, असें त्यांनी अभिवचन दिलें आहे. तुमचा निश्चय झाला पाहिजे. लहान उद्योगांत सरकारकडे न पाहतां, आपण आपल्या उदाहरणानें, उद्योगानें, निश्चयानें त्यांचें बोलणें खरें करावयास लावणें हें आपलें कर्तव्य आहे. हें कठीण आहे, पण आपण माणसें आहोंत हें लक्षांत ठेवा. **तीस कोटि पशूदेखील इंग्रजांना आकलन करतां आले नसते**; पण दुही व जातिमत्सर यांच्यामुळें आमची कोणतीही गोष्ट सिद्धीस जात नाहीं. अशी मनाची समजूत झाल्यामुळें आम्ही पंगू झालों आहों. याकरितां एकी करा, जूट करा, म्हणजे धार्मिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिक सर्व उन्नति तुमच्या हातीं आहेत. तुमच तुम्हीच शत्रू व तुमचे तुम्हीच मित्र आहां. आपली तुमची तुम्ही मदत करून घेतली पाहिजे. आम्ही धैर्य दाखविल्याखेरीज आम्हांस कोणी मदत करणार नाहींत. आम्ही बुडत असलो तरी बुडत नाहीं अशी बुद्धि धरली पाहिजे. परमेश्वराचा न्याय अन्यथा होणार नाहीं. त्याच्या साहाय्यानें आपली स्थिति सुधारो !

---

# मद्यपाननिषेध

सोमवार, ता. २ मार्च १९०८ रोजीं, सोलापूर येथील साखरपेठेंतील खंडोबाच्या तलावाजवळील तुरीच्या मैदानांत लो. टिळक यांचें व्याख्यान झालें, तें येणेंप्रमाणें: —

अध्यक्ष आणि सद्‌गृहस्थहो ! आज आपणांपुढें—एवढ्या मोठ्या समाजापुढें —मद्यपाननिषेध या विषयावर दोन शब्द बोलावे अशी आपण विनंति केली व त्या विनंतीस मी मान देऊन त्याकरतां येथें बोलावयास उभा राहिलों या दोन्ही गोष्टी आपणांस लज्जास्पद आहेत ! येथें जमलेल्या या समाजांत बरेचसे हिंदु आहेत व बरेचसे मुसलमानही आहेत. दोन्ही जातींच्या धर्मांत मद्यपान हें निषिद्ध मानलें आहे. जैन धर्म, बुद्धांचा धर्म, जगांतील ख्रिस्तीधर्माखेरीज यच्चयावत् सर्व धर्म मद्यपान निषिद्ध मानीत आहेत. ख्रिस्ती लोकांत तेवढें मद्यपान निषिद्ध नाहीं. ख्रिस्ती लोक या देशावर राज्य करीत आहेत. अशा प्रसंगीं, आपणांस धर्माज्ञा दारू न पिण्याबद्दल असतांना, 'दारू पिऊं नका' असा उपदेश करण्याची पाळी यावी हें आमचें दोघांचेंही दुर्दैव होय. दारू न पिण्यास सांगण्याचा प्रसंग आला कसा ? याचा विचार करणें अवश्य आहे. ज्यांनीं दारू निषिद्ध मानली होती, ज्यांनीं दारू पिणें हें पंचमहापातकांत घातलें होतें, ज्यांचें धर्म या पातकासारखें दुसरें पातक नाहीं म्हणून सांगत आहेत, त्यांतील लोकांना दारू न पिण्याबद्दलचा उपदेश करण्याचा हा विचित्र योग आला आहे. याचें कारण शोधून काढणें अवश्य आहे.

दारू कां पिऊं नये, याचीं कारणें सांगण्याची आवश्यकता नाहीं. याच्यायोगें शरीर, बुद्धि, आयुष्य वगैरे नाश पावतात. दारू हा पौष्टिक पदार्थ नाहीं, असे डॉक्टर लोक सांगत आहेत. इंग्रजसुद्धा दारू पिऊं नये म्हणून सांगतात. परंतु राज्यकर्त्यांचें म्हणणें व कृति हीं निरनिराळीं आहेत. आपल्या महाराष्ट्र देशांत पूर्वीं श्रीशिवाजी महाराज, पेशवे वगैरेंचें राज्य होतें. त्या वेळीं म्हणजे पेशवाईअखेर त्यांच्या मुलुखाचें दारूचें उत्पन्न १०,००० रुपये होतें. म्हणजे १० जिल्ह्यांचें हें उत्पन्न आहे; यांत कोंकणांतील ताडीचें, माडीचेंही उत्पन्न सामील आहे. पेशव्यांचा मुलूख

इंग्लिशांच्या ताब्यांत आला त्या वेळीं एल्फिन्स्टन् साहेबांनीं केलेल्या रिपोर्टांतील हे आंकडे आहेत. त्या रिपोर्टांत आणखी असेंही म्हटलें आहे कीं, राजानें हा बंदोबस्त ठेवल्यामुळें लोकांची नीति चांगली राहिली आहे, त्यांना सौख्य उपभोगावयास सांपडत आहे; व त्यांच्याजवळ पैसा शिल्लक आहे; इंग्रज सरकारनें हेंच धोरण ठेवल्यास महाराष्ट्र बिघडणार नाहीं. एल्फिन्स्टन् साहेबांनीं अशा तऱ्हेचा इषारा दिला आहे. हा रिपोर्ट इ. स. १८२० सालचा आहे. तेव्हांपासून आतांपर्यंत ८७ वर्षें झालीं. एवढ्या अवधींत पूर्वीं प्रत्येक जिल्ह्यास सरासरी जें एक हजार रुपयांचें दारूचें उत्पन्न होतें तें हल्लीं प्रत्येक जिल्ह्यास ५।६ लाख रुपये झालें आहे ! ! ! सबंध इलाख्याचें दारूचें उत्पन्न १ कोटी २५ लक्ष रुपये आहे ! ज्या जिल्ह्याचें सरासरीचें उत्पन्न एक हजार होतें त्याच ठिकाणीं इंग्रज सरकार तुम्हांला दारू पाजून दरसाल ५।६ लाख रुपये वसूल करीत आहे ! ही गोष्ट पुष्कळांना माहित नाहीं. दारू न पिण्याबद्दल उपदेश करण्याचा आम्हांस अधिक अधिकार नाहीं—धर्माज्ञेपेक्षां माझें वाक्य अधिक प्रमाण नाहीं. धर्मानेंच आपणास दारू न पिण्याबद्दल आज्ञा केली आहे. धर्मानें निषिद्ध मानल्यामुळें ज्या लोकांस आज कित्येक पिढ्या दारू पिण्याचें माहित नव्हतें त्यांस दारू पिण्यास कोणी शिकविलें ? पूर्वींच्या राजांनीं अगर वाडवडिलांनीं हें शिकविलें नाहीं. मग हें शिकविलें कोणी आणि कां शिकविलें ? ज्यांना दारू हें विष वाटत होतें त्यांच्यांत ह्या व्यसनाचा प्रसार झाला आहे. आमच्या इंग्रजी राजकर्त्यांनीं हा प्रसार आपली तिजोरी भरण्याकरितां केला आहे, ही गोष्ट येथेंच नव्हे तर राजकर्त्यांपुढेंही उघड सांगण्यास मी तयार आहे.

## सरकारनेंच दारूबंदी करावी

इंग्रज हे पिढीजात दारू पिणारे आहेत. आम्ही हजारों वर्षांपासून दारू सोडून दिलेली आहे. राज्यकर्ते दारू पिणारे आहेत; आम्ही न पिणारे आहोंत. अशांचा योग आला. याचा परिणाम काय झाला ? सर्व देशभर दारूचा प्रसार होऊन त्याचें सरकारास ५।७ कोटींवर उत्पन्न होऊं लागलें. सरकारनें या व्यसनाचा प्रसार न होऊं दिल्यास लोक अधिक नीतिमान, अधिक संपन्न व अधिक सुखी होतील यांत शंका नाहीं. विलायतेंत दारू न पिण्याबद्दल

सभा निघाल्या आहेत. त्यांना तुमचा आचार चांगला वाटतो. पण दुर्दैव कीं, तुम्हांला त्यांचा आचार चांगला वाटतो. आपलें राज्य होतें त्यावेळीं या दारूस त्या सरकारनें बंदी केली होती. इंग्रजांस हें कां करतां येऊं नये ? पोलिसांस चोऱ्या बंद करतां येतात, सरकारास 'फॉरेस्ट' राखतां येतें, मग त्यांना दारू बंद कां करतां येऊं नये ? ही बंदी त्यांस करतां येणार नाहीं असें नाहीं. पण सरकारच्या मनांत हें बंद करावयाचें नाहीं. त्यांच्या मनांत आल्यास हें दोन महिन्यांत होईल. सरकार आपल्या १० कोटी उत्पन्नाकरितां लोकांस दारू पाजीत आहे. सरकारच्या कागदपत्रांतील शास्त्र बरोबर असेल. पण त्यामुळें दारूच्या व्यसनास आळा न बसतां तें वाढतच आहे. लोकांस आम्हांला स्वराज्याचे हक्क पाहिजे आहेत म्हणून सांगतों, त्याचें हें एक महत्वाचें कारण आहे. आमच्या हातीं अधिकार आल्यास आम्हीं सात आठ वर्षांत दारू अजीबात बंद करूं. सरकारला ही गोष्ट माहित आहे. दारूसंबंधाचं काम लोकलबोर्ड व म्युनिसिपालट्या यांच्या हातीं देण्याबद्दल सरकारकडे कळविलें होतें. पण हें काम लोकलबोर्ड किंवा म्युनिसिपालट्या यांच्या हातीं दिलें तर जातीजातींत तंटे होतील, अगर त्यानें (Lead to political discontent) म्हणजे राजकीय असंतोष उत्पन्न होईल, हें कारण दिलें आहे! पण हें बरोबर नाहीं. कांहीं तरी निमित्त काढून लोकांना व्यसनांत घालणें हें राज्यकर्त्यांचें काम नव्हे.

इंग्लंडांत दरमाणशीं वर्षास तीस गॅलन दारू लागते. म्हणजे सरासरीनें दरमाणशीं दररोज अर्धी बाटली लागते. पिणारे न पिणारे धरून पुण्यांत दर एक माणशीं वर्षास १ गॅलन दारू लागते. म्हणजे माणशीं महिन्याला अर्धी बाटली लागते. यावरून कोणी म्हणेल कीं, संध्येच्या आचमनाइतकीहि प्रत्येकजण दारू घेत नाहीं; मग ही हाकाटी कां ? पण ही चूक आहे. कलेक्टरचा हा हिशेब चुकीचा आहे. याबद्दल अर्ज आले आहेत, ओरड केली आहे, तरी पण सरकार आमचें ऐकत नाहीं.

## दोन प्रकारची राजनीति

दारू पिऊं नये असें आमचा धर्म आम्हांस सांगत आहे, आमचे वाडवडील तेंच सांगतात, डॉक्टर, वैद्य वगैरे तेंच सांगतात, एवढ्यानें जर दारू बंद होत

नाहीं तर मी सांगून तरी दारू कशी बंद होणार ? दारू बंद करावयास उपाय काय ! विलायतेंत दारू बंद केली तर बंडें होतील, विलायतेंत लोकांना आवडेल असा कायदा करावा लागतो. पण दारू पिणाऱ्या देशांत तेथील लोक दारू बंद करण्याचा प्रयत्न करीत आहेत. दारूपासून अनेक वाईट परिणाम होतात हें इंग्रजांना माहित आहे; तिकडे मिशनरी दारू न पिण्याबद्दल उपदेश करीत आहेत आणि हा उपदेश सफळ झाला कीं, सरकार तिकडे दारू न पिण्याबद्दल कायदाही करील. पण हिंदुस्थानांतील प्रकार निराळा आहे. इकडे प्रथम दारू नव्हती. इंग्रज सरकार इकडे आलें त्यावेळीं, 'मतस्वातंत्र्य, कृतिस्वातंत्र्य मला आहे, माझी मोकळीक तुम्ही कोण नाहींशी करणार ?' अशा तऱ्हेचें तत्त्व—निदान दारूच्या बाबतींत तरी—पहिल्यांदा शिकविलें गेलें. या तत्त्वाच्या प्रसारामुळें व सरकारास दारूमुळें पैसे मिळतात त्यामुळें, हें व्यसन वाढत चाललें. विलायतेंत दारू बंद करण्याबद्दल खटपट चालू आहे. येथें बंद होती ती सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. अशा तऱ्हेची दोन ठिकाणीं ही निरनिराळी राजनीति सुरू आहे. या राजनीतीमुळें, ज्या देशांत दारूचें उत्पन्न शून्य होतें त्या ठिकाणीं तें दहा कोटी झालें आहे. चीनमधील अफू बंद करण्याबद्दल विलायतेंत खटपट चालू आहे, पण हिंदुस्थानला दारू न पाठविण्याबद्दल मात्र ते खटपट करीत नाहींत !

दारू विकूं नका म्हणून सांगण्याचें कारण नाहीं. सर्वांचें बहुमत दारू बंद करावी असेंच आहे. मग थोड्याशा लोकांकरतां दारूचें मुक्तद्वार ठेवलें आहे; तें बंद करण्यास सांगणें अवश्य आहे. दारूचीं दुकानें कॉंट्रॅक्टनें देण्यांत येतात. दारूचें दुकान प्रिय व्हावें म्हणून ही मंडळी तेथें नाच, तमाशे उभे करतात. हें करूं नये म्हणून कायदे आहेत; पण तिकडे सरकारचें लक्ष जात नाहीं. कॉंट्रॅक्टर लोक लोकांस दारू पिण्याकडे अधिक प्रवृत्त करतात म्हणून कांहीं मामलेदार व कलेक्टर यांचे रिपोर्ट आहेत. पण ते सरकारच्या दप्तरीं पडले आहेत. सरकारास लोकांस दारू फार पाजावयाची नाहीं, पण जी थोडीबहुत आहे ती बंद व्हावी, व त्याचें उत्पन्न कमी झालें तरी चालेल, असें त्यांस वाटत नाहीं. कारण ते पिढीजाद दारूबाज आहेत, त्यांस दारू बंद करावी असें वाटणार नाहीं. त्यांकरतां दारू बंद करण्यास इतर ठिकाणीं जे उपाय योजण्यांत येतात तेच येथें योजले पाहिजेत. दारू पिणारावर बहिष्कार घालून दारूच्या दुकानात जागा

द्यावयाची नाहीं, तेथें जाणाराला परावृत्त करावयाचें, व इतकेंही करून एखादें दुकान आलें तर तें चालूं द्यावयाचें नाहीं, असा आपण मनाचा निश्चय करून त्याप्रमाणें कृतीस सुरवात केली पाहिजे. दारू बंद करण्यास दुसरा मार्ग नाहीं. आम्ही उपदेश करण्याचें कारण नाहीं, धर्मच आपणांस दारू पिऊं नये म्हणून सांगत आहे. लोकांस दारू पिण्यास लावल्याचा दोष सरकारच्या माथीं आहे. आमच्या हातीं सरकारनें व्यवस्था दिल्यास आम्ही दारू बंद करूं, पण आमच्या सरकारनें खोट्या सबबी सांगून अबकारी खातें जिवंत ठेवलें आहे, आणि तें खातें वाढत आहे ! ही देशावर एक प्रकारची आपत्ति आहे, दारू पिणें बंद झालें तर निम्मे पोलीस कमी करितां येतील. दारूचें तंटे मिटविण्याकरितां बरेच पोलीस लागतात. अबकारी कमिशनर दरसाल चाळीस हजार रुपये नेतो, ते तो सव्वा कोटीची दारू खपवितो म्हणून. याशिवाय, कलेक्टर्स, सुपरिंटेंडेंट वगैरे लोक पगार नेतात तो निराळाच. इतका खर्च करण्याऐवजीं हें खातें अजीबात काढून टाकलें तर फारसा तोटा होणार नाहीं.

## बहिष्कारयोग हाच उपाय

मुळींच दारू न पिण्याबद्दल इतर ठिकाणीं हल्लीं कायदे होऊं लागले आहेत. आमच्यांत तसे कायदे नाहींत. आम्ही दारू बहिष्कार-योगानेंच बंद केली पाहिजे. दारू पिणारांशीं व्यवहार बंद ठेवला पाहिजे, तरच दारू बंद होईल, व सरकारला लाज वाटेल. अशा तऱ्हेची कृति खेडोखेडीं झाली पाहिजे. हें काम बिनसंकटाचें नाहीं. या रीतीनें एकसारखा प्रयत्न केल्यास कदाचित् तुरुंगांतही जावें लागेल. कुलाबा-खानदेशाकडे अशा तऱ्हेचा अनुभव आला आहे. दारू न पिण्याबद्दल शपथ घेणारांच्या मागें कॉंट्रॅक्टरच्या नुकसानीमुळें पोलिसांचा त्रास सुरूं झाला व त्यांनी शपथ मोडून दारू पिण्यास पुनः सुरवात केली. नुसतें दारू पिऊं नका म्हणून सांगण्यानें काम भागत नाहीं. दारू ही आईच्या रक्ताप्रमाणें माना म्हणून सांगितलें तर लोक एकतात, पण पोलीस त्यांच्या मागें लागलें कीं पुनः दारू सुरूं होते. मद्यपाननिषेधावर माझें हें पहिलेंच व्याख्यान नाहीं. आजपर्यंत मी बरेच वेळां या विषयावर बोललो आहे. हल्लींची स्थिति फार वाईट झाली आहे. दारूचे एक कोटि रुपये आपल्या

हातीं पडले तर आपणास काय करतां येणार नाहीं ! हे एक कोटि रुपये आपण होऊन घालवितो. जगांतील कोणचेंही सरकार दारू खपावी अशी तजवीज करीत नाहीं. हिंदुस्थानांत मात्र अशी व्यवस्था होत आहे. अशा वेळीं आपल्या हातीं एकच उपाय आहे व तो बहिष्काराचा. या वेळीं आपण निश्चयानें दारूच्या पिपावर, दारू पिणारावर आणि दारू पाजणाऱ्या सरकारावर बहिष्कार घातला पाहिजे. आम्ही सरकारच्या विरुद्ध बोलावयाचें म्हणून बोलत नाहीं. आमची ही ओरड आज पन्नास वर्षांपासूनची आहे. पण आमचें कोणी ऐकत नाहीं. तुम्ही तरी माझें ऐका एवढी माझी आपणांस विनंति आहे.

## दारू हें महापातक

हें महापातक—दारू—आज या सर्व देशांत वाढलें आहे. अशानें आपलें राष्ट्र ऊर्जित दशेस यावें कसें ? दारू पिण्यांत काय दोष आहे ? असें पहिल्या पहिल्यानें इंग्रजी शिकलेले प्रतिष्ठित लोक विचारीत असत. अलीकडे असले प्रतिष्ठित लोक कमी झाले आहेत. कांहीं लोक शास्त्रांतील खोटीं वचनें देऊन या दारूची तरफदारी करीत ! अशानें देश वर कसा यावा ? या दारूनें ब्राम्हण, मराठे, जैन, लिंगायत, मुसलमान वगैरे सर्वांना भ्रष्ट केलें आहे; अशांच्या हातून करामत काय होणार आणि हे करणार तरी काय ? याचा विचार करा. हें व्यसन अत्यंत घातुक आहे. दारू न पिण्याचा आमचा सद्गुण आमच्या स्वातंत्र्याबरोबर नाहींसा झाला. आमच्यांतील दारूचा दुर्गुण घालविण्याकरितां कांहीं ठिकाणीं चित्रें दाखविण्यांत येतात. चित्रें दाखविणें विलायतेंत ठीक आहे. इकडे वास्तविक त्याची आवश्यकता भासूं नये. ज्या देशांत आम्ही दारू बंद केली होती त्या ठिकाणीं ढिलाईमुळें हें व्यसन पुनः शिरलें आहे. ही ढिलाई इंग्रजी शिक्षण, गोरें सैन्य, नेटिव शिपाई व गिरणींतील मजूर यांच्यामुळें झाली. पण दारूचें व्यसन हा दुसरा प्लेग आहे. प्लेगाइतका हा भयंकर रोग आहे, ही गोष्ट मोर्ले साहेबांसपुद्धां मान्य आहे. पण त्यांनीं दारू बंद करण्याची काय तजवीज केली आहे ? दारू वाईट आहे वगैरे कोरड्या थापा रिपोर्टांत दाखल करतात, हातून कृति मात्र कांहीं होत नाहीं ! यांस वठणीवर आणण्यास एकच मार्ग आहे. आम्ही शहरांत दारूचें दुकान येऊं देतां उपयोगी

नाहीं. शपथ घेऊन जातीच्या पूर्वीच्या संस्था जोरांत आणून बहिष्कार अमलांत आणला पाहिजे. दारू पिणारा वाटेल तो असो, त्यास समाजानें शासन केलें पाहिजे. तसें न केल्यास दारू बंद होणार नाहीं. दारू बंद करण्यास एक तर स्वराज्याचे हक्क मिळविले पाहिजेत, नाहीं तर सर्वतोपरी दारूशीं संबंध तोडला पाहिजे. हा मुलाबाळांच्या सुखाचा प्रश्न आहे. दारू न पिण्याबद्दल धर्माची आपणांस आज्ञा आहे. त्याची आज्ञा पाळा. धर्माच्या आज्ञेपेक्षां सरकारची आज्ञा अधिक योग्यतेची नाहीं. प्रतिकार करणें तुमच्या हातीं आहे. दारू नको असेल तर जूट करून लोकांना बहिष्कार व **अडवणुकीच्या मार्गानें दारू बंद करावयास लावा.** असें न केल्यास थोडक्याच दिवसांत सर्व हिंदुस्थान देश बाटल्यांत बुडून जाईल.

## धर्माची आज्ञा पाळा

कोणत्याही शास्त्रानें या दारूस उत्तम पेय म्हटलेलें नाहीं. अशा या दारूची आम्हांस चीड आली पाहिजे. चीड हा आमच्यांतील पदार्थ नाहींसा झाला आहे. दारूच्या गल्लींतून जातांना नाकाला पदर लावण्याऐवजीं आम्ही तेथील दारूच्या दुकानास पदर लावला पाहिजे. हल्लींपेक्षां दारू बंद पाडण्यास आपण अधिक प्रयत्न केला पाहिजे. सरकार ऐकेल असें केलें पाहिजे; न ऐकेल तर त्यास दारू बंद करावयास भाग पाडतां येईल इतका हट्ट धरला पाहिजे. म्हणजे सर्व कांहीं होईल. आमच्यांत निश्चय नाहीं तो आणला पाहिजे. ठिकठिकाणीं मंडळ्या स्थापन झाल्या पाहिजेत. अबकारी अधिकारी, पोलीस अगर कलेक्टर, यांस भिऊं नका. सरकारचा कायदा आमच्या उलट असल्यामुळें एकच मार्ग आम्हांला उरला आहे व तो मार्ग सांगितलेला होय. कॉंट्रॅक्टरची कींव येण्याचें कारण नाहीं. तो पापी आहे. त्याच्या नुकसानीबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. याकरतां एक निश्चयानें दारू बंद कराल तर त्यामुळें पुष्कळ ठिकाणीं फायदा होईल. या बाबतींत सरकार दोषी आहे; आम्ही निर्दोषी आहों; आम्ही अबकारी खात्यास एकजुटीनें बहिष्कार घातल्याची तार परकी देशांत गेल्यास ते लोक तुमची तारीफच करतील. स्वराज्य जें पाहिजे तें याचकरतां होय. तें असतें तर तीन-चार वर्षांत दारू बंद करतां आली असती.

खरा दोष सरकारचा आहे. बायकांपोरांस उपाशी मारून आम्ही दारू पिण्यापेक्षां दुष्काळांत मेलेले चांगलें, अशी माझी समजूत आहे. आमच्यांत चीड नाहीं; ती उत्पन्न झाली पाहिजे. चार वर्षे दारू खपली नाहीं तर पोलीस खटले करील हें मी जाणून आहे. पण दारूच्या विरुद्ध बोलणें हें पुण्य आहे. दारू पिऊं नका म्हणून मी सांगण्याचें कारण नाहीं. धर्माची ती आज्ञा आहे. त्याप्रमाणें वागण्यास ईश्वर सर्वांस सुबुद्धि देवो एवढी त्याजवळ प्रार्थना आहे.

# राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा

मंगळवार, ता. ३ मार्च १९०८ रोजीं सायंकाळीं, बार्शी येथें 'लायब्ररी' मागील पटांगणांत लो. टिळक यांचे व्याख्यान झालें तें येणेंप्रमाणें:—

आज मी आपणापुढें 'राष्ट्रीय शिक्षण' या विषयावर बोलणार आहे. हे शब्द व्यवहारांतले नसल्यामुळें त्यांची फोड करून सांगणें जरूर आहे. नुसतं लिहितां वाचतां येणे म्हणजे शिक्षण नव्हे; लिहितां वाचतां येणें हें ज्ञान मिळविण्याचें—सुशिक्षित होण्याचें—साधन आहे. मागील पिढ्यांचा अनुभव पुढील पिढीस प्राप्त करून देणें याचें नांव शिक्षण, मग तें पुस्तकद्वारां मिळो अथवा अन्य तऱ्हेनें मिळो. प्रत्येक धंद्यास शिक्षण लागतें व प्रत्येक मनुष्य तें आपापल्या परीनें आपल्या पुढील प्रजेस देत असतो. कारागीर लोक आपल्या मुलांस आपल्या धंद्याचें ज्ञान देतात. तेल्याच्या धंद्याचें ज्ञान तेल्यास मिळालें पाहिजे. चांभाराचा धंदा कसा चालवावा, त्यांत काय सुधारणा केली पाहिजे, वगैरे शिक्षण त्यांस मिळालें पाहिजे. आपल्यांतील लष्करी धंदा बुडाला, पण तो जर असता तर त्या धंद्याचें ज्ञान मुलांस देण्याकरितां त्या तऱ्हेचें शिक्षण द्यावें लागलें असतें. खरोखर, असा धंदा नाहीं कीं, ज्यांत शिक्षणाची जरूर नाहीं. लोकांनीं आमचे धंदे बुडविले, पण हें कळत नाहीं. कुंभारास चिनीमातीच्या भांड्यांचा आकार करतां येतो, पण चिनीमाती कशी करावयाची हें माहीत नसल्यामुळें तो धंदा बुडाला आहे. त्याच प्रमाणें धर्मशिक्षणाचीही आवश्यकता आहे, धर्माचें ज्ञान नसेल तर धर्माभिमान कसा उत्पन्न होईल ? धर्म शिक्षणाचा अभाव हें 'मिशनरीं'च्या सुळसुळाटाला एक कारण झालें आहे. ह्या तऱ्हेचें शिक्षण आम्हांस मिळतें कीं नाहीं याचा आजवर आम्ही विचार केला नाहीं; आज व्यापारी येथें आले आहेत; ते आपलीं मुलें शाळेत नाखुषीनें पाठवितात किंवा पाठवीतही नाहींत; कारण त्यांस उपयोगी आहे असें शिक्षण तेथें मिळत नाहीं. शिवाय व्यापाऱ्यांची हल्लींच्या पद्धतीनें शिकलेलीं मुलें पोषाखी बनतात. कारकून होण्यास इच्छितात. ज्या गादीच्या आश्रयानें त्यांच्या वाडवडिलांनीं पैसे मिळविले त्या गादीवर बसण्याची त्यांस लाज वाटते.

किंबहुना अशा कामांत त्यांच्या स्वच्छ कपड्यास मळ लागलेलासुद्धां त्यांस खपत नाहीं, अशी त्यांची स्थिति होते ! याचें कारण हल्लीं मिळणारें शिक्षण एकांगी आहे हें होय.

## नोकरीकडे प्रवृत्ति कां झाली ?

सरकारास इंजिनिअर, डॉक्टर, कारकून वगैरे पाहिजे होते, तेवढेच तयार होतील अशा तऱ्हेच्या शाळा सरकारनें काढल्या, आणि म्हणूनच शाळांतून बाहेर पडलेल्या लोकांची प्रवृत्ति प्रथम नोकरीकडे झाली. कांहीं दिवस अशी स्थिति होती कीं, तीन-चार परीक्षा दिल्या म्हणजे उदरनिर्वाहाची काळजी राहत नसे; पण अलीकडे इतक्या परीक्षा देऊनही पोट कसें भरावें, याची पंचाईत पडूं लागली आहे; आणि म्हणून आमच्यांत आतां विवेक उत्पन्न झाला आहे. मी शिकलों असून मला पोट भरतां येऊं नये हा माझा दोष नसून तो शिक्षणाचा आहे, हें आतां कळलें आहे. हें शिक्षण कसें सुधारावें हा प्रश्न नंतर आमच्या डोळ्यापुढें साहजिकच उभा राहिला. शिक्षणखातें जर आमच्या हातांत असतें तर आम्ही तावडतोब इष्ट सुधारणा करूं शकलो असतो. पण हें नसल्यामुळें आम्ही प्रथम सरकारास विनंति केली. अगदीं आरंभीं, ज्ञान मिळविण्याची किल्ली-पुस्तकें वाचतां येणें—आमच्याजवळ देण्याविषयीं आम्ही सरकारास विनंति केली. आतां आम्हास नागरिक बनविणारें शिक्षण पाहिजे, असें वाटत आहे. हल्लींच्या शिक्षणांत सुधारणा करणें जरूर आहे, ही गोष्ट हल्लींचे गव्हर्नरसाहेब यांनींसुद्धां कबूल केली आहे. पण ते म्हणतात सरकाराजवळ पैसा नाहीं. ही सबब खरी असो अगर खोटी असो—मला स्वतःला ती सयुक्तिक वाटत नाहीं. पण सरकार या गोष्टीचा विचार करूं शकत नाहीं, एवढी गोष्ट निर्विवाद आहे. पण सरकार कांहीं करीत नाहीं म्हणून आम्हीही स्वस्थच बसावयाचें कीं काय ? हा प्रश्न आहे. धर्मशिक्षण सरकार देऊं शकत नाहीं व तें परधर्मी असल्यामुळें त्यानें तसें करणें इष्टही नाहीं. देशासंबंधानें विचार करण्याचें शिक्षण तर आमच्या इकडे मुळींच मिळत नाहीं. स्वतंत्र देशांत अशी स्थिति नाहीं. अमेरिकेंत चवथ्या पांचव्या इयत्तेंत स्वतंत्रतेचा जाहिरनामा शिकविला जातो. अशा रीतीनें तेथें शाळें-तील मुलांना राजकीय शिक्षण दिलें जातें; ऐशीं नव्वद वर्षांपूर्वी इंग्लंडच्या चढा-ओढीनें जर्मनींतील धंदे बुडाले. तेव्हां जर्मन सरकारनें शास्त्रीय व यांत्रिक शिक्षण

वाढविण्याचा हुकूम करून धंद्यांचें पुनरुज्जीवन केलें. अशा रीतीनें जर्मनीच्या उद्योगधंद्यांची इतकी भरभराट झाली आहे कीं, हल्लीं त्या देशाचे इतर देशांस भय वाटूं लागलें आहे.

## स्वतंत्र शाळा पाहिजेत

वास्तविक हें काम सरकारचें आहे; व आम्ही जे सरकारास कर देतो ते तरी एवढ्याचकरतां कीं, सरकारनें आमच्या कल्याणाच्या गोष्टी कराव्या. पण सरकारच्या मनांत आम्हांस लंगडें ठेवावयाचें आहे. विलायत व हिंदुस्थान यांच्या व्यापारविषयक हितांत विरोध आहे. म्हणून सरकार या बाबतींत फारसें कांहीं करूं इच्छित नाहीं. नाहीं म्हणावयास मुंबईस सरकारने असा उपक्रम थोडासा केला आहे. पण आमच्या खेड्यापाड्यांतील धंदें ऊर्जितावस्थेस येण्यास त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. खेड्यांतील लोकांस सोयिस्कर अशा शाळा खेड्यांत नसल्यामुळें शेतकऱ्यांचीं मुलें शाळेंत जात नाहींत. म्हणून आम्हीच ह्या गोष्टी करण्यास सुरवात केली पाहिजे. ह्या विषयासंबंधाचे पुष्कळ वादविवाद झालेले आहेत. आणि विचारांतीं असें दिसून आलें आहे कीं सर्व बाजूने **उपयुक्त असें शिक्षण मिळण्यास राष्ट्रीय शाळाच काढल्या पाहिजेत.** सरकारी मदतीच्या खाजगी शाळा यापूर्वी निघाल्या आहेत; पण त्यांतही सरकारी मदतीच्या भिंधेपणामुळें पाहिजे तसें शिक्षण मिळत नाहीं. हें देण्यासाठीं आपण स्वतःच शाळा काढिल्या पाहिजेत; मग ही गोष्ट सरकारास रुचो वा न रुचो. स्वार्थावर पाणी सोडून बंगाल्याप्रमाणें उद्योग करण्यास सुरवात केली पाहिजे. असा उद्योग सर्वत्र सुरू आहे. पंजाबांत गुरुकुल नामक संस्था अशाच धोरणावर निघाली आहे. वऱ्हाड, मद्रास वगैरे ठिकाणींही हा उद्योग सुरू झाला आहे. आपला महाराष्ट्र जरा ह्या कामांत मागें आहे. अशा तऱ्हेचा इकडेही उपक्रम झाला आहे, पण त्यास लोकांकडून साहाय्य झालें पाहिजे आहे. द्रव्यबलाची या कामास फार जरूर आहे. म्हणून या विषयाचें महत्व आपल्या मनावर जर ठसलें असेल तर आपण या कामास मनापासून मदत कराल, अशी माझी खात्री आहे. येथवर या विषयाचा पूर्वभाग झाला. आतां असें विद्यालय काढून तेथें आम्ही काय करणार हें मी आपणांस सांगतों.

स्थल पत्र सं. ता.

## धर्मशिक्षण

येथें आम्ही ज्या गोष्टी करणार आहोत, त्यांत पहिली गोष्ट विद्यार्थ्यांना धर्मशिक्षण देणें ही आहे. नुसतें व्यावहारिक शिक्षण मनुष्यास मनुष्यपणा आणण्यास पुरें होत नाहीं. धर्मांत जीं मोठीं तत्वें असतात त्यांचें अध्ययन मन पापापासून परावृत्त होण्यासाठीं फार जरूर आहे. धर्म आपणास ईश्वराचें स्वरूप शिकवितो. मनुष्य करणी करील तर परमेश्वर होऊं शकतो असें आपल्या धर्मांत सांगितलें आहे. उद्योग केल्यानें मनुष्य जर परमेश्वर होऊं शकतो तर गोऱ्या लोकांप्रमाणें आपणांस शहाणें व कर्तृत्ववान् होतां येणार नाहीं काय ! धर्मामुळें तंटे होतात असा कित्येकांचा आक्षेप असतो. पण मी विचारतो, धर्मांत तंटा करावा असें कुठें सांगितलें आहे ? पृथ्वीवरील सर्व धर्मांत अत्यंत सहिष्णु, ज्यानें त्यानें आपापल्या धर्मानें वागावें व सर्वांशीं प्रेमानें वागावें असें सांगणारा जर कोणचा धर्म असेल तर तो हिंदुधर्म आहे. या नवीन राष्ट्रीय शाळांमधून हिंदूंस हिंदुधर्माचें, मुसलमानांस त्यांच्या धर्माचें, अशा रीतीनें धर्मशिक्षण देण्याचा विचार आहे. निरनिराळ्या धर्मांतील व पंथांतील विरोध कसा नाहींसा करावा, हेंही शिक्षण येथें देण्यांत येईल.

## स्वभाषेंतून शिक्षण

दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे येथें परकीय भाषाध्ययनाचा बोजा नाहींसा करण्यांत येणार आहे. आज इतकीं वर्षें हिंदुस्थानांत राहूनसुद्धां एकाही साहेबास मराठी भाषेंत तास दोन तास चांगलें भाषण करतां येत नाहीं; पण आमच्या ग्रॅज्युएटांस मात्र इंग्रजींत उत्तम बोलतां आलें पाहिजे अशी सक्ती आहे. इंग्रजी बोलतां अगर लिहितां येणें म्हणजे सुशिक्षित होणें अशी शिक्षणाची व्याख्या झाली आहे. पण **नुसतें भाषाज्ञान हें खरें ज्ञान नव्हे.** परकी भाषा इतक्या उत्तम रीतीनें शिकावी लागण्याचा जुलूम दुसरीकडे कोठेंही नाहीं. आम्हांस परकी भाषेंतून ज्ञान संपादन करावें लागत असल्यामुळें सात-आठ वर्षांत मिळण्यासारख्या ज्ञानासाठीं आम्हांस २०।२५ वर्षें खर्चावीं लागतात. इंग्रजी अजिबात न शिकून आमचें भागावयाचें नाहीं; पण ज्ञान मिळविण्यास साधन म्हणून त्या

भाषेंत प्राविण्य मिळविण्याचें आम्हांस बिलकूल कारण नाहीं; मुसलमानी अमलांत आम्हांस फारशी भाषा शिकावी लागत होती, पण आतांप्रमाणें त्या भाषेचा बोजा आमच्यावर पडत नव्हता. हा व्यर्थ कालापव्यय होऊं नये म्हणून यां शाळेंत शिक्षण स्वभाषेंतून—मराठींतून—देण्याचें आम्ही योजिलें आहे. आरंभीं कानडी, गुजराथी वगैरे भाषाद्वारां शिक्षण देण्याइतकी अनुकूलता नसल्यामुळें महाराष्ट्राची प्रमुख भाषा जी मराठी तिच्या द्वारां शिक्षण देण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

## औद्योगिक शिक्षण

तिसरी गोष्ट म्हटली म्हणजे उदीमधंद्याचें शिक्षण. सावकारांच्या मुलांस पेढीचें शिक्षण कोणच्याही शाळेंत मिळत नाहीं. उद्योगधंदे व व्यापार यांचें शिक्षण या शाळेंत दिलें जाणार आहे. ही फार महत्वाची बाब आहे. आज शंभर वर्षांत आम्हांस आगकाडी कशी करावी हें समजलें नाहीं; ह्यास मोठी विद्वत्ता लागते अशांतली गोष्ट नाहीं. सोलापुरांत गवताच्या काड्या करतात; व आमच्या देशांत गवताची कमतरता नाहीं, म्हणून हा धंदा वाढविल्यास परदेशी काड्या पुष्कळ कमी येऊं लागतील. साखरेचा धंदा असाच आहे. मॉरिशस येथील उंसाइतका चांगला उंस आमच्या देशांत आहे; तेथील उंसाइतकी साखर पुण्याच्या आसपासच्या उंसांत असते असें त्या उंसाचें पृथक्करण करून पाहतां दृष्टोत्पत्तीस आलेलें आहे. साखरेचे पायीं सहा कोट रुपये आपण परक्यांच्या पदरांत टाकतो. असें कां व्हावें ? काय येथें ऊंस नाहीं ? कां यंत्रें मिळत नाहींत ? याचें कारण हें शिक्षण आम्हांस मिळत नाहीं. जर्मनींत असा प्रकार नाहीं; तेथें व्यापारी खात्याकडून कोणच्या धंद्याची कशी स्थिति आहे ह्याची चवकशी करण्यांत येते व बुडणाऱ्या धंद्यास उत्तेजन देऊन त्यांचें पुनरुज्जीवन करण्यांत येतें. इंग्लिश सरकार आपल्या देशांत असेंच करीत आहे. पण इकडे सरकार तसें करीत नाहीं. ही चूक असो; वा तसें मुद्दाम करण्यांत येत असो; एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं सरकार या बाबतींत कांहीं करीत नाहीं, म्हणून आपण स्वस्थ बसतां कामा नये. या कामासाठीं एखादी मोठी रसायनशाळा अथवा यंत्रशाळा काढण्याचा विचार आहे. साखरेपासून राब निघते, तिची दारू करण्याची परवानगी

सरकार देत नाहीं त्यामुळें साखर स्वस्त पडणें कठिण पडत आहे. २० हजार टन काकवी मॉरिशस बेटांतून इकडे येते. या सर्व गोष्टींस सरकारी धोरण कारण आहे; पण आम्हांस तें कळत नाहीं. लोक आग्रह धरतील तर सरकारास आपलें धोरण बदलावें लागेल. ह्या गोष्टी आम्हास शाळा सोडून पंचवीस वर्षें झाल्यावर समजूं लागल्या आहेत. त्या आमच्या पुढील पिढीस तरुणपणींच समजावयाला पाहिजे आहेत.

## राजकीय शिक्षण

चवथी गोष्ट राजकीय शिक्षण. हें सरकारी शाळांतून मिळत नाहीं. राणीचा जाहिरनामा हा आमच्या हक्कांचा पाया आहे, हें मुलांस समजलें पाहिजे. मुलांस असल्या गोष्टी कळूं नयेत, तीं अडाणीं राहावींत म्हणून सरकारचे प्रयत्न चालू आहेत. आपले परमपूज्य गुरु दादाभाई नौरोजी यांनीं पन्नास वर्षें दीर्घोद्योग करून जी गोष्ट सिद्ध केली आहे ती तरुण पिढीस लहानपणींच समजली पाहिजे. दरसाल मोबदल्याशिवाय तीस कोटि रुपये परदेशी जातात. ह्यामुळें आम्ही दरिद्री झालों आहों. ह्या गोष्टी लहानपणीं समजल्या म्हणजे त्या मनावर जशा ठसतात तशा मोठेपणीं ठसत नाहींत. म्हणून हें शिक्षण शाळांतून द्यावयास पाहिजे. प्रो. विजापूरकरांसारखी विद्वान मंडळी या कामास आपणांस सर्वस्वी वाहून घेण्यास तयार झाली आहेत. विद्वान लोक आपली विद्या देण्यास तयार आहेत. आतां धनवान् मंडळींनीं आपल्या धनाची जोड त्यांच्या विद्येस करून दिली पाहिजे. पुढील पिढ्या चांगल्या निपजून त्यांस पोटभर खावयास मिळावें व त्यांतील लोकांनीं उत्तम नागरिक बनावें ही आपल्या सर्वांच्या हिताची गोष्ट आहे. सरकारनें हें केलें असतें तर आम्हांस आनंद झाला असता. सरकार करीत नाहीं तर आम्हांस तें केलें पाहिजे. सरकार ह्या कामाच्या आड येणार नाहीं व आलें तरी आपण परवा करतां कामा नये. सूर्यास उगवूं नको म्हटल्यानें तो तसा उगवावयाचा रहात नाहीं तसें हें आहे. आम्हीं अद्याप सर्वस्वी गरीब झालों नाहीं. अमेरिकेंत एकेकटा माणूस हीं कामें करतो. आमच्यांत एकेकटा धनिक जरी हें करूं शकणार नाहीं तरी सर्वांनीं मनांत आणल्यास हें काम आपण करूं शकूं. आपण तीस कोटी आहोंत. सोलापुराहून नुसत्या दारूबद्दल जर पांच लाख रुपये

जातात तर या कामास आपणास मदत करतां येणार नाहीं काय? इच्छा पाहिजे आहे. सरकार रुसो किंवा रागवो—सरकार या बाबतींत सक्ती करील असें वाटत नाहीं—आपण आपलें कर्तव्य केलें पाहिजे.

सरकारनें लग्नें करूं नका म्हणून सांगितलें तर आपण तसें थोडेंच करणार आहोंत? शिक्षणाची गोष्ट अशीच आहे. उंदीर व घुशी बिळें करतील या भीतीनें ज्याप्रमाणें कोणी घरें बांधण्याचें सोडीत नाहीं, त्याप्रमाणें सरकार रागावेल या भीतीनें आपण उद्योगास लागण्याचें सोडून देणें उपयोगी नाहीं. संकटें आल्यास पुढच्या पिढीस जो मार्ग सुचेल त्याप्रमाणें ती वागेल. संकटाला भिऊन डगमगणें हें मनुष्यपणास कमीपणा आणणारें आहे. संकटें येतील तितकीं चांगलीं; कारण त्यामुळें अंगीं धैर्य येईल व संकटें सोसण्याची संवय लागेल. संकटें काढल्याशिवाय राष्ट्राचा संसार चांगला चालत नाहीं. स्वराज्याचे हक्क आमच्या ताब्यांत नाहींत म्हणून हें शिक्षण आम्हांस मिळत नाहीं. पेशवाईंत असें झालें नाहीं—आमचें राज्य चांगलें होतें कीं वाईट होतें हा प्रश्न स्वतंत्र आहे—पण पेशवाईंत दारूचें उत्पन्न दहा हजार होतें तें हल्लीं साठ लक्ष झालें आहे. इंग्रजांच्या कांहीं गोष्टी चांगल्या आहेत; पोलिस आहे, बंदोबस्त चांगला आहे, हें सर्व खरें आहे; पण लोक जास्त दारू प्यायला लागले व कफल्लक झाले हें वाईट आहे. हल्लीं स्वराज्याची ओरड एवढ्याचसाठीं आहे. आमच्या हातांत अधिकार येईपर्यंत वाट पाहून उपयोग नाहीं; त्या कामास सुरुवात आतांच केली पाहिजे. ह्या सर्व गोष्टी होण्यासाठीं राष्ट्रीय शिक्षण हवें आहे; व यासाठीं गांवोगांव जाऊन मदत मागण्याचा आमचा संकल्प आहे; तेव्हां आपण ह्या कामास यथाशक्ति मदत कराल, अशी आशा करून मी आपली रजा घेतो.

# स्वदेशी व्रत

बुधवार ता. ४ मार्च १९०८ रोजीं सायंकाळीं, बार्शी येथें, रा. ब. वैद्य यांचें 'स्वदेशी चळवळ' या विषयावर व्याख्यान झालें. तेव्हां अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक म्हणालेः—

व्यवहारोपयोगी व्रतांमध्यें श्रेष्ठ—व्रतानानुत्तमं व्रतम्—असें हें स्वदेशी व्रत आहे, व तें व्रत फार कडकडीतपणानें आज आम्ही पाळलें पाहिजे. ज्या देशांत कापसाचें एक बोंडही पिकत नाहीं व आठशें वर्षांपूर्वी जेथें लोक इतके अज्ञानांत होते कीं, लोंकर झाडावर पिकते अशी त्यांची समजूत होती, त्या देशानें आज आम्हांस कापड पुरवावें अशी स्थिति आली आहे. कापूस इकडे पिकावा, त्याची सरकी इकडे काढावी, त्याचे गठ्ठे इकडे बांधावे व कापड विलायतेंतून यावें याचें कारण काय? यांत्रिक सुधारणा विलायतेंत निघाली ती इकडे कां आली नाहीं? यंत्रें इकडे आणूं नका अगर यांत्रिक कला आम्हांस शिकवूं नका असा कोणी सरकारास अर्ज केला होता काय? हें काम वास्तविक सरकारचें होतें. कारण प्रजेचें कल्याण करणें हें राजाचें कर्तव्य आहे. पण सरकारनें तें केलें नाहीं. एवढेंच नाहीं, तर उलट आपले उद्योगधंदे वाढविण्याकरितां खटपट करून आमचे उद्योगधंदे बुडविले. डाक्याच्या तलम कापडासारखे कापड अद्याप यंत्रांवर निघत नाहीं. पूर्वी जेव्हां डाक्याची मलमल विलायतेंत जात होती, तेव्हां तिचा प्रसार बंद करण्याकरितां तिच्यावर त्यांनीं जकात बसविली. लोंकरीचा धंदा ऊर्जितावस्थेस आणण्याकरितां त्यांनीं मेंढ्या तिकडे नेऊन लोंकरीकरितां एक स्वतंत्र खातें स्थापन केलें. ह्या सर्व गोष्टी विलायत सरकारनें आपल्या देशाच्या फायद्याकरितां केल्या, पण आमचे हिंदुस्थानचे सरकार ह्या देशाच्या फायद्याकडे लक्ष देत नसून गोऱ्या लोकांच्या कल्याणाकडे त्यांची जास्त दृष्टि आहे हें आम्हांस आरंभीं कळलें नाहीं. शंभर वर्षांनीं घर धुवून गेल्यानंतर ही ओळख आम्हांस पटूं लागली आहे. खेड्यांतील लोकांस सुद्धां ह्या गोष्टी आतां थोडथोड्या कळूं लागल्या आहेत.

## सरकारचा सख्खा–सावत्रभाव

कच्चा माल आमच्याकडे व्हावा व पक्का माल बाहेरून यावा अशी स्थिति सध्यां चालू आहे. तीळ आम्ही पिकवावा, तेल विलायतेंतून यावें; भुईमूग आम्ही तयार करावा, तेल बाहेरून यावें. अशी स्थिति कां झाली ? याचें कारण आमचे राज्यकर्ते नुसते क्षत्रियच नाहींत, तर ते क्षत्रिय असून वाणीहि आहेत, हें आहे. व्यापाराच्या रस्त्यानें, अंमलदारांच्या पगारांच्या द्वारानें वगैरे रीतींनीं इंग्रज आमचा पैसा नेत आहेत; यांस कारण सावत्रपणाचें नातें हें होय. सख्खा–सावत्रभाव जेथें उत्पन्न झाला तें घर बुडालें, असा संसारांतला अनुभव आहे. इंग्रज सरकारास दोन मुलें आहेत; सख्खी मुलें विलायतेंत असून सावत्र हिंदुस्थानांत आहेत. या सावत्र मुलांची योग्य जोपासना होत नाहीं. अशी अनास्था होऊं लागल्यामुळेंच स्वदेशी चळवळ निघाली आहे. सरकारनें शेतकी खातें काढलें आहे. इजिप्तसारख्या लांब धाग्याच्या कापसाची गेल्या पंचवीस वर्षांत किती तरी लागवड करतां आली असती ! पण शेतकी खात्याचें लक्ष दुसरीकडेच आहे. येथें रबर कसा होईल ह्याची काळजी शेतकी खात्यास आहे. हेतु हा कीं, रबर इकडे झाला म्हणजे विलायतेस त्याचा चीक पाठविता येऊन रबरी सामान तिकडून इकडे यावें ! सारांश, कच्चा माल इकडे व्हावा व पक्का तिकडे तयार होऊन इकडे यावा व मजूरी वगैरे नफा गोऱ्यांच्या हातांत पडावा, असें सरकारचें धोरण आहे. रंगाला रंग ओळखतो; पैशाला पैसा ओळखतो. त्याप्रमाणें गोऱ्यांची ओढ गोऱ्यांकडे राहणार; सरकाराकडून साहाय्य होत नाहीं असें जेव्हां दिसून आलें तेव्हां स्वावलंबनाचा व प्रतिकाराचा प्रश्न निघाला. स्वदेशी व बहिष्कार हे आपल्या हातचे उपाय आहेत. स्वदेशी मालच वापरावयाचा असा निश्चय करण्यांत स्वदेशी मालास उत्तेजन देण्याचाच हेतु आहे. परकीयांचें नुकसान व्हावें हा हेतु नाहीं; माझें पोट प्रथम भरलें पाहिजे, मग लोकांचें भरलें तर माझी हरकत नाहीं. लोकांचें पोट अगोदर भरावें व मी उपाशीच रहावें इतके साधु आम्ही अद्याप बनलों नाहीं; हा स्वसंरक्षणाचा उपाय आहे. परद्वेषाचा हा प्रयत्न नव्हे. हल्लीं आपले दिवस फिरलेले आहेत; आपण साधू जर बनूं तर साधूंस योग्य असें जें ठिकाण तेथें म्हणजे स्वर्गास आपणास लवकरच जावें लागेल. व्यापारी साधु झाला कीं बुडालाच म्हणून समजावें. हिंदुस्थानास सवलत देण्याचा

प्रश्न निघाला कीं पार्लमेंटांत पंचवीस लोक उभे राहून विचारतात कीं आपण हिंदुस्थान कशाकरितां काबीज केलें आहे ?

असो, कापड विणण्याची कला आमच्या देशांत निघाली, पण हल्लीं पंचवीस कोटींचें कापड बाहेरून येत आहे. रंग देखील तिकडून येत आहेत. अशी स्थिति कशानें आली, त्याचा आपण विचार केला पाहिजे. हा कांहीं आवाक्याबाहेरचा प्रश्न नाहीं, अथवा मोठमोठ्या ग्रंथांतून काढून आपल्यापुढें ठेवलेला नाहीं; हा रोजच्या व्यवहाराचा प्रश्न आहे. पक्का रंग प्रथम इकडे निघाला. जाजमाचा तांबडा रंग इकडेच निघाला. फार काय, पण तेलांत बुचकळल्यानंतर रंग पक्का होतो ही गोष्ट-सुद्धां ते आमच्यापासूनच शिकले; पण हल्लीं पक्का रंग तिकडून इकडे यावा अशी स्थिति आली आहे. या गोष्टीचा आम्हीच विचार केला पाहिजे. आम्हांस हिंदु-स्थानाबाहेर कोठें थारा नाहीं; आमचा देशच काय तो आम्हांस उरला आहे; पण येथें-ही आमचें घर आमच्या ताब्यांत राहतें कीं नाहीं, असा प्रश्न उत्पन्न झाला आहे. राज्यकर्ते या बाबतींत बहुतकरून कांहीं करणार नाहींत. **या स्थितीचा प्रतिकार आमचा आम्हांसच केला पाहिजे.** परदेशी माल स्वस्त असला तरी घ्यावयाचा नाहीं असा निश्चय आपण केला पाहिजे. विदेशी मालास अडीच रुपये पडत असून स्वदेशीस तीन पडत असले तरी स्वदेशीच माल आपण घेतला पाहिजे, कारण तिकडे गेलेला पैसा पुनः परत येणार नाहीं. अशा रीतीनें परदेशांत आठ आणे जाण्यापेक्षां आपल्याच देशांत आपल्याच देशबांधवांजवळ रुपाया राहणें हें अधिक इष्ट आहे.

## आमचें सौभाग्य परक्यांच्या हातीं


देशी माल महाग आहे व कित्येक देशबुडवे लोक लबाडी करून या चळवळीचा फायदा घेत आहेत, हें मला कबूल आहे. असले देशबुडवे आपल्यांत आहेत म्हणूनच हें संकट आपल्यावर आलेलें आहे. बांगड्या विलायती, पोत विलायती, फार काय सौभाग्यदायक कुंकू विलायती झाल्यामुळे आमचें सौभाग्य-सुद्धां परक्यांच्या हातांत गेलेलें आहे. सगळ्यांची बुद्धि भ्रष्ट झाली आहे. इंग्रज लोकांची अशी स्थिति होती तेव्हां त्यांनी शेंकडा पन्नास टक्के जकात बसवून स्वदेशी चळवळ केली. जर्मनी, ऑस्ट्रिया, वगैरे देशांनीं हेच केले आहे.

आमच्याही हातीं सत्ता आली तर आम्ही ह्या गोष्टी उद्यां करून दाखवूं. पण अशी सत्ता नाहीं, स्वराज्याचे हक्क आम्हांस नाहींत, म्हणून तुमच्यापुढें येऊन एकीनें कार्य करा, असें सांगण्याचा प्रसंग आला आहे. हें लहानसहान व्रत नाहीं, तुम्ही तयार व्हाल तितकें थोडें आहे; विदेशी माल घेऊन आम्ही गोरा लोहार, गोरा कुंभार, गोरा कोष्टी यांचीं पोटें भरीत आहोंत तुम्हांला गोऱ्यांची जर अधिक आवड असेल तर गोऱ्यांची पोटें भरा. पण जवळ आपला भाऊ मरत आहे, त्यास सोडून लांबच्यांची काळजी तुम्हांस वाटत असेल हें कधींही शक्य नाहीं. आमचे व्यापारी परकी माल आणून देशद्रोह करीत आहेत. ही देशबुडवेपणाची दलाली सोडून द्या. मुंबईत एकदां बोलण्याचा प्रसंग आला असतां मी सांगितलें होतें कीं, नुसत्या बहिष्कारानें आपलें काम भागणार नाहीं. परकी मालास बहिष्कार घालून आपल्या देशांत तो माल कसा उत्पन्न होईल याचें ज्ञान लोकांस करून दिलें पाहिजे. राष्ट्रीय शाळा तरी ह्याकरितांच पाहिजे आहेत. आपण ह्या उद्योगास मनःपूर्वक लागले पाहिजे; **नुसती मांडीवुर मांडी ढाळून स्वदेशी व्रताची चेष्टा करणें ह्यासारखें दुसरें महापातक नाहीं.** तुमच्यानें फार कांहीं होत नसेल तर जे थोडेबहुत लोक करीत आहेत त्यांच्या आड येऊ नका. परकी मालास बहिष्कार घातला तर त्यांचे कसें होईल ? याची काळजी तुम्हांस नको. हिंदुस्थानाशिवाय त्यांस इतरत्र पुष्कळ गिऱ्हाईक आहे. तुमच्या अज्ञानामुळें व सरकारच्या काळजीमुळेंच आम्हांस अशी स्थिति प्राप्त झाली आहे. स्वदेशी व्रत गिऱ्हाईक तयार करतें. उद्योगानें काय होत नाहीं ? शंभर वर्षांपूर्वी जेथें एकही गिरणी नव्हती, त्या मँचेस्टर शहरीं हल्लीं शेंकडों गिरण्या झाल्या आहेत; व ज्या हिंदुस्थानांत पूर्वीं कोट्यवधी माग होते, त्यांची आज वाताहात झाली आहे. हिंदुस्थान हा चर वाळूचा तुकडा असता तर ह्याच्याकडे कोणी ढुंकूनही पाहिलें नसतें, पण हा सोन्याचा तुकडा आहे म्हणून सर्वांची दृष्टि आहे. ह्या सोन्याच्या तुकड्याची हल्लीं पितळ होत आली असून शेवटीं माती तरी हातीं राहते कीं नाहीं याची शंका आहे.

## राष्ट्रीय इमारतीचे चार खांब

ही स्थिति सुधारण्याचा उद्योग शुद्ध अंतःकरणानें केला पाहिजे. **आपला देश अशा स्थितीस यावा ही गोष्ट मनास एकसारखी टोंचली**

पाहिजे. या विचारांचा परिणाम वृद्धांवर फारसा होणार नाहीं, पण पुढच्या पिढीच्या तरी मनावर हे विचार उत्कृष्ट रीतीनें ठसावे म्हणून हा प्रयत्न आहे. आपण उद्योग करा, म्हणजे परमेश्वर साहाय्य करील. परमेश्वराची कृपा केवळ इंग्रजांवरच आहे असें नाहीं. आपल्या देशावर प्रेम करण्यास कोणास भिण्याचें कारण नाहीं. अथवा त्यांत कोणाचा दोषही होत नाहीं. मी दुसऱ्या एका प्रसंगीं एक दृष्टांत देऊन सांगितलेंच आहे कीं, आपल्या बायकोवरच प्रीति करा असें सांगितल्यानें दुसऱ्या बायकांचा द्वेष करा असें होत नाहीं. एकपत्नीव्रताप्रमाणें हें स्वदेशी व्रत आहे. हा पोटापाण्याचा प्रश्न आहे. आमच्या पोटावर प्रेम करणें हें आमचें कर्तव्य आहे; त्यामुळें दुसऱ्याचें पोट भरलें नाहीं तर त्याबद्दल आम्ही जबाबदार नाहीं. शुद्ध अंतःकरणानें आपण काम केलें म्हणजे परमेश्वर साहाय्य करीलच करील. म्हणून राष्ट्रीय इमारतीचे चार खांब—स्वराज्य, स्वदेशी बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण यांचें अवलंबन करण्याविषयीं प्रार्थना करून मी आपलें भाषण संपवितों.



# बाबू बिपिनचंद्र पाल यांची मुक्तता

सोमवार ता. ९ मार्च १९०८ रोजीं रात्रीं मुंबई येथें कावसजी पटेल तलावाजवळील हिराबागेंत, 'नॅशनल यूनियन' मार्फत, नवीन पक्षाचे बंगाल्यांतील पुढारी बाबू बिपिनचंद्र पाल यांची कारागृहांतून सुटका झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करण्यासाठीं डॉ. नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरली होती, तींत लो. टिळक यांचें भाषण झालें तें येणेंप्रमाणेंः—

आजचा दिवस फार आनंदाचा आहे. हा आनंद सर्व देशभर सारख्या प्रमाणानें झालेला आहे. आज येथें ज्याप्रमाणें सभा भरवून आनंदाचा दिवस पाळला गेला आहे, त्याप्रमाणेंच तो सर्वत्र पाळला जाईलसें वाटतें. आज आपणांस आनंद कां झाला आहे याचें कारण सांगण्याची जरूरी नाहीं. बिपिन बाबूंची काराग्रहांतून आज मुक्तता झाली म्हणून आपणांस आनंद झाला आहे अशा प्रसंगीं जिव्हा विस्तृत पाल्हाळिक रीतीनें सुटतात असा नियम आहे. मनोविकार जेव्हां प्रबळ होतात, तेव्हां ते अनावर होतात. बाबूसाहेब सुटले म्हणून आनंद झाला; परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, हा त्यांचा कारागृहवास आपणास बंद करितां आला नाहीं. आपली फार दुर्बल अवस्था झाली आहे! प्रेम, खेद, अन्यायाच्या शिक्षेबद्दल मनांत असलेला संताप, या तिघांचा मिलाफ झाला पाहिजे. बिपिन बाबूंवर जो प्रसंग आला होता तो या देशांतील पुढाऱ्यांवर येऊं नये म्हणून जर कांहीं तजवीज करितां आली तर आजचा आनंदाचा दिवस खरा म्हणावयास हरकत नाहीं. बाबू बिपिनचंद्र पाल विद्वान आहेत, धार्मिक आहेत, तत्त्ववेत्ते आहेत म्हणून आपणास आनंद झाला असे नव्हे, ते सुटले म्हणून नव्हे, सुटले हें निमित्त कारण आहे; पण आनंदाचें कारण तिसरेंच असलें पाहिजे. एका पुढाऱ्याला अन्यायाची शिक्षा झाली, ती आपणांस बंद करितां आली नाहीं, व अशा रीतीनें राष्ट्राला जो धक्का बसला, त्याच्या स्मारकाची ही सभा आहे. ज्याप्रमाणें मनोधर्म त्याप्रमाणें न्याय व कायदेशीरपणा यांत अंतर आहे. कायदा जेव्हां जुलमी होतो, तेव्हां तो तोडणें हें मनुष्याचें कर्तव्य होतें. मनोदेवता त्याला जें सांगतें तेंच करणें हें माणुसकीचें लक्षण होय, असें मल

वाटतें. हें तत्त्व पूर्णपणें प्रत्येकाच्या मनांत बिंबलें पाहिजे. आजच्या सभेपासून अशा बऱ्याच गोष्टी शिकतां येतील. राष्ट्रावरील संकटाला बाबू बिपिनचंद्र पाल हे पहिले बळी पडले आहेत. असें न व्हावे, म्हणून आजचा उत्सव आहे. प्रयत्न करा म्हणजे परमेश्वर तुमचा पाठीराखा होईल. मी जास्त बोलूं इच्छित नाहीं. पुण्यास नाहीं तरी मुंबईस अशा प्रकारच्या सभेस मला हजर राहतां आलें याबद्दल मला आनंद होत आहे. पुणें, बेळगांव वगैरे ठिकाणींहि अशाच सभा भरवावयाच्या होत्या. परमेश्वर करो व अशा प्रकारच्या आनंदप्रदर्शक सभा भरविण्याचा प्रसंग आपणावर पुन्हा न येवो, अशी इच्छा प्रदर्शित करून मी आपली रजा घेतों.

मराठी ग्रंथ संग्रहा

# राष्ट्रीय शिक्षण व लोकांचें कर्तव्य

शनिवार ता. २१ मार्च १९०८ रोजीं, म्हणजे रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या पुणें जिल्हासभेच्या बैठकीच्या दुसऱ्या दिवशीं राष्ट्रीय शिक्षणासंबंधींचा सहावा ठराव लो. टिळक यांनीं सभेपुढें मांडला. तेव्हां त्यांनीं भाषण केलें, तें येणेंप्रमाणें:—

सभ्य गृहस्थहो, आपल्यापुढें जो ठराव मांडण्याची अध्यक्षांची मला आज्ञा झाली आहे, तो ठराव आधीं मी आपल्याला वाचून दाखवितो. तो ठराव असा आहे:—'**राष्ट्रीय शिक्षण**' [ अ ] राष्ट्राच्या गरजा व इष्ट साध्य लक्षांत आणून त्याअन्वयें हल्लींच्या शिक्षणपद्धतींतील दोष नाहींसे करून अशा शिक्षणाचा प्रसार करण्याकरितां चालू शिक्षणसंस्था सुधारणें व स्वावलंबनाचे तत्त्वावर निव्वळ लोकांच्या ताब्यांतील नवीन शिक्षणसंस्था काढणें अवश्य आहे, असें या सभेचें मत आहे. [ ब ] वरीलप्रमाणें राष्ट्रीय शिक्षणसंबंधानें विचार करण्याकरितां व पुढील जिल्हासभेपुढें रिपोर्ट सादर करण्याकरितां खालील गृहस्थांची कमिटी नेमण्यांत येत आहे—रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी [ अध्यक्ष ] लो. बाळ गंगाधर टिळक, डॉ. नानासाहेब देशमुख, प्रो. वि. गो. विजापूरकर, रा. ल. ब; भोपटकर, रा. रा. दा. देसाई, प्रो. ह. गो. लिमये, प्रो. के. रा. कानिटकर, रा. न. आ. द्रविड, प्रो. वा. ब. पटवर्धन, रा. वि. रा. जालनापूरकर, रा. वि. गो. आपटे." प्राथमिक शिक्षणासंबंधानें बोलतांना रा. आपटे ( हरी नारायण ) यांनीं सांगितलें कीं, आम्ही मागतो तें सरकार देत नाहीं. त्याच्यापुढें भाग असा कीं, सरकार जें कांहीं देत आहे तें पुरेसें नाहीं आणि सरकार देत आहे त्यांतील बऱ्याच गोष्टी आम्हांस नको आहेत. बंगालची विभागणी हें राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न पुढें येण्यास कारण झालें. सरकार विवक्षित मर्यादेपलिकडे शिक्षण जाऊं देत नाहीं—सरकारचें धोरण ठरून गेले आहे, आणि राष्ट्रीय म्हणूनच शिक्षणासंबंधाचा विचार आपल्याला करावा लागत आहे. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न दुसऱ्या देशांत निघत नाहीं. सरकार व लोक यांचें एकमत असतें तेव्हां ही चळवळ होत नाहीं, हें साहजिक आहे. लॉर्ड रॉबर्ट्स यांचा लष्करी शिक्षणासंबंधानें कांहीं विचार असला तर त्यांस सर-

कारचा व लोकांचा पाठिंबा मिळणें शक्य असतें. जर्मनींत उपयुक्त शिक्षण कालानुसार देण्याची व्यवस्था करतात—जपानांतही असेंच होतें. राष्ट्राला काय पाहिजे, राष्ट्राची इभ्रत, संपत्ति, वैभव कसें वाढेल, राष्ट्राची छाप इतरांवर कशी बसेल, हें जें शिकवील तें शिक्षण. व्यापारी पैसा मिळवितो. पण तो पैसा बरोबर घेऊन जात नाहीं. त्याचें जें संचित द्रव्य असतें, त्या द्रव्यावर व्यापार करून मुलांनें तें वाढवावें, हें शिक्षण त्यास देणें म्हणजे व्यापारी शिक्षण त्यास दिल्यासारखें आहे. मागील पिढीच्या शिक्षणाचा शेवट हा पुढील पिढीच्या शिक्षणाचा आरंभ करून मागील पिढीच्या शिक्षणांत पुढील पिढीला ज्या शिक्षणानें भर घालतां येईल तें खरें शिक्षण. नुसतें लिहिणें वाचणें हें शिक्षण नाहीं. लिहिणें-वाचणें शिकणें म्हणजे केवळ ज्ञानाच्या प्रदेशांत प्रवेश करणें आहे. कालिदासांनेंसुद्धां म्हटलें आहे कीं, 'लिपेर्यथावद्ग्रहणेन वाङ्मयम्। नदीमुखेनेव समुद्रमाविशत्' लिहा-वाचावयास शिकविणें म्हणजे अंगणांत सोडणें आहे.

## आगबोटीमागील होडगें

शिक्षणाचें द्वार बंद करणें व पुढला मार्ग संकुचित करून बुद्धीच्या विकास न होऊं देणें, हे हल्लींच्या शिक्षणपद्धतींतील दोष आहेत. सरकारला हें कळत नाहीं असें नाहीं. जपान, जर्मनी हीं राष्ट्रें शिक्षणासंबंधानें काय करीत आहेत हें सरकारला ठाऊक आहे. पण राणी सरकारच्या स्मारकाकरितां जमलेले पैसे लोकांच्या शिक्षणाकडे खर्च करण्यास तयार झालें नाहीं; लॉर्ड कर्झन यांनीं नवा ताजमहाल बांधण्याचें ठरविलें पण त्या-प्रीत्यर्थ लागणारे कित्येक लाख रुपये औद्योगिक शिक्षणाकडे खर्च करण्यास तयार झाले नाहींत. सरकार स्वतः करीत नाहीं, व दुसऱ्याला स्वतंत्रपणें करू देत नाहीं, अशी स्थिति आहे. अमूक एक मर्यादेपर्यंतच आम्ही जावें, असें त्यांचें धोरण आहे. आम्हांस पाहिजे तसें शिक्षण सरकारी शाळांत मिळणें शक्य नाहीं. असें शिक्षण सभांतून वगैरे जावून मिळवावें, असें जर मनांत आणलें तर त्यालाही शिस्तीच्या नांवाखालीं बंदी करण्यांत आली आहे. इंग्लंडच्या आगबोटीमागचें हिंदुस्थान हें एक होडगें व्हावें अशी सरकारची इच्छा आहे. आमच्या मतें हिंदुस्थान इंग्लंडच्या बरोबरीची आगबोट व्हावी. आम्हाला पाहिजे आहे तें शिक्षण देण्यास सरकार

तयार नाहीं; आणि त्याचें कारण उघड आहे. आम्ही आमचा अंतिम हेतु कोणता ठरवावा, आमची महत्त्वाकांक्षा आम्ही कोठपर्यंत ठेवावी, यासंबंधींचे आमचे विचार सरकारी अधिकाऱ्यांना पसंत वाटत नाहींत. मोर्ले साहेबांच्या नजरेच्या टप्प्यांत येतें तोंपर्यंत Bureaucracy अधिकारी वर्गाचें राज्य चालावें, असें त्यांचें म्हणणें आहे. हिंदुस्थानानें मँचिस्टरसारखीं शहरें पोसावीं अशी त्यांची इच्छा आहे. 'राष्ट्रांच्या गरजा' किंवा इष्टसाध्य यांसंबंधाच्या सरकारच्या व आमच्या कल्पना भिन्न असल्यामुळें त्यांच्या व आमच्या शिक्षणविषयक विचारांत भेद होणें साहजिक आहे. सरकारच्या ताब्यांत काय आहे आणि आपल्यास त्यांतील भाग कसा मिळवितां येईल हें सरकार कधींही शिकविणार नाही. पण 'आई जेऊं घालींना व बाप भीक मागू देईना' अशी आमची स्थिति झाली आहे. 'रिस्ले सर्क्युलर' काढून बाहेरचें शिक्षण बंद करावयाचें आणि सरकारी शाळेंत योग्य शिक्षण द्यावयाचे नाहीं, अशी स्थिति आहे.

अशी स्थिति राहूं नये म्हणून बंगाल इलाख्यांत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयत्न झाला असून इतरत्र तो होऊं लागला आहे. हल्लीं आहेत त्या शाळा असाव्या तशा नाहींत, या शाळांनीं देशाची गरज भागत नाहीं. त्यांतून धार्मिक शिक्षण दिलें जात नाहीं—कारण सरकार धर्माच्या बाबतींत तटस्थ आहे. राजकीय व औद्योगिक बाबतींत सरकार तटस्थ आहे; याचें कारण सरकार परकीय आहे. आर्ट्स कॉलेजांत, मेडिकल कॉलेजांत वगैरे सरकाराच्या गाड्याला मदत करायला हवींत तितकींच माणसें सरकाराला पाहिजे आहेत. लोकांना उच्च शिक्षण अधिक मिळणें सरकाराला नको आहे, असें स्पष्ट दिसत आहे. सरकारी शिक्षणानें हजारांत एखादा रा. ब. रानडे होतो—नाहीं असें नाहीं—ज्यानें उच्च व उदात्त विचारांचें परिशीलन केलें त्याच्या डोक्यांत विचार येत नाहींत असें नाहीं. आजच्या सभेचे अध्यक्ष रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे सरकारी शिक्षणक्रमां-तूनच बाहेर पडलेले आहेत. अशीं माणसें सरकारी शिक्षणक्रमांतून मुळींच बाहेर पडत नाहींत असें माझें म्हणणें नाहीं; पण यापेक्षां—हल्लींपेक्षां—असलीं माणसें अधिक निपजावीं असें माझें म्हणणें आहे. सरकारला सर्व कांहीं कळतें. त्यांच्याच पुस्तकांतील आंकडे घेऊन आम्हीं त्यांच्यापुढें मांडतों. सरकार आम्हांस काय उत्तर देत असेल तें देवो. पण ते लोक आपल्या घरीं याबद्दल

आपल्याला हांसत असतील. त्यांनींच इतिहास लिहिलेला; त्याच्यापुढें त्यांतील माहिती काय मांडतां? त्यांना सर्व ठाऊक आहे. इंग्लंड देश कसा वाढला, हें त्यांना माहित आहे; पण तुमच्या देशाला उच्च करण्याचा त्यांचा विचार असेल तर कीं नाहीं?

## आमची प्रगति कां खुंटते?

सरकारी धोरणानें आमची प्रगति खुंटत आहे. दारिद्र्यामुळें सारी शिक्षणसंस्था आपल्या हातांत घेतां आली नाहीं तरी एक राष्ट्रीय कॉलेज स्थापिलें तर सरकारजवळचे पैसे आमचेच आहेत, ते आम्हाला पुढें आमच्यासारखे करून घेतां येतील. संस्थानांतून स्वतंत्रता असली तरी ते परिस्थितीमुळें बांधले गेले आहेत. माझ्यासारखा आगापिछा नसलेला माणूस एखाद्या संस्थानिकापेक्षां अधिक काम करूं शकतो, अशी स्थिति आहे. पहिलें ‘कावळ्याचा रंग काळा,’ दुसरें ‘मेंढ्यावरी लोंकर दाट भारी,’ तिसरें ‘माळीबोवा! मला निरनिराळ्या रंगाचीं फुलें द्या,’ हीं तत्त्वें ज्यांत आहेत त्या पुस्तकांतील शिक्षणाने मुलांच्या मनावर संस्कार होणार काय, व त्या मुलाचा पुढें राष्ट्राला उपयोग होणार काय? राष्ट्राच्या कामाकरितां माणसें तयार करावयाचीं, असा सरकारचा हेतु दिसत नाहीं. राजकीय—नाहीं राष्ट्रीय—शिक्षण, ज्यानें ‘राष्ट्राकरितां मी वेळ आल्यास मरेन देखील’ अशी बुद्धि उत्पन्न होईल असें शिक्षण राष्ट्रीय शाळेंत दिलें गेलें पाहिजे. तुम्ही रानटी होतां. इंग्रजांना देवानें तुमच्याकरितां पाठविलें, त्यांना प्रत्येक गोष्टींत अनुकूल राहण्यांत तुमचें हित आहे, असें शिक्षण हल्लीं दिलें जात आहे. कमिशनपुढें मला विचारलें होतें कीं, सरकार जर पैसे खर्च करील तर त्यावर सरकारची देखरेख नको का! मी सांगितलें कीं, पैसे द्याल तर द्या, पण देखरेखीचें व्याज त्याबरोबर आम्हांला नको, देखरेखीचा विटाळसुद्धां नको.

## पुढील पिढीचें ऋण द्या

राष्ट्रीय बाण्याचें शिक्षण स्वतंत्रपणेंच अधिक चांगलें देतां येईल. परावलंबनाच्या शिक्षणक्रमांतून तरुण पिढी कच्ची व नाउमेद अशाच निघावयाची.

देवाचें, ऋषींचें व ब्राम्हणांचें अशी तीन ऋणें सांगितलीं आहेत, याच कल्पनेप्रमाणें तुम्ही पुढल्या पिढीचें ऋण देणें आहां; तें न द्याल तर तुमचें व पुढल्या पिढीचें नुकसान कराल. दे. दादाभाई नौरोजी यांनीं पन्नास वर्षें खर्चून हिंदुस्थानांतून इंग्लंडाकडे द्रव्याचा कसा सारखा ओघ चालला आहे हें सिद्ध केले. दे. दादाभाईनीं सिद्ध केलेली ही गोष्ट जी दादाभाईना त्यांच्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं कळली ती गोष्ट जर पुढील पिढींतील मुलाला त्याच वयांत कळेल तर मग दे. दादाभाई यांनीं श्रम केले ते कशाला ? न्यूटननें एक सिद्धांत स्थापित केला. त्या सिद्धांताचें ज्ञान मुलाला एकदम प्रथम मिळून त्यापुढें अधिक शिक्षण मिळालें पाहिजे, तरच प्रगति होईल. पुढली पिढी नेहेमीं मागल्या पिढीच्या पुढें जात राहिली पाहिजे. सध्यां राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांतील विद्यार्थी युनिव्हर्सिटीच्या परीक्षांना घेणार नाहींत, पण म्हणून राष्ट्रीय शाळा काढावयाच्या नाहींत असे करतां कामा नये. सरकारी शाळेंतून बाहेर पडणाऱ्या लोकांपेक्षां राष्ट्रीय शाळेंतून बाहेर पडणारे लोक अधिक चांगले व अधिक विद्वान असले पाहिजेत. राष्ट्रीय शाळांतून शिक्षणाचा दर्जा कमी करावयाचा आहे, असें मुळींच नाहीं. राष्ट्रांत विद्वान लोक निपजतील तितके पाहिजे आहेत. राष्ट्रांत विद्वान नसणें म्हणजे तें राष्ट्र बुडालें असें समजावें. इंग्लंडसारख्या देशांत मार्गदर्शक असे मुत्सद्दी विद्वान आहेत, आणि म्हणूनच त्यांचा उत्कर्ष झाला आहे. सरकारला बुडवितां येणार नाहीं, अशी विद्वत्तेची परंपरा आपली आहे. परीक्षा सोप्या कराव्या, त्या पास होण्यास कमी विद्वत्ता पुरावी, असा राष्ट्रीय शिक्षणाचा हेतु नाहीं. राष्ट्रीय शाळांमुळें इतर शिक्षणसंस्थांचें नुकसान न होतां हितच होणार आहे. तेव्हां या राष्ट्रीय महत्वाच्या विषयाकडे लक्ष देऊन राष्ट्रीय शिक्षणास आपण मदत करावी, अशी विनंति करून मी खाली बसतो.



# मद्यपाननिषेधाच्या चळवळीची दिशा

रविवार ता. २२ मार्च १९०८ रोजीं, रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरलेल्या पुणें जिल्हा सभेच्या बैठकीच्या तिसऱ्या दिवशीं 'मद्यपाननिषेध अथवा अबकारी' या विषयावरील ठराव सभेपुढें आला होता, तेव्हां त्यावर लो. टिळक यांनीं जें भाषण केलें त्याचा गोषवारा येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष महाराज आणि सभ्य गृहस्थहो, पुढल्या एका ठरावावर माझें नांव असल्यामुळें या ठरावावर मी बोलणार नव्हतों, पण आतां जें एक भाषण झालें तें ऐकून या विषयावर बोलावें, असें मला वाटलें व अध्यक्षांच्या परवानगीनें मी आपल्यापुढें उभा आहे. रा. लवाटे, रा. खाडिलकर, रा. देवधर, रा. नातू यांनीं या विषयाचें विवेचन केलेंच आहे, आणि ही गोष्ट निर्विवाद आहे कीं इंग्रज सरकारामुळें आमच्या इकडे दारूचा प्रसार झाला दारूचा प्रसार बंद करावा म्हणून सरकारकडे अर्ज करण्यांत आले, पण सरकारनें—ते दारूबाज असल्यामुळें—आमचें म्हणणें ऐकलें नाहीं. सरकारच्या मनावर दारूचा बुरसा चढला असल्यामुळें—आमच्या म्हणण्याकडे त्यांचें लक्ष लागलें नाहीं. रा. देवधर यांनीं आपल्या भाषणांत सांगितलें कीं, मद्यपाननिषेधावर लहान लहान चोपडी छापून तीं सर्वांस द्यावीं, मद्यप्राशनापासून होणारे दुष्परिणाम दाखविणारे देखावे 'मॅजिक् लँटर्न'च्या द्वारें लोकांस दाखवावे, घरोघर जाऊन स्त्रियांस मद्यपानाविरुद्ध उपदेश करावा, मद्यपानाचा तिटकारा येईल अशा प्रकारचीं चित्रें मुलांमध्यें वाटावीं आणि त्यांनीं वाचावयाच्या पुस्तकांतून मद्यपाननिषेधपर सचित्र धडे घालावे. मला या उपदेशांत कांहीं अर्थ वाटत नाहीं. इंग्लंडांतील लोक पिढीजाद दारूबाज आहेत, तेव्हां त्यांच्या पुस्तकांत चित्रें घालून किंवा 'मॅजिक-लँटर्न'नें त्यांना मद्यपान वाईट आहे हें दाखवावयाचें आहे. आमच्याइकडे या गोष्टींची जरूरी नाहीं. आम्ही पिढीजाद दारू पिणारे नसून आमच्या धर्मानें दारू निषिद्ध म्हणून सांगितलें आहे. पूर्वीं आमच्यांत दारूचा प्रसार झालेला नव्हता; तेव्हां आमच्या बायकापोरांच्या मनावर दारूच्या दुष्परिणामाचा ठसा उमटविण्या-

करितां क्रमिक पुस्तकांतून सचित्र धडे घालण्याची अगर 'मॅजिक लँटर्न'नें देखावे दाखविण्याची आवश्यकता नाहीं.

## मद्यपानाची चीड

माझ्या घरांत येऊन कोणी मद्यपानाविरुद्ध उपदेश करूं लागला तर मी त्याला प्रथम घराबाहेर घालवून देईन. जेथें मद्यपान निषिद्ध मानलें जातें तेथें मद्यपानासंबंधानें उपदेश करावयास जाणें म्हणजे तेथील लोकांचा अपमान करणें आहे. मद्यपान बंद करावयाचें म्हणजे त्यासंबंधानें चीड आली पाहिजे. तरुण कुमारींच्या विक्रयासंबंधानें विलायतेस 'रिव्ह्यू ऑफ रिव्ह्यूज'चे मि. स्टेड यांनी ज्या प्रकारची चळवळ केली त्या प्रकारची चळवळ इकडे झाली पाहिजे. केवळ अर्जानें असलीं कामें होत नसतात. नीतीला, धर्माला, आईबापाला, पूर्वजांना स्मरून जर या कार्याला उद्युक्त व्हाल तर—कांहीं अधिकाऱ्यांचें शाप घ्यावे लागले तरी—सर्व जग तुमची पाठ थोपटील. तुम्ही जर दारू बंद करूं शकला नाहीं तर तुम्ही स्वराज्याला नालायक आहां, असें मी समजतों. 'मॅजिक लँटर्न'नें हें होणें नाहीं—त्या निमित्तानें पैसा मात्र विलायतेला जाईल. तुम्ही मद्य खरोखरच निषिद्ध मानतां हें स्वार्थत्यागाचा व नीतीचा जोर दाखवून सिद्ध करा. कायदा मोडूं नये हें सामान्य तत्त्व मला कबूल आहे. पण ट्रान्सव्हालासारखी स्थिति आली म्हणजे कायदा पाळणें अशक्यच होतें. सरकार येथें बंदोबस्त ठेवावयाला आलें आहे, नीति शिकवायला आलेलें नाहीं. तें अनीति शिकवीत नाहीं; पण नीति शिकविण्याचा प्रत्यक्ष उद्योगही तें करणार नाहीं. आमच्या इकडे सध्यां खपते इतकी दारू खपणें म्हणजे कांहीं विशेष नाहीं, असेंच त्यांना त्यांच्याकडच्या मानावरून स्वाभाविकपणें वाटत असून दारूच्या खपापासून जो फायदा होतो तो ते करून घेत आहेत.

## तरुण पिढीचें कर्तव्य

दारू बंद करण्याचें काम तरुण पिढीनें केलें पाहिजे. अन्यायी अधिकाऱ्यांच्या अंमलबजावणीस बळी पडून तुरुंगांत जावें लागलें तरी त्यास तरुण पिढीनें तयार असलें पाहिजे; आणि त्यांना त्यांच्या आळीतील लोकांची मदत मिळाली

पाहिजे. तुमची मद्यपानासंबंधाची चीड इतकी प्रबल असली पाहिजे कीं, अन्यायी अधिकाऱ्यांनीं उगीचच्या उगीच तुरुंगांत टाकलें असतां त्याचें दुःख मद्यपानानें येणाऱ्या चिडीपेक्षां कमी वाटलें पाहिजे. कांहीं लोक आपल्या पवित्र उद्देशाकरितां तुरुंगांत गेले तर तुम्हाला चीड आणणाऱ्या गोष्टी कमी झाल्याखेरीज राहणार नाहींत. फार तर काय, पण आपल्या थोर उद्देशाकरितां परिश्रम करीत मरण्याचीही तुमची तयारी असली पाहिजे, तरच तो सफळ होईल. तुमचा निग्रह कमी, तुमचा निश्चय कमी, म्हणून तुम्हांस मिळणारें फलही कमी. एक दारूचें दुकान कमी करीन तर मी स्वर्गाला जाईन, असें वाटलें पाहिजे; मग हें व्यसन परत इंग्लंडांत जाईल. स्त्रियांना मद्यपानाविरुद्ध उपदेश करावयाचा असें म्हणून आमच्या हिंदी स्त्रियांचा समावेश मद्यप्राशनास अनुकूल असलेल्यांत कशाला करतां ? त्या मद्यपी आहेत काय ? त्यांना मद्यप्राशन आवडतें काय ? त्यांना मद्यप्राशनाविरुद्ध उपदेश करावयास जाण्यासंबंधानें बोलतांना लाज वाटली पाहिजे. आमच्या बायका कांहीं दारू पीत नाहींत किंवा आपल्या मुलांना दारू पाजीत नाहींत. त्यांना कशाचा उपदेश करतां ? आमच्याइकडे होत असलेला मद्यप्राशनाचा प्रसार बंद करावयाचा म्हणजे त्याची तुम्हांस चीड आहे असें तुम्ही दाखविलें पाहिजे, त्याकरितां स्वार्थत्याग करावयास तुम्ही तयार झालें पाहिजे, आणि आळींत दारूचें दुकान उघडणें अशक्य केलें पाहिजे, हाच त्यास उपाय आहे. नाहीं तर चित्रें व 'मॅजिक लँटर्न' बायकापोरांना दाखवून कांहीं होणें नाहीं.

# रयतेचीं दुःखें !

रविवार, ता. २२ मार्च १९०८ रोजीं, म्हणजे रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरलेल्या पुणें जिल्हासभेच्या बैठकीच्या तिसऱ्या दिवशीं, 'जंगलखातें, जमीनसारा, हत्यारांचे परवाने, जमीनमहसुलाचा कायदा, गांवकुळकर्ण्यांचे पगार, साऱ्याची तहकूबी, प्राप्तीचा कर, वगैरेसंबंधाचा ठराव' लो. टिळक यांनी सभेपुढें मांडला. तेव्हां त्यांनीं केलेल्या भाषणाचा गोषवारा येणेंप्रमाणें:—

घोड्यावरील कंठाळींत ज्याप्रमाणें निरनिराळ्या वस्तु ठेवलेल्या असतात त्याप्रमाणें 'कंठाळी' ठरावांत निरनिराळ्या अनेक विषयांचा समावेश केलेला असतो. शेतकऱ्यांचे प्राण ज्यांनीं कंठांत येतात त्या बाबींचा समावेश झालेल्या, ठरावास मी 'कंठाळी' ठराव म्हणतो. स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण वसाहतीसारखें स्वराज्य हें प्राप्तव्य असावें किंवा पूर्ण स्वातंत्र्य हें अंतिम साध्य ठरवावें, या मोठमोठ्या गोष्टींचा विचार व ऊहापोह शहरांतील सभांतून व राष्ट्रीय सभांतून होतो. पण खेड्यांतून संसारांत राहणाऱ्या लोकांना जीं दुःखें भोगावीं लागतात, ज्या अडचणी येतात व जे हाल सोसावे लागतात, त्यांचें स्वरूप शहरांतील लोकांच्या दुःखापेक्षां, अडचणींपेक्षां व हालांपेक्षां निराळें असतें. जंगल, पोलिस, अबकारी, रेव्हिन्यु या प्रत्येक खात्याच्या फाजिलपणानें लोकांना अडचणी येत असतात व त्याने त्यांस फार त्रास होतो. पेशवाईत जंगलखातें नव्हतें तें १८७६ सालीं झालें व या खात्यानें पुढें चांगलेच हातपाय पसरले. यामुळें शेतकऱ्यांना आपलीं गुरें चारण्यास रान राहिलें नाहीं. आणि लांकूडफांटा मिळण्याची पंचाईत झाली. दुष्काळांत चाऱ्याच्या अभावीं बहुतेक गुरें पटापट प्राणास मुकतात. पेशवाईअखेर कमाल दर होता, तो फार आहे, तो कमी करा, असें लोकांचें म्हणणें होतें, पण तिकडे लक्ष देण्यांत आलें नाहीं.

## दुप्पट सारावाढ

आतां तर दुप्पट कमाल झाली आहे ! ८० वर्षांत सारा दुप्पट झाला आहे ! साऱ्याची मागणी भलत्याच वेळीं करण्यांत येतें. सुपे, बारामतीकडे ७५ सालीं

दंगा झाला. ‘ अॅग्रिकल्चरल ’ कमिशनरच्या सूचना सरकारनें ऐकल्या नाहींत. शेतकऱ्यांचा जमिनीवरील हक्क काढून घेतला. आमच्या वाडवडिलांपासून चालत आलेला हक्क काढून घेण्यांत आला आहे. ‘लॅंड रेव्हिन्यू’ कोडाच्या एका कलमानें जमीन शेतकऱ्याची नाहीं, असें ठरविण्यांत आलें. कोडांत नाजूक शब्द आहेत, त्यांचा उपयोग करून असें फर्माविण्यांत आलें आहे कीं, जमीन नांगरण्याचा हक्क ‘ वंशपरंपरेनें ’ चालावयाचा आहे. कै. रा. सा. मंडलीक यांनीं यास हरकत घेतली होती, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सारा दिला नाहीं म्हणजे हा ‘नांगरण्याचा हक्क’ही नाहींसा होत असतो. जमीन दहा हात खणूं म्हणाल तर तसें करतां येणार नाहीं. खालीं दगडाची खाण लागली तर ती सरकारची ! साध्या नांगरानें जितकी खोल खणतां येईल तितकी जमीन खणावयाची. पाण्यावर कर बसला आहे. बागाइती विहिरीवर व कालव्याजवळच्या विहिरीवर कर ! घरचें सागाचें झाड तोडतां येत नाहीं. जमीनीवर झोपडी बांधली तर ती शेतकीच्या कामाकरितां बांधलेली असला पाहिजे—घर बांधलें तर दंड होईल ! दहा पिढ्यांची शेतकऱ्याची जमीन सारा थकला कीं जाते ! पोलीस खात्यानें शेतसनद्यांचीं वतनें खालसा केली ! जंगलांतील लाकूड घ्यावयाचें नाहीं ! जंगलाच्या आसपास स्वतःचें लांकूड कापण्याची सोय नाहीं ! झाड तोडावयाचें झालें तर तें आपल्या नंबरांतलें आहे हें शेतकऱ्याला सिद्ध करावें लागतें.

जंगलासंबंधाचा त्रास, पोलिसांचा त्रास, रेव्हिन्यू खात्याचा त्रास, असे अनेक त्रास रयतेस सोसावे लागतात. सावकार शेतकऱ्याला लुबाडतो म्हणून सावकाराचे हक्क बुडवून सरकारानेंच शेतकऱ्यांस लुबाडण्याचें काम आपण करण्यास प्रारंभ केला ! रयतेचीं दुःखें कशीं नाहींशीं करतां येतील हें पाहिलें पाहिजे आहे. आम्ही त्यांच्याकरितां अर्ज करून पाहिले आहेत, पण त्यांचा उपयोग झालेला नाहीं. इंदापूर तालुक्याचा अर्ज तर पार्लमेंटपर्यंत पाठविला होता. पण सरकारनें जाणून बुजून केलेल्या गोष्टी फिरत नाहींत. लहान सहान गोष्टी—गाऱ्हाणीं—दूर होतील, पण विलक्षण चळवळ केल्याखेरीज हें होणार नाहीं. अडवणुकीचा मार्ग स्वीकारण्याबद्दल शेतकऱ्याचें मन वळविलें पाहिजे. आपण सर्वजण शेतकऱ्याच्या श्रमावर उपजीवन करतों, हें विसरूं नका. त्याला सोडूं नका. त्यांच्यांत निश्चय व जूट उत्पन्न करून त्यांना धीर द्यावयाचा, त्यांना संकटांतून मोकळें करावयाचे, हें तुमचें कर्तव्य आहे.

## हत्यारांचे परवानें

हत्यारांचे परवाने अधिक मिळण्याचें तर एकीकडेच राहिलें, पण आहेत त्यांतील कमी करण्यांत येत आहेत. डुकरांचा त्रास झाला तर बंदुका नकोत, बरच्यांचा उपयोग करा म्हणतात. बंदुका देत नाहींत. जुन्नराकडे रामोशांचें बंड झालें होतें. यावर पोलिसांच्या रिपोर्टांत म्हटलें आहे कीं, चावडींत दगड जमा करावे व गोफणीनें दगड फेंकून दंगेखोरांना मारावें! दोनतीन तरवारी रामोशांना मिळाल्या कीं, त्यांना एखाद्या तालुक्यावर राज्य करतां येतें. अशी स्थिति आहे. बेळगांवकडे उंसाचीं पिकें डुकरें खातात हें कळलें; त्यावर उपाय काय सुचवितात तर नवीन कर बसवून डुकरें मारण्याकरितां एक गोरा अंमलदार नेमावा—एका गोऱ्याला ही जागा द्यावी. पण याची सरकारला पुढें लाज वाटली आणि तसें करण्यांत आलें नाहीं. कुळकर्ण्यांचे पगार फारच थोडे असून ते वाढणें अवश्य आहे. कुळकर्ण्यांवर कामाचा बोजा फार असतो. जे तें काम कुळकर्ण्यांकडे यावयाचें असें आहे. गांवचें कावळे किती आहेत हें मोजण्याचें काम करावें लागलें तर तेंही कुळकर्ण्यांनेंच करावयाचें! तेव्हां महिन्यांतून एकदां कुळकर्णी मामलेदार-कचेरींत जातो व काय लिहावयाचें असेल तें एकदां सगळें लिहून टाकतो; आणि त्यानें अशा रीतीनें केलेल्या कामांत जे आंकडे दिलेले असतात ते आपल्याला मिळतात. पीक चार आणें आलें आहे कीं कमी आलें आहे हें ठरविण्याचें कुळकर्ण्यांकडेच येतें, तेव्हां कुळकर्ण्यांच्या कामाच्या मानानें पाहतां त्यांचे पगार वाढणें अवश्य आहे. अशी रयतेस अनेक प्रकारचीं दुःखें सोसावीं लागत आहेत व त्यांचीं अनेक गाऱ्हाणीं आहेत; तिकडे लक्ष देऊन तीं नाहींशीं करण्याचा प्रयत्न कराल व आपलें कर्तव्य बजावाल अशी आशा आहे.

# साखरेचे कारखाने

रविवार, ता. २२ मार्च १९०८ रोजीं, म्हणजे रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें येथें भरलेल्या पुणें जिल्हा सभेच्या बैठकींचे तिसऱ्या दिवशीं, साखरेच्या कारखान्यासंबंधींचा १२ वा ठराव लो. टिळक यांनीं सभेपुढें मांडला, त्या वेळीं त्यांनीं केलेल्या भाषणाचा गोषवारा येणेंप्रमाणें:—

हा शेवटचाच ठराव आहे आणि हा शेवटचा आहे याने मला आनंद वाटत आहे; कारण, हा ठराव साखरेसंबंधाचा आहे. मॉरिशिअस बेट हें एका तालुक्याएवढें आहे, पण तें हिंदुस्थानास साखर पुरवीत आहे. हिंदुस्थानांत परदेशची तीन कोट रुपयांची साखर येते. इतकी साखर परदेशांतून कां यावी ? हिंदुस्थानांत ऊंस पिकत नाहीं काय ? मग येथेंच साखर कां तयार होऊं नये ? आमच्या इकडचा ऊंस तिकडल्या ऊंसासारखा—किंबहुना सरस—असतां इकडे साखर तयार करण्याचे कारखाने निघून स्वदेशी साखर कां तयार होत नाहीं ? आपण कापूस उत्पन्न करावा आणि कापड तयार करूं नये, आपण गूळ तयार करावा पण साखर करूं नये, हा असाच क्रम सर्व बाबतींत कां दिसून येतो ? याचा आपण विचार केला पाहिजे गूळच पुरेसा तयार होत नाहीं, मग साखर तयार करण्याची हांव कशाला धरतां ? असा एक आक्षेप येतो. पण साखरेचा कारखाना झाल्यास जास्त गूळ होऊन गूळ व साखर दोन्ही तयार होतील, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. दारू गाळण्याची परवानगी आम्हाला देत नाहींत, ती मिळाली पाहिजे आहे. मनूनें सांगितलेली ' माध्वी ' दारू पाहिजे आहे, ' गोडी ' नको. सध्यां काकवी, काकवीची ' रम् ' व साखर, सारेच परदेशांतून इकडे येत आहे, या गोष्टींचा विचार करून व जरूर लागल्यास हें काम शेवटपर्यंत नेऊन तें यशस्वी करावें अशी सूचना आहे. एका मॉरिशिअस बेटांत ८० कारखाने आहेत. येथें निदान चाळीस-पन्नास तरी होतील तर आपला कांहीं कोटींचा फायदा होणार आहे. तेव्हां हा ठराव आपण पसार कराल व या ठरावाप्रमाणें नेमण्यांत येणारी कमिटी ऊंसाचे कारखाने कसे काढतां येतील, ते काढण्यासंबंधानें अडचणी काय आहेत व त्या कशा दूर होतील, या संबंधानें चौकशी करील, आणि त्याबद्दल शेतकरी, सावकार, शेतकी खातें व सरकारी अधिकारी यांजबरोबर पत्रव्यवहार करून जरूर ती व्यवस्था करील, अशी आशा आहे.

# के. विष्णुशास्त्री चिपळुणकर
## व
# ‘ राष्ट्रीय शिक्षण ’

सोमवार ता. ३० माहे मार्च सन १९०८ रोजीं सायंकाळीं, पुणें येथें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत ‘ सद्वर्तनप्रवर्तक मंडळी ’तर्फे के. विष्णुशास्त्री चिपळुणकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त जाहीर सभा भरली होती. या सभेंत राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न निघून त्याविषयीं ऊहापोह झाला. नंतर कांहीं गृहस्थांनीं आग्रह केल्यावरून लो. टिळक यांनीं भाषण केलें. त्याचा सारांश येणेंप्रमाणें:—

आज मी येथें आलों तो बोलण्याच्या उद्देशानें आलों नाहीं. सभेला उशीरा आलों, हा माझा दोष आहे. दुसरी गोष्ट पूर्वीचीं भाषणें मी ऐकलेलीं नाहींत. आणि तिसरी गोष्ट माझी बोलण्याची इच्छा नाहीं. पण मी बोलावेंच असें कित्येकांचें म्हणणें असल्यामुळें मी बोलावयास उभा राहिलों आहे. आज चिपळुणकर शास्त्रीबोवांच्या श्राद्धतिथीचा दिवस आहे. त्यांस परलोकवासी होऊन आज सव्वीस वर्षें झालीं. त्यांचे जे हेतु होते त्याप्रमाणें दोन-चार आणे काम झालेलें आहे—सोळा आणे झालें आहे असें मी म्हणत नाहीं. शास्त्रीबोवांसारख्यांची श्राद्धतिथि पाळणें हें त्यांच्यासंबंधीचें कर्तव्य नसून आपल्यां स्वतःसंबंधींचें कर्तव्य आहे. आपण कोणीकडे चाललों आहों, कोणीकडे जाण्याचा आपला उद्देश होता, आपली प्रगति होत आहे किंवा पीछेहाट होत आहे, यासंबंधींचा आढावा घेण्याकरितां, आपल्या उद्देशाविषयींची आठवण जागृत करण्याकरितां, असले प्रसंग उपस्थित केले जातात, आणि अशा प्रसंगीं आपल्या चळवळींचा आढावा घेणें हितावह असतें. शिक्षणाच्या प्रश्नाच्या दृष्टीनें पाहातां शास्त्रीबोवांनीं स्थापिलेल्या शाळेच्या तिसऱ्या वार्षिक रिपोर्टांत “ Education of the people, to be useful, must be in the hands of the people themselves ”, ( लोकांस द्यावयाचें शिक्षण उपयुक्त करावयाचें असेल तर त्या शिक्षणाचा ताबा लोकांकडेच असला पाहिजे ) अशा प्रकारचें

वाक्य आहे. या वाक्यासंबंधानें त्या वेळीं वाद झाला होता व मी तेव्हां हजर होतों. शास्त्रीबोवांच्या हयातींत एकदां अशी वेळ होती कीं, ‘डेक्कन कॉलेज’-सारखी संस्था—दुय्यम प्रतीचें शिक्षण आमच्यावर सोंपविण्यास सरकार तयार होतें. तेव्हां प्राथमिक शिक्षणाकडे पैसा खर्च करण्याचा त्यांचा विचार होता. पण तेव्हांचा काळ आतां बदलला आहे. पुढें सत्ताधाऱ्यांची छाप बिनसत्ताधाऱ्यांवर पडली. राष्ट्रांतील सुशिक्षित लोकांनीं शिक्षणाचें काम आपल्या हातांत घेऊन आपल्याला वाटेल तसें शिक्षण द्यावें हा तेव्हांचा हेतु होता. या हेतूचें आतां पुढें काय झालें, हें मी सांगत बसत नाहीं—तें आतां आपल्या सर्वांना दिसतेंच आहे. जिच्या योगानें राष्ट्रांत जागृति उत्पन्न होईल अशी शिक्षणाची एकच पद्धत नाहीं. शेवटचें साध्य लक्षांत ठेवून निरनिराळ्या पद्धतीनें राष्ट्रोन्नतीचा प्रयत्न करावा लागतो. परमेश्वराजवळ जाण्याला ज्याप्रमाणें भक्ति, कर्म, योग वगैरे मार्ग आहेत, तसेंच शिक्षणाचेंही अनेक मार्ग आहेत. ज्याला इंग्रजींत ‘कॅरॅक्टर’ म्हणतात तें चारित्र्य—दानत—राष्ट्रांतील लोकांत असली पाहिजे, त्यांच्यांत करारीपणा असला पाहिजे, आणि ‘मी राष्ट्रांकरितां मरण्यास देखील तयार आहे’ अशी बुद्धि राष्ट्रांतील तरुणांत उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्या शिक्षणानें होईल तें राष्ट्रीय शिक्षण. ज्यांच्या अंगांत करारीपणा येतो ते कधींही उपाशी मरत नाहींत. ‘लॅांगमन्’चें रीडर शिकवावें कीं नाहीं, हा प्रश्न नाहीं. आम्हाला करारी देशभक्त तयार करावयाचे आहेत. अधिकाऱ्यांना हें नको आहे. ख्रिस्ती देवाला ज्याप्रमाणें आपल्यासारखा दुसरा कोणी खपत नाहीं, त्याचप्रमाणें ख्रिस्ती अधिकाऱ्यांनाही आपल्यासारखीं करारी माणसें उत्पन्न व्हावयास नको आहेत. शास्त्रीबोवांच्या वेळच्या व आत्तांच्या परिस्थितींत फरक पडलेला आहे. तेव्हां सध्यां काय परिस्थिति आहे हें लक्षांत ठेवून राष्ट्रीय शिक्षणाची आलेली दुसरी लाट आपण फुकट जाऊं देणार नाहीं, अशी आशा आहे.

# पुणें येथील मद्यपाननिषेधाची चळवळ

गुरुवार ता. २३ एप्रिल १९०८ रोजीं सायंकाळीं, पुणें येथें ' रे-मार्केट 'च्या मैदानांत डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या अध्यक्षतेखालीं जंगी जाहीर सभा भरली होती, तींत पसार झालेल्या ठरावांतील पहिला ठराव असा होताः—

" दारूच्या गुत्त्यांशेजारीं शांतपणें लोकांचीं मनें वळवून मद्यपाननिषेधाचें काम पुढें ढकलण्याकरितां पुणें शहरांत मद्यपाननिषेधक मंडळींनीं जो उद्योग सुव्यवस्थित रीतीनें चालविला होता तो हाणून पाडण्याकरितां स्थानिक अधिकाऱ्यांनीं सोडलेल्या हुकमांचा व त्या हुकुमान्वयें केलेल्या धामधुमीचा अत्यंत जोराचा निषेध पुणें शहरवासी लोकांची ही सभा करीत आहे. ग्रेटब्रिटन, अमेरिका व जगांतील सुधारलेलीं इतर राष्ट्रें ह्यांमध्यें जे मार्ग न्याय्य समजले जातात, व अधिकाऱ्यांकडून कोणताही अडथळा न होतां ज्या मार्गांचा उपयोग करण्यांत येतो, त्या मार्गांचा उपयोग करण्याचा हक्क पुणें शहरवासीयांना आहे, असें या सभेचें मत आहे. लोकांमध्यें मद्यपानाचें व्यसन पसरलें असतां उत्पन्न होणाऱ्या दुःखाकडे व अधोगतीकडे दुर्लक्ष करून व केवळ उत्पन्नाच्या वाढीवरच लक्ष देऊन सरकार वागत आहे, असा अधिकाऱ्यांच्या ह्या कृत्यामुळें लोकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे, इकडे सरकारनें लक्ष पोहोंचवावें, अशी या सभेची विनंति आहे, आणि ह्या गोष्टीचा पुन्हां विचार करून सोडलेले हुकूम रद्द करण्यास अधिकाऱ्यांना सरकार फर्मावतील, अशी ह्या सभेची विश्वासपूर्वक विनंति आहे." हा ठराव लो. टिळक यांनीं सभेपुढें मांडला, तेव्हां ते म्हणालेः—

या शहरामध्यें गेले १५।२० दिवस जी चळवळ सुरू आहे तिचें पर्यवसान ही सभा आहे. पर्यवसान म्हणजे चळवळ बंद करणें नव्हें, तर चळवळीस पुष्टि देऊन सरकारची तीवर वेडीवांकडी नजर—सरकारचा रोष—असेल तर तो काढून टाकावा, आपले हेतु सरकारास कळावे, सरकारचे हेतु आपल्यास कळावे, हा हेतु आहे. आज येथें सर्व जातींचे लोक जमले आहेत. एवढा आणि असा

निबंध ६ २८

समाज गेल्या दहा-पंधरा वर्षांत येथें कधींही जमला नव्हता. तीन आठवड्यापूर्वी कांहीं तरुण मंडळींनीं गुत्त्यांपुढें उपदेशास सुरुवात केली. दारू पिणें हें धर्माच्या व नीतीच्या विरुद्ध आहे व तुझ्या हिताच्या दृष्टीनेंही हें वाईट आहे, असें दारू प्यावयास येणाऱ्यास हातापाया पडून स्वयंसेवक सांगत असत, व त्याची विनवणी करीत असत. पण प्रत्येक चळवळीस शत्रू हे असावयाचेच, आणि त्याप्रमाणें ते या चळवळीसही होते. गुत्तेवाल्यांचें नुकसान होऊं लागलें आणि त्यांनीं गाऱ्हाणें केलें. तेव्हां प्रथम त्यांचें मदतीस अँडरसन आले, व गुत्त्यापुढें दांडगाई सुरू केली. " स्वयंसेवकामुळें रस्त्यावर गर्दी होते, व त्यामुळें दंगा होण्याचा संभव आहे. तुम्ही येथून जा. " असे हुकूम पुढें करण्यांत आले. पण हे हुकूम बेकायदेशीर म्हणून स्वयंसेवकांनीं ऐकले नाहींत; तेव्हां खटले होऊन आजपर्यंत सरकारनें स्वयंसेवकांपासून पांचशें रुपये दंड वसूल केला आहे ! नीतीवि रुद्ध, कायद्याविरुद्ध व सरकारी धोरणाविरुद्ध हा प्रकार झाला. गुत्त्यांसमो उभे राहून उपदेश करण्याचा आमचा हक्क आहे, एवढेंच नव्हे तर कायद्याच्या व नीतीच्या दृष्टीनें ही चळवळ योग्य असतांही जर सरकार तिला प्रतिबंध करील तर तें त्यांच्या ५८ सालच्या जाहिरनाम्याला बट्टा आणील. दारू प्यायला आम्ही सांगितलें नाहीं, आम्हीं नुसतीं दारूचीं दुकानें उघडविलीं आहेत, असें सरकारतर्फें म्हणण्यांत येतें. यासाठीं आम्हींही लोकांना मद्यपानाविरुद्ध उपदेश करून मद्यप्राशनापासून परावृत्त केले पाहिजे. लोकांच्या मनांत धर्मश्रद्धा अद्याप कायम आहे; त्यांना दारूच्या दुकानांत जातांना बोध केल्यास ते खास मागें फिरतील. दारू पिणारास अजून भीति व लाज वाटण्यासारखी स्थिति आहे. तेव्हां, दारूपासून लोकांना परावृत्त करण्याकरितां उपदेश करणें हें आपलें कर्तव्य आहे. १८२० सालीं ज्या पुणें शहरांत दारूचा एक थेंबही खपत नव्हता तेथें आतां सात लक्ष रुपयांची दारू खपते ! नुसती लायसेन्स फी पन्नास हजार रुपये होते ! शहरांत दारूचीं दहा दुकानें आहेत. येथील म्युनिसिपालिटीचें उत्पन्न चार लाख; तर दारूचें उत्पन्न सात लाख होत असतें ! मद्यपान जाईल तर हें दुर्धर व्यसन तर जाईलच, पण शेंकडो लोकांच्या पोटाला मिळेल. मद्यपानाविरुद्ध उपदेश करणारांवर केलेले खटले कायद्याच्या दृष्टीनें खरें असतील; पण ते नीतीच्या दृष्टीनें खरे नाहींत. पोलिसांनीं वाटेल तें सांगावें व तें लोकांनीं

निमुटपणें ऐकावें, असें जगांत कोठेही नाहीं. सरकारला इष्ट अशी गोष्ट आम्ही करीत असतां जर कोणी अडचण आणील तर ती सरकारनें नाहींशी केली पाहिजे. पण सरकारनें तसें केलें नाहीं ! सर्व जातीचे व धर्मांचे लोक येथें आलेले आहेत; ही विद्यार्थ्यांची किंवा अडाण्यांची सभा नाहीं. मद्यप्राशन वेदाविरुद्ध, कुराणाविरुद्ध व बायबलाविरुद्धही आहे. मद्यपाननिषेधाचे चळवळीस परमेश्वराचा पाठिंबा खास आहे; अर्थात् यांत यश आलेच पाहिजे. यश येईल; पण आपण नेटानें व एकजुटीनें प्रयत्न मात्र केला पाहिजे.

# राष्ट्रीय शिक्षणाची दिशा

मंगळवार ता. २८ एप्रिल १९०८ रोजीं, म्हणजे रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं धुळें येथें भरलेल्या मुंबई इलाख्याच्या पंधराव्या प्रांतिक सभेच्या बैठकीचे दुसऱ्या दिवशीं, परिषदेपुढें दुसरा ठराव राष्ट्रीय शिक्षणा-संबंधींचा आला होता. या ठरावास मि. जी. के. चितळे [ अहमदनगर ] यांनीं आपली अनुमति दिली. पण आपल्या भाषणांत 'राष्ट्राची परिस्थिति लक्षांत घेऊन राष्ट्रीय शिक्षण द्यावें.' ह्याचा रा. चितळे यांनीं असा अर्थ करण्यास आरंभ केला कीं, 'अधिकाऱ्यांची सत्ता आपलें सभोंवतीं आहे हें न विसरतां, अधिकाऱ्यांना न दाखवितां आपण शिक्षण-संस्था चालविल्या पाहिजेत; उगीच 'राष्ट्रीय' 'राष्ट्रीय' अशी ओरड करून भलत्याचे नादीं लागतां कामा नये.' रा. चितळे या विषयावर कांहीं विरुद्ध बोलत आहेत असें या वेळीं परिषदेच्या प्रतिनिधींना वाटल्यामुळें त्यांनीं 'पुरे करा' 'थांबा' असें आपले मत जाहीर केलें. ठरावाचे समर्थन करावयास आलेल्या इसमानें ठरावाचें समर्थन केले पाहिजे, असें त्यांचें म्हणणें होतें. पण अध्यक्षांच्या विनंतीवरून सर्व प्रतिनिधि रा. चितळे यांचें भाषण ऐकावयास तयार झाले. पण 'मी बोलणार,' 'टेबलाजवळून जाणार नाहीं,' 'मला उचलून नेण्याची गोष्ट राहूं द्या' असें म्हणणारे रा. चितळे लोकांच्या असहिष्णुतेची नुसती निंदा करूनच आपल्या जागीं जाऊन बसले. नंतर लो. टिळक यांनीं या विषयावर भाषण केलें तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष महाराज आणि सभ्य गृहस्थहो, आतां येथें जो प्रकार झाला तसला प्रकार येथें होईल, ही मला कल्पना नव्हती. रा. चितळे, मी व अध्यक्ष यांचें पुणें जिल्हासभेंत पसार झालेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावासंबंधानें भाषण झालें हें खरें—हें मी कबूल करतों. पण त्या ठरावाचा अर्थ रा. चितळे यांना समजलेला नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. येथें परकी राज्य आहे हें लक्षांत ठेऊन परकीय राज्यकर्त्यांना आवडेल असें शिक्षण द्यावयाचें असा त्या ठरावांतील शिक्षणाचा अर्थ मुळींच नाहीं. आपलें सरकार परकीय असल्यामुळें, राष्ट्राचा झेंडा सर्वत्र फिरवितां येईल अशा प्रकारचें शिक्षण तरुण पिढीस आपण

दिलें पाहिजे, असा त्या ठरावांतील शिक्षणाचा अर्थ घेतला पाहिजे. ज्यानें आमची पूर्ण वाढ होऊन आमची उन्नति होईल असे शिक्षण सरकार आम्हांला देत नाहीं—हीं परिस्थिति लक्षांत आणून कोणत्या प्रकारचें शिक्षण द्यावयाचें हें आम्ही ठरविलें पाहिजे. कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, त्या परकी सरकाराकडून होणें नाहींत. त्यांनी आम्हांला थोडें शिक्षण देऊन आमचे डोळे उघडले, पण हिंदी राष्ट्रास पूर्णपणें उन्नतीस पोहोचलेलें राष्ट्र बनवावें, अशी राज्यकर्त्यांची इच्छा दिसत नाहीं. मग मिल्ल व मोर्ले वाटेल तितका वेदांत सांगोत ! आमचें राज्य असते तर राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्नच उपस्थित झाला नसता. **सरकार व लोक यांच्या अंतिम हेतूंत फरक असल्यामुळें हा प्रश्न उपस्थित झालेला आहे.** सरकारचे हेतु व आमचे हेतु कित्येक बाबतींत परस्परविरोधी आहेत. स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, यासंबंधानें त्यांच्या आमच्या हेतूंत विरोध आहे. रा. चितळे म्हणतात त्याप्रमाणें निरुपद्रवी गोष्टी करण्याचा या ठरावाचा हेतु नाहीं. प्रांतिक परिषद असल्या ठरावानें बेहेत्तर आहे बंद झाली तर ! पण निरुपद्रवीपणानें—कोणी साहेब कांहीं बोलणार नाहीं अशा रीतीने केलेल्या गोष्टींनें—राष्ट्रीय कामें होत नसतात. अशा जोमानें व अशा बलानें काम झालें पाहिजे कीं, लहानमोठ्या अडचणी येतील त्या दूर करतां आल्या पाहिजेत. सध्यां नवी पिढी जुन्या पिढीहून बलवत्तर होत नाहीं; ती तशी व्हावी, याला साधन राष्ट्रीय शिक्षण आहे.

## सरकारच्या मुठींत शिक्षण नको

भूगोल, इतिहास, हे विषय शिकवितांना राष्ट्रीय शाळेंतून, कलकत्ता ब्रह्मदेशांत किंवा सयाम चीनांत आहे, असें शिकविण्याचा हेतु नाहीं. पण भूगोल शिकवितांना देखील तो राष्ट्रास हितकर होईल अशा रीतीनें शिकवितां येत असतो. इंग्लंडच्या ' काउंटीज ' ठाऊक असाव्या, तिकडील कारखान्यांची यादी माहीत असावी, आणि इकडील कांहीं कळूं नये, अशी सध्यां स्थिति आहे. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांतून ही स्थिति बदलविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. ' राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळांत दोन आणि दोन मिळून चार होतात, असेंच सांगाल कां दुसरें कांहीं सांगाल,' असा प्रश्न करणें मूर्खपणाचें आहे. लहान मुलांची अंतःकरणें देशप्रीतीनें भरून टाकणें, आमच्यावरील अभ्र काढून टाकणें हा प्रस्तुतच्या

शिक्षणाचा उद्देश नाहीं—तो राष्ट्रीय शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे. लगाम लोकांच्या हातांत व आपण घोड्यावर ही स्थिति नको आहे. **लगाम आपल्याच हातांत असला पाहिजे.** रा. चितळे एका शिक्षणसंस्थेचे व्यवस्थापक आहेत, मीही एकदां अशा संस्थेचा चालक होतो. गेल्या वीस वर्षांत सरकारच्या वृत्तींत फरक झाला आहे, सरकारचें धोरण पालटलें आहे; 'न्यू इंग्लिश स्कूल' निघालें तेव्हां सरकार आम्हांला अनुकूल होतें. रे साहेब सर्व शाळा आमच्या ताब्यांत द्यावयास तेव्हां तयार होते, पण आतां सरकारचें धोरण निराळें आहे. लॉर्ड कर्झन विचारी आहेत, त्यांच्यासारख्यांना वाटतें कीं, शिक्षणानें मुलांचीं मनें बनतात, तेव्हां लोकांना स्वराज्याचे हक्क जर आपल्याला द्यावयाचे नाहींत तर तें शिक्षण खुंटवून शिक्षणावर सरकारचा ताबा ठेविला पाहिजे—शिक्षण सरकारच्या मुठींत राखलें पाहिजे. चांगली माती घेऊं द्यावयाची नाहीं, ती कमावूं द्यावयाची नाहीं, असें सरकारचें सध्यां धोरण आहे. हिरण्यकश्यपूनें असा बंदोबस्त केला होता कीं, प्रल्हादाचें कानीं नारायणाचें नांव पडूं नये. तशाच प्रकारची स्थिति सध्यां इकडे शिक्षणाच्या बाबतींत आहे. इंग्रजी राज्यांत स्वतंत्रपणाच्या कल्पना ते येऊं देणार नाहींत. सध्यांच्या शिक्षणक्रमासारख्या निरुपद्रवी शिक्षणक्रमानें पुढली पिढी अधिक निःशक्त व लंगडी होईल, हें तुम्हाला पाहिजे असेल तर रा. चितळे यांचें ऐका. हरएक बाबतींत आपला गळा दुसऱ्यांच्या ताब्यांत नको. या गोष्टीचा आम्हाला आतां वीट आला आहे. आम्हाला स्वतंत्र राष्ट्रांत आहेत तसल्या शाळा स्थापावयाच्या आहेत. पुण्यांतील ठराव अशा प्रकारचा आहे. तो न समजतां राष्ट्रीय शिक्षणाच्या ठरावावर भाषण करणें हा अज्ञानाचा परिणाम आहे. रा. चितळे हें आपलें भाषण पुढें बोलले नाहींत, हें बरें झालें नाहीं. ते अधिक बोलले असते तर त्यांच्या मुखांतून कांहीं अधिक विचार या विषयासंबंधानें बाहेर पडले असते व ते खोडून काढावयास बरें झालें असतें. 'Give him a long rope' असें इंग्रजींत म्हणत असतात, त्याप्रमाणें त्यांना अधिक बोलूं दिलें असतें म्हणजे त्यांचें खंडन करणें अधिक सुलभ व चांगलें होतें. तशी लांब दोरी स्वतःभोंवतीं गुंडाळून घेण्याकरितां रा. चितळे यांस आपण वेळ मिळूं दिली नाहीं याबद्दल मी दिलगीर आहे.

# राष्ट्रीय सभा व राष्ट्रांतील पक्ष

बुधवार ता. २९ एप्रिल १९०८ रोजीं, म्हणजे धुळें येथें भरलेल्या मुंबई इलाख्याच्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या बैठकीचे तिसऱ्या दिवशीं, 'समेटानें राष्ट्रीयसभा भरविण्याची तजवीज करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यासंबंधीचा' सातवा ठराव लो. टिळक यांनीं परिषदेपुढें मांडला. तेव्हां ते म्हणालेः—

दोन प्रहरच्या उष्णतेंत स्वराज्याचा ठराव आपण पास केला हें ठीकच आहे; कारण ताप झाल्याशिवाय 'स्वराज्य' मिळत नाहीं. माझ्या हातांत जो ठराव आहे, तो शीतळ संध्याकाळच्या वेळेस विचाराकरितां घ्यावा, अशा प्रकारचा आहे. याचा विचार सायंकाळच्या वाऱ्यानें थंड झालेल्या डोक्यांनीं आपण करावा. सुरतेस मोडलेली राष्ट्रीय सभा सर्व पक्ष एकवटून होणें शक्य आहे किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. राष्ट्रीय सभा हे राष्ट्राचें जीवन होतें. एकवीस वर्षांच्या अल्पवयी, कायद्यांतून सुटली असतां, राष्ट्रीय सभेस प्रौढता आल्याबरोबर तिजवर असा प्रसंग गुजरावा हीं दुःखाची गोष्ट होय. राष्ट्रीय सभा सुरतेस मोडली असली तरी माझ्या मतें हें संकट अपरिहार्य नाहीं. इतकेंच नाहीं, तर आपण सर्व पक्ष एकवटून समेटानें राष्ट्रीय सभा भरवूं शकतों, असें सिद्ध केल्यास आमच्यांत सौजन्य आहे, आमच्यांत सजीवपणा आहे आणि आमच्यांत देशप्रीति आहे, अशी जगाची खात्री होणार आहे. ज्या ठरावावर मी बोलत आहे त्यासंबंधानें पुष्कळशी जबाबदारी मजवर आहे; आणि ती ओळखूनच मी आज बोलत आहे. सुरतेस दुफळी झाली; आतां सर्व जातींच्या, धर्मांच्या, मतांच्या लोकांची सभा होईल कीं नाहीं, हा प्रश्न आहे. १८५८ च्या जाहिरनाम्यांत सरकारनें जाहीर केलें कीं, Caste, Creed किंवा Colour; जात, धर्म, किंवा वर्ग, या गोष्टी बाजूला ठेऊन राज्यकारभार चालवूं. त्याचप्रमाणें जात, मत व धर्म या तिन्ही उपाधींनीं न ग्रासलेलें असें राष्ट्रीय सभेचें धोरण असलें पाहिजे. जात, मत व धर्म यांतील भेदाभेद लक्षांत न आणतां सर्व माणसें राष्ट्राच्या कार्याकरितां एक होतात, याचें नांव एकी व याचें नांव राष्ट्र. एकदां राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष झालेले सर हेन्री कॉटन यांनीं आपल्या 'न्यू इंडिया' पुस्तकाचे प्रारंभीं अशाच आशयाचें विधान केलें आहे. " The

test of a nation is that its members, among all kinds of racial differences, do, in the main, work together as fellow-citizens, linked by common memories and associations and common objects" असें तें वाक्य आहे.

## राष्ट्रीय सभा सर्वांचीच

देशांत भिन्नभिन्न समाज, भिन्नभिन्न व्यक्ति, भिन्नभिन्न मतें, हीं असावयाचींच. हातांचीं पांचीं बोटें जशी सारखी नसतात तसें हें असावयाचेंच; नाहीं तर मग त्या देशांत माणसें रहात नाहींत तर मेंढरें राहतात, असें म्हणावें लागेल. राष्ट्र म्हणजे एका धर्माचे, एका जातीचे, एका मताचे लोक अशी व्याख्या नाहीं. आपली भिन्नभिन्न मतें सोडून विशिष्ट उच्च हेतूकरितां लोक एक होतात, तेव्हां त्यास राष्ट्र म्हणतात. बावीस वर्षें असें चाललें होतें. पण दुर्दैवाची गोष्ट कीं, हें पांच सहा महिने विसरले गेलें. हिंदुस्थानचें कल्याण करण्याचा मक्ता एका जातीला, एका धर्माला किंवा एका मताला नाहीं. हें सर्वांचें काम आहे. देशकल्याण करण्याचा सर्वांस हक्क आहे. या बाबतींत कोणी दुसऱ्यांस दूर सारणें—कमअस्सल म्हणणें—मूर्खपणाचें आहे. देशकल्याणाकरितां सर्व लोक प्रयत्न करीत आहेत. हा हक्क एकट्या मुसलमानांचा, एकट्या हिंदूंचा, एकट्या पारशांचा, अगर एकट्या जैनांचा नाहीं. हा प्रश्न मूळ असा निघाला आहे कीं, आकुंचित स्वातंत्र्य मागणाऱ्या लोकांना पूर्ण स्वातंत्र्य मागणाऱ्या लोकांशीं संबंध ठेवणें अनिष्ट वाटूं लागलें—येथून खऱ्या अडचणीस सुरुवात झाली आहे. या बाबतींतलें किल्मिष प्रथम मनांतून गेलें पाहिजे; तें मनांतून गेलें म्हणजे एकी होईल. म्हणून समेट घडवून आणण्यासाठीं कमिटी नेमण्याचा ठराव मी आपल्यापुढें आणिला आहे. इंग्लंडच्या पार्लमेंटांत लिबरल आहेत, रॅडिकल आहेत, युनियनिस्ट आहेत. तेथें कोणी असें म्हणत नाहींत कीं, अमुक एका पक्षाला पार्लमेंटांतून काढून द्या. हें तेथें चालणार नाहीं. ज्यांना लोकसत्तात्मक संस्थांचा अनुभव आहे,—अशा लोकांचा असा अनुभव आहे. त्यांचा असा नियम आहे—कीं **अशा संस्थांतून सर्व पक्षांचे लोक घेतले पाहिजेत.** त्यांत ज्या पक्षाच्या बाजूनें बहुमत असेल त्या पक्षाच्या मताप्रमाणें निकाल होत असतो. इंग्लंडांत

ज्या पक्षाकडे बहुमत असेल त्या पक्षाला राजा प्रधानमंडळ तयार करावयास सांगतो. एका पक्षाचें अगर राजाचें तिकडे चालणार नाहीं; अगर एका पक्षाचे बाजूनें बहुमत झालें म्हणजे त्या पक्षाच्यानें दुसऱ्या पक्षाला काढून देणेंहि होणार नाहीं. लोकसत्तात्मक संस्थांचें वळण अद्याप आम्हांला लागावें तितकें लागलेलें नाहीं. कांहीं आपलें घरांत महारालà येऊं देणार नाहीं, असें म्हणतात, त्याप्रमाणें आम्हीं ज्यांना या बाबतींत महाराप्रमाणें लेखतों, त्यांना राष्ट्रीय सभेंत येऊं देणार नाहीं, असें म्हणणें म्हणजे घर व सार्वजनिक संस्था यांतील फरक न समजणें आहे. असें झाल्यास राष्ट्रीय सभा ही गोऱ्या अधिकारी वर्गाप्रमाणें ( Bureaucratic ) होईल, ती लोकसत्तात्मक संस्था राहणार नाहीं. राष्ट्रीय सभेमध्यें पूर्ण स्वातंत्र्य मागणाऱ्या, अर्धे स्वातंत्र्य मागणाऱ्या, चतकोर स्वातंत्र्य मागणाऱ्या, मुळींच स्वातंत्र्य न मागणाऱ्या अशा सर्व पक्षांना बोलाविलें पाहिजे.

हें कसें करतां येईल, हें ठरविण्याकरितां एक कमिटी नेमावयाची आहे. या ठरावावर एक उपसूचना येणार आहे. ठरावांत 'सर्व पक्ष असें आहे, त्यांतील 'सर्व' शब्द काढून टाकावा, अमर्याद स्वातंत्र्य मागणाऱ्या लोकांस राष्ट्रीय सभेंतून काढून टाकावें अशी सूचना आपल्यापुढें येणार आहे ! काय अमर्यादित स्वातंत्र्य असावें असें म्हणणारे आम्ही या देशांतील नाहीं ? आम्ही राष्ट्रीय सभेंत नसावें असें म्हणण्याचा हक्क कोणाला आहे ? हे कोण सांगणार ? आज हा पक्ष लहान असेल, पण पुढें तो मोठा होईल आणि दुसरा पक्ष कदाचित् धुळीस मिळेल. दुसऱ्या पक्षाला आंत न घेण्याची एवढी घमेंड कशाला ? या पक्षास काढून टाकल्यास ती 'राष्ट्रीय' सभा राहणार नाहीं. सर्व पक्षांना खुला दरवाजा असला पाहिजे. सही करा मग आंत घेऊं, असें राष्ट्र म्हणूं शकत नाहीं. बाबू बिपिनचंद्र पाल व बाबू अरविंद घोस हे ज्या पक्षांत आहेत—व ज्यांत मी आपला अंतर्भाव करून घेतो—त्या पक्षाला बाहेर ठेवा, असें म्हणतां यावयाचें नाहीं. आपल्यापैकीं तरी कोणी म्हणेल असें मला वाटत नाहीं. कन्व्हेन्शनमध्यें मुसलमानांना सवलत आहे. पण राष्ट्रीय पक्षाकरितां मात्र सवलत नाहीं हें काय ? या पक्षाला मांडवाबाहेर ठेऊन जे स्वतः मांडवांत जेवतात, ते आपल्या पोरांना घराबाहेर ठेवून स्वतःच शिजविलेलें अन्न निर्दयपणानें खातात, असें म्हणावें लागेल. हिंदुस्थानांतील सर्व लोकांनीं बंधुभावानें हातांत हात घालण्यास राष्ट्रीय सभेच्या मंडपासारखी दुसरी जागा नाहीं.

स्वातंत्र्यदेवीच्या मंदिरांत जाण्यास कोणास मज्जाव करूं नका. राष्ट्रीय सभा हें हिंदूंचें देऊळ नव्हे, ही मुसलमानांची मशीद नव्हे, हें जैनांचें मंदिर नव्हे, हें मवाळांचें घर नाहीं, किंवा ही जहालांची जहागीर नाहीं. हें या सर्व लोकांचें घर आहे. पाहिजे तर या घरांतील एक खोली घेऊन त्यावर एका पक्षानें आपलें नांव लिहावें, आपली जागा आंखून घ्यावी; पण सर्वांना या एका घरांत राहण्याचा हक्क आहे. अशा गोष्टींत जर कोणी निर्बंध घालील—व त्यास जर आपण संमति द्याल—तर देश बुडाला म्हणून समजावें.

## अंतिम साध्य व महत्त्वाकांक्षा

बाप मेल्यावर बापाची इस्टेट मागतां तेव्हां भीति वाटते कां? बाप मेला म्हणून त्याची अर्धी इस्टेट स्वर्गाला पाठवाल काय? कातडी बचावण्या‑करितां तुम्ही हें करीत असाल तर तें व्यर्थ आहे. Faith and Aspirations **'अंतिम साध्य व महत्वाकांक्षा' हीं पिनल कोडाच्य वर आहेत. ती पिनल कोडाच्या मर्यादेंत येत नाहींत, असें खुद्द मोर्लेसाहेब म्हणतात. जो अंतिम हेतु डोक्यांत असेल तो साध्य करून घेण्यासाठीं योजिलेले उपाय पिनल कोडांत येतात.** पिनल कोड योजिलेल्या उपायांस लागू आहे; मनोविकारांच्या पराकाष्ठेला पिनल कोड लागत नाहीं. मी मागें उदाहरण दिलें होतें, त्याप्रमाणें 'मी हिंदुस्थानचा बादशहा होईन' अशी महत्वाकांक्षा मनांत धरली तर ही महत्वाकांक्षा कायदा व नीति याला धरून आहे. 'एडवर्ड बादशहाला तक्तावरून ढकलून देऊन मी बादशहा होईन' असें जर मी म्हणूं लागलों तर मात्र तो राजद्रोह होईल. 'मी ब्रह्म आहे' असें जर म्हणतां येतें तर मी बादशहा होईन असें म्हणणें ही त्या मानानें किती लहान पायरी आहे! 'मी ब्रह्म आहे' असें म्हणणारास गणपतीच्या, खंडोबाच्या, म्हसोबाच्या उपासकांत मिसळूं देऊं नये काय! योगसामर्थ्यांत कांहीं व्यत्यय झाला म्हणजे त्याला राजकुलांत जन्म प्राप्त होतो. समजा कीं, मी योगसामर्थ्यानें अशा रीतीनें हिंदुस्थानचा राजा झालों, तर तें कायदेशीर होणार नाहीं काय? समजा बादशहानें मला दत्तक घेतलें, तर मग मी पुढें बादशहा होईन. मग तें काय बेकायदेशीर झालें? कोणतीही गोष्ट ज्याच्या त्याच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे. कोणाला म्हसोबाची

भक्ति करूनच मोक्ष मिळवावयाचा असतो. 'मी लक्षाधीश होणार' म्हटलें म्हणजे मी चोरीच करणार असें होत नाहीं. जे स्वातंत्र्यवादी आहेत ते चांगले जाणते, सूज्ञ आहेत. काय इष्ट आहे, काय अनिष्ट आहे, हें काय त्यांना समजत नाहीं ? स्वातंत्र्यवादी लोकांइतकी आपली दूरदृष्टि पोहोचत नसली तर त्यांना हांकलून देणें देशद्रोहीपणाचें आहे. **ज्याच्या त्याच्या कृतीचे परिणाम जो तो भोगील.** ते राष्ट्रीय सभेला भोगावे लागणार नाहींत. भिणाऱ्या, चांचपडत जाणाऱ्या लोकांची भीति निर्मूल आहे. तुमचें मत नसेल तर 'नाहीं' म्हणा; पण आमचे विचार आम्हाला सांगूं द्या. भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें सूर्याच्या प्रकाशाचा कवडासा आरशावर पडला तर त्याचें परावर्तन होऊन प्रकाश वाढेल; मातीवर पडला तर कांहीं होणार नाहीं. माझ्या कणगुल्यांत मावेल अशी राष्ट्रीय सभा पाहिजे; तिची लांबी, उंची, रुंदी, परीघ अधिक नको; असें म्हणतां येत नाहीं. **कणगुल्यांतील सभा पाहिजे तर भरवावी, पण तिला राष्ट्रीय सभा म्हणतां येणार नाहीं.** मागें मी उदाहरण दिलें होतें, त्याप्रमाणें सर्व हिंदूंच्या सभेंत शैव व वैष्णव हे जरी दोन निरनिराळे पंथ असले तरी ते येतात; आणि सर्व जगांत हिंदु, रशियन, वगैरे सर्व लोक येतील. ज्याला त्याला स्वतःचें घर आहे, पण 'टाऊनहॉल' सार्वजनिक असतो. तसें ज्याला त्याला आपलें 'क्रीड' आहे; पण राष्ट्रीय कामांत सर्वांनीं खांद्याशीं खांदा लावूनच लढलें पाहिजे. राष्ट्रीय सभा एकट्या मवाळांची किंवा एकट्या जहालांची नाहीं. एकानें दुसऱ्याला ढकलून द्यावयाचें, याचा उपक्रम सुरतेस झाला; त्याचा परिणाम काय झाला, हें दिसतेंच आहे.

## राजकीय जाति नकोत

तुम्ही म्हणाल, "आम्ही निराळा यत्न करूं, तुम्ही निराळा यत्न करा." पण परिस्थिति फार कठिण आहे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांना एका मोठ्या बलाढ्य अधिकारी वर्गाशीं—राजसत्तेच्या अधिकारमदानें धुंद झालेल्या बलवत्तर घमेंडखोरांशीं—झगडावयाचें आहे. **एका कोपऱ्यांत एक लहानसा प्रयत्न, दुसऱ्या कोपऱ्यांत दुसरा लहानसा प्रयत्न, अशानें यश येणार नाहीं.** सर्वांवर आलेलें अभ्र गेल्यावर "मी आपला सैंपाक या खोलींत करूं कां त्या खोलींत करूं?" याचा विचार करा. जहाल व मवाळ यांच्यांतील वैर

पांडव-कौरव यांच्यांतील वैराइतकें तर खास नाहीं. चित्रसेन गंधर्वानें दुर्योधनाला पकडलें व तो त्याला नेऊं लागला, तेव्हां धर्मराजानें सांगितलें कीं, आम्ही आप-आपसांत भांडूं तेव्हां कौरव शंभर व आम्ही पांच; पण जेव्हां तिसऱ्याबरोबर प्रसंग येईल तेव्हां आम्ही एकशें पांच आहों! सध्यांचा काळ असा आहे कीं आपण सर्वांनीं याप्रमाणें १०५ राहिलें पाहिजे. राष्ट्राचा प्रसंग सध्यां असा आहे कीं, जगांतील अति बलाढ्य अशा अधिकारी वर्गाशीं टक्कर द्यावयाची आहे. जहाल, मवाळ, निम्मे जहाल, निम्मे मवाळ, ज्वलत् जहाल, ज्वलत् मवाळ, असें करून उपयोगी नाहीं. प्रत्येकानें राष्ट्रकार्याच्या गोवर्धनपर्वताला काठी लाविली पाहिजे. एखाद्याचा अंतिम हेतू अलग असला म्हणजे तो अस्पर्श झाला, असें कोणत्याही शास्त्रांत सांगितलेलें नाहीं. राष्ट्रमत असें आहे कीं, तें पुत्रार्थ्याला पुत्र व मोक्षार्थ्याला मोक्ष देतें. जातीचा भेद प्रत्येक बाबतींत आणण्याची आपली पूर्वापारची वाईट खोड आहे. आहेत त्या जाती पुष्कळ झाल्या. **राजकीय बाबतींत तरी आतां जाती करूं नका**. जहालांच्या हातांतलें पाणी आम्ही घेणार नाहीं. जहालांनीं शिजविलेलें अन्न आम्ही खाणार नाहीं, असें म्हणूं नका. स्वातंत्र्यदेवीच्या हस्तानें हें अन्न पवित्र झालें आहे. हा सत्यनारायणाचा प्रसाद आहे. तो सर्वांनीं घ्यावा. तो न घेणारास सत्यनारायणाचा प्रसाद न घेणाऱ्या इसमास जी शिक्षा होते ती होईल. आपण म्हणाल हें 'अशक्य' आहे पण नेपोलियन म्हणत असे कीं, माझ्या कोशांत 'अशक्य' हा शब्दच नाहीं. ही गोष्ट लक्षांत आणा. राष्ट्राला अमूक एक गोष्ट अशक्य आहे असें म्हणतील त्यांस इतिहास समजला नाहीं, असेंच म्हटलें पाहिजे. अशक्य कांहीं एक नाहीं. मन कोतें, भित्रें झालें आहे, गोऱ्या अधिकाऱ्यांनीं रागावूं नये म्हणून हें सारें भिणें आहे. गोरा अधिकारी वर्गही त्यांना आपल्याकडे ओढीत आहे. पण मोर्ले साहेब सांगत आहेत कीं, चांदोबा मागूं नका. ते तुम्हांला फार तर चहाचा पेला देतील किंवा आलेत म्हणजे बसायला खुर्ची देतील एवढेंच, हें लक्षांत ठेवा.

## भिक्षेकऱ्यांचा तंटा!

रीस साहेबांनीं लिहिलेल्या पुस्तकावर टीका लिहितांना 'टाइम्स ऑफ इंडिया' काय म्हणत आहे, तें पहा. तो म्हणतो, जहालांचा पक्ष मोडून टाकण्याकरितां

मवाळ पाहिजेत. पण त्यांनीं आपलें अंतिम साध्य सोडून द्यावें. अंतिम साध्याबद्दलचा तंटा मालक पैही देत नसतां यजमानाला लाख रुपये मागावे कां कोट रुपये मागावे, याबद्दलच्या भिक्षेकऱ्यांच्या तंट्यासारखा आहे. यजमान पैही द्यावयास तयार नाहीं, उलट पुरभय्याकडून लाथा मारून हांकून देणार आहे, आणि इकडे त्याच्याजवळ किती मागावे—लाख कां कोटि—याचा वाद माजविणे यासारखे अंतिम साध्याकरितां तंटा करीत बसणें मूर्खपणाचें आहे. हा मूर्खपणा किती दिवस चालणार ? मतभेद राहतीलच; पण एकमेकांच्या साहाय्याखेरीज राष्ट्रकार्य होणार नाही. ज्यांच्याशीं भांडावयाचें त्यांतील कोणी 'तुम्हांला दुसऱ्यापेक्षां प्रेमानें वागवूं' असें म्हणूं लागला तर त्याला हातभर मागें सारा—त्याच्या बोलण्यानें मोहून जाऊं नका. गोऱ्या अधिकारी वर्गाची घट्ट मूठ सैल करावयाची आहे, तेव्हां या मुठीचें एक बोट जहालांनीं सैल केलें तर दुसऱ्या पक्षानें दुसरें बोट उघडलें पाहिजे व मूठ मोकळी केली पाहिजे. मग निरनिराळ्या चौक्यांत सैंपाक हवा तर करा; पण सध्यां लढाईचा काळ आहे. यावेळीं एकच अन्न खाल्लें पाहिजे. [ येथें ठराव वाचून दाखवून लो.टिळक म्हणाले] या निरनिराळ्या पक्षांना संभाळून काम कसें करावें, असा प्रश्न येईल, तर युनायटेड स्टेट्स्कडे पहा. ज्यांत निरनिराळे पक्ष एक होतात, त्यासच राष्ट्र म्हणत असतात. दुसरी एक सूचना अशी आहे कीं, कलकत्त्याच्या ठरावास पाया समजून राष्ट्रीय सभेचें काम पुढें चालविण्याकरितां नव्या पक्षानें जी कमिटी नेमली आहे ती आणि 'कन्व्हेन्शन्' यांनीं आपलें म्हणणें दे. दादाभाई नौरोजी यांजपुढें प्रथम मांडून, ते सांगतील तसें करावें. हें मला मान्य आहे; पण माझें म्हणणें एवढेंच आहे कीं, कमिटीला अशा रीतीनें बांधून टाकूं नका. साधन, उपाय व मार्ग यासंबंधाचा भाग गौण आहे. ज्याला जो मार्ग सोपा वाटेल तो तो पत्करील. कमिटीवर आपण काम सोपवावें. ज्या अध्यक्षांनीं आपल्या या सभेचें काम आज चार दिवस इतक्या सौजन्यानं व विद्वत्तेनें केलें, त्यांना विकट मार्ग कोणता व सुलभ मार्ग कोणता हें समजत नाहीं काय ? याप्रमाणें दोन सूचना आपल्यापुढें येणार आहेत, त्यासंबंधानें सावध रहावें.

## प्रश्न राष्ट्राचा आहे

कोणी म्हणतील हा प्रांताचा प्रश्न नाहीं. हा राष्ट्राचा प्रश्न आहे. होय; हा राष्ट्राचा प्रश्न आहे. पण आम्ही राष्ट्राचे अवयव आहोत, हें विसरूं नका.


डोळ्याला दुखापत झाली असतां हातानें त्याला औषध घालूं नये, असें म्हणत असाल तर मग हा ठराव प्रांतानें घेऊं नये. असा प्रयत्न करण्याचा आमचा हक्क आहे. पोट आणि अवयव या धड्यांतील गोष्टीप्रमाणें आम्ही एक झालें पाहिजे; नाहीं तर सर्व शरीर मृत होईल. जहालाशीं तुटून वागल्यानें आपल्याला हक्क मिळतील असा जर 'मवाळ' असें ज्यांना म्हणतात त्यांचा समज असेल तर तो फुकट आहे. खरोखर जर हक्क त्यांना मिळत असतील तर ते आम्हांला पाहिजे आहेत. पण घोडा व हरिण यांची गोष्ट त्यांनी विसरतां कामा नये. हरणाला हुसकवून लावण्याकरितां घोड्याने आपल्या पाठीवर एकदां जें जीन घालूं दिले तें जीन घोडेस्वारानें त्याच्यावर कायमचेंच केलें; इकडे लक्ष दिले पाहिजे. आपल्यांतील दुहीनें कित्येक इंग्रजांना आनंद झालेला आहे. पण ते कोणाला कांही देणार नाहींत. इंग्रजी गोड गोष्टी ऐकून भुलूं नका. एकीचें महत्व न समजणें हें मूर्खपणाचें आहे. सर्वांचा समावेश राष्ट्रीय सभेंत झाला पाहिजे. 'मत बाजूला ठेवून देह तेवढा घेऊन आमच्याजवळ या' असें म्हणणें ठीक नाहीं. डॉ. राशबिहारी हे गेल्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष आहेत, असा बंगाल्यांत बूट निघाला आहे. सुरेंद्रनाथ बाबूंनी कन्व्हेन्शनमध्ये अशी सूचना केली होती कीं, डॉ. घोष यांनी अध्यक्ष या नात्यानें पुनः राष्ट्रीय सभा बोलवावी. पण सुरेंद्र-नाथासारख्या देशभक्तानें केलेली ही विनंतीहि मान्य करण्यांत आली नाहीं, तरी समेटानें सर्व पक्षांची राष्ट्रीय सभा भरविणे अवश्य आहे. तेव्हां या ठरावास आपण आपली संमति द्याल अशी मला आशा आहे.

# राष्ट्रीय सभा व बहुमताविरुद्ध असलेले लोक

बुधवार, ता. २९ एप्रिल १९०८ रोजीं, म्हणजे धुळे येथें भरलेल्या मुंबई इलाख्याच्या पंधराव्या प्रांतिक परिषदेच्या बैठकीचे तिसऱ्या दिवशीं, समेटानें राष्ट्रीय सभा भरविण्याची तजवीज करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यासंबंधीचा सातवा ठराव लो. टिळक यांनी परिषदेपुढें मांडला. लो. टिळक यांनीं ' सर्व ' पक्षांची समेटानें राष्ट्रीय सभा व्हावी असें आपल्या भाषणांत प्रतिपादिलें. त्यावर धुळें येथील रा. गरुड यांनीं सूचना आणिली कीं, " स्वतंत्र राज्य मागणारा पक्ष राष्ट्रीय सभेंत नसावा, म्हणून ' सर्व ' पक्षांची राष्ट्रीय सभा भरवूं नये, " या प्रतिसूचनेस अनुमोदन व पुष्टि मिळाल्यावर लो. टिळक यांनी उत्तरादाखल भाषण केलें, तें येणेंप्रमाणें :—

आतां मी जो उभा राहिलो आहे तो केवळ माझा हक्क फुकट जाऊं नये, तो बजावावा, म्हणून उभा राहिलो आहे. नुकत्याच आलेल्या या प्रतिसूचनेविरुद्ध मला फारसें बोलावयाचे नाहीं. रा. आपटे यांच्या म्हणण्यांत असे आले कीं, वसाहतींच्या स्वराज्यासंबंधींचा ठराव ज्या सभेंत पसार झाला त्या सभेंत स्वातंत्र्यवादी लोकांना कसें घेता ? पार्लमेंट सभेंत लढाई करावयाची असें ठरलें तरी त्याविरुद्ध लोक हे सभेंत होतेच, हे त्यांना ठाऊक नाहीं काय ? सर्व मतांच्या लोकांची प्रथम सभा भरवून मग बहुमताप्रमाणें काय तें ठरवावयाचें व ठराव मंजूर करावयाचे, असा सर्वत्र प्रचार आहे. एखाद्या सभेंत बहुमतानें पसार होणाऱ्या किंवा झालेल्या ठरावांविरुद्ध ज्यांचीं मतें आहेत असे लोक जर नको असले तर मग त्या सभेंत बहुमत तें कशाला पाहिजे ? सभेच्या ठरावाविरुद्ध मत असलेलीं माणसें ज्यांना सभेंत नकोशीं वाटतात त्यांना पार्लमेंटच्या नियमांची माहिती नाहीं, असल्यास त्यांना ते आठवत नाहींत, असेंच म्हटलें पाहिजे. पार्लमेंटपुढे येणाऱ्या ' लायसेंसिंग बिला ' विरुद्ध असलेल्या लोकांना काढून दिलें

तर त्याविरुद्ध मत देणारा कोणीच राहाणार नाहीं—मग राहिलेल्यांचे एकमतच झालें, तें बहुमत कसचें ? दोन पक्ष असले व त्यांतील एका पक्षाचे लोक कमी असले तर कमी लोक ज्यांत आहेत तो पक्ष आपलीं मतें देशांतील लोकांपुढें मांडतो व त्यांचीं मतें आपल्यासारखी बनविण्याचा प्रयत्न करतो. अशा रीतीनें तो पक्ष प्रबल होऊन देशांतील बहुमत त्या पक्षाच्या बाजूचे होतें; आणि राष्ट्राची प्रगति होते ती अशाचमुळें होते. राष्ट्रीय सभेंतील बहुमत विवक्षित मताच्या बाजूला असले तरी स्वातंत्र्यवादी वक्त्यास आपल्या मताच्या प्रवर्तनार्थ भाषण करण्याचा हक्क आहे. हा हक्क बुडवाल तेव्हां राष्ट्र बुडवाल, हें लक्षांत ठेवा. असें केलेत तर राष्ट्रीय सभेंत सरकारी अधिकारी वर्गासारखी 'ब्यूरॉक्रसी' च झाली, असें म्हणावें लागेल; मग राष्ट्रीय सभेंत 'लोकमत' जाहीर होणार नाहीं. तेव्हां, बहुमत अमुक आहे म्हणून त्या मताविरुद्ध असलेल्या लोकांचा सभेंत येऊन आपलीं मतें प्रतिपादन करण्याचा जो हक्क आहे तो आपण बुडविणार नाहीं व प्रगतीचा मार्ग कुंठित करून देशाचें नुकसान होऊं देणार नाहीं, अशी आशा आहे. इतकें बोलून मी आपली रजा घेतो.



# आमची दुःस्थिति व त्यावर उपाय

धुळें येथें ता. २७ एप्रिल ते १ मे १९०८ पर्यंत मुंबई इलाख्याच्या पंधराव्या प्रांतिक परिषदेची बैठक झाली. या प्रसंगीं परिषदेचें काम झाल्यावर एके दिवशी रात्री खुल्या मैदानांत उमरावतीचे वकील रा. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं लो. टिळक यांचें दहा हजार श्रोत्यांसमोर जाहीर व्याख्यान झाले तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष महाराज आणि सभ्य गृहस्थहो ! आज या ठिकाणीं जो एवढा मोठा समूह जमला आहे त्याची—या सर्व लोकांची व माझी—ओळख घडण्याचा प्रसंग आला याबद्दल मी फार आभारी आहे. मला खानदेशांत असा प्रसंग आजपर्यंत आला नव्हता; तो या प्रांतिक परिषदेमुळें आला. येथें शहरांतील, खेड्यांतील पाटील, कुळकर्णी, देशपांडे असे सर्व प्रकारचे लोक आले आहेत. अशा लोकांना शास्त्रांतील एखादी गोष्ट न सांगतां व्यवहारांतील सांगावी असा माझा विचार आहे. आपली स्थिति कशी आहे; बरी आहे कीं वाईट आहे, बरी असल्यास अधिक बरी कशानें होईल, वाईट असल्यास ती बरी होण्याकरितां काय करावें, यासंबंधानें बोलून आम्ही जें कांहीं कार्य आरंभिलें आहे त्याविषयीं आपलीं सर्वांची सहानुभूति मिळवावी म्हणून मी आतां बोलणार आहे. माझें म्हणणें तुम्हांला पटलें तर तुम्ही आमच्या कार्याला मदत द्याल अशी मला आशा आहे. अलीकडे लोकांच्या मनांत एक विचार येऊं लागला आहे—मग ते लोक मुसलमान असोत, हिंदू असोत, ख्रिस्ती असोत, श्रीमान असोत, गरीब असोत, इभ्रतीचे असोत किंवा साधारण स्थितींतले असोत—त्या सर्वांच्या अडचणी एकच झाल्यानें त्यांच्यांत भेदाभेद राहिलेला नाहीं. आज जर कोणाचाही विचार केला तर तो विचार ब्राम्हण, कारकून, मुसलमान, ख्रिस्ती, यापैकीं सर्वांस लागू आहे. प्रांतिक सभेंतील भाषणांत रा. सा. म्हाळस यांनीं सांगितलें कीं इकडे १८१८ त इंग्रजी राज्य झालें. इंग्रजी राज्य झाल्यास ९० वर वर्षें होऊन गेलीं. या काळांत लोकांना खायला अधिक मिळूं लागलें का कमी, लोकांच्या पोटा-

पाण्याची तजवीज अधिक चांगली झाली किंवा कसें, हें पहावयाचें आहे. आपण चार लोक जमलों तर एकमेकाला कुशल विचारीत असतो. मुलेंबाळें खुशाल आहेत काय, तुमची पोटापाण्याची व्यवस्था ठीक आहे ना, असें आपण विचारीत असतो. शेतकरी असल्यास गुरेंढोरें कशी काय आहेत, वगैरे प्रश्न करतो. अशा प्रकारें आपल्या स्थितीसंबंधाचा आढावा वर्षांतून एकदां तरी घ्यावा अशी माझी इच्छा आहे. प्रांतिक परिषदेंत तरी हेंच केलें जातें. लोक पंढरपुराला जातात ते परलोकसुखाकरितां—आमचा हा जो प्रयत्न होत आहे तो या लोकांतील सुखाकरितां आहे. परलोक मिळविण्यास तरी मन स्वस्थ लागत असतें; खायला प्यायला लागत असतें, स्वस्थता लागत असतें, सुख लागत असतें. हें ज्यांस असेल त्यांसच परलोकीं गति मिळेल. ज्याला खाण्यापिण्याचें सुख नाहीं त्याला मनाच्या अस्वस्थतेमुळें परलोकही लाभणार नाहीं.

## आक्काबाईचा फेरा कसा आला ?

अशा तऱ्हेचा विचार आपण करतां काय?—कधीं केला आहां काय? जिल्ह्यांतील लोक जमवून असा विचार करण्याची पद्धत आपल्यांत रूढ झाली आहे असें मला वाटत नाहीं. पाऊस पूर्वीसारखा पडत नाहीं, उत्पन्न होत नाहीं, पोटाला मिळत नाहीं, हा आपला अनुभव आहे. प्रांतिक सभेच्या अध्यक्षांनीं यासंबंधानें पुरावा गोळा केलेला आहे. शिवाय येथें शहरांतील व खेड्यांतील लोक आहेत; त्यांनीं आपला अनुभव आपल्या मनाला विचारावा. आपल्या सर्वांच्या मनांनी जर एकच साक्ष पटविली तर 'पांचा मुखीं परमेश्वर' या न्यायानें तें सत्य समजण्यास हरकत नाहीं, व मग मी तरी निदान हें बोलेनच. इंग्रजी राज्यांत आम्ही दरिद्रा झालों आहों हें खरें. ही आक्काबाई इकडे कां आली? ही अवदशा आली कशी? हिला जर आम्ही बोलाविली नाहीं तर तिला घरांत घातली कोणी? आमचा तरी हा निदान दोष नाहीं. प्रत्येकाला वाटतें मला रोजगारधंदा मिळावा, खायला मिळावें. मग हें दारिद्र्य आलें कोठून? याचा विचार न केला तर ज्या जमिनीवर आमच्या वाडवडिलांनीं पोट भरलें त्या जमिनींत आम्हांला लवकरच जावें लागेल. सावकार

लोक जसा वर्षास आढावा घेतात, नफानुकसान काय झालें हें पहातात, तसा आपल्या जिल्ह्याचा व प्रांताचा हिशेब आपण घेतला पाहिजे. असा हिशेब आपण पूर्वी घेत नव्हतो. तेव्हां, या देशांतले राजे—हिंदु व मुसलमान राजे—मुसलमान असले तरी ते येथें राहणारेच होते—रयतेची काळजी घेत. रयतेचें उतन्न कसें वाढल यांविषयीं ते काळजी वहात. यासंबंधीं राजानें जर काळजी घेतली नाहीं तर तो राजा कशाचा ?—नाहीं तर त्याला आम्ही कर कशाबद्दल द्यायचा ? त्याचें आम्ही कर्ज खाल्लें आहे कीं काय ? ज्या गोरगरीब अज्ञान लोकांना समजत नाहीं त्यांच्या हिताचा विचार पैसा घेणाऱ्या अधिकाऱ्यांनीं पाहिला पाहिजे. जे अधिकारी आमचे पैसे घऊन आमची काळजी घेत नाहींत ते हरामाचे पैसे घेतात, असें म्हटलें पाहिजे !

इंग्रज सरकार येथें आलें तेव्हां थक्क होण्यासारखी गोष्ट नजरेस आली. इंग्रज सरकारनें भिल्लांचा दंगाधोपा बंद केला, शाळा काढल्या, वगैरे गोष्टी केल्या; यानें इंग्रजांविषयीं पूज्यबुद्धि वाढली. पूर्वीचे दंगे आठवल्यानें लोकांना नवीन स्थितीचें कौतुक वाटलें. या राज्यांत काठीला सोनें बांधून जावें, कोणाला त्रास नाहीं; या राज्यांत पक्षपात नाहीं, हे राज्यकर्ते निःपक्षपाती आहेत; असा तेव्हांचा समज होता. मोठ्या उजेडाचा नवीन दिवा डोळ्यासमोर आला म्हणजे डोळे दिपून जातात व प्रथम बघवत नाहीं; पग कांहीं काळानें त्या दिव्यांतील दोषही दिसूं लागतात. तसें आतां झालें आहे. घी देखलें, पण बडगा नाहीं देखला, असें आतां वाटूं लागलें आहे. आमच्यांतील पंचायती होत्या त्या नाहींशा झाल्या, बलुत्यांची व्यवस्था होती ती राहिली नाहीं. कोष्टयांची स्थिति बिघडली. तेल्यांची स्थिति बिघडली. दारूचा प्रसार किती व्हावा हें सरकार ठरविणार ! तुम्ही दारू प्यायलीच पाहिजे असें सरकारचें धोरण दिसतें. दारूनें लोक नागावले जात असून कित्येक बायकापोरें या व्यसनाचें पायीं उघडी पडलीं आहेत. यासंबंधानें सरकारकडे अर्ज केला तर सरकार आमचें ऐकत नाहीं. सरकारनें आम्हांला दारू पिण्याचा अधिकार दिला आहे ! इतर स्वातंत्र्य आतां आपल्याला नाहीं, पण या राज्यांत दारू प्यावयाचें स्वातंत्र्य मात्र मुबलक आहे ! पुण्यास दारूप्रीत्यर्थ ६–७ लाख रुपये दरसाल खर्च होतात. दर जिल्ह्यांत असा खर्च होतो. पुण्याची लोकसंख्या एक लाख तर दारूचें उतन्न सात लाख रुपयांचें. पूर्वीं जंगलांत गुरांना फुकट चरायला मिळत

असे, राबाकरितां जंगलाचा उपयोग होत असे, याकरितां जंगलांत स्वेच्छेनें संचार करावयाला मिळत असे. आतां शेतकऱ्यास हें सारें विकत घ्यावें लागतें. सरकारनें कायदा केला आहे—गुरांना फॉरेस्टाची मर्यादा समजली पाहिजे! गुरं आंत गेलें तर मालकाला शिक्षा होते. फॉरेस्ट कांहीं सरकारनें विलायतेहून आणलेलें नाहीं—जंगल, डोंगर, गवत, आमचें; पण एका हुकूमानें हें सगळं गेलें! जंगलखात्याकडून गुरें कोंडलीं जातात—त्यांना खायला मिळत नाहीं. सुदैव समजा कीं गुरें बिचारी दारू पीत नाहींत. ती दारू प्यायला लागली असती तर काय झालें असतें आणि काय नाहीं हें कांहीं सांगतां येत नाहीं. पाऊस पडावा तसा पडत नाहीं, म्हणून 'फॉरेस्ट राखण्यांत आलें. पण १८७९त जंगलाचा कायदा झाला, त्याला तीस वर्षें झालीं—यांत पावसाची सरासरी कमीच आहे. पावसाचा तोटा, गुरें नसल्यानें नांगरण्याची पंचाईत, चारा नसल्यानें गुरें [illegible] मुश्किल अशी स्थिति झाली आहे.

## गाड्यास खिळ घालण्याचा अधिकार

शेतकऱ्याची स्थिति याप्रमाणें संकुचित होत चालली तरी—१८१८ सालापेक्षां तिप्पट सारा शेतकऱ्यांना द्यावा लागत आहे, हें निराळेंच. सारा दर पहाणीला चार पांच आणे वाढला व अशा दोन तीन पहाण्या झाल्या! जमिनीचे सारे वाढले, ते रोख द्यावे लागले! सावकार घरीं येऊं लागला, तेव्हां सावकार बुडाला तरी हरकत नाहीं पण सारा वेळेला मात्र भरला गेला पाहिजे, असें करण्यांत आलें. जी गोष्ट पहावी ती अंगाशींच येतें. तुम्ही म्हणाल हा धंदा सोडावा व दुसरा करावा, पण दुसरा धंदा कोठें आहे? खानदेशांत कापूस आहे. पण त्याचें कापड विलायतेंत होतें. मग काय येथें कोष्टी नाहींत? का कापूस नाहीं? का कापड तुम्हांला करतां येत नाहीं? कोष्टी बुडाले व तेही शेतकी करायला लागले. तेल्यांचा धंदा रॉकेलानें बुडविला. कुंभार व लोहार यांचा धंदाहि करतां येईनासा झाला आहे. प्रजा वाढल्यानें दारिद्य वाढलें आहे. अशी स्थिति आतां किती दिवस राहाणार व टिकणार? **सोन्याचा धूर निघत असणाऱ्या राष्ट्रास ही अशी स्थिति सहन होणार नाहीं.** तो देशसुद्धां अशा स्थितींत भिकारीच होईल. तुमच्यावर हुकमत चालविणारा आधिकारी—कलेक्टर—तुमच्यापेक्षां

अधिक शहाणा अगर अधिक बुद्धिमान असतो—ते शहाणे आहेत म्हणूनच तुमच्यावर राज्य करतात. तुमचे धंदे बुडाले तर ते तुम्हाला हे अधिकारी कां शिकवीत नाहींत ? याचें कारण त्यांचें नुकसान होतें. एकाच बादशहाची प्रजा, पण त्यांत काळ्यागोऱ्यांत भेद केलेला प्रत्यहीं दिसून येतो. आमची स्थिति दिवसें-दिवस अधिकाधिक भिकार होत आहे. या खानदेशांत पूर्वी कोणी गाडीच्या चाकांना चांदीच्या धांवा लाविल्या होत्या असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. पण ती स्थिति आतां गेली ! आतां शेतांतलें उभे पीक युरोपियन विकत घतो. **आमच्या देशांतलें सगळें धान्य आमच्या पोटांत गेलें तर आम्हीं उपाशी मरणार नाहीं, पण त्यांतील किती तरी धान्य परदेशीं जातें !** व्यापाऱ्यांची स्थिति अशीच आहे. त्यांचा धंदा बुडाला ! ब्राह्मणांच्या नोकऱ्या इंग्रजांनीं घेतल्या. अशा स्थितींत लोकांनीं काय करावें ? जगायचें का मरायचें ? इंग्रज कातडी पांघरींत असत तेव्हां आम्ही कपडे वापरीत होतो; त्या आमची स्थिति आज इंग्रज राज्यांत अशी व्हावी हें दुर्दैव होय ! आम्ही अन्नाला मोताद झालों आहों ! या गोष्टी जर तुम्हाला कळल्या, तुमच्या मनांत उतरल्या, तर तुम्हांला त्यावर उपाय सुचेल. पाऊस पडत नाहीं—यासंबंधानें आमच्या धर्माची समजूत अशी आहे कीं, राजाच्या कुवर्तनामुळें देशांत पाऊस पडत नाहीं. शिवाय सर-कारानें धान्याचीं पेवें कां ठेवूं नयेत ? सध्यांची दुःस्थिति बंद कशी करावयाची हा प्रश्न आहे. सरकारनें दंगे मोडले; फौज ठेविली; सरकार बलिष्ठ आहे हें खरें; पण मामलेदार, पाटील, कुळकर्णी, हे सर्व आपले लोक असून हे जर सरकारला मिळाले नाहींत तर राज्य कधींही चालणार नाहीं. प्रस्तुतची राज्यपद्धति जर असह्य झाली असेल तर राज्यकारभाराच्या गाड्याला खीळ घालण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. असें केल्याशिवाय अधिकारी वर्गाचें लक्ष आपल्या दुःस्थितीकडे व आपल्या गाऱ्हाण्याकडे लागावें तसें लागणार नाहीं.

## याचें नांव स्वराज्य

गुरें फॉरेस्टांत गेलीं म्हणून कोंडणारे आम्ही, पाटील आम्ही, कुलकर्णी आम्ही, मामलेदार व इतर अधिकारी आम्ही आणि इंग्रजांकरितां लढतोंही आम्हीच. तम्हीच राज्य चालवीत आहां. आपल्या हातांतच स्वराज्य आहे. हें कळावयाचें

व तें हातांतल्या हातांत ठेवावयाचें एवढेंच काय तें. स्वराज्य म्हणजे सर्व कांहीं तुमचें तुम्ही आपल्या इच्छेनें ठरवावयाचें. जंगल किती व कोणतें राखावयाचें, दारूची विक्री किती होऊं द्यावयाची, वगैरे गोष्टी आपल्या आपण ठरवावयाच्या, याचें नांव स्वराज्य. आमचें इंग्रजांना म्हणणें एवढेंच आहे कीं तुम्ही २५०० रु. घेत जा, पण मग तुम्ही गांवाच्या कामाकडे न पहाल तर बरें. कोणी परकी मनुष्य एखाद्याच्या घरांत शिरून त्याचें खरें व पूर्ण हित कधी करूं शकत नाहीं, हा जगमान्य सिद्धांत आहे. या सिद्धांताप्रमाणें पहातां राज्यकारभारांत रयतेच्या हिताकरितां रयतेच्या मताप्रमाणें व्यवस्था होणें जरूर आहे. पण हें मायबाप सरकार येथें आपल्याच मताप्रमाणें आमचें हित करावयास लागलें आहे! पण मुलाला तरी मालमत्तेचा अर्धा वांटा द्यावाच लागतो! स्वराज्य झालें म्हणजे दारू नाहींशी झाली तर उत्पन्न कमी होईल; मग हो कसें? असें कोणी म्हणतील. यास उपाय एवढाच कीं, मोठमोठे पगार जे घेतात त्यांना अर्धा पगार द्यावा! सर्वांनीं लहान—थोडा—पगार घ्यावा, आणि कांहीं थोड्या लोकांनीं मोठा पगार घ्यावा हा अन्याय आहे. कापूस आमचा व धोतर त्यांचें, असें सध्यां आहे. शेण आमचें व गवऱ्या त्यांच्या असें होऊन डबेच्या डबे शेण भरून तिकडे जाईल व तिकडून गवऱ्या बनून येतील; त्या बिनधुराच्या 'वा, काय छान जळतात!' म्हणून तुम्ही जाळाल, असा प्रसंग येण्याचा संभव आहे. या गोष्टी कुंभारापासून तो शिंप्याला, न्हाव्याला, वगैरे सर्वांना कळल्या पाहिजेत. न्हाव्याला वस्तरे विलायती, स्त्रियांच्या बांगड्या विलायती, मग तुम्ही काय करणार? जमीन नांगरण्याचा काय तो हक्क आतां राहिला आहे; पण तो सुद्धां एक फूट खोल नांगरण्यापुरताच आहे. बाकी त्या खालीं जमिनींत कांहीं सांपडल्यास तें सरकारचें! अशा स्थितींत कोणता देश भिकारी होणार नाहीं? अशा स्थितींत इंग्लंडही भिकारी होईल. नाहीं तरी इंग्लंडांत कोळसा व लोखंड याखेरीज काय आहे? ज्युलियस सीझरनें देखील या देशांत नुसतें बर्फ पसरलेलें पाहून त्यास 'श्वेतद्वीप' असें नांव ठेविलें होतें. ब्राह्मणच सरकारच्या अधिकाराची अम्मलबजावणी करतात, असा आक्षेप आहे, व तो बहुतांशी खराही आहे. मामलेदार, भाग कारकून बहुधा ब्राह्मणच असतात; पण यांच्यामागें बागुलबोवा असतो, त्याला हे भितात.

## निर्गुण निराकार सरकार

सराकारला आकार नाहीं, सरकारला बोलवत नाहीं, तुम्ही बोललां तर सरकार तें ऐकत नाहीं. सरकार निराकार निर्गुण असें झालें आहे. या गोष्टींचें सर्वांस ज्ञान व्हावें म्हणून राष्ट्रीय, प्रांतिक व जिल्हासभा आहेत. हें सारें कोणातरी एकव्याकरितां नाहीं. मी आपले पोट भरण्या-करितां येथें आलो नाहीं. तुमची व्यवस्था तुमच्या हातांत आली पाहिजे, आणि तुम्ही निश्चय केलात तर काय होणार नाहीं ! इतक्या लोकांना वाटलें कीं आमची व्यवस्था आम्ही पहावी, तर मग काय होणार नाहीं ! परमेश्वर जसा तुमच्याजवळ आहे, त्याप्रमाणे हा मार्गही तुमच्याजवळ आहे. तुम्ही निश्चय केला पाहिजे, भीति धरतां कामा नये. असे होईल तेव्हां तुमची ऊर्जितावस्था येईल. **जें हवें आहे तें प्राप्त करून घ्या, आणि नको असेल तें नको म्हणा; जुटीनें वागा, म्हणजे तुम्हांला यश मिळेल.** परमेश्वर दुःखानें गांजलेल्यांचा साहाय्यकारी आहे; तो गरीबांचा वाली आहे. **देशाला विसरला तर एकएकटे मरून जाल.** जुटीनें वागले पाहिजे—पुढाऱ्यांना तुमचें साहाय्य पाहिजे. जूट पाहिजे, मग ती तीस कोट मुंग्यांनी केली तरी त्या हत्तीला जेरीस आणतील ! तुमच्या पूर्वजांनीं धैर्याचीं, शौर्याचीं, इभ्रतीचीं अनेक कामें केलीं आहेत; त्यांच विस्मरण होऊं देऊं नका. **स्वदेशीचा स्वीकार करा; परदेशीला तिरस्कारानें दूर सारा.** स्वदेशी व्रताची शपथ घ्या, त्याचें स्मरण ठेवा, इतके सांगून व माझें भाषण इतका वेळ शांतपणें ऐकून घेतलेत याबद्दल आभार मागून पुरें करतों.

# शिवाजी महाराज व परिस्थितीचें बंड

शनिवार ता. २ मे १९०८ इ. रोजीं सायंकाळीं, अकोला ( वऱ्हाड ) येथें गांवाबाहेरील रा. फडके यांच्या मैदानांत श्री शिवाजी उत्सवाचे निमित्त लो. टिळक यांचें वऱ्हाडांतील निरनिराळ्या ठिकाणांहून आलेल्या दहा हजार श्रोत्यांसमोर व्याख्यान झालें. तें येणेप्रमाणें:—

देशबांधवहो, आजच्या सुप्रसंगीं महाराष्ट्रांतील कोणत्या तरी ठिकाणीं शिवजयंतीच्या उत्सवाला मला हजर राहतां आलें याबद्दल मला समाधान वाटतें. आतां जो आपण माझा गौरव केलात तो माझा गौरव नसून आजच्या प्रसंगाचा, आजच्या उत्सवाचा, त्यांत ग्रथित झालेल्या तत्वांचा, तो गौरव झालेला आहे, असें मी समजतो. शिवाजी उत्सवाचा भाट या नात्यानें मी आज येथें उभा आहे. शिवाजी उत्सव सुरू होऊन बारा तेरा वर्षें झालीं. त्यावर जे जे आक्षेप व विघ्नें आलीं त्यांच निरसनहि झालेलें आहे. कित्येकांना या उत्सवांत सामिल होणें एक प्रकारचें धोक्याचें वाटतें. कदाचित् ही खोड त्यांच्या बरोबरच नाहीशी होणारी असेल ! आमच्यांत अशी म्हण आहे कीं, जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं; तसली ही खोड असेल ! तथापि अकोल्यासारख्या ठिकाणीं या उत्सवानिमित्त एवढा समाज जमला आहे हें पाहून कोणासही आनंद झाल्याशिवाय राहणार नाहीं. उत्सव पुष्कळ आहेत. पशूंचाही उत्सव असतो. गुरांच्या दिवाळीविषयीं आपण ऐकलेंच असेल. बैलांना काम दिलें नाहीं, त्यांच्या शिंगांना रंग लावला व गोंडे बांधले त्यांना वाजत गाजत नेलें, एक दिवस विश्रांति दिली, म्हणजे पशूंचा उत्सव संपला. अशा प्रकारचे उत्सव करण्याचा उपक्रम कांहीं लोकांनी केला होता. हे उत्सव वास्तविक पशूंचे नसतात, तर पशूंच्या यजमानांचे असतात. ज्ञान, ईर्षा, मनाच्या वृत्तींत सुधारणा होणें, वगैरे कांहीं गुरासंबंधानें होत नाहीं. राष्ट्रांतील लोक पशू झाले म्हणजे ते जो उत्सव करतात तो त्यांच्या यजमानांचा उत्सव होय. एखादा अधिकारी आला म्हणजे त्याच्यामागें जो मेळा गोळा करून नेला जातो व जो उत्सव केला जातो तो या प्रकारचा असतो.

## उत्सवांचा उद्देश

उत्सव सर्वांना पाहिजे असतात. बारा महिने काबाडकष्ट करून एक दिवस विश्रांति घ्यावीशी वाटणें अगदी स्वाभाविक आहे. यांत कोणी आडकाठी आणूं म्हणेल तर तें शक्य नाहीं. याकरितां आपल्या धर्मप्रवर्तकांनीं अनेक सण उत्पन्न करून ठेविले आहेत; यांतील बीज काय ? संसारांतून निघून मन उल्लसित व्हावें, सत्कृत्याकडे प्रवृत्ति व्हावी, आपल्या जातीकरितां, आपल्या धर्माकरितां, आपल्या देशाकरितां, कांहीं करण्याची बुद्धि उद्बुद्ध व्हावी, हा या उत्सवांचा हेतु आहे. आपण रामनवमी करितो, कृष्णजयंती करितो, हें आपण केवळ चैनीकरितां करीत नाहीं, रामाकरितां करीत नाहीं, कृष्णाकरितां करीत नाहीं, किंवा शंकराचार्यांकरितां करीत नाहीं. **आपल्यांत शहाणपणाचें, विद्वत्तेचें, किंवा कर्तृत्वाचें कांहीं बीजारोपण व्हावें म्हणून आपण हे उत्सव करतो**. पशूंच्या व माणसांच्या उत्सवांतील फरक लक्षांत ठेऊन उत्सवांमध्यें सद्बुद्धीनें अंतःकरणें ग्रासलीं जाऊन राष्ट्रांतील लोक कर्तव्याला लागतील अशा प्रकारचा जो उत्सव करण्यांत येतो तो उत्सव सर्वमान्य व प्रिय होऊन राष्ट्राचे कल्याणाला कारण होत असतो. शिवजयंति हा त्यांतील एक उत्सव आहे. यावर कदाचित् आपण विचाराल कीं, रामचंद्रापेक्षां किंवा कृष्णापेक्षां शिवाजीची योग्यता अधिक किंवा तितकीच आहे काय ? असा जर प्रश्न कराल तर त्याचें उत्तर मी 'होय' असेंच देणार. यांत एक मुद्दा आलेला आहे; तिकडे आपण लक्ष दिले पाहिजे. रामचंद्राचें वर्णन प्राचीन असल्यानें त्याच्या वर्णनाची योग्यता शिवाजीच्या वर्णनाइतकी असली तरी मनावर संस्कार करण्याचे कामीं त्याची योग्यता कमी आहे. उदात्त विचार, देशाविषयींची कळकळ, ही उत्पन्न होण्याला शिवाजीचे चरित्राइतकें दुसरें चरित्र साधनीभूत होत नाहीं. पदार्थविज्ञानशास्त्राचा नियम आहे कीं, वस्तु पृथ्वीपासून जितकी दूर दूर जाईल त्याच्या वर्गाचे मानानें पृथ्वीचें त्या पदार्थावरील आकर्षण कमीकमी होत जाईल. या नियमाप्रमाणेंच अगदीं प्राचीन काळच्या अवतारी माणसाचें चरित्र त्या मानानें अलीकडच्या अवतारी पुरुषाच्या चरित्रापेक्षां कमी प्रमाणानें इष्टफलदायी होत असतें.

## शिवाजीच्या चरित्राची शिकवण

शिवाजीला महाभारतापासून स्फूर्ति आली; आह्मांला त्याच्या चरित्रापासून आली पाहिजे. शिवाजीचें चरित्र इतकें मनोहर, इतकें चित्तवेधक व विशेष-करून महाराष्ट्रांतील लोकांना इतकें स्फुरण आणणारें आहे कीं, तितकें दुसऱ्या कोणाचें चरित्र नसेल. राष्ट्राला एकवट करणारा, सजीव करणारा व स्फुर्ति उत्पन्न करणारा शिवाजींसारखा पुरुष महाराष्ट्रीयांत सांपडणें कठिण आहे. आपण आज येथें चैनीकरितां जमलो नाहीं, शिवाजीचे चरित्रापासून राष्ट्राला उपयोगी पडेल असें जर आपणांस शिकतां आले तर तें शिकण्या-करितां आपण आज येथें जमलों आहो. शिवाजीचे चरित्रांत एवढें मोठें काय आहे! हें चरित्र शाळेंतील मुलांना माहीत आहे. पण सन १६२७ त शिवाजी जन्मला आणि १६८० त मृत्यू पावला, तो एक डोंगरांतील लुटारू होता, चोऱ्या करून त्यानें राज्य मिळविलें, असें शिक्षण त्यांस दिलें जात आहे. आणि हें शिक्षण कोणाला दिलें जातें म्हणाल, तर शिवाजी महाराज व त्यांचे साथीदार यांचे वंशजांना दिलें जातें! हा निंद्य प्रकार अलीकडे कमी झाला आहे, हें राष्ट्राचें सुदैव होय. गेल्या दोनतनिशें वर्षांत हिंदुस्थानांत—महाराष्ट्रांत—जे उत्तम पुरुष निपजले, त्यांत **शिवाजी महाराज हें अग्रगण्य** होत. पशूंच्या व माणसांच्या उत्सवांतील भेद मी आतां सांगितलाच. पशू व माणूस यांतील भेद सुभाषितांत सांगितला आहे कीं " आहारनिद्राभयमैथुनं च सामान्य-मेतत् पशुभिर्नराणाम् " खाणें, झोंप, भय व मैथून या गोष्टी मानवांना व पशूंना सारख्या आहेत. धर्म हाच काय तो मानवांचा विशेष आहे. ज्यांना धर्म नाहीं ते पशूच समजावयाचे. हा धर्म काय, त्याचें रक्षण कशाला म्हणतात, व त्याची वृद्धि कशी करावयाची, हें आपण शिवाजीच्या चरित्रापासून शिकलें पाहिजे. धर्म तेव्हां कोठें गेला होता कीं काय? नाहीं. पण माणसें तेव्हां पशू झालीं होतीं. त्या पशूंची शिवाजीनें पुढें माणसें बनविलीं, म्हणून त्याला धर्म-संस्थापक अशी संज्ञा मिळाली. राष्ट्रांतील लोकांचें मन जेव्हां अन्नार्थी होतें, लोक जेव्हां घोरत पडतात, भयानें ग्रासले जातात, तेव्हां तें राष्ट्र पशूंचें म्हणून गणलें जातें. तीस कोटी—त्यावेळीं कदाचित् वीस कोटी असतील—लोकांची स्थिति त्यावेळीं यासारखी होती. राजांनी दिलें तें घेऊन स्वस्थ रहावें, त्याचे अधिकार आपण घेण्याची

इच्छा करूं नये, अशी तेव्हां लोकांच्या मनाची प्रवृत्ति होती. स्वतंत्र होण्याची बुद्धि तेव्हां मावळली होती अशा वेळीं महाराष्ट्रलाच नव्हे तर सर्व हिंदुस्थानाला स्वतंत्रतेचा मार्ग ज्यांनी खुला करून दिला ते आजच्या उत्सवाचे नायक होत.

## मी करीन ती परिस्थिति !

लोकांचें मन हल्लीं द्विधा झालेलें आहे. सरकार जे चतकोर, आठ आणे, दहा आणे स्वातंत्र्य देईल तें घेऊन आपण स्वस्थ रहावें, पूर्ण स्वातंत्र्य मागणें हा निव्वळ वेडेपणा होय, चार आणे कमी स्वातंत्र्य आपल्यास पुरे, असें मानणारा एक वर्ग आहे. हल्लीं मवाळ व जहाल किंवा मवाळ व राष्ट्रीय पक्षाचे लोक यांतील भेद याचमुळें माजला आहे. कोणाला खरें स्वातंत्र्य पाहिजे, तर कोणाला चार आणेच पाहिजे. हा दुसरा विचार घातुक आहे. मनुष्याच्या मनांत ज्या उच्च वृत्ति उचंबळतात त्या अमुक मर्यादेपर्यंतच पुरे असें म्हणणें म्हणजे त्या मनोवृत्तींना वाईट मर्यादा घालून देणें आहे. मोर्लेसाहेब म्हणतात कीं, चांदोबा मागूं नका. सात हजार कोसांवरून शांतता राखण्याकरितां परमेश्वरानें सामर्थ्यवान् लोकांना पाठविलें आहे. त्यांचा अव्हेर करूं नका, चार आणेही स्वातंत्र्य मागूं नका, ते देतील ते घेऊन त्यांच्याशीं गोडीगुलाबीनें रहा, असें त्याचें म्हणणें आहे. शिवाजीचें चरित्रांत यांस उत्तर आहे. महत्त्वाकांक्षा कोठवर न्यावी, स्वतंत्रतेचा प्रयत्न किती करावा; याचा विचार आपण दोनतीनशें वर्षांपूर्वीच्या शिवाजीच्या चरित्रापासून करावा. **शिवाजी व त्याचे वडील यांतील जो वाद तोच मवाळ व जहाल यांमधील वाद आहे.** शिवाजी महाराज पराक्रमी होते, पण त्यांचे वडील शहाजी हे कांही कमी पराक्रमी नव्हते. त्यांनीं राज्यें कमावलीं पण तीं विजापूर व अहमदनगर येथील राजकर्त्यांचें पायीं अर्पण केलीं! त्यांचें मत असें होतें कीं त्या वेळचा काळ स्वातंत्र्याला योग्य नव्हता. कोठे अहमदनगरचे व विजापूरचे शिपाई, त्यांचें सैन्य किती मोठें, व त्यांची तयारी केवढी ! त्यांचे घोडे किती चांगले, त्यांच्याजवळ पैसा किती, याचा विचार करा, असें शहाजी म्हणत असत. शहाजीनें आपलें बल, आपला पराक्रम व आपलें तेज अहमदनगर व विजापूर येथील राज्यकर्त्यांकरितां खर्च केलें.

चांगल्या विद्वान व पराक्रमी लोकांना कित्येकदां वाटत असतें कीं, परिस्थिति मोठी वाईट आहे. तीपुढें काय चालणार ? महाराज, **परिस्थितीचें हें बंड आपण प्रथम मोडून टाकलें पाहिजे.** परिस्थिति, परिस्थिति म्हणजे काय ? मी करीन ती परिस्थिति, अशी बुद्धि असावी. 'क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे'. जो माणूस असतो तो परिस्थिति बदलवितो. कवीनें रामचंद्राचें उदाहरण घेतलें आहे. रामचंद्राचे वेळीं परिस्थिति काय होती ? त्यांना 'विजेतव्या लंका' म्हणजे लंका स्वाधीन करून घ्यावयाची होती. हिंदुस्थानभर प्रवास करून हिंदुस्थाना-बाहेरचें बेटांत त्यांना जावयाचें होतें. मध्यें समुद्र होता. त्यावरून जाण्यास नौका किंवा आगबोट नव्हती तर, 'चरणचरितव्यो जलनिधिः' अशी स्थिति होती. इतकें करूनही 'रिपुः पौलस्त्याख्यः' म्हणजे शत्रु रावणासारखा मोठा बलाढ्य होता. रामचंद्राला साहाय्य करावयास कोणी होतें काय ! साहाय्य करावयास माकडें होतीं. माकडांचे साहाय्यानें बलाढ्य शत्रूंचा नाश करावयाचा होता. अशी मोठी दुर्धर स्थिति होती. पण 'तथाप्येको रामः सकलमवधीद्राक्षसकुलम्' म्हणजे एकट्या रामचंद्रानें माकडांच्या साहाय्यानें सर्व राक्षसांचें निर्दालन केलें. राक्षसांचीं सव कुलें बुडवून टाकिलीं. जो मोठा पुरुष असतो, तो आपल्या पराक्रमानें सर्व कांहीं घडवून आणतो.

## नैसर्गिक हक्क

तुम्ही लक्षांत आणा कीं, शिवाजीचे काळीं उत्तर हिंदुस्थानांत दिल्लीस मोगलसत्ता प्रबल होती. दक्षिणेस अहमदनगर व विजापूर ही पुढें येऊन विजयानगरचें राज्य लयाला गेलें होतें. राष्ट्रांतील लोक नाउमेद झाले होते. मावळ्यांकडे पाहिलें तर या माकडांनी शिवाजीला काय मदत केली असेल, असें तुम्हांला वाटेल. पण शिवाजीनें परिस्थितीविषयीं तक्रार न करतां किंवा लोकांना दोष न लावतां देशाला स्वतंत्रता मिळवून देऊन सर्व लोकांना कित्ता घालून दिला. यांतील बीज काय ? एकच. स्वतःवर विश्वास व लोकांवर विश्वास. अली-कडे एक तऱ्हा निघाली आहे. आम्ही तयार आहों, पण लोक तयार नाहींत; ते अज्ञानी आहेत, त्यांजकडून कांहींही व्हावयाचे नाहीं; त्यांना सरकारनें सक्तीनें शिकवावें, ते शिकल्यावर मग पाहूं; असें म्हणणारे लोक निघाले आहेत. याचा

अर्थ स्वतःचे कर्तबगारीवर व इतरांचे कर्तबगारीवर भरंवसा नाहीं ! लोक अज्ञानी आहेत, त्यांची तयारी नाहीं, अशी ओरड ऐकूं येते. ही ओरड ज्यांनीं सुरू केली त्यांना हें ठाऊक नाहीं काय कीं इंग्रजांचें राज्य आमच्याच लोकांनीं चालविलें आहे ? ज्या लोकांच्या मदतीनें राज्य चाललें आहे, त्यांनीं मनांत आणले तर —ही इच्छा उत्पन्न होणें हें त्यांच्या पुढाऱ्यांवर अवलंबून आहे—काय होणार नाहीं ? स्वराज्य म्हणजे आपलें राज्य. तें आपलें आहे. आपल्याजवळ आहे. तें कोणी कोणाला देत नसतो. प्रयत्न करा, आपल्या पायांवर उभे रहा. तें तुमच्या-जवळ आहे. तें कांहीं आकाशांतून पडत नाहीं. एके दिवशीं सकाळीं उठल्याबरोबर स्वराज्याचा पाऊस पडलेला दृष्टोत्पत्तीस आला, असें कधीं होणार नाहीं. प्रयत्नानें जुटीनें, निश्चयानें, ही गोष्ट घडून येणार आहे. स्वराज्य शब्दाची उत्पत्ति शिवाजीचे, वेळीं झाली, या उत्सवास बारा वर्षांपूर्वीं सुरवात झाली; व उत्सव सुरू झाल्यानंतर बारा वर्षांनीं राष्ट्रीय सभेंत 'स्वराज्य' शिरलें. स्वराज्याची कल्पना महाराष्ट्रांतील पूर्वजांनीं आम्हांस दिली आहे. नुसतें स्वातंत्र्य मागावें कीं पूर्ण स्वातंत्र्य मागावें, याचा विचार करीत असणें म्हणजे हातांत असलेलें कडें सोन्याचें कां लोखंडाचें हें समजून घेण्याकरितां सोनाराकडे जाण्यासारखें आहे. स्वराज्य हें अंतिम साध्य असें म्हणतात. मी म्हणतों **हा आमचा नैसर्गिक हक्क आहे**. स्वराज्याची कल्पना आमच्या अंगांत खेळलेली आहे. अग्नीवर भस्म किंवा राख जमलेली असली तरी आंत ज्याप्रमाणें विस्तव असतो, त्याप्रमाणें स्वराज्याच्या कल्पनेचें आम्हांला कांहीं काळ विस्मरण झालें असलें तरी ती कल्पना अद्याप महाराष्ट्रांत जिवंत आहे; असें ज्यांनी सिद्ध केलें त्यांचा आज उत्सव आहे. त्यांचें सांगणें जर आपण ऐकलें तर देश चढणीला लागायला वेळ लागणार नाहीं. बांधवहो ! मी नवी गोष्ट सांगत नाहीं. आपणांस स्वराज्याच्या कल्पनेचें विस्मरण झालें होतें, तें होऊं नये म्हणून पुढाऱ्यांनी प्रयत्न करणें हें त्यांचें कर्तव्य आहे, व तसें थोडेंबहुत होऊं लागलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

## अंतिम वासनेंत राजद्रोह नाहीं

स्वराज्यासंबंधानें एवढ्या समाजाला उपदेश करणें एकप्रकारें धोक्याचें आहे, व म्हणून कित्येक लोक यासंबंधानें बोलण्यास कांकूं करतात. पण मनुष्याला कान

व नाक असतात त्याप्रमाणें त्याचे बरोबरच स्वातंत्र्याची कल्पनाही उत्पन्न झालेली असते. ज्याला स्वातंत्र्य हें नैसर्गिक वाटत नाहीं तो पशू समजावा. स्वराज्य हें अंतिम समजणें, मनुष्याची अंतिम वासना कोणती असावी हें सांगणें यांत राजद्रोह नाहीं, असें खुद्द मोर्लेसाहेबांनीं सांगितलें आहे. Faiths and aspirations हीं पिनल कोडाच्या मर्यादेंत येत नाहींत. आपली स्थिति बिघडेल, सरकार सतावेल, आपल्या घरापेक्षां अधिक वाईट ठिकाणीं रहावें लागेल, अशी कित्येकांस भीति वाटते, ती व्यर्थ आहे. संकटें मुळींच येणार नाहींत असें नाहीं. पण संकट कोणास चुकलें आहे ? रामचंद्राचे ग्रह उच्चीचे होते तरी त्याची बायको चोरीस गेली; त्यावर जास्त संकट काय यावयाचें होतें ? संकट मनुष्यांना भिवविण्याकरितां येत असतें. संकटें मनुष्यानें निर्माण केलेलीं असोत वा परमेश्वरानें निर्माण केलेलीं असोत. त्यांना तोंड देणें, त्यांतून पार पडणें यानेंच पराक्रमी माणस दिसून येत असतो. आपली कसोटी पाहण्याकरितां परमेश्वर संकटें पाठवितो. त्यांची आपण वाट पाहिली पाहिजे. मजवर संकट कधीं येईल व माझी कसोटी केव्हां उतरेल अशी सारखी उत्कंठा लागून राहिली पाहिजे. " विघ्नैः पुनःपुनरपि प्रतिहन्यमानाः प्रारब्धमुत्तमजना न परित्यजंति " यांतील रहस्य हेंच होय. **विघ्न न येता गोष्ट तडीस गेली तर त्यांत पुरुषार्थ तो काय ?** विघ्नें बाजूला सारून जे यश मिळवितात तेच खरे पराक्रमी पुरुष होत. श्रीशिवाजी महाराज तसे होते. आपल्या लोकांना स्वराज्य व स्वतंत्रता मिळवून देण्याचे प्रयत्नांत त्यांजवर अनेक संकटें आलीं. ते कैदेंत गेले, त्यांना डोंगरात रहावें लागलें व अनेकदां माघार घ्यावी लागली ! वडिलांच्या आज्ञेची त्यांनीं पर्वा बाळगिली नाहीं व आपलें अवतारकृत्य केलें. **जेव्हां बुद्धि उच्च असते, देशप्रीतीनें जेव्हां कार्याला प्रारंभ झालेला असतो, तेव्हां संकटांचें कांहीं वाटत नाहीं,** हें शिकण्यास योग्य उत्सव शिवाजी महाराजांचाच होय.

शिवाजीसारखें आम्हांला करावयाला सांगतां कीं काय ? असा कोणी प्रश्न करतात. याचें निरसन पूर्वीं अनेकवार झालेलें आहे. **शिवाजीनें केलें तसें तंतोतंत करा असें आम्ही सांगतो म्हणून कोणाचा समज असल्यास तो काढून टाका.** वैश्वदेवाचे वेळीं बापाचा कासोटा सुटत होता, म्हणून मुलानें आपला मुद्दाम सोडणें हें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच हें मूर्खपणाचें आहे.

हल्लींच्या परिस्थितींत योग्य तें कार्य करा. परिस्थितीला न जुमानतां राष्ट्राला वळण देणें हें अवतारी माणसाचें कर्तव्य आहे. परिस्थितीवर आपला पगडा बसविणें, तिचें आकलन करून तिला वळण देणें, हें महापुरुषांचें लक्षण आहे. दोनशें वर्षांपूर्वींची निराशेची व अंधःकाराची स्थिति सध्यां आली आहे. आमच्यानें कांहीं होणार नाहीं असें सर्वत्र वाटत आहे. आणि आमच्यांतील शहाण्यांना चिंता पडली आहे कीं, राष्ट्र आतां वर येणार कीं खालीं जाणार ! अशा परिस्थितींतून एकदां आम्ही वर आलों आहों. ही परिस्थिति ज्यांनीं बदलविली त्यांचें रक्त तुमच्या अंगांत खेळत आहे. तुम्ही त्यांचे वंशज आहां. तेव्हां परिस्थितीनुसार त्यांना अनुसरा.

## पूर्वजांच्या पराक्रमाचें स्मरण

इतर देशांत असे थोर लोक झाले नाहींत असें नाहीं. अमेरिकेचा वॉशिंग्टन् असाच पुरुष होता. पण शिवाजीच्या धैर्याकडे पहावयाचें तें एवढ्याचकरितां कीं शिवाजी आपल्यांतला असून त्यानें महत्कार्य केलें. **दुसऱ्यांचीं मुलें सुरेख असून आम्हांला काय उपयोग ?** लॉर्ड क्लाईव्हचा उत्सव आपण कां करीत नाहीं ? लॉर्ड क्लाइव्ह याच्या स्मारकाचा उपक्रम लॉर्ड कर्झन यांनीं केला आहे. त्यांना जितका क्लाइव्ह प्रिय त्यापेक्षां शिवाजी महाराज महाराष्ट्राला शत, सहस्र नव्हे, तर लक्षपट प्रिय असले पाहिजेत. शिवाजीनें परकीयांवर सत्ता मिळवून आपलें वैभव गाजविलें नाहीं. कोणी म्हणतात शिवाजीची नीति चांगली नव्हती; पण क्लाइव्हची नीति कोठें चांगली होती ? उमीचंदासंबंधाची गोष्ट सोडून दिली तरी हे लोक येथें येऊन त्यांनीं जें येथील लोकांवर आपलें ओझें घातलें तें काय म्हणून ? असो. हा ऐतिहासिक वादाचा प्रश्न आहे. माझी अशी विनंति आहे कीं, आपल्या पूर्वजांची किंमत कमी करूं नका. शिवाजी-उत्सव करणें हा जर राजद्रोह असेल तर शिवाजीची किंमत कमी करणें हा आपलें जन्मभूमीसंबंधानें मातृगामीपणा करणें आहे. राजद्रोहाचें सोंग कोठवर न्यावें, विशेषतः परकीय राज्यांत कोठवर न्यावें, याचा विचार सूक्ष्म आहे. तो ज्याला करतां येत नाहीं त्यानें लक्ष्यांत ठेवावें कीं, स्वराज्यावरील प्रीति ही नुसत्या शांततेच्या प्रीतीपेक्षां अधिक किंमतीची आहे. आपल्या पूर्वजांनीं कर्तबगारी केली असतां जो कायम दास्याचा उपदेश करतो तो आपल्या हातांनीं आपल्या

देशबांधवांचे पाय कांपतो, असें समजावें. स्वराज्याचे इच्छेनें ज्यांचीं मनें ग्रासून टाकिली नाहींत त्यांचे उत्सव पशूंच्यासारखे, त्यांचे त्या त्या काळीं जे जे यजमान असतील त्यांच्याकरितां असतात. स्वराज्य आणि देशप्रीति, पराक्रम—परिस्थिति जिकून पराक्रम करणें—हें शिवाजीच्या चरित्राचें रहस्य आहे; किंबहुना हा त्या चरित्राचा जीव कीं प्राण आहे.

शिवाजी उत्सवासारख्या प्रसंगीं तुमचीं अंतःकरणें उज्ज्वल देशभक्तीनें भरून गेलीं पाहिजेत. दोनशें वर्षांपूर्वींची गोष्ट आहे; ती फार प्राचीन नाहीं. तुम्ही म्हणाल तो अवतारी पुरुष होता. होय, होता. पण तो आपल्यांतलाच ना! जेव्हां जेव्हां जरूर पडते तेव्हां तेव्हां मानवाचे रूपानेंच परमेश्वर अवतार घेत असतो. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्। धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे' ॥ असें श्रीमद्भगवद्गीतेंत सांगितलें आहे. जेव्हां राजे वाईट वर्तन करूं लागतात तेव्हां परमेश्वर अवतार घेतो. संकटांत लोकांचा हा हक्क आहे. ईश्वराला मागणी करण्याचा आपला हक्क आहे. किंबहुना त्याचा पदर धरून आपलेकडे त्याचें लक्ष ओढून घेण्याचा आपला हक्क आहे आज दहा हजार, वीस हजार वर्षें म्हणा, त्यानें हिंदुस्थानाचें रक्षण केलें आहे. विश्वास ठेवा. विश्वाच्या रहाटगाडग्याचें मनन करा. **तुमच्या पूर्वजांनीं पूर्वीं जी कामगिरी केली त्याचें स्मरण ठेवून एकीनें व धैर्यानें कामाला लागा**; म्हणजे अंतिम साध्य जवळ आहे. भाव व निष्ठा असल्यानें काम होत असतें. तो भाव असूं नये म्हणून कित्येकांचा प्रयत्न आहे. कित्येकांनीं स्वार्थामुळें, कित्येकांनीं भीतीमुळें आणि कित्येकांनीं कावेबाजपणामुळें असा प्रयत्न चालविला आहे. स्वार्थ, भीति किंवा आशा यांनीं प्रेरित झालेल्या लोकांच्या म्हणण्याकडे लक्ष न देतां पूर्वजांचे पराक्रम आठवून—त्यांचेंच रक्त आपले अंगांत खेळत असून त्यांनीं केलेली कर्तबगारी करून दाखविण्याचें सामर्थ्य आपणांत आहे अशी मनाची खात्री ठेवून—काम केल्यास परमेश्वर आपणांस यश देईलच देईल. सर्वांत प्राचीन धर्म व सर्वांत प्राचीन देश आपलाच आहे. आपली ओळख करून घ्या, प्रयत्न करा, म्हणजे शिवाजी महाराजांच्या व श्रीसमर्थ रामदास स्वामींच्या कृपेनें आणि परमेश्वराच्या साहाय्यानें आपली इच्छा पूर्ण होईल, अशी आशा प्रदर्शित करून मला जें सांगावयाचें होतें तें पुरें करतों.

# आमची दुःस्थिति व आमचें प्राप्तव्य

रविवार ता. ३ मे १९०८ इ. रोजीं अक्षयतृतीयेचे दिवशीं सायंकाळीं, अकोला (वऱ्हाड) येथें गांवाबाहेरील रा. फडके यांच्या मैदानांत लो. टिळक यांचें भाषण झालें, तें येणेंप्रमाणेः—

आपण आतांपर्यंत जीं तीन भाषणें ऐकलीं त्यापेक्षां अधिक चांगलें अगर अधिक बोधप्रद भाषण मजकडून होईल, असें मला तरी वाटत नाहीं. तथापि माझ्याकडे जो अधिकार दिला आहे त्याचा मान राखून मला बोललें पाहिजे. मी आपणांस काल सांगितलें कीं, शिवाजी महाराजांनीं देशाला स्वातंत्र्य मिळवून दिलें, ही त्यांच्या आयुष्यांतील मुख्य गोष्ट होय. तुम्ही स्वातंत्र्यास पात्र आहां हें त्यांनीं सिद्ध करून दाखविलें. अगदीं अंतिम प्राप्तव्य म्हणजे पूर्ण स्वातंत्र्य कां निम्में स्वातंत्र्य पाहिजे, याबद्दलचा तंटा शहाजी व शिवाजी महाराज यांमध्यें होता. अलीकडेही असाच चमत्कार झालेला आहे. मनुष्य व पशू यांमधील भेद मी आपणांस काल सांगितला. नांगराचा बैल गाडीला जुंपला तर त्यास थोडें अधिक बरें वाटेल; पण हें त्याचें अंतिम साध्य नव्हे. विचार करा. इंग्रजांनीं आम्हांला गाडीला जुंपलें, तोफा ओढावयास लाविलें, तर तें आमचें अंतिम साध्य नव्हे. सर्व देशावर सांवट असून त्याखालीं रहा म्हणणें म्हणजे देशाची वाढ खुंटविणें आहे. काशीयात्रेची अडचण जवळच्या नदीवर स्नान करून भागवून घे, असें जर हिंदूस सांगितलें तर तो ऐकणार नाहीं. मक्केच्या अलीकडील एखाद्या मशिदींत नमाज पढावयास जर मुसलमानास सांगितलें तर तो नाकबूल होईल. त्याचप्रमाणें स्वातंत्र्यदेवीच्या मंदिराकडे तोंड करून जाणाऱ्याला अर्धवट स्वातंत्र्यमंदिर अगदीं अंतिम साध्य या नात्यानें पसंत पडावयाचें नाहीं. राजकीय गोष्टींत अंतिम साध्य विशेष महत्त्वाचें आहे. आम्ही माणसें आहोंत. स्वतंत्र राहण्याचा आमचा हक्क आहे. परमेश्वराची तशी इच्छा आहे. तत्त्वज्ञान्यांची मोठी इच्छा मोक्ष मिळविण्याचीच असते. ज्यांना ही इच्छा नसेल ते पशू होत. त्यांना गोठ्यांत बांधलें म्हणजे ते खूष असतात. धर्म, अर्थ

मराठी ग्रंथ सं.

काम व मोक्ष हे चार 'पुरुषार्थ' सांगितले आहेत, परमार्थ सांगितलेले नाहींत. ज्या राष्ट्रांतील पुरुष हें विसरतात, त्याकडे लक्ष देत नाहीत, ते मनुष्य जातीचें ज्ञान विसरतात, ते अधोगतीस जातात! मनोवृत्ति मर्यादित ठेवण्याचा हा धडा शिवाजीपासून घ्यावयाचा आहे. कृति कदाचित् परिस्थितीप्रमाणें कमी जास्त करावी लागेल. रा. देशपांड्यांनीं आपणांस सांगितलें कीं, शरीर धिप्पाड असावें. मी म्हणतों नुसतें धिप्पाड शरीर पुरेसें नाहीं. **ज्याचें मन मजबूत नाहीं त्याचें शरीर कितीहि धिप्पाड असलें तरी त्याचा उपयोग नाहीं.** मी शरीराची निंदा करीत नाहीं. हत्ती धिप्पाड असतात; पण त्यांना स्वातंत्र्य नसतें, हें विसरूं नका. खांदा बैलाला असतो पण तो पुरुषाला पाहिजे. ताडाला उंची असते, ती पुरुषाला पाहिजे. पशु व पुरुष यांमधील भेद मनामुळें झालेला आहे. 'मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः' असें महाभारतांत सांगितलें आहे. ज्याचें मन, विचार, हिंमत, छाती, हीं अत्युच्च पायरीस पोंचलीं असतील तोच कांहीं तरी करूं शकेल. भीति बाळगूं नका. भिवविणें हें परकीय सरकाराचें कामच आहे. मी राजा असतों तर असेंच केलें असतें.

## हिंदुस्थान हें कुरण

महाराज! मी आपल्याला सांगतो कीं, हल्लींचा काळ मोठा कठीण आला आहे! कित्येक उन्मत्त, मदान्ध, बलाढ्य व विद्वान् अधिकारी जुलूम करीत आहेत. आम्ही संपत्तिहीन झालों असून शेतकरी धान्य कमावतो त्याचा मोबदला त्यास मिळेनासा झाला आहे. मुसलमानांच्या राज्यांत देखील असें नव्हतें. त्यांनी लूट केली तरी ती सात समुद्राच्या पलीकडे जात नव्हती. पाटलाचा पैसा लुटला तरी तो दुसऱ्या भावाला मिळत असे. अलीकडे स्थिति तशी नाहीं; हा सध्यांच्या राज्यपद्धतीचा दोष आहे. माझे व माझ्या भावाचे पैसे विलायतेंत गठडींतून जात आहेत. सरकारचा रोष व संकटें सोसूनही सरकारला जागें करण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतां जर सरकार जागें झालें नाहीं तर तो दोष आमचा नाहीं. आम्हांला राजद्रोह करावयाचा नाहीं. विहिरीच्या कांठावर निजलेल्या मनुष्यास 'अरे नको' असें म्हटलें व त्यानें जर तिकडे लक्ष दिलें नाहीं, तर दोष कोणाचा? आंत पडेल म्हणून आम्ही त्यास जागें केलें याबद्दल झोंपमोड झाली म्हणून जर तो

आमच्यावर खटला करील तर त्याचें नशीब ! या प्रयत्नांत मोडता घालण्यासाठीं नेमस्त लोक मध्यें येतात ही शरमेची गोष्ट आहे. आपल्यांतील लोकांनींच आपल्या स्वतःला मवाळ, भित्रे वगैरे म्हणावें आणि आपण आपल्या देशबांधवांच्या कार्यांच्या आड यावें, ही गोष्ट दुर्दैवाची नाहीं काय ? राज्यकर्ते अक्कलवान व धूर्त आहेत. ते आमच्यावर राज्य करीत आहेत, हें ते अधिक अक्कलवान आहेत, म्हणूनच करीत आहेत. पण त्यांची अक्कल त्यांच्यासाठीं व आमची अक्कल आमच्यासाठीं. **कोणीही झाला तरी आपल्या अधिक अकलेचा उपयोग आपल्या स्वार्थाकडे करीत असतो.** इंग्रजांचीही गोष्ट अशीच असल्यामुळें आम्हांस स्वदेशी बहिष्काराचा अवलंब करावा लागला. आम्हांवर १०० वर्षें राज्य करूनही त्यांनी आम्हांस नुसत्या आगकाड्या कशा कराव्या, हें शिकविलें नाहीं. आमच्याकडे लांकूड आहे, करवत आहेत, यंत्रें पाहिजे तर येतील, असें असतां व सर्व सामग्री उपलब्ध होणें शक्य असतां, जर्मनी व स्वीडन यांनी या उद्योगावर आपलें पोट भरावें ही गोष्ट हल्लींच्या सरकारास अत्यंत लाजिरवाणी आहे. इंग्लंड तर राहूंच द्या, पण इतर कित्येक देश व्यापारानें हिंदुस्थानांतील पैसा नेत आहेत. इतर देशांचें हिंदुस्थान कुरण करणें ही मोठी चूक आहे. इंग्रजांचा फायदा असला तरी त्यांत आमचा फायदा नाहीं.

## प्रजाद्रोह कां करतां ?

प्रजेनें राजद्रोह करूं नये, तर महाराज, राजानें तरी प्रजाद्रोह करावा काय ? प्रजाद्रोह करणाऱ्या अधिकारी वर्गाला मी प्रजेतर्फे विचारतों " हा प्रजेचा द्रोह तुम्ही कां करितां ? " राजा व प्रजा यांचा संबंध सासूसुनेप्रमाणें नाहीं. प्रजेचें सुनेचें नातें असलें तरी सास्वेंत प्रेमळपणा पाहिजे. हल्लीं सर्वांचीच नागवणूक होत आहे. हिंदु-मुसलमान, नेमस्त-जहाल, हा भेद राजकर्त्यांजवळ नाहीं. सर्वांवर सारखा वरवंटा फिरविला जात आहे. त्याच्यातून कोणीही सुटत नाहीं. कर सर्वांस सारखेच भरावे लागत आहेत. हिंदु–मुसलमान दोघांसही दारू नको असतांना ती त्यांस पाजली जात आहे. मुसलमान मोमीन व हिंदु साळी या दोघांचे धंदे मँचेस्टरनें साफ बुडविले आहेत. राजा जर असा भेद ठेवीत नाहीं तर प्रजेनें तरी आपसांत भेद ठेवून सरकारपाशीं कां वागावें ! 'जशास तसें'

असें कां वागूं नये ? ते आमच्यावर राज्य करतात ही त्यांची सद्दी किंवा त्यांच्यावरील ईश्वरी कृपा नसून हा त्यांच्या कर्माचा परिणाम आहे. त्यांची सद्दी म्हणजे आमची उदासीनता होय. आम्ही ही गोष्ट न जाणतां उद्योग करीत नाहीं, ही त्यांची सद्दी होय. तुमच्यांत फूट पडावी, तुम्ही एकी करूं नये, म्हणून मोर्ले साहेब म्हणतात, मवाळांना जवळ करा. पण, प्रथम जहालांची खबर घ्यावयाची व त्यांची वासलात लावली म्हणजे मग मवाळांची वासलात लावावयाची, असें धोरण आहे. ही राजनीति न ओळखतां फूट पाडणें म्हणजे देशाशीं बेइमानीपणा करणें होय. इंग्रजांना मवाळ प्रिय नाहींत. जास्त द्वेष कोणाचा करावयाचा, एवढाच त्यांच प्रश्न आहे. अशा स्थितींत 'मी मवाळ' म्हणून राजाजवळ जाऊन सांगणें म्हणजे प्रजाद्रोह करणें आहे. आंव्याचा मोहोर हें साध्य म्हणणाराला फळ नको आहे काय ? इंग्रज दोघांना लुचे म्हणत आहेत. ते आम्हा दोघांपेक्षां धूर्त आहेत. 'टाईम्स'चें म्हणणें असें आहे कीं, मवाळ 'पुढें काय' याविषयींचे आपल्या मनांतले विचार बोलून दाखवीत नाहींत, आणि जहाल आपलें म्हणणें स्पष्टपणें सांगतात, एवढाच दोघांत फरक, बाकी ते सारखेच वाईट आहेत. फसवाफसवींत आमचे राज्यकर्ते कोणास हार जावयाचे नाहींत. म्हणून उघड बोला, धैर्य धरा व एकी करा. एकी कराल तरच यश येईल. आमचे राज्यकर्ते इतरांपेक्षां अधिक कुशल आहेत. पूर्वेतिहासावरून त्यांनीं आपलीं धोरणें बांधून ठेविलीं आहेत. इंग्रजी राज्य जाऊं नये म्हणून तिकडले विद्वान एकसारखा विचार करीत असतात; आणि या महात्म्यांच्या प्रभावानेंच त्यांचें राज्य चालतें.

## पुण्यांश मिळवून द्या

राष्ट्रांत साधुपुरुष असल्याशिवाय राज्य चालत नाहीं; मिलनें सांगितलें आहे कीं, एका व्यक्तीनें दुसऱ्या व्यक्तीला, एका राष्ट्रानें दुसऱ्या राष्ट्राला बंदीवान करणें हें पाप आहे. थोडी तरी प्राप्ति दान केली पाहिजे, असें आहे. साधुसंतांनीं द्रव्यार्जनाकडे कानाडोळा केला आहे. द्रव्य कशाकरितां मिळवावयाचें, तर 'त्यागाय.' तेव्हां राज्य घेतलें, याच्या मोबदल्यादाखल कांहीं करावयाचें असेल तर जित राष्ट्राला जिंकणाऱ्या राष्ट्राच्या पायरीला आणलें पाहिजे. विलायतेंतील साधूंचें म्हणणें आहे कीं, दुसऱ्या देशांवर

राज्य करणें, त्यांची संपत्ति लुटणें हें पाप आहे. त्याचें क्षालन जित राष्ट्राला हळू-हळू राज्यकारभार शिकवून परत स्वगृहीं जाण्यानेंच होत असते. आमचे राज्यकर्ते जर हें पुण्य करणार नाहींत तर त्यांस तें करावयास लावा. कोणास पुण्य करावयास लावल्यानें पाप होत नाहीं. जर ते याच रीतीनें राज्य करावयाचें ठरवितील तर त्यांस तसें करूं देऊं नका. यांत राजद्रोह नाहीं. त्यांस पुण्यांश मिळवून या हा द्रोह नव्हे. 'ये यथा माम् प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्' असें गीतेचें सांगणें आहे. कोणाचें उसनें हें पाप आहे. काळी प्रजा ही इंग्लंडाची प्रजा नव्हे काय? मग तिच्या कल्याणाची सरकार बाळगावी तशी काळजी कां बाळगीत नाहीं? मला असे प्रश्न कित्येकजण विचारतात कीं, "तुह्मी यंत्रें कां आणीत नाहीं? तुम्हांला जशी मोकळीक आहे तशीच मोकळीक इंग्रजांना आहे." हें म्हणणें मोठें गोड दिसतें. यामुळें मोठा मोह उत्पन्न होतो. पण इंग्लंडनें आपल्या लोकांस असें सांगितलें नाहीं. पंक्तिप्रपंच जर झाला नसता तर मी हें ऐकलें असतें. त्यांनी तिकडे हिंदुस्थानचें कापड घेऊं नये म्हणून प्रयत्न केला नाहीं काय? तिकडच्या कल्याणासाठीं तिकडे दारू बंद व्हावी आणि आमच्याकडे सुरू व्हावी असा प्रकार चालू आहे. आमच्याइकडे दारू पिण्याची अजून लाज वाटते. परंतु इंग्रज राज्य दारूबाज आहे. इंग्रज म्हणतो, दारू पिण्याचा माझा हक्क आहे, हा हक्क माझ्या बापापासून चालत आलेला—पिढीजाद आहे. अशी स्थिति तिकडे असतां 'लायसेन्सिंग बिल' पुढें आलें आहे; आणि इकडे दारू बंद करण्याचा प्रयत्न सहज फलद्रुप होणार असून तो केला जात नाहीं! दारू पिणें म्हणजे नरकाचें साधन करणें आहे, अशी आमची धर्मसमजूत आहे. दारू बंद करण्याचा आम्हीं उद्योग केला तर सरकारचें दारूचें उत्पन्न बुडेल अशी सरकारी अधिकाऱ्यांस भीति वाटते. लोकांना दारू पिण्याचा नैसर्गिक हक्क आहे असें ते म्हणतात. लोकांचें पानस्वातंत्र्य बुडेल अशी त्यांना भीति आहे. इतर स्वातंत्र्यें बुडालीं तरी त्यांची हरकत नाहीं; पण मुबलक दारू पिणारास हल्लीं अभय देण्यांत आलें आहे.

## राष्ट्रांतील सपिंडभाव

ही स्थिति चांगली नाहीं. ती सुधारणें आमचें कर्तव्य आहे. बुडत असला तर दोघेही बुडूं नका. इंग्रजांचें पातक आमच्या दुर्गुणांमुळें दुणावलें तर आम्हीही दोषी ठरूं. पातक करतो तो, पातकास अनुमोदन देतो तो व पातक होत असतां

तें बघतो तो, हे सारे पातकी आहेत असें आमचें शास्त्र सांगतें. हा इहलोकचा प्रश्न नाहीं, परलोकचा आहे. तुम्ही हल्लीं इतकेंच निरंतर पराधीन रहावें अशी कोणाची इच्छा नाहीं. दास्यांत रहावयास ईश्वरानें आम्हांस उत्पन्न केलेलें नाहीं. बंधुप्रीतीनें वागावें, सर्वजण परमेश्वराचीं लेंकरें आहेत, सर्वांस सारखा हक्क आहे, कोणी कोणाला तुडवायला आलेला नाहीं, हीं सर्व धर्मांचीं तत्त्वें आहेत. हीं तत्त्वें बुडवूं देऊं नका. यांत परमेश्वराची आज्ञा पाळावयाची आहे. कोणाचा द्रोह करावयाचा नाहीं. स्वार्थ आड येईल, पण ही दुर्बुद्धी बाजूला सारून प्रातव्य प्राप्त करून घ्या—आपला नैसर्गिक हक्क प्राप्त करून घ्या. हे एकाचें काम नाहीं, सर्वांचें आहे. हा कोणाच्या धर्माचा प्रश्न नाहीं. धर्म खेरीज करून हिंदु व मुसलमान हे एक आहेत, असें इतरांस ओळखतां आलें पाहिजे. मुसलमान व हिंदु दोघेही या देशांत पुष्कळ वर्षें राहिले आहेत. या देशांतील धान्यावरच दोघांचाही पिंड वाढला आहे. हा जो सपिंडभाव वाढला आहे तो सोडूं नका. हा भाव लक्षांत ठेवून एका कुटुंबांतील माणसांप्रमाणें जर एका कार्यास उद्युक्त व्हाल तर परमेश्वर साहाय्य होईल. ही गोष्ट हक्काची, माणुसकीची व बंधुप्रेमाची आहे, राजद्रोहाची नाहीं. सूर्य प्रकाशतो तो वऱ्हाडांत अधिक व महाबळेश्वरांत कमी हा सूर्याचा दोष नाहीं. सूर्यास दोष देण्यांत अर्थ नाहीं. स्वतंत्रतेचा सूर्य इकडे उदयोन्मुख झाला व तो पूर्वी इकडे पूर्ण प्रकाशत होता. तो नंतर नैसर्गिक नियमाप्रमाणें पश्चिमेकडे गेला असला तरी आतां तो पुन्हां हिंदुस्थानांत मध्यान्हांत येणार आहे अशा वेळीं **मातीचीं ढिकळें होऊन हीं किरणें खाऊन जाऊं नका**, एवढीच माझी आपणांस विनंति आहे.

सगळें पोट भरण्याचा हक्क असतांना आम्हांस अर्धीच भाकरी देणें चांगलें नाहीं हें धर्म व नीतीस मान्य नाहीं. आमच्या लोकांना उपाशी मारून आम्ही आपल्यांतील अर्धी भाकरी दुसऱ्यास देण्यास तयार नाहीं, एवढेंच आमचें म्हणणें आहे. आमचें बल लहान असेल, पण हत्ती कितीही मोठा असला तरी लहान मुंग्या त्याला जेरीस आणतात. जगांतील लहान वस्तु देखील श्रीमंतांस आवश्यक आहेत. ज्याची थोराला जरूर लागत नाहीं, इतकें क्षुल्लक असें या जगतांत कांहींही नाहीं. पोलिस, शिपाई, अबकारी इन्स्पेक्टर हे कांहीं इंग्लंडांतून येत नाहींत. ते—इंग्रज—म्हणतात, 'तुमचेच लोक वास्तवीक राज्य करितात, मग जुलूम कसा होतो?' ज्यांच्याविषयीं असें टोंचून विचा-

रण्यांत येतें त्यांनीं दुसरे धंदे कां करूं नयेत ? जुलूम करण्याचे कामीं सरकारला साहाय्य करूं नका. त्यांचीं उपकरणें बनूं नका. कर बसवून त्यांचा उपयोग करण्याचा अधिकार आमचा आहे. आम्ही कर भरावे व इतरांनीं त्यांचा वाटेल तसा विनियोग करावा, हा ईश्वराच्या घरचा न्याय नव्हे. राजकारणांत व्यावहारिक रीतीनें वागा. दारूचीं दुकानें किती व कोठें उघडावयाचीं, लष्कराकडे किती खर्च करावयाचा, हें आम्ही ठरविणार. आमच्या अमुक पैशाचा विनियोग शिक्षणाकडे झाला पाहिजे, असा मनाशीं निश्चय ठरवा. पैसाफंडास वर्षास एक पैसा दिला तर तुम्ही आम्हांस त्याचा हिशेब मागतां, असेंच सरकारांत जे १२० कोटि दरसाल भरतां त्याचा हिशेब मागावयास शिका. हा हिशेब घेतां येईल तर हिंदुस्थानाला चांगली स्थिति येईल. तुमच्या इच्छेप्रमाणें खर्च होईल असें करा.

## राजा हा क्षत्रिय-वैश्याचा गोळा

पूर्वींच्या व हल्लींच्या स्थितींत फार फरक पडला आहे. पूर्वींचे राजे जित राष्ट्राच्या उत्पन्नांतील कांहीं हिस्सा घेऊन स्वस्थ बसत; पण आतां राजा नुसता क्षत्रिय नाहीं; क्षत्रिय–वैश्याचा तो एक गोळा झाला आहे. उद्योगधंद्यांनीं, करांच्या रूपानें, बेवारसाची मालमत्ता घेऊन आपली भर करावयाची, असें सध्यांचें राजकीय धोरण आहे. हें राजनीतीचें धोरण ओळखा व त्यास आळा घाला. **ज्यांना आपल्या मुलांबाळांना चांगले दिवस यावेत अशी इच्छा असेल त्यांनीं आतां प्रयत्नाला लागले पाहिजे.** काळ कठिण आला आहे. हिंदु व मुसलमान यांच्यांत तंटा नाहीं. पुढें येणारा शिवाजी मुसलमानांत जन्मला तरी मला वाईट वाटणार नाहीं. गुणांची अपेक्षा आहे; जातीची नाहीं. या संबंधाची चाड महाराष्ट्राला विशेष पाहिजे. याचें कारण शिवाजीनें महाराष्ट्रांत जन्म घेऊन विलक्षण पराक्रम करून दाखविले आहेत. या उत्सवापासून जो फायदा करून घेण्यासारखा आहे तो करुन घ्या. या उत्सवाचा हेतु आतां थोडा सफल होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. जी भूमि आमची आहे तिच्यांत स्फूर्ति उत्पन्न व्हावी, त्या स्फूर्तीचा आम्ही फायदा करून घ्यावा, एकजुटीने प्रयत्न करून आम्ही कार्यास लागावें हा या उत्सवाचा हेतु आहे. या मार्गानें जुटीनें जाण्याचें धैर्य परमेश्वर आपणांस देवो, अशी इच्छा प्रदर्शित करून व इतका वेळ माझें भाषण शांतपणें ऐकून घेतलेंत याबद्दल आपलें सर्वांचे आभार मानून मी माझें भाषण पुरें करितों.

# राजकीय साध्यसाधन-मीमांसा

सोमवार ता. ४ मे १९०८ इ. रोजीं सायंकाळीं, अकोला (वऱ्हाड) येथें दहा बारा हजार श्रोतृसमाजापुढें लो. टिळक यांचें व्याख्यान झालें तें येणेंप्रमाणें :—

देशबांधवहो, आजचा हा प्रचंड जनसमूह पाहून मला आनंद होत आहे. आजचा प्रसंग अपूर्व आहे. श्रीशिवाजीउत्सवाचा आज तिसरा दिवस आहे. या प्रसंगीं आपल्या प्रांतांतील प्रसिद्ध सिद्ध पुरुषाचें या ठिकाणीं आगमन होऊन त्यांचा अनुग्रह व्हावा हें खरोखर सुदैव होय. असा प्रसंग आजपर्यंत श्रीशिवाजी-उत्सवाला यापूर्वी कधींही आला नव्हता. महाराजांना येथें निमंत्रण करून हा अपूर्व योग आपण घडवून आणला याबद्दल मी आपला फार आभारी आहे. श्रीगजाननमहाराजांची परंपरा श्रीशिवगुरु श्रीरामदासस्वामीपासून आहे हें आपणांस माहीत आहेच. या उत्सवप्रसंगीं त्यांनीं हजर रहावयाचें मनांत आणून व आपल्या विनंतीस मान देऊन येथें आगमन केलें आहे. ‘हजर राहण्याचें मनांत आणून व विनंतीस मान देऊन’ असें मी म्हटलें आहे. येथें येण्याचे त्यांच्या मनांत आलें, यामुळें या आपल्या कार्याला यश येईल, अशी सद्बुद्धि माझ्या मनांत उत्पन्न झाली आहे. कोणत्याहि कार्यास परमेश्वराचा अनुग्रह पाहिजे व त्याचें चिन्ह आजचें महाराजांचें आगमन होय. त्यांनीं येण्याचा अनुग्रह केल्यामुळें त्यांच्या-समोर बोलणारावर जबाबदारी येऊन पडली आहे, आणि या जबाबदारींतून आपण कसें पार पडूं याची शंका मला वाटावयास लागली. तथापि ज्या कृपेनें त्यांचें येथें आगमन घडवून आणिलें तीच सत्कृपा हें कार्य घडवून आणील, अशी मला खात्री वाटते. असे योग क्वचित् येतात. यांत ईश्वरी प्रेरणेचा अंश खचित आहे. या ठिकाणीं येण्याची त्यांना बुद्धि व्हावी, आमची वेडीवांकडीं कृत्यें त्यांनीं अवलोकन करावीं, व त्या कार्यांना त्याचें पाठबळ मिळावें, यावरून हा दैवी योग आहे, अशी माझी समजूत झाली आहे. माझ्या मतें एवढी प्रस्तावना पुरी आहे. पुरी म्हणण्याचें कारण हें आहे कीं, या वेळेस माझ्या मनोवृत्ति इतक्या उचंबळल्या आहेत, विचार इतके प्रगल्भ झाले आहेत कीं, त्यांचें स्पष्टीकरण करणें अशक्य

झालें आहे. यासाठीं त्यांनीं जो आज अनुग्रह केला त्याबद्दल त्यांचें उपकार मानून व आमच्या चळवळीवर अशीच कृपादृष्टि ठेवावी ही त्यांस प्रार्थना करून मी व्याख्यानास आरंभ करितों.

## स्वातंत्र्य हा ध्रुवाचा तारा

देशबांधवहो, काल आणि परवां मी आपणांस सांगितलें कीं, राष्ट्राचें अगदीं अखेरचें अंतिम साध्य 'स्वातंत्र्य' हें होय. सत्पुरुषादेखत ही गोष्ट मला आपणांस कळवितां आली, याचा मला आनंद होत आहे. यासंबंधाच्या आक्षेपांचा उल्लेख पूर्वींच झाला आहे. पारमार्थिक गोष्टींत काशीयात्रा हें जसें अंतिम साध्य इहलोकीं आहे, तसेंच राजकीय बाबतींत स्वातंत्र्यगंगा हा अंतिम हेतु आहे. जगांत हजारों धर्मक्रांत्या झाल्या, विचारक्रांत्या झाल्या, राज्यक्रांत्या झाल्या, तरी पण या सर्व क्रांत्या पाहून हिंदुस्थान देश या घटकेपर्यंत शाबूत आहे. कोणताही देश हिंदुस्थानची बरोबरी करूं शकत नाही. आज हजारों वर्षें आपला देश जिवंत आहे, तो निरंतर परावलंबनांत ठेवण्याकरितां ईश्वरानें ठेवला आहे काय ? आपल्या राष्ट्रावर जर ईश्वराची अवकृपा असती तर हें राष्ट्र नामशेष झालें असतें. आपणांस सुदिन दाखविण्याचें परमेश्वराच्या मनांत खास आहे. मी आपल्या प्रेरणेनें हें बोलत नाहीं—वस्तुस्थिति तशी आहे. तिच्या अवलोकनापासून जें कळलें तें मी सांगत आहे. परमेश्वराचे जे अनेक मार्ग आहेत त्या मार्गांचें गूढ आपणांस उकलत नाहीं. ईश्वर जें कांहीं करतो तें सर्व आपल्या बऱ्यासाठीं करतो, या म्हणीप्रमाणें आपली भावना ठेवा. परमेश्वर कोपला नाहीं. कर्में वाईट झालीं असतील, नाहीं असें मी म्हणत नाहीं, परंतु सत्कर्में करून त्यांची शुद्धि करून घ्या. तशी शुद्धि करून घेतां येण्यासारखी आहे, सोन्यांत जर अशुद्धता असेल तर ती अग्नीनेंच काढून टाकली पाहिजे. अग्नींत जळावें लागतें म्हणून जर सोन्याची कांडी कुरकुर करील तर जगाच्या व्यवहाराबद्दल ती अज्ञान प्रकट करतें असें म्हणावें लागेल. 'हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकापि वा' असेंच कालिदासानें म्हटलें आहे. सध्यां संकटाचे दिवस आले आहेत. ज्या वेळेस आम्ही मलमलीचीं वस्त्रें परिधान करीत होतों आणि आमचे राज्यकर्ते कातडीं पांघरीत असत, ज्यावेळेस ग्रीक लोकांचें नांवही ऐकूं येत नव्हतें, खाल्डियाच्या साम्राज्याचा उदयही झाला

नव्हता, आमची एकसारखी भरभराट होत होती आणि जगांत दुसरें कोणतेंही राष्ट्र जन्मास आलें नव्हते, त्या वेळेपासून आमचें राष्ट्र—मोडकीतोडकी कां होईना—पण पूर्वपरंपरा कायम राखून आणि कालास टक्कर देऊन कायम राहिलें आहे.

## राजकारणांतील मोक्षप्राप्ति

रोमन राष्ट्र नामशेष झालें, कार्थेजचें साम्राज्य धुळीस मिळालें, इराणचें साम्राज्य लयाला गेलें, तरी पण आमचा धर्म, आमची परंपरा हीं सर्व कायम आहेत. कांहीं कमी असेल, पण परंपरा अद्याप कायम आहे. हा जो चिवटपणा आमच्यांत आहे तोच आमच्या जिवंतपणाच कारण होय. जिवंत राहण्याची प्रत्यक्ष तुमची जरी इच्छा नसली तरी ईश्वराची तशी इच्छा आहे. इतिहासाची अशी साक्ष असूनही तुम्ही मोहाला फशी पडून ही ईश्वराची देणगी जर गमाविली तर तुमच्यासारखें हतभाग्य तुम्हींच ! म्हणून आपलें ध्येय विसरूं नका. तें भावी उत्कर्षाचें बीज आहे. **हिंदुस्थानची नौका कोणीकडे हाकावी, हें दाखविणारा हा ध्रुवाचा तारा आहे.** तो तारा जर कां सुटला तर कांहींही कामास यावयाचें नाहीं. काशीस जाणें म्हणजे वाटेंत भेटणाऱ्या नर्मदा नदीचें दर्शन करणें नव्हे. काशीची यात्रा करणें म्हणजे गंगेचें दर्शन झाल पाहिजे. याबद्दल कायद्याची भीति बाळगावयाचें कारण नाहीं. राजानें केलेले कायदे आपल्या मनांतील हेतु दाबूं शकत नाहींत. कायद्याचा अंमल शरीरावर चालतो, मनावर चालूं शकत नाहीं. पूर्वी राजाचा अंमल मनावरही चालत असे. ते कोणाही मनुष्याच्या मनांतील पाप काढून टाकण्यास समर्थ असत. हल्लींच्या राजांचा अंमल मनावर चालूं शकत नाही. रघुवंशांत असें वर्णन केलें आहे कीं, एक राजा प्रजेच्या मनांत पाप आल्याबरोबर सिद्ध पुरुषांच्या साहाय्यानें धनुष्यबाण घेऊन तें नाहींसें करीत असे. अशा सिद्ध पुरुषांचें साहाय्य कलियुगांतील राजांना नाहीं. पुष्कळजण राजद्रोहाचे ढोंग करून इतरांस घाबरवीत असतात. राजाचे धर्म व प्रजेचें धर्म परस्परसंबंधीं आहेत; पण हल्लींचे कायदे एकपक्षीय आहेत. **सध्यांच्या पिनलकोडांत प्रजाद्रोहाला शिक्षा सांगितलेली नाहीं,** आणि ती जरी पृथ्वीवरील राजांच्या पिनलकोडांत सांगितलेली नसली तरी सर्व राजांचा राजा जो परमेश्वर त्याच्या कोडांत प्रजाद्रोहाबद्दल शिक्षा सांगितलेली असलीच पाहिजे हा

प्रजाद्रोहाचा गुन्हा राजांकडून घडत असला म्हणजे प्रजेच्या मनोवृत्ति प्रज्वलित होऊन राजे लोक त्यांत पतंगाप्रमाणें नाश पावतात; पण राजे लोक प्रजाद्रोह करीत नसले तर असें होण्याचें कांहीं कारणच रहात नाहीं. अशा रीतीनें राष्ट्राचें अंतिम साध्य कायम झाल्यावर तें मिळविण्याच्या उपायांचा खुलासा केला पाहिजे. पारमार्थिक बाबतींत मोक्ष हा एक अंतिम साध्याचाच प्रकार आहे. स्वातंत्र्या-शिवाय आम्ही मुक्त होणार नाहीं, याचें प्रत्यक्ष उदाहरण श्रीगजाननमहाराजांचें आहे. मोक्षाशिवाय दुसरें कोणतेंहि अंतिम साध्य असूं शकत नाहीं. खायला प्यायला मिळालें, वायकापोरें सुखी असलीं म्हणजे अंतिम साध्य मिळालें, अशी जर कोणाची धर्मसमजूत असेल तर त्यास श्रीगजाननमहाराजांची केव्हांही अनुमति मिळणार नाहीं. धार्मिक बाबतींत मोक्ष जसें अंतिम साध्य, तसें राज-कीय बाबतींत 'स्वातंत्र्य' हें अखेरचें ध्येय होय. हें अंतिम साध्य कोणास प्राप्त होवो वा न होवो, तें अंतिम ध्येय कमी होऊं शकत नाहीं. श्रीगजानन महाराजां-सारख्या एखाद्यासच तें मिळतें, म्हणून तें अंतिम साध्य नव्हे, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. राज्यकर्ते आमचें ऐकत नाहींत. मुलगा वयांत आल्यावर जर बाप त्याला मालमत्तेचा भागीदार करणार नाहीं तर त्यावर फिर्याद करण्याची सोय कायद्यानें करून ठेविली आहे. असें जर नसतें तर बाप मेल्याशिवाय मुलास कांहींही मिळालें नसतें.

आज शंभर वर्षें आमच्यावर इंग्रजांचें राज्य आहे. त्यांच्यामुळें आम-च्यांत विचारक्रांति झाली आहे, या क्रांतीमुळें जें मिळविण्याचें आम्ही योजलें आहे तें 'स्वराज्य' होय. 'स्वराज्य' लांब नाहीं, तें जवळ आहे, त्याची ओळख पटवून घ्या. ती ओळख पटली म्हणजे स्वराज्य मिळवणें व देणें हे शब्दच रहात नाहींत. म्हणून **स्वराज्यप्राप्तीचा पहिला उपाय ओळख पटणें हा होय**. ही ओळख पटण्यास शस्त्रें नकोत, अस्त्रें नकोत. ही ओळख पटण्यासाठीं भगवद्गीतेंत "ज्ञानिनस्तत्वदर्शिनः" म्हणून सांगितलें आहे. राष्ट्रीय बाबतींत हाच न्याय लागू आहे. ज्ञानी असतात तेच तत्वदर्शन करून देत अस-तात. हें ज्ञान मिळविण्यासाठीं राज्यकर्त्यांकडे धांव घेऊं नका; कारण या बाबतींत अधिकाऱ्यांचा स्वार्थ आड येणार आहे. मी नेहेमीं पुराणांतील प्रल्हाद व हिरण्यकश्यपु यांचें उदाहरण देत असतो. हिरण्यकश्यपूनें प्रल्हादास शाळेंत घातलें

खरें पण ईश्वराचें नांव त्याच्या कानांवर पडूं नये, असा कटाक्ष होता. ज्या स्वातंत्र्यासाठीं आमचे प्रयत्न चालू आहेत, त्या स्वातंत्र्याची ओळख काय सरकारी शिक्षण करून देणार ? राष्ट्रीय शिक्षणाची आवश्यकता ही ओळख पटवून देण्याकरितां आहे. सध्याच्या स्थितींत हें ज्ञान पूर्ण स्वतंत्र गुरूकडूनच मिळणें शक्य नाहीं. म्हणून **राष्ट्रीय शिक्षण हें अंतिम साध्याचें पहिलें साधन होय.** ज्ञानासारखें पवित्र या जगांत कांहींही नाहीं, असें भगवद्गीता सांगते. पण जें ज्ञान सध्या आपणांस मिळतें तें अपवित्र ज्ञान आम्हांस काय शिकवितें म्हणाल तर इंग्रजांशिवाय आमचा तरणोपाय नाहीं. पूर्वकाळीं आमचें हस्तकौशल्य कितीही असलें तरी त्याचा यंत्रकौशल्यापुढें टिकाव लागावयाचा नाहीं, म्हणून पक्का माल उत्पन्न करण्याच्या भानगडींत न पडतां तुम्ही कच्चाच माल उत्पन्न करा, असलें शिक्षण सध्या आम्हांस मिळत आहे. आमचे राज्यकर्ते जरी सांगत नसले तरी त्यांचेच जातभाई पाद्री आम्हांस असें सांगतात कीं, 'आमचा ख्रिस्ती धर्म तुमच्या हिंदु धर्मापेक्षां श्रेष्ठ आहे, व आमचा धर्म श्रेष्ठ नसला तरी तुमचा हिंदुधर्म वाईट आहे. जगाची प्रगति आधिदैविक शक्तीनें न होता आधिभौतिक शस्त्रानेंच होत असते,' अशाही प्रकारचें शिक्षण मिळत असते. आधिभौतिक व आधिदैविक यांची अशा प्रकारें फूट पाडून, आधिदैविकाची ओळख विसरून घोटाळ्यांत पाडणारें शिक्षण सध्या आम्हांस मिळत आहे.

## पशूंचें शिक्षण काय कामाचें ?

धर्माचें शिक्षण नाहीं, नीतीचें शिक्षण नाहीं, स्वातंत्र्याचें शिक्षण नाहीं किंवा उच्च मनोवृत्ति उद्दीपित करणारें शिक्षण मिळत नाहीं. पशूंस जसें शिक्षण मिळतें तसें इंग्रजांच्या ताब्याखालीं कसें रहावें एवढ्याचपुरतें शिक्षण आम्हांस मिळत आहे म्हटलें तरी चालेल. या शिक्षणानें पोटास भाकर मिळते, सरकारी नोकरी मिळते, दरबारांत खुर्ची मिळते, किताब मिळतो; हें सर्व जरी खरें असलें तरी राष्ट्राच्या अंतिम ध्येयाशीं तुलना केली असतां या गोष्टी क्षुल्लक आहेत. जें शिक्षण सध्यां आम्हांस मिळत आहे, तें इंग्रजांचें राज्य चिरस्थायी होण्यासाठींच केवळ देण्यांत येत आहे, असें दिसतें. त्यांत आमच्या कल्याणाचा विचार प्रथम होत नाहीं. कित्येकजण राष्ट्रीय शिक्षणाची थट्टा करीत असतात. पण तें वळण आहे, आणि हें वळण जर

राहाणार नाहीं तर मनुष्य व पशू यांच्यांत भेद राहाणार नाहीं. पशूंस शिक्षण नको, त्यांच्यांत जी उपजत बुद्धि Instinct असते तिला अनुसरून त्यांची दिनचर्या असते. पशू आपल्या पुढील पिढीबद्दल काळजी करीत नाहींत. परंतु मनुष्याचा विशेष असा आहे कीं, तो आपला अनुभव पुढील पिढीस देऊन त्या अनुभवाची वाढ करण्यास तिला सांगत असतो. याचेंच नांव 'राष्ट्रीय शिक्षण' हें होय. पुढें पाऊल पडेल असें शिक्षण पाहिजे. आमच्या उन्नतीची ही किल्ली आम्ही सरकारच्या स्वाधीन केली आहे. परकीयांच्या ताब्यांत पाण्याचा सांठा देऊन नंतर त्यासाठीं त्यांच्याजवळ तोंड वेंगाडणें हा शहाणपणा नव्हे. राष्ट्राचें शिक्षण राष्ट्राच्या ताब्यांत न ठेवतां परकीयांच्या ताब्यांत देणें म्हणजे हातांतील गाठोडें जाणून बुजून दवडणें होय. हें शिक्षण आम्हांला द्या म्हणून सरकारजवळ भिक्षांदेही करणें म्हणजे तर मूर्खपणाच होय. राष्ट्रीय शिक्षणासंबंधानें गैरसमज दूर करण्यासाठीं मी हें सांगत आहे. कित्येकजण असें विचारतात कीं, ' तुम्ही राष्ट्रीय भूगोल कसा शिकविणार ? ब्रह्मदेश बंगाल्यांत आहे म्हणून सांगणार ?' यावर माझें असें उत्तर आहे कीं, 'कलकत्ता बंगाल्यांत आहे असें मी सांगणार, पण तें समुद्रकाठीं आपल्या व्यापाराच्या सोईसाठीं इंग्रजांनीं बसविलेलें बंदर आहे असें मी विद्यार्थ्यांना समजावून देईन.' कित्त्यांतील अक्षरें तींच व मायनाही तोच; पण वळण बंडोपंती आहे, कीं दुसरें आहे, हा त्यांत महत्त्वाचा प्रश्न आहे. हाच वळणाचा न्याय राष्ट्रीय शिक्षणांत अंतर्भूत होतो. हल्लींच्या शिक्षणानें राष्ट्रांतील ज्योत जागृत होत नाहीं. ही ज्योत जर प्रज्वलित झाली नाहीं तर शिक्षणाचें कार्य झालें नाहीं असें समजावें.

## स्वराज्याचा श्रीगणेशा

हल्लींचें शिक्षण इंग्रजांच्या फायद्यासाठींच असल्यासारखें आहे. कोणास टोंचून बोलावें म्हणून मी बोलत नाहीं; राष्ट्रीय शिक्षण म्हणजे काय हें ज्यांस समजत नसेल त्यांनीं तें इंग्लंड, जर्मनी किंवा अमेरिका येथें जाऊन पहावें. आम्ही आपलें शिक्षण परकीयांच्या स्वाधीन केलें आहे. राष्ट्रपुरुषाची सर्व तऱ्हेनें उन्नति करणारें आणि राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारें तें राष्ट्रीय शिक्षण होय. हें शिक्षण इंग्रजांच्या ताब्यांत देऊं नका.

कित्येक असे आक्षेप घेत असतात कीं, 'ग्रँट घेतल्यानें काय होतें ? सरकार जो पैसा देते तो तरी आमचाच कीं नाहीं ?' तो पैसा तुमचाच खरा, पण त्यावर तुमचा ताबा नाहीं, हें विसरूं नका. त्या 'ग्रँटवर' बसून अराष्ट्रीयत्वाचें भूत येत असतें. **ग्रँटचें भूत एकदां घरांत शिरलें कीं तें तुमच्या मानगुटीस बसल्याशिवाय रहात नाहीं.** हें मी अनुभवावरून सांगत आहे. कोणाच्या उद्योगाला नांव ठेवावयाचें आहे असें नाहीं. पूर्ण उद्योग झाला नाहीं असें माझें म्हणणें आहे. धर्मशिक्षण नाहीं तर तें मागा, असें कांहीं जण म्हणत असतात. जे देत नाहींत तें मागा म्हणणें ही कांहीं त्याची तोड नव्हे. राजाचा स्वार्थ व प्रजेचा स्वार्थ ही सर्वस्वी एक नाहींत, फार अंशानें भिन्न आहेत. राजा व प्रजा जेथें एक नाहींत तेथें राष्ट्रीय शिक्षण मिळणें शक्य नाहीं. जर्मनींत व इंग्लंडांत दोघेही एक असल्यामुळें हें शिक्षण तेथें देण्यांत येतें. राष्ट्रीय शिक्षणाची सोय करणें म्हणजे स्वराज्याचा 'श्रीगणेशायनमः' करणें होय. राष्ट्रीय शिक्षण स्वदेशी-बहिष्कारापेक्षांही जास्त योग्यतेचें आहे. राष्ट्राचें मन बदलणें, राष्ट्रांतील लोकांत भावना उत्पन्न करणें, हें राष्ट्रीय शिक्षणाचें काम आहे. यासाठीं सरकारच्या कच्छपी लागूं नका. मनुष्यस्वभावाप्रमाणें ते वागत आहेत. "तुम्ही शहाणे झालां म्हणजे आम्ही आपलें चंबुगबाळें आटोपून निजधामास परत जाऊं." हें बोलावयास सोपें आहे; पण करण्यास फार कठिण आहे. इंग्लंडांतून साधू हीं तत्त्वें सांगतात, पण सर्वांस तें शक्य नाहीं. मुलगा व बाप यांचें तंटे तोडण्यास जशीं इंग्रजीं कोर्टें आहेत तशीं राजा व प्रजा यांमधील तंटें तोडणारीं कोर्टें नाहींत. तीं असतीं तर हा समाज आज येथें जमलाच नसता. तथापि दृढनिश्चय धरा. पाहिजे तें मिळवूं हें शिकविणारें राष्ट्रीय शिक्षण होय. आम्ही गरीब आहों, आमच्याजवळ पैसा नाहीं, या अडचणी मी जाणून आहे. पण आमचा प्रयत्न सफळ झाला म्हणजे खाजगी शाळा तोच कित्ता वळवितील व सरकारासही पुढें—मागे तसें करणें भाग पडेल.

## आत्म्याचें जतन करा

**स्वराज्याच्या साधनत्रयीपैकींच स्वदेशी व बहिष्कार हीं दोन साधनें आहेत.** स्वदेशी उद्योगधंद्यांना सरकार उत्तेजन देत नाहीं, हें मनुष्य

स्वभावास अनुसरूनच आहे. तो त्यांचा दोष नसून विक्रम-बत्तिशींतील गोष्टीप्रमाणें ज्या जागेवर ते अधिष्टित झाले आहेत त्या जागेचा हा गुण आहे. लॉर्ड मिंटो म्हणतात कीं, 'मी प्रामाणिक 'स्वदेशी' आहे.' पण प्रत्येकाच्या स्वदेशाची व्याख्या निराळी आहे. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि पंजाबपासून आसामपर्यंत जो प्रदेश पसरलेला आहे तो माझा स्वदेश आणि यूरोपच्या पश्चिमेस एका कोप-त्यांत असलेलें समुद्रवलयांकित बेट हा लॉर्ड मिंटोंचा स्वदेश. लॉर्ड मिंटो स्वदेशी आहेत, मीही स्वदेशी आहे. ते जशी स्वदेशाची काळजी बाळगतात तशीच आपणही बाळगली पाहिजे. इंग्लंडनें तें व्रत स्वीकारलें म्हणून त्यास आजचें वैभव प्राप्त झालें आहे. त्यांचें वैभव कमी होईल असे उद्योग ते आपणांस शिकवीतील हें दुर्घट आहे. **आमच्या हितासाठीं आम्ही उद्योग केला पाहिजे.** आम्ही जर एकादा कारखाना काढून भरभराटीस आणला तर इंग्लंडांतील आपल्या गोऱ्या जातभाई कारागिरांच्या फायद्यासाठीं त्यावर जबर जकात बसवून सरकार त्याचे हातपाय तोडीत असते. लॉर्ड कर्झनसाहेबानें एकदां असें म्हटलें कीं, राजकीय साम्राज्यापेक्षां औद्योगिक साम्राज्य अधिक महत्वाचे आहे. मी म्हणतो कीं, राजकीय स्वातंत्र्यामागूनच भरभराट जात असते. ती गुलामगिरीमागून जाणें अशक्य आहे. तुमचा तुम्हींच विश्वास धरला पाहिजे. आमचे विचार, आमच्या कल्पना, आमचा पोषाख सर्व विलायती झाले आहे. आमचे आत्मेही विलायती झाले आहेत किंवा नाहींत हें सांगतां येत नाहीं! 'वासांसि जीर्णानि यथा विहाय' या गीतावचनाप्रमाणें आमच्या आत्म्यांनीं नवीन वस्त्रें परिधान केलीं आहेत किंवा काय हें सांगणें कठीण आहे. पण आतां तुमचा सर्व मोठेपणा अंतःकरणांतून बाहेर येऊं द्या. उन्नति आत्म्यापासून सुरू होऊन शरीरापर्यंत होत असते. शरीरापासून आत्म्यापर्यंत होत नाहीं. म्हणून आत्मे प्रथम नीट जतन करून ठेवा. महाराज, स्वदेशी हे ढोंग नव्हे. ज्या देशांतील अन्नानें आमचा पिंड बनला व ज्या देशांत आम्ही आज रहात आहो तो देश काय ढोंग आहे! आर्यभूमि वाट पहात आहे. तिला माता पिता म्हणून केव्हां ओळखाल याची ती वाट पहात आहे.

## स्वदेशी–बहिष्काराचें अद्वैत

आर्यभूमीला माता म्हणून ओळखणें, हीच स्वदेशी चळवळ होय. तुम्हीं प्रपंचांत गुरफटला आहांत. बंधूंचें नुकसान होत आहे. पैशाचे नुकसान होत आहे, हें

तुम्हांस कळेनासे झालें आहे. हें तुम्हांस कळणार नाहीं असेंच शिक्षण सध्यां मिळत आहे. स्वदेशीबरोबर बहिष्काराचीही ओळख करून घ्या. **स्वदेशी व बहिष्कार यांत द्वैत नाहीं.** एकाच देहापासून परमेश्वरानें ज्याप्रमाणें स्त्री-पुरुष उत्पन्न केली त्याचप्रमाणें एकाच देहाचे स्वदेशी व बहिष्कार हे दोन प्रकार आहेत. स्वदेशी करा, पण बहिष्कार नको, असें कित्येकांचें म्हणणें आहे. या बहिष्काराची राज्यकर्त्यांस फार भीति वाटत आहे. हा आज विलायती मालावर आहे तोच उद्यां आपल्या राज्यावर पडेल, असें वाटत आहे **हिंदुधर्म द्वेष करावयास शिकवीत नाहीं.** आणि आम्ही तो शिकवीत आहों असा आमच्यावर आरोप आहे! **आम्ही द्वेषामुळें बहिष्कार घालीत नसून स्वदेशाच्या प्रीतीमुळें आम्ही बहिष्कार घालीत आहों.** रागद्वेष व्यवस्थित असावे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. द्वेषाचा अतिरेक होतां कामा नये. कंदिलाच्या उजेडाबरोबर छायाही येतेच. हीच गोष्ट स्वदेशी-बहिष्कारासंबंधानें आहे. बहिष्कार नवीन नाहीं. **जर बहिष्कार नसता तर स्वर्गांत बदमाष लोकांचा भरणा झाला असता; आसुरी मायेनें गुणांस ग्रासून टाकलें असतें.** या बहिष्कारामुळेंच इंग्रज लोक वैभवास चढले असूनही ते आम्हांस बहिष्कारयोग शिकवीत नाहींत. सामान्य लोकांची अशी समजूत असते कीं आपणांस माहीत असलेला योग किंवा मंत्र दुसऱ्यास शिकवूं नये; कारण त्या योगानें आपलें महत्व कमी होईल असें त्यांस वाटत असतें. तुम्ही जर या बहिष्कारयोगाचा त्याग कराल तर घरीं चालत आलेल्या कामधेनूला गमाविल्यासारखें होईल. मी म्हणतों यांत अतिशयोक्ति नाहीं. बहिष्कारास प्रतिबंध करणें अशक्य आहे. बहिष्काराबद्दल तंटा करीत बसणें म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वर तुमच्या घशांत अमृताचा घोंट घालीत असतां तो 'नको' म्हणण्यासारखें आहे. बहिष्काराचा उच्चार करून राजाचा कोप संपादन करण्यांत अर्थ नाहीं, काय करावयाचें तें गुपचीप करावें, असें कित्येकजण म्हणत असतात. पण मी म्हणतो कीं, आम्हांस जें वाटतें तें बोलून दाखविण्यासाठींच ईश्वरानें मनुष्यास वाणी दिली आहे. वाणी पशूस दिलेली नाहीं. **विचार व्यक्त करण्यासाठीं वाणी दिलेली आहे. तिचा उपयोग केला नाहीं तर तो राजद्रोह होत नसला तरी देवद्रोह होतो, हें खास.** इतरांनीं वापरलेलें हें शस्त्र निःशस्त्र लोकांनीं वापरण्यासारखें आहे. आम्हां निःशस्त्र लोकांजवळ या शस्त्राशिवाय दुसरें कोणतें

शस्त्र राहिलें आहे ? आम्ही जर निश्चय केला तर आमच्या मनांवर कोणाचाही हुकूम चालणार नाहीं. आम्ही हें यशस्वी शस्त्र टाकून कां देणार ? तर साहेबाजवळ बोलण्याचें धैर्य नाहीं म्हणून ! परमेश्वरानें निःशस्त्रांसही शस्त्रें दिलीं आहेत. बहिष्कार हें असें शस्त्र आहे कीं, त्यायोगानें निःशस्त्र असलेल्यांचे सर्व हेतु पूर्ण होतात. त्याचा उच्चार करायला—तें वापरायला भिऊं नका. पुरुषाचे जे प्रकार आहेत त्यांपैकीं कित्येकांच्या मनांत विचारच येत नाहींत, कित्येकांच्या मनांत विपरीत विचार येतात, कित्येक विचार बोलून दाखवीत नाहींत, कित्येकांचे विचार एक आणि बोलणें दुसरें असें असतें. तर 'मनसि वचसि काये' जे एकच असतात, ते श्रेष्ठ, कां इतर पुरुष श्रेष्ठ ? बहिष्कार हें सामान्य शस्त्र नाहीं. त्याचा उपयोग कसा करावा हें आपणांस शिकावयाचें आहे. स्वदेशींतच त्याचा उगम होऊन त्यामुळें परकीय तें आपोआप बाहेर पडतें. राष्ट्रीय शिक्षणांतच स्वदेशी-बहिष्काराचा अंतर्भाव होतो. तिन्हीही आचरणीय असून स्वातंत्र्यपोषक आहेत. हे उपाय सर्वांस कळावे हा या नवीन चळवळीचा हेतु आहे त्यांचें निदर्शन केलें आहे. हा विषय फार व्यापक आहे—एका विषयावर दहा व्याख्यानें दिलीं तरी पुरे होणार नाहींत. राष्ट्रांत ही जी नवीन ज्योत उत्पन्न झाली आहे तीवर फुंक घालूं नका.

## नवीन पिढीची जबाबदारी

हे नवीन चळवळीचे हेतु कोणाकडून साध्य करावयाचे याचा आतां विचार करूं. **ही चळवळ यशस्वी करण्याची जबाबदारी सर्वस्वीं नवीन पिढीवर आहे.** मी जुन्यांना नांवें ठेवीत नाहीं. मीही त्याच कोटींतील आहे. अनेक वर्षांच्या संस्कारानें जुन्यांची बुद्धि नवीन कल्पना ग्रहण करूं शकत नाहीं. तिच्यांत नवीन जोम उत्पन्न करणें दुघट आहे. पण जुन्यांनींही आतां ताणून घेऊं नये अशी माझी त्यांना विनंति आहे. नवीन पिढीला पुढें जाऊं द्या. जे परिणाम होतील ते ते भोगतील. आमच्या अनुभवाचा फायदा त्यांना मिळालेला आहे. आमच्या खांद्यावर ते उभे असल्यामुळें त्यांच्या दृष्टीचें क्षेत्र विस्तृत झालें आहे. आमचें उदाहरण व त्यापासून मिळालेलें ज्ञान हें नवीन पिढीच्या अस्वस्थतेचें खरें कारण आहे. मीही जुनाच आहे. हें मीं पूर्वींच सांगितलें आहे. तरुण पिढीस माझें असें

सांगणें आहे कीं, तुम्ही नवीन मार्ग काढा. आम्हांस जे मिळालें नाहीं तें तुम्ही मिळवा; तें तुम्ही मिळवावें अशी परमेश्वराची इच्छा आहे. वृद्धांस माझी अशी प्रार्थना आहे कीं तरुण पिढीचे हातपाय तुम्ही बांधू नका. मुलांच्या हांतून दोष होत असतील तर त्यांस क्षमा करा; त्यांच्या आड येऊं नका. ते जें कार्य करीत आहेत तें तुमचेंही नाहीं व त्यांचेही नाहीं, तर राष्ट्राचें आहे. तुमच्या अनुभवाचा त्यांस फायदा करून द्या. खेदाची गोष्ट आहे कीं, आम्ही त्यास कांहीं शिकविलें नाहीं, आतां त्यांस खोटा भंरवसा तरी देऊं नका. पन्नास नाहीं जास्त वर्षें झालीं, आम्ही उद्योग केला. आम्हांस स्वराज्य नको होते असें नाहीं पण आम्ही फसलों. हा अनुभव नव्या पिढीनें घ्यावा. दोष आमच्या—जुन्या पिढीच्या—माथीं मारूं नका. आम्ही उद्योग केला. ही परंपरा तुम्ही पुढें चालू ठेवा. **अंतिम हेतु पुढें ठेऊन राष्ट्राचें जहाज मार्गावर आणून सोडणें हें तरुण पिढीचें काम आहे.** आमच्या हातून चुका झाल्या आणि आतां आम्ही बहिष्काराच्या गप्पा मारीत आहों, असें तुम्ही आम्हाला म्हणाल, पण तेव्हांच्या स्थितींत जें करावयास पाहिजे होतें तें केलें; आतां ती परिस्थिति बदलवून टाकून तुम्ही काय पाहिजे ते मिळवा. व्यवस्था ठेवण्याचें पोलिसचें काम आमचे स्वयंसेवक करूं लागले. येथपर्यंत मजल आली आहे. प्रयत्न चांगला चालला आहे. स्वराज्य, स्वराज्य म्हणजे काय ? तर सरकार जें हल्लीं करीत आहे तें आम्ही करावयाचें. या ओघास अडवूं नका. वृद्धांना अवज्ञा वाटत असेल, तरुण पिढीकडून दोषही होत असतील, पण **कोणत्याही कार्याचा आरंभ हा दोषांनीं आवृत्त असावयाचाच.**

## स्वातंत्र्य-गंगेंत स्नान

सध्यांचें धोरण ओळखून आणि उगवणाऱ्या स्वातंत्र्यसूर्याकडे दृष्टि देऊन वृद्धतरुणांनीं कामगिरी बजाविली पाहिजे. हा दोघांच्या मिलाफाचा प्रश्न आहे. **प्रसंग आणीबाणीचा प्राप्त झाला असतां पानपतच्या रण-क्षेत्रांतील दुहीप्रमाणें जहाल व मवाळ असे दोन भेद होऊन दुही माजावी हें राष्ट्राचें दुर्दैव होय !** संकटाखेरीज यश मिळत नाहीं. ‘ न संशय-मनारुह्य नरो भद्राणि पश्यति ’ हें ध्यानांत ठेवा. मोहोर साध्य कीं फल साध्य,

असला तंटा करूं नका. नवीन पिढीची भावना फळ मिळेल अशी आहे. ही भावना देशाचा उत्कर्ष करणारी आहे. ती परमेश्वरानें उत्पन्न केली आहे; तिला खच्ची करण्याचा प्रयत्न करूं नका. नवीन पिढीनें पुढें जावें अशी तिची इच्छा आहे. असें असतांना गाड्याचा एक बैल चिखलांत रुतला तर तें दुर्दैव नाहीं तर काय ? नवीन पिढीचा निर्धार झालेला आहे. स्वातंत्र्यगंगेचें पाणी खेळत असलेलें त्यांना दिसत आहे. रस्ता बिकट असला तरी तो सर्वांनीं गिरवलेला आहे. आमच्या राज्यकर्त्यांनीं गिरवलेला आहे. याच रस्त्यानें आमचे पूर्वजच नव्हे तर सर्व गेलेले आहेत. रस्त्यावर विघ्नें आहेत; पण उमेद अशी आहे कीं, वाटेंत देह पडला तरी शेवटील वासना त्या स्वातंत्र्यगंगेंत जाऊन स्नान करीलच करील. अशा वासनांनीं प्रेरित होऊन राष्ट्र निघालें आहे. सत्पुरुषांचें साहाय्य मिळेल असा भरंवसा आहे. आम्ही उपोषित आहों आणि या उपोषणाची पारणा गंगेंत स्नान करून सोडूं, असा आमचा निर्धार आहे. मेहेरबानी करून याला आड येऊं नका. तरुणांनींही वृद्धांची अवहेलना करूं नये. सन्मार्ग धरा. वाडवडील तुम्हांस विसरतील, पण परमेश्वर विसरणार नाहीं. सर्वजण स्नानास निघालें आहेत. बंगाल निघालें आहे, पंजाब निघालें आहे, आणि मद्रास निघालें आहे. महाराष्ट्र आपला पूर्वइतिहास विसरेल काय ? स्वातंत्र्यरूपी परमेश्वराच्या मंदिराचें शिखर आम्हांस दिसत आहे. चुकणारांची अनुकंपा करा. कोणाची निंदा करण्यासाठीं हा उद्योग सुरू केलेला नाहीं; परमेश्वराच्या प्रेरणेनें ही यात्रा निघालेली आहे. **ज्यांना आमच्याबरोबर यावयाचें असेल त्यांची गाडींत सोय होईल. ज्यांना यावयाचें नाहीं त्यांनीं आमचा मार्ग रोधूं नये.** हें आमचें कार्य तडीला जाईल अशी खात्री आहे. **जसा भाव असेल तसें सत्पुरुषांच्या व परमेश्वराच्या कृपेने हें कार्य तडीस जाईल.**

# आमच्या गरजा

मंगळवार ता. ५ मे १९०८ रोजीं सायंकाळीं, खामगांव ( वऱ्हाड ) येथें रा. श्रीराम शालिग्राम यांच्या बंगल्याच्या पटांगणांत लो. टिळक यांचें व्याख्यान झालें, तें येणेंप्रमाणें:—

आपण जो सत्कार केला त्याबद्दल मी आपला फार आभारी आहे. तुम्ही जो सत्कार केला तो व्यक्तीचा नव्हे तर तत्त्वाचा होय, असें मी समजतों. हल्लीं राष्ट्रामध्यें जी चळवळ आहे व जिच्या योगानें सर्व राष्ट्र जागृत झालें आहे तिच्यासंबंधानें मी आतां निरूपण करणार आहें. माझा व्यासंग राजकीय विषयाचा आहे, आणि मी जें सांगणार आहे ते देशस्थितीसंबंधानेंच सांगणार आहे. प्रस्तुतचा आपला धर्म, आचार व गृहस्थिति बरी किंवा वाईट याचा खल आपसांत करावयाचा असतो. पण, यामध्यें जी एक प्रकारची उलटापालट झालेली असेल ती उलटापालट व तो फेरफार बरा किंवा वाईट याचा विचार करण्यापेक्षां आपणावर आलेल्या राजकीय परिस्थितीचा विचार अधिक करणें अधिक बरें होईल असे वाटतें. वैद्यशास्त्राच्या नियमाप्रमाणें रोग्याच्या दुर्धर रोगाकडे प्रथम व विशेष लक्ष दिलें पाहिजे. या दुर्धर रोगाची उपेक्षा करून फायदा नाहीं. हा देशाचा दुर्धर रोग म्हणजे देशाच्या गरजा होत. हा दुर्धर रोग कोणत्याही राष्ट्राला रसातळाला नेईल, हा राष्ट्रांत कसा व केव्हां शिरला, व तो हटविण्याकरितां कोणत्या मात्रांचा उपयोग करण्यांत आला, तो कमी होण्याच्या पायरीला लागला आहे कीं नाहीं, हें जाणणें आपलें कर्तव्य आहे. कोणती मात्रा अधिक लागू पडेल ? या वैद्यांच्या तंट्यांत देशाचें नुकसान होणार आहे; तेव्हां **या गोष्टीचा विचार लवकर झाला पाहिजे**. विचार लवकर न झाल्यास रोगी मरेल. यासाठी ज्याला ज्याला विचार करितां येतो— व प्रत्येकाला तो आला पाहिजे—त्यानें त्यानें कोणता इलाज चांगला व कोणती मात्रा हितावह हें समजून घेऊन पुढचा मार्ग आक्रमिला पाहिजे.

इंग्रजांच्या राज्याची आमच्या देशांत स्थापना होऊन शंभर वर्षे झालीं आहेत. इतक्या मुदतींत इंग्रजी राज्याबद्दल लोकांचे समज पालटत चालले

आहेत. आमची पहिल्यापासून अशी समजूत आहे कीं, राजा हा देवाचा अंश आहे व प्रजेचें हित करणें त्याचें काम आहे. त्याचप्रमाणें प्रजेला पोटभर अन्न मिळतें कीं नाहीं, प्रजेचा व्यापार भरभराटींत चालतो कीं नाहीं, शूद्रांना शेतकीचीं साधनें मिळतात किंवा नाहीं, किंबहुना पाऊस पडतो किंवा नाहीं, याची जबाबदारी राजावर आहे. रामायणांत सांगितलें आहे कीं, एका ब्राह्मणाचा मुलगा अकालीं मेला, तेव्हां रामचंद्राकडे जाऊन तो म्हणाला कीं, 'रामा! तुझ्या पापामुळें माझा मुलगा मेला.' नंतर रामचंद्र धनुष्य घेऊन पापाचा शोध करण्याकरितां स्वतः गेले व एक शूद्र तपश्चर्या करीत आहे असे त्यांस दिसलें. त्याला शासन केल्यावर मेलेला मुलगा जिवंत झाला. यावरून आमच्या इकडील मताप्रमाणें राजावर जबाबदारी किती असते याचा खुलासा होईल. दुष्टांस शासन करणें राजाचें काम आहे. प्रजेच्या प्राप्तीपैकीं षष्ठांश राजास मिळतो तो काय त्याचें कर्ज म्हणून? त्यानें प्रजेचा बंदोबस्त करावा म्हणून. राजा ईश्वराचा अंश आहे; पण राजा जेव्हां धर्म सोडतो तेव्हां त्यामधील ईश्वरांश दुसऱ्याचे अंगांत संचार करितो व दुसरा एक ईश्वराचा अंश उत्पन्न होऊन गादीवर चढतो. राजा ईश्वराचा अंश खरा, पण तो जोंपर्यंत धर्म पाळीत आहे तोंपर्यंत. राजाचा धर्म म्हणजे प्रजेचें पुत्राप्रमाणें रक्षण करणें हा होय. अलीकडे पाऊस वेळेवर पडत नाहीं, तर राजानें काय करावें? असा त्यांचेकडून आक्षेप येतो. प्रजेचे असें उत्तर आहे कीं, वर्षास कांहीं तरी पाऊस पडतो व तें पाणी तलाव वगैरे बांधून सांठवून ठेवणें राजाचें कर्तव्य आहे. पूर्वींचे राजे आपले पैसे तलाव वगैरे बांधून स्वदेशांत खर्च करीत असत, पूर्वींच्या राजांनीं बांधलेल्या तळ्यांचें पाणी शेतकऱ्यांना फुकट मिळत असे. हल्लीं करांतून शिल्लक राहिलेल्या पैशांतून तलाव बांधून पुनः त्यावर कराची आकारणी घेणें म्हणजे 'चक्रवाढ' नाहीं काय? कांहीं ठिकाणीं कराच्या उत्पन्नांपैकीं पैसेच शिल्लक रहात नाहींत.

## कलियुगापेक्षांही वाईट युग

दुष्काळाकरितां दीड कोटि रुपये वसूल होणारा इनकम्-टॅक्स आम्हांवर बसविला आहे. हा कर बसविण्यासंबंधानें सरकारनें असें सांगितलें होतें कीं, हे कराचे रुपये बाजूस ठेवून दुष्काळाचे वेळीं त्यांचा उपयोग करूं. परंतु द्रव्याचा लोभ

फार कठिण आहे! सरकार हें एक सावकारच आहे. पण यांच्या व इतर सावकारीमध्यें फार दांडगें अंतर आहे. आपण जर एखादा पैसा गोरक्षणास म्हणून दिला तर आपण त्याचा हिशेब मागण्यास तयार होतो. पण सरकाराजवळ हिशेब मागण्यास अधिकार नाहीं! अजून खर्च बरोबर नाहीं हें सांगण्याची मोकळीक आहे; पण तो खर्च करण्याचा किंवा तो खर्च कसा करावा हें ठरविण्याचा अधिकार आपल्यास नाहीं. सरकार हें 'ट्रस्ट' आहे आणि तें कराच्या रूपानें कित्येक कोट रुपये जमा करून विलायतेस नेत आहे; पण त्याचा हिशेब मागण्याचा आम्हांस अधिकार नाहीं. नुसता राजा काहीं सव्वाशें कोट रुपये खात नाहीं. तो आपल्याइतकेंच अन्न खाणार व कपडेहि पण तितकेंच—थोडे अधिक—घालणार. त्याला इतके कोट रुपये नेऊन काय करावयाचे आहे? पण सर्व अधिकारी परकीय आहेत. त्यांच्या पोटाकडे पाहणें त्याला भाग पडतें. ते आमचा पैसा खातात तरी खर्चाचे बाबतींत आमचा विचार बिलकूल घेत नाहींत; इतकेंच नाहीं तर ते आमचा पदोपदीं अपमान करतात. पेशवेशाही, भोसलेशाही बुडून आगगाड्या, तारायंत्रें, पोस्ट-ऑफिसें इत्यादि गोष्टी जेव्हां सुरूं झाल्या, तेव्हां लोकांना सत्ययुग आलें असें वाटलें. पण ही समजूत फार दिवस टिकली नाहीं. पुढें असें अनुभवास आलें कीं, सत्ययुगापेक्षां वाईट, किंबहुना कलियुगापेक्षांही वाईट युग या खालीं दडून राहिलें आहे. अधिकारी वर्गाचें जाळें हळू हळू वाढत चाललें असून हल्लीं पहिल्या प्रतीची दक्षणा गोऱ्यालाच मिळत असते.

ही गोष्ट अधिकाराची झाली. व्यापाराकडे दृष्टी फेकली तर त्याचीही तीच गत झाली आहे. ज्या वेळेस आपला देश भरभराटीच्या शिखरास पोंचला होता, त्या वेळीं परदेशांत जाऊन व्यापाराचें साहस आमच्या हातून घडलें नाहीं, कारण हें कीं, त्या वेळेस कोणत्याही प्रकारें तसें करण्याची आपल्यास जरूर नव्हती. आपला व्यापार आपल्या ताब्यांत होता. आपल्या वस्तु दुसऱ्या देशांत जात असत व त्यामुळें तिकडील संपत्ति आपणाकडे येत असे. आतां तसें नाहीं. आपलें सरकार व्यापारी आहे. हिंदुस्थानचा सर्व व्यापार त्यांनीं आपल्या हातीं घेतला. ज्या इंग्लंडांत कापसाचें एक बोंड देखील पिकत नाहीं त्या देशांतून २५ कोट रुपये किंमतीचा माल हिंदुस्थानांत येतो. सरकार गिरण्या काढा म्हणून

म्हणतें, पण उद्योगधंदे शिकविणें हें काम सरकारचें कीं प्रजेचें ? पण हे राजे कर घेऊन कर्तव्य करण्यास चुकले म्हणण्यापेक्षां आपणच चुकलों, असें म्हटलें पाहिजे. हल्लीं करतात तसें जर त्यांनीं केलें नाहीं तर तिकडील लोहार, सुतार, तेली वगैरेंचे पोट भरावें कसें ? थोडक्यांत दृष्टांत असा आहे कीं, एका आईस एक सख्खा आणि सावत्र मुलगा आहे, आई आपला ओढा नेहमीं सख्या मुलाकडे ठेवते व सावत्र मुलाला कांहीं दिलें पाहिजे म्हणून हलक्या जिनसा देते, हीच गत आपल्या राष्ट्राची झाली आहे. हिंदुस्थानचे व इंग्लंडचे राजे एकच आहेत. पण विलायतच्या गिरणीवाल्यांनीं जर कापड खपत नाहीं म्हणून ओरड केली तर लगेच आमच्या गिरणीवाल्यांवर कर बसतो ! हिंदुस्थानचे उद्योगधंदे वाढवा, असें लिहिलें तर फक्त ते कागद नुसते दाखल होतात. अशा रीतीनें पार्लमेंट आपल्यावर राज्य करीत आहे.

## देश भिकेस लागेल !

राजानें प्रजेचें सुख प्रथम पाहिलें पाहिजे, आपलें राज्य चिरस्थायी कसें राहील याचा पहिल्यांदा विचार केला पाहिजे पण सध्यांची राज्यपद्धति उलट आहे, असें दिसून येतें. त्यांचें पहिलें पाहणें असें असतें कीं, आपले गोरे लोक इकडे कसे पोट भरतील ? आमच्या लोकांना लष्करांत मोठ्या जागा कधीं मिळत नाहींत; जसें कांहीं आम्ही कधी हातीं शस्त्रच धरलेलें नाहीं ! लष्करावर फाजील खर्च होतो. इंग्रज सरकार व्यापारी आहे; तेव्हां त्यास आम्ही असें विचारतो कीं, २०० रुपयांचें उत्पन्न असलें तर ५०० रुपयांचें पुरभय्ये रखवाली करण्याकरितां नोकर म्हणून ठेवाल काय ? आम्हाला कांही काम सांगितले तर आम्ही करणार नाही काय ? पण **आमचें म्हणणें न ऐकतां मर्जी वाटेल त्याप्रमाणें आपल्या हातांत अधिकार राखून जर प्रजा संतुष्ट राहिली तर त्यांना तें पाहिजे आहे.** मि. मोर्ले म्हणतात कीं, अधिकारीवर्गाची सत्ता कमी करणार नाहीं ! अधिकाऱ्याच्या स्वातंत्र्यास आळा न घालतां जर प्रजेचें समाधान होईल तर मि. मोर्ले यांना तें पाहिजे आहे. आपले ४० कोट रुपये बिनमोबदला जातात ही गोष्ट ज्यांना कळली, त्यांत दे. दादाभाई नौरोजी अग्रगण्य होत. त्यांनीं होतें असे सिद्ध केल्याप्रमाणें होत राहिल्यानें आमचा देश

भिकेला लागणार नाहीं काय ? कुबेराचीही संपत्ति नाहींशी होऊन तो अशानें भिकारी होईल. इकडील प्रजेच्या कल्याणाकडे दृष्टि देण्यापूर्वी आपल्याकडील लोक संपन्न झाले पाहिजेत, असें ज्या राष्ट्राचें मत आहे तें राष्ट्र कितीही बलाढ्य व सुधारलेलें असलें तरी केव्हांना केव्हां या राज्यपद्धतींत सुधारणा झाली नाहीं तर तें सुखानें टिकणें कठिण होणार आहे. हा आमच्या पुरागांतील सिद्धांत आहे.

**आपले पैसे कोणी खर्च करावयाचे हें ठरविण्याचें काम आपल्याच हातीं ठेवणें ही पहिली सुधारणा होय.** या कामासाठीं लोक निवडून नेमा किंवा कसेही नेमा, अधिकार आमच्या हातीं पाहिजे. नाहीं तर आमच्या दरिद्री देशाची सुधारणा कधींही होणार नाहीं. या असल्या गोष्टी आम्ही हजारों वेळां कळविल्या आहेत. खुद्द राणी सरकारनें सांगितलें आहे कीं, प्रजेची आबा-दानी हें राष्ट्राचें बळ आहे. पण आपला अधिकार कमी करावयाचा नाहीं असें अधिकारी वर्गाचें सध्यांचें धोरण आहे. तुम्ही पाहिजे तितक्या पदव्या मागा. देऊं. पण बंदुका ठेवण्याची 'लायसेन्सें' मात्र मिळणार नाहींत ! मुंबई इलाख्यांत २५००० हजार गांवें आहेत पण बंदुक ठेवण्याचे परवाने मात्र ५००० लोकांनाच आहेत. इतकी बंदी कशाकरिता ? तर तुम्ही लोक बंड कराल म्हणून. विलायतेंत याच्या अगदी उलट गोष्ट आहे. **याहीपेक्षा भयंकर अशी गोष्ट म्हणजे दारूची होय.** लोकांनी दारू घ्यावी व आमचा खजिना भरून द्यावा, असें सरकारचें धोरण दिसतें. हिंदु राज्य होतें तेव्हां या गोष्टींचा बिलकूल प्रसार नव्हता, इतकेंच नाहीं तर करांच्या वसुलीचें मान पाहिलें तरी तें १०० पटीनें वाढलें आहे. म्हणजे ज्या महाराष्ट्रांत पूर्वी १० लक्ष रुपये दारूच्या कराचें उत्पन्न होतें तेथें आतां तें १० कोटींपर्यंत गेलें आहे. ही दारू-बद्दल गोष्ट झाली. उद्योगधंद्यांची तीच स्थिति झाली आहे. या सर्व गोष्टींची विलायतेंत जाऊन बोंबही केली, पण सर्व व्यर्थ. अशा वेळीं काय करावयाचें हा प्रश्न आहे. या परिस्थितींतून सुटका होण्यास मार्ग आहे किंवा नाहीं हेंही समजलें पाहिजे. आपल्या उणीवा काय आहेत त्या सर्व समजल्या आहेत व त्या कांहीं खोट्या आहेत असें अधिकाऱ्यांनी ठरविलेंही नाहीं; पण **राज्यकर्त्यांचा लोभ आमच्या मार्गांत आड येतो.** आतां अशी स्थिति झाली आहे कीं, राजकर्त्यांचा राज्यलोभ एका बाजूस आहे व प्रजेची अधिकाधिक

स्वतंत्र होत जाण्याची इच्छा एका बाजूस आहे. मि. मोर्ले हे जेव्हां सेक्रेटरी झाले तेव्हां सर्व लोकांना अशी आशा होती कीं, मोर्ले साहेब उदारमतवादी, पंडित आहेत; ते अधिकारावर आले म्हणजे आपल्यास सर्व अधिकार देतील, पण आपल्यांत म्हण आहे त्याप्रमाणें झालें, कीं "वेदांती राजा दुसऱ्या राजापेक्षां वाईट. आपलें गांठोडें वेदांत्याच्या हवाली करण्यापेक्षां चोरांच्या हवाली करणें चांगलें."

आपल्यांत दोन पक्ष झाले आहेत. एकाचें म्हणणें आपणांस केव्हां तरी मोक्ष मिळेलच. उगीच डोकें उठवूं नका. या योगानें संकटें मात्र येतील. अर्ज करणें हाच काय तो सनदशीर मार्ग आहे. याच्या पलीकडे गेला तर संकटें येतील व त्यांत चेंगरून जाल. अर्ज विनंत्या कराव्या, त्यांनीं ऐकलें तर बरें; नाहीं तर स्वस्थ बसावें—आज नाहीं उद्यां त्यांना आपली कींव येईलच येईल. दुसऱ्या पक्षाचें म्हणणें असें आहे कीं ३० कोटि लोक कांहीं पशू नाहींत. ती माणसेंच आहेत. जर माणसाला परमेश्वर होतां येतें तर व्हाईसरॉय होतां येणार नाहीं काय? "नर करणी करे तो नरका नारायण हो जाय" मग नर करणी करील तर त्याचा व्हाईसरॉय किंवा राज्याचा सत्ताधारी होणार नाहीं काय? लोकांच्या तेजावर ज्याचा विश्वास आहे असा दुसरा पक्ष आहे. आगगाड्या चालविल्या कोणी तर आम्ही. सरकार ज्या गोष्टी करिते त्या गोष्टी आपणांस करतां येणार नाहींत काय? आम्हीच हें गाडें चालविलें आहे, पण तें दुसऱ्याच्या हिताकरितां चालविलें आहे. तें आमच्याकरितां आम्हांस चालवितां येणार नाहीं काय? आमचे पोलीस लोक जर बंदोबस्त ठेवतात तर आमचे स्वयंसेवक बंदोबस्त ठेऊं शकणार नाहींत काय? आमचेच लोक सध्यां सरकाराकरितां न्याय देतात तर पंचायतीचा प्रकार त्यांना शक्य नाहीं काय? आणि म्हणूनच मी म्हणतो कीं, **आपल्या गोष्टी आपणच करावयाला लागणें यापेक्षां स्वराज्य तें दुसरें कोणतें?** कांहीं लोक म्हणतात, इतकी मोठी मागणी मागूं नका, व कांहीं म्हणतात कमी मागणें हा आपला भित्रेपणा आहे. सगळें म्हणणें सावकाराच्या घरीं गेलेल्या भिक्षुकाप्रमाणें होय. एक भिक्षुक म्हणाला, आतां एवढ्या मोठ्या सावकाराजवळ जावयाचें तेव्हां तूं किती मागणार? एक लाख कीं दोन लाख? दुसऱ्याचें मत भिन्न

पडलें व ह्यांतच ते भांडत बसले, आणि त्यापासून अखेर कांहींच निष्पन्न झालें नाहीं. या प्रकारचाच विरोध दोन पक्षांमध्यें सध्यां माजला आहे. दोन काळ्या एकदम मोडतां येत नाहींत म्हणून सरकारनेंच हा पक्ष उत्पन्न केला किंवा काय, हें समजत नाहीं. मवाळांना 'आमचेकडे या' असे सरकार म्हणतें. यांत एक युक्ति आहे. आधी सरकार जहाल लोकांना तुडवील व मग मवाळांना तुडवील. ही युक्ति सिद्धीस जाऊं नये ह्याकरितां आपण खटपट केली पाहिजे.

## हरिण व घोडा

ही युक्ति अधिकारी वर्गानें हरीण व घोडा यांच्या गोष्टींतील युक्तीसारखी केली आहे, असें दिसून येईल. पहिल्यांदा हरीण पळत होतें तें घोड्यास दाखवून त्याची वाहावा करून 'हरीण तुझ्यापुढे जात आहे तर तूं एवढा चलाख असून त्यांनीं तुझ्यापुढें जावें हें तुला पाहवतें तरी कसें ?' असे घोड्यास म्हणून तो जीन ठेऊं देत नव्हता तरी त्याच्या पाठीवर खोगीर घातलें आणि मग शर्यतींत हरणाला हरवून घोडा पुढें आला. मग घोडा म्हणतो, 'आतां खोगीर काढा.' तेव्हां स्वार त्याला म्हणाला 'तुझ्यावर मी जे जीन घातलें तें कांहीं काढण्याकरितां नाहीं !' याप्रमाणें सरकारी अधिकारी आपली गत करीत आहेत व करणार आहेत असें स्पष्ट दिसतें. सरकार नेहमी आपला फायदा पाहतें. आपल्या कार्यसिद्धीकरितां दरबारी भाषा पाहिजे तर वापरावी. जर नुसते मागून त्यांनीं आपल्याला हक्क दिले तर तें बरें. ते तसे मिळालेले हक्कही आम्हांस नकोत असें नाहीं. पण, नाहीं तर अडवणुकीचा मार्ग लोकांनीं स्वीकारला पाहिजे. त्यांनीं थोडें हक्क दिलें तरी आम्हीं घेणार नाहीं असें नाहीं; पण पूर्ण हक्क—मग ते आपल्या अडवणुकीनें मिळोत किंवा सरकार ओळखून देवो—मिळविण्याचा आमचा कृतसंकल्प आहे. आम्ही तीस कोट लोक ईश्वराचे अंश आहोंत. राजा जर पाप करण्यास उद्युक्त झाला तर त्याच्या आड येणें आपलें कर्तव्य आहे. बाप जर मुलाचें अनहित करूं लागला तर मुलानें बापाचा हात धरणें हें शास्त्राच्या आड येईल काय ! राजानें आपलें कर्तव्य केलें नाहीं म्हणजे त्यानें प्रजेचा द्रोह केला असें होतें. हा जरी राज्यकर्त्यांच्या कायद्यांत गुन्हा नाहीं तरी प्रजाद्रोह हा ईश्वराचे येथें गुन्हाच आहे. स्वराज्याचे हक्क मागण्यास तयार व्हा. हा आपला ईश्वरदत्त हक्क आहे.

उद्योग पुष्कळ दिशेचे आहेत; मात्र त्यांसाठीं त्रास सोसावयाला आपण तयार झालें पाहिजे. रोग्यांनीं कडू औषध घेतलेंच पाहिजे, त्याप्रमाणें हे आहे.

## राष्ट्रीय शिक्षण हें पहिलें काम

**आपणास जें पहिलें काम करावयाचें तें राष्ट्रीय शिक्षणाचें होय.** ज्ञान झाल्याखेरीज कोणतीही गोष्ट होणार नाहीं. आपल्या डोक्यांत भलभलत्या गोष्टी भरल्या आहेत आणि आपलें डोकें ताळ्यावर आणण्यास राष्ट्रीय शिक्षणच उपयोगी पडणार आहे. सर्व शाळा सरकारच्या ताब्यांत आहेत तेव्हां तें आपल्या स्वतःस हितकर अशाच प्रकारचें शिक्षण देणार, हें उघड आहे. आपल्या हातानें कोणीही आपला पाय तोडून घेत नाहीं. सरकारच आपलें सर्व प्रकारें कल्याण करील, ही बुद्धि पालटेल असें शिक्षण देणें हें आपलें काम आहे. त्याप्रमाणें लहान मुलाला आपण देवाची किंवा धर्माची ओळख करून देतों त्याप्रमाणें राष्ट्राला राष्ट्रीयत्वाचें शिक्षण दिलें पाहिजे. सरकारच्या हातांत मुलें दिलीं म्हणजे तीं तेजस्वी निघण्याच्या ऐवजीं दुबळीं होतात. तेव्हां राष्ट्रीय शिक्षण द्यावयाचें तें एवढ्याचकरितां कीं, त्यांच्या मनांत राष्ट्राशिवाय प्रथम दुसरी कोणतीही गोष्ट येऊं नये. जर सरकार शिक्षण देत नाहीं, किंवा जर परदेशी माल आपल्याकडे येणे बंद करीत नाहीं, तर आपणच त्या गोष्टी केल्या पाहिजेत. हल्लीं काय झालें आहे कीं, आपण मँचेस्टरचे गुलाम बनलों आहों. साखरेच्या व कापडाच्या रूपानें ३०–३५ कोट रुपये विलायतेंत जातात. आणि जर तितकेंच पैसे आपण वाचवूं व जर त्यांचा व्यापार आपण बंद केला तर ते आपलें म्हणणें कबूल करतील, कबूल करणें त्यांना भाग होईल. आणि **अशा रीतीचा चटका जसा चरचरीत बसेल तसा चटका दुसऱ्या कोणत्याही गोष्टीनें बसणार नाहीं.** या गोष्टी राज्यकर्त्यांकडे केवळ अर्ज करून मिळावयाच्या नाहींत. म्हणून ह्या गोष्टीविषयींचा अर्ज मी आपणाकडेच करणार आहे. स्वदेशीबरोबर बहिष्काराची कुस्ती लागली आहे. बहिष्कार या शब्दानें कित्येकांचें डोकें दुखूं लागतें. साहेब म्हणतात कीं, आम्हाला काय घालवून देतां ? आमचा काय द्वेष करतां ? याला उत्तर देतां येत नाहीं. आई जेऊं घालत नाहीं व बाप भिक्षा मागूं देत नाहीं, अशी आमची स्थिति झाली आहे ! आपण कांहीं देत आहां कां ? आणि जर आपण कांहीं देत नाहीं तर आमच्या हिताकरितां आम्ही यत्न करूं

नये काय ? असें आमचें राज्यकर्त्यांस म्हणणें आहे. हल्लींची स्थिति आम्हांस दुःसह झाली आहे. इसापनीतींतील परटाच्या गाढवाप्रमाणें राहण्याची आमची इच्छा नाहीं. आपल्या बायकोवर प्रीति केली म्हणजे दुसऱ्या बायकांचा द्वेष केल्यासारखें होईल काय ! या प्रश्नाला जें उत्तर द्याल तेंच आपण बहिष्कार घालण्यासंबंधानें दिले पाहिजे. हा **पोटा-पाण्याचा प्रश्न आहे.** आमच्या देश-बांधवांचीं पोटें भरतील असें आम्ही करणार. आमचे धंदे परकीयांच्या पोटा-करितां नाहींत. आम्हांला जो मार्ग आवडेल, जो मार्ग आम्हांस हितकर दिसेल, तो आम्ही अनुसरणार. **स्पष्ट बोललें पाहिजे.** डोकें मारलें तरी हरकत नाहीं ! हा व्यक्तिमात्राचा प्रश्न आहे. हा देशाच्या फायद्याचा प्रश्न आहे. या **जगामध्यें अशी कोणतीहो गोष्ट नाहीं कीं, जिला कांही लोक नांवें ठेवीत नाहींत.** बहिष्कार ही स्वदेशीची जोड आहे. जसें ‘ खरे बोलेन ’ म्हणजे ‘ खोटे बोलणार नाहीं ’ असें होतें, तरी साक्षीच्या वेळीं दोन्हीही गोष्टींची शपथ घेतात, तसेंच हें आहे. ही जशी जोडी आहे तशीच स्वदेशी व बहिष्कार यांची आहे. बहिष्कार टाका, त्यापासून अंतीं अपाय होणार नाहीं. उद्योग करा. आपसांत जूट करा. स्वराज्य आपल्या हातांत आहे; तें कांहीं लांब नाहीं. सरकारच्या कृतींना आळा घातला पाहिजे. आपण जोर धरूं त्यावेळीं तें होणार आहे. बलाढ्य व अभिमानी लोकांचा स्वभावच असा असतो कीं, ते धक्का बसला म्हणजे विचारतात ‘ काय म्हणून धक्का दिला ! ’ ज्यांची संपत्ति आसुरी आहे त्यांचा स्वभाव तामसी असतो. ह्या तामसीपणाला आळा घालण्याचें आपल्यांतील प्रत्येकाचें कर्तव्य आहे; व तें प्रत्येकानें बजाविले पाहिजे. आपण या गोष्टी विसरलो तर खचित अधोगतीला जाऊं यांत शंका नाहीं !

# कामकरी लोक व दारूचें व्यसन

रविवार ता. ७ जून १९०८ रोजीं सायंकाळीं करी–रोड [ मुंबई ] स्टेशनाजवळील मोकळ्या जागेंत सिंधुदुर्गवासी आर्यमित्रसमाजामार्फत मद्यपाननिषेधासंबंधानें जंगी जाहीर सभा भरली होती. या सभेचे अध्यक्ष या नात्यानें लो. टिळक यांनी व्याख्यान दिलें, तें येणेंप्रमाणें:—

सभ्य गृहस्थहो ! आतापर्यंत निरनिराळ्या वक्त्यांचीं झालेलीं भाषणें आपण ऐकलींच आहेत. मी आतां त्यांच्यापेक्षां अधिक कांहीं सांगणार आहे असें नाहीं, तथापि अध्यक्ष या नात्यानें आजच्या विषयाचा मी समारोप करणार आहे. माझ्या मतें अशा प्रकारच्या सभा होऊन मद्यपानाची चर्चा होण्याचा प्रसंग आमच्या इकडे यावा, हें देशाचें दुर्दैव होय. हिंदुस्थानांत हिंदु आणि मुसलमान या दोन जातींची विशेष वस्ती आहे. अशा हिंदुस्थानांत या प्रश्नाचा विचार करण्याचा प्रसंग यावा ही विशेष दुःखाची गोष्ट आहे. हें कां झालें ? अशी स्थिति आपल्याला कां आली ? याचा विचार केला तर असें दिसून येईल कीं, या गोष्टीला आमच्यापेक्षां आमचें सरकारच अधिक कारण झालेलें आहे. ब्राह्मण दारू पाजतात, असें आतांच एका वक्त्यानें सांगितलें. पण जो म्हणून दारू पिण्यास सांगत असेल त्याचा तुम्ही निषेध करा असें मी तुम्हांस सांगतो—मग तो ब्राम्हण असो, सरकार असो, अथवा त्याच्याही पलीकडचा परमेश्वर असो. मी असें म्हणणार नाहीं कीं ब्राह्मणावरच केवळ बहिष्कार टाका. प्रत्यक्ष परमेश्वर येऊन ‘ दारू प्या ’ म्हणून सांगूं लागला तर त्याच्यावर देखील बहिष्कार टाका. इंग्रज लोक थोर आहेत, शहाणे आहेत, विद्वान आहेत, राज्यकर्ते आहेत, चांगले राज्यकर्ते होण्याची त्यांची योग्यता आहे; पण दारू पिण्यास प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें जर ते सांगू लागले तर त्यांचा निषेध केलाच पाहिजे. हा प्रश्न एकट्या ब्राह्मणांचा नाहीं, एकट्या मराठ्यांचा नाहीं, एकट्या क्षत्रियांचा नाहीं, राजाचा नाहीं, किंवा इंग्रजांचा नाहीं. हा धर्माचा व नीतीचा प्रश्न आहे. ब्राह्मण लोक अमुक करतात, साहेब लोक अमुक करतात, म्हणून तुम्हीही तसेंच करावें असें कांहीं कोठें शास्त्रांत सांगितलेलें नाहीं. आमच्या शास्त्रांत असें सांगितलेलें आहे कीं, ब्राह्मण

**असून तो वाईट कर्म करूं लागला तर तो शूद्र होतो, आणि शूद्र असून त्यानें चांगलें कर्म केलें तर शूद्राचा ब्राह्मण होतो.** जातीचा विचार करावा, वर्णाचा विचार करावा, धर्माचा विचार करावा, एशिया किंवा युरोपचा विचार करावा, असा हा विषय नाहीं. धर्मानें निषिद्ध आहे, नीतीनें निषिद्ध आहे, वैद्यकीनें निषिद्ध आहे, आरोग्यानेंही निषिद्ध आहे. हें पाहिजे तर सिद्ध करून देतां येईल, सिद्ध करून दिलेलें आहे.

## मजूर राजे होणार !

मुंबईत दोन लाख मजूर आहेत एकपंचमांश मुंबई तुम्हीं आहां.मुंबई शहर तुमचें आहे. मुंबई शहर श्रीमंत लोकांचें नव्हे.मला मुंबई शहर कोणाचें आहे म्हणून विचारल, तर मुंबई शहर मजूर लोकांचें आहे असेंच मी सांगेन. तुम्ही जर मेहेनत केली नाहीं तर मुंबईतील गिरण्या बंद पडतील. तुम्हांस योग्य मजुरी मिळेल, तुमचें पोट भरेल तरच मुंबई शहर सुखी आहे, असें मी समजेन. मुंबई शहरांत जर तुमची प्रमुख वस्ती आहे तर मुंबई शहराला कोणी नांवें ठेवलीं तर तुम्हाला त्यानें वाईट वाटले पाहिजे. पण सर्वांत अधिक दारू पिणारें शहर मुंबई आहे. ३०।४० लक्षांची दारू एकट्या मुंबई शहरांत खपते. याशिवाय विलायती दारूचा खप आहे तो निराळाच. हें व्यसन मजूरदार लोकांमध्यें विशेष आहे. माझें या विषयासंबंधानें नुकतेंच एका कलेक्टराशीं बोलणें झालें. त्या वेळीं मजूर लोकांना 'श्रमपरिहारार्थ दारू पिणें भाग आहे', असें साहेब म्हणाले. साहेबांना काळजी पडली कीं, गरीबांना दारू कशी मिळणार ? मजुरांचा श्रमपरिहार कसा होणार ? अन्न न मिळाले तरी हरकत नाहीं. पण श्रमांचा थकवा नाहींसा होण्याकरितां दारू मिळालीच पाहिजे ! मी उत्तर दिलें कीं, हिंदुस्थान कांहीं नवें नाहीं. आज दहा हजार वर्षें हिंदुस्थान अस्तित्वांत आहे. इतक्या अवधींत जर दारूशिवाय आमच्या लोकांचा श्रमपरिहार झाला तर आजच त्या दारूवांचून चालणार नाहीं असें कसें म्हणतां येईल ! एक कोटी पंचवीस लक्ष रुपये मुंबई इलाख्यांत दारूबद्दल कर द्यावा लागतो.

दारू हें व्यसन सुधारणेचें आहे आणि तें सुधारलेल्या इंग्रज लोकांबरोबर इकडे शिरलेलें आहे. इंग्रजींत दारूच्या व्यसनाला Tutonic vice असें

म्हणतात. आमचे राज्यकर्ते 'टयूटन' आहेत. इंग्रजांच्या धर्मांत दारू पिण्याविषयीं निषेध नाहीं—'दारू प्या' असें सांगणारा जगांत हाच एक धर्म आहे. आमच्या धर्मांत निषेध आहे. बाकीच्या दोषांस प्रायश्चित्त सांगितल आहे, पण मदिरापानास आमच्या धर्मांत प्रायश्चित्त सांगितलेलें आहे; आणि तें तापलेला लोखंडाचा रस प्राण जाईपर्यंत दारू पिणाराच्या घशांत ओंतावा हें होय—म्हणजे त्याला देहांत प्रायश्चित्त द्यावें असें आहे. ज्यांच्या धर्मांत दारू निषिद्ध नाहीं ते दारू न पिण्याविषयीं खटपट करितात; मग आमच्या धर्मांत दारू निषिद्ध आहे, तेव्हां आम्ही तिचा निषेध करणें हे आमचें कर्तव्य नाहीं काय ? दारू पिणाऱ्या लोकांचें राज्य हिंदुस्थानावर झालें, त्याचा परिणाम हिंदुस्थानांत मद्यपान सुरू झालें. या व्यसनाकडे आपल्या लोकांची जी प्रवृत्ति झालेली आहे, ती नाहींशी करण्याकरितां ही मद्यपाननिषेधाची चळवळ उपस्थित झाली आहे. या कामीं आम्हांला आपणा सर्वांची मदत पाहिजे आहे. आपण मजूर लोक राजे होतां व आतां रंक झालां आहां, असे डॉ० साळुंके यांनीं सांगितलें. पण मजूर लोकांना राजे व्हावयाचे दिवस यायचे आहेत—ते खात्रीनें येतील असें मी सांगतो. इंग्लंड देशांत 'लेबर पार्टी' म्हणून मजुरांचा पक्ष आहे. इंग्लंड व अमेरिका या देशांत सत्ता आपल्या हातीं घेण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू आहे. आणि आज ना उद्यां त्यांचें तिकडे राज्य होणार आहे. तुम्ही प्रयत्न केला तर हिंदुस्थानांत तुमचेंही वर्चस्व होईल यावद्दल शंका नाहीं. यासाठीं तुम्ही आपलीं व्यसनें टाका. देशांतील नानातऱ्हेच्या वस्तु मजुरांच्या श्रमानेंच तयार होतात. देशाचा उद्धार व्हावयाचा म्हणजे मजूर वर्ग निर्व्यसनी व जाणता झाला पाहिजे.

## इंग्रजांच्या राज्यांत पान-स्वातंत्र्य

तुम्हींच येथें काम करतां असें नाहीं, तर इंग्लंडांत देखील मजूर लोक काम करीत असतात. इंग्लंडांतल्या मजुरांनीं दारू पिऊं नये म्हणून तिकडे प्रयत्न चालले आहेत; इंग्रजी राज्यांत आम्हाला दुसरें कसलें स्वातंत्र्य नसलें तरी 'पानस्वातंत्र्य' आहे. 'दारू पिणें हा प्रत्येकाचा हक्क आहे' असें 'टाईम्स ऑफ इंडिया'नें एक मोठा लेख लिहून प्रतिपादन केलें आहे. 'टाईम्स' सारख्या इंग्रजी पत्रकारांना वेडगळ कोट्यांनीं सरकारच्या वर्तनाचें समर्थन करण्याची

खोडच आहे. असल्या वेडगळ कोट्या बाजूला ठेवून आपला धर्म जे आपल्याला सांगतो, आपली नीति, आपली माणुसकी जें आपल्याला सांगत आहे तें ऐकणें हें आपलें कर्तव्य आहे. इंग्लंडांतील मजूर आज एक हजार वर्षें दारूच पीत आले, ही जी त्यांची खोड आहे, हें जें त्यांचें व्यसन आहे, तें पिढ्यानुपिढ्या त्यांच्या अंगीं खिळलेलें आहे. एके जागीं पिढीजाद दारूबाजाला सुधारावयाचें आहे, आणि दुसऱ्या जागीं अलीकडेच जडलेलें व्यसन सोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. तेव्हां कोणतें व्यसन नाहींसे करणें अधिक सोपें झालें पाहिजे ते तुम्हीच पहा. हिंदुस्थानचें दारूचें उत्पन्न २० कोटींचें झालें आहे; सगळ्या पेशवाईचें एकंदर उत्पन्न अवघें ८ कोटींचें होतें. सारांश, आपल्याला जे कांहीं उद्योग करावयाचे आहेत, ते नुसत्या शपथा घेऊन भागण्याजोगे नाहींत. दारू पिण्याविषयीं प्रत्यक्ष अगर परोक्ष तुम्हांला कोणी सांगूं लागला तर त्याचें तुम्ही ऐकूं नका. —मग तो उच्च वर्णांतला ब्राह्मण असो, शूद्र असो, सरकार असो, अथवा प्रत्यक्ष परमेश्वर असो—त्याचेवर तुम्ही बहिष्कार घातला पाहिजे. मुलखांतून जे तुम्ही येथे आला, ते दोन पैसे मिळविण्याकरितां कीं दारूचें व्यसन परत मुलखांत जातांना बरोबर घेऊन जाण्याकरितां ? याचा विचार करा. पैसा तर तुमच्याजवळ राहत नाहींच. पण दारूचें व्यसन बरोबर घेऊन मात्र तुम्ही परत आपल्या गांवीं जातां.

## थकव्यावर झोंप हें औषध

सरकार दारू बंद करीत नाहीं, पण तुम्ही निश्चय कराल तर सरकारला आपण होऊन दुकानें बंद करावीं लागतील. सरकारनें अबकारी खातें काढिलें आहे, तें लोकांनी दारू पिऊ नये, याकरितां काढलें आहे, असें सरकार म्हणतें. सरकारला पैशाचा लोभ नाहीं. सरकारला दारूपासून पैसे मिळविण्याची इच्छा नाहीं; पण सरकारच्या मनांत नसतां—निदान सरकार तसें सांगत असतां—लोकांच्या कमनशिबानें अबकारी खात्याचें उत्पन्न मात्र दरसाल ८।१० लाखांनीं वाढतें आहे ! आम्हांला किती व कसें काम करावें लागतें याची तुम्हांला काय कल्पना ! फुकटचा उपदेश कोणालाही करतां येतो, असें तुम्ही म्हणाल. तुमचें म्हणणें खरें नाहीं असें मी म्हणत नाही. पण तुम्हांला

जितकें काम पडतें, तितकें मलाहि कधींकधीं पडलेलें आहे. पण मी माझ्या थकव्याचा परिहार कधीं दारू पिऊन केलेला नाहीं. झोपेनेंच केलेला आहे. **श्रम करून थकवा आल्यावर तो नाहींसा करण्यास दारू हें औषध नव्हे. झोप हें उत्तम औषध आहे.** दारूच्या पायीं तुम्ही कुटुंबाला मुकतां, पोराबाळांना मुकतां, घरादाराला मुकतां, आपल्या देहास मुकतां, या लोकास मुकतां आणि परलोकासही मुकतां. इंग्रजी औषधांत दारू असते असें एका वक्त्यानें सांगितले. पण मी असें विचारतो कीं, आज दहा हजार वर्षें इंग्रजीं औषधें घेऊनच आम्ही जगलो होतो काय ? पृथ्वीच्या पाठीवर दारू पिणारा प्राणी काय तो मनुष्यच आहे. माकडें, कुत्रीं कांही दारू पीत नाहींत. आपल्यास मी कांही विशेष सांगावें असें नाहीं. आमच्या वाडवडिलांनीं दारू पिऊन कांही शरीरसंपादन केलेले नाहीं. दारू हा सुधारणेचा प्रकार आहे. सुधारणेमध्यें दोष काय आहेत हें समजत नसल्यामुळें इकडले लोक दारू पिऊं लागले आहेत. आपले ‘ सेक्रेटरी ऑफ स्टेट ’ मोर्लेसाहेब यांनीं सांगितले आहे कीं, दारू हा ‘दुसरा प्लेग’ आहे. दारू जर दुसरा प्लेग आहे, तर प्लेग बंद करण्यास ‘इनॉक्युलेशन’ची जशी मोठी दांडगी खटपट चाललेली आहे, तशी खटपट हा दारूचा प्लेग बंद करण्यास सरकार कां करीत नाहीं ? हा दुसरा प्लेग बंद करण्यास ‘ इनॉक्युलेशन ’ वाल्या सरकारने दसपट खटपट केली पाहिजे. ती त्यांनी केली नाहीं; उलट अशी खटपट करणारास त्यांनीं शिक्षाच दिल्या आहेत. दारू बंद कशी होईल इकडे आमचें सर्वांचें लक्ष लागलें आहे. सरकार दारू बंद करणार नाहीं; पण आपण सरकारकडून दारू बंद करविली पाहिजे. हें काम करतांना शिक्षा झाल्या तरी त्या आपण सोसल्या पाहिजेत. पहिला प्लेग राजकर्त्यांच्या पापामुळें जरी आला नसला तरी हा दुसरा दारूचा प्लेग सरकारच्या पापामुळें आलेला आहे.

मुंबईंत मजूर लोकच दारू पिणारे आहेत. ब्राह्मण लोक दारू पिणारे नाहींत, असें मी म्हणत नाहीं. ब्राह्मणदेखील दारू पिणारे आहेत—या मुंबई शहरांत आहेत. ब्राह्मण दारू पितात हें पाहूनच मजूर लोक दारू पिऊं लागले. पहिल्यानें ब्राह्मण बिघडले, मग खालचे लोक बिघडले; अशी स्थिति आहे. ब्राह्मण लोक गुन्हेगार नाहींत असें मी म्हणत नाहीं, आणि आपल्यालाही म्हणावयाला सांगत नाहीं. **दोष असला—मग तो ब्राह्मणांचा असला म्हणून काय झाले ?—तो स्पष्टपणें कबूल केलाच**

**पाहिजे.** या दारूच्या कामांत सरकारला १० कोट रुपये मिळत आहेत. तो पैसा जर तुमच्याजवळ राहिला तर तुमच्या पोटाला मिळेल कीं नाहीं, याचा विचार करा. तुम्ही खटपट केलीत तर तुमच्या गिरणीचे मालक तुम्हाला या कामीं मदत करतील. मला आपल्या सेक्रेटरीनीं मघाशीं सांगितलें कीं, येथील कामाठीपुऱ्यांत १४ गल्ल्यांत २८ दुकानें आहेत. दारू न पिण्याची शपथ वहावयाची आणि आपल्या गल्लींतील दुकान कसें उठेल त्याबद्दल खटपट करावयाची असा निश्चय करा. हा निश्चय 'सत्यसंकल्प' आहे. या संकल्पाचा परमेश्वर पाठिराखा आहे. अशी गोष्ट राजा कितीही बलाढ्य असला तरी त्याजकडून अन्य तऱ्हेनें घडेल असें संभवत नाहीं. **जी गोष्ट समाजाला नको ती समाजावर लादणें सरकाराला कधींही श्रेयस्कर होणार नाहीं.** ज्यानें दारू न पिण्याची शपथ घेतली त्यानें दुसऱ्यालाही दारू न पिऊं देण्याविषयीं खटपट केली पाहिजे. नाहीं तर त्यानें शपथ पाळली असें म्हणता येणार नाहीं. तुम्ही मजूर लोक हलके आहां, खालच्या जातीचे आहां, अशी बुद्धि ठेवूं नका. **तुम्हां मजुरांत साधुसंत निर्माण झाले व त्यांच्या चरणीं आम्हीं ब्राह्मण लीन झालों होतों.** त्यांनीं ब्राह्मणांना देखील धर्माची दिशा दाखवून दिली आहे. येथें जमले आहेत त्यांना माझी अशी विनंति आहे कीं, आज जे येथें आले नसतील त्यांना निरोप कळवा कीं, हे काम तडीस न्या. हा तुमचा धर्म आहे. कोणी त्यासंबंधानें भिण्याचें कारण नाही. कोणी रागावण्याचें कारण नाहीं. ब्राह्मण दारू पितात म्हणून तुम्ही दारू प्या, असें जो सांगणारा असेल किंवा अप्रत्यक्ष रीतीनें भासविणारा असेल, त्याला मी देशाचा शत्रू समजतों. तो तुमचा शत्रू आहे असें समजा.

## दारू हें सुधारणेचें व्यसन

आज ज्या मंडळीनें सभा बोलावली आहे, त्यांनीं प्रत्येक गिरणींतील मद्यपान निषेधक मंडळ्या स्थापन करण्यासाठीं खटपट केली पाहिजे. सरकारचे अधिकारी पर्यायानें तुमच्यापुढें दारू आणून मांडतील, पण प्रत्यक्ष जुलूम करणार नाहींत ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. दारू हें पाश्चात्य व्यसन आहे—सुधारणेचें व्यसन आहे. हें व्यसन हांकून देणारे आहेत त्यांना आपण मदत केली पाहिजे. स्वावलंबनाचा धडा मिळावा म्हणून आजची ही स्थिति परमेश्वरानें तुमच्यावर आणलेली आहे. तुम्हांस सरकारी

अधिकाऱ्यांनीं सहानुभूति दाखवावयास पाहिजे तेवढी ते दाखवीत नाहींत ही दुःखाची गोष्ट आहे. दारू पिणारे लोक कांहीं फारसे सभेस येत नाहींत. दारू पिणाऱ्या लोकांची सभा कुठें भरते ? गुत्त्यांत. तेव्हां त्यांस गुत्त्यांतच जाऊन व्याख्यान दिलें पाहिजे. इंग्लंडांत 'पिकेटिंग' योग्य मानले जातें. त्याच इंग्रजांच्या राज्यांत हिंदुस्थानांत गुत्त्याजवळ जाऊन दारू पिणारास 'दारू पिऊ नको' म्हणून उपदेश करावयास गेले तर उपदेश करणारावर खटला होतो आणि त्याला शिक्षा होते. पण दारूचें व्यसन आपले अनहित करणारें असून तें नाहींसे केले पाहिजे, यांत संशय नाहीं. सत्यनारायणाला स्मरून दारू न पिण्याची तुम्ही शपथ घ्या; आणि दुसऱ्यांनाही दारूपासून परावृत्त करा. या प्रश्नाला सहानुभूति दाखविणारे पुष्कळ लोक निघाले आहेत. हिंदुस्थानांतील लष्कराचे मुख्य आधिपति लॉर्ड किचनेरसाहेब हे त्यापैकीं एक आहेत. दारू पिऊं नका, असा त्यांचा गोऱ्या सोल्जरांना उपदेश आहे ! आतां उशीर बराच झालेला आहे. मला जे कांहीं आपल्याला सांगावयाचें होते तें मी सांगितलेंच आहे. असेच दुसरें आणखी प्रसंग यावेत आणि येतील अशी मला आशा आहे.

निबंध ६३८
२८५१२५३८

# राजकीय चळवळ यशस्वी कशानें होते?

रविवार ता. १० जून १९०८ रोजीं सायंकाळीं, पुणें येथें लकडीपुलानजीकच्या श्रीविठ्ठल-मंदिरांत श्री शिवराज्याभिषेकोत्सवानिमित्त उमरावतीचे श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं अहमदनगरचे दे. बाळासाहेब देशपांडे यांचें व्याख्यान झालें. 'काळ' कर्ते प्रो. शिवराम महादेव परांजपे यांजवरील राजद्रोहाच्या खटल्यांत खटपट करण्याकरितां मुंबईस गेलेले लो. टिळक याच दिवशीं सायंकाळीं पुण्यास आले, ते स्टेशनवरून तसेच उत्सवास हजर झाले. त्यांनीं तेव्हां जें भाषण केलें तें येणेंप्रमाणें:—

अध्यक्ष आणि सभ्य गृहस्थहो ! मी आज जो येथें आलो आहे तो येथें आल्यावर मला भाषण करावें लागेल अशा समजुतीनें आलो नाहीं. वेळ बराच झालेला आहे. ( श्रोत्यांतून—'नाहीं, नाहीं' ) कांहीं झाले तरी वेळेवर तुमची सत्ता नाहीं. नऊ वाजावयाचे ते वाजले आहेत. बोलावें लागेल असें मला माहीत नव्हतें आणि मी कोणत्याही विषयाची तयारी केलेली नाहीं. तेव्हां आता मला स्वतंत्र दोन शब्द सुचले आहेत तेच सांगतो. हल्लींच्या उत्सवाच्या अध्यक्षांनी अकोला येथील श्री शिवाजीउत्सवाचें ओझें माझ्यावर टाकलें होतें, तेव्हां या उत्सवांत त्यांना अध्यक्ष व्हावें लागलें ही जी अनायासें योजना घडून आली, 'दे वाण घे वाण' जी सहज झाली, तीवरून ईश्वराच्या घरीं न्याय आहे असें दिसून येतें ! हा तेरावा श्री शिवराज्याभिषेकोत्सव आहे. या उत्सवाला काय संकटें आलीं, त्यांतून हा उत्सव कसा पार पडला, हें कांहीं सांगायला नको—तें आपल्यास माहीत आहे. आश्चर्य हें कीं, आमच्या असल्या चळवळींत मोर्ले साहेबांना आतां राम आहे असें वाटूं लागले आहे ! कांहीं महिन्यापूर्वीं हिला मोर्ले साहेब 'फॅस' म्हणत होते. ( श्रोत्यांतून—'आतां तोंडाला फेंस आला आहे' ) तोंडाला फेंस अद्याप आलेला नाहीं; पण आमच्या चळवळींत राम आहे हें तत्त्व त्यांच्या तोंडाला आलें आहे एवढें मात्र खरें ! देशांत स्वस्थता पाहिजे व या स्वस्थतेकरितां प्रयत्नही पाहिजेत; पण याशिवाय दुसऱ्या कांहीं गोष्टीची आवश्यकता आहे हें आतां अधिकाऱ्यांनी

कबूल केलें आहे. ही एक पायरी आपण मिळविली, असेंच म्हटलें पाहिजे. या उत्सवाला सामाजिक व धार्मिक बाजू आहे, तशी राजकीय बाजूही आहे, आणि ती आम्ही कधीही लपवीत नाहीं. **फेंसाचा दगड झाला आहे आणि त्याचें वज्र होणें आहे !** वृत्राला मारण्याकरितां इंद्रानें फेंसाचें वज्र केलें, अशी कथा आहे. मी वेद वाचले तेव्हां हें कसें झालें असेल याची मला देखील शंका आली होती. पण फेंसाचें वज्र होणें शक्य आहे हे वेद न मानणाऱ्या लोकांनाही आतां वाटूं लागलें आहे ! यावरून यांत बीज आहे, हें एक रूपक आहे, असें वाटतें. ज्या गोष्टी क्षुल्लक दिसतात त्या परिणामीं अति तीव्र होतात, हें यावरून दिसून येते. ही एक आनंदाची गोष्ट झाली.

दुसरी गोष्ट वाईट आहे आणि ती वर्तमानपत्रांवरील खटले ही होय. यांचा येथें उल्लेख करण्याचें कारण अशाच उत्सवांतून एक खटला मागें उपस्थित झाला होता. एका तोंडानें सरकार राष्ट्र जिवंत आहे म्हणतें आणि—मी सरकारास दुतोंडें म्हणत नाहीं !—दुसऱ्या तोंडानें हा जिवंतपणा किती कमी करतां येईल याविषयीं प्रयत्न सुरू आहे. बंगाल्यांत कांहीं असलें तरी महाराष्ट्रांत कांहीं एक नसतांना प्लेगप्रतिबंधक उपायांस प्लेगच्या आधीच सुरवात करतात, त्याप्रमाणें सरकारनें इकडे फिर्यादींना सुरवात केली आहे, ही मोठी चूक आहे. **अशानें लोकांचीं अंतःकरणें वश होत नाहींत; शांतही होत नाहींत.** याचा परिणाम काय होईल हें सांगतां येत नाहीं ! मोर्लेसाहेबांचें ‘ feeling the way ’ चाललें आहे. ते अंधारांतच कां होईना, पण चांचपडायला तरी आतां लागले आहेत. ते म्हणतात कीं, The period is very dark, म्हणजे हा काळ अंधारमय आहे. यावर उजेड पडला म्हणजे त्यांना दिसेल !

## चळवळींत जिवंतपणा कसा येतो ?

तिसरी गोष्ट सांगावयाची ती ही कीं, चळवळींत जिवंतपणा कशानें येतो ? **कोणत्याही चळवळीला जिवंतपणा येण्यास माणसें एकनिष्ट लागतात.** त्यांना विघ्नांतून कसे बाहेर यावें हें कळावें लागतें, निश्चय लागत असतो. सुदृढ, निश्चयी, एकनिष्ठ, असे जे पुरुष ते पुरुष चळवळीला मिळाले म्हणजे ती

चळवळ जिवंत होते. मग त्याच्यापुढें फलप्राप्ति होते. कांहीं लोक असे आहेत कीं, ते फक्त जिवंत माणसांनाच स्पर्श करितात. जें जिवंत नाहीं त्यास स्पर्श करीत नाहींत; तेव्हां माझी अशी खात्री आहे कीं, अशा प्रकारचे जे लोक सध्यां चळवळीच्या बाहेर आहेत ते तींत येऊन आतां मिळतील. जिवंत झऱ्याचें पाणी वाढतें. तसें हें आहे. जिवंतपणा शाबीत करण्याची जबाबदारी मात्र ते आपल्या अंगावर घेऊं इच्छित नाहीत! आणि जिवंत पाण्याचा गुण असा आहे कीं, त्यांत गढूळ पाणी येऊन मिळालें तर तेंही जिवंत होऊन जातें. जिवंतपणाचें सर्टिफिकीट मिळालें कीं, लोक त्यांत येतात. हा उत्सव संकटांस न जुमानतां बारा वर्षें चालला हें जिवंतपणाचेंच लक्षण आहे. उत्सवाला मी हजर नसल्यामुळें व माझी तयारी नसल्यामुळें त्यासंबंधाची चर्चा मला करतां येणार नाही. रा. देशपांडे यांनीं सांगितलें कीं, माझें भाषण ऐकण्याकरितां ते येथें आले. त्यांची निराशा होईल याचें मला वाईट वाटतें! आज सकाळीच मी येणार होतों. पण कांहीं कामामुळें मला सकाळीं मुंबईहून येतां आलें नाहीं.

## आधीं कुलूप उघडा

**प्रसंग उत्तरोत्तर कठिण येणार आहे.** आज देशांत कामाला सुरवात झाली आहे; त्या कामाकरितां ज्यांच्याशीं भांडावयाचें त्यांच्याशीं भांडण्यास नुसतें कोठें तोंड लागलें आहे. आतांच निराश व्हाल तर तुमच्यानें कांहींही व्हावयाचें नाहीं. **तुम्हांला पाहिजे आहे तें संकटापलीकडे आहे!** कुलूप उघडल्याशिवाय पेटी उघडतां यावयाची नाहीं. मार्ग बिकट आहे. बराच मार्ग जावयाचा आहे. आणि तयारी उघड रीतीनें, योग्य तऱ्हेनें करावयाची आहे. या कार्याकरितां शिवाजी महाराजांच्या चरित्रापासून बोध घेण्याची ही वेळ आहे. मी आकोल्यास सांगितलें होतें त्याप्रमाणें सबंध राष्ट्र काशीयात्रेस निघालें आहे. स्वराज्याचा इष्ट हेतु जो विश्वेश्वर तो स्वातंत्र्यगंगेच्या कांठीं जें मंदिर आहे त्यांत मांडलेला आहे. तो कायम ठेवा. संकटें येतील, कित्येकांचे प्राण खर्ची पडतील. पण असे प्राण गेले तरी आपल्या वासनेला त्या गंगेंत स्नान करायाचा कधी ना कधी प्रसंग येईल, हें लक्षांत ठेवा. **तुम्ही काम कसें करितां हें दाखविण्याची ही वेळ आहे.** या वेळीं आपल्याला कांहीं पावलें मागें घ्यावीं

लागली, तरी एकंदरीनें आपली प्रगतीच होणार आहे. समुद्राच्या कित्येक लाटा किनाऱ्याकडे येऊन मागें जातात व किनाऱ्यावर दहा मिनिटें उभें राहणारास दिसून येतें कीं कांहीं लाटा येऊन माघारी गेल्या; पण तसें दिसलें तरी एकंदरीनें भरती येत असते. राजकीय चळवळीचा प्रकार यासारखाच आहे. एकंदरीनें भरती येईल असा क्रम आपण ठेवला पाहिजे. महाराष्ट्रावर ही जबाबदारी आतां येऊन पडली आहे. बंगाल्यांतील लोकांनीं आपली कामगिरी कशी बजावली हें सर्वांना ठाऊक आहे. **समोर अंधार दिसत असला तरी त्या पलीकडे उजेड आहे हें लक्षांत ठेवा.**

असें सांगून लो. टिळक यांनीं भाषण स्वस्थपणें ऐकल्याबद्दल श्रोत्यांचे आभार मानिले आणि टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटांत व 'वंदेमातरम्'च्या उत्साहपूर्ण गर्जनेंत आपलें कळकळीचें व तेजदार भाषण संपविलें.

# स्वराज्याची गुरुकिल्ली

[ १९१७ सालच्या नाशिकच्या परिषदेंत स्वराज्याच्या ठरावावर लो. टिळकांनीं जें भाषण केलें तें खालीं दिलें आहे. हें भाषण समग्र असें प्रथमच प्रसिद्ध होत आहे. नाशिक येथें या भाषणाची हस्तलिखित प्रत १९३२ सालीं श्री. ग. वि. केतकर यांना सांपडली. ती मुद्दाम या भाषणांच्या बरोबरच छापण्यांत येत आहे. ]

स्वराज्याच्या ठरावास पुष्टि द्यावयास लोकमान्य पुढें आले तेव्हां टाळ्यांच्या कडकडाटानें व 'हिंदमाता की जय', 'शिवाजी महाराज की जय', 'टिळक महाराज की जय' अशा जयजयकारानें मंडप गदगदां हलून गेला. मंडप निःस्तब्ध झाल्यावर लोकमान्य म्हणाले:—

अध्यक्ष महाराज व सभ्य गृहस्थहो, हा ठराव पुढें मांडतांना जयकर-साहेब म्हणाले कीं, पहिल्यानें तरुण व नंतर वृद्ध अशी जी सरणी या ठरावावरील वक्तयांची घातली गेली आहे ती मोठी सुफलदायी व चांगली आहे. या वक्तयांच्या सरणीमध्यें आमच्या तय्यबजींनीं—ते माझ्यापेक्षां वृद्ध आहेत—खंड पाडला आहे. जी सरणी अविच्छिन्न नाहीं व ज्या सरणीमध्यें एक कां होईना पण अपवाद उत्पन्न होतो ती सरणी ढांसळली असें न्यायाचें तत्त्व आहे. म्हणून ही सरणी मला कबूल करतां येत नाहीं. मी वयानें वडील व शरिरानें कितीहि वृद्ध दिसलों तरी मी विचारांनी-निदान तुमच्याइतका—खास तरुण आहे. (टाळ्या) हा माझा तरुणपणाचा हक्क मी गमावूं इच्छित नाहीं. विचारांची वाढ खुंटली हें कबूल करणें म्हणजे या ठरावा-वरील हक्क गमावणें आहे. मी जे बोलणार आहे—सांगणार आहे, उपदेश करणार आहे, कांही म्हणा, तें नित्य तरुण आहे. ( टाळ्या ) शरीर वृद्ध होत असलें तरी आत्मा कधीं होत नाहीं. आत्मा हा नित्य आहे. स्वातंत्र्य हा आत्मा आहे. स्वातंत्र्य कधीं म्हातारें होत नाहीं. ( टाळ्या ) शरीर म्हातारें होईल, दुर्बळ होईल, मरेल. पण आत्मा हा अमर आहे. आमची चळवळ कधीं कधीं लंगडी पडल्यासारखी दिसली तरी त्यांतील आत्मा जें स्वातंत्र्य तें नित्य, अविनाशी, आपलें पद लोकांना प्राप्त करून देणारें आहे. ( टाळ्या ) आत्मा म्हणजे परमेश्वर.

त्याच्याशीं तादूप्य पावल्याखेरीज मनाची तळमळ नाहींशी होत नाहीं. एक शरीर जीर्ण झालें तर आत्मा दुसरें शरीर धारण करतों. ' वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृण्हाति नरोपराणि । तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ हा गीतेंतील सिद्धान्त आहे. हें तत्वज्ञान जुनें आहे. नुसती गीता वाचणें हा वेदान्त नव्हे. हा नवा वेदान्त आहे, असें पाहिजे तर म्हणा. स्वातंत्र्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे. हा आत्मा जोंपर्यंत माझ्या हृदयांत जागृत आहे तोंपर्यंत मी म्हातारा नाहीं. आपण मला म्हातारा म्हणूं नका. ( हंशा ) 'नैनं दहति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ असे आत्म्याचें वर्णन गीतेंत आहे. यामध्यें मी आज 'नैनं दहति सी. आय्. डी.' असें पांचवें नवीन पद घालतों. ( टाळ्या ) येथें समोर जे सुपरिंटेंडंट साहेब बसले आहेत—कलेक्टर साहेबांना आज निमंत्रण दिलें होतें पण ते आलेले नाहींत—हे येथें मानकरसाहेब अस्तन्या सारून रिपोर्ट घेत आहेत, त्यांना आम्ही हेंच तत्त्व सांगणार ! ( टाळ्या )

## खरें राजकीय नीतिशास्त्र

हें तत्त्व मारलें तरी नाश पावणार नाहीं, हें लक्षांत ठेवा. हें स्वराज्य आम्ही मागतो म्हणजे तें आम्हांला मिळालेच पाहिजे. ज्या शास्त्राचें पर्यवसान स्वराज्यांत होतें तें राजकीय नीतिशास्त्र होय, जिचा शेवट दास्यांत होत असेल ती राजनीतिच नव्हे ! राजनीति हा देशाचा वेदान्त आहे. तुमच्यामध्यें आत्मा हा आहेच. मी फक्त त्याला जागृत करणार आहे. कांहींसा अज्ञानानें, स्वार्थ-साधु लोकांच्या प्रयत्नानें, व कांहींच्या अपमतलबानें जें पटल उत्पन्न झालें आहे तें दूर करण्यासाठीं येथें मी आलों आहे. हें पटल दूर झालें म्हणजे राष्ट्र प्रयत्नाला लागेल. राजकीय नीतीचे दोन भाग आहेतः—दैवी व आसुरी. राष्ट्रांचें दास्य हा प्रकार आसुरीमध्यें येतो. जयकर साहेब म्हणाले कीं, कोणत्याही राष्ट्राला चिरकाल दास्यांत ठेवणें शक्य नाहीं. मिल्लचा सिद्धांत असा आहे कीं, No nation has a moral right to keep another in slavery दास्यांत ठेवणें हें नीति-दृष्ट्या पातक आहे. या आसुरी प्रकाराचें नीतिदृष्ट्या समर्थन होणें शक्य नाहीं. अशा तत्त्वाचें समर्थन करणारें राष्ट्र परमेश्वराच्या घरीं पापी ठरेल, हा मिल्लचा

सिद्धांत आहे. आपला हक्क काय आहे हें स्पष्ट बोलण्याचें कोणामध्यें धैर्य असतें, कोणामध्यें नसतें. या तत्त्वाचें ज्ञान होणें हेंच राजकीय व धार्मिक शिक्षण होय. राजकीय व धार्मिक हे शिक्षणाचे निरनिराळे प्रकार नाहींत. ही दोन्ही एकच आहेत. आपणांस जें हें भिन्नत्व वाटतें तें परकी अंमलामुळें होय. सर्व philosophies या राजकीय नीतिशास्त्रांत अंतर्भूत होतात. आपण स्वराज्य फक्त विसरला आहां, त्यांची जागृति देण्याला मी आलो आहे. स्वराज्य कोणाला माहीत नाही ? स्वराज्य कोणाला नको ? तुमच्या घरांत जर मी स्वयंपाक करूं लागलों तर तें तुम्हाला चालेल काय ? हक्क हे सर्वांना कळतात पण त्यांच्यापुढें पडदे सोडलेले आहेत ते मी दूर करणार आहे. माझ्या घरची व्यवस्था पाहण्याची सत्ता मला पाहिजे, हेंच तें स्वराज्य होय. वेडे व लहान मुलें यांनाच व्यवहार पाहण्याची सत्ता नसते. येथें परिषदेला एकवीस वर्षांच्या वर वयाचे लोक येतात. हा नियम आहे. मग तुम्हांला तुमची सत्ता नको असें वाटतें काय ? ( नाहीं ) तुम्ही वेडे आहां काय ? तुम्ही मुलें आहां काय ? नाहीं ना ? मग तुम्हाला सर्व व्यवहार कळतो, हक्क कळतात, स्वराज्य कळतें ( टाळ्या ) तुम्हाला जर कोणी वेडे म्हणत असतील तर ते आपमतलबी होत. या सर्व गोष्टी जर कळतात तर हें व्याख्यान कशाला ? अवंतिकाबाई म्हणाल्या कीं 'सत्ता पाहिजे'. घरांत जर सवत आली तर ती कोणाला पाहावेल ? जास्त मागितलें तर देणार नाहीं, ही भाषा कोणी ऐकून घेणार नाहीं. सत्ता पाहिजे, स्वराज्य पाहिजे. आपला हक्क मागावयास कोणाची भीति ! आत्म्याचा नैसर्गिक हक्क मागावयास भितां ? हिंदु-मुसलमान एक झाले, जहाल-मवाळ भेद गेले, १९ कीं १७ हा भेद १९१७ सालानें मिटला. आतां क्षुद्र गोष्टी ऐकून भुरळ पाडून घेणें हें आमच्या गैदीपणाचें लक्षण होईल. हें परमेश्वराच्या घरीं पाप ठरेल.

## इंग्रजांच्या राजनीतीला काळिमा

आम्ही स्वराज्याला पात्र नाहीं. तुम्ही १०० वर्षांत आम्हाला स्वराज्याला पात्र केलें नाहीं. मग आतां आम्हीच स्वतःला पात्रता आणतो. (टाळ्या) भलत्याच सबबी सांगून, नाहीं नाहीं त्या भुरळी घालून, लालूची दाखवून, भीति उत्पन्न करणें हें इंग्रजांच्या राजनीतीला काळिमा आणण्यासारखें आहे. (टाळ्या)

हें युद्ध इंग्लंडनें कां सुरू केलें ? बेलजमच्या स्वातंत्र्य-रक्षणासाठीं इंग्लंड युद्धांत पडलें ना ? लहान राष्ट्राचें स्वातंत्र्य रक्षण करण्याचें काम जें इंग्लंड आज खुद्द हिंदुस्थानच्या मदतीनें करीत आहे, तें इंग्लंड आम्हाला स्वराज्य मिळूं नये, असें कसें म्हणेल ? जे नांवें ठेवतात, ते लोभी होत. दुर्जन कोणाला नांवें ठेवीत नाहींत ? परमेश्वर दयाळू नाहीं अशी खुद्द परमेश्वराची निंदा करतात. मग स्वराज्याची कथा काय ? कोणालाही न जुमानतां देशाच्या आत्म्याचें रक्षण करण्याचे प्रयत्न आम्हाला केले पाहिजेत. यांत जन्मसिद्ध हक्कांचें रक्षण आहे, देशाचें कल्याण आहे. (टाळ्या) राष्ट्रीय सभेनें पास केलेला स्वराज्याचा ठराव ही परिषद मंजूर करिते (affirms) अशी या ठरावांत भाषा घातलेली आहे. मी समर्थांना विचारतों (समर्थांकडे पाहून) कीं, ही भाषा कायदेशीर आहे कीं कायद्याबाहेर आहे ? या प्रांतिक सभेच्या पितृस्थानीं राष्ट्रीय सभा आहे. बापाचा हुकूम मुलानें मंजूर करणें ही भाषा योग्य आहे ! बापाची आज्ञा शिरसावंद्य मानून ती सिद्धीस नेण्यास तयार असणें एवढेंच मुलाचें काम ! ( टाळ्या ). पितृस्थानीं म्हणजे काय याचा अर्थ पूर्णपणें माहीत आहे. ( हंशा ). बापाच्या केवळ आज्ञेकरितां रामानें १२ वर्षें वनवास पत्करिला. इतकी रामाची पित्यावर अढळ निष्ठा होती. राष्ट्रीय सभेनें—पित्यानें—स्वराज्याचा ठराव मंजूर केला. हा एकदां आम्हाला पित्यानें हुकूम सोडला आहे. राष्ट्रीय सभा आतां आज्ञा बदलीत नाहीं. आमचा पिता दोनदां बोलत नाहीं ! ! आतां ही पित्राज्ञा पाळण्याकरितां आम्हाला मरण येवो, आपत्ति कोसळोत, वनवास सोसावा लागो किंवा अज्ञातवास पत्करणें भाग पडो. आम्ही हा ठराव अमलांत आणविण्याचा प्रयत्न करणार ! हा आमचा निश्चय आहे. बापाची आज्ञा पाळण्यासाठीं रामाला १२ वर्षें वनवास प्राप्त झाला, आमचा कदाचित् एक दोन वर्षांतच संपेल ! हा ठराव मंजूर करणें म्हणजे टाळ्या वाजविणे नव्हे ! हा ठराव जर खरोखर मंजूर करावयाचा असेल, तर तो अंतःकरणापासून शपथ घेऊन मंजूर करा. ( टाळ्या ).

## त्रैलोक्य चिंतामणीची मात्रा

आमची पिढी कदाचित् जाईल. पण पुढच्या पिढीला तो प्राप्त होईल. आत्मा अमर आहे, रामाचा निश्चय कायम टिकला. आपला निश्चय कायम टिकेल, आम्ही

वनवासाला भिणार नाहीं तर आम्हांला सुद्धां स्वराज्य मिळेल. (टाळ्या). व्रतें व उद्यापनें हें एक मंत्राचें अंगच आहे. नुसत्या उच्चारानें मंत्राची सिद्धि नाहीं. येथें दहा गायत्री रोज जपणारे पुष्कळ असतील. नुसत्या गायत्री मंत्राच्या जपानें कोणाला गायत्री प्रसन्न झाली आहे ? मंत्राच्या सिद्धीला कांहीं नियम असतात ते पाळावे लागतात. तेव्हां सिद्धि मिळते. मंत्राचा जप—ठराव—अनेकदां पास झाला. आतां सर्वांना प्रार्थना—हात जोडून प्रार्थना—आहे कीं, या मंत्रांतील इंगित समजून घ्या ! परमेश्वरानें अनुकूल काल निर्माण केला आहे. म्हणाल काल बदलला आहे, ही परमेश्वराची कृपा झाली. आतां तुमचा उद्योग तुम्हाला केला पाहिजे. याउपर प्रयत्न केला नाहीं तर काय तो परमेश्वराचा दोष ? या ठरावाच्या अंमल-बजावणीसाठीं तन मन धन खर्च कराययाचें नसेल, नुसती दोन तीन दिवस मजा मारण्यासाठीं तुम्ही येथें जमला असाल तर तुमची मंजुरी नको ? याची फळें आम्हाला चाखायला न मिळाली तरी तीं आमच्या मुलांना मिळतील, ही खात्री ठेवा. राष्ट्राला औषध पोंचलें आहे. पण ते Alchoholic नको असें समर्थ म्हणाले व जयकर साहेबांनीं तें कबूल केलें. ते एवढे बॅरिस्टर पण चुकले. अलकोहोल हा शब्द वाईट आहे तो सोडा. मात्रा हा शब्द बरा आहे. समर्थांना देशी औषधांचा परिचय नसेल म्हणून अलकोहोलीक ( मादक ) असें म्हणाले. मी म्हणतो मृत्युशय्येवर पडलेल्या इसमाला चांगली सणसणीत मात्रा—त्रैलोक्य चिंतामणी मात्राच—दिली पाहिजे. ( टाळ्या ). या मात्रेला अनुपान असतें तें सुद्धां सणसणीत आल्याच्या व तुळशीच्या रसाचें असावें लागतें. ( टाळ्यांचा गजर ) एकाद्या वेळीं रोग्याची दांतखिळी बसली तर पळी घालून उघडावी लागते. ( टाळ्या ). पचेल तेवढेंच औषध देऊन भागत नाहीं—थोडा स्ट्रॉंग डोस द्यावा लागतो ! ( हंशा ). समर्थांनीं दारू हा शब्द वापरला, पण ज्याचे हातपाय गार पडले असतील अशा रोग्याला शेवटी डॉक्टर ब्रँडी देतात ! ( टाळ्या ). तुमची स्थिति दीन झाली, तुमचे हक्क गेले, झाड तोडायचें तरी सरकारकडे अर्ज करावा लागतो, अशा हातपाय थंड पडलेल्या स्थितींत झणझणीत अंजनच पाहिजे. आम्हीं सरकारजवळ वचन मागतों पण नुसत्या वचनानें मी खूष नाहीं. १८५७ सालीं आम्हाला वचन मिळालें. रेड्यांचीं आचळें पिळण्यासाठीं आम्ही तीस वर्षें प्रयत्न केलें. पण दुधाचा थेंब कांहीं भांड्यांत पडलेला नाहीं. ( टाळ्या ).

## परमेश्वरी कृपेचा फायदा

आतां आम्ही शक्य तितक्या कायदेशीर व सनदशीर मार्गांनीच प्रयत्न करणार. ( टाळ्या ). इंग्लंडांतील लोकांची बुद्धि पालटली. हा केवळ परमेश्वरांचा उपकार होय ! आतां आमचे प्रयत्न निष्फळ होणार नाहींत असा आमचा भरंवसा आहे. आजपर्यंत आपलें चिमूकलें राष्ट्र साम्राज्याचें रक्षण करील अशी इंग्लंडला घमेंड होती. हा राजसत्तेचा मद आज उतरला आहे. हें काय आम्ही केलें ! इंग्लंडला आज साम्राज्य-घटनेंत फेरफार केले पाहिजेत. ही जी जाणीव उत्पन्न झाली आहे, ती परमेश्वराचीच कृपा होय. ( टाळ्या ). टाळ्या कां वाजवितां ! ही स्थिति काय तुम्ही उत्पन्न केली ? हिंदुस्थानच्या मदतीशिवाय इंग्लंडचें चालणार नाहीं असें खुद्द लॉईड जार्ज म्हणतात ! ( टाळ्या ). पूर्वीच्या हजारों राज्यकल्पना आज लयाला गेल्या आहेत. पांची पक्षाचें शहाणपणं आज अपुरें पडले आहे. असें आज विलायतेंतील लोकांना वाटत आहे. या वेळीं इंग्लंडला आम्ही कळविलें पाहिजे कीं, आम्ही हिंदुस्थानचे तीस कोटि लोक साम्राज्याकरितां मरायला तयार आहों. ( टाळ्या ). ही वस्तुस्थिति समजावून सांगा. इंग्लंडचे लोक आमचें म्हणणें अमान्य करणार नाहींत. आमच्या शिपायांनी फ्रेंच रणभूमीवर लढून इंग्रज शिपायांचे प्राण वाचविले आहेत. आमच्या लोकांनीं शौर्य दाखविलें आहे. आजपर्यंत जे लोक हिंदी लोकांना दास समजत होते, तेच आज आपणाला बंधु म्हणूं लागले आहेत. ही बंधुभावाची ओळख ते विसरले नाहींत तोंच आपली मागणी जोरानें, निकरानें पुढें मांडली पाहिजे. आम्ही तुमच्या पाठीमागें उभे राहूं तर साम्राज्याकडे वक्रदृष्टीनें पाहण्याची कोणाची छाती नाहीं हें इंग्रजांना स्पष्ट कळविलें व पटविलें पाहिजे. ही खूण पटविण्यासाठीं आम्ही डेप्युटेशन नेमलें. पण मुदत जात चालली आहे. आज महिन्यामहिन्याचें फार मोठें महत्त्व आहे. या कामीं दिरंगाई होणें इष्ट नाहीं. डेप्युटेशन तांबडतोब कां जात नाहीं ? मंत्र कळतो पण कृति होत नाहीं. कॉंग्रेसनें म्हणावें ' ठराव पास करतों. ' We resolve, आम्हीं म्हणावें 'ठराव मंजूर करतों' We affirm आणि सरकार म्हणेल We hear 'आम्हीं ऐकतों,' हें आतां पुरे झालें. (टाळ्या). यानें कांही कार्य होणार नाहीं, होमरूल म्हणा, सेल्फ-गव्ह-

मेंट बोला, कीं, 'राजकीय सुधारणा' हें मिळमिळीत नांव घ्या. ( हंशा ). पण हा ठराव अमलांत आणण्याचे प्रयत्न करा एवढीच माझी आपणांस विनंति आहे.

## स्वातंत्र्याच्या मंत्राचें बीज

होमरूल लीगला, मुस्लीम लीगला, जहाल मवाळांना सर्वांना हा ठराव मान्य झाला. पण प्रयत्नांची हीच वेळ होय, ही खात्री झाली पाहिजे. स्वराज्याचा कायदेशीरपणा हायकोर्टांत सिद्ध झाला आहे. ज्यांच्याजवळ मागायाचें त्यांची बुद्धि निवळली आहे. आतां उद्योग कराल तर ठीक, नाहीं तर सर्व फुकट जाईल हें ध्यानांत ठेवा. ( टाळ्या ). स्वराज्य म्हणजे राजा नको असें कोणी म्हणत नाहीं. ब्यूरॉक्रसी नको असेंहि म्हणत नाहीं. फक्त आमच्या तंत्रानें राज्यकारभार करा एवढीच आमची साधी सोपी मागणी आहे. अधिकारी आम्हाला पाहिजेत. काळागोरा भेद नाहीं अशी ही मागणी आहे. आजपर्यंत प्रत्येक कुलुपाला किल्ल्या लावीत बसलों पण आतां ह्या २५-३० किल्ल्या नकोत, आज आम्हांला गुरुकिल्ली सांपडली आहे. आणि ती गुरुकिल्ली म्हणजे स्वराज्य होय. ( टाळ्या ). ही गुरुकिल्ली—हें साम्राज्यांतर्गत स्वराज्य हा स्वातंत्र्याच्या मंत्राचें बीज आहे. जन्मसिद्ध हक्कांचें बीज आहे. हा मंत्राचा 'कीलक' ध्यानांत ठेवा व शपथ घेऊन उद्योगाचा निश्चय करा. ( टाळ्या ). या दृढनिश्चयाचें पांच लोक आम्हांला मिळाले तरी पुरे ! शपथपूर्वक निश्चय करा. म्हणजे पहा काय गंमत होते ती !! ही शपथ वाहावयला तयार आहां असाच मी या ( मंजूर ) शब्दाचा अर्थ समजतो. या निश्चयानें आपण या ठरावाला अनुमोदन द्याल अशी मला आशा आहे." ( टाळ्यांचा कडकडाट ).

समाप्त.

REFBK-0005706
५७०६